UNIVERSAL
LIBRARY

OU_192686

UNIVERSAL
LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83/1392Y Accession No. M45

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below.

युद्धरहस्य !

अथवा

महायुद्धाची

गुरुकिल्ली !

पुस्तक १ लें.

जर्मनीचें पाताळयंत्र !

पुस्तक २ रें.

केसरची प्रभावळ !

किंमत १। रुपया.

युद्धरहस्य !

अथवा

महायुद्धाची

गुरुकिल्ली !

पुस्तक १ लें.

जर्मनीचें पाताळयंत्र !

पुस्तक २ रें.

केसरची प्रभावळ !

किंमत १। रुपाया.

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प सतरावें.

जर्मनीचें पाताळयंत्र !



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

भगवान् श्रीकृष्ण.

प्रकाशक—प्र. श्री. भसे, गिरगांव-मुंबई.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस,' ४३२ शनवार पेठ, पुणें.

द्वितीयावृत्ति.

१९१७.

(सर्व हक्क स्वाधीन.)

किंमत बारा आणे.

प्रकाशक :
प्र. श्री. भसे,
व्यवस्थापक
भारत-गौरव-ग्रंथ माला.
गिरगांव, मुंबई.



मुद्रक,
केशव रावजी गोंधळेकर,
'जगदितेच्छु प्रेस',
४३२ शनवार पेठ, पुणें शहर.

प्रकाशकाचे दोन शब्द.

जर्मनीचें पाताळयंत्र आणि केसरची प्रभावळ या जोड पुस्तकाची ही द्वितीयावृत्ति असून ती आह्मी आमच्या आश्रयदात्यांच्या हातीं प्रेमपूर्वक देत आहों. युरोपखंडांत महायुद्धाची आग भडकण्यापूर्वी युरोपांतल्या कांहीं कांहीं देशांविषयीं यथार्थ माहिती मिळविण्याचें प्रयोजन अर्थातच कोणास पडलें नाहीं. कांहीं कांहीं देशांविषयींचें अज्ञान साधारण जनसमुहांतच होतें असें नाहीं, तर इतिहासाचा अभ्यास करणारांतहि होतें. जर्मन देश व जर्मन राष्ट्र अनेक बाबतींत युरोपांत प्रसिद्ध असल्यामुळें या देशाची माहिती इतिहासज्ञांस नव्हती, असें कांहीं ह्मणतां यावयाचें नाहीं; परंतु जर्मन राष्ट्रानें ब्रिटिश साम्राज्याशीं शत्रुत्व जोडून घेऊन सगळ्या जगाला आपल्या लष्करी बळाचा चमत्कार दाखविल्यावर इतिहासज्ञहि आश्चर्यचकित झाले आणि जर्मनीचा खरा इतिहास मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू झाला. हळू हळू ही जिज्ञासा सर्वत्र पसरून हा जर्मन शत्रू आहे तरी कसा, हें शोधण्याची इच्छा प्रत्येकास होऊं लागली. मराठी वाचकांची ही इच्छा शक्य तितक्या सुगमतेनें पुरी करावी ह्मणून हा प्रयत्न आह्मीं केला आहे. या पुस्तकाची ही द्वितीयावृत्ति इतक्या लवकर काढावी लागली, यावरून हा प्रयत्न महाराष्ट्रीयांना आवडला हें उघड दिसतें. हल्लींसारख्या बिकट स्थितींत खर्चाच्या दृष्टीनें द्वितीयावृत्ति काढणें बरेंच त्रासाचें असल्यामुळें पहिलीच आवृत्ति आह्मीं मोठी काढली होती. असें असतांहि या पुस्तकाची ही द्वितीयावृत्ति आह्मांस घाईघाईनें प्रसिद्ध करावी लागली, यावरून युद्धरहस्य जाणण्याची इच्छा बरीच वाढली आहे, असें अनुमान काढावें लागतें. नाहीं तरी प्रत्यक्ष युद्धापेक्षां युद्धरहस्यांतच अधिक मौज आहे. आमच्या विशेष परिचयाच्या महाभारतांतहि युद्धकथेपेक्षां युद्धरहस्यच अधिक मननीय आहे. याच दृष्टीनें हल्लींहि युरोपांतल्या प्रचंड युद्धाचें रहस्य शोधण्याचा प्रयत्न सर्वत्र आढळून येत आहे. एवढीं मोठालीं राष्ट्रें कशीं लढतात, हें समजण्यापेक्षां कां लढतात, हेंच समजावून घेणें अधिक महत्त्वाचें असून

तें समजलें म्हणजे या महायुद्धाची गुरुकिल्ली सांपडली, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

ज्या युद्धाचा परिणाम अनंत कालाच्या पोटांत तयार होत आहे, अशा प्रचंड युद्धासंबंधानें उगीच इकडची तिकडची माहिती गोळा करून वाचकांपुढें ठेवणें केव्हांहि अयोग्य असल्यामुळें आह्मीं या पुस्तकाचें लेखन साहित्य विशेष परिश्रमानें मिळवून तें शक्य तितकें मनोरंजक करण्याचाहि प्रयत्न केला आहे. इंग्रजींत गुप्त हेरांच्या विलक्षण गोष्टींचीं अनेक पुस्तकें आहेत व त्यांतल्या कांहीं पुस्तकांचा मालसा मराठींतहि पहावयाला मिळतो, परंतु असल्या विलक्षण व काल्पनिक कथानकांपासून हें पुस्तक अगदीं अलिप्त असून या पुस्तकांत जर्मनीच्या राजकीय हेर खात्यांत काम करणाऱ्या डॉ. आर्मगार्ड कॉर्लग्रेव्ह या नांवाच्या हेरानें लिहिलेला अगदीं खराखरा इतिहास ग्रथित केला आहे. हा इतिहास केवळ आश्चर्यकारकच आहे, असें नाहीं, तर तो अत्यंत मनोरंजक असून मननीयहि आहे. युरोपांत युद्धाची आग भडकण्यापूर्वी सर्व युरोपांतल्या राष्ट्रांची व त्या त्या राष्ट्रांतल्या मुत्सद्यांची मनोभूमिका कशा प्रकारची होती, याचें यथातथ्य चित्र या पुस्तकांत वाचकांना पहावयाला मिळेल. विशेषतः जर्मनीची कुटिल राजनीति व विलक्षण महत्त्वाकांक्षा यांची तर चांगलीच ओळख वाचकांना पटेल अशी आमची समजूत आहे.

केसरची प्रभावळ या पुस्तकाची लेखनसामग्री एकत्र करतांना श्रम, पैसा व वेळ हीं बरींच खर्च झालीं आहेत. हा प्रयत्न लोकांना आवडल्यास या सर्वांचें चीज झालें, असें म्हणतां येईल. या पुस्तकांत दिलेली माहिती जितकी मनोरंजक आहे, त्यांपेक्षांहि ती अधिक मननीय आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. राजकारणाच्या दृष्टीनें जर्मनी जगांत श्रेष्ठ आहे कीं कनिष्ठ आहे, हें सांगण्याचा या पुस्तकाचा उद्देश नसून औद्योगिक, बौद्धिक व वैज्ञानिक दृष्टीनें कोणत्या थोर पुरुषांनीं जर्मनीची उत्क्रांति कशी घडवून आणली, एवढेंच या पुस्तकांत सांगितलेलें आहे. शेतकी, यंत्रशास्त्र, व व्यापार या बाबतींत सर्व जगाच्या मागें पडलेल्या हिंदुस्थानास या लहानशा पुस्तकापासून पुष्कळ शिकतां येण्यासारखें आहे व तेवढी आमीच हिंदी जनतेच्या अंतःकरणांत उत्पन्न

झ ली, तरी देखील या लहानशा पुस्तकानें आपलें कार्य बजाविलें असें हो ल.

जर्मनचिें पाताळयंत्र हें पुस्तक १९१६ च्या मार्च महिन्यांत प्रसिद्ध केलें होतें. या पुस्तकाच्या सर्व प्रती त्याच वर्षाच्या मे महिन्यांत म्हणजे अवघ्या दीड पावणेदोन महिन्यांत खपल्या. त्यानंतर दुसरें पुस्तक केसरची प्रभावळ हें १९१६च्या जूनमध्यें प्रसिद्ध केलें आणि त्याच्याहि प्रति अवघ्या दोन महिन्याच्या अवधींत खपल्या. तेव्हांपासून या पुस्तकांना एकसारख्या मागण्या येत होत्या; परंतु छपाइचें सगळें सामान विलक्षण महाग झाल्यामुळें ही द्वितीयावृत्ति इतक्या उशीरां प्रसिद्ध करावी लागली. मागणीबरोबर ज्यांच्या हातीं पुस्तकें पडलीं नाहींत, ते वरील अडचण लक्षांत घेऊन उशिराबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. पूर्वी हीं दोन्हीं पुस्तकें निरनिराळीं छापलीं होतीं; पण आतां तीं एकत्र करून पूर्वीपेक्षां बांधणीहि मजबूत केली आहे. तसेंच या आवृत्तींत पूर्वीपेक्षां चित्रेंहि अधिक दिलीं आहेत. एकंदरींत ही द्वितीयावृत्ति प्रसिद्ध करण्यास कृपणपणा असा आम्ही मुळींच केलेला नाहीं. हल्लींसारख्या विकट परिस्थितींत हा प्रयत्न पैशाच्या दृष्टीनें आम्हांस फार डोईजड झाला आहे. या अडचणींतून पार पाडणें सर्वस्वी आश्रयदात्यांच्या स्वाधीन असल्यामुळें आमचे गुणग्राहक आश्रयदाते ग्रंथमालेस नवीन आश्रयदाते मिळवून देण्यास हयगय करणार नाहींत, असा आम्हांस भरंवसा आहे.

युद्धमान राष्ट्रें आणि राजपुरुष !

या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा मनोदय आम्हीं मागें कळविला होता व तेव्हांपासून हें पुस्तक केव्हां प्रसिद्ध होणार ? असें आम्हास आमच्या आश्रयदात्यांकडून एकसारखें विचारण्यांत येत आहे. आम्हासहि हें पुस्तक प्रसिद्ध करण्याची घाई आहेच; परंतु हा प्रयत्न अत्यंत श्रमाचा आहे. युद्धांत पडलेल्या सात आठ बलिष्ठ राष्ट्रांची व त्यांतील मुत्सद्यांची खरी व उपयुक्त माहिती मिळवावयाची व त्यावरून सुसंगत नवीन इतिहास लिहावयाचा; ही कल्पना मनांत आणली म्हणजे या कार्यासाठीं केवळ्या जबरदस्त श्रमाची आवश्यकता आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. या पुस्तकाचें लेखनसाहित्य मिळवीत असतां केव्हां केव्हां आम्ही

देखील निराश होत होतों; परंतु आम्हांस कळविण्यास आनंद वाटतों. कीं, परमेश्वरकृपेनें बरीच माहिती मिळाली असून आणखी चार दोन महिन्यांनीं या पुस्तकाचा पहिला भाग आश्रयदात्यांच्या हातीं खात्रीनें पडेल. हल्लीं सगळ्या जगाचे डोळे जर्मनीकडेच वेधलेले असल्यामुळें पहिल्या भागांत जर्मन राष्ट्र आणि जर्मन मुत्सद्दी या संबंधाचीच माहिती देणार आहों. युद्धमान राष्ट्रें आणि राजपुरुष हें पुस्तक अर्थातच फार प्रचंड होणार असून तें कांहीं भागांत प्रसिद्ध करावे लागेल. हीं पुस्तकें अत्यंत उपयुक्त व मनोरंजक तर असतीलच; पण तीं शक्य तितकीं सर्वांगसुंदर करण्याचाहि आमचा फार मानस आहे. उत्कृष्ट कागद, सुंदर छपाई, सुबक बांधणी आणि हाफटोन प्रोसेसचीं पाहण्यासारखीं चित्रें; इतक्या गोष्टी एकत्र करणें, हें हल्लींच्या महागायीच्या दिवसांत किती विकट आहे, हें कोणासहि समजण्यासारखें आहे. तथापि या आमच्या प्रयत्नास जर भरपूर लोकाश्रय मिळेल, तर चित्रें वगैरेंच्या बाबतींत या पुस्तकांत कोणताहि उणेपणा राहणार नाहीं, असें आम्ही आमच्या आश्रयदात्यांना निश्चितपणें कळवितों. आमच्या जुन्या आश्रयदात्यांनीं मात्र नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचे कामीं हयगय व उपेक्षा करूं नये. पुस्तकास लागणारी प्रत्येक वस्तु कल्पनेच्या बाहेर महाग झाल्यामुळें या पुस्तकांच्या प्रति वर्गणीदारांच्या संख्येइतक्याच काढण्याचें आम्हीं ठरविलें आहें.तसेंच द्वितीयावृत्ति काढण्याच्या भानगडींतहि अशा स्थितींत पडणें श्रेयस्कर नसल्यामुळें या पुस्तकांची द्वितीयावृत्तीहि निघावयाची नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून नवीन आश्रयदाते वर्गणीदारांत नांव नोंदण्याची त्वरा करून किती प्रती छापाव्या लागतील याची कल्पना आम्हांस लवकर करून देतील अशी आम्हांस आशा आहे. या अत्यंत उपयुक्त, आवश्यक व महनीय कार्यास प्रत्येक महाराष्ट्रीयाकडून आश्रय व प्रोत्साहन मिळेल अशा भरंवसा बाळगून हे प्रास्ताविक शब्द आम्ही पुरे करतों.

मुंबई,
गिरगांव, ता. १ मार्च १९१७.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
प्रभाकर श्रीपत भसे.



जर्मन बादशहा दुसरे वुइलियम.

जर्मनीचं पाताळयंत्र !

[कुटिल जर्मन राजनीतीचें एक चित्र.]

—:o:—

प्रकरण पहिलें.

मी हेर कसा झालों ?

इसवी सन १९१३ च्या जूनची बारावी तारीख. कोठल्याशा टॉवरवरील एका घड्याळांत साडेतीनचा ठोका पडला. या वेळीं कॉमन्स् सभेंत सॉमर्सेट परगण्याचे प्रतिनिधि मि. किंग हे बैठकीच्या जागीं बसले होते. ते आतां जो प्रश्न विचारणार होते, तो विलक्षण खळबळ उडवून देणारा होता. ते म्हणाले, " आर्मगार्ड कार्ल ग्रेव्हज् या नांवाच्या जर्मन हेरावर जो खटला चालला होता, त्यांतील कांहीं गुप्त गोष्टींचा स्फोट स्कॉटलंडचे सेक्रेटरी मि. म्याकिनान् वुड् यांनीं सभेपुढें करावा, अशी आमची इच्छा आहे. "

हीं प्रश्नोत्तरें पुढें सुरू करण्यापूर्वी त्यासंबंधीं थोडासा खुलासा करणें अवश्य आहे. हीं प्रश्नोत्तरें झालीं त्या वेळीं राजकीय गुन्हा सिद्ध झाल्यावरून मला तुरुंगाची शिक्षा मिळाली होती आणि स्कॉटलंडांतल्या एकाद्या तुरुंगांत आमची स्वारी शिक्षा भोगीत असेल, असें सर्व इंग्लंडास वाटत होतें; पण अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहरांत अस्मादिक एकदम प्रगट झाल्यामुळें सर्व इंग्लंड आश्चर्यानें थक्क होऊन गेलें होतें.

किंग यांनीं विचारलेल्या प्रश्नांतील मुख्य मुद्दे असेः—हेर म्हणून मला झालेली शिक्षा मी अद्याप भोगीत आहें कीं काय ? जर तसें नसेल, तर माझी मुक्तता केव्हां आणि कां करण्यांत आली ? माझी शिक्षेची मुदत

सांगल्यानंतर मला देशाबाहेर हांकून देण्यांत येईल कीं काय ? अथवा सध्याच मला तशा रीतीनें हद्दपार केलें आहे ?

यापुढें एडिंबरो येथील स्कॉटस्मन् वर्तमानपत्राच्या १९१३ तील जून बारा तारखेच्या अंकांतील उतारा जशाचा तसा देतों.

स्कॉटलंडचे सेक्रेटरीः—ग्रेव्हज् याला गेल्या दिसेंबरांत मुक्त करण्यांत आलें. राजेसाहेबांना दयादानाचा जो विशेष हक्क आहे, त्या हक्काच्या अमलाखालीं ग्रेव्हज् याला तुरुंगांतून सोडण्यांत आलें. राजेसाहेबांनीं हा हक्क या प्रसंगीं कां बजावला, याचा खुलासा करणें पूर्वापार पद्धतीस अनुसरून नाहीं. हा कोणत्या जातीचा मनुष्य आहे, हें मला सरकारी रीतीनें समजलें नाहीं. याला हद्दपार करावा, अशा-प्रकारची शिफारस जजसाहेबांनीं शिक्षा देतांना केली नव्हती.

मि. किंगः—त्याची प्रकृति नादुरुस्त झाली, म्हणून त्याला मुक्त करण्यांत आलें काय ?

सेक्रेटरीः—त्याची प्रकृति बरोबर नव्हती, असें मला वाटतें; पण याहून अधिक खुलासा मला करतां येत नाहीं.

मि. किंगः—त्याला मुक्त केलें, तेव्हां त्याच्याशीं कांहीं विशेष अटी ठरविण्यांत आल्या होत्या काय ?

सेक्रेटरीः—मला वाटतें या प्रश्नाचें उत्तर मीं पूर्वीच दिलें आहे. (सभेंत नाहीं नाहीं अशी मोठी ओरड होते.)

मि. किंगः—आमचे सन्मान्य सेक्रेटरीसाहेब अधिक खुलासा करतील काय ? (हशा) यांत खरा प्रकार काय आहे, हेंच जाणण्याची सभासदांची इच्छा आहे. सन्मान्य सेक्रेटरीसाहेब याहून अधिक स्पष्ट खुलासा न करतील व ग्रेव्हज् याला कांहीं अटीवर मुक्त करण्यांत आलें कीं काय, हें न सांगतील, तर मला हाच प्रश्न पुन्हां विचारावा लागेल. (हंशा.)

नंतर सभापति (स्पीकर) मध्यें पडून त्यांनीं हा वाद येथेंच थांबविला आणि हा विषय तितकाच राहिला.

पुन्हां अधिक प्रश्नोत्तरें होण्याचा रंग दिसूं लागला, पण सभापतीला

आंतून ताबडतोब सूचना मिळाली आणि हा विषय पुरा झाला, असें त्यास पुकारावें लागलें.

आतां सेक्रेटरीसाहेबांनीं दिलेल्या उत्तराचा थोडासा विचार करा. ते म्हणतात, " राजेसाहेबांनीं आपल्या विशिष्ट हक्काचा उपयोग कां केला, याचा खुलासा करणें पूर्वपरंपरेस अनुसरून नाहीं. " या उत्तराचा खरा अर्थ इतकाच कीं, राजेसाहेबांच्या हक्काचा उपयोग करून बार्लिनी येथील तुरुगांतून माझी गुप्तपणें सुटका करणें इंग्लंडांतील उच्च अधिकाऱ्यांस युक्त वाटलें. कां ? हेंच मी पुढे हळु हळू सांगणार आहें.

तसेंच माझी जात कोणती, हें सरकारी रीतीनें माहीत नाहीं, असें सेक्रेटरी साहेबांनीं कां म्हटलें, हेंहि पहाण्याजोगें आहे. या उत्तरांत फार गूढ अर्थ होता, हें पुढें तुमच्या लक्षांत येईलच.

माझ्या संबंधानें तीन गोष्टींशीं वाचकांना कांहीं कर्तव्य नाहीं. एक माझें मूळ घराणें, माझी जात आणि माझी नीतिमत्ता. मी खरोखर कोण आहें, हें ज्यांना ठाऊक आहे, असे पुरुष फक्त तीनच आहेत आणि या तिघांपैकीं एक मोठा सत्ताधारी बादशहा आहे. मी खरोखर कोण आहें, याचा सुगावा या तिघांपैकीं एक जणहि तुह्मांस लागूं देणार नाहीं. कांहीं खोट्यानाट्या सब्बाहात बाता झोंकून जगांत उगीच गडबड उडवून द्यावी या गोष्टीचा मला मनापासून तिटकारा आहे. पुढील हकीकत सांगण्यांत कांहीं प्रसंग असे आहेत कीं, त्यांचा उल्लेख करण्याचें धाष्टर्य मूर्खावांचून दुसरें कोणी करणार नाहीं, आणि असें धाष्टर्य कोणीं केलें, तर त्याचें कटु फळ त्याला मिळाल्यावांचून रहाणार नाहीं. जगांतील मोठ्या सामर्थ्यवान् राष्ट्राच्या सरकारालाहि माझी पूर्वपिठिका चव्हाट्यावर आणणें इष्ट वाटलें नाहीं. तीन सभासदांनीं पिच्छा पुरविला असतांहि मि. म्याकिनान्वुड यांनीं माझ्याबद्दलची माहिती सांगितली नाहीं. कदाचित् सेक्रेटरीसाहेबांना माझी पूर्वपीठिका माहीत नसेल; अथवा यासंबंधानें उत्तर न देणें, हेंच त्यांना सयुक्तिक वाटलें असेल.

शेंकडों वर्षें ज्या घराण्यानें आपल्या पितृभूमीचीं अनेक कार्यें बजाविलीं व अनेक उलाढालींत जातीनिशीं काम केलें, अशा एका घराण्यांत

माझा जन्म झाला. या घराण्यांत मी एकुलता एकच मुलगा असल्यामुळें अर्थात् त्या घराण्याचा लौकिक, संपत्ति व इतर हक्क वगैरे हीं सर्व मला एकट्यालाच मिळावयाचीं होतीं ! ही गोष्ट अगदीं खरी होती आणि लहानपणापासून मला ही गोष्ट अगदीं स्पष्ट दिसत असल्यामुळें मीं आपल्या अयुष्याचा बराचसा भाग निरुद्योगावस्थेंत घालविला आहें. मनाची अशी समजूत असल्यामुळें मीं विशेष काळजीपूर्वक शिक्षण संपादन केलें नाहीं, हें खरें; पण तें मला अगदींच लाभलें नाहीं, असें कांहीं नाहीं. वडिलार्जित सर्व हक्क मला प्राप्त होतील, असें मला वाटलें होतें खरें; पण कांहीं कारणांमुळें ते हक्क मला प्राप्त झाले नाहींत आणि आतां ते होणें शक्यहि नाहीं. लहानपणापासून माझ्या मनांत फार उच्च आकांक्षा असत; पण ज्यांच्याकडून मदतीचीं अनेक आश्वासनें मला मिळालीं होतीं, त्यांच्याकडून वचनभंग झाल्यामुळें माझे सारे हेतु जागच्या जागीं राहिले आणि पुढील आयुष्यांत मला जे टक्केटोणपे खावे लागले, त्यामुळें आतां मी शुद्ध दैववादी बनून राहिलों आहें. केवळ याच कारणामुळें माझ्या बऱ्यावाईट स्थितविषयक मला आतां कांहींच वाटेनासें झालें आहे. हा वेळपर्यंतचा आयुष्यक्रम मला स्वतःच्या मनगटाच्या जोरावरच कंठावा लागला आहे. तरी मीं दुःखाबरोबर सुखहि पुष्कळ उपभोगिलें आहे आणि अनेक वेळां चांगल्या चैनीनें दिवस घालविले आहेत. एकंदर एकुणचाळीस वर्षांच्या अवधींत मी जितक्या चमत्कारिक प्रसंगांत सांपडलों, तितके प्रसंग सामान्य मनुष्याच्या वांट्यास बहुतकरून येत नसतील !

आमच्या घराण्याच्या चालीप्रमाणें मला लष्करी शिक्षण मिळालें होतें. हें शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एका सुप्रसिद्ध विद्यालयांत मीं तीन वर्षें अभ्यास केला. हें शिक्षण मीं संपादन केल्यामुळें पुढें विश्वविद्यालयांतील शिक्षण घेण्याची पात्रता माझ्या अंगीं साहजिकच आली व त्याप्रमाणें पुढें एका जुन्या विश्वविद्यालयांत कांहीं काळ घालवून तत्त्वज्ञान आणि वैद्यक या विषयांत मीं डिग्री घेतली. या वेळीं माझें वय २२ वर्षांचें होतें आणि वयोमानानें पहातां ही प्रगति कांहीं लहानसहान म्हणतां यावयाची नाहीं. ज्ञानसंपादनाची हौस मला लहानपणापासूनच होती आणि विशेषतः

भौतिक शास्त्रें आणि देशोदेशींच्या भाषा शिकण्याकडे माझ्या मनाचा जास्त कल होता. एका वेळीं सिंगाली आणि तामील या भाषांचें पोटापुरतें ज्ञान मीं अवघ्या तीन महिन्यांत मिळाविलें.

विद्यालयाचा क्रम पुरा करून मी घरीं आलों. स्वभावतः मी एककल्ली आणि हट्टी आहें; इतकेंच नव्हे, तर मी दुराग्रहीहि आहें. माझ्या घराण्यावर आणि तसेंच माझ्या देशावर अनेक प्रकारच्या आपत्ति कांहीं इतर देशांच्या खटपटीनें कोसळल्या आहेत, असा माझा लहानपणापासूनच समज करून देण्यांत आला होता. माझ्या घराण्यावर जीं अनेक संकटें ओढवलीं, त्यांचा पाढा विद्यालयांतून बाहेर पडल्याबरोबर मी वाचूं लागलो. या बडबडण्यांत कित्येक वेळां अधिकाऱ्यांवरहि मीं नानाप्रकारचे आरोप करण्यास कमी केलें नाहीं. त्यांच्याकडून अनेक वेळां मला समजूत मिळाली असतांहि माझी बडबड न थांबल्यामुळें सहजच मी त्यांना फार नावडता झालों. शेवटीं गोष्टीवरून गोष्ट वाढतां वाढतां इतका प्रसंग आला कीं, मला कांहीं दिवस लांब कोठें तरी पाठविणें बरें, असें माझ्या आप्तेष्टांस वाटलें. सध्यां माझ्या घराण्यांतील माझे आप्त व मी हे एकमेकांस अगदीं पारखे झालेले आहों आणि आतांपर्यंत ज्या कांहीं गोष्टी घडल्या, त्यांवरून झालें हें बरेंच झालें, असें मला वाटतें.

माझ्या कुटुंबाशीं माझा संबंध अशा रीतीनें तुटल्यानंतर जगांत कोठें तरी भटकण्याचा उपक्रम मीं सुरू केला. जगांतील जंगली मुलखांत मीं बराच प्रवास केला. या ठिकाणीं जें अनेक वस्तूंचें मीं निरीक्षण केलें, तें माझ्या भावी अयुष्यक्रमांत मला फार उपयोगी पडलें. कोणत्याहि देशांत गेलों, म्हणजे तेथल्या मूळच्या रहिवाशांशीं मी बराच संबंध ठेवीत असें. हे मूळचे रहिवासी विलक्षण संशयखोर असतात व विशेषतः कोणाहि युरोपियाला ते आपल्या पोटांत शिरूं देत नाहींत. तथापि अशा लोकांचाहि विश्वास संपादन करण्याची विद्या मला लवकरच साध्य झाली. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांतील बहुतेक प्रदेशांत मीं प्रवास केला आणि हीं दोन्ही ठिकाणें मला फार आवडलीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या पश्चिम भागांत मी कधीं गेलों नाहीं; तथापि तेथील ज्या कांहीं गोष्टी माझ्या

कानावर आल्या, त्यांवरून तिकडची राहणी ऑस्ट्रेलियांतील राहणीप्रमाणेंच स्वच्छ आणि आरोग्यदायक असावी, असें मला वाटतें.

येथून पुढें दक्षिणमहासागरांतील बेटांत प्रवास करण्याचा मीं बेत केला; पण इतक्यांत दक्षिणअफ्रिकेंतील आकाश मेघांनीं व्याप्त होऊं लागलें. तेथें लवकरच तलवारींचा चकचकाट आणि तोफांचा गडगडाट होणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. अशा परिस्थितींत मुद्दाम जाऊन पडण्याची गरज माझ्यासारख्या प्रवाशाला नव्हती; पण माझा स्वभाव असा कांहीं विलक्षण कीं, जरूर नसेल अशाच जागीं जाऊन तोंड खुपसावयाचें. या माझ्या स्वभावाला अनुसरून केपटाऊनला जाणारी पहिलीच बोट मीं पकडली. मी तेथें जाऊन पोहोंचल्यानंतर एक महिन्यानें युद्धाला सुरुवात झालीच. बोटींतून उतरल्यानंतर घोड्यावरून मीं खाणीच्या भागाकडे प्रवास केला. मनुष्याच्या आयुष्यांत कित्येक वेळां अशा कांहीं गोष्टी घडतात कीं, बाह्यतः त्या अगदीं क्षुल्लक दिसल्या, तरी त्यांमुळें त्याचा सारा आयुष्यक्रम बदलून जातो. अशाच प्रकारची एक गोष्ट येथें घडली. डूर्नक्लुफ नांवाच्या गांवीं एका सकाळीं मी पोहोंचलों. त्या वेळीं धुकें पडलें होतें आणि हवेंत गारठाहि बराच होता. माझ्या भावी आयुष्यक्रमाला नवें वळण लावणारी गोष्ट याच गांवीं घडली.

डूर्नक्लुफ हा पिशाच्यांच्या वस्तीचा गांव आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. रखरखीत वाळूच्या मैदानांत थोड्याशा पत्र्यांच्या झोंपड्या बांधून तेथें बोअर लोकांनीं वस्ती केलेली आहे. मृतसमुद्राच्या काठीं वनस्पती देखील उगवत नाहींत, अशी त्याची ख्याति आहे. या बाबतींत हा गांव त्या समुद्राशीं खास साम्य करील. सूर्योदय होऊन एक तासभर झाला न झाला, तोंच अंगावर उन्हाची फोडणी बसूं लागावयाची आणि सूर्यास्तानंतर तासभरानें थंडीमुळें अंगाचा आंकडा वळावयाचा, अशी ही येथल्या हवेची स्थिति आहे. येथें सुमारें चारशें बोअर लोकांची वस्ती आहे. हे लोक अत्यंत आकुंचित वृत्तीचे आहेत. यांची कल्पनाप्रतिभा झटली, तर ती गवतावर उडणाऱ्या नाकतोड्यांच्या कल्पनाशक्तीहून अधिक विस्तृत नाहीं. डूर्नक्लुफ गांवाचें हें चित्र झालें.

मी गांवांत शिरलों त्या वेळीं मी अगदीं त्रासून गेलों होतों. पोटांत सडकून भूक लागली होती, पावसानें भिजून चिंब झालों होतों आणि त्यांत त्या गांवचा देखावा पाहून माझें मस्तक अगदीं भणाणून गेलें होतें. पहावें तिकडे उदासपणा पसरलेला. जवळपास कोठें खानावळहि दिसेना, आणि लोक आदरातिथ्यांत इतके उदार कीं, त्यांच्या घरीं जन्मांत कावळ्याचें तोंडहि उष्टें व्हावयाचें नाहीं. मी म्हणजे मोठा सुस्वभावी आहें असें नाहीं; पण या साऱ्या प्रकारानें माझें मन अगदीं फाटून गेलें यांत नवल नाहीं. आतां कोणाला तरी चावावें कीं, गिळावें, असें मला होऊन गेलें. तसाच मी घोड्यावर बसून थोडासा रस्ता पुढें चालून गेलों, तों समोरच एक लठ्ठ बोअर एका बाराचवदा वर्षांच्या 'नेटीव' मुलाला चाबकाखालीं झोडपीत आहे, असें दिसलें. अफ्रिकेंतल्या रानटी प्रजेला सुसंस्कृत करावें, म्हणून बोअर लोकांनीं तेथें वस्ती केली; पण त्यांना सुसंस्कृत करण्यांत बायबलापेक्षां चवदावें रत्न अधिक उपयोगी पडतें, असा समज या बोअर मनुष्याचा असावा. मीं मध्यें पडून त्या मुलाला सोडविलें. त्याच्या पाठीचें अगदीं धिरडें होऊन गेलें होतें. त्याचें मूळचें नांव त्यानें मला सांगितलें; पण त्याचा उच्चार करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें असल्यामुळें मी त्याला 'किम्' हें नांव दिलें. हा मुलगा आफ्रिकेंतील बासोटो जातीचा आहे. त्याची माझ्यावर लवकरच भक्ति बसली आणि तो अद्यापीहि माझ्याबरोबर आहे. मीं त्याला जीवदान दिलें असा त्याचा समज झाला आहे आणि ह्या माझ्या उपकाराची फेड त्यानें आजवर अनेक प्रसंगीं केली आहे. पुढें थोड्याशा महिन्यांनीं माझ्या आयुष्याचा सारा क्रम बदलण्यास हाच 'किम्' न कळत कारणीभूत झाला. जें व्हावयाचें तें होतेंच, असा माझा समज असल्यामुळें मला असल्या गोष्टींचें फारसें नवल वाटेनासें झालें आहे.

मीं किमला स्वतःच्या नोकरींत ठेवलें आणि त्याच्या कामांत त्याला तरबेज केलें. थोड्या दिवसांनीं पोर्टमेटल या गांवीं आम्ही गेलों. या वेळीं बोअर युद्ध सुरू झालें होतें. या युद्धांत डॉक्टर या नात्यानें सैन्याच्या इस्पितळांत मीं नौकरी धरली. ज्या ठिकाणीं लढाईची फार

गर्दी असे, अशा जागीं आम्हांस जावें लागे. मॉडर नदीवरील लढाईत जे कित्येक घायाळ लोक शुश्रुषेसाठीं इस्पितळांत आले, त्यांत एक परदेशीय अधिकारी होता. असे पुष्कळ अधिकारी बाहेर देशांतून बोअर लोकांस मदत करण्यासाठीं आले होते. यांतल्याच एका अधिकाऱ्याला किम् यानें त्याची जखम बांधण्यासाठीं मजकडे आणलें. जखम बरीच काळजी करण्यासारखी होती, यामुळें त्या अधिकाऱ्याला वारंवार तपासणें मला भाग होतें. त्या अधिकाऱ्याच्या व माझ्या अनेक गप्पागोष्टीहि होत असत. कित्येक वेळां माझ्या तोंडून जी कांहीं माहिती न कळत बाहेर पडे, ती एकत्र जुळवून मी कोण, तें या गृहस्थानें बरोबर ताडलें. या गृहस्थांचें नांव फ्रिहर फॉं रिटझेन्स्टीन असें असून सैन्यांत त्यांचा मेजरचा हुद्दा होता. मी देशत्याग कां केला, यांचीं खरीं कारणें ज्या थोड्याशा लोकांना माहीत आहेत, त्यांपैकींच हेहि एक गृहस्थ होते.

माझी व या गृहस्थांची जानपछान अधिक अधिक होऊं लागली व साहजिकच आमच्या गप्पागोष्टीहि अधिक अधळपधळ होऊं लागल्या. अशा गोष्टी चालतां चालतां एके दिवशीं ते मला म्हणाले, " तूं जर्मनीच्या एकाद्या पोलिटिकल खात्यांतं नौकरी कां करीत नाहींस ? " माझें शिक्षण आणि माझा सामाजिक दर्जा हीं असल्या कामांत फार उपयोगीं पडतील असें त्यांचें मत दिसलें. दुसरें असें कीं, असल्या राजकीय उलाढालींत मला जें शान व वजन प्राप्त होईल, तें खाजगी रीतीनेंहि माझ्या उपयोगीं पडेल असें ते म्हणाले. माझे भाऊबंद जो माझा हक्क बळकावून बसले होते, तो त्यांजकडून हिसकावून घेण्यास मला ही नौकरी उपयोगीं पडेल, असें त्यांचें म्हणणें दिसलें. राजकीय उलाढालीच्या नौकरींत मोठ्या वजनदार लोकांशीं संबंध घडणार आणि त्याचा उपयोग मला खाजगी रीतीनें करून घेतां येईल, हें त्यांचें म्हणणें मला पटलें. जर्मनीच्या हेराची नौकरी मीं कां पत्करली, याचें हें मुख्य कारण आहे. काउन्टसाहेब जर थोडा अधिक काळ जगले असते, तर माझा हा मूळचा हेतु सिद्धीस गेला असता यांत संशय नाहीं; पण आफ्रिकेंत आमची गांठ पडल्यानंतर तीन वर्षांनीं ते एका शर्यतींत मृत्यु पावले आणि माझ्या

एका उत्तमोत्तम स्नेह्याच्या प्रेमाला मी मुकलों. ह्या काळांत ह्या हेराच्या धंद्यांत माझे पाय इतके खोल रोंवले गेले होते कीं, ते तेथून बाहेर काढणें मला शक्य नव्हतें. हा धंदा सोडावा असें अनेक वेळ माझ्या मनांत येई; तथापि त्यांतून माझे पाय बाहेर पडले नाहींत, इतकी गोष्ट खरी. पूर्वार्जित जिनगी मला प्राप्त करून देण्याविषयीं अनेकांनीं वचनें दिलीं होतीं; पण तींहि कोणीं पाळलीं नाहींत.

अशा रीतीनें काउन्ट रिटझेन्स्टीन यांचें व माझें संगन मत झालें व त्यांच्या कार्यांत मीहि त्यांना मदत करूं लागलों. या बोअर युद्धांत इंग्रजसैन्याविषयीं पुष्कळ माहिती जर्मनीला मिळाली आणि तींतील कांहीं भाग अस्मादिकांनींच पुरविला आहे. माझ्या डाक्तरीच्या पेशामुळें मला कोठेंहि जाण्यास मज्जाव नसे आणि माझ्याबद्दल कोणी पूसतपासहि करीत नसे. यामुळें ब्रिटिश सैन्यांतील शिस्त, त्यांची शस्त्रास्त्रसामग्री आणि सैन्याचा दम यांजबद्दल बरीच अंतस्थ माहिती मीं इकडून तिकडून गोळा केली. ब्रिटिश वसाहतींतून येणारे ऑफिसर लोक बोलण्यांत बरेच ढिले असतात, असें माझ्या अनुभवास आलें. अनेक बाबींसंबंधीं अगदीं मोकळेपणानें ते आपलें जिव्हास्त्र चालवीत असत. ही सारी माहिती काउन्ट रिटझेन्टस्टीन यांच्या जखमा बांधतांना त्यांना मी सांगत असें. एके दिवशीं ते मला म्हणाले, ' युद्ध संपल्यावर मला बर्लिन येथें भेटण्यास विसरूं नका, हं !'

ब्रिटिश वसाहतींतील ऑफिसरांकडून कांहीं अधिक माहिती मिळवावी या हेतूनें मींहि एके दिवशीं त्यांच्या वादविवादांत शिरून आपलें जिव्हायंत्र सुरू केलें; पण याचा परिणाम असा झाला कीं, एके दिवशीं लॉर्ड किचनर यांजकडून मला बोलावणें आलें. त्यांच्या तंबूंत जाऊन मी त्यांच्या समोर उभा राहिलों, तों ते एकदम तुसडेपणानें म्हणाले, " डॉक्टर, क्यांप सोडून जाण्यास तुम्हांला चोवीस तासांचा अवधि दिला आहे. "

माझ्या अंतःस्थ चळवळी लॉर्डसाहेबांच्या ध्यानीं आल्या, कीं, त्या वसाहतवाल्यांनीं त्यांचे कान फुंकले कोणास माहीत; पण या खारटुमच्या

सरदाराची वृत्ति मला माहीत असल्यामुळें त्यांनीं दिलेल्या मुदतींत सैन्याचा तळ मीं सोडला.

कांहीं दिवसांनीं काउन्टसाहेबांची प्रकृति चांगली सुधारल्यामुळें त्या युद्धांत पुनः बोअर लोकांच्या बाजूनें न लढण्याविषयीं वचन घेऊन त्यांस मुक्त करण्यांत आलें व ते केपटाऊन येथें आले आहेत, असें मला समजलें. ब्रिटिश लोकांनीं प्रिटोरिया घेतल्यानंतर थोड्या दिवसांनीं मीं अफ्रिका सोडली. त्या झोटिंग बादशाहींत राहण्याचा मला कंटाळाच आला होता. बराच काळ बर्लिन येथें रहावें या उद्देशानें मी त्या शहरीं आलों. या शहराची मला पूर्ण माहिती होती आणि शिक्षण घेत असतां बराच काळ तेथें राहिल्यानें त्या शहराबद्दल माझ्या मनांत प्रेमहि उत्पन्न झालें होतें. कसल्याहि गोष्टीची काळजी म्हणून करावयाची नाहीं, असा माझा स्वभाव असल्यामुळें मीं तेथें बरेच दिवस शुद्ध आळसांत घालविले. वास्तविक पाहतां तेथें आल्याबरोबर काउन्ट रिटझेन्स्टीन यांची भेट घ्यावयास पाहिजे होती, पण बरेच दिवस आळसांत घालविल्यावर मी त्यांच्या घरीं त्यांना भेटावयासाठीं गेलों. त्या वेळीं काउन्टसाहेब अप्परगार्टन येथील शर्यतीस जाण्यासाठीं बाहेर जाण्याच्या तयारींत होते, असें दिसलें. हे मोठे पटाईत स्वार आहेत, आणि प्रत्येक शर्यतींत काउन्टसाहेब असावयाचेच, असा त्यांचा साऱ्या प्रशियांत लौकिक होता. त्यांनीं मला आपल्याबरोबर मैदानावर बोलाविलें आणि त्यांचा नौकर त्यांची गाडी आणण्यासाठीं गेला असतां, मधल्या वेळांत त्यांनीं ती पूर्वीची गोष्ट पुनः मजपाशीं काढली. जर्मनीच्या हेरखात्यांत शिरण्याविषयीं ते मला आग्रह करूं लागले.

ते म्हणाले, " आज किती तरी दिवस मी तुमची वाट पहात आहें. नौकरींत शिरण्याचा तुमचा मार्ग मीं बराच निष्कंटकहि करून ठेवला आहे. त्या खात्यांतले एक दोन मुख्य अधिकारी आज मैदानावर भेटण्याचा संभव आहे. तुमची मर्जी असेल, तर तुमची व त्यांची आजच मुलाखत करून देतों. " मीं विचारलें, " मला कोणीं ओळखील असें

तुह्मांस वाटतें काय ? माझा खरा दर्जा कायम ठेवून नौकरींत शिरणें अशक्य आहे, ही गोष्ट आपणास ठाऊक आहेच. "

काउंट म्हणाले, " छे ! छे ! ती शंका देखील नको. तुह्मी खरोखर कोण आहां, हें फक्त एकाच व्यक्तीला सांगावें लागेल. "

ही एकच एवढी महत्त्वाची व्यक्ति कोण हें मला नंतर कळलें. मी ह्मणालों, " ठीक आहे. यत्न करून तरी पाहूं या. "

काउंटसाहेब स्वतःच गाडी हांकीत असत. त्यांनीं मला आपल्या शेजारींच बसावयास बोलाविलें. वाटेनें जातांना माझ्या खाजगी कामाबद्दल आह्मीं बरीच चर्चा केली. माझ्या खाजगी बाबतींत काउंटसाहेबानीं बरीच सहानुभूति दाखविली आणि त्यांच्या संभाषणानें नौकरी पत्करण्याकडे माझा कल अधिक अधिक होऊं लागला. आह्मी मैदानावर जातों, तोंच काउंटसाहेबांनीं भाकित केल्याप्रमाणें गोष्ट घडून आली. दोन विशिष्ट व्यक्तींची व काउंटसाहेबांची सलामी झाली. यांपैकीं एका गृहस्थाचें नांव क्याप्टन झूरसी फॉं ट्याप्केन असें असून दुसऱ्याचें नांव हर फॉं रिक्टर असें होतें. काउंटसाहेबांनीं या दोघांची व माझी ओळख करून दिली, तेव्हां माझें नांव डॉक्टर फॉं ग्रेव्हर असें सांगितलें. यानंतर प्रसंग पडेल तेव्हां याच नांवाचा विपर्यास मी ग्रेव्हज या इंग्रजी नांवांत करीत असे. माझ्याशीं थोडा वेळ गप्पागोष्टी करून क्याप्टन फॉं ट्याप्केन यांनीं मला आपल्या ऑफिसांत भेटण्यासाठीं बोलाविलें. हे आरमाराच्या बातमी खात्याचे मुख्य अधिकारी असून हें ऑफिस कोनिगरग्रेटझर या रस्त्यावर नं. ७० च्या घरांत होतें. शर्यती संपेपर्यंत या विषयाचा पुन्हा त्यांनीं उल्लेख केला नाहीं. हर फॉं रिक्टर यांनीं मात्र माझी बरीच चवकशी केली. मीं कोठें कोठें प्रवास केला आहे, आणि मला किती भाषा येतात, इत्यादि अनेक प्रश्न त्यांनीं मला केले. माझ्या उत्तरांनीं ते खुष झाले असावेत असें दिसलें. मधून मधून 'वाहवा, शाबास' असेहि उद्गार त्यांच्या तोंडून निघत, त्यावरून ते बरेच खुष झाले, असें मला दिसलें.

माझ्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून क्याप्टन् ट्याप्केनचे ऑफिसांत दुसरे दिवशीं मी गेलों नाहीं. तीन दिवसांनंतर क्याप्टनकडून एक गोड

भाषेंत लिहिलेलें पत्र मला आलें. त्यांत त्यांनीं मला शक्य तितक्या लवकर भेटण्यास बोलाविलें होतें. कांहीं महत्त्वाच्या कामाबद्दल माझ्याशीं बोलावयाचें आहे, असेंहि त्यांनीं कळाविलें होतें. पत्राप्रमाणें ऑफिसांत जाऊन मी हजर झालों. कोनिगरग्रेडझरस्ट्रासी नं. ७० हें घर इतर खात्यांच्या घराप्रमाणेंच विशिष्ट पद्धतीचें बांधलेलें आहे. जर्मनीच्या सरकारीखात्यांच्या इमारती बांधण्यांत शोभेपेक्षां टिकाऊपणाकडेच अधिक लक्ष दिलें असतें. शिस्त, सुव्यवस्थितपणा आणि टापटीप यांजबद्दल जर्मनीची ख्याति आहे, आणि तीच गोष्ट या खात्यालाहि लागू आहे. तसेंच इतर खात्यांप्रमाणें या खात्यावरहि नेहमीं खडा पहारा असतो. दरवाजावर एक द्वाररक्षक आणि एक कामिशनर म्हणून अधिकारी असतो. हा कमिशनर अगदीं निबोल्या असावयाचा. तुमच्या नांवाची चौकशी करून तुह्मांस ज्याला भेटावयाचें असेल, त्याला तुमच्या आगमनाची वर्दी कळाविणें हें याचें काम आहे. ही माहिती तो एका बुकांत नोंदून घेतो आणि ऑफिसांतील अपेक्षित गृहस्थास टेलिफोन करतो. त्याजकडून जबाब आला म्हणजे, तुह्मांस आंत जाण्यास परवानगी मिळते अथवा नकाराचा जबाब मिळतो. तुम्ही आंत जातांना तुमच्याबरोबर एक रक्षक दिला जातो व थेट आंतल्या दारांतून तुह्मी जाईपर्यंत तो तुमची पाठ सोडीत नाहीं. तुह्मी केवढेहि विख्यात पुरुष असलां, तरी या रक्षकाचें शुष्ककाष्ठ तुमच्या मागें असावयाचेंच. बाहेर पडतांनाहि या साऱ्या गोष्टी पुनः व्हावयाच्याच. तुह्मी ऑफिसांत किती वेळ राहिलां, याचीहि नोंद येथें केली जाते.

माझें नांव वर गेल्याबरोबर मला एकदम आंत बोलावण्यांत आलें. क्याप्टन फॉं ट्याप्केन यांच्या खाजगी खोलींत पोहोंचण्यापूर्वी दुसऱ्या तीन खोल्या मला ओलांडून जाव्या लागल्या. या खोल्यांत खाजगी चिटणिसांचीं ऑफिसें होतीं. क्याप्टनसाहेब आपल्या खोलींत आपल्या दर्जाचा दर्शक असा आरमारी पोषाक घालून बसले होते. जर्मनीच्या हेरखात्यांत सर्व अम्मलदारांना असाच आपल्या दर्जाचा पोषाक वापरावा लागतो आणि या खात्यांतील मुख्य अधिकारीहि लष्करी किंवा

आरमारी नौकरींतील असतात. त्यांचे चिटणीस व इतर कारकून मंडळी हे मात्र सामान्य नागरिकांपैकींच असतात, आणि असें असण्याचें एक विशेष कारणहि आहे. सर्व खात्यांतील प्रमुख अधिकारी हे जुन्या प्राशियन घराण्यांतून निवडलेले असतात. हीं सर्व घराणीं जमनिदारांचीं असून लष्करी नौकरी करण्यास बांधलेलीं असतात. नौकरीबद्दल बादशहाकडून त्यांस इनाम जमिनी असल्यामुळें अर्थातच हीं घराणीं अत्यंत राजनिष्ठ आहेत. हे लोक अत्यंत राजनिष्ठ असले, तथापि हेरखात्यांत जीं कांहीं अनुचित कर्में अवश्य करावीं लागतात, तीं करण्यास ते नाराज असतात. एकादी विशिष्ट गोष्ट कशी करावी, याचा फक्त दर्शनी नकाशा मात्र ते तयार करून देतात. प्रत्यक्ष कार्य करून आपले हात ते मळवून घेत नाहींत. आतां फॉ झेंडेनसारखे कांहीं जुने लष्करी अधिकारी असल्या कामांत प्रत्यक्ष पडतात, ही गोष्ट खरी; पण असल्या माणसांना सामाजिक दर्जा कांहींच उरलेला नसतो, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. आरमारी अथवा सेनेंतील कोणताहि अधिकारी या हेरखात्यांत कधींहि काम करावयाचा नाहीं.

फॉ ट्याप्केन यांनीं माझें स्वागत मोठ्या चतुरतेनें केलें. आरमारांतल्या आणि लष्करांतल्या प्राशियन अधिकाऱ्यांत हा एक विशेष गुण आहे. कोणाचें स्वागत कसें करावें व कोणाशीं कसें बोलावें हें कौशल्य त्यांच्या अंगीं पूर्ण भरलेलें आहे. हा गुण इंग्रज अधिकाऱ्यांत सांपडत नाहीं. इंग्रज अधिकारी अधिक तुसडा असतो. यामुळें त्याला भेटावयास जाणारे लोक थोडेबहुत तरी नाखुष होऊन परत जातात.

मला बसावयास खुर्ची देऊन व आपल्या चिरूटाची पेटी माझ्यापुढें सरकावून क्याप्टन म्हणाले, " कसें काय डॉक्टरसाहेब, मग हेरखात्यांत शिरण्याचा तुम्हीं निश्चय कला ना ? ज्याला प्रवासाची आणि उलाढाल्या करण्याची आवड असेल, त्याला हा धंदा मानवेल हें मी खात्रीनें सांगतों. तुमची एकंदर तयारी आणि तुमचा पूर्वानुभव यांबद्दल पूर्ण विचार करतां हा आपला संबंध परस्परांस फायदेशीर होईल, याबद्दल मला संशय नाहीं."

कसल्या प्रकारची कामागरी मला करावी लागेल, असें मीं त्यांना

विचारलें, तेव्हां ते म्हणाले, "पण आधीं नौकरी करण्याचा तुमचा निश्चय झाला आहे कीं नाहीं, हें सांगा. कामाच्या समजुतीसंबंधीं मी तुह्मांस मग सांगेन."

त्यांचें हें म्हणणें रास्त वाटून मीं उत्तर दिलें, "होय. माझी तयारी आहे; पण साऱ्या नीतीला गुंडाळून ठेवून एकादें अकर्म तुह्मी मला सांगाल; तर तें मात्र माझ्या हातून होणार नाहीं." माझें भाषण ऐकून त्यांच्या चेहऱ्यावर हास्याची लहानशी लकेर झळकूं लागली. थोड्या वेळानें सरळ माझ्याकडे पाहून ते म्हणाले, "जीं शस्त्रें लोक आमच्या विरुद्ध वापरतात, त्यांचाच उपयोग आह्मीहि करतों. या बाबतींत अधिक चोखाळपणा करून आमचें चालावयाचें नाहीं. एकंदर देशाचे हिताहितसंबंध या बाबतींत अगोदर पाहिले पाहिजेत. हें मोठें कार्य साधतांना नीतीच्या खाजगी कल्पनांस वाव देतां उपयोगी नाहीं. आतां तुमच्या कामासंबंधीं ह्मणाल, तर आह्मांला जरूर लागेल ती माहिती पुरविणें, हें तुमचें पहिलें कर्तव्य आहे. ती माहिती तुह्मी भल्या अथवा बुऱ्या कोणत्याहि मार्गानें मिळवा. आमचें लक्ष तुह्मीं दिलेल्या माहितीवर असतें. ती तुह्मीं कशी मिळविली, हें पहाण्याचें आमचें काम नाहीं. एकाद्या कामागिरीवर तुमची नेमणूक झाली, म्हणजे तिच्या संबंधीं जी कांहीं अगाऊ माहिती आह्मांला असेल ती तुह्मांस पुरविली जाईल. आमच्या एकंदर खात्याचें सहाय्यहि तुह्मांस मिळेल. पण एक गोष्ट मात्र पक्की लक्षांत ठेवा, कीं, एकाद्या पेंचांत तुह्मी सांपडला, तर त्यांतून तुह्मांस सोडविण्याचें सामर्थ्य आमच्या आंगीं नाहीं आणि तुह्मांला सोडविण्याची खटपटहि आम्ही करणार नाहीं. ही नौकरी बोलूनचालून सुळावरची पोळी आहे, हें विसरूं नका. कसल्याहि प्रकारच्या प्रसंगांत सरकारी मदत तुह्मांस मिळणार नाहीं, हें ध्यानांत ठेवूनच जें काय करणें असेल तें करा."

क्याप्टनसाहेबांनीं दिलेली ही सूचना अक्षरशः खरी होती. याचा मला पुढें चांगलाच अनुभव आला. मला पगार किती मिळणार याचा खुलासा क्याप्टन् यांनीं आतांपर्यंत केला नव्हता. त्यासंबंधीं मीं प्रश्न विचारतां ते म्हणाले, "तें सारें तुमच्या नौकरीच्या दर्जावर अवलंबून

आहे. आरंभीं तुम्हांला नौकरींत दाखल केल्याबद्दल वर्षाचे सुमारें चार हंजार मार्क (सुमारें तीन हजार रुपये) मिळतील. तसेंच तुम्ही प्रत्यक्ष एकाद्या कामगिरीवर असलां किंवा नसलां तरी तुम्हांला चालू खर्चासाठीं रोज दहा मार्क मिळतील. याशिवाय कामगिरीचें जसें महत्त्व असेल, त्या मानानें प्रत्येक कामगिरीबद्दल कांहीं बक्षीसहि तुम्हांला मिळेल. कोठें बाहेर गांवीं एकाद्या कामगिरीवर गेल्यास रोजचा खर्च चाळीस मार्कांहून अधिक असतां उपयोगीं नाहीं. कामगिरीबद्दलच्या बक्षिसाची रक्कम महत्त्वाच्या मानानें आगाऊ ठरविली जाईल. आतां आणखी एक गोष्ट पक्की लक्षांत ठेवा. ती ही कीं, तुम्हांला जी कांहीं एकंदर रक्कम द्यावयाची, तिचा एक तृतीयांश पांच टक्के व्याजानें आमच्यापाशीं राहील. "

त्यांची ही शेवटची सूचना ऐकून मी हंसत हंसत म्हणालों, "माझ्या पैशाची काळजी ध्यायला मी समर्थ आहें." क्याप्टन्साहेबांच्या चेहऱ्यावर हास्याची एक लहानशी लकेर मात्र दिसली. थोड्या वेळानें ते म्हणाले " तुम्ही समर्थ असाल, ही गोष्ट खरी; तथापि पुष्कळशा माणसांना तें साधत नाहीं, असा आमचा अनुभव आहे. दोन कारणांसाठीं आम्हीं हा नियम केला आहे. एक कारण असें कीं, त्यामुळें आमच्या माणसांवर आमचा ताबा पक्का राहतो. दुसरें असें कीं, या खात्यांतले पुष्कळसे लोक उडावू असतात, असें आमच्या अनुभवास आलें आहे. समजा कीं, एकाद्या कामगिरींत त्यांचें बरें वाईट झालें, तर त्यांच्या बायकापोरांची वाट काय ? हा पैसा त्यांच्या पदरीं पडतो. "

या नियमाला शिव्या हांसडण्याची माझ्यावर पुढें पाळी आली ! कारण मला इंग्लंडांत धरलें, त्या वेळीं माझे तीस हजार मार्क जर्मन हेर खात्याकडे शिल्लक होते. इतक्या पैशावर मला पाणी सोडण्याची वेळ आली. असो. मी आतां काय काय उत्तर देणार, हें ऐकण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें क्याप्टन् ट्याप्केन् माझ्याकडे पाहूं लागले. माझें मन घोटाळ्यांत पडलें होतें. पैशासंबंधीं विचार माझ्या मनांत नव्हता; पण माझ्यासारख्या थोर घराण्यांतल्या मनुष्यानें हेराच्या धंद्यांत पडावें कीं काय, या विचारांत

माझें मन डळमळत होतें. माझ्या मनांत खरा विचार काय चालला आहे, याचा अजमास क्याप्टनसाहेबांना नव्हता. पगार कमी म्हणून मी अनमान करीत आहें, असें त्यांना वाटलें. ते म्हणाले, " ही पगाराची रक्कम केवळ आरंभींचीच आहे. तुमची योग्यता वाढली व अधिक महत्त्वाच्या कामगिरीवर तुमची योजना होऊं लागली, म्हणजे तुमचा पगारहि अर्थात् वाढेलच. तें सारें तुमच्या योग्यतेवर अवलंबून आहे. " एवढें बोलून ते पुनः उत्सुकतेनें माझ्याकडे पाहूं लागले. मीं म्हटलें, " ठीक आहे. माझी कबुली आहे. "

आपली पसंती दर्शाविण्यासाठीं हात पुढें करून ते म्हणाले, " तुम्हीं लवकरच निश्चय केला हें ठीक. माझा हाच शिरस्ता आहे. कोणतीहि गोष्ट एकदम करावयाची अथवा सोडावयाची. छान ! छान ! डॉक्तर-साहेब, अशी तडकाफडकीची मनाची वृत्ति मला फार आवडते. असो. आतां तुह्मांला कांहीं विषयांत अगोदर तरबेज केलें पाहिजे. उद्यांपासून तुमची तयारी आहे का ? "

" या क्षणापासून देखील माझी तयारी आहे. "

" वाः ! हें तर फारच छान; पण उद्यांसुद्धां कांहीं हरकत नाहीं. उद्यां सकाळीं दहा वाजतां येथें या. मग कांहीं ठराविक वेळ दररोज तुम्हांस खर्च करावा लागेल. " असें म्हणून त्यांनीं आपल्या एका चिटणीसाला हाक मारली आणि थोडक्यांत त्याला कांहीं तोंडीं हुकूम दिला. थोड्याच वेळांत तो हस्थ तीनशें मार्कांची हुंडी घेऊन आल्यावर क्याप्टन म्हणाले, " डॉक्टरसाहेब, हा आपला पहिल्या महिन्याचा चालू खर्च. नौकरींत दाखल केल्याबद्दलचें वर्षासन तुम्हांस केव्हांहि देण्यांत येईल. "

हुंडी खिशांत घालतां घालतां मीं म्हटलें, " क्याप्टनसाहेब, हा वेळपर्यंत आपणां दोघांची तोंडओळख सुद्धां नव्हती. मग माझ्याबद्दल तुमची इतकी खात्री कशी झाली ? "

पुनः त्यांचें तें विशिष्ट स्मित त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागलें. ते म्हणाले, " या प्रश्नाचें उत्तर देण्याचें कांहीं कारण नाहीं. मला वरून जसें हुकूम मिळतात, तशी मी अम्मल बजावणी मात्र करतों. "

त्या वेळीं मी अननुभवी तरुण होतों, आणि साऱ्या गोष्टी आपणास समजाव्या अशी प्रबल इच्छा माझ्या मनांत होती. या इच्छेला अनुसरून मीं म्हटलें, " तुमच्यावर कोण आहेत, आणि त्यांनीं तुम्हांला काय हुकूम दिला आहे ? "

हा प्रश्न विचारतांच हेर खात्यांतला पहिला धडा मला मिळाला. क्याप्टन्साहेबांच्या चेहऱ्यावरचा स्नेहाळूपणा एकदम मावळला. ते म्हणाले, " डॉक्तर, आतां मी काय सांगतों, हें पक्कें लक्षांत ठेवा व तें कधींहि विसरूं नका. अधिकाऱ्यांना कधींहि प्रश्न विचारूं नये. उगीच बडबड करूं नये. आपले विचार आपल्याच मनांत ठेवावेत. आमच्या या खात्याचे पुष्कळसे गुप्त कायदे आहेत, ही गोष्ट पुढें लवकरच तुमच्या प्रत्ययास येईल. "

माझ्या नोकरींतील हा पहिला धडा मी कधींहि विसरणारं नाहीं.

प्रकरण दुसरें.

धंद्याची पूर्व तयारी.

—:o:—

युरोपियन राष्ट्रांतील राजकीय हेरांच्या हालचाली, त्यांचीं साधनें आणि त्यांचें साध्य यांजबद्दल सामान्य मनुष्यांस अगदीं पुसट कल्पना मात्र असते. राजकीय हेरांनीं केलेल्या कामगिऱ्यांसंबंधीं ज्या कांहीं लहानसहान गोष्टी किंवा कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांनीं सामान्य मनुष्याचें मन बुचकळ्यांत मात्र पडतें. ह्या लेखकांना प्रत्यक्ष अनुभव कांहींच नसल्यामुळें ह्या धंद्याचें अस्पष्ट व गोंधळांत पाडणारें चित्र ते वाचकांसमोर उभें करतात. या धंद्याची स्पष्ट व न फुगविलेली अशी ही हकीगत आज प्रथमच प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या धंद्यांत कसल्या प्रकारच्या स्त्री-पुरुषांचा अंतर्भाव होतो, यांत कसल्या प्रकारचें साहित्य लागतें आणि केवढा मोठा धोका असतो, इत्यादि अनेक बाबींचा खुलासा

मी स्पष्टपणें करणार आहें. अगदीं बायबलाच्या काळापासून तों नेपोलियन-पर्यंत सर्व राजेरजवाड्यांस, प्रधानांस आणि इतर खात्यांच्या अधिकाऱ्यांस खुल्या मार्गापेक्षां इतर अंतस्थ मार्गांनीं बाहेरील माहिती मिळविणें भाग झालें आहे. नेपोलियन बोनापार्ट यानें प्रथम शिस्तवार रीतीनें हेरखातें निर्माण केलें. बाहेरील माहिती आपणास मिळावी म्हणून गुप्त रीतीनें काम करणारीं स्त्री-पुरुषें नौकरींत ठेवण्याचा प्रघात जुन्या काळापासून चालत आला आहे. परकीय देशांत ठेवलेले वकील आणि कॉन्सल वगैरे इतर कामदार यांना सर्व प्रकारची माहिती मिळविणें शक्य नसतें. कारण हीं माणसें उघडपणें परराष्ट्रीय असल्यामुळें त्यांच्याशीं कोणीहि मोकळ्या मनानें बोलत नाहीं. अशा माणसांशीं बोलतांना स्वभावतःच फार सावधगिरी बाळगली जाते. दुसरें असें कीं, वकील अथवा कॉन्सल या जागाच्या सरकारी दर्जा मोठा असल्यामुळें खुल्या राष्ट्रनीतीस अननुरूप अशी कोणतीहि कामगिरी त्यांनां करतां येत नाहीं. हल्लींच्या शास्त्रीय युगांत सर्व प्रकारची वाढ मोठ्या झपाट्यानें झाली आहे. हल्लीं कोणतीहि गोष्ट घडावयाची झाली, तरी ती पूर्वीपेक्षां किती तरी कमी वेळांत घडून येते. यामुळें परराष्ट्रांतील माहिती जितकी अचूक व जितक्या लवकर मिळेल तितकी हवी, असें झालें आहे. सध्यां युरोपची स्थिति सर्वत्र लष्करी तळ पडल्यासारखी झाली आहे. सर्व राष्ट्रें बहुधा सारख्याच तोलाचीं असून परस्परांवद्दल त्यांच्या मनांत थोडी फार तरी भीति वसत आहे. परस्पर असलेले हितसंबंध आणि एकमेकांचा अविश्वास या दोन कारणांमुळें जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया या चौकडीला कोट्यवधि रुपये युद्धसाहित्यावर खर्च करावे लागतात. आज जर्मनीनें एक बेडर जहाज बांधलें कीं, उद्यां इंग्लंड दोन बांधितें. इकडे फ्रान्सनें दहा नव्या पलटणी उभ्या केल्या कीं, जर्मनींत वीस नव्या पलटणी उभ्या होतात. अशा रीतीनें या शर्यतींत मागें न पडण्याची खबरदारी सर्व राष्ट्रें घेत आहेत, तथापि यंत्रकलेची वाढ, शस्त्रास्त्रांतील नवे शोध, विमानें इत्यादि अनेक साहित्या-मुळें या राष्ट्रांच्या युद्धसामग्रीच्या समतोलपणांत वारंवार बिघाड होत असतो. याच ठिकाणीं कित्येक माणसांची राजनीति आणि महत्त्वाकांक्षा हीं

सुद्धां आपलीं डोकीं खुपसतात. कारण दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांच्या मार्गे आपण पडूं नये, इतकेच नव्हे, तर आपल्या राष्ट्रानें या बाबतींत सर्वांवर अवाडी मारावी, या करतां सर्व राष्ट्रांतील राजमंडळाचीं धडपड चालू आहे. यामुळें कोणतें राष्ट्र काय करीत आहे, याचा सुगावा काढण्यासाठीं हीं राष्ट्रें परस्परांवर बारीक नजर ठेवीत असतात. ही अंतस्थ माहिती मिळविणें असेल, तर शिस्तवार हेरखातें निर्माण करूनच ती मिळण्यासारखी आहे. या खात्यांतील स्त्री पुरुषांना विशिष्ट पद्धतीचें शिक्षण द्यावें लागते. आणि तीं स्त्री-पुरुषेंहि निधड्या छातीचीं असलीं पाहिजेत. या धंद्यांत केव्हां कसलें संकट उद्भवेल याचा नियम नसतो.

संकटें तर नेहमींच उद्भवतात. कैदेंत जाण्याचा प्रसंग मला दोनदां आला. एकदां सर्व्हियांतील बेलग्रेड शहरीं आणि दुसऱ्या खेपेस इंग्लंडांत. पांच वेळेला मारामारीचे प्रसंग मजवर आले ! आणि त्यांच्या निशाण्या अद्यापि माझ्या शरीरावर आहेत. शेंकडों वेळां संकटांतून मी अचानक सुटलोंहि आहें. माझ्या सर्व कामगिऱ्या सफल झाल्या असें नाहीं. पुष्कळशा कामगिऱ्यांत मला अपयश आलें आणि या धंद्यांतलें अपयश म्हणजे यमाच्या दरबारांतलें वारंट. उदाहरणार्थः—सर्व्हियांत जो एक मोठा कट कित्येक दिवस चालू होता, त्याची अखेर १९२३ सालांतील तारीख ११ जून रोजीं झाली आणि त्यांत राजा, राणी, राजमंडळ व इतर राजकीय पुरुष यांचे बळी पडले. या भयंकर अत्याचाराच्या मुळाशीं कसल्या प्रकारचें राजकीय वातावरण पसरलें होतें, याचा अधिक तपशील सांगण्याचें कारण नाहीं. पण पुढें माझ्या सरकारने मला या बाबीची कांहीं माहिती मिळविण्यासाठीं बेलग्रेड येथें पाठविलें. या अत्याचाराचे मूळ प्रवर्तक कोण होते, ही माहिती आमच्या सरकारास हवी होती. यात कर्नल म्याशिन व सहाव्या पलटणींतील कित्येक आधिकारी यांचें प्रमुखत्वानें अंग होतें, असें पुढें दिसून आलें. राजाच्या रक्तानें हात माखविणाऱ्या या राक्षसांना रशियन सरकाराकडून पैशाचा पुरवठा होत असे. कारण ऑब्रोनोव्हिच घराणें आस्ट्रियाकडे ओढा दाखवूं लागल्यामुळें रशियाला तें अप्रिय व भीतिमूलक झालें होतें. राजाची मूर्खपणाची वागणूक

आणि ड्रागा राणीचें अनेक वेळां झालेलें अप्रासंगिक वर्तन इत्यादि कारणांनीं हें घराणें लोकांच्याहि मर्जीतून उतरलें होतें.

अशा स्थितींत बेलग्रेड येथें जाऊन आपलें नाक खुपसणें म्हणजे गांधील माशांचें पोळें उठविणेंच होय आणि हा अनुभव मला पुढें आलाच. लेफ्टेनेंट कर्नल निग्लीश यांच्या हुकुमावरून मला कैद करण्यात आलें. माझ्यावरचा आरोप झणाल, तर इतकाच कीं, खोटा दाखला घेऊन मी सर्व्हियांत शिरलों. उचल आणि दे सुळीं अशी स्थिति या वेळीं सर्व्हियांत होती. खरें पाहिलें, तर माझ्या जवळ त्या वेळीं संशय घेण्याजोगे कसलेहि कागदपत्र नव्हते; पण त्या वेळच्या सरकारच्या विरुद्ध जे कांहीं लोक होते, त्यांच्या संगतींत मी आढळल्यावरून कसल्या तरी आरोपावरून एखाद्या सांगकाम्या कोर्टापुढें मला त्या सरकारानें उभे केलें होतें.

पेटीप्यारीशियन नांवाच्या एका उपाहार गृहांत मी बसलों होतों. मजबरोबर लेफ्टनंट निकोलव्हिच आणि क्रास्टोक नांवाचे एक बेलग्रेड येथील व्यापारी बसले होते. इतक्यांत सोजिरांची पार्टी घेऊन ऑफिसर आंत आले आणि आह्मांस आमच्या खुर्च्यांवरून ओढून किल्लयाकडे घेऊन गेले ! दुसऱ्या दिवशीं सकाळीं आह्मां तिघांस तीन कर्नलांच्या कोर्टापुढें वेगवेगळे उभें करण्यांत आलें. या कोर्टानें आह्मांस कोणताहि प्रश्न विचारला नाहीं.

कोर्ट मला म्हणालें, " बंडखोरांच्या संगतींत असतांना तुला कैद करण्यांत आलें आहे. आमच्या देशांत प्रवास करण्यास मोकळीक असल्याबद्दलचा जो दाखला तुजजवळ आहे, तो तुझा स्वतःचा नाहीं. सूर्यास्ताच्या वेळीं गोळी घालून तुला मारण्यांत यावें, अशी शिक्षा कोर्ट फर्मावित आहे. "

खरोखर ही सारी थट्टा असावी, असा माझा प्रथम समज झाला. नंतर मला भिवाविण्यासाठीं हा कांहीं डाव केला असेल असेंहि मला वाटलें; पण माझ्या डोक्यांतला हा थट्टेचा भाग लवकरच मावळला. ' कोर्टा ' च्या गालोवराल तीं उंच उंच हाडें, त्यांचे बारीक झालेले डोळे

आणि अगदीं थोडे कैंस असलेलीं सुळसुळीत डोकीं, असा हा कोर्टाचा उठाव पाहून आतां आपलींहि अस्त्रें फेंकण्याची वेळ आली आहे, असें मला वाटलें. माझ्या पोटांत चाललेली धाकधूक बाहेर दिसूं न देतां मी शांतपणें ह्मणालों, " युद्ध खात्याचे प्रधान एम् झोलारोविच यांस कौंट वेरिग्रेड हे आदरपूर्वक आपला सलाम पाठवीत आहेत, असें त्यांस कळविण्यांत यावें. "

माझें हें भाषण ऐकून ते तिघे कर्नल एकमेकांकडे चमत्कारिक मुद्रेनें पाहूं लागले. नंतर मधल्या कर्नलनें बऱ्याचशा प्रश्नांचा गोळीबार माझ्यावर झाडला. त्यांपैकीं एकाचेंहि उत्तर न देतां मी नुसती तिरस्काराची मुद्रा धारण केली होती. शेवटीं मी ह्मणालों, " मला जें सांगावयाचें होतें, तें मी सांगून चुकलों आहें. "

कोर्टातून मला माझ्या कोठडींत परत नेण्यांत आलें. दुपारीं चार वाजण्याच्या सुमारास त्या तिघांपैकीं एक कर्नल मजकडे आले आणि मला म्हणाले, " तुमचा निरोप पाठविला गेला नाहीं. कारण माझ्या जोडीदारांना तसें करणें बरें वाटलें नाहीं. झोलारोविच यांच्याशीं माझें नातें आहे. तेव्हां त्यांना निरोप पाठविण्याइतकें सबळ कारण तुम्ही दाखवित असाल, तर तुमचा निरोप मी त्यांना कळवीन. "

मीं माझें कारण त्याला सांगितलें. तें त्याला इतकें सबळ वाटलें कीं, झोलारोविच यांच्याकडे जाण्यासाठीं तो तावडतोब उठला. माझ्या कोठडींतून बाहेर पडतांना या कर्नलचा चेहरा पिठासारखा पांढरा झाला होता. आपलें काय होणार, याबद्दल फारशी फिकीर या वेळीं माझ्या चित्तांत नव्हती; पण संध्याकाळीं साडेसाताच्या सुमारास जेव्हां दोन सोजीर संगिनीसह आणि आपल्या गोळीबाराच्या तोस्दानासह माझ्य खोलींत आले आणि याशिवाय दुसरे दहा सशस्त्र सोजीर व एक ऑफिसर बाहेरील मैदानांत उभे असलेले मीं पाहिले, तेव्हां मात्र माझ्या अंगांतील सारें रक्त गोठून गेलें. आमच्यावर होणाऱ्या गोळीबाराची ही तयारी आहे, असें माझ्या तेव्हांच लक्षांत आलें. माझा निरोप योग्य स्थळीं पोंहोंचला असला, तर मला कांहीं धोका नाहीं, याबद्दल माझी

खात्री होती; पण वेळ पडली झोटिंग बादशाहीची. अनेक कारणांनीं माझा निरोप पोंहोंचण्यास दिरंगाई होणें या वेळीं अगदीं शक्य होतें.

त्या सोजिरांनीं आपल्या मध्यभागीं मला घातलें आणि किल्ल्याच्या पश्चिम भागाकडे असलेल्या एका टेंकडीकडे मला नेलें. एका जुन्या काळच्या मठाचा मोडकातोडका भाग एका बाजूला मला दिसत होता. आजूबाजूला कांहीं जुन्या थडग्यांचे धोंडेहि विखुरलेले होते. अशा या जागेंतून आमची रवानगी यमाच्या राजधानीकडे होत होती. एका दगडी भिंतीजवळ आल्यानंतर आम्ही सर्व उभे राहिलों. ऑफिसरानें एक सरकारी कागद खिशांतून बाहेर काढला आणि तो वाचण्यास आरंभ केला. ही सारी चर्पटपंजरी सर्व्हियन भाषेंत लिहिलेली होती.

हा वेळपर्यंत कोणी कोणाशीं एक शब्द देखील बोलत नव्हतें. ऑफिसराचें वाचन संपल्यानतर मीं त्याला मोठ्या विनयानें म्हटलें, " मी जातीचा सर्ब नाहीं. यामुळें तुम्ही काय वाचलें, तें मला समजलें नाहीं. याकरितां जर्मन किंवा फ्रेंच यांसारख्या एखाद्या सुधारलेल्या भाषेंत तुमच्या कागदांतला मतलब मला सांगितला, तर मजवर मोठे उपकार होतील. " माझे भाषण ऐकून तो थोडा दचकल्यासारखा दिसला. मी सर्ब आहें, असा त्याचा समज होता. कोणी तरी भयंकर चूक करीत आहे, व या चुकीचें प्रायश्चित त्यास मिळाल्यावांचून राहणार नाहीं, अशा अर्थाचीं कांहीं वाक्यें जर्मन आणि फ्रेंच भाषेंत मीं ठांसून बोललो. त्या दोन्ही भाषा त्याला समजत होत्या. माझें जरबीचें भाषण ऐकून तो ऑफिसर मनांतल्या मनांत खूप चरकला; तथापि तसाच धीर धरून तो म्हणाला, " मला मिळालेल्या हुकुमाप्रमाणें कामगिरी बजावणें, मला भाग आहे. " युद्धखात्याच्या प्रधानाला मीं निरोप पाठविला असल्याचें त्याला सांगितलें. भाषण लांबवून कसा तरी वेळ काढण्याचा माझा उद्देश होता, हें त्याच्या लक्षांत आलें पण तोहि फारसा घाईत दिसला नाहीं. पांच मिनिटें झालीं. आणखी दहाहि वर झालीं. त्यानें खिशांतून आपलें घड्याळ काढलें. त्या वेळीं आठाला पांच मिनिटें कमी होतीं. घड्याळ परत खिशांत घालून तो म्हणाला, " आतां मला अधिक थांबतां येत

नाहीं. " त्यानें एका सार्जेटला हाक मारली. सार्जेटनें मला भिंतीशीं टेंकून उभें केलें आणि डोळे बांधण्यासाठीं एक हातरुमाल माझ्यापुढें केला. मला हातरुमालाची जरूर नव्हती. त्या ऑफिसरनें कांहीं हुकुमाचे शब्द उच्चारतांच बारा मॉसर बंदुकांचीं घाणेरडीं कृष्णमुखें माझ्याकडे पाहूं लागलीं.

मला त्या वेळीं काय वाटलें, हें मला सांगतां येत नाहीं. खरी गोष्ट सांगावयाची म्हणजे मला अमुक वाटलें, असें स्पष्टपणें कांहींच सांगतां येत नाहीं. मला इतकेंच आठवतें कीं, दुसऱ्या रांगेंतल्या तिसऱ्या सोजिराला आपली बंदुक चांगली रोखतां येत नव्हती. त्यानें प्रथम माझ्या छातीच्या मध्यभागीं नेम धरला होता. नंतर त्यानें माझ्या नाकाकडे रोंख धरला. या शिपायाचा मला मोठा राग आला. अशा स्थितींत आम्ही किती वेळ उभे राहिलों होतों याची मला कल्पना नाहीं. पुढें मला इतकेंच आठवतें कीं, शस्त्रें जमीनीवर ठेवल्याचा खडखड असा आवाज झाला आणि दोन ऑफिसर रागावून एकमेकांकडे कांहींसे हातवारे करीत आहेत, असेंहि दिसलें. नंतर तीन ऑफिसर माझ्याकडे आले आणि त्यांपैकीं एकानें दारूची बाटली उघडून माझ्या तोंडाशीं धरली. त्या वेळीं तिची मला फार आवश्यकता होती; पण ती बाटली हातांनीं मीं दूर लोटली. इतका सारा वेळ छातीवर आडवे हात ठेवून मी उभा होतों. " ही भागूबाई नाहीं. " असेंहि कोणी पुटपुटल्याचें मला आठवतें; पण जर माझी स्थिति त्याला कळती, तर—

असल्या प्रकारचा अनुभव मला घ्यावा लागेल असें जर मला पूर्वीं समजतें, आणि ज्या गोष्टी मला पुढें कळल्या त्या पूर्वींच कळल्या असत्या, तर या नौकरींत मी पडलों असतों कीं, नाहीं, हें मला सांगतां येत नाहीं. असो. आतां ही बाजूची कथा सोडून क्याप्टन ब्याप्केन यांना त्यांच्या ऑफिसांत ज्या दिवशीं भेटावयास मी गेलों, त्या दिवसापर्यंत मागें जाऊं या. क्याप्टनसाहेबांबरोबर नौकरीची व्यवस्था करून मी आपल्या आश्रमांत परत आलों व तेथें पडल्यापडल्या अनेक प्रकारचे विचार माझ्या मनांत घोळूं लागले.

केवळ पैशासाठीं अथवा कांहीं अचाट कामगिरीच्या हौसेसाठीं मी या भानगडींत पडलों नव्हतों. जन्मास येऊन पैसा मिळविणें हेंच सार्थक्य आहे, असें मला कधींच वाटलें नाहीं, आणि यापुढें वाटणारहि नाहीं. खाऊनपिऊन सुखासमाधानानें राहतां येईल, अशी माझी स्थिति होती. आणि जगांतील विलक्षण गोष्टी करण्याच्या हौसेसंबंधीं म्हणाल, तर बोअर युद्धांत ही माझी हौस पुरी भागली होती. छट ! असल्या गोष्टीसाठीं कांहीं मीं नौकरी पत्करली नव्हती. माझें खरें कारण वेगळेंच होतें. माझ्या पूर्वार्जित हक्कांतून ज्यांनीं मला हुसकून लावलें होतें, त्यांजवर मात करतां आली तर पहावी, असा माझा उद्देश होता. ही गोष्ट मला साध्य होईल याबद्दल कौंट रिटझेन्स्टीन यांची पक्की खात्री होती. अशा रीतीनें अनेक प्रकारचे विचार चित्तांत घोळवीत मी आपल्या खोलींत पडलों होतों. त्या वेळीं भविष्य जाणण्याची दृष्टि जर मला असती, तर या हेराच्या धंद्यांत मी कधींहि पडलों नसतों; पण वयाच्या ३९ साव्या वर्षीं जें शहाणपण मला अनुभवानें मिळालें, तें चोविसाव्या वर्षीं मजपाशीं नव्हते, याबद्दल आश्चर्य वाटावयास नको.

आपला भविष्यकाळ या पुढें सुखाचा जाणार, असे मांडे मनांत खात. खात दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी लवकरच उठलों व क्याप्टन टचाप्केन यांच्या ऑफिसांत गेलों. बरोबर दहा वाजतां मी आरमारी खात्यांत जाऊन हजर झालों आणि पूर्वीप्रमाणेंच दरवाजाजवळील सारे सस्कार उरकून क्याप्टन टचाप्केन याचे खाजगी चिटणीस हर्र फॉं स्टचामर यांजपुढें जाऊन उभा राहिलों. हर्र स्टचामर हे फार वस्ताद आणि हिशोबी गृहस्थ आहेत. प्रत्येक गोष्टींत आपला नफातोटा पाहण्याची बनियाबुद्धि त्यांजपाशीं भरपूर आहे. हे मोठे मनमिळाऊ, गोड स्वभावाचे आणि अघळपघळ बोलणारे आहेत. स्वतःच्या हेतूंचा थांग लागूं न देतां लोकांच्या पोटांत शिरून त्यांजकडून अधिक माहिती मिळविण्याची विद्या यांना पुरी अवगत झाली आहे. हेरखात्यांतल्या यच्चयावत बाबींची तपशीलवार जंत्री यांच्या अगदीं जिभेवर असते. या बाबतींत हे गृहस्थ म्हणजे हेरखात्याचा जिवंत

विश्वकोशच होत. तसेंच हेरखात्यांत नवे चेले तयार करण्याच्या कामीं हे अगदीं बिनतोड गुरु आहेत.

फॉ स्ट्यामर यांच्या आफिसांत मी जातांच, ते मला म्हणाले, " आजपासून यापुढें तुम्ही सदोदित आमच्या हाकेस हजर झालें पाहिजे. आतां सर्वस्वी तुम्ही आमचेच झालां आहां, असें समजा. रोज दुपारीं बरोबर बारा वाजतां मी सांगेन त्या नंबराच्या टेलीफोनवर तुम्ही हजीरी देत जा. आम्ही म्हणूं त्या वेळेस तुमच्याशीं आम्हांला बोलतां येईल, अशी व्यवस्था सदोदित राहिली पाहिजे. पुढील नियमहि पक्के लक्षांत ठेवा. तुम्हांला कोणत्या कामगिरीवर पाठविलें आहे, याबद्दल चकार शब्दहि बाहेर फुटूं नये. खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याशिवाय अथवा ज्या कोणास तुमच्याकडे पाठविण्यांत येईल, त्या गृहस्थाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि खालच्या दर्जाच्या अमलदाराशीं तुम्हीं संभाषण करूं नये. जवळ कसलेंहि टिपण बाळगूं नये. अथवा दुसरे कसलेहि कागदपत्र जवळ असूं नयेत. हेरखात्यांतल्या दुसऱ्या नौकराजवळ आपल्या कामासंबंधीं कधींहि बोलूं नये. दुसऱ्या कोणत्याहि नौकराशीं फार सलगी करणें हें आमच्या नियमाच्या अगदीं विरुद्ध आहे. कोणतेहि मादक पेय कधींहि पिऊं नये. कोणत्याहि प्रकारच्या स्त्रियांशीं संबंध ठेवूं नये. यापुढें आमच्याशीं तुमचा संबंध नांवानें न होतां एका विशिष्ट नंबरानें होत जाईल. कामगिरीचे रिपोर्ट करण्याची वेळ येईल तेव्हां हा नंबर कळवावा. तारा अथवा टेलीफोन करणें शक्य तोंपर्यंत टाळीत जावें. अगदीं निकडीचें काम असेल, तर तसें करीत जा; पण त्या वेळीं तुम्हांला दिलेल्या संकेत भाषेचा उपयोग करीत जा. "

अशाच प्रकारें आणखीहि पुष्कळशा बारीकसाराकी सूचना त्यांनी मला दिल्या. त्या देतांना या खात्याच्या एकंदर पद्धतीचाआढावा त्यांनीं मला सांगितला होता. हें बाकीचें लांबलचक भाषण सामान्य वाचकांस कंटाळवाणें होण्याचा संभव असल्यामुळें येथें देत नाहीं. त्या दिवशीं दुपारचा सारा वेळ मीं या ऑफिसांत काढला. मी बाहेर पडलों त्या वेळीं फॉ ट्यापकेन यांजकडून बोलावणें येऊन आपली आपल्या पहिल्या कामगिरीवर लवकरच रवानगी होणार, अशा आशेंत मी चूर झालों होतों पण

माझी ही आशा मनांतल्या मनांतच जिरली. माझी पहिली कामगिरी मला मिळण्यापूर्वी पांच महिने मला वाट पहावी लागली. इतके महिने वाट पाहून अखेरीस जी कामगिरी मिळाली, ती सुद्धां अगदीं फुसकी. हे पांच महिने माझें शिक्षण चालू होतें. दिवसांमागें दिवस आणि आठवड्यांमागें आठवडे या नोकरीला लागणाऱ्या अवश्य विषयांचें शिक्षण मला देण्यांत येत होतें.

या शिक्षणात सामान्यतः चार विषय येतात. भूनिरीक्षण, त्रिकोणमिति, युद्धनौकाबंधन आणि चित्रकला. माझी ज्या ज्या कामगिऱ्यांवर नेमणूक झाली होती, त्याच्या स्वरूपावरून या शिक्षणाचें महत्त्व वाचकांस कळून येईल. माझे सारे शिक्षक आपापल्या कलेंत अत्यंत तरबेज होते. एखाद्या हेराला फ्रान्समधल्या व्हर्डूनसारख्या किल्ल्याची परिस्थिति, त्याची शस्त्रास्त्रसामग्री इत्यादिकांचें निरीक्षण करण्याकरितां पाठविलें, तर लांबीरुंदीचें मापन, उंची, कोण व भोंवतालच्या जमीनीची ठेवण इत्यादि गोष्टींचा अदाज बरोबर करतां आला पाहिजे. ज्याला या गोष्टींचें अगदीं सशास्त्र शिक्षण मिळालें असेल, असाच मनुष्य हे काम बरोबर करूं शकेल. भूनिरीक्षणाचें शास्त्र त्याच्या जिव्हाग्रीं असलें पाहिजे. त्रिकोण मितीच्या सहाय्यानें सर्व हिशेब त्याला बरोबर व जलद करतां आले पाहिजेत. तसेंच मनांत ठरविलेले हे सारे अंदाज कागदावर स्पष्ट करून दाखविण्याइतकी रेखाविद्याहि त्याच्या जवळ असली पाहिजे. पोर्टआर्थर किल्ल्याची पहाणी करण्यासाठीं मला पाठविण्यांत आलें होतें, त्या वेळीं हें शिक्षण मला फार उपयोगीं पडलें.

हीच गोष्ट युद्धनौका बांधण्याच्या कलेलाहि लागू आहे. टारपेडो बोट आणि टारपेडो ड्रिस्ट्रायर (विनाशिका) यांतला फरक सामान्यतः नौकरींत शिरण्यापूर्वी मला माहीत होता; तथापि निरनिराळ्या जातींची बांधणी आणि त्यांतील सर्व प्रकारच्या यंत्रांच्या रचना इत्यादि तपशीलाचें खास वर्णन मला देतां येत नव्हतें. लेफ्टनंट-क्याप्टन कर्ट्स्टिफन्स् हें या विद्येतले माझे गुरु होते. टारपेडोच्या विद्येंत हे गृहस्थ जर्मन आरमारी खात्यांत पहिल्या प्रतीचे निष्णात म्हणून गणले जातात. एक महिना यांच्या हातीं शिक्षण घेतल्यानंतर मला टारपेडो (आगमासा)

च्या निरनिराळ्या जाती, पाणबुड्या बोटी, पाणसुरुंग इत्यादिकांचें बरोबर वर्णन देतां येऊं लागलें. आगमासा पाण्यांत सोडला झणजे, जो विशिष्ट प्रकारचा आवाज तो करतो, त्यावरून तो व्हाइटहेड जातीचा आहे कीं, ब्रेनन जातीचा आहे, हें सुद्धां मला सांगतां येऊं लागलें.

त्याचप्रमाणें प्रत्येक जातीच्या आरमारी तोफेंतील यंत्ररचनेचेंहि शिक्षण मला देण्यांत आलें होतें. युद्धांत लागणाऱ्या जिनसांचे डझनोगणती नमुने मला दाखविण्यांत येऊन त्यांच्या स्वरूपाची फोड केली जात असे. जगांत जितक्या युद्धनौका आहेत, तितक्या साऱ्यांच्या प्रतिमा माझ्या पहाण्यांत आल्या होत्या. बातमीखात्याच्या एका खोलींत निरनिराळ्या जातींच्या युद्धनौकांचीं आकाशचित्रें (सिलहुट) टांगून ठेवलेलीं होतीं. एकसारखें या चित्रांकडे पहात मला कित्येक दिवस बसविण्यांत आलें होतें. गलबत समुद्रांतून चालूं लागलें म्हणजे आकाशाच्या पोकळींत त्याची जी छाया क्षितिजावर लांबून दिसते, तिला आकाशचित्र (सिलहुट) असें म्हणतात. या निरीक्षणात शेवटीं मी इतका तरबेज झालों कीं, नुसत्या दृष्टिक्षेपाबरोबर दर्यात दूरवर चाललेलें गलबत, ब्याटलशिप, क्रूझर, कीं डिस्ट्रायर आहे, हें मला सांगतां येऊं लागलें. तसेंच तें इंग्रज, फ्रेंच, रशियन किंवा अमेरिकन बांधणीचें आहे, हें सुद्धां मी विनचूक सांगूं लागलो. इंग्लंडांत मला एका कामगिरीवर पाठविलें होतें, त्या वेळीं ब्रिटिश जहाजांच्या आकाशचित्रांची पुन्हां एकवार मजकडून उजळणी करून घेण्यांत आली होती. कारण फार दूर अंतरावरून सुद्धां चाललेल्या गलबताची जात मला ओळखतां यावी, अशी आवश्यकता माझ्या या कामगिरींत होती. जगांतील सारे आरमारी कामदार, त्यांचे निरनिराळ्या दर्जाचे आरमारी पोषाख, नौकेवरील इतर माणसांची संख्या, त्यांची निशाणसंकेताची भाषा आणि त्यांचे इतर प्रकारचे संकेत, या साऱ्यांची तपशिलवार माहिती मला देण्यांत आली होती. एका पुस्तकांत जगांतील सर्व आरमारी पोषाकांचीं आणि खुणांच्या निशाणांचीं रंगीत चित्रें काढलेलीं होतीं. या सर्व चित्रांचा अभ्यास मला करावा लागला. यांत शेवटीं मी इतका तरबेज झालों, कीं नुसती नजर फेंकण्याबरोबर हा अमुक दर्जाचा

ऑफिसर आहे, असें मला बिनचूक सांगतां येऊं लागलें. अशा रीतीने जगांतील प्रमुख राष्ट्रांच्या आरमारांची सर्व माहिती मला देण्यांत आली होती. हीच गोष्ट सर्व निशाणांच्या अभ्यासासहि लागू होती. या चित्रांचा अभ्यास करण्यांत मीं रात्रीच्या रात्री घालविल्या आहेत. माझ्या शिक्षणाचे नेमलेले तास म्हटले म्हणजे सकाळीं दहापासून बारा आणि दुपारीं दोनपासून सहापर्यंत होते; पण या ठरलेल्या वेळांत अभ्यासाचा सारा क्रम संपणे अशक्य होतें व मी तर माझ्या पहिल्या कामगिरीवर जाण्यास अत्यत आतुर झालों होतों, यामुळें अभ्यासावर मीं बराचसा घोट्या मारला होता. माझें सारें शिक्षण बर्लिन येथें झालें असें नाहीं. माझा कांहीं अभ्यास बर्लिन येथें कोनिगरग्राडझर रस्त्यावर असणि कांहीं झूचॉस नांवाच्या युद्धखात्याच्या मोठ्या संग्रहालयांत झाला, तथापि पुष्कळ वेळां कील आणि वुइलियमसहेवन येथील सरकारी प्रचंड गोद्यांतहि मला जावें लागलें. नौकाबंधन विद्येंतील यत्ररचनेची तपशीलवार माहिती मला येथें देण्यांत आली. एकाद्या तोफेचे, आगमाशाचे अथवा दारूगोळ्याचे निरनिराळ्या जागीं पडलेले भाग पाहून ते कसे जोडावयाचे, व त्यांचा उपयोग काय इत्यादि गोष्टींची सुबुद्ध चर्चा मला करतां येईपर्यंत मला येथून रजा मिळाली नाहीं.

अशा रीतीनें जर्मनींतील निरनिराळ्या निष्णात गुरूंच्या हाताखालीं शिक्षण घेत असतां जर्मन युद्धखात्याजवळ किती पूर्ण व तपशीलवार माहिती भरलेली आहे, आणि या खात्याची एकंदर रचना किती निर्व्यंग व परिपूर्ण आहे, हे पाहण्याची मला संधि प्राप्त झाली. खरोखर म्हटलें तर मीं आपली दृष्टि आपल्या रेखीव शिक्षणाच्या बाहेर बरीच लांबविली होती. जर्मन युद्धखात्यांत जी गुप्त माहिती गोळा करून ठेवलेली आहे, ती जमा करण्यास किती श्रम, वेळ आणि पैसा लागला असेल हें पाहिलें आणि तसेंच जर्मन साम्राज्यांत युद्धशास्त्र किती पूर्णत्वास गेलें आहे, याचा विचार केला, म्हणजे मन आश्चर्यानें अगदीं भांबावून जातें. असो. यासंबंधीं अधिक माहिती पुढें एकादे वेळीं मी सांगेन.

माझ्या चौकस स्वभावामुळें ज्या विषयांचें शिक्षण मला मिळत असे, त्या व्यतिरिक्त बऱ्याचशा इतर गोष्टीहि मला कळल्या. या खात्याच्या एकंदर रचनेचा विचार मी करूं लागलों. परदेशांत हेर पाठवून तेथील गुप्त गोष्टींची माहिती मिळवावी यासाठीं जीं हेरखातीं निर्माण केलीं गेलीं आहेत, त्यांतील सामान्य रहस्य थोडक्यांत सांगतों.

यूरोपांत या खात्याच्या चार प्रकारच्या पद्धति अस्तित्वांत आहेत. केवळ पद्धतशीर रीतीनें काम करण्यासंबधीं पाहिलें तर जर्मन पद्धतीचा नंबर सर्वांत वर लागेल व त्यानंतर अनुक्रमानें रशियन, फ्रेन्च आणि इंग्लिश असे नंबर लागतील. हिंदुस्थान आणि आशियांतील इतर ब्रिटिश प्रदेश यांतील ब्रिटिश हेरखातें उत्तम प्रतीचे आहे व या संबंधांत ब्रिटिश राष्ट्र युरोपांतील चळवळींत अलीकडेच पडूं लागलें आहे. याशिवाय इंटरन्याशनल सिक्रेट सर्व्हिस ब्यूरो या नांवाची एक निमखाजगी संस्था बेल्जम देशांत आहे. ही संस्था योग्य रक्कम मिळाल्यास वाटेल त्या राष्ट्राला विश्वसनीय माहिती मिळवून देण्यास तयार असते. बाह्य देशांतील यांत्रिक रहस्यांची माहिती काढण्याचें काम बहुधा या संस्थेकडे सोंपाविलें जातें. एकादें राष्ट्र नवी तोफ तयार करीत असलें अथवा कोठें बारीक सारीक तटबंदी होत असली, तर त्यासबंधाची माहिती मिळविण्याचें काम बहुधा या संस्थेकडे सोंपाविलें जातें. ही संस्था कोणत्याहि विशिष्ट राष्ट्राकरितां नसून जो कोणी पैसा देईल त्याचें काम ती करीत असते. तिचें मुख्य ठाणें ब्रुसेल्स् येथें आहे. किरकोळ कामाशिवाय प्रसंगीं एखाद्या महत्त्वाच्या कामगिरीकरितां यासंस्थेचा उपयोग करून घेतला जातो. उदाहरणार्थः—

एकाद्या राष्ट्रानें परकीय राष्ट्रांतली माहिती मिळविण्यासाठीं जे हेर नेहमींच्या नोकरींत ठेवलेले असतात, त्यांशिवाय इतरांकडून माहिती मिळविण्याचा प्रसग फारसा येत नाहीं; पण असाहि एक प्रसंग ब्रुसेल्स येथील रशियन हेरांवर थोड्या वर्षांपूर्वी आला होता. स्विझरलंडांत मांट्रो येथें कांहीं बंडखोर लोकांनीं एक प्रकारची लहानशी वसाहत केली होती यांतील पुढाऱ्यांचीं नांवें व ते कोण व कोठले राहणारे इत्यादि बाबींची माहिती सेन्ट पिटर्सबर्ग (पेट्रोग्राड) येथील मुख्य अधिकाऱ्यास हवी

होती. या कामावर थेरेसा प्रिव्हो या नांवाच्या एका फ्रेंच स्त्रीची नेमणूक झाली होती. थेरेसा अगदीं तरुण आणि मोठी चतुर होती. तिच्याच बरोबर काम करण्यास तिचा " भाऊ " ह्मणून चार्लस प्रेव्हो या नांवाच्यां गृहस्थास नेमलें होते.

रशियांतून पळून आलेल्या या बडखोरांचा प्रमुख कोण आहे, याची माहिती रशियन अधिकाऱ्यास पाहिजे होती. जिनीव्हा सरोवराच्या कांठीं ही मंडळी रहात असे. यांच्या म्होरक्याचें नांव गोलुकॉफ्स्की असें होतें. याला बावीस वर्षांचा एक मुलगा असून तो थोडासा भोळा होता. यामुळेच तरुण आणि सुंदर थेरेसा बाईचा उपयोग करून घेण्यांत आला होता. ही स्त्री ब्रुसेल्स येथील इंटरन्याशनल संस्थेंत काम करीत होती.

या स्त्रीनें जिनीव्हा येथें जाऊन कानडा देशांतील एका लखपतीची आपण मुलगी आहों अशी अफवा पसरावी, असें ब्रुसेलच्या संस्थेनें ठरविलें. आरंभींच्या खर्चासाठीं तिजबरोबर पांच हजार फ्रँक ह्मणजे सुमारे तीन हजार रुपये देण्यांत आले होते. ही रक्कम व चार्लस् यांस बरोबर घेऊन मांट्रोच्या ठाण्यावर या बाईनें हल्ला केला. वृद्ध गोलुकॉफ्स्कीच्या तरुण मुलावर आपले मोठें प्रेम जडलें आहे, असा बाहणा तिनें केला. दिवसच्या दिवस ती या तरुणाच्या संगतींत घालवीत असे. शेवटीं या दोघांचें लग्न ठरलें. नवऱ्यामुलीचा 'भाऊ' चार्लस् प्रेव्हो हाहि म्हाताऱ्या गोलुकॉफ्स्कीबरोबर गुळचट गप्पा मारण्यांत गुंग असे. ही गोष्ट जिनीव्हा येथील लोकांना अद्यापिहि आठवत असेल.

या नंतर नेहमींच्या चालीप्रमाणें कानडाच्या लखपतीच्या या मुलीनें गोलुकॉफ्स्की, त्याचें कुटुंब व त्याचे सारे आप्तइष्ट यांना केळवणास बोलाविलें. या समारंभाकरतां नवऱ्या मुलीनें पाण्यासारखा पैसा खर्च केला होता. ' आणखी पैसा पाठवा ' अशा अर्थाचे शब्द वाहून नेतां नेतां बिचाऱ्या ताराहि वांकल्या असतील. गोलुकॉफ्स्कीचे चिरंजीव आपल्या भावी पत्नीसंबंधींच्या चिंतनांत गुंग होऊन गेले होते. आपल्या भावी पतीच्या सर्व मित्रांनीं (सर्व बंडखोरांनीं) या समारंभास हजर राहिलेंच पाहिजे, अशी अत्यंत आग्रहाची विनंति तिनें बुढ्ढ्या गोलु-

कॉफ्स्कीला केली होती. त्यांच्या नांवाच्या निमंत्रण चिठ्या तिनें स्वतः लिहावयाचा बेत केला; पण त्यांच्या नांवांचीं स्पेलिंगें आपणास समजावयाचीं नाहींत असा बहाणा करून भोळ्या आणि उल्लु बनलेल्या तरुण गोलुकॉफ्स्कीकडून एकंदर मंडळीची याद तिनें तयार करून घेतली. तिच्या भावी पतिराजांनीं मोठ्या आनंदानें सारीं नांवें एका कागदावर लिहून तो कागद तिच्या स्वाधीन केला. पिटर्सबर्गच्या अधिकाऱ्यांनाहि याच यादीची जरूर होती.

केळवणाचा दिवस उगवला. थेरेसा एकाद्या परीप्रमाणें नटली होती. जमलेल्या मंडळीपैकीं बुद्धे लोक सुद्धां तिजकडे टकमका पाहूं लागले. म्हाताऱ्या गोलुकॉफ्स्कीचा आनंद तर गगनांत मावेना. असली सुंदर आणि त्यांतून श्रीमंत मुलगी त्याची सून होणार, याहून अधिक मोठें दैव तें कोणतें !

सर्व मंडळी भोजनाच्या टेबलाभोंवतीं बसली. बर्फांत ठेवून थंडगार केलेल्या नानाप्रकारच्या चिजांचें पहिलें वाढप झालें. इतक्यांत थेरेसा मुर्कत आणि हंसत म्हणाली; " साऱ्या मंडळीला आतां मला चकित करून सोडावयाचें आहे. माझ्या साऱ्या आयुष्यांत असा दिवस फिरून उगवावयाचा नाहीं. त्याच्या स्मरणार्थ माझ्या या जानदोस्तांचा ग्रुप (एकत्र घेतलेला फोटो) माझ्या जवळ रहावा अशी माझी इच्छा आहे. आजच्या प्रसंगाचा असा ग्रुप म्हणजे हजारों रत्नांपेक्षां मला अधिक किंमतवान् वाटतो. " काय असेल तें असो; पण त्या मंडळीला ही कल्पना पसंत पडली नाहीं. अशा मंडळीला फोटो काढणें, हें साहजिकच भयंकर वाटतें. थेरेसा म्हणाली, " फोटोच्या साऱ्या प्रती माझे श्वशुर गोलुकॉफ्स्की यांच्यापाशींच रहावयाच्या आहेत." तिजकडून असें आश्वासन मिळाल्यानंतर मंडळी फोटोसाठीं तयार झाली. बाहेरच्या हिरव्यागार पटांगणांत सर्व मंडळीचा ग्रुप जमला. फोटोग्राफरनें आपलें काम केलें. सर्व मंडळी अगदीं पूर्ण आनंदांत होती. फोटोच्या प्रती तयार झाल्याबरोबर त्या थेरेसाच्या हातांत पडल्या. त्याच रात्रीं थेरेसा व तिचा 'भाऊ' यांनीं मांट्रो शहर सोडलें. तरुण गोलुकॉफ्स्कीच्या हातची सर्व बंडखोरांची

यादी आणि त्यांचे फोटो दुसऱ्या दिवशीं इंटरन्याशनल संस्थेंत येऊन दाखल झाले. या कामगिरीबद्दल थेरेसाचा खिसाहि चांगलाच गरम करण्यांत आला. आपणास भेटलेल्या या तरुण रशियनाचे तिनें किती तरी आभार मानले असतील !

ब्रुसेल्सच्या संस्थेंतहि कित्येक वेळां कशा महत्त्वाच्या कामगिऱ्या बजावल्या जातात, याचें हें एक उदाहरण आहे. जर्मन हेरखात्याच्या लष्करी, आरमारी आणि व्यक्तिविषयक अशा तीन निरनिराळ्या शाखा आहेत. यांपैकीं प्रत्येकावर एकेक मुख्य अधिकारी असून त्याच्या हाताखालीं कित्येक बायका आणि पुरुष काम करीत आहेत. जर्मनीच्या हेरखात्यांत उणींपुरीं मीं बारा वर्षें नोकरी केली. लष्करी आणि आरमारी शाखा बर्लीन येथील जनरल स्टाफच्या ताब्यांत आहेत. बर्लीनचा जनरल स्टाफ ही एक जगांतील अत्यंत नमुनेदार संस्था आहे. राजकीय आणि व्यक्तिविषयक शाखा ह्या जर्मनीच्या परराष्ट्रीय खात्याच्या ताब्यांत आहेत. त्यांचें काम खुद्द बादशाहा किंवा त्यांचा हुजूर कामदार यांपैकीं कोणी तरी पहात असतो. सैन्यांचीं शस्त्रास्त्रें, तटबंदी व किल्ल्यांची पाहणी, तसेंच नानाप्रकारचे नवे शोध इत्यादिकांबद्दल गुप्त माहिती मिळविण्याचें काम लष्करी आणि आरमारी खात्याकडे असून राजेरजवाड्यांच्या भेटी व प्रधान मंडळांचीं खलबतें इत्यादिकांतील रहस्यें जाणण्याचें काम राजकीय शाखेकडे आहे. याशिवाय जें व्यक्तिविषयक म्हणून एक खातें आहे, तें हुजूर कामदारांच्या ताब्यांत असून त्याचा उपयोग खुद्द बादशाहा स्वतःच्या व्यक्तिविषयक कामगिरीकडे करून घेतो. या शाखेंत नोकरी मिळणें ही जर्मन हेरखात्यांतल्या बढतीची परमावधि होय, असें समजलें जातें.

या खात्यांत सर्व प्रकारचे पुरुष आणि बायका यांचा समावेश होतो. यांत राजघराण्यांतील पुरुष, सरदार घराण्यांतील पुरुष, वकील आणि डॉक्टर आहेत. नट आणि नटी आहेत. तसेंच कमअस्सल वर्तुणकीच्या स्त्रियाहि आहेत. यांशिवाय हॉटेलांतील वाढपे, आचारी, हमाल इत्यादिकांचा उपयोग प्रसंगाप्रमाणें केला जातो तो वेगळाच. एखाद्या आगबोटीवर

तुमचा तात्पुरता मित्र बनलेला एखादा मनुष्य किंवा एखाद्या हाटेलांत तुमच्या बरोबर चहा पिणारी एखादी नवयुवती हीं एकाद्या राष्ट्राच्या हेर खात्यांतीलहि माणसें असण्याचा संभव आहे. मोठमोठे गवय्ये, आणि सुप्रसिद्ध नर्तकी व नटी—विशेषतः रशियन किंवा ऑस्ट्रियन असल्या तर—बहुधा या खात्यापैकीं असावयाच्या. यांपैकींच एक सुंदर रशियन नर्तकी पन्नास हजार रुबलच्या (सुमारें पाऊण लाख रुपये) वर्षासनावर या खात्यांत नौकरीस ठेवली होती. या बाईसाहेब जर्मनींत प्रवास करीत; तेव्हां त्यांजभोंवतीं सरकारी गुप्त पहारा असे. हा पहारा बाईसाहेबांच्या संरक्षणासाठीं होता कीं, जर्मन सरकारच्या स्वतःच्या संरक्षणासाठीं होता, हें कोणीं सांगावें ? बर्लिन मधील प्याले डि डान्स (नाचखाना) येथे जो प्रकार घडला, त्याची आठवण अद्यापीहि बाईसाहेबांस असेल, किंवा तें आठवत नसलें तर एका वर्षप्रतिपदेच्या दिवशीं संध्याकाळीं त्यांची सुदर सोन्याच्या तारेची पिशवी त्यांस कशी परत मिळाली—हरवली नव्हे हो—परत मिळाली, हे तरी त्यांस आठवत असेल. या पिशवीनें बाईसाहेबांना बरेंच घोटाळ्यांत आणलें होतें. कांहीं वेळ ही पिशवी हेरखात्यांतील एका मनुष्याच्या हात चलाखीनें थोडा वेळ अदृश्य होऊन बाईसाहेबांस पुनः ' परत मिळाली. ' ही गोष्ट अशीः—

या पिशवींत काय चिजा भरल्या आहेत, याची माहिती जर्मन हेरखात्याच्या व्यक्तिविषयक शाखेला हवी होती. पॉट्स्ड्याम येथील शिबंदीपैकीं एका लष्करी ऑफिसराशीं बाईसाहेबांचें बरेंच प्रेम जडले होतें. लष्कराला दारू गोळा पुरविणाऱ्या खात्यांत हा अम्मलदार काम करीत होता. असल्या प्रकारच्या स्त्रियांशीं कोणत्याहि लष्करी अम्मलदारानें संबंध ठेवल्याचें दिसलें, तर तो अम्मलदार या खात्याच्या ताबडतोब नजरेस येतो. विशेषतः तो अम्मलदार दारूगोळ्याच्या खात्यांपैकीं असला, तर या खात्याची नजर त्याकडे अधिकच करडी जाते. आपल्या चालू कथानकांतील बाईसाहेबांना पॉट्स्ड्याम येथील त्या अम्मलदारानें एक सुंदर सोन्याची पिशवी नुकतीच नजर केली होती. या भेटीबरोबरच त्यानें एक पत्रहि दिलें होतें. तें पत्र त्या पिशवींत न ठेवण्याइतका चाणाक्षपणा बाई-

साहेबांच्या डोक्यांत राहिला नाहीं. बाईसाहेब, तुह्मी येथें साफ घसरलां ! अहो, असल्या नाजुक चिजा ठेवावयाला योग्य जागा म्हटली, म्हणजे जाकिटाचा आंतला खिसा किंवा पायमोजे.

या पिशवीच्या पायीं बाईसाहेब बऱ्याच मोठ्या गोत्यांत आल्या. वर्ष-प्रतिपदेचा दिवस. बाईसाहेब नाचखान्यांत मेजवानी झोडीत होत्या. त्याच दिवशीं पलीकडच्या दुसऱ्या एका टेबलाशीं मी बसलों होतों. तेथून सारा प्रकार माझ्या नजरेस पडला. त्या दिवशीं घडलेल्या नाटकाच्या पोटांत खरें रहस्य काय होतें आणि त्याचे सूत्रधार कोण होते, याचा उलगडा मला मागाहून झाला.

ती सोन्याची पिशवी जवळच टेबलावर पडली होती. त्या पिशवीची जागा ध्यानांत आणून एका वाढप्यानें जवळचा दारूचा ग्लास धक्का मारून पालथा केला. दारूचा ओघळ बाईसाहेबांकडे जाऊ लागला, ह्मणून त्या एकदम उठून उभ्या राहिल्या आणि थोड्या पलीकडे झाल्या. त्यांचें लक्ष दुसरीकडे गुतलें आहे, असें पाहून हातांतील फडक्याने दारूचा ओघळ टिपून घेण्याच्या मिषानें त्या वाढप्यानें ती पिशवी चट्कन उचलली आणि तो अदृश्य झाला. आत गेल्याबरोबर त्यानें ती पिशवी उघडली आणि त्या अम्मलदाराचें तें पत्र आपल्या खिशांत कोंबलें. हा सारा प्रकार घडण्यास फार तर दोन मिनिटांचा अवधि लागला असेल. वाढपी बाहेर येऊन ह्मणाला, " बाईसाहेब, घाईघाईत ही आपली पिशवी मीं उचलली याबद्दल मी आपली क्षमा मागतों. "बाईसाहेब थोड्याशा दचकल्या; पण पिशवी हातांत घेऊन ती त्यांनीं उघडली व पत्राचा तपास केला. पत्र आंत नाहीं असें पाहून थोडा वेळ त्या अगदीं गांगरून गेल्या; तथापि बाईसाहेब फार चतुर खऱ्या ! वाढप्याकडे पिशवी एकदम भिरकावून त्या ह्मणाल्या, " छे छे ! ती माझी नाहीं. ती मीं कधीं डोळ्यांनीं पाहिली सुद्धां नाहीं. ती कोणाची आहे, हें तूंच शोधून काढ. "

बाईसाहेब, आपण शक्कल तर खूप लढविली. एवढ्या मौल्यवान् जिनसेवर आपण पाणी सोडलें खरें; पण जर्मन सरहद्दीपलीकडे झालेली आपली उचलबांगडी मात्र आपणांस टाळतां आली नाहीं.

एकाद्या हेरावर सोंपविलेल्या कामगिरीच्या स्वरूपाप्रमाणें त्याला आवश्यक असणारी विद्याहि निरनिराळ्या स्वरूपाची आहे. आचारी, वाढपे, हमाल इत्यादि लोकांबद्दल फारसा विचार करण्याचें आपणास कारण नाहीं. कारण त्यांची योजना कोणत्याहि कामगिरीवर स्वतंत्रपणें होत नाहीं. कोणाच्या तरी हाताखालीं एखाद्या क्षुल्लक कामगिरीवर यांची योजना होत असते. महत्त्वाच्या कामगिऱ्या ज्याच्याकडे सोंपविल्या जातात, अशा हेराला चांगली बुद्धि, योजकता आणि वाक्पाटव यांची जोड अवश्य पाहिजे. अनेक भाषांचें ज्ञानहि त्याला अवश्य पाहिजे. त्याचप्रमाणें समयसूचकता आणि माणसांची पारख हेहि गुण त्याच्या अंगीं अवश्य असले पाहिजेत. स्त्री हेराच्या अंगीं मोहकपणा, योजकता, सौंदर्य आणि हावभाव हीं असलीं पाहिजेत. याच गुणाबरोबर एकाद्या आजीबाईचा लौकिक अनुभवहि तिच्याजवळ असावा लागतो. हेरांना निरनिराळ्या कामगिरीप्रमाणें पगाराचें प्रमाणहि चढतें उतरतें असतें; तथापि एकंदरीनें पगार साधारणच. कामगिरीवर असतां त्यानें चार दोन पैसे अधिकउणें खर्च केले, तर त्याबद्दल त्याला जबाब विचारला जात नाहीं. या खात्यांत पैशाचा खर्च ही मोठीशी बाब नसते. रिव्हीएरा गांवाकडील एका कामगिरींत चवदा दिवसांत सुमारें पंधरा हजार रुपये मीं खर्च केले. माझ्या अखेरच्या दिवसांत मला साडेसात हजार रुपयाचें वर्षासन मिळत होतें. याशिवाय कामगिरीवर नसतां पंधरा रुपये रोजप्रमाणें बैठा खर्च मिळत असे. कामगिरीवर गेलों म्हणजे रोजचा खर्च पंचेचाळीस रुपयांप्रमाणें मिळत असे. याखेरीज बक्षिसी म्हणून कामगिरीच्या स्वरूपाप्रमाणें आलाहिदा रकमा मिळतात, त्या वेगळ्याच. एका वेळीं एका कामगिरीबद्दल मला स्वतःला तेवीस हजार रुपये मिळाले !

ही नौकरी म्हणजे सुळावरची पोळी आहे, हें पूर्वी एक वेळ मीं सांगितलेंच आहे. नेमलेल्या कामगिरींत यश आलें, तर उखळ पाढरें होण्यास वेळ नाहीं; पण फसगत झाली, तर डोळे पांढरे होण्यासहि उशीर नाहीं. तुह्मी कोठें पेंचांत सांपडलां, तर सरकारीरीत्या तुह्माला कसलीहि मदत मिळावयाची नाहीं, आणि ज्यांच्या हातांत तुह्मी सांपडतां त्यांज-

कडून तर क्षमेची आशाहि नको. ज्यांना अनेक प्रकारचे उपद्याप करण्याची हौस असेल, तसेंच स्वतःच्या प्रकृतिस्वास्थ्याबद्दल जे फारशी फिकीर करीत नसतील, अथवा ठराविक नीतितत्त्वांची ज्यांना अडचण वाटत नसेल, अशा लोकांना हा धंदा फार चित्ताकर्षक वाटेल, यांत शंका नाहीं. भित्र्या लोकांनीं मात्र केवळ पोटासाठीं या धंद्यांत केव्हांहि पडूं नये अशी मी शिफारस करतों. कित्येक वेळां या धद्यांत शारीरिक आणि मानसिक कष्ट प्रमाणापलीकडे सोसावे लागतात. या धंद्यांत पडणारे लोक एवढ्या निधड्या छातीचे असतात कीं, त्यांना माणसाचीच काय, पण दैत्याची देखील भीति वाटावयाची नाहीं. या धंद्यांत पडणाऱ्या माणसांच्या आयुष्याची दोरी बहुधा आंखुड होण्याचा संभव अधिक असतो. त्यांच्या मनोरज्जूला जो ताण बसत असतो, त्याची थोडी जरी कल्पना तुम्हांस करतां आली, तर माझें म्हणणे तुम्हांस खचित पटेल. कामगिरीवर असतां अहोरात्र विचारांची चालना चित्तात असावयाची. बहुतकरून मदत कोणाचीहि मिळावयाची नाहीं; आणि ज्यांच्याशीं झगडावयाचें, ते लोक बहुधा मोठे सत्ताधारी असावयाचे. कित्येक वेळां कामगिरी अगदीं हातातोंडाशीं आली असतां, एकादा अचानक प्रसंग येऊन ती पालथी व्हावयाची. जगांतल्या अत्यंत तीव्र आणि सूक्ष्मदर्शी बुद्धीच्या लोकांबरोबर नेहमीं हातघाईचे प्रसंग यावयाचे. या साऱ्या अडचणींशीं झगडून काम करीत असतां एकादी क्षुल्लक चूक झाली, तर हाताला कडीतोड्यांची भेट ताबडतोब व्हावयाची. एवढेंच नव्हे, तर प्रसंगीं मानहि जावयाची. अशा परिस्थितींत आयुष्याची दोरी आंखुड झाली तर नवल नाहीं, ही गोष्ट कोणासहि पटेल.

धैर्याचे केवळ खांब अशीं अनेक स्त्री-पुरुषें या धंद्यांत अल्पायु झाल्याचें मला माहीत आहे. हा धंदाच असा आहे, कीं यांत शरीर झिजल्यावांचून राहणेंच शक्य नाहीं. याखेरीज आयुष्य कमी होण्याचे दुसरेहि कांहीं मार्ग आहेत. कित्येक स्त्रिया आणि पुरुष या धंद्यांत अकल्पित रीतीनें नाहींशीं झालीं आहेत. हीं माणसें एकाएकीं अदृश्य झालीं असा लोकांचा

समज करून दिलेला असतो. त्यांच्या या नाहींसें होण्याशीं केवळ परकीयांचाच संबंध असतो असेंहि नाहीं. हीं दोनच उदाहरणें पहाः—

व्होलगा ब्रुडर या नांवाची एक स्त्री या धंद्यांत होती. तिला जर्मनीकडून आणि ब्रुसेल्स येथील इटरन्याशनल संस्थेकडून कामगिऱ्या मिळत असत. 'रशियन सरहद्दीजवळील पूर्वप्रशियांतील मेमेल या गांवीं व्होलगा ब्रुडर या नांवाच्या स्त्रीनें आत्महत्त्या केली' असा मजकूर युरोपीय वर्तमानपत्रांत कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला होता. या बाबतींतील खरी हकीकत अशीः—एका रशियन किल्ल्याच्या बांधणीची माहिती मिळविण्याच्या कामगिरीवर या ब्रुडर बाईची नेमणूक झाली होती. अपेक्षित माहिती तिनें मिळविली; पण एका रशियन लष्करी अंमलदाराच्या मोहजालांत ती सांपडली असून सारे कागदपत्र ती त्याच्या हवालीं करणार आहे, असा सुगावा बर्लिन येथें लागला. तसेंच परकीय राष्ट्रांच्या दुसऱ्या चार हेरांशींहि तिचें बरेंच सूत जमलें होतें. ही गोष्ट अर्थातच जर्मन हेरखात्याच्या नियमाविरुद्ध होती. यानंतर रशियन अमलदारासंबंधाची हकीकत ड्यान्सीग येथील आलेल्या रिपोर्टावरून कळली. पुढें थोड्याच वेळांत व्होलगा ब्रुडरनें 'आत्महत्त्या' केली! तिजवर विषप्रयोग करण्यांत आला.

दुसरी गोष्टः—लेफ्टनट फाँ इयास्ट्रोव्ह या नावाचा एक जुना लष्करी अंमलदार जर्मन हेरखात्यांत नौकरीस होता. तो एका द्वंद्वयुद्धांत प्राणास मुकला. कांहीं रशियन हेरांबरोबर तो खलबतें करीत असतो, असा संशय मुख्य अधिकाऱ्यांस आला. प्रत्यक्ष पुरावा मुळींच नव्हता. या मनुष्याला अनेक रहस्यांची वित्त बातमी असल्यामुळें तुरुंगांत टाकण्याची सोय नव्हती. तो त्या वेळीं लष्करी नौकरींत नसल्यामुळें उघड रीतीनें कोर्टांत चवकशी झाल्याखेरीज त्याला तुरुंगांत टाकणें जर्मन कायद्याच्या विरुद्ध होतें. तो लष्करांत नौकरीला असता, तर गुप्त लष्करी कोर्टांत त्याची वाट लावणें शक्य झालें असतें; पण तो एका जुन्या खानदानी घराण्यांतला असल्यामुळें, आणि बऱ्याचशा रहस्यांचा संग्रह त्याजपाशीं असल्यामुळें, उचल आणि दे फांशीं असेंहि करणें शक्य नव्हतें. या सर्व कारणांमुळें बिचाऱ्यावर द्वंद्वयुद्ध करण्याचा प्रसंग आला. पहिल्या द्वंद्वांत त्याची

सरशी होऊन त्यानें आपल्या प्रतिपक्ष्याला ठार मारलें. येथेंच थांबण्याइतके मुख्य अधिकारी कांहीं भोळे नव्हते. विचाऱ्या इयास्ट्रोव्हवर दुसऱ्या द्वंद्वाचा प्रसंग आला आणि अर्ध्या तासाच्या अवधींत इयास्ट्रोव्हचें प्रेत जमिनीवर पडलें.

वरील हकीकती वाचून पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटेल; पण मी निक्षून सांगतों कीं, आमचेच मुख्य अधिकारी आह्मांस पाण्यांत पाहूं लागतात. एकादा हेर फार चाणाक्ष असला, अथवा त्याला बरींच गुह्यें माहीत असलीं, तर त्याला जगांत राहूं देणें अधिकाऱ्यांना अनिष्ट वाटतें, आतां कांहीं महत्त्वाचे कागदपत्र त्याच्या ताब्यांत असले, आणि ते फुटण्याची भीति अधिकाऱ्यास असली, तर मात्र गोष्ट वेगळी. त्याच्या वाटेस जाण्यास अधिकाऱ्यांना छातीच होत नाहीं. माझ्यावरहि असले प्रसंग येण्याचे अलीकडेच बंद झालें.

प्रकरण तिसरें.

माझा पूर्वेकडील प्रवास.

सिंगापूर येथें जाणाऱ्या बेयर्न नांवाच्या एका जर्मन बोटीवर स्वस्थपणें विडी ओढीत व कांहीं तरी विचार करीत मी एका आराम खुर्चीवर पडलों होतों. ब्यारन हुराकी नांवाच्या एका जपानी गृहस्थाबरोबर बोटीवर माझी बरीच ओळख झाली. बोटीच्या वरच्या उघड्या मजल्यावर आराम खुर्चीवर पडून विड्या ओढण्याचा आमचा परिपाठ असे. या परिपाठाप्रमाणें ब्यारन हुराकी लवकरच येतील असा माझा अजमास होता; इतक्यांत दुसऱ्या सैबेरियन पलटणीचे दोन अम्मलदार झुकत झुकत माझ्या बाजूला आले. त्यांच्या हावभावांवरून व बोलण्याचालण्याच्या एकंदर पद्धतीवरून ते सुरादेवीच्या मंदिरांतून नुकतेच बाहेर पडले असावेत, असें उघड दिसत होतें. तथापि माझ्या सुखासमाधानांत

त्यांच्याकडून व्यत्यय येत नव्हता तोंपर्यंत त्यांच्याकडे लक्ष देण्याचें मला कारण नव्हतें; पण असा व्यत्यय येण्यास लवकरच सुरुवात झाली. मी बोटीच्या ज्या भागांत बसलों होतों, तो भाग स्वस्थपणें पडून विश्रांति घेण्यासाठीं व वाचनासारख्या थंड करमणुकीसाठीं राखून ठेवलेला होता, ही गोष्ट या अम्मलदारांनाहि ठाऊक नसेल, असें नाहीं. तथापि ते मोठ-मोठ्यानें ओरडून बोलत होते. थोड्या वेळानें ते मजजवळ येऊन पोहोंचले. त्यांपैकीं एकजण ब्यारनसाहेबांच्या खुर्चीवर लवडला, व त्यानें मोठ-मोठ्याने ओरडून पलीकडे गेलेल्या आपल्या सोबत्यास हांका मारण्यास सुरुवात केली. या त्याच्या वर्तुणकीचा मला अतिशय त्रास होऊ लागला. इतक्यांत ब्यारनसाहेब स्वतः आले आणि मोठ्या सभ्यपणानें आपल्या खुर्चीवरून उठण्याची विनंति त्यांनीं त्या अम्मलदाराला केली. सुरादेवी-च्या अंमलांत पूर्णपणे गेलेला तो अम्मलदार ब्यारन हुराकी यांजकडे डोळे फाडून पाहू लागला आणि पडल्या पडल्या मोठ्याने ओरडून म्हणाला, " अहो मेहेरबान, सगळ्या जगाची मालकी कांहीं अद्यापि आपणास मिळालेली नाहीं. आपण येथून चालते व्हा पाहू. " त्याचे हें भाषण ऐकून माझे चित्त अगदीं भडकून गेले. लष्करी जर्मन भाषेंत मीं त्याला खुर्ची सोडून जाण्यास सांगितले. रशियन अम्मलदारांपैकीं शेकडा ऐशीं लोकांना लष्करी जर्मन भाषेचें ज्ञान आहे. रशियन अम्मलदार नुस-त्या तोंडाच्या भाषेनें कधींहि शुद्धीवर यावयाचे नाहींत; पण आपल्या वर्तुणुकीनें हातघाईचा प्रसंग येईल, अशी त्यांची खात्री झाली, म्हणजे त्याचा शिरजोरपणा उतरण्यास वेळ लागत नाहीं: असा प्रसग येईल, अशी त्या अम्मलदाराची खात्री मीं करून देतांच, तो निमुटपणें उठून दुसरीकडे चालता झाला.

तो उठून गेल्यावर ब्यारन हुराकी त्या खुर्चीवर आडवे झाले. त्या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर मंदस्मिताची एक लकेर उमटली होती; तथापि त्यांच्या डोळ्यांत जें चमत्कारिक पाणी त्या वेळीं खेळत होतें, तें पाहून माझें चित्त थोडेसें अस्वस्थ झाल्यावांचून मात्र राहिलें नाहीं. ब्यारनसाहेब ज्युजुत्सुच्या (जपानी पेंच) कलेंत मोठे प्रवीण होते. बोटीवरल्या एका

दांडग्या खलाशाला त्यांनीं अगदीं लीलेनें लांबवर झुगारून दिल्याचें मला आठवत होतें. या खलाशाला एका चांगल्या पुष्ट बैलाइतकें बळ होतें. ब्यारनसाहेबांच्या आंगीं अशी शाक्ति असतांहि त्या अम्मलदारांशीं त्यांनीं जी अगदीं सौम्यपणाची वागणूक केली, ती पाहून मीं त्यांना म्हटलें, " ब्यारनसाहेब, त्या जंगली मनुष्याला अर्ध्या बोटीपर्यंत पलीकडे तुम्ही कसें झुगारून दिलें नाहीं, याचें मला मोठें नवल वाटतें.

त्यांनीं दिलेला जबाब मी कधींहि विसरणार नाहीं.

" मुळाशीं कांहीं मुद्दा असल्याशिवाय आम्ही सामुराय (जपानी क्षत्रिय) कधींहि हातघाईवर येत नाहीं. अद्यापि वेळ आली नाहीं. "

या वेळीं सुद्धां त्यांच्या डोळ्यांत तें पाणी दिसलें, त्यामुळें मला कसें-सेंच झालें.

जर्मन हेरखात्यांत माझा प्रवेश झाल्यानंतर ही पहिलीच महत्त्वाची कामगिरी मला मिळाली होती. या कामागिरीनिमित्त मी बर्लीन येथून सिंगापुरला जात होतों. स्ट्रेट्ससेटलमेंटामध्ये नवी तटबंदी आणि नव्या गोद्या बांधण्याचें काम सुरू झालें होते. या कामासबंधीं सर्व प्रकारची माहिती, त्या जागेचे फोटोग्राफ आणि बांध कामाची आंखणी याबद्दलची सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचा हुकूम आमच्या बातमी खात्याकडून मला देण्यांत आला होता.

बंदर सोडतांना बेयर्न बोटीवर थोडीबहुत गर्दी होतीच. पूर्वेच्या बाजूकडील युद्धाचे ढग क्षितीजावर डोकाऊं लागले होते. बोटीवरील उतारू बरेच जपानी लोक दिसत होते. त्यांच्या सरकारनें पुढील कार्यासाठीं त्यांना स्वदेशीं परत बोलाविलें होतें असें मला मागाहून कळलें. पोर्ट सैय्यद बंदरावर बरेच रशियन लोकहि बोटींत चढले. यांत कांहीं लष्करी अम्मलदार असून ते पोर्ट आर्थर, डालनी व व्लाडिओस्टाक या बंदरीं जावयाचे होते. ज्या दोन मानवकुलांचें तुंबळ युद्ध लवकरच सुरू होणार होतें, त्या दोन कुलांचे नमुने मला येथें पाहावयास मिळाले. या दोन नमुन्यांचा अभ्यास करणें मला फार मौजेचें वाटलें.

यानंतर राशियन लोकांसंबंधीं मला जें कांहीं ज्ञान झालें, त्यामुळें माझ्या अनेक वर्षांच्या अनुभवांत आणखी भर पडली. या वेळेपासून ब्यारनहुराकी हे मजपाशीं थोड्या निराळ्या तऱ्हेनें वागूं लागल्याचें माझ्या अनुभवास येऊं लागलें. जपानी लोकांच्या चालीरीति, त्यांचीं ध्येयें आणि त्यांच्या आकांक्षा इत्यादि अनेक प्रकारच्या गोष्टींबद्दल ते आपण होऊन माझ्याशीं बोलूं लागले. त्यांनीं दिलेला कीमोनो (जपानी झगा) अंगांत घालून अनेक प्रकारच्या विषयांवर मनमुराद संभाषण करीत आम्हीं रात्रीच्या रात्री त्या आगबोटीवर घालविल्या. ते दिवस उष्ण्याचे असल्यामुळें रात्रींहि उकाडा फार होत असे, आणि अशा-प्रकारच्या गप्पा सांगण्यास मला कोणी भेटला नसता, तर बोटीवरचा प्रवास मला फार त्रासदायक व कंटाळवाणा झाला असता. ब्यारन हुराकीच्या बरोबर संभाषण करतांना जपानी लोकांची दानत आणि त्यांचे भावी उद्देश यांचें जें कांहीं ज्ञान मला त्या वेळीं प्राप्त झालें, त्याचा मला पुढें फार उपयोग झाला. ब्यारनसाहेब आपल्या देशांत सांप्रत मोठ्या हुद्यावर आहेत. मजविषयींचा त्यांचा स्नेहभाव अद्यापीहि कायम आहे, अशी मला आशा आहे. चेरी फुलांचा एक गुच्छ प्रतिवर्षी त्यांज-कडून मला येत असतो. परस्पर स्नेहभाव वृद्धिंगत होत आहे, असा आशय दाखविण्याची जपानी लोकांची ही एक पद्धत आहे.

कोणाशींहि अधिक स्नेह करणें, हें हेराच्या धंद्यांत पडलेल्या मनुष्याला बरें वाटत नाहीं; तथापि बरोबरच्या प्रवाशांशीं संभाषण करून अनेक प्रकारची माहिती करून घेण्यास मात्र तो चुकत नाहीं. माझ्या नेहमींच्या चालीस अनुसरून अनेक जपानी प्रवाशांशीं मीं ओलखी करून घेतल्या आहेत. त्यांतल्यात्यांत ब्यारन हुराकी यांचें माझें बरेंच मेतकुट जमलें. ब्यारन हुराकी चांगले विद्वान् आहेत अशी माझी खात्री झाली.

त्यांचें भाषण अलंकारिक नसे; तथापि अनेक शास्त्रीय किंवा तात्त्विक वादविवादांत स्वतःची बाजू शांतपणें सांवरून धरण्याची हातोटी त्यांना साधली होती. त्यांचें ज्ञान खोल होतें; पण याची साक्ष पटविण्याची त्यांना अशी कांहीं खुबी साधली होती, कीं त्यांत अहंकाराची किंवा लब्धप्रतिष्ठित-

पणाची यत्किंचितहि छटा उमटत नसे. जितके जपानी गृहस्थ मला भेटले, त्या सान्यांत हा गुण थोड्याबहुत प्रमाणानें असल्याचें माझ्या अनुभवास आलें. अशा प्रकारें अनेक विषयांवर गप्पा छाटीत असतां राजकीय विषय मध्येच घुसडण्याचा यत्न मीं एकदोन वेळां केला; पण उत्तरादाखल ब्यारनसाहेब नुसतें हसरें तोंड मात्र करीत. या हंसण्याचा काय अर्थ करावा, हें मोठें गुढ होतें आणि तें मला केव्हांहि उकलतां आलें नाहीं. अशामुळें त्या त्या प्रसंगीं मी अधिक बुचकळ्यांत मात्र पडत असें. पौर्वात्यांच्या मनाच्या खोलींत बुडी मारण्याचा अद्याप मला अभ्यास नव्हता. बेयर्न जहाजावर मला जो कांहीं अनुभव आला, त्यावरून माझी अशी खात्री झाली कीं, पौर्वात्यांच्या मनाचा ठाव काढण्यास पाश्चात्त्यांच्या पद्धती आणि युक्ती यांचा यत्किंचितहि उपयोग होत नाहीं. एकाद्या बाबतींत पौर्वात्यांनीं जर मुखस्तभपणा स्वीकारला, तर त्यांच्या तोंडचें कुलूप काढणें पाश्चात्त्यांस शक्य नाहीं. आतां एकाद्या पाश्चात्याविषयीं प्रेमभाव उत्पन्न झाला, तर मात्र त्याजपाशीं ते आपलें मन उघडे करतील. जपानी लोक ठेंगणे आणि शरीराने लहान बांध्याचे आहेत. कोणाहि दोन जपानी माणसांचें वजन एका रशियनाबरोबर होईल. स्वभावतः जपानी लोक शांत, मुखस्तभ आणि गोड स्वभावाचे आहेत. रशियन लोक शरीरानें धिप्पाड, मजबूत बांध्याचे, प्रत्येक गोष्टींत आपलें नाक खुपसणारे आणि दारुबाज असल्याचें मला आढळून आलें. त्यांचें तोंड घंटेप्रमाणे सदोदित वाजत असावयाचे. भांपणाची पद्धति उद्धट आणि अरेरावीची. जपानी लोकांबद्दल तर त्यांच्या मनांत विलक्षण तिरस्कार दिसत होता. भावी युद्धासंबंधीं ते अगदीं तुच्छता दर्शवीत असत आणि जपानी लोकांविषयीं बोलतांना छोटेखानी माकडाच्या जातीचीं मनुष्यें असा उल्लेख करीत. आमच्या जहाजावर जपानी आणि रशियन असे दोन्ही नमुने होते, ही गोष्ट मला फार फायद्याची झाली. पौर्वात्यांबद्दल ब्यारन हुराकी यांजपासून ज्या ज्ञानाचा लाभ मला झाला होता, त्याचा उपयोग मला सिंगापूर येथें झाला. आणि रशियनांपासून

जें ज्ञान मीं मिळविलें होतें, तें पोर्ट आर्थर येथें माझ्या फार उपयोगीं पडलें. पण हा पुढचा कथाभाग आधींच कशाला सांगा ?

सिंगापूर येथे आल्यानंतर हॉटेल डी ला पाय येथें मीं आपलें बिऱ्हाड ठेवलें. मी एक सामान्य प्रतीचा प्रवासी आहें, असा समज करून देण्याजोगीं मीं आपली वर्तणूक ठेवली होती. तसेंच उष्ण कटिबंधांतील वनस्पतीच्या अभ्यासाकरतां मी सिंगापूर येथें आलों असून शिकारीचा नादहि मला थोडाबहुत आहे, असें मीं भासविलें. हळुहळू तेथील इंग्रजी लष्करी अम्मलदाराबरोबर माझ्या ओळखी झाल्या, व त्यांजबरोबर त्यांच्या क्लबांतहि मी जाऊं येऊं लागलों. सिंगापूर येथें जी नवी आरमारी गोदी बांधण्याचें काम चाललें होतें, तिजबद्दल थोडीशी माहिती मला या द्वारानें मिळाली; पण ती फारच अपुरी आणि केवळ कागदी माहिती होती. असल्या तुटपुंजी माहितीचा मला फारसा उपयोग नव्हता. प्रत्यक्ष काम काय चाललें आहे, याची माहिती मला हवी होती, आणि ती मिळविण्यासाठीं तेथील नेटिव्ह कारकुनांची ओळख करून घेणें अवश्य दिसलें. पूर्व दिशेकडे सर्व इंग्रजी राज्यांत खालच्या प्रतीच्या कारकुनीच्या नेटिवांशीं आपला परिचय वाढविला पाहिजे, असा बेत मीं केला खरा, पण तसे करणें सोपें नसून प्रसगीं तें भयावहहि आहे, अशी माझी लवकरच खात्री झाली. माझ्या कामांत मला यश मिळविणे असेल, तर एकाद्या उच्च दर्जाच्या नेटिवाची ओळख करून घेतली पाहिजे, व त्याचे वजन कारकुनावर पडेल अशा स्थितींतला तो असला पाहिजे, अशी माझी खात्री झाली. अनेक छोट्या छोट्या संस्थानिकांपैकीं एखादा जर माझ्या जाळ्यांत सांपडेल, तर माझें काम हटकून साध्य होईल, असें मला वाटलें.

एका क्लबांत माझी ही आशा सफळ होईल, असा रंग दिसत होता. एक तरुण संस्थानिक—अर्थात् त्याचें नांव सांगणें इष्ट नाहीं—कांहीं पेंचांत आला होता. आणि ब्रिटिश सरकारनें त्याचें उत्पन्न कांहीं काळ बंद केलें. माझें घोडें पुढें ढकलण्यास ही एक चांगली संधि मिळाली. हे तरुण संस्थानिक महाराज कोणत्या ठिकाणीं जात येत असतात याचा

शोध करून त्या त्या ठिकाणीं जाण्याचा मीं परिपाठ सुरू ठेवला. एके दिवशीं मरीन हॉटेलच्या सज्जांत राजेसाहेब उभे असतां मीं त्यांच्या जवळ जाऊन काड्यांची पेटी मागितली, आणि एक कागदी विडी त्यांच्या पुढें केली. माझी ही वागणूक तेथल्या युरोपियन लोकांच्या सामान्य सामाजिक पद्धतीच्या अगदीं विरुद्ध होती. पौर्वात्यांशीं बरोबरीच्या नात्यानें वागणें हें स्वतःस कमीपणा आणणारें आहे, असा समज पूर्वेकडील युरोपियन लोकांत आहे. असल्या प्रकारची युरोपियनांची वागणूक नेटिवांस आवडत नाहीं व तिजबद्दल मनांतून त्यांस फार राग येतो. युरोपियन पद्धतीचें शिक्षण ज्यांस मिळालें आहे व युरोपियन चालीरीतीचा ज्यांनीं अंशतः अंगिकार केला आहे, अशा नेटीव लोकांस तर असल्या वागणुकीचा अत्यंत राग येतो. युरोपियनांनीं आपणांस कमी दर्जाचें लेखावें या गोष्टीची त्यांना फार चीड आहे. हीच गोष्ट आमच्या तरुण व तरतरीत राजेसाहेबांसहि लागू होती. त्यांच्या व्हिस्कीच्या आमंत्रणाचा मीं स्वीकार केला, आणि पुढे हळुहळू त्यांच्या बगल्यावर जेवावयासहि जाऊं लागलों. भेटीनें भेट वाढतच गेली आणि परस्परांचा परिचयहि दृढ होत गेला. पौर्वात्यांच्या चालीप्रमाणे राजेसाहेब चैनीला लालचावलेले होते, आणि तशांत उत्पन्न बंद झालेलें. यामुळें ते वारंवार पैशाच्या अडचणींत येत. अशा स्थितींत या दृष्टीनेहि मी त्यांच्या थोडासा उपयोगीं पडलों. हळुहळू सरकारबद्दलहि असतोषाचें बीजारोपण त्यांच्या मनांत मीं करून दिलें. अशा रीतीनें सावधगिरीनें माझ्या कामाला योग्य अशी त्यांची मनोभूमिका मीं तयार केली. कारकून मंडळीवर राजेसाहेबांचे चांगले वजन होतें. त्यांच्या मार्फत स्ट्रेट्स्सेटलमेंट (सिंगापूर) मध्यें इग्लंडची जी नवी आरमारी गोदी तयार होत होती, तिजबद्दलचे सर्व रेखा नकाशे, अंदाज व फोटोग्राफ मला मिळाले.

या सुमारास राजेसाहेबांच्या व माझ्या मधील मैत्रीबद्दल हळुहळू कुजबुज होण्यास आरंभ झाला, आणि आपलें जाळें आंवरण्याचा मीं बेत केला. जर्मनीला जाणाऱ्या साशेन नांवाच्या आगबोटीचें तिकीट मीं घेतलें. बोट निघण्यास एका आठवड्याचा अवधि होता. याच सुमारास प्रिन्स

रीजंट लिओपोल या नांवाची बोट कोलंबो बंदरांत येणार होती. आस्ट्रेलियांतून निघून युरोपाकडे जात असतां वाटेंतलें कोलंबो बंदर ती करणार होती. साशेन बोटीचें कोलंबोपुढचें तिकीट बदलून तें मीं या बोटीचें केलें. असें करण्यांत सिलोन बेटांत आठ दहा दिवस मुक्काम करण्याची मला संधी मिळणार होती. पूर्वी एक वेळ या भागांत मीं प्रवास केला होता, त्या वेळचे कांहीं माझ्या ओळखीचे गृहस्थ येथें होते. कोलंबो येथें ग्यालिफेस हॉटेलांत मी उतरलों. येथे अलॅन म्याग्रेगॉर या नांवाचे एक गृहस्थ भेटले. हे गृहस्थ क्यांडी आणि नेवाराइलाया येथील लिप्टनच्या इस्टेटीचे म्यानेजर आहेत. माझ्या पूर्वीच्या प्रवासांत यांजबरोबर माझी ओळख झाली होती. अनेक वेळां आम्हीं जोडीने शिकार केली होती व ब्रिज या नांवांचा पत्त्यांचा खेळहि खेळलों होतो. त्यांच्या सगतींत सात आठ दिवस रहावें व कांहीं दिवस चित्त्यांच्या मागे लागून अरण्यवास करावा असा मीं बेत केला. म्याग्रेगारसाहेबाचे त्या वेळचे जान दोस्त हे एक राष्ट्रीय हेर आहेत ही गोष्ट साहेब मजकुरांना कळल्यानंतर त्यांचा चेहरा कसा झाला असेल, हें जाणण्याची मला फार हौस आहे !

जाऊं द्या हो म्याग्रेगारसाहेब ! माझ्या संबंधीं आश्चर्यानें थक्क होऊन जाणारे दुसरे अनेक जोडीदार तुह्मांला मिळतील. मग तुह्मांला एकटें एकटें वाटण्याचें काय कारण आहे ?

म्याग्रेगारबरोबर शिकारीला जाण्याच्या मी अगदीं तयारींत असतां हॉटेलचा म्यानेजर बिलपिटर्स ह्यानें एक तारेचा लखोटा आणून माझ्या हातीं दिला. या तारेंतील मजकुरानें माझे सारे बेत जागच्याजागींच राहिले ही तार क्यापटन फॉ ट्यापकेन यांजकडून आलेली असून ती सांकेतिक भाषेंत होती. ट्यापकेन यांच्या हुकुमाप्रमाणें मी पुनः बोटीबर चढलों; पण ती बोट जर्मनीकडे जाणारी नसून पोर्टआर्थरकडे जाणारी होती. पोर्टआर्थर येथील किल्ल्यांचें चालू असलेलें काम कितपत पुरें झालें आहे, व तेथील एकंदर परिस्थिति कशी काय आहे, हें पाहण्याचा हुकूम मला झाला होता. हा हुकूम पाहून मला खरोखर फार आश्चर्य वाटलें. रशिया आणि जपान यांजमधील युद्धांत जर्मनीचे कसले हितसंबंध गुंतले असा-

वेत, हें माझ्या लक्षांत येईना. तसेंच पोर्टआर्थरसारख्या जागीं जाण्याचें कामहि माझ्या पसंतीजोगें नव्हतें. रशियन लोक फार संशयी असावेत असा माझा समज होता. यामुळें पोर्टआर्थरला जाणें मला मोठ्या धोक्याचें वाटलें; पण रशियन लोकांसंबधीं जो माझा पहिला अजमास होता, तो प्रत्यक्ष अनुभवानें खोटा ठरला.

वनस्पतिशास्त्राचा व सृष्टीच्या इतिहासाचा शोधक या पांघरुणाखालीं या भागांत प्रवास करण्याचे मीं आरंभिलें. मी वैद्यकाचा अभ्यास केला असल्यामुळे हें नवें पांघरूण मला अगदीच विशोभित नव्हतें. डॉ. फ्रान्झ फॉ क्यानिट्झ असें नांव वाचकांना यापुढें कोठें आढळलें, तर ते डॉक्टरसाहेब म्हणजे अस्मादिकच हें वाचकानीं लक्षांत ठेवावें. रशिया आणि जपान यांजमधील युद्ध टळत नाहीं, याबद्दल बहुतेक सर्वांची खात्री होऊन चुकली होती. विशेषतः जर्मन सरकारची तर पक्कीच खात्री होती. फक्त रशियाला मात्र या भावी युद्धाची खबर नव्हती ! हें युद्ध कसें उपस्थित झालें याजबद्दलचा थोडासा पूर्वेतिहास सांगतों.

इ. स. १८९५ सालीं चीन व जपान यांमध्यें जें युद्ध झालें, त्यांत चीनचा जपाननें पराभव करून त्याजकडून पोर्टआर्थरचे बंदर मिळविले. त्यानतर फ्रान्स आणि जर्मनी यांच्या पाठिंब्यानें रशियानें दिलेल्या दपटशामुळें तें बंदर सोडणें जपानला भाग पडलें. या दपटशाच्या गडबडीतून इंग्लंड मात्र वेगळे राहिलें हे लक्षांत ठेवण्यासारखे आहे. पोर्टआर्थरचें बंदर जपाननें आपल्या ताब्यांत ठेवल्यास जगाच्या पूर्वेकडील भागांत अखंड शांतता नांदणार नाही, असें रशियानें आपल्या [illegible] खालि त्यांत म्हटलें होतें. हा अपमान जपानच्या हृदयात शल्यासारखा झोंबला. असल्या प्रकारचे अपमान आशियांतील लोक विसरत नाहींत, आणि प्रसगीं त्याचा योग्य वचपा काढल्यावांचूनहि ते रहावयाचे नाहींत. अशा योग्य संधीची वाट जपान पहात होता. बॉक्झर बंडाच्या वेळचें रशियाचें दुटप्पी वर्तन आणि त्या वेळीं पोर्टआर्थरमध्यें त्यांनीं केलेला प्रवेश या गोष्टींवरून त्या वेळीं जें बीज पेरलें गेलें, त्याचें फळ म्हणजे हें रूसोजपानी युद्ध.

पोर्टआर्थर येथें येऊन हॉटेल-ल-युरोप या नांवाच्या खानावळींत मीं

तळ दिला, आणि माझ्या वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासाला उपयोगीं पडेल, अशी सामग्री बरोबर घेऊन मी पोर्टआर्थरच्या टेंकड्याभोंवतीं हिंडू लागलों. जागजागीं चाललेल्या कामावर असंख्य चिनी आणि चंगशूसी लोक पाहून मला मोठें नवल वाटलें. ह्यांत सर्वच चिनी होते असें नसून जपानी मजुराचीहि त्यांत बरीच भेसळ होती. जवळ जवळ शेंकडा दहा इतके जपानी मजूरहि मला त्यांत आढळले. पूर्वेकडील निरनिराळ्या जातींच्या लोकांच्या चेहरेपट्टया पाहण्याचा अभ्यास ज्यांनी केला असेल, त्याला या असंख्य मजुरांतून जपानी चेहरे हुडकून काढणें फारसें कठिण नव्हतें. खुद्द रशियनलोकांच्या धडधडीत डोळ्यासमोर अशा रीतीनें शेकडों जपानी लोक पोर्टआर्थरच्या तटबदीभोंवतीं वावरत होते. खुद्द गडाच्या तटबंदीवर जपानी कारागीर काम करीत होते, अशी माहिती बेयर्न जहाजावर ब्यारन हुराकी यांनीं मला दिली होती. ही बातमी अक्षरशः खरी असल्याचा प्रत्यक्ष प्रत्यय मला या वेळीं आला. हेच जपानी लोक जपानी तोफखान्याच्या फार उपयोगीं पडले. किल्ल्यांतील मर्मस्थानें जपानी तोफखान्याच्या हातीं अचानक पडलीं. या कारागिरांखेरीज दुसरेहि कित्येक जपानी लोक रशियन लष्करी अम्मलदारांकडे नौकरीस राहिले होते. लायोटीशान रेलवेवर आणि पीजन बंदरावर हमालाच्या रूपानें शेकडों जपानी लोक वावरत होते. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, रशियन सरकारचें हें मर्मस्थान जपानी भुंग्यांनीं अगोदरच पोंखरून ठेविलें होते.

जपानी सैन्यास पोर्टआर्थरचा किल्ला इतक्या लवकर सर करतां आला याचीं अनेक कारणें आहेत. मुख्यतः तेथील रशियन अम्मलदार अत्यंत निष्काळजी होते. परिस्थितीचें ज्ञान त्यांना बिलकूल नव्हतें. बुटबैंगण जपानी लोक आपणावर हल्ला करण्यास धजावतील, अशी शंका सुद्धां त्यांस येत नव्हती. पोर्टआर्थरची तटबंदी पूर्णावस्थेस पोहोंचली नव्हती. ही गोष्ट खरी; तथापि ती होती त्या स्थितींत सुद्धां शत्रूच्या हल्ल्यास लवकर दाद देणारी नव्हती. तटबंदीची आंखणी सर्व बाजूनीं फार प्रचंड प्रमाणावर केली होती; तथापि कांहींना कांहीं भाग अपूर्ण स्थितींत असलेले मला सर्वत्र आढळून आले. वनस्पतीचे नमुने हुडकण्याच्या मिषानें मी डालनी

बंदराच्या दक्षिण व पाश्चिम भागांत फिरत असतां क्यांगटाँग द्विपकल्पच्या जवळील डोंगरी किल्ले अत्यंत अपूर्ण स्थितींत असलेले मला आढळले तसेंच पोर्टआर्थर आणि डालनी यांमधील रेलवेचा फाटाहि शत्रूचा हल्ला निवारण करण्याजोगा सुरक्षित नव्हता.

चाललेल्या कामावर अम्मलदारांची चांगलीशी नजर नव्हती. सर्व प्रकारचें काम गोगलगायीच्या चालीने चाललें होतें. कोणाला कोठें जाण्यास आडकाठी नसल्यामुळें मी हव्या त्या भागांत प्रवेश करीत असें तथापि मला कोणी एका शब्दानेंहि हटकलें नाहीं. लष्करी अम्मलदार आणि सोजीर या लोकांत मी खुशाल मिसळत असें. सोजिरासाठीं व्होडका दारूवर थोडेसे पैसे खर्च केल्यामुळें, मी सर्वांचा प्रिय होऊन बसलो होतों. त्याचप्रमाणें अम्मलदाराचाहि मी आवडता होतों. पोर्टआर्थर येथील सामानाचा पुरवठा अगदीं खराब होता, ही गोष्ट मला त्यांजकडून कळली. अनेक मासल्यांपैकीं एकच मासला सांगतों. चौदा लक्ष वीस हजार पौंड कणकीपैकीं निम्मी काणिक आंबून गेली होती. यामुळें पोर्टआर्थरच्या शिबंदीत अनेक रोगांनीं आपलें ठाणें दिलें होतें. युद्ध सुरु झाल्यानंतर केवळ घाणेरड्या अन्नाला बळी पडल्यामुळें पंचेचाळीस टक्के लोक निकामी झाले होते. पांच लक्ष पौंड मेज धान्य किडून गेलें होतें आणि सात लक्ष पौंड गोमांस सडलें होतें. दोन गोष्टींचा मात्र पुरवठा पोर्टआर्थरमध्यें भरपूर होता. त्या दोन गोष्टी म्हणजे दारू आणि बायका

जगांतलीं अनेक दारूबाज ठिकाणें मीं पाहिलीं आहेत, तरी या ठिकाणीं जो दारूचा संग्रह मी पाहिला, तितका मोठा दारूचा आणि तसेंच बदफैली बायकांचा संग्रह साऱ्या जगांत मला कोठें आढळून आला नाहीं ! बहुतेक प्रत्येक लष्करी अम्मलदाराचा एकक खाजगी झनाना होता. कित्येक सैबेरीयन अम्मलदार आपल्या नव्या पिस्तुलांचा गोळीबार शिकत असतां त्यासाठीं दारूनें भरलेल्या बाटल्यांचा उपयोग त्यांनीं केलेला मी पाहिला आहे. अशा वेळीं ती जागा गुडघा गुडघा दारूनें अक्षरशः भरली जात असे. तसेंच येथें जुगारखानेंहि जागोजाग पसरलेले होते. दारूबाजीनें आपला अम्मल येथें इतका करडा बसविला होता कीं, अड-

मिरल टोगोचा पहिला आरमारी हल्ला बंदरावर झाला त्या दिवशीं रशियन आरमारापैकीं निम्याहून अधिक लोक दारू पिऊन मुरद्यासारखे गांवांत पडले होते. त्या दिवशीं एका रशियन साधूची पुण्यातिथि होती, ती त्यांनीं अशा रीतीनें पाळली !

पाणसुरुंग, सर्चलाईट, इत्यादि बंदराच्या संरक्षणाच्या ज्या तजविजी असतात, त्या साऱ्या अगदीं वाईट स्थितींत असल्याचें मला आढळून आलें. बंदरांतील पाणसुरुंगांना वत्ती देण्याचीं किनाऱ्यावरील विद्युत्गृहें मीं तपासलीं. तेथेंहि हाच निष्काळजीपणाचा प्रकार सर्वत्र दिसून आला. पाणसुरुंग कोठे आहेत, हें दर्शविणारे बोयरे पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगत असल्यामुळें गुप्त सुरुंग कोठें आहेत, हें ते साऱ्या जगाला ओरडून सांगत होते. पाणसुरुग पेरण्याचें काम इतक्या कुशलतेनें (?) केलें होतें कीं, प्रत्येक पांच पाणसुरुंगांपैकीं तीन सुरुंग जपानी आरमारांनीं बाहेर काढून फोडले. अडामिरल टोगोनें बंदरावर एकंदर पांच हल्ले चढविले आणि यांतील कित्येक ३६ तासांइतके लांब मुदतीचे असतांहि एका हात्सुसे जहाजाखेरीज दुसरें कोणतेंहि जहाज पाणसुरुंगानें किंवा आगमाशानें दगावलें नाहीं. या एकाच गोष्टीनें पाणसुरुग पेरण्याची शिताफी दिसून आली !

पोर्टआर्थरच्या गडाभोंवतीं फिरून तेथील एकंदर वस्तुस्थितीची मीं पहाणी केली, तों किल्ल्याच्या आजूबाजूची जमीन भुसभुशीत राखट मातीची आहे, असें मला आढळून आलें. २०३ मिटरची टेंकडी जपानी सैन्यानें फारसे श्रम न करितां सर केली, याचें मला फारसें नवल वाटलें नाहीं. लष्करी दृष्टीनें पाहतां रशियन सैन्यानें तेथें चांगल्या प्रकारची मजबुती केली होती; पण भोंवतालची जमीन शत्रूला अनुकूल अशी असल्यामुळें रशियनांच्या तयारीचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. जमीन भुसभुशीत असल्यामुळें मोठ्या तोफांचे कुलपी गोळे न फुटतांच जमिनींत घुसून बसत. यामुळें तटबंदीशीं समांतर चर खणून किल्ल्याच्या दिशेनें सपासप पुढें पाऊल टाकणें जपानी सैन्यास सुकर झालें. तेथील जमीनीचा हा विशिष्टपणा जपानी लोकांच्याहि लक्षांत आला होता आणि

त्यांना त्याचा उपयोगहि चांगला करून घेतला. १७४ आणि १३१ मिटर टेकड्यांवरील तटबंदी अपूर्ण स्थितींत असल्याचें मला आढळून आलें. किल्ल्याची तटबंदी पुरी करण्यासाठीं तेथील गडकरी जनरल स्मर्नाफ हे जीवापाड धडपडत होते; पण मुख्य सेनापति जनरल क्रॉनड्राचिंको यांच्याशीं त्यांच्या नित्य कटकटी चालत असल्यामुळें त्यांच्या साऱ्या खटपटी फुकट गेल्या. पोर्टआर्थरच्या तटबंदीसाठीं जो अलोट पैसा रशियन सरकारनें वेगळा काढून ठेवला होता, त्याचा प्रामाणिकपणें उपयोग झाला असता, तर तो किल्ला खरोखर अभेद्य बनला असता; पण या पैशापैकीं साठ टक्के कोणत्या खाड्यांत गडप झाले, याचा मागमूस कोणासहि लागला नाहीं. माझें हें म्हणणें तुम्हांला अतिशयोक्तीचें वाटण्यासारखें आहे; पण त्या वेळची पोर्टआर्थरची स्थिति कोणींहि नजरेनें पाहिली असती, तर त्यानेंहि हेंच मत खास दिलें असतें.

एकंदरीनें तेथले रशियन अम्मलदार गचाळ होते, असें मीं म्हटलें खरें; तथापि सारेच अम्मलदार व्यसनी व दुराचारी होते असें नाहीं. यांत कित्येक माणसें दानतीनें चोख आणि कर्तव्यदक्ष अशींहि होतीं. पोर्टआर्थरची भयंकर स्थिति त्यांच्या लक्षांत आली होती; पण ही गोष्ट त्यांच्या इतकी आंगवळणीं पडून गेली होती, कीं, त्या गोष्टीनें त्यांनीं आपली झोंपमोड होऊं दिली नाहीं. शोधकबत्ती (सर्च लाईट) चीं ठाणीं सुद्धां अगदीं दैन्यवाण्या स्थितींत असल्याचें मला आढळून आलें. जपानी आरमाराचा दुसरा हल्ला बंदरावर आला, त्या रात्रीं शोधकबत्त्या नादुरुस्त झाल्यामुळें बंदरांत अमावास्येचा काळोख पसरला होता. हा काळोख अर्थातच शत्रूला उपकारक झाला. यानंतर भयंकर खर्च करून आणि विलक्षण आडचणी सोसून या बत्त्या दुरुस्त करण्यांत आल्या होत्या; पण घराला आग लागल्यावर विहीर खणून काय उपयोग ? शोधक बत्त्यांचीं ठाणीं आणि त्यांच्यासाठीं वीज उत्पन्न करण्याचा कारखाना यांच्या बरोबर जागा मजुरदार हेरांच्या मार्फत जपानी तोफखान्यांच्या हातीं आगाऊ पडल्यामुळें त्यांनीं त्या जागांची नुसती चाळण करून सोडली. जपानी गोलंदाजांची निशाणबाजी अचाट आहे, असा मोठा

गवगवा त्या वेळीं झाला होता; पण या निशाणबाजीच्या मुळाशीं काय होतें, याचा विचार केला झणजे जपानी गोलंदाजांचें फारसें कौतुक करावयाला नको. माऱ्यांच्या जागांचीं सर्व अंतरें आणि त्यांची उंची वगैरे सर्व प्रकारची माहिती त्यांच्या हातीं आधींच पडली होती.

सामान्यपणें रशियन अम्मलदार वर्ग निष्काळजी आणि विचारशून्य होता, तरी तेथल्या रशियन शिबंदींतील शिपायी गडी चांगले होते, या बद्दल मात्र वाद नाहीं. ते मोठे विलक्षण तेजदार होते असें नाहीं, तथापि ते विश्वासू आणि आज्ञाधारक होते, यांत मात्र शंका नाहीं. कसाहि प्रसंग आला, तरी रशियन सेना बेदील होऊन कधींहि सैरावैरा पळत सुटावयाची नाहीं. अखेरच्या मनुष्यापर्यंत जागच्याजागीं लढत राहून सारी पलटण आपले देह धारातीर्थीं अर्पण करील; पण पळत सुटणार नाहीं. अम्मलदारासंबंधी पहातां ते तेजस्वी, पुढें सरकण्यास उद्युक्त आणि निधड्या छातीचे असे होते; पण विषयासक्ति, हलगर्जीपणा, भावी युद्धाच्या स्वरूपाबद्दल बेफिकिरी आणि शत्रूच्या तयारीबद्दल अनादर या सर्व दुर्गुणांनीं त्यांचे चांगले गुण मातीमोल झाले.

पोर्टआर्थर येथील वरिष्ठ अम्मलदारांपैकीं दारूगोळ्याच्या खाजिन्यावरील मुख्य अम्मलदार कर्नल रीस हे मात्र ह्या अम्मलदारांच्या नियमास अपवाद होते. किल्ल्याचे मुख्य गडकरी जनरल स्टोसेल यांजपासून तों तहत खालच्या शिपायांपर्यंत लष्करी अम्मलदारांची स्थिति कशी होती, हें मीं वर सांगितलेंच आहे. कर्नल रीस यांच्या लक्षांत मात्र ही भयंकर स्थिति आलेली होती. पुष्कळ वेळां मी त्यांच्याशीं शिळोप्याच्या गोष्टी सांगत बसत असें त्या वेळीं दारूगोळ्याचा पुरवठा उद्वेगजनक स्थितींत आहे, असे उद्गार ते मजपाशीं काढीत असत. या एकदर परिस्थितीसबंधीं अधिक काळजी कां घेण्यांत येत नाहीं ? असा प्रश्न मी करतां ते म्हणाले, " काय करावें ? सरकार स्वारी (झार) येथून फार लांबच्या पल्ल्यावर आहे. "

दारूच्या भोतांत जें ठरलेलें वजन असावयाचें, त्याहून कमी वजनाचे भोत पुरविण्यांत आले होते. अर्थात् पैशाची आकारणी मात्र पुऱ्या वज-

नाची होत असे. दारूगोळ्याचीं पोतीं ज्या गाडीच्या डब्यांतून यावयाचीं, त्या डब्यांत वरचे दोन थर मात्र दारूगोळ्याचे असून त्यांच्या खालीं बाकी सारीं पोतीं वाळूचीं असावयाचीं. वाळूचा उपयोग फुटणाऱ्या गोळ्यापासून संरक्षण करण्यासाठीं असतो. अशा रीतीनें दारूगोळ्याऐवजीं वाळू पदरांत पडून त्याऐवजीं दारूच्या किंमतीचा पैसा लष्करी कत्राटदारांच्या खिशांत पडत असे. सेनापति स्टोसेल यांच्याशीं माझी दोनदां मुलाखत झाली. हे मोठे चतुर सेनानी असावेत असा माझा ग्रह दोन्ही वेळां झाला नाहीं. बांध्यानें हे जनरल बुल्गरसारखे होते. हे अंतःकरणाचे खुले आणि निधड्या छातीचेहि होते; पण लष्करी कौशल्य यांच्या डोक्यांत फारसें असावें, असें मला वाटलें नाहीं.

पोर्टआर्थर येथें जे कांहीं रशियन लोक मला भेटले, त्या सर्वांत व्हेरेस्टशागिन हेच काय ते लक्ष वेधून घेण्यासारखे मला आढळले. युद्धाचीं चित्रें रगविण्यांत यांच्या तोडीचा चित्रकार विरळा. त्यांनीं मला एक वेळ आपला ' स्नेही ' म्हटलें याचा मला मोठा अभिमान वाटतो. ते एकदां हिंवतापानें आजारी असतां मी त्यांच्या थोडासा उपयोगी पडलों. या कारणानें त्यांची माझी प्रथम ओळख झाली. पुढें साहित्य संगीत इत्यादि गोष्टींबद्दल आमचीं मतें जुळतीं झाल्यामुळें हा परिचय दृढ होत गेला. पुष्कळ लेखक, कलापंडित व राजमंत्री मला आजपर्यंत भेटले; पण खोल विचार, आणि खरी गाळीव विद्वत्ता या बाबतींत या चित्रकाराची बरोबरी करणारा मला फारसा कोणी आढळला नाहीं.

पोर्टआर्थर बदराच्या समुद्रकांठीं असलेल्या एका घराच्या सज्जांत आम्ही एके दिवशीं बसलों होतों. रात्र अगदीं शांत होती. आकाश अगदीं निरभ्र होतें. स्तब्धता सर्वत्र भरून राहिली होती. चांदणें पिठासारखें पडलें होतें. आम्ही बसलों होतों तेथून सर्व बंदर दिसत होतें. रशियन आरमारांतील राक्षसी गलबतांच्या छाया क्षितिजावर दिसत होत्या. आम्ही त्या वेळीं त्या भागाच्या इतिहासाची चर्चा करीत व विड्या ओढीत स्वस्थ बसलों होतों. जुन्या मांचू व तार्तार घराण्यांनीं जगाच्या इतिहासांत कसल्या प्रकारच्या गोष्टी नमूद करून ठेवल्या आहेत, व यापुढेंहि

या भागांत काय प्रकार घडण्याचा संभव आहे, अशा प्रकारच्या अनेक विषयांवर आमचें संभाषण चालू होतें. त्या वेळीं या विषयासंबंधीं व्हेरेस्टशागीन यांजपाशीं ऐतिहासिक ज्ञानाचा केवढा मोठा सांठा होता, हें मला कळून आलें.

अखेरीस रात्र बरीच झाली असें पाहून मी त्यांना ह्मणालों, " आज बराच वेळ मीं तुह्मांला त्रास दिला, " तेव्हां ते एकदम माझ्याकडे वळून व आपला हात माझ्या खांद्यावर ठेवून ह्मणाले, " छे ! छे ! डॉक्टरसाहेब, आज तुह्मीं माझ्यावर फार उपकार केले आहेत. आज माझी वृत्ति बावरल्यासारखी झाली आहे. या सुंदर टेंकड्या, लवकरच आगीच्या खायी बनून जातील, असें मला आज डोळ्यापुढें दिसूं लागलें आहे. आणि त्यांत रशियाचें नुकसान होईल; पण तें पाहण्यास मी कांहीं जगणार नाहीं. " हें शेवटचें वाक्य ते स्वतःशींच पुटपुटत असल्यासारखें दिसलें. थोड्या वेळानें ते आपल्या आरामखुर्चीवर एकदम उठून बसले आणि त्यांनीं आपलें आंग झाडल्यासारखें केलें. ते एकदम ह्मणाले, " डॉक्टर, मनुष्याला भावी गोष्टी कधीं कधीं आगाऊ कळतात, यावर तुमचा विश्वास आहे काय ? मृत्यु मला येथें लवकरच गांठील असें मला खचित वाटतें. "

त्यांचें हें भाषण ऐकून माझें शरीर थोडेंसें थरारलें. माझ्या मनांत त्या वेळीं काय आलें, तें शब्दांनीं सांगतां येण्यासारखें नाहीं. सामान्य गोष्टींनीं भांबावून जाण्याइतक्या कच्चा दिलाचा मी नाहीं. मी मनाचा मोठारा कोंवळा नाहीं, अथवा असल्या प्रकारच्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याइतका भोळाहि पण नाहीं; तथापि माझ्या आयुष्यक्रमांत एकदोन गोष्टी अशा घडून आल्या कीं, त्यांच्या कार्य–कारणसंबंधी कसलीहि सामान्य उपपत्ति उपयोगीं पडत नाहीं. व्हेरेस्टशागीन यांचें भाषण ऐकून मीहि थोडा भांबावल्यासारखा झालों; तथापि थोड्या वेळानें मीं आपलें चित्त आंवरलें आणि त्यांना ह्मटलें, " तुमच्या अंगांत तापाची कसर अजून थोडीशी राहिली आहे. त्यांतून औषध थोडें अधिक कडक पडल्यामुळें त्याचाहि परिणाम तुमच्या चित्तावर झाला आहे, यामुळें असे भलभलते

विचार तुमच्या चित्तांत येत असतील. " माझें भाषण ऐकून ते उठून उभे राहिले आणि हंसून म्हणाले, " तुझी अश्विनीकुमार पडलां, तेव्हां तुमचें म्हणणें खरें म्हटलेंच पाहिजे. "

तेथून बाहेर जाण्यापूर्वी त्यांनीं मला पोर्ट आर्थरच्या देखाव्याचें एक लहानसें चित्र दिलें. मला जीं कांहीं थोडींशीं चांगलीं माणसें भेटलीं त्यांपैकीं एकाची स्मृति म्हणून तें चित्र मीं जवळ बाळगलें आहें. अस्मादिकांशीं ज्यांची ज्यांची गांठ पडली, त्यांपैकीं जे थोडेसे निर्लेप म्हणून सुटले, त्यांतच हे चित्रकार होते.

व्हेरेस्टशागीन यांचें भविष्य खरें झालें. पुढें सहा आठवड्यांनीं ॲडमिरल मॅकरॉफ यांच्या जहाजानें पोर्ट आर्थरच्या तोंडाशीं आंतील सर्व माणसांसह जी जलसमाधि घेतली, त्यांत व्हेरेस्टशागीन हे एक होते.

पोर्ट आर्थर येथें मी आणखी पांच आठवडे राहिलों. ॲडमिरल टोगो यांनीं पोर्ट आर्थर बंदरावर जो रात्रीचा पहिला छापा घातला त्याच्या आधीं बरोबर एक आठवडा मला जर्मनीहून तार आली. ही तार अर्थातच सांकेतिक भाषेंत होती. पोर्ट आर्थर बंदरांत अडकून पडण्याची वेळ लवकरच येईल, याकरतां तुझी ताबडतोब तेथून बाहेर पडा, असा हुकूम मला या तारेनें मिळाला होता. बर्लीन येथील बातमीखात्यास या हल्ल्याची अगाऊ माहिती होती. पण पोर्ट आर्थर येथें याबद्दल नुसती गुणगुण देखील कळली नव्हती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तसेंच हा हल्ला होण्यापूर्वी कित्येक तास न्यूयॉर्क येथील सराफकट्ट्यावर रशियन नोटींच्या भावात अठरा दोकड्यांची घट झाली होती, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वाशिंगटन येथील जर्मन वकिलातींतून ही बातमी बाहेर फुटली होती. मी पोर्ट अर्थर येथून बाहेर पडल्यानंतर बरोबर सात दिवसांनीं टोगो यांनीं रात्रीचा हल्ला चढवून झारविच, रेट-व्हिझान् आणि पॅलाडा या तीन रशियन जहाजांस समुद्राचा तळ दाखविला.

युरोपला निघून जाण्यापूर्वी मी प्रथम कियोचौला गेलों. कियोचौ हें चिनांतील एक जर्मन ठाणें आहे. (होतें.) माझ्या एकंदर कामगिरी-संबंधीं तपशीलवार हकीकत तेथून मीं तारेनें आपल्या सरकारास कळविली.

यानंतर सहा महिन्यांनीं जर्मनींतील बऱ्याच मोठमोठ्या लष्करी अम्मलदारांची व माझी मुलाखत झाली त्या वेळीं मीं पुरविलेली माहिती व त्यावरून मीं काढलेलीं अनुमानें हीं अगदीं बरोबर उतरलीं याबद्दल त्यांनीं माझें अभिनंदन केलें.

पोर्टआर्थर येथें मला कां पाठविण्यांत आलें होतें, याचीं कारणें मला मागाहून कळलीं. पोर्टआर्थर येथें व त्या बाजूच्या एकंदर भागात रशियाचीं स्वसंरक्षणाचीं साधनें कितपत जय्यत स्थितींत होतीं, त्याचा अंदाज जर्मनीला काढावयाचा होता.

या अंदाजाचीं कारणें अशीं:—

पहिल्या नेपोलियनच्या काळानंतर जर्मनीला जर कोणत्या एकाद्या राष्ट्राची भीति वाटत असेल, तर तें राष्ट्र रशिया हेंच होय. रशियाशीं उघडपणें तंटा उपस्थित करणें जर्मनीला धोक्याचें वाटतें. १९०६ सालीं रुसो जपानी युद्धात रशियाची जी तंगडमोड झाली, तीमुळें बाल्कनद्वीपकल्पांतील त्याच्या वजनास उतरती कळा लागली. त्याचप्रमाणें बाल्कनयुद्धांत रशियाची नीति अयशस्वी झाल्यामुळें त्याचें तेथील महत्त्व इतकें कमी झालें कीं, कित्येक वर्षेपर्यंत तें पुन्हां सांवरलें जाणार नाहीं. आपल्या बातमीखात्याच्या द्वारें जर्मनीला रुसोजपानी युद्धाचें भविष्य आगाऊच कळून चुकलें होतें. तेवढ्यानें सावध होऊन बाल्कन संस्थानांतील रशियाच्या महत्त्वाचें पूर्ण उचाटन करण्याचा उपक्रम जर्मनीनें सुरू केला.

रुसोजपानी युद्धांत झालेल्या पराभवानें रशियाच्या सामर्थ्याचें केंद्रस्थान बदललें. यामुळें बाल्कनसंस्थानांत आणि तुर्की राज्यांत ढवळाढवळ करण्याची संधी जर्मनी आणि आस्ट्रिया या राष्ट्रांस मिळाली. अशा संधीसाठीं हीं राष्ट्रें टपूनच बसलीं होतीं. रुसोजपानी युद्धांत रशियाची सरशी होईल, असें जर्मनीला वाटलें असतें, तर बाल्कन संस्थानांच्या नकाशांचे रंग आणखी कांहीं निराळ्याच पद्धतीनें पालटले असते. असो. याचा आणखी उल्लेख पुढें येईलच.

प्रकरण चवथें.

तुर्की राज्यांत.

माझा पूर्वेकडील प्रवास संपून तारीख १० मार्च १९०५ रोजीं मी बर्लिन येथें परत आलों. यानंतर चार महिने विशेष महत्त्वाचें असें कांहीं घडलें नाहीं. या चार महिन्यांत मला ज्या कामगिऱ्या सांगण्यांत आल्या, त्यांत महत्त्वाची व मनोवेधक अशी एकहि नाहीं.

यानंतर तारीख ५ जुलै रोजीं कॅपटन् फॉ ट्यापकेन् यांजकडून मला तांतडीचें बोलावणें आलें. त्याप्रमाणें कोनिगरग्रयाडझर स्ट्रासी नं० ७० येथें मी एकदम जाऊन हजर झालों. मी एकदम कॅपटन साहेबांच्या ऑफिसांत शिरलों आणि त्यांजकडे मीं पाहिलें, तेव्हां ते बऱ्याच गडबडींत होते असें दिसलें.

" डॉक्टरसाहेब, तुमची आमची संगति आतां तुटणार याचें मला फार वाईट वाटतें. यापुढें वुइलहेल्मस्ट्रासीच्या तैनातींत तुम्हांला देण्याचा हुकूम मला झाला आहे. मला खरोखर फार राग आला आहे. आमच्या खात्यांतून तुम्हांला तिकडे द्यावें हें मला बरें वाटत नाहीं. पण करणार काय ? आलेल्या हुकुमाची बजावणी करणें मला भाग आहे. "

या त्यांच्या भाषणावर मीहि आपलें दुःख प्रदर्शित केलें.

" डॉक्टर, यांत तुमचें हितच आहे. वुइलहेल्मस्ट्रासीची नजर आमच्या माणसांवर फार करून जात नाहीं. माझ्याकडील माणसांची बदली ते आपणाकडील तैनातीवर फारशी कधीं करीत नाहींत; पण तुमच्या चांगल्या कामगिरीमुळें त्यांचें लक्ष तुमच्याकडे वेधलें आहे. तथापि तुम्ही आम्हांला कांहीं कायमचेंच सोडणार नाहीं अशी मला आशा आहे. कधीं मधीं आमची आठवण ठेवा, इतकीच मी तुम्हांला विनंति करतों. हर स्टयामर हे तुमच्या बरोबर जाऊन तुम्हांला तेथें रुजू करतील. सलाम. तुमची भरभराट होवो. "

मोठ्या प्रेमानें क्यापटन् साहेबांचें व माझें हस्तांदोलन झालें, आणि

अशा रीतीनें आरमारी बातमीखात्याचा व माझा संबंध तुटला. स्टामर आणि मी असे दोघे बाहेर पडल्यावर आम्हीं एक मोटारगाडी बोलावली. आणि बुइलहेल्मस्ट्रासीवर जाऊन हजर झालों. दरवाजावर पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणें सर्व सोहळा झाल्यावर द्वाररक्षकानें एका खोलींत आह्मांला बसविलें व तो अदृश्य झाला. येथें मला कसल्या प्रकारची कामगिरी मिळणार, हें जाणण्याची मला मोठी उत्कंठा लागली होती. पण स्ट्यामर यास या बाबतींत मीं कसलाहि प्रश्न विचारला नाहीं. या खात्यांत काम करूं लागल्यापासून मला प्रथमच मिळालेला, प्रश्न न विचारण्याचा धडा मीं आतांपर्यंत चांगला गिरविला होता. थोड्याच वेळांत उंच, अंगानें साधारण बारीक व थोडेसे सांवळ्या वर्णाचे असे एक गृहस्थ आंत आले. पक्क्या सुलतानी थाटाचा प्रशियन अम्मलदार कसा असतो, हें या गृहस्थांच्या गागणुकीवरून कळण्यारखे होतें. ते जलदीनें पावलें टाकीत खोलींत शिरले आणि आम्हीं दिलेल्या सलामीचा स्वीकार थोडीशी मान हलवून त्यांनीं केला. नंतर स्ट्यामर याजकडे बघून ते ह्मणाले,

" काय स्ट्यामर, काय खबर आहे ? "

" हे डॉ. ग्रेव्हज्. मेहेरबान. "

" असें काय ? ठीक आहे. स्ट्यामर, क्यापटन् ट्यापकेन् यांना माझे सलाम कळवा. "

सलाम करून हर स्ट्यामर बाहेर पडले. या नव्या मेहेरबान साहेबांनीं मला दुसऱ्या एका आंतल्या खोलींत नेलें. त्या ठिकाणीं बसलेल्या एका चिटणविसाने या मेहेरबानांचें नांव व हुद्दा हीं मला कळविलीं. त्यांचे नांव ग्राफ बोथो फॉ वेडेल असें असून ते बादशहाचे प्रिव्हीकौन्सीलर होते.

अस्सें ! एकंदरींत कौंट वेडेल ह्मणतात, ते हे ! आजपर्यंत कौंट साहेबांची बरीच कीर्ति मीं ऐकली होती; पण त्यांचें प्रथम दर्शन आजच मला झालें. खुद्द बादशहांचे हे सल्लामसतलगार असून हेरखात्याच्या राजकीय विभागाचे हे मुख्य अम्मलदार होते. हे गृहस्थ ह्मणजे बादशहाचा उजवा हात असा त्यांचा लौकिक होता. आतां एकंदरींत मोठी मजा होणार यांत कांहीं शंका नाहीं. मला कामगिरी तरी कसली मिळणार ?

अशा प्रकारच्या विचारतरंगांत मी बाहवत असतां कौंट साहेबांकडून मला एकदम बोलावणें आलें, आणि खुद्दांच्या खोलींत आमचा प्रवेश झाला.

मी आंत गेल्यावर कौंट यांनीं एका खुर्चीकडे बोट करून मला बसण्यास सांगितलें. वेडेल यांनीं बराच वेळपर्यंत आणि अत्यंत सूक्ष्मपणें अस्मादिकांची मर्ति न्याहाळून पाहिली आणि संतोषाचें चिन्ह त्यांच्या चेहेऱ्यावर उमटलें.

" डॉक्टर, तुमचें वय काय ? "

माझें वय थोडें असल्यामुळें वयाचा प्रश्न कोणी विचारल्याबरोबर मला मोठी चीड येते.

" पंचवीस, मेहेरबान. "

" अगदींच पोरवय. अगदींच कोंवळा ! " थोडा वेळ थांबून त्यांनीं पुनः एकवार टक लावून माझ्याकडे पाहिलें.

" असो. तुम्ही लहान असलां, तरी तुमचें काम संतोषकारक आहे, अशी खबर आम्हांला मिळाली आहे. सामान्यतः तुमच्या वयाच्या माणसांना असावी, त्याहून तुमची बुद्धि आणि सारासार विचारशक्ति हीं अधिक योग्यतेचीं आहेत. "

मीं आभारदर्शक सलाम केला.

कौंट वेडेल म्हणाले, " आजपासून तुमची नौकरी आमच्या शाखेंत रुजू करण्यांत आली आहे. फार महत्त्वाच्या अशा कांहीं कामगिऱ्या तुम्हांस सांगण्यांत येतील. त्यासंबंधीं तुम्हांला जी कांहीं माहिती लागेल, त्याबद्दलचे सारे हुकूम खुद्द माझ्याकडून तुम्हाला मिळतील. कोणत्याहि बाबीबद्दलचा रिपोर्ट तुम्हांला कळविणें असेल, तेव्हां तो थेट माझ्याकडे करीत जा. कोणताहि अम्मलदार अथवा दुसरा कोणीहि मनुष्य केवढ्याहि मोठ्या दर्जाचा असला तरी माझ्या स्पष्ट परवानगीशिवाय त्याची भेट घेण्याची तुम्हांला मनाई आहे, समजलां ?

" होय साहेब. "

कौंट आणखी म्हणाले, " तुम्हाला लागेल तो पैसा आमच्या चिट-

णिसाकडून घेत जा. दिलेल्या पैशाचा हिशोब तुह्मांला दरमहा रुजू करावा लागेल. कामगिरीवर जाण्यास तुह्मी केव्हां तयार व्हाल ? ”

“ दोन तासांत तयारी करूं शकेन ” असा मी जबाब दिला.

कौंट म्हणाले, “ ठीक आहे. जितक्या लवकर तुह्मी तयार व्हाल तितकें चांगलें. आतां जी कामगिरी तुह्मांला मी सांगणार आहें ती अशी. तुह्मी एकदम कान्स्टान्टीनोपलला जा आणि फ्रेंच व रशियन सरकाराकडून तेथच्या कोणत्या सरकारी अम्मदारांना तैनात मिळते याचा शोध करा. तसेंच मुलकी व लष्करी अम्मलदारांचें कोणत्या स्त्रियांशीं विशेष संघटन आहे, याचाहि शोध करा. विशेषेंकरून या स्त्रिया कोणत्या देशांतून आल्या आहेत, याचा शोध काढण्यास विसरू नका. येथून कांहीं ओळखीचीं पत्रें मी तुह्मांला देणार नाहीं. कारण त्यामुळें तुमच्याबद्दल तेथें संशय मात्र उत्पन्न होईल. तेथले लोक फार लुच्चे आहेत, याकरतां फार संभाळून आणि धिरे धिरे तुमचा उद्योग तुम्हांला केला पाहिजे. त्या देशांत कोणतेहि काम झटपटीनें व्हावयाचें नाहीं हें तुह्मांला ठाऊक आहेच. ”

यानंतर कांहीं वेळ दुसऱ्या कांहीं बारीकसारीक मुद्यांवर आमचें संभाषण झाल्यावर कौंट म्हणाले, “ आजपासून तुमचा सरकारी नंबर १७३४ आहे, हें ध्यानांत ठेवा. खुद्द माझ्याकडे जे रिपोर्ट तुह्मी पाठवाल, त्यावर १७ ही सही असावी आणि जे दुसरे रिपोर्ट आमच्या ऑफिसाकडे येतील, त्यावर ३४ ही सही करीत जा. ”

माझ्या प्रवासाच्या तयारीकरतां लागणाऱ्या खर्चाची रक्कम कौंटसाहेबांच्या एका चिटणिसाकडून मीं घेतली आणि मी आपल्या खोलींत परत येऊन पुढील कामगिरीची तयारी कशा प्रकारें करावी, याचा विचार करूं लागलों. क्यापटन् ट्यापकेन यांच्या ऑफिसांतून माझी बदली झाली, ही गोष्ट मला एका अर्थी बरी वाटली. कारण वुइलहेल्मस्ट्रासींत माझी नेमणूक झाल्यामुळें मुत्सद्दी मंडळाच्या पाताळयंत्रांतील विशेष महत्त्वाचे भाग मला पहावयाला सांपडतील असें मला वाटलें. वुइलहेल्मस्ट्रासींतिल अंमलदार माझ्या कामासंबंधानें खुष झाले आहेत, असें ट्यापकेन यांज-

कडून मला कळलें होतें. पोर्टआर्थर येथे जी कामगिरी मीं बजावली तिजमुळें एका खाजगी नाजुक कामगिरीवर माझी नेमणूक झाली होती. ती गोष्ट अशीः—

आपल्या सर्व लष्करी अंमलदारांवर जर्मनीची सक्त नजर असते. त्यांतील एकादा अंमलदार आपल्या उत्पन्नाहून अधिक उधळपट्टी करतोसें दिसलें कीं, त्याची ताबडतोब शहानिशा करण्यांत येते. स्प्यांडॉ येथील शिबंदीपैकीं एक लष्करी अंमलदार पुष्कळ पैसा उधळतो असें आमच्या गुप्तखात्याच्या नजरेस आलें, तेव्हां त्याजबद्दल चौकशी करण्याचे कामीं माझी नेमणुक झाली होती. स्प्यांडॉ येथील बंदुकींच्या कारखान्यांत या अंमलदाराची नेमणूक होती. त्याच्या उधळपट्टीला लागणारा पैसा इतर राष्ट्रांना लष्करी रहस्य सांगून तो मिळवीत असेल असा साहजिकच संशय आला.

हा संशय निराधार असून आंत कांहीं वेगळाच नाजुक प्रकार आहे, असें मला आढळून आलें. परकीय राष्ट्रांच्या बाबतींत या अम्मलदाराची वर्तणूक अगदीं निष्कलंक होती, असे मला दिसलें. त्याला जी प्राप्ती होत होती तिचा उगम एका राजकुळांतून झाला होता. एका राजघराण्यांतील एक मुलगी त्याच्यावर आपक झाली होती आणि तिजकडून त्याला पुष्कळ पैसा मिळत असे. ती मुलगी एका सन्माननीय घराण्यांतील होती, त्या अर्थीं क्यापटन् ट्यापकेन्कडे जाणाऱ्या रिपोर्टांत तिच्या नांवाचा उल्लेख करणें मला युक्त वाटलें नाहीं. आतां रिपोर्ट कसा करावा याची मला मोठी पंचाइत येऊन पडली. शेवटीं सदर्हू अम्मलदारानें कोणत्याहि प्रकारचा देशद्रोह केला नाहीं, एवढ्याच [illegible] रिपोर्ट मीं ट्यापकेन् यांजकडे पाठविला, व याशिवाय दुसरा एक खाजगी रिपोर्ट एकदम वरिष्ठ अम्मलदाराकडे मीं पाठविला व त्यांत या नाजुक गोष्टीचा उल्लेख मीं केला होता. यामुळें त्या राजकन्येच्या नांवाचा बभ्रा खालच्या अम्मलदारांत न होतां सर्व काम सुरळीतपणें पार पडलें. या कामगिरींत जी सारासार विचारशक्ति मीं दाखविली, तीमुळें बुइलहेल्मस्ट्रासींत माझ्याबद्दल चांगला ग्रह उत्पन्न झाला असावा, असा माझा खास तर्क आहे.

मिटलस्ट्रासीच्या रस्त्यावर एका बाजूच्या घरांत मीं रहावयासाठीं जागा घेतली होती. साऊथ आफ्रिकेंतून मीं बरोबर आणलेला झुलू जातीचा छोकरा किम् हा आतां चांगला वाढला होता. तोच माझी सर्व व्यवस्था पहात असे. मी कोण आणि मी उद्योगधंदा काय करतों इत्यादि गोष्टींची फाजील चवकशी माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं करूं नये ह्मणून मी साउथ आफ्रिकेंतला एक मोठा जमीनदार असून प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं युरोपांत आलों आहें, अशी हकीकत चोहींकडे मीं पसरून दिली होती. कित्येक वेळां महिनेच्या महिने आमची स्वारी अस्तंगत व्हावयाची आणि कित्येक वेळां महिनेच्या महिने मिटलस्ट्रासी वरील बिऱ्हाडांत माशा मारीत पडावयाची. असल्या या परस्परविरोधी वर्तनाचा मेळ लोकांच्या दृष्टीनें वसविणें मला इष्ट होतें. याकरतां ही साउथ आफ्रिकन् जमीनदाराची कहाणी मला रचावी लागली. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं हवा खाण्याच्या ठिकाणीं मी मधून मधून जाऊन रहात असतों, असा समज मीं करून दिला.

कान्स्टान्टिनोपल येथें ज्या कामगिरीवर माझी योजना झाली होती, ती कामगिरी फार नाजुक स्वरूपाची होती. तेथे बराच काळ राहणें मला अवश्य होतें. तेथें कोणत्या धंद्याच्या मिषानें रहावें, याबद्दल मला मोठा विचार पडला. देशोदेश पहाणारा प्रवासी या नात्याने रहावें, असा विचार प्रथम माझ्या मनांत आला; पण प्रवाशाचे हें सोंग माझ्या उद्देशाला अगदींच विरुद्ध असल्यामुळें त्याबद्दल अधिक विचार करण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. केवळ देशोदेशींच्या मौजा पहात फिरणारा प्रवासी कोणत्याहि एकाच ठिकाणीं फार दिवस रहात नाहीं आणि मला तर तेथें तीन चार महिने मुक्काम करावयाचा होता. प्रवाशाच्या सोंगाची याप्रमाणें वाट लागल्यावर दुसऱ्या कसल्या धंद्याचें सोंग पांघरावें याचा विचार मी करूं लागलों. एकाद्या विषयाचा विद्यार्थी ह्मणून तेथें रहावें, तर तशा स्थितीलाहि अनुकूल अशा कांहीं योजना कान्टान्टिनोपल येथें नाहींत. पोर्ट-आर्थर येथें मी वनस्पतिशोधक ह्मणून राहिलों होतों. हाच आपला 'शोध' तुर्की राजधानींतहि चालवावा, असें एक वेळ मला वाटलें; पण हाहि

धंदा जमण्याचा रंग दिसेना. कसल्या तरी जिनसांचे व्यापारी बनावें, तर तेंहि माझ्या हातून पोषक नव्हतें. व्यापारी बनावयाचें झालें तेथल्या पुष्कळशा व्यापाऱ्यांच्या ओळखीपाळखी केल्या पाहिजेत. या ओळखी करण्यांत काळाचा व्यय फार होणार आणि आमचें खरें कार्य लांबणीवर पडणार. अशा रीतीनें विचार करतां करतां शेवटीं हकीम बनण्याचा मीं निश्चय केला. तुर्क आणि अरब लोकांत हकीम हा फार आदरणीय आणि पूज्य मानला जातो. याप्रमाणें पुढील सोंग निश्चित केल्याबरोबर मीं एकदम आपल्या खात्याकडे टेलीफोन केला आणि कान्टान्टिनोपल येथील जर्मन व पेरा हॉस्पीटल या दवाखान्यांच्या मुख्याला ओळखीचीं पत्रें घेण्याची व्यवस्था केली. वरील इस्पितळें ज्या संस्थेमार्फत चाललीं होतीं, ती संस्था बर्लिन येथेंच होती. मीं मागितलेलीं पत्रें त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांकडून मला मिळालीं. उष्ण कटिबंधांतील आणि आशियाखंडांतील विशिष्ट रोगांचा अभ्यास करण्याकरितां कान्स्टांटिनोपल येथें मी जात असून मला सर्व प्रकारचें सहाय्य करावें असा मजकूर त्या पत्रांत होता. माझीं शस्त्रक्रियेचीं हत्यारे व इतर वैद्यकीय आयुधेंहि बरोबर घेण्याच्या सामानांत बांधण्याविषयीं मीं किम याला सांगितलें, व त्याच रात्रीं कान्स्टान्टिनोपलकडे जाणाऱ्या खास गाडीनें बर्लिन शहर सोडण्याचा मीं बेत केला. या वेळीं किम यास मीं बरोबर घेतलें होतें. माझ्या पुढील बेताला किमचें चांगलें सहाय्य होण्यासारखें होतें. थोड्या वेळानें काउन्ट वेडेल याजकडून कांहीं पैसे व सीलबंद पत्रे घेऊन एक मनुष्य आला. कान्स्टान्टिनोपल येथें जे जर्मन अधिकारी जर्मनसरकाराकडून उघडपणें नेमण्यांत आले होते, त्यांच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नये, असें वेडेल यांनीं मला निक्षून बजावलें होतें. अस्मादिकांसारख्या मुरलेल्या मनुष्याला असली सूचना करण्याचे श्रम वेडेल यांनीं घेण्याचें कांहीं कारण नव्हतें. पौर्वात्य लोक किती आंतल्या गांठीचे व सुतानें स्वर्गाला जाणारे असतात, याची ओळख मला चांगली होती. तेव्हां माझ्या उद्देशाबद्दल यत्किंचित्हि शंका लोकांच्या मनांत येईल असें वर्तन कान्स्टान्टिनोपल येथें करण्याइतका दुधखुळा मी खास नव्हतों. पौर्वात्य स्वभावाचें

मला फार खोल ज्ञान आहे अशी मला मोठी घमेंड आहे. काउन्ट वेडेल यांनीं एक हजार मार्क-सुमारें आठशें रुपये रोख दिले होते. आणि याशिवाय कान्स्टान्टिनोपल येथील आटोमन बँकेवर पांच हजार रुपयाची हुंडी माझ्या नांवची दिली होती.

या खेपेला मीं किम याला बरोबर घेतलें, याबद्दल वाचकांना वरेंच आश्चर्य वाटेल; पण कान्स्टान्टिनोपल येथें त्याचा उपयोग मला अतिशय होईल, अशी माझी पक्की खात्री होती. कारण कीमला त्याच्या स्वतःच्या देशांतल्या सगळ्या काफिर भाषा येत असून शिवाय त्याला आरबी भाषेचेंहि ज्ञान होतें. आरबी भाषेचें ज्ञान असलेल्या कोणत्याहि शिद्दी मुलाला कान्स्टान्टिनोपलमधली कोणतीहि गोष्ट कळणें अशक्य नाहीं. कान्स्टान्टिनोपल येथें काळ्या वर्णातील साऱ्या जातींचा मोठा भरणा आहे. घरींदारीं नौकरीच्या पेशानें राहिलेल्या सजातीय लोकांपासून कीमला जी माहिती मिळण्याजोगी होती, ती माहिती एखाद्या युरोपियनाला मिळविणें शक्य नव्हतें.

कोणत्याहि प्रकारची अडचण वाटेंत न येतां मी कान्स्टान्टिनोपलला पोहोंचलों आणि रु उस्माल अल्ली नांवच्या भागांत असलेल्या ब्रासरीकोर नांवाच्या एका मध्यमशा हाटेलांत आहीं आपला तळ दिला. या ठिकाणी बहुधा सामान्य प्रतीचे लोक उतरत असत. आपणाकडे कोणाचें विशेषसें लक्ष वेधूं नये ह्मणून मीं ही योजना केली होती. एखाद्या मोठ्या दरबारी हाटेलांत मी उतरलों असतों तर ती गोष्ट फुकट चर्चेला कारण झाली असती. हा गृहस्थ कोण ? तो मोठा पैसेवाला दिसतो ! हा पैसा याचा स्वतःचाच आहे, कीं तो दुसऱ्या कोठून आणतो ? याचा हा स्वतःचा पैसा नसेल, तर हा कोणाच्या पैशावर एवढी चैन करतो ? असल्या प्रकारच्या अनेक प्रश्नांची चर्चा गांवांत सुरू झाली असती. स्वतःबद्दल असल्या प्रकारच्या कुशंका तुर्की लोकांच्या मनांत उत्पन्न होऊं देणें हें नेहमींच फार अनिष्ट आहे. यापूर्वी कान्स्टान्टिनोपल येथें मी केव्हांच गेलों नव्हतों. याकरतां शहराच्या नकाशाची ओळख करून घेण्यांत पहिला आठवडा मीं घालविला. निरनिराळ्या राष्ट्रांच्या वकिलातींची

ठिकाणें व मोठ्या दरबारी अधिकाऱ्यांचीं रहातीं घरें यांची माहिती मिळविणें मला अवश्य होतें. या उद्योगांत एक आठवडा खर्च केल्यानंतर एका नव्या जागीं मीं आपलें बिऱ्हाड नेलें. दरबारी लोकांचा रहावयाचा जो मोहोल्ला होता, त्याच्या मध्यभागींच माझ्या नव्या बिऱ्हाडाची जागा होती. येथें बिऱ्हाड आणल्यानंतर तुर्की अम्मलदारांच्या रखेल्या कोठें रहातात याचा शोध मीं चालविला. कान्स्टान्टिनोपल येथें आल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं जर्मन आणि पेरा इस्पितळांत मीं आपलीं ओळखपत्रें हजर केलीं आणि तपासनीस या नात्याने तेथल्या नोंदबुकांत मीं आपलें नांव दाखल करून घेतलें. या नंतर प्रत्येक दिवशीं थोडा थोडा वेळ मी या इस्पितळात घालवीत असें. असें करण्यांत मीं ऊन किंवा पाऊस यांचाहि विचार केला नाहीं, आणि आपला नियम चुकविला नाहीं. दिवसांतून निदान एकदां आणि कधीं कधीं दोनदां या इस्पितळांची वारी करून तेथील बुकावर मी सह्या करीत असें. डॉक्टर फ्रान्झ फॉ ग्रेव्हज ही सही या इस्पितळांच्या नोंदबुकांत किमानपक्ष शभर वेळां तरी सांपडेल. वाचकहो, आतां तुम्हींच सागा पाहूं कीं, मीं आपलें वैद्यकीय शोधाचे काम बरोबर केलें कीं नाहीं ? माझा सह्यांचा आंकडाच ही गोष्ट सिद्ध करण्यास पुरेसा आहे !

थोड्या दिवसांनीं पेरा इस्पितळाच्या जवळ मीं एक खोली भाड्यानें घेतली आणि मध्यम स्थितींतील खाऊन पिऊन सुखी अशा तुर्कांला साजेशा पद्धतीनें ती सजविली. मीं घेतलेल्या सोंगाची बतावणी योग्य रीतीनें करण्यास अशी गोष्ट करणें अवश्य होतें. येथें मीं श्रीमंतीचा आव घातला असता, तर शंका आणि कुशंकांचा नुसता सुळसुळाट झाला असता. फाजील चवकस व संशयखोर असे लोक येथल्याइतके दुसरे कोठेंहि तुम्हांस आढळावयाचे नाहींत. पोर्ट सय्यद येथें साऱ्या जगांतला हलकटपणा व दुष्टपणा भरला आहे, असें किप्लींग ह्मणतो. त्याचें हें ह्मणणें बरोबर आहे; पण तो इस्तंबूल येथें कधींच गेला नसावा असें मला वाटतें. इस्तंबूल येथें जगांतल्या साऱ्या जातींच्या बाजरबुणग्यांचे मिश्रण भरलें आहे. जगांतल्या साऱ्या जाती आणि पोटजाती यांचे मासले येथें पहावयास सांप-

डतात. या साऱ्या जातींचे नमुने येथें आपल्या मूळच्या रूपांत दिसतात, इतकेंच नव्हे तर त्यांच्या एकमेकांच्या मिश्रणाने आणखीहि अत्यत विकृत अशा मानव जाती येथ निर्माण झालेल्या आहेत. मानव जातीची ही खिचडी इतकी अपूर्व आहे कीं, कोणत्याहि मानवशास्त्रज्ञास तिचें वर्गीकरण करणे शक्य नाहीं. उदाहरणार्थः-अल्बोनियांतला एक दरवडेखोर हा स्वतः ग्रीक बाप आणि न्युबियन सिद्दी आई याच्यापासून निर्माण झालेला असतो. हा एका अरब स्त्रीशीं लग्न लावतो. या अरब स्त्रीचे मूळ एकाद्या फ्रेंचाच्या रक्तांत सांपडते. आतां हा दरोडेखोर नवरा आणि ही अरब स्त्री यांजपासून झालेली संतति कोणत्या वंशाची ह्मणावी ? या उत्तर पाहू! अशा स्थितीत आणि अशा प्रकारच्या खिचडीच्या शहरांत एकाद्या यूरोपियाला आणि त्यांतून परक्याला आपलें काम करणे कितपत सुलभ जात असेल, याचा विचार करणे तुमच्याकडेच सांपवितो.

कान्स्टान्टिनोपलची सामान्य पहाणी करतांना त्या शहरांत अनेक परस्परविरोधी गोष्टी भरून राहिल्या आहेत, असे मला आढळून आलें. शहराच्या ज्या भागांत मूळचे अस्सल तुर्क लोक राहतात, तो भाग फार स्वच्छ आणि सुखसोयींनीं भरलेला आहे. तसेच येथे परकीय लोक रहातात, तो भागहि स्वच्छ आहे; परंतु याशिवाय बाकीच्या शहराचा भाग म्हणजे शुद्ध सैतानानगरी आहे. दारासमोर उकिरडा माजला तरी त्याकडे ढुंकूनहि पहावयाच नाहींत असल्या ऐदी लोकानीं बाकीचे शहर भरून गेलें आहे. कान्स्टान्टिनोपल येथील अस्सल तुर्क आणि बाकीची खिचडी यांच्यांतील भेद वर वर पहाणाऱ्या प्रवाशांच्या लक्षांत येत नाहीं; पण मुळांत फारच मोठा भेद आहे, हें विसरतां कामा नये. अस्सल तुर्की गृहस्थ किंवा उस्मानाचा खरा वंशज हा स्वच्छतेचा भोक्ता, रूबाबदार आणि थंड्या डोक्याचा असावयाचा. त्याच्या वृत्तींत एक प्रकारची तत्वनपणाची छाया दिसते; तथापि या छायेंत आता थोडीशी हलक्या वृत्तीची मेसळहि झाली आहे. एशिया मायनर आणि युरोपचा दक्षिणेकडील भाग यांतून आलेल्या लोकांच्या शेकडों वर्षांच्या संसर्गानें त्याच्या मूळच्या वृत्तींत किंचितसा फरक पडलेला दिसतो.

माझें काम अत्यंत कठिण होतें, हें मीं अगोदरच सांगितलें आहें. शहराची सर्व राहणी आणि तेथील एकंदर जीवनक्रम यांची पाहणी करावयाची. या कामांत अत्यंत चिकाटी आणि त्रास सोसण्यास लागणारी मनाची शांति हीं अवश्य पाहिजेत. बरेच दिवस अशा रीतीने श्रम करून तेथील सरकारचीं अंतस्थसूत्रें कशीं चालतीं जातात याची माहिती मीं मिळविली. तेथल्या रखेल्यांचीं ठिकाणें शोधून काढण्यांत पुऱ्या तीस रात्री मला खर्चाव्या लागल्या. यांत फ्रेंच, रशियन व सरकेशियन औरतींचाच जास्त भरणा आहे. त्यांचा संबंध थेट मुख्य वजिरापासून तो खालच्या दर्जाच्या लष्करी अंमलदारापर्यंत सर्वांशीं आहे. आमच्या भावी कार्यांतला हा पहिला दुवा घडविणेच फार दुष्कर होतें. यांनीं माझा अर्धा जीव मटकावास आणला; पण साऱ्या इमारतीचा तो पायाच असल्यामुळें त्यावर मेहनत करणें आवश्यकच होतें. पायात एकादी जरी चूक राहिली, तरी ती पुढें दगा दिल्यावाचून रहावयाची नाहीं. कित्येक वेळां महिनेच्या महिने काम करूनहि विशेषसें फळ दिसत नाहीं, इतकेंच नव्हे तर कित्येक वेळां मार्गहि अगदीं चुकलेला असतो. या गोष्टींची चवकशी करतांना विलक्षण सावधपणा आणि दूरवर नजर हीं ठेवावीं लागतात. राजकीय कारभारांत ढवळाढवळ करणाऱ्या या कमअस्सल स्त्रिया कमालीच्या धूर्त आणि चाणाक्ष असतात. एकाद्या सावजाला आपल्या भक्ष्याचा वास जसा फार लांबून येतो त्याचप्रमाणें या स्त्रियाहि राजकीय खटपट करणारे ' भक्ष्य ' फार लांबून हुडकून काढतात. याकरता यांच्या दरींत प्रवेश करावयाचा तो फार सावधगिरीने आणि शिताफीनें केला पाहिजे, हें उघड होय.

या माझ्या कामांत किमची विनमोल मदत झाली. फार काय; पण तो नसता, तर माझ्या कामांत मला मुळींच यश आलें नसतें. मुर्की कामदाराच्या घरीं अनेक जातींचे काळे लोक नौकरीच्या पेशानें राहिलेले आहेत. या नौकरांपासून कांहीं माहिती मिळवावयाची म्हटलें, तर ती गोष्ट एकाद्या गोऱ्या मनुष्याला कधींहि साध्य व्हावयाची नाहीं. कारण हे लोक कोणत्याहि गोऱ्याशीं मन मोकळें करून कधींहि बोलावयाचे नाहींत.

त्यांच्या तोंडाचें कुलूप काढण्यास सोन्याच्या किल्लीचाहि उपयोग होत नाहीं; पण किम हा त्याचा जातभाई आणि विशेषेंकरून त्यांच्यांतील एका राजघराण्याचा वंशज असल्यामुळें अत्यंत महत्त्वाच्या खबरा मिळविणें त्याला शक्य झालें.

तुर्की कामदारांच्या रखेल्यांचीं रहाण्याचीं ठिकाणें शोधून काढण्याचें काम मी आपल्याकडे घेतलें होतें. यानंतर पुढील भाग मीं किमकडे सोपविला होता. एकाद्या स्त्रीच्या घराचा पत्ता लागला आणि तिचे नांव कळलें, कीं किम तेथें हजर व्हावयाचाच.

" किम, अमुक एका स्त्रीला रोज भेटावयाला कोण अमलदार येतो? रोज एकच अमलदार येतो की काय, ही माहिती तुला मिळविली पाहिजे. तसेंच तिला पत्रें वगैरे कोठून येतात, याचाहि शोध तुला केला पाहिजे. त्याचप्रमाणें तिला बाहेरून कोठून पैसा येतो, याचीहि माहिती तूं मिळव. थोडक्यांत इतकेंच सांगायचें कीं, तिच्या संबंधीं जी कांहीं बारीकसारीक माहिती मिळेल ती सारी तूं खिशांत घालून ठेव. "

अशा रीतीनें किमची योजना झाली म्हणजे तो त्या घरांत प्रवेश करून नोकरचाकरांत जाऊन वसत असे. ही स्वारी तेथून बाहेर पडली, म्हणजे मला लागणाऱ्या या माहितीनें तिचे खिसे भरपूर भरलेले असावयाचे.

या वेळीं अबदुल्ला या नांवाचा मुख्य वजिराचा एक महत्त्वाचा सल्लागार होता. बालानिऑ नांवाच्या एका स्त्रीकडे या अबदुल्लाच मोठें सूत जमलें आहे असें मला आढळून आलें. मुख्य वजीर जर्मनीला अत्यंत प्रतिकूल आणि जर्मनीच्या हिताकडे अगदीं काणाडोळा करणारा होता, ही गोष्ट आमच्या सरकारास पूर्णपणें विदित झाली होती. कान्स्टाटिनोपल येथें फ्रेंच व रशियन सरकारें खलबतें करण्यांत गुंतलीं होतीं, ही गोष्ट वुइलहेल्मस्ट्रासीला माहीत होती. याकरतां अबदुल्ला हा बालानिऑ बाईच्या घरीं जात असतो कीं काय याची चवकशी करण्यास मीं किमला सांगितलें. तसेंच तो बरोबर कोणत्या वेळीं येतो व प्रत्येक खेपेस तेथें किती वेळ रहातो याचीहि माहिती त्याला मिळविण्यास सांगितलें. अबदुल्लाची आणि या स्त्रीची भेट चार चौघांदेखत अनेक वेळां होत असल्याचें मीं समक्ष पाहिलें होतें;

पण एवढ्यानेंच तिच्या व त्याचा कांहीं अंतस्थ राजकीय संबंध आहे कीं काय, हें ठरविणें शक्य नव्हतें. असल्या प्रकारच्या स्त्रियांच्या घरीं लष्करी अम्मलदाराच्या आणि सरदार घराण्यांतील तरुणांचा घोळका नेहमींच जमावयाचा. या स्त्रियांच्या कार्यक्रमांतला हा एक भागच आहे. तरुण लष्करी अम्मलदारांस आणि मुलकी कामदारास भुरळ घालून घेरावयाचे, त्यांना आपल्या भोवतीं नाचावयाला लावायचे, त्यांच्या पैशाची चादरात उडवावयाची आणि मग आपल्या हातातले हुकुमाचे पान बाहेर काढावयाचें असा या स्त्रियांचा ठरीव कार्यक्रम आहे. तुर्की लष्करी अम्मलदार या स्त्रियांच्या नादीं लागून जो पैसा उधळीत, तो त्यांच्या पगारापेक्षां कितीतरी पटीने अधिक असे असे माझ्या लक्षात आले. भारी भारी किमतीचे हिऱ्यामाणकांचे दागिने खरेदी करताना त्यांना यत्किंचितहि दिक्कत वाटत नसे. मोटार गाड्यांची खरेदी करतांना लागतील तितके पैसे ते डोळे मिटून देत असत असल्या मूर्खपणाच्या उधळपट्टीचा परिणाम काय व्हावयाचा हे उघडच होते. अशा स्थितींत हे अम्मलदार लवकरच कर्जात बुडून जावयाचे, हें उघड होय. असल्या कर्जबाजारी अम्मलदारांना दोन मार्ग खुले असतात. एक तर त्याने आपल्या कर्जाची फेड तावडतोब केली पाहिजे, अथवा एकाद्या जंगली भागांत स्वतःची बदली करून घेतली पाहिजे. पण कान्स्टान्टिनोपलच्या चैनी भोगण्यास चटावलेले तुर्की अम्मलदार तें शहर कसचे सोडणार ? देशांतल्या मागासलेल्या जंगली मुलखांत जाण्यापेक्षां आत्महत्या करणे सुद्धां तो पत्करील. अशा स्थितींत त्यांच्या कर्जाचो फेड या स्त्रिया करतात आणि त्याचा मोबदला म्हणून महत्त्वाच्या बातम्या त्यांजकडून घेतात.

या स्त्रियांच्या भोंवतीं अशा प्रकारच्या अम्मलदारांचा जो घोळका असतो, त्यापैकीं अबदुल्ला हाहि एक असण्याचा संभव होता. माझ्या सांगीप्रमाणें बालनिऑबाईच्या घरांत किमनें प्रवेश केला आणि मला जरूर असलेली सारी माहितीहि त्यानें लवकरच मिळविली. बालनिऑबाईच्या काळ्या नौकरांनीं कांहीं पत्रें आणि कागदांचीं दुसरीं कांहीं चिटोरीं चोरून किमला आणून दिलीं होतीं. याशिवाय अबदुल्लाचीं व

तिचीं जीं कांहीं संभाषणें होत, त्यांतील कांहीं ना नौकरांनीं आडून ऐकलीं आणि त्यांचा गोषवारा त्यांनीं किमला सांगितला. हे सारें भाडवल किमनें माझ्या स्वाधीन केलें आणि तें तपासून पहातां, या साऱ्या नाटकाचा आद्य सूत्रधारच माझ्या हातीं लागला आहे, असे मला आढळून आलें. पहिल्याच खेपेला एवढें मोठें सावज हातीं लागलें, ही गोष्ट खरोखर माझ्या चांगल्या नशिबानेंच घडविली असें म्हटले पाहिजे. तसेंच या बाईला प्रत्यक्ष घेरणें अशक्य आहे, हेंहि मला आढळून आलें. लांच देऊन किंवा धाकदपटशा दाखवून ती बाई वश होण्यासारखी नव्हती. ही जो पैसा येथे खर्च करीत असे, तो कोठून येतो, याची माहिती मिळविणें मला अवश्य होते ही माहिती खुद्द तिच्याकडून मिळविणें अशक्य होतें.

तिच्या भोंवतीं जमणाऱ्या दोस्तमंडळांतून आपल्या जाळ्यांत सांपडण्यासारखा कोण आहे, याचा शोध मीं करूं लागलों. सडपातळ आणि गोड चेहऱ्याची व काळ्या केसांची अशी एक तारुण्यानें मुसमुसलेली छोकरी तिच्याबरोबर नित्य जातां येतांना मी पहात असें. एका सार्वजनिक नाचखान्यांत ती नाचतहि असे. सिसिलिया कोर्सान असें तिचें नांव असल्याचें मला समजलें. त्या नाचखान्यांत नित्य जाण्याचा परिपाठ मीं सुरू केला. तेथें शेंकडो तुर्की लष्करी अम्मलदारहि येत असत. आपल्या सौंदर्यानें लोक मोहून जातात, या गोष्टीचा तिला फारसा आनंद झाल्याचें दिसत नसे. लोकांनीं टाळ्या वाजविल्या झणजे ती नुसत्या यंत्राप्रमाणें मान हालवीत असे.

युरोपांत जे नाचखाने आहेत, त्यांहून तुर्की नाचखान्यांची पद्धत अगदीं वेगळी आहे. येथील पद्धतींत पौर्वात्यपणा अधिक दिसतो. हे नाचखाने बहुधा उघड्या जागीं असतात. एकादें मोठें अगण आणि त्यावर स्मर्नाचा बिनमोल गालीच्या अंथरलेला अशा जागेची कल्पना तुम्हीं केली झणजे तुर्की नाचखाना बरोबर तुमच्या ध्यानांत येईल. आजुबाजूला रेशमी गादीच्या खुर्च्या घालून खुद्द तेथल्या अशा नर्तकी बसलेल्या असतात. याचे निम्मे चेहरे बुरख्यानें झाकलेले असावयाचे; पण झिरझिरीत दमास्कसच्या जाळींतून एकंदर शरीराचा देखावा मुग्ध रीतीनें नजरेस पडावयाचा. यूरोपियन

नर्तकी थेट प्यारीसच्या पोशाकांत असावयाच्या. आजुबाजूला संगमरवरी टेबलें असून त्यांजवर सुंदर हुक्का ठेवलेला असावयाचा. जवळच एकाद्या खुर्चीवर एकादी यूरोपियन युवती रेजीचे (कागदी विडी) फुत्कार सोडीत असली, तर दुसऱ्या बाजूला एकादा 'बे' एकादा 'पाशा' किंवा एकादा 'एफेंडी' सुवासिक धुराचे लोट सोडतांना आढळावयाचा. लष्करी अम्मलदार आपले तावडे, निळे आणि सुवर्णरेखांकित लष्करी पोषाक चढवून यावयाचे. एकादा सहा फूट उंचीचा आल्बेनियांतला सरदार रेशमी पायजमा पेहरून व सोन्याच्या अथवा चांदीच्या मुठीचा जंबिया किंवा तसल्याच मुठीचे एकादें पिस्तुल कम्बरपट्टयांत खोवून आलेला असावयाचा. हे सारे चित्र पाहिलें, ह्मणजे एकाद्या शहाजाद्याच्या बैठकीचीच आठवण व्हावयाची.

वर सांगितलेल्या या सुंदर पटीवर स्तुतीचा वर्षाव जिकडून तिकडून होत होता; पण मी मात्र दगडासारखा तटस्थ बसून राहिलों. असें करण्यांत माझा एक उद्देश होता. तिचें लक्ष आपणाकडे वेधावे ह्मणून इतरांबरोबर न मिसळतां अशा प्रकारची एखाद्या इंग्रजाला साजेशी तटस्थवृत्ति मीं धारण केली. माझी ही गोळी बरोबर लागूं पडली. माझी मुग्धता तिला अर्थातच पहावली नाहीं.

एके रात्रीं ती माझ्या टेबलाजवळ आली आणि फ्रेंच भाषेंत तिनें मला एक प्रश्न विचारला. मीं नुसतें हंसून तिच्याकडे पाहिलें आणि फ्रेंच भाषा मला समजत नाहीं, असें मीं दर्शविलें. त्यानंतर तिनें मोडक्यातोडक्या जर्मन भाषेत कांहीं वाक्यें उच्चारलीं; पण या वेळींहि मीं आपली अजाणपणाची मुद्रा कायमच ठेवली होती. अखेरीस ती झोंकदार इंग्रजी भाषेत बोलूं लागली आणि त्या वेळीं मीं तिला प्रत्युत्तर दिलें. इंग्रजी भाषा ती फार चांगल्या रीतीनें बोलत असे. लंडन येथील एम्पायर थिएटरांत ती मुख्य गाणारणीचें काम करीत असे, असें मला शेवटीं कळलें. आमची ओळख हळुहळू अधिक दाट होत चालली. एके रात्रीं सिसेलिया फार उदासवाणी दिसत होती. त्या दिवशीं बालनिऑबाईबरोबर तिचें भांडण झालें होतें. माझ्या मुख्य कार्याचें घोडें मी हळुहळू पुढें दामटीत होतों.

त्या दिवशीं सुद्धां मी कांहीं प्रश्न तिला विचारीत होतों, इतक्यांत एक तुर्की लष्करी अम्मलदार आमच्या जवळ आला. त्याच्या तोंडांतून कोन्याकदारूचे वाफारे एकसारखे बाहेर पडत होते. त्यानें सिसेलियावर उद्धट फ्रेंच भाषेंत कांहीं टीका केली. एका गोऱ्या स्त्रीचा अशा रीतीनें उपमर्द होत असलेला पाहून माझें चित्त खवळलें. फ्रेंच भाषेंतच मीं त्याची कान-उघाडणी केली. मला फ्रेंच अवगत नसल्याचा बहाणा मीं पूर्वी केला होता; पण संतापाच्या भरांत मी ही गोष्ट साफ विसरलों. माझ्या दरडावणीनें मियासाहेबांची स्वारी तेथून निघून गेली. तो अम्मलदार निघून गेल्यानंतर मीं सिसेलियाकडे पाहिलें, तो तिच्या मुद्रेवर चमत्कारिक हास्याची लकेर झळकत होती, असें मला आढळून आलें.

ती म्हणाली, " तुम्हांला फ्रेंच भाषा येत नव्हती नव्हे का ? तुह्मांला तर थेट प्यारीसची भाषा बोलतां येते असे दिसते! "

तिचें हें भाषण ऐकून माझी मूर्खपणाची घोडचूक माझ्या लक्षांत आली. माझा चेहरा किती मेषपात्र बनला असेल, याची तुह्मीच कल्पना करा. आमचें भाषण पुन्हां सुरू झालें, तेव्हां सिसेलिया ह्मणाली, " मला आज या बैठकीचा अगदीं कंटाळा आला आहे, गाडींतून जरा फिरावयाला तरी चला. "

मीं एक गाडी बोलावली आणि आम्ही दोघें आंत बसून आमची गाडी चालू झाल्यावर मी म्हणालों, " सध्यांचा आयुष्यक्रम तुला आवडतो का ? आतांच्यासारख्या अम्मलदाराशीं नेहमीं प्रसग येणें, हें कांहीं खरोखर फारसें सुखाचें नसेल. "

सिसेलिया ह्मणाली, " आतां या गोष्टी माझ्या आंगवळणीं पडत चालल्या आहेत. एखाद्या इंग्रज लढ्यापेक्षां किंवा जर्मन घटिंगणापेक्षां तुर्की डुक्कर कांहीं अधिक वाईट नाहीं. " हे शब्द बोलतांना आंतून तिला आपला जीवनक्रम कष्टमय वाटत होता, असें माझ्या ध्यानांत आल्याशिवाय राहिलें नाहीं.

कोणतीहि स्त्री कितीहि बहकलेली असली, तरी तिच्या अंतरंगाचा ओढा सभ्यपणाकडे स्वाभाविक असतो. ही गोष्ट पुष्कळ घटिंगणांच्या

लक्षांत येत नाहीं. हस्थी बाण्याचे आचरण आणि सभ्यपणाच्या चाली-रीती यांची छाप अगदीं बहकलेल्या स्त्रीवर देखील बसल्यावांचून रहात नाहीं. उघडपणें वेश्येचा धंदा करणाऱ्या स्त्रीला हा प्रसंग केवळ नाविन्यामुळेंच मजेचा वाटतो. तिच्या कानावर सदोदित घाणेरडी भाषा पडत असते, यामुळें सभ्यतेच भाषण केवळ नाविन्यामुळेंच तिला मनोहर वाटतें. एकादी गृहस्थाश्रमी स्त्री दुराचारी निघाली, तर उलटपक्षीं एकाद्या घटिंगणाची छाप तिच्यावर पडावयाची.

यानंतर नाचखान्यांतलें सिसेलियाचें काम आटोपल्यानंतर तिला बरोबर घेऊन गाडींतून फिरावयाला जाण्याचा पाठ मीं ठेवला. पुष्कळ तुर्की अम्मलदार यामुळें माझ्यावर जळफळत असत; पण मीं त्यांच्याकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. गाडींत हळुहळू प्रश्न करून कांहीं बारीक-सारीक माहिती मीं तिच्याकडून मिळविली. तिनें दिलेल्या माहितीशीं किमची हकीकत मी जुळवून पहात असे. नाचखान्यांतून जी थोडीबहुत प्राप्ती तिला होत असे, तेवढ्याच पैशाच्या आशेनें तुर्की अम्मलदारांचीं गलिच्छ भाषणें सोसून ती कान्स्टाटिनोपल येथें रहात नव्हती, हें माझ्या सहज लक्षात आलें. या संधीला मीं आपल्या नाटकाच्या पहिल्या अंकाचा पडदा पाडून दुसऱ्या अंकास सुरुवात केली. मी नाचखान्यांत जाण्याचें एकदम बंद केले. यामुळे सिसेलिया हिला अधिकच उदासवाणे वाटूं लागलें.

एके दिवशीं दुपारीं तिनें मला बोलावणें पाठविलें. तिच्या घरीं जो थोडासा मजेचा प्रकार झाला, त्याचा माझ्या नौकरीशीं कांहीं संबंध नाहीं; तथापि त्यांतहि एक करुण कहाणी वाचकांस कळून येईल. तिनें सर्व बाधाबांधी केली होती, असें मला आढळून आले. ती म्हणाली, " आतांशा तुम्ही नाचखान्यांत मुळींच आलां नाहीं, असें कां ? "

" इस्पितळांत सध्यां मला इतकें काम पडतें कीं मान वर करण्यास देखील मला फुरसत नाहीं. "

थोडा वेळ थांबवून ती म्हणाली, " आज मी प्यारीसला निघून जातें. * * * मग—

" अरेरे, मला फार वाईट वाटतें. "

" एवढें म्हटलें, ह्मणजे झालें का सगळें ? "

" लाडके, अधिक बोलण्यांत फायदा तरी काय ? त्यामुळें आपणां दोघांचें दुःख वाढेल मात्र. "

" पण मी ह्मणतें, दुःख होण्याला जागा तरी कशाला ठेवावी ? माझ्या बरोबर आपणहि प्यारीस्ला आलां, तर नाहीं का चांगलें होणार ?"

तिनें हंसत हंसत पण मोठ्या तोऱ्यानें माझ्याकडे पाहिलें. मीं म्हटलें, " लाडके, मी कांहीं लखपतीचा बेटा नाहीं. मग उगीच टिवल्याबावल्या करीत मुलुखभर फिरत राहणें, मला कसें साधेल ? त्याशिवाय, ज्या कामासाठीं मी येथें आलों आहें, तें करावयाला नको काय ? आणखी एक महिना तरी या इस्पितळांतून माझी सुटका होणार नाहीं. "

सिसेलिया अगदीं नाखुष झालेली दिसली. ती माझ्याकडे निरखून पाहूं लागली. तिच्या वृत्तींत एकाएकीं बदल झाल्यासारखे दिसलें. ती माझ्याकडे इतक्या बारीक दृष्टीनें पहात होती कीं, जणू काय तिनें माझें परीक्षणच चालविलें होतें. थोड्या वेळानें ती ह्मणाली, " फ्रान्झ, तुमच्या सारख्या मनुष्यानें असल्या भिकार कामांत आपलें आयुष्य फुकट घालवावें, हें मला बरें दिसत नाहीं. तुमचें जगाविषयींचें ज्ञान आणि तुह्मांला असलेली मनुष्याची पारख यांचा याहून अधिक उपयोग तुह्मांला करतां येण्यासारखा आहे. तुमची विद्वत्ता आणि तुह्मी केलेला प्रवास यांचा उपयोग प्यारीस येथल्या आमच्या कांहीं लोकांस फारच चांगला होईल. "

ती कोणत्या उद्देशानें बोलत होती, हें माझ्या लक्षांत आलें; तथापि तिच्या ह्मणण्याचा भावार्थ मला कांहींच समजला नाहीं, अशी मुद्रा मीं धारण केली. तेव्हां तिने तो भावार्थ मला थोडक्यांत स्पष्टपणें सांगितला. फ्रान्सच्या हेरखात्यांत ती मला ओढूं पहात होती. मनातल्या मनांत मला इतकें हंसूं लोटत होतें कीं, तें दाबून टाकण्यासाठीं मला भगीरथ प्रयास पडले. ' हेरखातें ह्मणजे काय ? ' असा प्रश्न मीं तिला गंभीर मुद्रेनें केला. तेव्हां तिला प्यारीसहून जीं पत्रें आलीं होतीं तीं मोठ्या

डौलाने तिनें माझ्यापुढें टाकलीं. त्या पत्राच्याखालीं असलेल्या सह्या आणि वरील पत्ते हीं पाहून फ्रान्सांतील सूत्रधारांची माहिती मला बरोबर कळली. बालनिऑ बाईसारख्या बाजार बसव्यांचा उपयोग करून जर्मनीचें महत्त्व कमी करण्याचा उद्योग कोण करीत होते, हें मला बरोबर समजले. बालनिऑबाईनें मिळविलेली माहिती फ्रेंच सरकाराकडे पाठविण्यांत सिसेलिया फक्त मध्यस्थीचें काम करीत होती, असें मला कळले. फ्रान्सच्या हेरखात्यांत शिरण्याची आपली तयारी आहे, असें दर्शवून आणखी कित्येक प्रश्न मीं तिला विचारिले. विशेषतः माझ्या पगारासबंधीं मी फार कसून चौकशी करतों, असें दाखविले. प्यारीसमधले " तिचे मित्र " मला भक्कम पगार देतील कीं नाहीं, असें मी विचारतां ती ह्मणाली, " त्याची नको तुझांला काळजी; तुह्मांला पगार भरपूर मिळेल. तुह्मी माझ्याबरोबर प्यारीसला चला तर खरे ! "

मीं तिला झटलें, " इस्पितळांतलें माझें काम संपल्याशिवाय मला येथून हालतां येणार नाहीं; पण तें झाल्याबरोबर मात्र मी खास येईन. " अशा रीतीनें आमचा करारमदार झाल्यानतर तिचीं कांहीं पत्रें आलीं, तर तीं घेऊन तिच्या पत्त्यावर मी तीं परत पाठवावींत असेंहि ठरले. या कराराप्रमाणें तिचीं पत्रें मीं रवाना केलीं—पण तीं बर्लिनला !

माझ्या अनेक प्रकारच्या कामगिरींत ज्या गोष्टी मला कराव्या लागल्या त्यांपैकीं ही एक गोष्ट केवळ माझ्या मनाजोगी घडली, असें नाहीं. स्त्रीजातीशीं असलें वर्तन करणें, हें माझ्या मतें अश्लाघ्य होय; पण सिसेलिया ही कोणत्या धेंद्यांत गुंतली होती, याचाहि विचार केला पाहिजे. ती दुसऱ्या एका प्रतिपक्षी सरकारच्या हेरखात्यांतील नौकर होती. तिच्या आणि माझ्या बुद्धीचा येथें सामना लागला होता. याकरतां प्रस्तुत प्रसंगीं तरी, माझें वर्तन अक्षम्य होतें असें ह्मणण्याचें कारण नाहीं. किमानपक्षीं या विचारानें माझ्या बुद्धीचें तरी मीं समाधान करून घेतलें.

तीन वर्षांनंतर ॲटवर्प येथील एका भिकार सुखशांतिगृहांत या छोकरीला पुन्हां मीं पाहिलें. त्या वेळीं ती नौकरींतून बजा झालेली होती. कान्स्टांटिनोपल येथें तिनें जो मूर्खपणा केला, त्याचेंच प्रायश्चित्त बहुधा

ती भोगीत असावी. तिनें मला ओळखलें नाहीं; पण त्या बिचारीची हीन दशा लक्षांत आणून मीं तिला गुप्तपणें तीनशे रुपयांची रक्कम पाठविली. माझ्यामुळें तिला जी दशा भोगावी लागत होती तिचें अंशतः परिमार्जन मीं अशा रीतीनें केलें.

अशा रीतीने कान्स्टान्टिनोपल येथें होणाऱ्या नाटकांतील फ्रेंच सूत्रधारांचा शोध लागल्यानंतर मीं सामान्य तुर्की अंमलदारांशीं हळूहळू स्नेह संपादूं लागलों. त्यांच्या विचारांचा रोख कोणत्या दिशेनें वाहतो, याचें सूक्ष्म निरीक्षण मीं चालविलें. कित्येक अमलदार, व्यापारी, मुत्सद्दी आणि विद्यार्थी याच्या भेटीला जाण्याचा पाठ मीं ठेवला. जनानखान्यांत बसून सूत्रे चालविणाऱ्या असल्या प्रकारच्या लोकांच्या पातालयंत्राचा सर्वांना अगदीं वीट येऊन गेला होता, असें मला आढळून आल. तरुण तुर्क अगदीं बेदील झाला होता. राज्यक्राति घडवून आणण्यास ही अगदीं सोन्यासारखी संधी होती असे मला आढळून आलें. मीं आपला रिपोर्ट सादर करताना या राज्यक्रांतीची कुंडलीहि त्यांत बरोबर वर्तविली होती. अनवरबेकडे विशेष लक्ष पुरविण्याबद्दल त्यांत मीं सुचाविलें होतें. या गृहस्थानें त्या वेळीं सुद्धां आपली चांगली छाप बसाविली होती. मुख्य वजिराला त्याची फार भीति वाटूं लागली होती. याचकरतां म्यासिडोनियांतल्या एका आडबाजूच्या जागेवर या तरुण तुर्कास वजिरानें रवाना केलें होतें. कान्स्टान्टिनोपलमध्यें त्याला दृष्टिआड करण्यांत आलें, तरी तरुण तुर्कांवरची त्याची छाप कमी झाली नाहीं, असें मला आढळून आलें. या वेळीं तुर्की लष्कराला शिक्षण देण्यासाठीं फॉं डर गोल्ड्झ् हे जर्मन अम्मलदार होते. यांचेहि रिपोर्ट बर्लिनला जात असत. त्यांच्या आणि माझ्या रिपोर्टांच्या अनुसंधानानें जर्मनींतल्या परराष्ट्रखात्यानें आपल्या कारस्थानाची दिशा नक्की केली असावी, यांत शंका नाहीं. सुलतान अबदुल हमीद हे केवळ बाहुल्यासारखे होते, याबद्दल माझी पक्की खात्री झाली होती. रशियन आणि फ्रेंच सोन्याची मोजदाद करतां करतां मुख्य वजिराचे हात पिंवळे होऊन गेले होते. यामुळें जर्मनीचें महत्त्व कमी होईल अशाच रस्त्यानें त्यानें आपल्या राज्यकारभाराचा गाडा चाल-

विला होता. फ्रान्स आणि रशियाच्या पगार खाणाऱ्या बाजारबसव्या तुर्की अम्मलदारांचीं घरें पोखरीत होत्या. या सर्व गोष्टींचा उलेख मीं आपल्या रिपोर्टांत केला होता. अशा रीतीनें कान्स्टान्टिनोपल येथें चार महिने कालक्रमणा करून [illegible] स्वारी बर्लिनला सुखरूपपणें परत येती झाली.

माझ्या कामगिरीचें राजकीय महत्त्व काय होतें, हें लक्षांत येण्यासाठी त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचें थोडेसें सिंहावलोकन करणें जरूर आहे. रशियाचें प्रस्थ माजून त्याचा उपसर्ग आपणास लागूं नये, ह्मणून तुर्की राष्ट्राचा स्नेह संपादन करावयाचा व त्याच्या द्वारें रशियाच्या वाढीस आळा घालावयाचा या राजनीतीचा उपक्रम बिस्मार्क यानीं जर्मनीमध्यें केला. तुर्कीच्या स्नेहभावानें इष्टकार्यसिद्धि कशी काय होईल, हें वाचकांस समजेलच. क्याप्रीव्ही यांच्या दिवाणगिरींत तुर्की व जर्मनराष्ट्रांतील स्नेहभावास थोडेंसें शैथिल्य आलें होते. असें शैथिल्य आपणास हितावह नाहीं ही गोष्ट दुसऱ्या वुइल्यिम बादशहासारख्या दूरदृष्टीच्या व तीक्ष्ण नजरेच्या मुत्सद्याच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाहीं, आणि तें शैथिल्य दूर करण्याचा यत्न त्यानें केला. आपल्या नेहमींच्या डामडौली पद्धतीस अनुसरून राणीसह या बादशहाची स्वारी ज्यालेस्टाईनमध्यें गेली. जातां जातां वाटेंत सुलतानाचीहि भेट त्यानीं घेतली. महमदी देशांतून त्यांचें स्वागत केवढ्या अपूर्व उत्साहानें करण्यात आलें, ही गोष्ट सर्वविश्रुत आहेच. जमनबादशहानें ज्यालेस्टाईनमध्यें अशा रीतीनें केलेली स्वारी हा राजनीतीचा एक अपूर्व मासला होय. बादशहाच्या वर्तनासंबधी त्या वेळीं पुष्कळशा कडक टीका झाल्या; पण बादशहाच्या इष्टकार्याची सिद्धीहि त्याच स्वारीमुळें झाली ही गोष्ट विसरतां कामा नये.

ज्यालेस्टाईनमध्यें केसरची स्वारी जाण्याच्या अगोदर सर्व महमदी राष्ट्रांचें पालकत्व आपणाकडे आहे, असें फ्रान्स म्हणत असे; पण या स्वारीनंतर हा मनु हळू हळू बदलूं लागला. केसरच्या भेटीनंतर वुइलहेल्मस्ट्रासी आणि सबलाईम पोर्टी यांजमध्यें उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा खल अधिक सलोख्यानें होऊं लागला. या राष्ट्राचें परस्पर दळणवळण वाढतां वाढतां

त्याला स्नेहाचें स्वरूप येऊं लागलें. दारूगोळा, तोफा वगैरे मालाची खरेदी जर्मनींतून मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. याशिवाय दुसऱ्याहि अनेक प्रकारच्या जर्मन मालाला महंमदी राष्ट्रांतून मोठ्या प्रमाणावर मागणी सुरू झाली, हें त्यांच्यामधील स्नेहभावाचें द्योतक होतें.

जर्मनीचा हा उत्कर्ष फ्रान्स आणि रशिया यांच्या डोळ्यांत तावडतोब आला. या दोघाना जर्मनीबद्दल फारसें प्रेम कधींच नव्हतें. या प्रसंगीं इंग्लंड मात्र या घोटाळ्यांतून अगदीं अलिप्त राहिलें. तुर्कस्थानांत रशियाचा हात शिरू नये याकरतां इंग्लंडनें क्रिमियन युद्धांत पाण्यासारखा पैसा खर्चून पुष्कळशी जीवहानीहि करून घेतली होती. रूसोफ्रेंच जोडीला तुर्कस्थानांत ढवळाढवळ करण्याची संधि मिळाली ही गोष्ट इंग्लडला अनिष्ट वाटत होती. आतां डॉर्डानेल्सचे अधिराज्य जर्मनी किंवा फ्रान्स यांच्या हातांत जाणे इंग्लडला कितपत रुचतें, हें पुढें पहाणें आहे. रशियासंबंधीं पाहतां या डार्डानेलीसबद्दल कॅथेराईन राणीच्या वेळेपासून एकसारखे रक्तपातच होत आले आहेत. अनेक प्रकारचीं गुप्त खलबतें आणि पाताळयत्रें इस्तंबूल येथें अद्यापिहि अहर्निश चालूं आहेत. तुर्कस्थान आणि आशिआमायनर यांजमधील रशियाचे वजन हळुहळू पण अव्याहत रीतीने जर्मनी कमी करीत चालला आहे. रूसोजपानी युद्धांत रशियाचा खुर्दा झाल्यानंतर बाल्कनसघ निर्माण करून त्या द्वारें आपले महत्त्व वाढवावें याकरितां रशियाने जिवापाड खटपट केली आहे; पण यासंबंधीं अधिक माहिती पुढें कळेल.

या भानगडींत जे कांहीं प्रश्न उपस्थित होतात, त्यांत जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांचें सगनमत झालें आहे. जर्मनीच्या या बाजूच्या उलाढाल्यांत ऑस्ट्रियाचें नेहमींच अंग असतें, असे म्हणण्यास हरकत नाहीं. तुर्कस्थानात मुख्य सूत्रधार कोण आणि नुसतीं बाहुलीं कोण आहेत, याचा शोध आपल्या हेरखात्याच्या द्वारें जर्मनीनें लावला. रूसोफ्रेंच जोड गोळीचें वजन इस्तंबूल येथें वाढत आहे, ही गोष्ट जर्मनीला कळून चुकली. तरुण तुर्कांच्या दृष्टीनें मूर्ख असा भासणारा सुलतान अबदुल हमीद मुख्य वजिराच्या ओंजळीनें पाणी पीत असे, ही गोष्ट जर्मनीनें

जाणली. असल्या मुलतानाच्या नादीं लागण्यांत फायदा नाहीं, हें जाणून जर्मनीनें आपल्या पुढील डावाची रचना करण्यास सुरवात केली. इस्तंबूल येथें ' मुले कुठारः ' या मार्गाचें अवलंबन करण्याची संधि येऊन पोहोचली आहे, हे जाणून जर्मनीनें ती कुऱ्हाड पाजळण्यास सुरवात केली. परिणामः-राज्यक्रांति. तरुण तुर्कांच्या हातांत सगळी सत्ता आली. या गडबडींत जर्मन शिक्षणांत मुरलेले असे अनवर बे, टचुफिक पाशा, इब्राहिम मांदर बे आणि तसेच इतर लोक यांच्या हातांत राज्याचीं सूत्रें गेलीं. तुर्कस्थानांत विस्कटलेली आपली घडी जर्मनीनें पुनः बसविली. आजमित्तीला तुर्कस्थानांत जर्मनीचें प्रस्थ विलक्षण वाढलें आहे ही गोष्ट खरी आहे. युरोपांतील एकंदर राज्यकारणांत या परिस्थितीचा काय परिणाम होणार, याचा विचार मी पुढे एकादे वेळी करीन.

प्रकरण पांचवें.

ग्रँडड्यूकचें पत्र.

इस्तबूलहून परत आल्यानंतर आणखीहि कांहीं भानगडीच्या कामगिऱ्यांवर माझी नेमणूक झाली होती. त्याच्या दगदगीने मी अगदीं त्रासून गेलों होतों. बोअर युद्धांत माझ्या फुप्फुसाला गोळी लागली होती, तिचा त्रास मला आतां जाणवूं लागला. रक्तस्राव होण्यास सुरवात झाली. थंडीवाऱ्यातून एकसारखें हिंडावें लागल्यामुळे माझी प्रकृति अगदीं ढांसळून गेली. शेवटीं बर्लिन येथील सुप्रसिद्ध वैद्य प्रो. बेअर यांची सल्ला मीं घेतली. एक महिनाभर पूर्ण विश्रांति घेऊन त्या अवधींत देवदाराची झाडें पुष्कळ असतलि अशा एखाद्या भागांत रहाण्याची शिफारस त्यांनीं केली.

नार्वे आणि जर्मनी या देशांत देवदारूंच्या अरण्यांना कांहीं तोटा नाहीं, आणि या दोन देशांत माझे स्नेही सोयतीहि पुष्कळ होते. यांच्यापैकीं कोणीहि माझी सोय मोठ्या आनंदानें केली असती; पण मला अगदीं

एकांत हवा असल्यामुळें या सोयीचा फायदा मीं घेतला नाहीं. रहातांपैकीं दोन खेही मला आठवले. यांच्या घरीं मात्र मन मानेल तसें वागण्याची मला मुभा मिळण्यासारखी होती. यांपैकीं एक गृहस्थ हंगेरींत रहात होते; पण तें ठिकाण फार लांबचें पडलें. दुसरा स्नेही फर्स्टेनवाल येथे रहात होता. हें गांव बर्लिनपासून तीस बत्तीस मैलावर आहे. हें ठिकाण मला फार पसंत पडलें. बर्लिनला जवळच्या जवळ असून अगदीं एकीकडे असें गांव आहे. याच्या आजुबाजूला देवदारूचें दाट जंगल आहे. या सर्व कारणांनीं मीं तेथेंच जाण्याचा बेत ठरविला.

येथें तीन आठवडे विश्रातीचे आणि एकांताचे सुख मीं अनुभविलें. या अवधींत मीं थोडीशी शिकारहि केली व मासे धरण्यासहि मी कधीं कधीं जात असें. तथापि एकाद्या मोठ्या देवदारूखालीं स्वस्थपणे लोळत पडण्यातच मी बहुतेक वेळ घालवीत असे. अशा रीतीने अस्मादिकांची स्वारी आश्रमवासाचें व कंदफलाशनाचे सुख अनुभवीत असतां एके दिवशीं एक तांबड्या तोंडाचा आणि चपट्या नाकाचा पोष्टाचा शिपायी आमच्या समाधिभंगास कारण झाला. त्यानें एक पत्र आमच्या हातीं दिलें.

हें पत्र काउंट वेडेल यांच्याकडून आलें होतें.

" प्रिय ग्रेव्हज्,


" तुमची प्रकृति आतां चांगली सुधारली असेल, अशी मला आशा आहे. पुढील कामगिरीकडे तुम्ही लक्ष द्यावें, अशी मी विनंति करतों. मी हें तुह्मांला सरकारी नात्याने फर्मावित नाहीं, हें विसरूं नका. तथापि या कामीं तुह्मांकडून जी मदत होईल, तिचा तुह्मांस चांगला फायदा होईल हें मात्र मी सुचवून ठेवतों. या कामगिरीचें थोडक्यांत स्वरूप असें. * * चे ग्रँडड्यूक यांजकडून त्यांच्या एका खाजगी नाजुक कामांत आमची मदत मिळेल कीं काय अशी पृच्छा करण्यांत आली आहे. ही कामगिरी आमच्या सरकारच्या वहिवाटीस सोडून आहे ही गोष्ट खरी; तथापि इतर कारणांस्तव ग्रँडड्यूकची विनंति मान्य करावी असे आह्मांस वाटतें. कामगिरी फारच नाजुक आहे, तिच्यासाठीं इंग्लंडांत

जावें लागेल. याकरतां तुमची खुषी असेल, तर हा कार्यभाग तुमच्यावर सोंपवावा अशी योजना मीं केली आहे. तुमची कबुली असेल, तर खात्यांतून थोडे दिवस रजा मिळण्याची व्यवस्था केली जाईल. पुनः एकवार सांगतो कीं, हा कांहीं सरकारी हुकूम नाहीं; पण तो मान्य करण्यांत तुमचा फायदा आहे. "

व्ही. वेडेल.

देवदारूवृक्षांच्या जंगलांत तीन आठवडे राहून माझी प्रकृति जितकी सुधारली, तितकी साऱ्या डॉक्तरांच्या औषधानेंहि सुधारली नसती. शिवाय खेड्यातल्या एकमार्गी आयुष्यक्रमाचा मलाहि कंटाळा आला होता. तशातून माझा खिसाहि फारसा खुळखुळत नव्हता. तेव्हां त्यातहि कांहीं भर टाकण्याची सोय मी पहात होतो. वेडेल यानीं सांगितलेली कामगिरी द्रव्यदृष्ट्या मला फायदेशीर होईल, असें त्या पत्रावरूनच दिसत होतें. कामगिरी माझ्या हातून होण्यासारखी असेल तर ती हातीं घेण्यास मजकडून आडकाठी नाहीं, असें उत्तर मीं वेडेल यांस लिहिलें. कामगिरी कसल्या प्रकारची असावी, याचा अदमास मला लागेना. प्रिन्स आणि डयूक असल्या बड्या घराण्यांच्या भानगडींत पडल्याने पुष्कळ वेळां नुसता त्रास मात्र नफ्यादाखल पदरीं पडतो, हें मला माहीत होतें. मोठाल्या राजघराण्यांतल्या खाजगी भानगडींत पडण्यापेक्षा परकीय राष्ट्रांत राजकीय कामागिरीवर जाणें, कमी श्रमाचें आणि अधिक हितावह आहे असें माझें मत झालें आहे. असल्याचपैकीं एकाद्या भानगडीवर माझी योजना होत असावी, असा माझा तर्क होता.

आणखी दोन दिवसांनीं काउंट वेडेल यांजकडून दुसरें पत्र आलें. त्यांत एका ठरलेल्या दिवशीं * * गांवीं मी हजर व्हावें, असें त्यांनीं मला कळविलें होतें. माझ्या मित्रमंडळीचा निरोप घेऊन व त्यांनीं केलेल्या पाहुणचाराबद्दल आभार मानून ग्रँडडयूक यांच्या गांवीं जाण्यासाठीं मी निघालों. मी गांवीं येऊन पोहोंचलों तेव्हां डयूकच्या तबेल्यांतील गाडी मला घेण्यासाठीं हजर होती. दोन हमालांनीं माझें सामानसुमान गाडींत टाकलें व डयूकसाहेबांच्या वाड्याकडे मी रवाना झालों. वाड्यांत शिरतांना



[पृष्ठ_१२८.



ग्रॅंड-ॲडमिरल फॉं टिरपिट्झ.

गाडी दिल्ली दरवाज्याजवळ उभी न राहतां ती एका बाजूच्या लहानशा दाराजवळ जाऊन उभी राहिली. तेथें उतरून मी एका लहानशा खोलींत शिरलों. इतक्यांत एक शांत वृत्तीचा वयातीत व सभ्य चेहऱ्याचा असा गृहस्थ आंत आला. त्याचा चेहरा चिंताग्रस्त दिसत होता. वृद्ध ग्रॅंड ड्यूक ते हेच, हें मीं ताबडतोब ओळखिलें. ड्यूकने एक सबध मिनिटभर माझ्याकडे अगदीं निरखून पाहिले आणि नतर स्वतःशीं पुटपुटल्यासारखें करून ते म्हणाले.

" हा तर अगदीं बच्चा दिसतो. असो. त्यांनीं आपल्या खात्रीनेच पाठविला असेल. " मग खालीं पाहून व डोके हालवून ते म्हणाले, " वखत तर मोठा कठीण आला आहे. काळ फारच वाईट. "

इतका वेळपर्यंत मी उभाच आहे, असें पाहून ड्यूकसाहेब एकदम म्हणाले, " बसा, बसा. ती खुर्ची घ्या. "

कसल्या प्रकारची कामगिरी ते मला सांगणार, तिचा उल्लेख त्यांनीं एकदम केला नाहीं. ते माझ्यापाशी इकडच्या तिकडच्या खाजगी गप्पा मारूं लागले. अशा गोष्टी चालतां चालतां शेवटीं मुद्याचा भाग निघाला. तेव्हां तो सांगून ते मला म्हणाले, " हे काम तुमच्यानें होईल का ? "

" माझ्या कामाचें नक्की स्वरूप माझ्या ध्यानांत येईपर्यंत मी खात्रीपूर्वक काहींच सांगू शकत नाही. माझ्या हातून तें होण्यासारखें नसल्यास स्पष्ट नकार देण्याची परवानगी मला असावी. " ही माझी अट त्यांनीं कबूल केली आणि पुनः एकवार माझ्याकडे निरखून पाहून ते बोलूं लागले.

" आमच्या घरांत एक फार त्रासदायक आणि भयंकर अशी भानगड उपस्थित झाली आहे. आमच्या गादीचा वारस आमचा पुतण्या इंग्लडांतल्या एका स्त्रीच्या जाळ्यांत गुरफटून जखडला गेला आहे. त्याच्या मनांतून तिच्याशीं लग्न करावयाचें आहे. तिचे घराणें फार मोठ्या दर्जाचें असल्यामुळें ही मागणी एकदम धुडकावून लावतां येत नाहीं, किंवा नुसत्या पैशानें तिला वळविणें शक्य नाहीं. आमच्या घराण्यांत तिचा प्रवेश होणें ही गोष्ट कांहीं कारणानें शक्य नाहीं. यांत काहीं राजकीय भानगड आहे,

असा भाग नाहीं; पण तें कारण माझ्या दृष्टीनें राजकीय स्वरूपाहूनहि अधिक महत्त्वाचें आहे. याकरितां तिचा येथें प्रवेश होणें, ही गोष्ट कालत्रयींहि घडणें नाहीं. या लग्नाला माझी संमति नाहीं, असें तिला कळल्यापासून आम्हांला पेंचांत पाडण्याचा उपक्रम तिनें सुरू केला आहे. " हें बोलत असतां म्हाताऱ्याच्या डोळ्यांत विलक्षण तेज चमकत होतें. थोडा वेळ थांबून व डोळे अधिक विस्तृत करून म्हातारा पुढें बोलूं लागला. " आमच्या पुतण्यानें तिला जीं कांहीं पत्रें मूर्खपणानें धाडलीं आहेत, आणि दुसरे जे कागदपत्र तिच्या स्वाधीन केले आहेत, ते आम्हांला आतां बाधक होण्याचा संभव आहे. हे कागदपत्र परत माझ्या हातां यावयास पाहिजेत. खर्च कितीहि झाला, तरी त्याची दिक्कत मला नाहीं. पैशासंबंधीं तुम्ही क्षणभरहि शंका मनांत आणूं नका. पुष्कळ वजनदार लोकांची भीड मीं तिच्याकडे घालून पाहिली, माझ्या पुतण्यालाहि मीं परोपरीनें सांगून पाहिलें; पण या साऱ्या खटपटीचें कांहीं सुद्धां फळ झालें नाहीं. ही कामगिरी कशी करावयाची, तें तुमचें तुम्ही पाहून घ्या; पण कांहीं झालें तरी, या गोष्टीचा बभ्रा लोकांत होतां कामा नये. तसेंच तिच्यावर जोर-जुलूमहि होता उपयोगी नाहीं. हें काम साधायला काय उपाय करावा हें मी तुम्हांला सांगूं शकत नाहीं. आतां सांगा पाहूं तुमच्यानें ही कामागिरी होईल का ? "

उगीच तोंडानें मोठ्या फुशारक्या माराव्या अशी संवय मला कधींच नव्हती. मीं उत्तर दिलें, " कामागिरीला निघाल्यानंतर तिला कांहीं विशेष स्वरूप प्राप्त येईपर्यंत, आपलें मत ठामपणें देणें मला बरें वाटत नाहीं. याकरितां मी आताच कांहीं निश्चितपणें सांगत नाहीं, याबद्दल सरकारानीं मला क्षमा करावी. "

माझ्या ह्या उत्तरानें म्हाताऱ्याचें समाधान झाल्यासारखें दिसलें. शेवटीं उठतां उठतां ते म्हणाले, " मीं हें आतां सर्वस्वी तुमच्याकडे सोंपाविलें आहे. तुम्हांला जेव्हां कांहीं कळविण्यासारखें असेल, तेव्हां आमच्या खाजगी मंत्र्याकडे कळवीत जा. कांहीं मजकूर तारेनें कळवावयाचा असेल, तर ती व्यवस्था तुमच्या बर्लिनच्या अधिकाऱ्यामार्फत मी करीन. जरा

थांबा. आमचे चिटणीस तुमची भेट घेतील." खोलींतून बाहेर पडतां पडतां माझ्या खांद्यावर हात ठेवून डयूकसाहेब ह्मणाले, "आह्मांला या अडचणींतून तुह्मीं बाहेर काढलें, तर तुमचे श्रम कांहीं वायां जाणार नाहींत."

माझे श्रम वायां गेले नाहींत, हें सांगावयाला नकोच. ग्रँडडयूक खोलींतून बाहेर निघून गेले. एक हुजऱ्या आंत आला, आणि एका भोजनाच्या खोलींत मला घेऊन गेला. त्या ठिकाणीं कांहीं खाण्याचे पदार्थ ठेवले होते. त्यांवर मींहि यथेच्छ ताव मारला. इतक्यांत डयूकसाहेबांचे एक चिटणीस आंत आले आणि डयूकचे सलाम सांगून एक बंद केलेले पाकीट त्यांनीं माझ्या हातांत दिलें. [illegible] तावडतोब निघून [illegible] डयूकसाहेबांनीं विनति केली आहे, असेंहि ते ह्मणाले. त्याच रात्रीं निघून जाण्याचें आश्वासन सेक्रेटरीला देऊन मी बर्लिनला परत आलों. वुइलहेल्मस्ट्रासीमधील हर स्ट्यामर यांना टेलिफोननें बोलावून दोन महिन्यांची रजा मीं मागितली. त्याच रात्रीं लंडनला जाण्यासाठीं हालंड एक्सप्रेस गाडीनें मी रवाना झालों.

ग्रँडडयूकचें पत्र उघडून पहातां प्रत्येकीं साडेसातशें रुपयांच्या तीन नोटा त्यांत होत्या, आणि त्यांशिवाय एका इंग्लिश ब्यांकेवर पांचशें पौंडांची हुंडी होती, असें मला आढळून आलें. आणखी पैसा लागल्यास त्याच ब्यांकेला तीन दिवस अगाऊ कळविलें असतां तजवीज केली जाईल, असें पत्रहि त्या पाकिटांत होतें. अशा रीतीनें लंडनमध्यें लागणाऱ्या सर्व खर्चाची तजवीज करण्यांत आली होती.

आपल्या नेहमीच्या शिरस्त्याला अनुसरून आपल्या कामगिरींतील सर्व गोष्टींचा तपशीलवार विचार मीं गाडींत केला. ती स्त्री उच्च दर्जाची होती. अर्थात् तिचे स्नेहीसोबतीहि बडे लोक असले पाहिजेत. तिच्या सोबतींतल्या लोकांशीं संघटन करण्याचा योग जुळवून आणला पाहिजे. लंडन शिवाय दुसऱ्या एकाद्या शहरीं, ही गोष्ट करणें फार जड गेलें असतें; पण लंडनची गोष्टच वेगळी. रुबाबदार चेहरा, चतुरस्रपणा आणि द्रव्यसंचय हीं ज्याच्या जवळ असतील अशा मनुष्याला लंडनच्या कोणत्याहि

दर्जाच्या लोकांत घुसणें फारसें कठिण नाहीं. ही गोष्ट करण्यास चातुर्य, चिकाटी आणि नाटकी बाणा हीं अवश्य पाहिजेत, हें सांगावयास नकोच. आपल्या कार्याला आरंभ करण्याकरितां पहिली भूमिका कोणत्या थाटाची सजवावी हेंच मला समजेना. याबद्दल मीं कोणताच निश्चय केला नव्हता. पुष्कळ वेळा अशा गोष्टी आगाऊ कांहींच ठरवितां येत नाहींत. वारा फिरेल तशी पाठ फिरविणें, हेच अशा स्थितींत फार उपयोगी पडते. लोकांत आपल्याबद्दल वाटाघाट कशी सुरू होईल, याचा विचार मी करूं लागलों. कोणत्या तरी रीतीनें स्वतःला लोकांच्या चर्चेचा विषय करणें, हें माझें पहिले कर्तव्य होतें. कसल्या तरी विक्षिप्तपणाबद्दल ज्याच्या त्याच्या तोंडीं माझें नांव होईल, अशी एकादी गोष्ट मला करावयाची होती. एकादा प्रवासी किंवा एकादा शिकारी अशा प्रकारच्या मनुष्याकडे ब्रिटिश स्त्रीपुरुषांचें लक्ष तावडतोब वेधतें. त्यांतून अशा मनुष्याच्या चाली-रीतींत किंवा एकाद्या सवयींत कांहीं विक्षिप्तपणा असला, तर मग बोलावयासच नको. अशा रीतीने लंडनांतील माझ्या वागणुकीची सामान्य रूपरेषा मीं आपल्या मनांत ठरवून टाकली आणि प्रत्यक्ष वागणूक कशी करावयाची याचा निश्चय तेथें गेल्यावर ठरवावा, असें मीं योजिलें.

लंडनला गेल्यावर प्रथम कांहीं दिवस रसेल्स स्क्वेअर हाटेलमध्यें मीं काढले, आणि नतर लँगह्यॅम हॉटेलमध्ये गेलों. ह्या हॉटेलांत मोठमोठे अमीरउमराव आणि राजेरजवाडे उतरतात. येथें आल्यावर मीं आपल्या कामगिरीला हळुहळू सुरवात केली, लंडनांतील अमीरउमराव व श्रीमंत लोक यांच्या हालचालीच्या बातम्या ज्यांत दिलेल्या असतात, अशीं सगळीं वर्तमानपत्रें मीं विकत घेतलीं आणि अथपासून इतीपर्यंत मीं त्यांचें अध्ययन केलें. ज्या बाईसाहेबांशीं मित्रत्वाचें नातें मला जोडावयाचें होतें, त्यांचें हिंडणें फिरणें कोणत्या मंडळींत होत असे, याचा शोध मीं चालविला. हॉटेलांत असतां मीं कांहीं स्नेही जोडले होते. त्यांच्यापासून व वर्तमानपत्रांच्या बातमीदारांपासून मला इष्ट असलेली बातमी मी थोडी बहुत मिळवूं लागलों. सुदैवानें लंडनांत फ्याशनेबल लोकांचा भरणा होण्याचे हे दिवस होते. यामुळें हे सारे लोक सध्यां येथें जमत होते.

बाईसाहेबांच्या विशेष परिचयाचे सोबती कोण आहेत आणि त्यांच्या एकत्र होण्याच्या जागा कोणत्या, हें मीं शोधून काढलें. एवढी आगाऊ तयारी केल्या नंतर बाईसाहेब दिसण्यांत कशा आहेत, त्यांची चालरीत कशी आहे, व त्यांच्या आवडीनिवडी कशा प्रकारच्या आहेत, याचा शोध मीं चालविला घोड्यावर बसून रपेट करण्याकरितां हाइडपार्क बागेंत त्या रोज जात असतात असें मला कळलें. मीहि त्या बागेंतल्या घोडदौडीवर रोज दोन तास घोड्यावरून फेरफटका करण्याचें ठरविलें. पांचव्या दिवशीं सकाळीं माझ्या श्रमाचा मोबदला मला मिळाला. आपल्या कांहीं मित्र-मंडळीबरोबर बाईसाहेब घोड्यावर बसून जात असल्याचें मला आढळलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याच वेळीं मी पुन्हां तेथें हजर झालों, आणि थोड्याच वेळांत त्याच मित्रमंडळीबरोबर बाईसाहेबांची स्वारीहि आली. या मंडळीचा ताफा बराच दूर गेल्यानतर मींहि आपला घोडा त्यांच्या मागोमाग पिटाळला. या मडळीचा घोडे बांधण्याचा तबेला मीं प्रथम हुरून पाहिला आणि ती मंडळी निघून गेल्यानंतर मींहि आपला मोर्चा तिकडे वळविला. त्या तबेल्यांत मीं कांहीं इकडे तिकडे चौकशी केली, त्यावरून ही मंडळी रोज त्याच वेळीं घोड्यावरून फेरफटका करीत असते, असें मला कळून आलें. यानंतर दररोज घोड्यावर बसून बाई-साहेबांच्या नजरेस पडावयाचे असा परिपाठ मीं ठेवला. घोड्यावर बसण्यात मी पटाइत आहें, असा अभिमान मला आहे. आस्त्रेलियांत असतांना घोड्यावर बसून अनेक जंगलें मी भटकत फिरत असें. नाक चेचण्याचे आणि कांटेरी झुडपें तोंडावरून ओरखडले जाण्याचे अनेक प्रसंग मनवर आले आहेत. घोड्याला निरनिराळ्या चालीवर चालविण्याची कलाहि मला अवगत आहे. ही आमची कलाहि एक दोन वेळां मी बाईसाहे-बांच्या नजरेस पाडली. एवढ्यानेंच त्यांच्याशीं माझा परिचय होईल, अशांतला भाग नव्हता; पण कोणीकडून तरी माझ्याकडे त्यांचें लक्ष जाईल इतकीच गोष्ट मला कर्तव्य होती. अशा प्रकारच्या दृष्टिवेधानें पुढील कार्यास सौकर्य येत असतें, असा मानसशास्त्राचा एक सिद्धांत आहे. एकाद्या मनष्याला तर्ही प्रत्यक्ष ओळखीत नसलां. तरी त्याचा

चेहरा रोजच्या रोज तुमच्या नजरेस पडत असला, तर अंतर्गत हेतूंचा एक सूक्ष्मतंतु तुह्मां दोघांमध्यें निर्माण होत असतो.

लंडनच्या फ्याशनेबल मंडळांत ज्या कांहीं विक्षिप्तपणाबद्दल गोष्टी शिरल्या आहेत, त्यांची आवड आमच्या बाईसाहेबांस व त्यांच्या मित्रमंडळीस असल्याचें मला कळून आलें. यांपैकीं, एका गोष्टकिडे माझें लक्ष विशेष वेधलें. रोज दुपारीं तीन आणि चार वाजण्याच्या दरम्यान स्ट्रॉबेरीचीं फळें खाण्याकरतां आमच्या बाईसाहेब आणि त्यांचें मित्रमंडळ सेव्हॉयहॉटेलमध्यें जात असे. मलाहि हीं फळें एकाएकीं फार आवडूं लागलीं आणि तीं खाण्याकरतां त्याच हॉटेलमध्ये त्याच वेळीं अस्मादिकांची स्वारी जाऊं लागली.

स्ट्रॉबेरीच्या मोसमांत सेव्हॉय हॉटेल हें मनुष्यरूपी फुलपांखरे आणि या फुलावरून त्या फुलावर उडणारे भुंगे यांचें निवासस्थान होऊन बसलेलें असतें. लंडनांतलें सारें सौंदर्य, सारी फ्याशन आणि सारा आळस हीं सर्व येथें एकत्र जमत असतात. इंद्रियजन्य सुखाच्या मागें हात धुवून लागावयाचे एवढाच उद्योग या मंडळीला असतो. ज्यांत कसलाहि रस नाहीं, असलीं शुष्क भाषणें आणि ठरींव मूर्खपणाच्या कोट्या यांचा येथें या वेळीं पाऊस पडत असतो. मानवी मनाची क्षुद्र बाजू निरीक्षण करण्याला याहून अधिक चांगली सधि दुसऱ्या कोठेंहि मिळावयाची नाहीं. टेम्स नदीच्या तीरावर बाजूनें कांचा लावलेल्या व श्रीमंती थाटानें सजविलेल्या गचीवर बसून असा अभ्यास करणे, हें खरोखर फार मौजेचे आहे.

आपल्या जिव्हालौल्याची तृप्ति करण्यासाठीं सेव्हॉय हॉटेलमध्यें जाणारास बाजिरावी थाटाचा खर्चहि करावा लागतो. आमच्या बाईसाहेब आणि त्यांचें मित्रमंडळ याजकरतां एका विशिष्ट जागेंतलें टेबल राखून ठेवण्यांत आलें होतें. तेथल्या वाढप्याच्या ' मेहरबानीनें ' त्यांच्या शेजारचेंच एक टेबल मीं आपल्याकरतां योजून ठेवलें होतें. बाईसाहेब आपल्या जागेवर जाऊन बसेपर्यंत मीहि इकडे तिकडे उगीच फिरत असें. त्या आपल्या जागेंत गेल्या म्हणजे थोड्या वेळानें मीहि आपल्या जागेवर जाऊन बसत असें. माझा स्वभाव एकलकोंडा असून आपल्या शेजारीं

दुसरा कोणी येऊन बसला, तर तें मला खपत नाहीं, असें माझ्या वर्तनानें मी दाखवीत असें. आपल्या गिऱ्हाइकांना स्ट्रॉबेरी देण्याची एक विलक्षण पद्धत या हॉटेलमध्यें आहे. दहांपासून बारा सुंदर रसदार फळें वर असलेलें झुडूप जसेंच्या तसेंच चांदीच्या ताटांत घालून गिऱ्हाइकापुढें ठेवलें जातें. अशा रीतीनें स्ट्रॉबेरी खाणें म्हणजे चैनीचा अगदीं मुरब्बीपणा समजला जातो. फळाबरोबर खाण्यासाठीं दुधावरची थोडी मलयीहि दिली जाते. स्ट्रॉबेरीच्या अशा एका प्लेटीला साडेसात रुपये पडतात. सामान्य खाणाराला एक प्लेट बहुधा पुरेशी होते. मी रोज पाच प्लेटींवर हात मारीत असें.

अशा रीतीनें रोज सुमारे पन्नेचाळीस रुपये ग्रँडडचूकच्या खिशांतून माझ्यासाठीं खर्च होत असत. हा प्रकार सुमारें दहा दिवस चालू होता. रोज त्याच वेळीं बाईसाहेबांच्या मागोमाग जाऊन बसावें व रोज तितक्याच प्लेटींचा फन्ना उडवावा असा माझा क्रम सुरू होता. लवकरच लोकांचें लक्ष माझ्याकडे वेधूं लागलें. माझ्या विक्षिप्तपणाबद्दल हळुहळू कुजबूज सुरू झाली. एके दिवशीं मी आपल्या जागेवर जात असता, कोणसेसें ह्मणालें, " हा आला स्ट्रॉबेरी खाणारा राक्षस ! "

हे शब्द ऐकून मला परमावधीचा आनंद झाला. बाईसाहेबांच्या मित्र मंडळींत घुसण्याची संधि लवकरच येणार, असें मीं ओळखलें. साऱ्या लंडनांत फार फ्याशनेबल–चोंचलेखोर—म्हणून नाणावलेल्या हॉटेलांत चोंचलेखोरपणाबद्दल माझा नंबर पुष्कळसा वर लागला, ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. आमच्या बाईसाहेबांचा दर्जा मोठा, त्यांचें कुळ उच्च, तेव्हां त्या सामान्य स्त्रीप्रमाणें वाटेल त्याच्याबरोबर थट्टामस्करीचा प्रकार करावयाच्या नाहींत, हें उघड होय. इतक्या उघडपणें त्यांच्याशीं ओळख करून घेणें शक्य नव्हतें. त्यांची खुर्षीत असण्याची वेळ साधून एकादा कटाक्ष त्यांच्याकडे फेंकला तर त्याहि तुमचा कटाक्ष परत करावयाच्या. दोघांचींहि तोंडें थोडींशीं हंसरीं होतात न होतात तोंच तीं एकमेकांच्या विरुद्ध दिशेला वळावयाचीं. पहिली सलामी येथेंच संपते. त्यानंतर दोघेंहि दुसऱ्या दिवसापर्यंत परस्परांकडे पहावयाचीं

नाहींत. अशा प्रेक्षणाला थट्टामस्करी हें ग्राम्य नांव कधींहि देता येणार नाहीं. फारच झालें तर तें एक मानसिक सम्मीलन आहे, इतकेंच ह्मणतां येईल.

अशा रीतीनें स्ट्रॉबेरीचा फन्ना पाडण्याचा माझा क्रम सुरू असतां हॉटेलचे म्यानेजर माझ्याजवळ आले आणि ह्मणाले, " तुह्मी कोण आहां, याबद्दल येथें बरीच चर्चा सुरू झाली आहे. कांहीं लोकांनीं मला याबद्दल प्रश्न देखील विचारले. " ही चौकशी करणारा बाईसाहेबांच्या मित्रमंडळापैकींच एक गृहस्थ आहे, असें त्या म्यानेजरकडून मला कळलें. अर्थात् या चौकशीचा उगम मूळ बाईसाहेबांपासूनच झाला असावा, हें मला सहज ताडतां आलें.

हा प्रकार इकडे सुरू असतां ग्रँडडयूकसाहेबांशींहि माझा रोजचा पत्रव्यवहार सुरू होता. त्यांचा पुतण्या या दिवसांत लंडनला जावयाचा; पण कसेहि करून त्याला इकडे येऊं देऊं नका, असें डयूक यांस मीं कळाविलें होतें. त्यानें लंडनला येऊं नये एवढेंच नव्हें, तर बाईसाहेबांना पत्रहि लिहूं नये अशी तजवीज मी ग्रँडडयूकसाहेबांकडून करविली. देशोदेशींचे चैनी लोक या वेळीं लंडनांत पुष्कळसे गोळा झाले होते. हे दिवस चैनीच्या मोसमाच्या भराचे होते. मीहि रोज चैनीचे नवे नवे प्रकार शोधून काढण्यांत गुंग झालों होतो. आज गेटी थियेटर तर उद्यां कोर्ट थियेटर आणि आज हा क्लब, तर उद्यां दुसराच कसला निराळा समाज असा माझा प्रकार रोज सुरू होता. तेथें माझ्या जुन्या ओळखीचेहि कांहीं मित्र मला भेटले. मी शिकारीनिमित्त किंवा युरोपांतल्या हवा खाण्याच्या ठिकाणीं कित्येक वेळां जात येत असें व त्या वेळीं पुष्कळांच्या ओळखीहि होत असत. अशापैकींच दोन तीन मित्र येथें मीं गांठले व त्यांजकडून कांहीं क्लबांत व मंडळांत मीं आपला प्रवेश करून घेतला. अशा रीतीनें बऱ्याच मंडळीच्या ओळखी झाल्यानंतर चहापार्ट्या व इतर प्रकारचीं घरगुती संमेलनें यांना मला बोलावणीं येऊं लागलीं. यांपैकीं पुष्कळशा ठिकाणीं आमच्या बाईसाहेबहि येत असत व त्या येण्याच्या ठिकाणीं मला आपोआप बोलावणें न आलें, तर युक्तिप्रयुक्तीनें तें मी

आणवीत असें. अखेरीस एका पार्टीच्या प्रसंगीं बाईसाहेबांचा व माझा प्रत्यक्ष परिचय झाला. बाहेर हिंडण्याफिरण्यांत पटाइत ह्मणून ज्या कांहीं इंग्रज स्त्रिया प्रसिद्ध आहेत, त्यापैकींच बाईसाहेब या एक होत्या. त्या पराकाष्ठेच्या सुंदर होत्या असें नाहीं, पण शरीराचें तेज, डोळ्यांचे पाणी आणि उत्तम प्रकृतीची टवटवी या गोष्टींच्या अनुकूलतेमुळें त्या मोहक दिसत, यात मात्र संशय नाहीं. बांध्यानें त्या उंच व सडपातळ होत्या. त्यांची वृत्ति व चालरीत हीं स्वतंत्र बाण्याचीं द्योतक होतीं. त्या कोणापुढें नमून रहातील अथवा कोणाच्या ओंजळीनें पाणी पितील, असें दिसत नव्हते. या दृष्टीनें पहातां त्यांची वाढ जर्मन स्त्रीवर्गाच्या वागणुकीच्या अगदीं विरुद्ध झालेली दिसत होती. कदाचित् तरुण ड्यूकसाहेबांच्या प्रेमाच्या मुळाशीं तेंच कारण असूं शकेल.

बाईसाहेब ह्मणाल्या, " काय कसें काय आहे ? स्ट्रॉबेरी खाण्याची तृप्ति अजून झाली कीं नाहीं ? "

आम्ही दोघेंहि मोठ्यानें हंसत सुटलों. मी म्हणालों, " एकूण बाईसाहेब माझ्याकडे इतक्या बारीक नजरेनें पहात होत्या तर ? "

" अर्थात् ! माझी तुमच्यावर सक्त नजर होती. "

यानंतर आम्ही दोघेंहि मन मोकळें करून थोडा वेळ गप्पागोष्टी करीत बसलों. तरुण ड्यूकसाहेबांचें मन बाईसाहेबाकडे इतकें कां वेधलें याचा अधिकाधिक उलगडा मला होऊं लागला. ड्यूकसाहेबांची निवड कांहीं वावगी नव्हती, असेंहि मला वाटलें.

त्या दिवसापासून बाईसाहेब जेथें जेथें हजर असतील, तेथें तेथें हजर रहण्याचा मींहि निश्चय केला. गाणींबजावणीं, नाटकें, उपाहारगृहें, इत्यादि ठिकाणीं त्यांना नेहमीं सलाम करण्याचा प्रसग मीं वायां जाऊं दिला नाहीं. बारीकसारीक गोष्टींत माझ्या संगतीचा उपयोग त्याना होऊं लागला. हळुहळू आणि कदाचित् त्यांना न कळतसुद्धां माझ्यावर त्यांचा विश्वास बसूं लागला. हा वेळपर्यंत मी कोण याचा लोकांना हळुहळू उलगडा पडत चालला होता. मी एक जगाचा प्रवासी असून वैद्यविद्येंत कांहीं शोध लावण्याचा नाद मला आहे, असा लोकांचा समज झाला

होता. छोट्या ग्रँडडयूकचा व त्यांचा जो ऋणानुबंध होता, त्याजबद्दल बाईसाहेबांच्या मित्रमंडळीस बरीच माहिती होती, असें मला कळून आलें. छोटे ग्रँडडयूक लंडनांत येण्याची वाट बाईसाहेब पहात होत्या. हळुहळू छोट्या डयूकसाहेबांची व माझी ओळख आहे, असें मीं बाईसाहेबांच्या लक्षांत आणून दिलें. आम्हां दोघांमध्ये हळुहळू अधिक मोकळेपणा येत चालला. आपल्या अतरंगांतील गोष्टी बाईसाहेब मजजवळ अधिक मोकळेपणानें बोलू लागल्या. या वाढत्या विश्वासाचा फायदा घेण्याचा उपक्रम मींहि सुरू कला. छोटे डयूकसाहेब कांहीं तरुणींच्या मागें लागले असून तिकडे आपलें बस्तान जुळवींत आहेत, असें मीं बाईसाहेबांच्या मनांत भरवून देऊं लागलों. अशा रीतीनें विश्वास वाढतां वाढतां बाईसाहेब छोट्या डयूकविषयीं आपले मन मजपाशीं उघडें करू लागल्या. मीहि छोट्या ढयूकबद्दल त्यांच्या मनांत मत्सराचें बीजारोपण करून दिलें. येणार, येणार, ह्मणून गाजत असलेले डयूकसाहेब अद्यापावेतों लंडनांत आले नव्हते. या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांजविषयीं बाईसाहेबांचें मन मी कलुषित करू लागलों. छोट्या डयूकसाहबांच कान मोठ्या ग्रँडडयूकसाहेबांच्या हातांत आणि या मोठ्यांचे कान अस्मादिकांच्या हातांत होते, ही गोष्ट वाचक विसरले नसतील. माझ्याकडून हुकूम सुटल्याशिवाय छोटे डयूक लंडनांत येणार कसे ?

यानतर सुमारें दोन महिन्यांनीं मला मेफेअर पेठेमधील बाईसाहेबांच्या घरीं जाण्याचा योग जुळून आला. छोट्या डयूकसाहेबांबरोबर माझी ओळख आहे, असें मीं त्यांस भासविलें असल्यामुळें ह्मणा किंवा इतर कांहीं कारणांमुळें ह्मणा, बाईसाहेबांचा आणि माझा परिचय या वेळीं बराच दाट झाला होता. छोटे डयूकसाहेब व बाईसाहेब यांचा प्रथम परिचय श्रॉपशायर परगण्यांतील एका सरदाराच्या घरीं झाला. पण या वेळीं त्यांचें विशेष मेथकूट जमलें नव्हतें. त्यानंतर स्विट्सरलंडमधील डोंगराळ प्रदेशांत या दोघांची पुन्हां गांठ पडली व तेव्हांपासून या दोघांत अधिक दृढ असा मित्रभाव वाढत गेला. बाईसाहेबांना पत्त्यावर

जुगार खेळण्याचा नाद असून त्यांत त्यांच्या खिशाला बराच चट्टा बसला असल्याचेंहि माझ्या निदर्शनास आलें.

बाईसाहेब कर्जबाजारी बनल्या आहेत, ही गोष्ट उघडकीस आणण्यास मला बरीच खटपट करावी लागली. बाईसाहेबांच्या दासीकडे संधान बांधून व तिच्याशी अनेक वेळां गप्पागोष्टी करून तिच्याकडून ही गोष्ट मला वदवावी लागली. बारीकसारीक प्रसंगीं सुद्धां या दासीबाईच्या हातास लोणी लावण्याचा प्रसंग मीं वायां जाऊं देत नसें. तिच्या मर्जीचा कल पाहून अनेक वेळां कांहीं बारीकसारीक वस्तु तिला मी देत असें. बाईसाहेब बाहेर गेल्या आहेत, अशी संधि साधून मी त्यांच्या घरीं गेलो आणि त्या परत येण्याची वाट पाहण्याचा बहाणा करून त्या दासीशीं बोलत बसलों. तिच्या लक्षांत न येईल अशा रीतीनें कांहीं मुद्द्याचे प्रश्नहि तिला मीं विचारले. तिनें जीं उत्तरें दिलीं, त्यावरून बाईसाहेबांना पैशाची तंगी असावी असें मीं ताडलें व पुढील धोरण या मुद्द्याला धरून ठरवाव-यायचें असा बेत मीं योजला.

यानंतर बाईसाहेबांच्या घरीं पत्त्यांचे डाव जेव्हां जेव्हां सुरू असत, तेव्हां तेव्हां मी हटकून हजर रहात असे. उच्च दर्जाच्या इंग्रज स्त्रियांत ब्रिज नांवाच्या खेळाचें फार खूळ माजलें आहे, आणि याच नादांत पडून बाईसाहेब कर्जबाजारी झाल्या होत्या. एके दिवशीं आम्हां दोघां-मध्यें डाव चालला असतां तो डाव बाईसाहेबांच्या अंगावर आला. या जुगारांत रोखीचा व्यवहार फारसा नसतो. डाव हारणारा इसम आपल्या प्रतिपक्ष्याला ठरीव रकमेची हुंडी मात्र लिहून देतो. त्याप्रमाणें त्या रात्रीं बाईसाहेबाकडून मीं हुंडी लिहून घेतली. त्याचप्रमाणें दुसऱ्या कित्येक हुंड्या त्यांनीं अनेकांना लिहून दिल्या होत्या. त्या दासीच्या मार्फत या कर्जदाराचे पत्तेहि मीं मिळविले, आणि त्यांजकडून त्या हुंड्याहि माझ्या स्वतःचा संबंध न दाखवितां माझ्या हातीं येण्याची व्यवस्था मीं केली. नंतर हुंड्यांचें हें सारें पुडकें खिशांत घालून एका प्रसिद्ध खाष्ट सावकाराकडे मी गेलों आणि त्याच्याशीं सौदा पक्का केला. त्यानें तें भेंडोळें खिशांत घालून बाईसाहेबांकडे जावें व रकमेचा उलगडा करण्याचा तगादा

त्यांजकडे लावावा, असें आह्मां उभयतांत ठरलें. अर्थातच माझ्या नांवाचा मागमूसहि त्यानें लागूं देऊ नये, असा ठराव मीं त्याच्याशीं केला. ज्या अर्थी बाईसाहेबांचा मी स्नेही म्हणवितों, त्या अर्थी पैशासाठीं त्यांच्याकडे मला स्वतःला कधींच तगादा करता आला नसता, हें उघड आहे. आमचा सौदा ठरला, त्याच दिवशीं आमचे मारवाडीशेट बाईसाहेबाच्या घरीं गेले. यानंतर कित्येक वेळां तो वारंवार त्याच्या घरीं जाई आणि पैशासाठीं निकडीचा तगादा करीत असे. एकसारख्या खेपा घालघालून व अखेरीस कोर्टाची दहशत दाखवून बाईसाहेबांस त्यानें सतावून सोडले. शेवटीं बाईसाहेब इतक्या वैतागल्या कीं, त्या खरोखर भ्रमिष्ट होण्याच्या रंगास आल्या. मींहि त्यांच्याशीं गुळचट भाषणे अधिक सुरू केलीं व त्यांच्या स्थितीबद्दल माझ्या हृदयाला अगदीं पीळ पडत आहे, असें मीं त्यांना भासविले. शेवटीं बाईसाहेब माझ्याशीं सारें आपलें हितगुज सांगूं लागल्या. आपण कर्जाच्या पेचांत सांपडलों असून आपलें बहुतेक सारें मित्रमंडळहि कर्जबाजारी आहे, ही गोष्ट उघडपणें त्यांनीं मजपाशीं कबूल केली !

माझा डाव आतां चांगला रंगास आला होता. बाईसाहेबाच्या डोक्यावर उपकारांचें मोठें ओझे लादण्याचा प्रसंग मला प्राप्त झाला. या पेचांतून बाईसाहेबांस सोडविण्यास काय युक्ति करावी याजबद्दल आह्मी परस्परांत खल सुरू केला. बाईसाहेबाच्या कारभारात बऱ्याच भानगडी व गुंतागुंती झाल्या होत्या, असें मला आढळून आलें. छोट्या डयूकसाहेबांकडून कसलीहि मदत होण्याचा फारसा संभव नाहीं, ही गोष्ट बाईसाहेबाच्या मनावर मीं ठसविली. डयूकशीं त्यांचा विवाहसंबंध होण्याची त्याना यत्किंचितहि आशा नाहीं, अशीहि त्याची मीं खात्री करून दिली; तथापि ज्या अर्थी छोटे डयूक त्यांच्याशीं वचनबद्ध झाले होते, त्या अर्थी या संकटांतून सोडविण्यास बाईसाहेबांस मदत करणें हें डयूकचें कर्तव्य आहे असेंहि मीं आपलें मत दिलें. प्रसंग मोठा अणीबाणीचा होता. बाईसाहेब स्वभावाच्या फार अभिमानी. यामुळें त्यांना नकळत त्यांचें मन वळविण्याचें मोठें बिकट काम मला आतां करावें

लागलें. डचूककडून पैसा घेणें म्हणजे त्याला पेंचांत धरून त्याजकडून पैसा उकळणें नव्हे, असें बाईसाहेबांना मला भासवावयाचें होतें. डचूककडून पैसा घेणें ही गोष्ट निव्वळ न्यायाची आहे, अशी मला त्यांची खात्री करावयाची होती. यांत कांहीं अन्याय आहे असा त्यांचा समज झाला असता, तर डचूककडून पैसा घेण्यापेक्षां समाजांतून बाहेर राहून एकातवास त्यांनीं अधिक पसंत केला असता. अशा स्थितींत आपल्या सर्व मोठेपणास व चैनबाजीस रजा देण्याइतका सदाभिमान त्याच्या ठिकाणीं जागृत होता, ही गोष्ट कबूल करणे भाग आहे. शेवटीं मी म्हणालों, " बाईसाहेब, तुमची नुकसानी ग्रँडडचूकनें भरून द्यावी, असें करण्यास तुमच्याजवळ कांहीं तीव्र शस्त्र आहे का ? "

बाईसाहेब बराच वेळ स्तब्ध बसल्या होत्या. नंतर त्या एकदम उठून बाहेर गेल्या आणि थोड्या वेळानें एक कागदपत्रांचे पुडके घेऊन आंत आल्या. यापैकीं कांही कागदावर ग्रँडडचूकच्या राजघराण्याची मोहर मला दिसली. छोट्या डचूकसाहेबांच्या हातून इतका मूर्खपणा झाला असेल, अशी माझी कल्पना नव्हती. संतापाच्या भरांत तें पुडकें माझ्या डोळ्यासमोर धरून बाईसाहेब म्हणाल्या, "ग्रँडडचूक आतां यापुढे काय बोलणार ते सांगा पाहू. छोट्या डचूकशीं माझा विवाह करण्यास त्यांना मी भाग पाडीन. "

ही संधि माझ्या फार फायद्याची होती. तवा अगदीं खरपूस तापला होता. शांतपणें आपण या गोष्टीसंबंधीं बोलू, असें मीं बाईसाहेबांस सुचविलें. बाईसाहेबांस माझा भरंवसा अधिक वाटावा म्हणून मी स्वतः एका बड्या जर्मन घराण्यांतला वंशज असून नांव चोरून मी लंडनमध्यें आलों आहे, असें त्यांस सांगितलें. अर्थातच ग्रँडडचूकच्या घराण्याची पूर्वापार माहिती मला आहे, असा त्यांचा समज झाला. तसेंच ग्रँडडचूकच्या घराण्याशीं माझें फारसें सूत नाहीं, असेंहि मीं त्यांना भासविलें. एकंदरीनें या वेळीं त्यांना माझ्या मदतीचा फारसा उपयोग होईल, असा त्यांचा पक्का समज मीं करून दिला.

" विवाहासंबंधी म्हणाल, तर तो कायदेशीर होणें शक्य नाहीं, हें

तुह्मांला स्पष्टपणें सांगण्यावांचून गत्यंतर नाहीं. खरोखर ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे, पण त्याला उपाय काय ? छोट्या ड्यूकनीं तुमच्याशीं केलेली वर्तणूक अत्यंत गर्हणीय आहे, यांत संशय नाहीं. याकरतां त्यांनीं आतां तुमची भरपाई करावी, हें अगदीं रास्त आहे. वचनभंगाच्या अपराधावरून तुह्मीं त्यांजवर दावा केला, तर कोर्टसुद्धां तुमच्यातर्फे निकाल देईल; पण हा मार्ग तुह्मांला कधींच श्रेयस्कर वाटावयाचा नाहीं. तुमच्यासारख्या थोर आणि कुलीन घराण्याला यामुळें केवढा कलंक लागणार आहे बरें ! " हें माझें भाषण बाईसाहेबांना आवडल्यासारखें दिसलें.

त्या ह्मणाल्या, " मग करावें तरी काय ? "

" बाईसाहेब, मी ज्या अर्थीं तुमचा मित्र म्हणवितों, त्या अर्थीं अशा प्रसंगीं तुमच्या उपयोगीं पडावें हा माझा धर्म आहे, असें मी समजतों. तुह्मी परवानगी द्याल, तर माझ्या मित्रधर्माला जागण्याचा यत्न मी करीन. म्हाताऱ्या ग्रँडड्यूकशी बोलणें करून त्याला या गोष्टीचा विचार सरळ मार्गानें करण्यास मी भाग पाडीन असें मला वाटतें. हा प्रश्न अत्यत नाजूक आहे, हे मलाहि समजतें; पण अशा गोष्टींत स्वतः बोलाचाली करण्यापेक्षां हें काम एखाद्या पुरुषावर सोंपवावें, हें तुह्मांलासुद्धा बरें नाहीं का वाटत ? "

बाईसाहेब खालीं मान घालून बसल्या. हातांतील पत्रांचें पुडके या हातांतून त्या हातांत त्या कांहीं वेळ फिरवीत राहिल्या. नंतर त्या मजकडे पाहून ह्मणाल्या, " छे, छे, मला धीर नाहीं होत. या मार्गाचा मला विचारदेखील करावासें वाटत नाहीं. "

तव्याखालीं थोडा आणखी जाळ घातला पाहिजे, असें मला दिसून आलें. त्या वेळीं मीं खरोखर इतक्या थापा मारल्या, कीं बाकीच्या साऱ्या जन्मांतहि मी इतकें खोटें बोललों नसेन. छोट्या ड्यूकसाहेबांचें चित्र पांच मिनिटांच्या अवधींत मीं इतक्या भेसूर रंगांत रंगाविलें कीं त्याज्यापुढें एकादा अस्सल कसाबहि फिका पडेल ! " बाईसाहेब, तुह्मीच विचार करा, छोटा ड्यूक या वेळीं येथें यावयास पाहिजे होता; पण तो

आला नाहीं. फार काय, पण तुमच्या पत्राला त्यानें नुसता जबाबहि दिला नाहीं. या राजघराण्यांतील बदमाषाची किंमत यावरूनच कळून येते. खरोखर असल्या मनुष्याला आणि त्याच्या घराण्याला तुह्मीं केवढीहि शिक्षा केली आणि केवढाहि दंड तुह्मीं त्याकडून भरून घेतला, तरी तो अपुराच होणार आहे. "

शिक्षेची कल्पना बाईसाहेबांच्या अगदीं पसंतीस उतरली असें दिसलें. केवळ स्वतःचा फायदा करून घ्यावा, ही माझी पहिली कल्पना त्यांना आवडली नव्हती. बाईसाहेब अभिमानी स्वभावाच्या असल्यामुळें ही शिक्षेची कल्पना त्यांच्या स्वाभिमानास पोषक अशी त्यांना वाटली. स्त्रीजातीचा—त्यांतून विशेषतः इंग्रज स्त्रीचा अभिमान खवळला झणजे, तो फार भयंकर होतो. बाईसाहेबांच्या अभिमानाला पोषक असें हें बोजारापण करून मी तावडतोब तेथून उठलों आणि घरीं आल्यानंतर प्रथम दोन पत्रें तयार कला. तीं तयार केलेलीं पत्रें ग्रँडडयूककडून आलेलीं नाहींत, असें म्हणण्याचें धाष्ट कोणींहि केलें नसतें. कारण त्या पत्रावर ग्रँडडयूक यांची सही व शिक्कामोर्तब वगैरे सर्व कांहीं यथायोग्य होतें. या पत्रात बाईसाहेबाच्या कर्जाची फेड करण्यास ग्रँडडयूक तयार आहेत, असा मजकूर होता. यानंतर दोन तीन दिवसानी पुन्हां मी बाईसाहेबांच्या घरीं गेलों आणि त्यांना तीं पत्रें मीं वांचून दाखविलीं. बाईसाहेब या वेळीं अगदीं विषण्ण होऊन बसल्या होत्या. वाटेल तो योग्य मार्ग स्वीकारण्यास त्यांनीं मला परवानगी दिली. तावडतोब मी ग्रँडडयूकच्या लंडन येथील ब्यांकेंत जाऊन सव्वादोन लाख रुपयांची मागणी केली. चार दिवसांनीं हे पैसे माझ्या हातीं आले. यानंतर पुढें सर्व कांहीं सुरळीत झाल. बाईसाहेबांकडील कागदांचें पुडकें घेऊन सव्वादान लक्ष रुपये मीं त्यांच्या स्वाधीन केले. आज बाईसाहेब मोठ्या चैनीनें साऱ्या युरोपभर फिरत असतात आणि ग्रँडडयूककडून मिळणाऱ्या वर्षासनावर त्यांचा योगक्षेम थाटांत चालला आहे.

सेव्हॉय हॉटेलमध्यें जाऊन स्ट्रॉबेरीचा फराळ त्या आतां करतात कीं

नाहीं, हें मला ठाऊक नाहीं; पण पूर्वी त्या तेथें गेल्यामुळें त्यांचें नाशिब खुललें हें मात्र मला पक्कें माहीत आहे.

बाईसाहेबांनीं पत्राचें पुडकें माझ्या स्वाधीन केलें, तेव्हां तें एका जाड पाकिटांत घालून तें पाकीट त्यांनीं मोहोरबद केलें, अर्थात् तीं पत्रें मला वाचावयाला मिळालीं नाहींत, यामुळें माझी मात्र एक प्रकारची निराशा झाली. पत्रांचें पुडकें माझ्या खिशांत पडल्याबरोबर मीं आपला लंडनचा मुक्काम हालविला व तावडतोब ग्रॅंडडचूक यांच्या गांवीं जाऊन तें पाकीट मीं स्वतः खुद्द त्यांच्याच हातीं दिलें. त्यांनीं तें उत्सुकतेनें माझ्या हातून घेऊन माझ्या समक्षच फोडलें. आंतील सर्व पत्रें बाहेर काढून तीं ते झटपट चाळूं लागले. त्या पत्रांकडे त्यांचे फारसें लक्ष होतें असें दिसले नाहीं; पण हें पुडकें चाळतांचाळता जेव्हां एक सरकारी कागदासारखा दिसणारा जाडसा कागद मध्येच बाहेर पडला, तेव्हां ह्याताऱ्याचा जीव एकदम थंड झाल्यासारखा दिसला. त्यांनीं एक लांबलचक सुस्कारा सोडला. स्वित्सरलडमध्यें जशा तऱ्हेच्या कागदावर लग्नाचे परवाने दिलेले असतात, तशा प्रकारचा तो कागद दिसत होता. तो कागद मला चागलासा पहावयाला मिळाला नाहीं, त्यामुळे तो अमक्याच एका स्वरूपाचा होता, असे मला निश्चितपणें सांगवत नाहीं; पण त्या कागदासंबंधीं दिसलेली ग्रॅंडडचूकची आतुरता, बाईसाहेबाच्या भाषणांतिल कांहीं संदिग्ध पण सूचक गोष्टी आणि अखेरीस खुद्द स्विटझर्लंडमध्यें माझ्या कानावर आलेली लोकवार्ता इत्यादि गोष्टींवरून यांत गुपचुप लग्नाचा प्रकार घडला असावा, याबद्दल मला तरी यत्किंचितहि शंका वाटत नाहीं.

माझी कामगिरी ग्रॅंडडयूसाहेबांस फार पसंत पडली असावी असें दिसलें. त्यानीं चार हजार रुपयांची बिदागी मला दिली, आणि याशिवाय थोड्याच दिवसांनीं एक हिऱ्याची आंगठी आणि सुंदर सोन्याचें घड्याळ व सांखळी अशा वस्तु मला मिळाल्या. घड्याळावर ग्रॅंडडचूकच्या राजघराण्याचा शिक्का असून त्या खालीं पुढील मजकूर आहे.

" आमच्या घराण्याचें महत्त्व राखल्याबद्दल ! "

प्रकरण सहावें.

मॉन्ट कार्लो येथील गुप्त खलबत

व्हियेन्ना येथील आपली कामागिरी संपवून मी नुकताच बर्लिनला परत आलों होतों. आपल्या कामागिरीचा रिपोर्ट सादर करून मिटलस्ट्रासीवरील आपल्या खोलींत येऊन मी स्वस्थ पडलों होतों. संध्याकाळीं कोठें तरी थोडी चैन मारावी, असे विचार माझ्या डोक्यांत घोळत होते. थोड्या वेळानें, जेवणाची वेळ झाली म्हणून मी उठण्याच्या तयारींत होतों, इतक्यांत एक सरकारी स्वार आमच्या दारासीं दत्त म्हणून उभा राहिला. त्याचे दर्शन झाल्याबरोबर संध्याकाळच्या चैनीच्या साऱ्या कल्पना माझ्या डोक्यांतून एकदम पळाल्या, हें निराळें सांगावयास नको. 'वुईलहेल्मस्ट्रासीमध्यें तुह्मांस एकदम हजर झालें पाहिजेच' असा निरोप त्या स्वाराने आणला होता. आमच्या वुइलहेल्मस्ट्रासीमधल्या यजमानांना सबुरी कशी ती ठाऊकच नाहीं. थोडासा सुद्धां खोळंबा झाला, तर तो त्यांना खपत नाहीं. त्यांचें बोलावणें आलें, म्हणजे कसलीहि सबब न सांगतां तुह्मी ताबडतोब हजर झालेंच पाहिजे. बोलावणें आल्यापासून वीस मिनिटांच्या अवधींत काउन्ट फॉं वेडेल यांच्या समोर मी हजर झालो. आणखी दहा मिनिटांनीं पुढील कामागिरीचे सारे हुकूम खिशांत घालून आमची स्वारी तेथून बाहेर पडली. कामागिरी काय सांगावयाची हें वुइलहेल्मस्ट्रासींतल्या लोकांनीं आगाऊच पक्कें ठरवून ठेवलेलें असतें. यामुळें त्यांचीं सारीं कामें बिनबोभाट व ताबडतोब पार पडत असतात. घरीं येतां येतां, फॉं वेडेल यांनीं सांगितलेल्या कामागिरीचा तपशील मनांतल्या मनांत मी चाळून पहात होतों. त्यांचें सारें भाषण मी पुनः स्वतःशीं बोलूं लागलों. "रात्रीच्या एक्सप्रेस गाडीनें तुह्मांला मॉन्ट कार्लोला गेलें पाहिजे. रिव्हियेराच्या प्रांतांत सध्यां रशियन, फ्रेंच आणि इंग्रज मुत्सदी फिरत आहेत. त्यांच्या हालचालीवर नजर ठेवून त्यांच्या भेटी वगैरे झाल्यास त्यांचा रिपोर्ट एकदम आह्मांकडे आला पाहिजे. जरूर

पडली, तर काउन्टेस चेचानी यांची मदत तुह्मांस मिळेल. या बाईच्या मदतीची आवश्यकता तुह्मांला भासली, तर माझ्या नांवाचें कार्ड त्यांना दाखवा."—त्यांनीं आपल्या नांवाचें कार्ड आपल्या सहीनिशीं माझ्याजवळ दिलें होतें—" या मुत्सद्यांच्या परस्पर भेटी होऊन त्यांचीं कांहीं संभाषणें झालीं, तर त्यांतला मुद्याचा भाग काय होता, याची माहिती तुह्मीं मिळविली पाहिजे. ही तुमच्या खर्चाची तजवीज. "—सुमारें सव्वादोन हजार रुपयांचा चेक काउन्टसाहेबांनीं माझ्या हातीं दिला होता—" आणखी कांहीं माहिती तुह्मांला पाहिजे ? "

काउन्टेस चेचानी यांस मीं पूर्वी कधींहि पाहिलेलें नसल्यामुळें त्यांजविषयीं अधिक माहिती काउन्ट वेडेल यांस मीं विचारिली. ताबडतोब घंटा वाजून काउन्ट यांनीं एका सेक्रेटरीला बोलाविले व त्याला कांहीं प्रश्न केला. तीन मिनिटांनी बाईचा फोटो आणि त्यांच्या सहीचा नमुना हीं माझ्या हातांत पडलीं. आता कांहीं अधिक माहितीची मला जरूर नसल्यामुळें काउन्टसाहेबास सलाम करून मी त्यांच्या ऑफिसांतून बाहेर पडलों.

काउन्ट यांनीं दिलेला चेक वटावून रोकड नाणे हातांत घेणें हें माझें पहिलें काम होतें. यानंतर मॉन्ट कार्लोला गेल्यावर तेथें कोणतें सोंग घ्यावयाचें हें मला ठरवावयाचे होतें. या खेपेला दक्षिण आफ्रिकेतला एक खाणीचा मालक हे सोंग माझ्या पसंतीस पडलें. खाणींच्या संबंधीं मला बरीचशी माहिती आहे. दक्षिण अफ्रिका आणि ट्रॅन्सवालचा प्रदेश यांत मीं बराच प्रवास केलेला असल्यामुळें त्या प्रदेशाची मला चांगली माहिती आहे. आपण ज्या सोंगाची बतावणी करणार, त्या सोंगाला लागणारा सर्व प्रकारचा साज आपल्यापाशीं जैय्यत तयार आहे कीं नाहीं, याचा विचार हेराने प्रथम केला पाहिजे. कारण केव्हांना केव्हां तरी खुद्द त्या धंद्यांत असलेल्या लोकांच्या गांठी पडतात आणि त्या धद्यांतल्या सर्व प्रकारच्या खुब्या हेराला ठाऊक नसल्या, तर त्याच्या फजितीस पारावार उरत नाहीं. याकरतां सोंगाची उत्तम बतावणी करण्याची हेराची तयारी असली पाहिजे. थोडेफार तरी खाणीवाले मॉन्टकार्लो येथें येणार हे मला अगोदरच ठाऊक होतें.

खाणीच्या शेअरचे भाव व खाणीसंबंधी इतर माहिती हीं ज्यांत येतात अशीं दक्षिण आफ्रिकेंतलीं एक दोन वर्तमानपत्रें विकत घेऊन मी घरीं आलों आणि या प्रवासास लागणारे कपडे व इतर सामानसुमान यांची बांधाबांधी मीं केली. मध्यरात्रीं निघणाऱ्या लॉईड एक्सप्रेस गाडींतून माझ्या प्रवासास सुरुवात झाली. मध्येंच एक चांगलीशी जागा बघून व तेथें आपल्या सामानाची सोय लावून एका गादीवर मीं लांब पाय केले आणि पुढील सर्व बेतांचा नकाशा मनांतल्या मनांत मी उठवूं लागलों. कामागिरी थोडी बहुत जडच होती. यांत अगदीं थोडें यश मिळावयाचें म्हटलें, तर काउन्ट वेडेल यांनीं सांगितलेल्या व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटीचा योग जुळून आणणें अवश्य होतें. ही गोष्ट मला साधारण कशी ? नुसता नमस्कारचमत्कार होण्याइतकी ओळख होण्याचा मुद्धां जेथें वानवा, तेथें प्रत्यक्ष भेटीचा योग कसला येणार ! ही गोष्ट मला जवळ जवळ अशक्यच वाटूं लागली.

ज्या तीन मुत्सद्यांवर मला नजर ठेवावयाची होती, त्यांचीं कल्पनाचित्रें आपल्या डोळ्यांपुढें उभीं करून त्यांना मी आपल्या मनांत चाळूं लागलों. राशियाचे प्रिन्स --यांजवर झाराची मोठी कृपा. फ्रान्सचे डेलकासा आणि इंग्लंडचे सर एडवर्ड ग्रे. रिव्हियेराच्या आणि सेव्हॉयच्या आजूबाजूला हे तीन मुत्सद्दी चक्राकार परिभ्रमण करीत होते. स्वतःच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं हे तिघेजण हवाफेर करीत आहेत, असा लोकांचा समज होता. कदाचित् या हवाफेराचें दुसरेंहि एकादें कारण असूं शकेल. कसेंहि असलें, तरी जर्मन बादशहाला या तिघांच्या प्रकृतीबद्दल फार काळजी लागली होती, ही गोष्ट मात्र खरी. एकाहून अधिक मुत्सद्दी एकाच ठिकाणीं हवाफेर करण्यासाठीं जमणे ही गोष्ट संशयोत्पादक असून तिचा अधिक छडा लावलाच पाहिजे, असें आमच्या सरकारास वाटलें. विशेषतः राजकीय उलाढाल्या विशेष काळजीच्या स्वरूपाच्या असल्या, ह्मणजे अशी चौकशी करण्यास तें आणखी एक कारण होतें. सन १९१० सालीं जर्मनीचें राजकीय वातावरण दाट धुक्यानें इतकें भरून गेलें होतें कीं, त्यांत शत्रु आणि मित्र या दोघांचीहि ओळख पटेनाशी झाली होती.

सर एडवर्ड ग्रे, यांजबद्दल मला कांहींच माहिती नव्हती. डेलकासी यांजबद्दल थोडीशी होती. रशियाचे प्रिन्स; ओहो ! यांची मला चांगली माहिती होती. हे गृहस्थ सुंदर चेहऱ्याला तावडतोब भाळणारे आहेत. चोहोंकडे पडलेल्या अंधारांत येथें मात्र एका प्रकाशाचा किरण मला दिसूं लागला. आमच्या काउन्टेस बाईचा येथें चांगलाच उपयोग करून घेतां येईल. त्यांच्या फोटोवरून पाहतां त्या फारच देखण्या असाव्या असें दिसलें; पण पुष्कळ वेळां फोटो आणि वस्तुस्थिति यांत जमीन अस्मानाचें अंतरहि असूं शकतें. हरकत नाहीं, पुढें पाहतां येईल.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं पांच वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं मॉन्ट कार्लो येथील हॉटेल मेट्रोपोलच्या एका खोलींत मीं आपला मुक्काम ठेवला. माझे स्नान झाल्यानंतर मीं थोडेसे उपाहाराचे पदार्थ खोलींत मागविले आणि हॉटेलच्या वाटाड्यास बोलावणें पाठविलें. हॉटेलमधले वाटाडे म्हणजे चालतेबोलते विश्वकोशच होत. त्यांना पुष्कळशा भाषा येत असतात. ते मोठे चवकस आणि बारीक नजरेचे असतात. ज्या गोष्टी त्यांच्या नजरेला येऊं नयेत, त्या हटकून बाहेर काढण्याची कला त्यांना चांगली अवगत असते; पण आपल्या तोंडाला कुलूप कसें लावावें हेंहि त्यांना पक्कें अवगत असतें. त्यांच्या तोंडाचें कुलूप काढणे ही सुद्धां एक मोठी विद्या आहे. त्यांचे हात ओले करून तें साधेल असें नाहीं. तुम्हीं त्यांना कितीहि पैसे चारले, तरी खऱ्या गोष्टींचा थांग ते तुम्हांला कधींच लागूं देणार नाहींत.

मॉन्ट कार्लो येथें काय भानगडी चालल्या आहेत, मोठ्या प्रकरणांतून कांहीं गुप्त प्रकार सुरू आहेत कीं काय, बाहेरचे कोण कोण बडे लोक आले आहेत आणि कांहीं नांवाजलेल्या नर्तकी, गाणारणी आणि जुवेबाज लोक वगैरे मॉन्टे कार्लो येथें आले आहेत किंवा काय, याची चवकशी मला करावयाची होती. तसेंच कांहीं बाहेर देशचे हेरहि येथें आहेत कीं काय, याचीहि चवकशी करण्यासाठीं मीं त्या वाटाड्याला बोलावलें. हा गृहस्थ जातीचा स्वीज होता. माझें बोलावणें गेल्याबरोबर तो दारांत येऊन उभा राहिला. मीं त्याला आंत बोलावून खुर्चीवर बसावयास सांगि-

तलें आणि मोठ्या प्रफुल्लित मुद्रेने एक उंची जातीची सिगारेट त्याच्या पुढें केली. ती तो आपल्या खिशात घालूं लागला, तेव्हां मीं त्याला एकदम म्हटलें.

" पेटवा, पेटवा. ती खिशात कशाला घालता ? मला अगदीं एकट्या एकट्यासारखें झालें आहे. माझ्याबरोबर गप्पा मारतां मारतां एकादा ग्लास घ्याल कीं नाहीं ? "

अशा रीतानें मीं सूतोवाच केलें. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या शुष्क गोष्टी झाल्यानंतर मी त्याला विचारलें, " येथें सध्यां कांहीं विशेष आहे कीं नाहीं ? "

हा प्रश्न विचारीत असतां मीं त्याच्याकडे काण्या डोळ्यानें पाहिलें. माझ्या या सलगीच्या वर्तनाने वाटाड्याची स्वारी बहुधा फार खुष झाली असावी. एकादें गुपीत सागण्यास मी योग्य मनुष्य आहें, असें त्याला वाटलें. माझा कार्यभाग चांगलाच सिद्धीस गेला.

तो हळूच म्हणाला, " ग्रँड हॉटेल दि लॉडर्समध्यें एक शिष्ट उतरले आहेत. "

मीं त्याला आणखी एक विडी दिली व त्याचा रिकामा झालेला ग्लास पुनः भरला.

" हॉटेलच्या नोंदबुकांत या शिष्टानें आपलें नांव काउन्ट टेचलो असें लाविलें आहे; पण माझ्यासारखा अशानें थोडाच फसणार ! अहो, तो खरोखर कोण, हें मी तुम्हांला सांगूं का ? तो रशियाचा प्रिन्स—"

" हा प्रिन्स येथें काय करतो आहे ? मला वाटतें, तो खूपसा जुगार खेळत असावा. " (तो जुगार खेळत नव्हता हें मला माहीत होतेंच.)

" छे ! छे ! तो उगीच इकडे तिकडे भटकून दिवस काढीत आहे. "

" बरोबर कुटुंब वगैरे आहे कीं नाहीं ? "

वाटाड्यानें नकारार्थी मान हालविली. या बातमीनें माझा मार्ग थोडासा अधिकच सुकर होणार, याबद्दल मला आनंद वाटला. यानंतर आणखीहि थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यानंतर त्या वाटाड्याला मीं

रजा दिली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं काउन्टेस चेचानी यांजकडे जाण्याचा बेत मीं केला.

काउन्टेस या हॉटेल लूव्हरमध्यें रहात असल्याची माहिती काउन्ट वेडेल यांजकडून मला मिळाली होती. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं त्या हॉटेलांत जाऊन मीं आपल्या नांवाचें कार्ड बाईसाहेबांकडे पाठविले. या कार्डावर एच. व्हॅन ह्यूट, डूर्नक्लूफ, ट्रान्सव्हाल, असें नांव व पत्ता दिला होता. डूर्नक्लूफ गांवीं मी पूर्वी गेलों होतों, हें वाचकांना अवगत आहेच. या कार्डाबरोबर काउन्ट वेडेल यांच्या सहीचें कार्डहि मीं आंत पाठविलें होतें. थोडा वेळ बाहेर थांबल्यानंतर काउन्टेस यांजकडून मला बोलावणें आलें आणि मी त्यांच्या खोलींत गेलों. काउन्टेस यांनीं साधाच, पण मोहक पोषाख केला होता. काउन्टेस स्वरूपानें सुंदर असाव्यात असा तर्क फोटोवरून मीं पूर्वीच बांधला होता; पण प्रत्यक्ष पाहिलें तों काय ! रम्भामेनकादि अप्सरांची ही एक मूसच ओतली आहे कीं काय, असा मला भास झाला. जगांतलें सारें सौंदर्य येथें जणूं काय एकवटलें आहे, असें मला वाटलें. एकाद्या कोमल वेलीप्रमाणें उंच व नाजूक शरीरयष्टि, झोंकदार बांधा, सुंदर नीलवर्ण डोळे, भ्रमरपंक्ती-सारखा नीलकृष्णवर्ण कुरळा केशभार, सज्ज केलेल्या मदनचापासारखे भासणारे आरक्तवर्ण ओंठ, अशी सौंदर्यसंपत्ति एकवटलेली पाहून मी तर आश्चर्यानें थक्क होऊन जागच्या जागींच उभा राहिलों; पण जाऊं द्या. अधिक वर्णन करून माझ्या वाचकांना उगीच भांबावून टाकण्यांत काय फायदा ? माझ्या या कामगिरीनंतर काउन्टेस यांची व माझी पुन्हा दृष्टि-भेट देखील झाली नाहीं.

काउन्टेसचा जन्म एका उच्च हंगेरियन सरदार घराण्यांत झाला होता व त्यांच्या विवाहानें हंगारींतल्या दुसऱ्या एका प्रतिष्ठित सरदार घरा-ण्याशीं त्यांचा संबंध जडला होता, ही गोष्ट अगोदर मला माहीत होती. मला हाक मारून त्यांनीं एका खुर्चीकडे बोट केलें. त्यांच्या बोटांत कित्येक रत्नमुद्रिका झळकत होत्या व नुकतीच पेटविलेली एक नाजूक सिगारेटहि त्यांच्या हातांत होती.

" या, ट्रान्सव्हालचे व्हॅन ह्यूट. ती खुर्ची घ्या. " हें वाक्य बोलत असतां काउन्टेस या लबाडीनें मजकडे पहात होत्या.

आम्ही दोघेंहि एकदम मोठ्यानें हांसत सुटलों. मी खरोखर कोण आहें याबद्दल त्यांना शंका नव्हतीच. काउन्ट वेडेल यांच्या कार्डावरून ही माहिती त्यांना अगोदरच मिळालेली होती; पण यापुढें जे आणखी कांहीं शब्द त्या बोलल्या त्यावरून त्यांना आणखीहि बरीच माहिती असावी, असें मला उघड दिसून आलें.

" डॉक्टरसाहेब, माझा पाय जरा मुरगळला आहे, त्याला कांहीं औषध देतां का ? तुमच्यानें कांहीं इलाज होण्यासारखा असला तर करा. " एवढें वाक्य बोलून त्या चेष्टेनें हासूं लागल्या.

माझ्या चेहऱ्यावर मेषपात्रपणाची कशी कळा आली असेल, याची वाचकांनींच कल्पना केलेली बरी. खरोखर मी अगदीं स्तंभित होऊन गेलों. काउन्टेस यांचें व माझें साऱ्या जन्मांत हे पहिलें दर्शन. मी डॉक्टर आहें, ही गोष्ट आमच्या खात्यांत फक्त एकदोघांनाच माहीत होती. याशिवाय आमच्या खात्यातल्या नौकरानीं परस्परांच्या खाजगी गोष्टी परस्परांस कळवूं नयेत असाहि कडक नियम होता. असें असतां बाईसाहेबाना ही इतकी माहिती कोठून मिळाली ? मला खरोखर तिचा थोडासा रागच आला. माझ्याहून अधिक माहिती असलेल्या मनुष्याचा, विशेषतः अशा एकाद्या स्त्रीचा, मला खरोखरच फार राग येतो. कारण अशा स्थितींत आपल्या पाण्याची खोली किती आहे, याचा अजमास आपणास सांपडत नाहीं. काउन्टेसला ही माहिती कशी मिळाली, हें जाणण्याची फारशी उत्सुकता मीं दर्शविली नाहीं; पण त्यांजकडून ही माहिती काढण्याचा मीं मनांतल्यामनांत निश्चय मात्र केला. मीं शांतपणें म्हटलें, " काउन्टेस, तुह्मीं आमच्यावर मात केली, ही गोष्ट आह्मांला कबूल आहे; पण माझी कांहीं मदत तुह्मांला होण्याजोगी असली, तर तुमच्या सेवेला मी हजर आहें. "

" जाऊं द्या हो, असे चिडता कां ? तुह्मी चांगल्या रीतीनें वागलां, तर पुढेंमागें तुह्मांला मी सारें कांहीं सांगेन. "

पण बाईसाहेबांनीं मला कधींच कांहीं सांगितलें नाहीं. काउन्टेसच्या सामान्य वागणुकींतहि पराकाष्ठेची चतुराई मला दिसून आली; पण त्यांच्या चालीरीती कितीहि मोहक असल्या, तरी त्या इतक्या आंतल्या गांठीच्या होत्या कीं, त्याच्या अंतःकरणाचा ठाव कोणासहि लागणे शक्य नव्हते. यानंतर बाईसाहेबांची कांहीं आणखी थोडी माहिती करून घेण्याच्या इच्छेनें आणखी थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारून शेवटी मी मुद्यावर येऊन पोहोंचलों, " काउन्टेस, माझी कामगिरी काय आहे, हे तुह्मांला ठाऊक आहे का ? " " मुळींच नाहीं. तुह्मी इकडे येणार व जरूर पडल्यास मीं तुह्मांला मदत करावी, इतकीच माहिती हुकुमावरून मला मिळाली आहे; तेव्हां आतां माझी मदत तुह्मांला कोणत्या कामांत हवी, हे तुह्मीच मला सांगा. "

माझ्या कामगिरीचे स्वरूप काउन्टेसला मी थोडक्यांत निवेदन केले; तथापि असे करतांना सुद्धा मीं आपल्या मनाचा पुरा ठाव त्यांना दिला नव्हता. आपल्या बेताचे सारे गांठोडे कोणाच्याहि हवालीं करू नये, अशी माझी नेहमींचीच पद्धत आहे. विशेषतः स्त्रियाच्या संबधीं तर अशी काळजी घेणें अधिकच जरूर असतें. यानंतर आमच्या कामागिरीला आरंभ कोठून करावयाचा, याचा विचार आम्हीं केला. रशियाचे प्रिन्स—यांची प्रथम ओळख करून घेतली पाहिजे, असें मीं सुचविलें. प्रिन्ससाहेबांची स्वारी हॉटेल लॉन्ड्रेसमध्ये रहात असल्यामुळें आम्हीं दोघांनींहि संध्याकाळीं तेथे भोजनास जाण्याचा बेत केला. नतर एक पेला चाकोलेट घेऊन मी काउन्टेसच्या खोलींतून बाहेर पडलों. घरीं येतांना मुद्दाम मी लँड्रेस हॉटेलमध्यें गेलों आणि तेथें थोडीशी ' युक्ति ' लढवून एका विशिष्ट जागेंतलें टेबल संध्याकाळच्या भोजनाकरतां मीं राखून ठेवले. नंतर सायकाळचा उंची पोषाख परिधान करून व फ्रेंच गुलाब पुष्पांचा गुच्छ हातात घेऊन मी पुनः काउन्टेसकडे गेलों.

गुलाब पुष्पें काउन्टेसकडे पाठवून देऊन त्यांच्या आगमनाची वाट पहात, मी दिवाणखान्यांत बसलों. ' मी लवकर येतें ' असा निरोप काउन्टेसकडून मला मिळाला; पण माझ्या तीन सिगारेट ओढून झाल्या,

तरी काउन्टेसचा पत्ता नाहीं, हें पाहून मला फार राग आला. कसल्याहि कामात दिरगाई न करणारी स्त्री मला तरी अद्यापि एकहि भेटली नाहीं. शेवटीं रेशमी वस्त्रांच्या घर्षणाचा मजुळ ध्वनि माझ्या कर्णपथावर येऊन आदळला आणि मी वर पहातों, तो बाईसाहेब माझ्यापुढें उभ्या! त्यांनीं उंची रेशमी वस्त्रे परिधान केलीं असून त्यांच्या मनगटावर व गळ्याभोंवतीं रत्नांचे सुंदर अलकार झळकत होते. बाईसाहेबांचें सौंदर्य खरोखर अनुपम होतें, यांत शंका नाहीं. त्यांचे सौंदर्य अमुक एका विशिष्ट प्रकारचे होतें असे ठरवितां येत नसलें, तरी कोणाहि पाहणाराच्या चित्ताला ताबडतोब मोह पडावा, असें तें होतें, यांत मात्र शंका नाहीं.

माझ्या जवळ येऊन व लीलेनें आपला हात माझ्या खांद्यावर टाकून काउन्टेस मला ह्मणाल्या, " वाट पाहून पाहून थकलां असाल नाहीं ? पण तुमच्या श्रमाचा मोबदला ह्मणून तुमचीं हीं गुलाबाचीं फुले मीं अंगावर घातलीं आहेत. "

बाईसाहेबानीं तो सुंदर पुष्पगुच्छ छातीवर लटकावून दिला होता. ताबडतोब आह्मी गाडींत बसून लॉड्रेस हॉटेलकडे जाण्यास निघालों. आजच्या सोंगाची बतावणी कशी करावयाची याचा बेत, आह्मी गाडींत करीत होतों. या रशियन अस्वलाला वेसण घालतां येईल कीं नाहीं, याबद्दल माझें मन बुचकळ्यात पडले होतें. थोड्या वेळानें आह्मी हॉटेलांत येऊन दाखल झालों. हॉटेल माणसांनीं बहुतेक अगदीं भरून गेलें होतें, असें मला आढळून आले. बहुतेक महत्त्वाचीं ह्मणून समजलीं जाणारीं माणसें तेथें त्या वेळीं जमलीं होतीं. कित्येक नांवाजलेल्या अमेरिकन स्त्रिया त्या दिवशीं तेथें मला आढळल्या. पिक्याडेली सरकस, केरो येथील शेपर्ड हॉटेल आणि मॉन्ट कार्लो या तीन जागा अशा आहेत कीं, जगांतील प्रत्येक नांवाजलेली व्यक्ति येथे केव्हाना केव्हां तरी भेटायचीच.

मीं आगाऊ योजलेल्या ' युक्ती ' प्रमाणें हॉटेलचा म्यानेजर धांवतच सामोरा आला व मोठ्या आदबीनें लवून सलाम करून आमच्या योजलेल्या टेबलाकडे आह्मास घेऊन गेला. आमचें टेबल सुंदर व किंमतवान फ्रेंच गुलाबांनीं सुशोभित केलें होतें. (सरकारी खर्चानें.) हा गुलाब

काउन्टेसला फार प्रिय होता. हळू हळू लीलेनें इकडे तिकडे पहात पहात आह्मी आपल्या टेबलाकडे जात असतां अनेक नेत्रांच्या जोड्या आह्मांकडे रोंखल्या गेल्या होत्या. त्यांजकडे आपलें लक्ष नाहीं, असें दर्शवीत काउन्टेसची स्वारी टेबलाकडे गेली. खरोखर त्या साऱ्या समूहांत काउन्टेसच्या जोडीस बसण्यासारखें सौंदर्य दुसऱ्या कोठेंहि व्यक्त होत नव्हतें, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

आम्ही आपल्या टेबलावर जाऊन बसलों, तेव्हां आमच्या अजुबाजूस शांततेचें साम्राज्य थोडा वेळ पसरलें. थोड्या वेळानें अस्फुट ध्वनि कर्ण-गोचर होऊं लागले. आमच्या उजव्या बाजूच्या टेबलाशेजारीं प्रिन्स-बसले होते. आमचें पाऊल आंत पडल्यापासूनच प्रिन्सची नजर काउन्टेसकडे एकसारखी लागलेली होती. मींहि बारीक नजरेनें प्रिन्सच्या हालचालीवर देखरेख ठेवली होती. एकाएकीं प्रिन्स आपल्या जागेवरून उठले व आपल्या सोबत्यांपैकीं एकाला आपल्या खुर्चीवर बसवून ते स्वतः त्याच्या खुर्चीवर जाऊन बसले. या खुर्च्यांच्या अदलाबदलींत काय हेतु होता, हें चटकन् माझ्या ध्यानांत आलें. नव्या जागेवरून काउन्टेसचा चेहरा प्रिन्सला अधिक चांगल्या प्रकारें दिसण्यासारखा होता. आपला चष्मा चढवून ते काउन्टेसकडे एकसारखी टक लावून बसले.

अर्थातच त्यांच्या या वर्तनापासून मला मनांतल्या मनांत फार आनंद झाला. या बड्या माशाच्या घशांत आमचा गळ खास अडकणार असें मला वाटलें; तथापि थोडासा अधिक गवगवा करण्याच्या हेतूनें मीं एक युक्ति योजली. त्या दिवशीं तेथें जाण्यांत आह्मां दोघांचा कांहीं गुप्तवेत आहे, असें कोणाच्या लक्षांत येऊं नये, असें करणें मला अवश्य वाटलें. प्रिन्स अगदीं वेडावून जाण्याच्या रंगांत आला होता, ही गोष्ट साऱ्यांच्याच ध्यानात येऊन चुकली होती. ते इतके बेहोष झाले होते कीं, सामान्य लौकिक चालीरीतीसुद्धां ते आता विसरले होते. त्यांच्या त्या टक लावून पाहण्यामुळें साऱ्या समूहाचें लक्ष त्यांच्याकडे वेधलें होतें.

मी अशाच संधीची वाट पहात होतों. हॉटेलच्या म्यानेजरास हांक मारून व सर्वांस ऐकूं जाईल असा आवाजाचा सूर चढवून मीं त्याला

म्हटलें, " आमच्या उजव्या बाजूच्या सद्गृहस्थांस इतकी टक न लावण्याविषयीं जरा विनंति करा. "

माझें भाषण प्रिन्सनीं ऐकल्याचें दिसलें. त्यांचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. ते एकदम आपल्या जागेवरून उठले आणि काउन्टेस यांस सलाम करून तेथून एकदम बाहेर चालते झाले. ही गोष्ट अगदीं माझ्या मनाजोगी घडली.

आमच्या ताटात वाढलेल्या मिष्ट पदार्थांवर यथेच्छ हात मारून काफी घेण्याकरता आम्ही बागेत आलों. काफी पिऊन झाल्यावर मीं एक उंची सिगारेट पेटविली, आणि हळू हळू धुराचे फूत्कार सोडीत प्रिन्स येण्याची वाट पहात बसलो. ते आमच्या मागोमाग येणार, याबद्दल मला शंका नव्हतीच. आमच्या अजूबाजूला अनेक दर्जाचे आणि अनेक परिस्थितींतले लोक इकडून तिकडे हिंडत होते. या बाजूला एकादा राजवंशीय पुरुष, तर दुसऱ्या बाजूला प्रामिसरी नोटांच्या सट्ट्यांत पैसे मिळवून गबर झालेला एकादा लक्षाधीश हिंडत होता. ती पहा, इकडे एक स्त्री येत आहे. तिच्या खाजगी वर्तणुकीकडे पाहण्याचें आपणास प्रयोजन नाहीं. तिनें निदान अर्धा डझन देशांत मोठा लौकिक मिळविला आहे. आणखी पलीकडच्या बाजूस कांहीं नर्तकी दिसत आहेत, आणि दुसऱ्या एका बाजूस कांहीं प्रसिद्ध मुत्सद्दीहि फिरत आहेत. जगांतले मनुष्य जातीचे सारे नमुने जणूं काय येथें एकवटले गेले होते. यांपैकीं पुष्कळांचीं पूर्वचरित्रें जर लोकांच्या नजरेस आलीं, तर किती तरी गंमत होईल ! आड पडद्यांतल्या गोष्टी जाणण्याचा माझा धंदाच असल्यामुळें मला यांपैकीं पुष्कळांचीं चरित्रें ठाऊक होतीं. या बाहेर दिसणाऱ्या भपक्याच्या आंत बरेचसे नुसते हाडांचे सांगाडे आहेत, ही गोष्ट या वेळीं मला एकाएकीं आठवली. पडद्याच्या पलीकडे पाहण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें आपणास दिलें नाहीं, यांत त्याचें खरोखर अपार चातुर्य दिसून येतें. फार लांब कशाला, माझ्या चेहऱ्यावरचा पडदा दूर करण्याची जशी मला छाती नव्हती, तशीच माझ्या समोर बसलेल्या बाईसाहेबांसहि पण नव्हती.

एकाएकीं प्रिन्सच्या स्नेह्यांपैकीं एक मजजवळ आला आणि प्रिन्सचें कार्ड माझ्या हातांत देऊन मला म्हणाला, " मॉंशर, प्रिन्सच्या वर्तणुकीपासून बाईसाहेबांना अथवा तुम्हांला काहीं त्रास झाला असला, तर त्याबद्दल त्यांना फार दुःख होत आहे. बाईसाहेबांची क्षमा मागण्यास स्वतः यावें अशी प्रिन्सची फार इच्छा आहे. या गोष्टीला [illegible] परवानगी आहे काय ? "

" बाईसाहेब स्वतःच मुखत्यार असल्यामुळें याबद्दल खुद्द त्यांनाच आपण विचारा. माझ्या स्वतःबद्दल म्हणाल, तर मजकडून काहीं हरकत नाहीं. "

काउन्टेस यांनीं संमतिदर्शक मान मात्र हलविली. प्रिन्सच्या या वकिलाने बाईसाहेबांस नमन केलें आणि तो तेथून चालता झाला.

थोड्याच वेळात तो गृहस्थ प्रिन्स यांस बरोबर घेऊन पुनः परत आला. यानंतर परस्पर ओळख करून देण्याचा विधि होऊन आम्ही सर्व एकत्र बोलत बसलों; तथापि प्रिन्स मात्र बाईसाहेबांशिवाय दुसऱ्या कोणाशीं फारसें बोलले नाहींत. अशा रीतीने गप्पांत सुमारे अर्धा तास गेल्यानंतर आम्हीं थोडासा उपहार मागविला. दुसऱ्या दिवशीं प्रिन्स यानीं मला व काउन्टेस यांना आग्रहाचें भोजनाचें निमंत्रण दिलें !

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं लॉड्रेस हॉटेलमध्यें आमचें सहभोजन झालें. प्रिन्स यांनीं आपल्या दर्जास शोभेशी भोजनाची तयारीहि अपूर्व ठेवली होती. या भोजनाला मला आमंत्रण आल्यामुळें मी गेलों होतो. भोजनानंतर नाटकाला जाण्याची तयारी झाली. नाटकाला मला निमंत्रण नव्हतें. आणखी एका सध्याकाळच्या जेवणाला काउन्टेस याना निमंत्रण आलें. या वेळींहि मला बोलावणें नव्हतें. दुसऱ्या दिवशीं बागेंत हिंडतां हिंडतां प्रिन्स यांची व माझी जेव्हां जेव्हां गांठ पडे तेव्हां माझी कसल्याहि प्रकारची ओळख न दाखवितां ते आपला राजकीय थाटाचा एक कटाक्ष मात्र मजवर फेंकून पुढें चालते होत. या त्यांच्या वर्तणुकीपासून मला मात्र मनांतल्या मनांत आनंद होत होता, हें सांगावयास नकोच. प्रिन्स काउन्टेसच्या कह्यांत पूर्णपणें गेला होता.

दिवसेंदिवस काउन्टेसच्या नादाने प्रिन्स अगदीं पागल बनत चालला आहे, हें मी दुरून दुरून पहात होतों. प्रिन्स व काउन्टेस या जोडीने नित्य गाडींत बसून फिरावयास जावें आणि रात्रीं नाटके पहावींत असा क्रम कित्येक दिवस चालू होता. प्रिन्स उदार हातानें बहुमोल देणग्यांचा वर्षाव काउन्टेसवर करीत होते. अशा रीतीने आमची कालक्रमणा चालू असतां डेलकासी हे नाइस शहरीं गेले असल्याची बातमी मला लागली. प्रिन्सवर काउन्टेसचा पहारा असल्यामुळें डेलकासीच्या मागें लागण्यास मला सवड मिळाली. याच वेळीं इंग्लंडांतून सर एडवर्ड ग्रे किंवा वुइन्स्टन चर्चिल यांपैकीं कोणी तरी, नाइस शहरीं येणार होते. डेलकासी व इंग्रज मुत्सद्दी यांच्यामध्यें कांहीं बोलणें चालणें होते कीं काय याची माहिती मला मिळवावयाची होती. नाइस शहरचें खलबत संपल्यानंतर प्रिन्सबरोबर त्यांचें खलबत होईल, असें मीं ताडलें होतें. नाइस शहरीं येऊन डेलकासी यांच्या हालचालीवर मीं सक्त नजर ठेवली होती; पण विशेष महत्त्वाचें असें कांहींच घडलें नाहीं. हाऊस ऑफ कामन्समध्यें कांहीं विशेष भानगड उत्पन्न झाल्यामुळें सर एडवर्ड किंवा चर्चिल यांपैकीं कोणी येऊं शकले नाहींत. यामुळे त्यांनीं आपल्यातर्फे एका गृहस्थास पाठवून त्याजबरोबर डेलकासी यांस ठेवण्यासाठीं कांहीं महत्त्वाचे दस्तऐवज मात्र दिले होते. पुढें प्रिन्स व डेलकासी यांची गांठ पडली, तेव्हां या दस्तऐवजांपैकीं एकांतील मजकूर आह्मांस कळला.

तारीख ९ नवंबर रोजीं रात्रीं काउन्टेसकडून एक तार मला आली. ती माझ्या हॉटेलांत मला मिळाली. ती उघडून पाहतां तींत पुढील मजकूर मला आढळला.

" परत या. डी क्यांप येथें आले. आपल्या मित्राची भेट घेणार. "

डी क्यांप म्हणजे डेलकासी हें माझ्या ध्यानांत आलें. नाइस शहर सोडून डेलकासी तिकडे केव्हां गेले, हें मला समजलें नाहीं. काउन्टेसच्या तारेंत 'आपला मित्र' असे शब्द होते, त्यांचा अर्थ प्रिन्स हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. क्षणाचाहि विलंब न लावतां एक भाड्याची मोटार करून मी ताबडतोबीनें मॉन्ट कार्लो येथें गेलों. पहांटे तीन वाज-

ण्याच्या सुमारास मी मॉन्ट कार्लो येथील माझ्या हॉटेलच्या खोलींत गेलों, तों काउन्टेसची दासी माझ्या येण्याची वाट पाहत बसली होती, असें मला आढळून आलें. डेलकासी व प्रिन्स यांजमध्यें झालेल्या भाषणाचा थोडासा महत्त्वाचा भाग या दासीनें मला सांगितला. काउन्टेस यांनीं सकाळीं दहा वाजतां एका बागेंत नेमलेल्या ठिकाणीं माझी भेट घ्यावी असा निरोप त्यांना पोंचविण्यास सांगून त्या दासीला मीं रजा दिली. ज्या बागेचें नांव मीं कळविलें होतें, तींत पुष्कळ लोकांची नेहमीं गर्दी असल्यामुळें तें ठिकाण गुप्त भेट घेण्यास योग्य असें आहे, असें कोणाच्याहि मनांत आलें नसतें. याकरतांच ही जागा मीं पसंत केली होती.

ठरल्याप्रमाणें काउन्टेस यांनीं माझी भेट घेतली आणि डेलकासी व प्रिन्स यांच्या भाषणांतील बराचसा मजकूर त्यांनीं मला सांगितला. आपलें पूर्वीचें हॉटेल सोडून काउन्टेस हॉटेल लॉड्रेसमध्ये राहवयास गेल्या होत्या. त्यांची खोली प्रिन्सच्या खोलीशेजारींच असल्यामुळें प्रिन्सच्या खोलींत होणारें संभाषण आपल्या कानीं पडावें अशी युक्ति त्यांना योजतां आली. या भाषणांतील कांहीं कांहीं भाग काउन्टेसच्या कानीं न येणें स्वाभाविकच होतें. तथापि जो कांहीं भाग त्यांच्या कानीं आला, तो मात्र अत्यंत महत्त्वाचा होता, यांत शंका नाहीं.

इंग्लंडच्या संमतीनें फ्रान्स आणि रशिया यांजमध्यें विशेष एकोपा होण्याचे घाटत आहे, असें या बातमीवरून मला उघड दिसून आलें. प्रिन्स आणि डेलकासी यांची आणखी एक भेट त्याच दिवशीं संध्याकाळी पांच वाजतां होणार आहे, अशी बातमी काउन्टेस यानीं मला दिली. या दुसऱ्या भेटीच्या वेळीं होणाऱ्या भाषणांतील सर्व मुद्दे आह्माला कळणे अगत्याचें असल्यामुळें तशी खटपट करण्यास मीं काउन्टेस यांस बजावले. यानंतर संध्याकाळीं सात वाजतां काउन्टेस यांनीं मला त्याच बागेंत त्याच जागीं भेटावें असें ठरवून मी घरीं परत आलों.

घरीं आल्यानंतर मीं हॉटेलचे पैसे चुकते केले आणि सर्व सामानसुमान स्टेशनावर पाठवून मिलनचें (इटली) एक तिकीट घेऊन

ठेवलें. प्रसंगीं एकदम पळून जाण्याची वेळ आली, तर एकाद्या मित्र-राष्ट्रांत चटकन् निघून जाण्याची तयारी आगाऊ करणें, हें नेहमींच इष्ट असतें. या प्रसंगीं अगदीं जवळचें मित्रराष्ट्र इटली हेंच होतें. कदाचित् कांहीं भानगड उपस्थित झाली असती, तर, फ्रान्स देश ओलांडून जाणें शक्यच नव्हतें. जवळचा स्वित्सरलंड देश स्वतंत्र आहे, तरी सरकारी-रीत्या मला तेथें अडकवून ठेवण्यास तेथील सरकारनें कमी केलें नसते. आतां आपल्या देशांत आलेल्या परदेशस्थ राजकीय गुन्हेगारास ते त्या परदेशाच्या सरकारच्या ताब्यांत देत नाहींत ही गोष्ट खरी; तथापि तेथे अडकून राहणें हें सुद्धां अनिष्टच होतें; पण इटलींत पाय ठेवल्यावर माझ्या सुरक्षितपणाबद्दल प्रश्नच नव्हता. जर्मनींतून थोडीशी सूचना मेळतांक्षणींच इटलींतून मला रोडून देण्यांत आले असतें, याबद्दल मला शंका नव्हती. मिलनचें तिकीट मीं यासाठीं घेतलें होतें.

संध्याकाळीं सात वाजेपर्यंत गांवांत इकडे तिकडे भटकून मीं कसा तसा वेळ काढला आणि नेमलेल्या वेळीं नेमलेल्या ठिकाणीं जाऊन मीं काउन्टेसच्या आगमनाची वाट पाहत बसलो. वेळ अतिशय कंटाळवाणा वाटूं लागला. तासामागें तास जाऊ लागले, तरी काउन्टेस येण्याचीं चिन्हे दिसेनांत. कर्मण्यकीसाठीं विड्या ओढता ओढतां मी थकून गेलो. अनेक प्रकारच्या कुशंका माझ्या मनांत येऊ लागल्या. अशा गोष्टींत एकादी लहानशी अडचणसुद्धां पर्वतप्राय भासूं लागते.

मी एकाच जागीं फार वेळ बसून राहिल्यामुळे एकाद्याला माझ्याबद्दल शंका येण्याचा संभव होता. अशी शंका येऊं नये म्हणून जवळच बसलेल्या एका लठ्ठ स्त्रीबरोबर मी गप्पा मारूं लागलो. तिनेंहि मजकडे वांकड्या डोळ्यानें पाहून हंसण्यास सुरुवात केली. आह्मा उभयतांमध्यें होत असलेले हे संकेत बऱ्याच लोकांच्या लक्षांत आले. विशेषतः जवळचा पहारेकरी आह्मांकडे पाहून हंसू लागला. माझ्या दृष्टीनें हे फार वांगलें झालें. कारण कोणी मनुष्य एकाच जागीं फार वेळ कामाशिवाय बसून राहिला, तर तो कोणीतरी गुप्त खलबतें करणारा असावा, अशी शंका साहाजिकच उद्भवते.

माझें लक्ष साहजिकच बागेच्या फाटकाकडे गेलें. तों काउन्टेसची दासी मला खुणेनें बोलावीत आहे, असें मला दिसलें. जवळच्या प्रियपात्राची रजाहि न घेतां मी एकदम फाटकाकडे धांवत सुटलो. दहा उड्यांत मी त्या दासीजवळ गेलो आणि तिला म्हटलें, " कांहीं विशेष खबर आणली आहेस काय ? "

" नाहीं. पण बाईसाहेबांना तुमची भेट घेणें जरूर आहे. कोठे भेटाल, ते त्यांनीं विचारलें आहे.

काउन्टेसची योजना फारच चातुर्याची होती आणि ती माझ्या फारच पसंतीस पडली. स्टेशनजवळील एका काफीपानगृहांत काउन्टेस यांना येण्यास सांगून मीं चटकन् एका गाडींत उडी मारली आणि त्या काफी गृहाचा रस्ता धरला. थोड्याच वेळाने काउन्टेसबाईंची स्वारीहि तेथें आली. माझ्या जवळील एका खुर्चीवर त्या बसल्या आणि मला एक गुलाबाचें फूल देण्याच्या मिषाने त्यानीं चटकन् एक कागदाचें पुडके माझ्या हातीं दिलें. नंतर त्या हळूच म्हणाल्या, " मला मिळालेली बातमी इतकीच, पण ती तुमच्या कामागिरीला पुरेशी आहे. मी उद्यां रात्रीं रोमला जाईन. सलाम. "

मीं खिशांतून घड्याळ काढून पाहिलें, तों मिलनची गाडी निघण्यास अगदीं थोडा अवकाश होता, असें मला दिसून आलें. ताबडतोब स्टेशनावर येऊन मी गाडींत बसलों. गाडी चालू झाल्यावर काउन्टेसनीं दिलेले कागद बाहेर काढून मीं ते वाचून पाहिले. नोटपेपरच्या आकाराचे ते दोन तुकडे असून त्यांजवर राजघराण्याच्या मोर्तबाचा उठाव छापलेला होता. त्यांत कांहीं तुटक वाक्यें लिहिलेलीं असून कांहीं तारखांचे आंकडे आणि कांहीं नावेंहि लिहिलेलीं होतीं. हा सर्व मजकूर प्रिन्स—आणि डेलकासी यांनीं खुद्द स्वहस्तेंच लिहिलेला होता. फ्रान्सचे प्रेसिडेंट आणि रशियाचे झार यांजमध्यें गुप्त भेट होण्याचें ठरलें असून ती भेट कोठें व्हावी, व त्या प्रसंगीं कोणत्या मुत्सद्यांनीं हजार रहावें याचा खुलासा या कागदांवरून व काउन्टेसनें ऐकलेल्या त्या दोघां मुत्सद्यांच्या भाषणावरून मला सहज करतां आला. क्रोन्स्टाड बंदरांत झारच्या स्टांडार्ट नांवाच्या

नौकेवर ही भेट होणार होती; पण ही भेट होण्याची वेळच आली नाहीं. ती होण्याच्या पूर्वीच केसर यांनीं मोरोको प्रकरण अचानकपणें हातघाईस आणल्यामुळें ही भेट मागें पडली.

मिलनहून मी ताबडतोब बर्लिन येथें गेलों आणि अठ्ठेचाळीस तासांच्या आंत ते कागदपत्र काउन्ट फाँ वेडेल यांच्या स्वाधीन मीं केले. त्यांजकडून ते केसरच्या हातांत ताबडतोब गेले असले पाहिजेत हें उघडच आहे. माझ्या या कामगिरीचा एकंदर मुद्दा असा.

मोरोको प्रकरण हातघाईस येऊं पहात होतें. सामदामाने अथवा दंड-भेदाने त्याचा निकाल जर्मनीस लवकरच लावावा लागणार, अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. या कामगिरीवर माझी नेमणूक होण्यापूर्वी पुष्कळशा गोष्टी स्पष्ट झालेल्या नव्हत्या. फ्रान्स, रशिया, आणि इंग्लंड, यांचें मेतकुट आहे कीं काय, याबद्दल केसरच्या मनांत प्रबळ शंका होती. फ्रान्सबरोबर युद्धाचा प्रसंग आल्यास कोणतीं राष्ट्रें तटस्थ राहतील याचा अजमास जर्मन बादशहास लागला नव्हता. माझ्या कामगिरींत या संशयाचें बरेंचसें निराकारण झालें. सर एडवर्ड ग्रे यांनीं डेलकासी यांस पाठविलेला निरोप आणि डेलकासी व रशियाचे प्रिन्स यांजबरोबर झालेलें खलबत याजवरून या प्रश्नाचा बहुतांशीं निकालच लागल्यासारखें होतें.

पण ही संधि कितपत टिकाऊ आहे, याबद्दल जर्मनबादशहाला शंका होती. अखेरपर्यंत फ्रान्सला इंग्लंड आपला पाठिंबा देईल कीं काय याबद्दल केसरला शंका होती. या शंकेचें निराकरण करून घेण्याकरतां त्यांनीं मुत्सद्देगिरीचा एक विलक्षण डाव टाकला. त्यांनीं मोरोको प्रकरण एकदम हातघाईस आणलें. प्यांथर या नांवाचें आपलें लढाऊ जहाज अगादीर बंदरांत पाठवून इंग्लंड आणि फ्रान्स यांस परस्परांमधील संधीचें स्वरूप उघड करावयास त्यांनीं लावलें. हें प्रकरण अगदीं युद्धावर आलें असतां वेळीं युद्ध कसें टळलें याची खरी हकीकत फक्त चार इसमांस मात्र ठाऊक आहे. प्यांथर जहाजाचा कप्तान, फाँ वेडेल, केसर आणि शेवटीं मी इतक्यांनाच हें रहस्य त्या वेळीं ठाऊक होतें. युद्धाच्या भयंकर प्रसंगांतून त्या वेळीं युरोप कसें निभावलें, याची हकीकत मी लवकरच सांगेन.

हो ! बरी आठवण झाली. मॉन्ट कार्लो येथें रशियाचे प्रिन्स यांनीं जी मुत्सद्देगिरी दाखविली, तिजबद्दल बाक्षिसादाखल सैबिरियांतील एका प्रांतांत झार यांनीं त्यांची नेमणूक केली.

प्रकरण सातवें.

केसर युद्ध टाळतात.

साऱ्या जर्मनीभर हवामान मोठें सुंदर होतें. बर्लिन तर मला प्रति-स्वर्गासारखें वाटत होतें. आतां चांगली विश्रांति घेऊन खूप चैन करावी असा निश्चय मीं केला होता आणि हा निश्चय पार पाडण्यास माझा खिसाहि चांगला गरम होता. बराच काळ बाहेर काढून मी जर्मनींत परत आलों, ह्मणजे माझी स्थिति अगदीं बेड्यासारखी होऊन जात असे. किती चैन करावी आणि किती करूं नये, याचा विचारच मला रहात नसे. शहरांत मिळणाऱ्या साऱ्या मौजाचा उपभोग एकाच दिवसाच्या अवधींत घ्यावा अशी माझी वृत्ति बनलेली असे. या वृत्तीला अनुसरून अनेक बेत मीं मनांतल्या मनांत योजीत होतों. बागेंतून सहल करणें, निरनिराळ्या राजशाही थाटाच्या उपाहारगृहांत जाऊन मेजवान्या झोडणें, आणि नाटकें नाच इत्यादिकांत दंग होणें, अशा प्रकारचा ' प्रोग्राम ' मीं योजिला होता. बर्लिन मध्यें फार दिवसांनीं मी परत आलों ह्मणून युरोपांतील राजकीय गुंतागुंतीपेक्षां हाच ' प्रोग्राम ' मला फार पसंत पडला होता. त्या दिवशीं दुपारीं अंटर डेन लिंडनवरील सरदारी काफीपानगृहांत मीं बराच वेळ काढला. नंतर पुढील कार्यक्रम मनांत योजून मी तेथून घरीं आलों.

माझा छोकरा किम हा माझी वाट पहातच बसला असावा, असें मला वाटलें. मी दार उघडून आंत जाण्यापूर्वीच त्यानें तें उघडलें आणि म्हटलें, " धनीसाहेब, टेलीफोनवर तुह्मांला बोलावणें आलें आहे; नंबर ११ तुह्मांला बोलावीत आहे. "

टेलीफोनचें नांव निघाल्याबरोबरच माझें चित्त अस्वस्थ झालें. आणि किमनें तो नंबर उच्चारतांच माझ्या छातींत धस्स झालें. बिसमिल्ला ! माझ्या साऱ्या चैनी, नाटकें आणि नाच हीं सारीं मनांतल्या मनांतच जिरलीं. जर्मनीच्या बाहेरचे रस्ते माझ्या नजरेसमोर दिसूं लागले. ए ११ चें बोलावणें म्हणजे पकडसमानच. तेथें टाळाटाळ किंवा विलंब कामाचा नाहीं. जर्मनीच्या परराष्ट्रीय खात्याचा टेलीफोन नंबर ए ११ असा आहे.

यंत्राकडे जाऊन मीं ताबडतोब ए ११ शीं भाषण सुरू केलें. रात्रीं साडेदहा वाजतां वुइलहेल्मस्ट्रासींत हजर राहण्याबद्दल मला हुकूम झाला. कदाचित् एकाद्या लांबच्या प्रवासाला जाण्याची वेळ येईल, असें वाटून तदनुरूप बांधाबांधी करून मीं सर्व तयारी केली.

रात्रीं दहा वाजता पोषाख करून मी खुर्चीवर थोडा आडवा पडलों. थोडा वेळ झोंप घेण्याचा माझा विचार होता. वुइलहेल्मस्ट्रासींतील रात्रींचीं खलबतें पुष्कळ वेळां अनपेक्षितपणें लांबचा प्रवास करावयाला लावतात, असें मला माहीत होतें. खुर्चीवर पडल्या पडल्या युरोपांतील एकंदर परिस्थिति मनातल्या मनांत मी न्याहाळून पहात होतों. आतांच एवढें मोठें कोणतें प्रकरण उपस्थित झालें असावें ? एकाद्या प्रचंड कामागिरीवर माझी योजना व्हावी, अशी माझी फार इच्छा होती. मला बारीकसारीक कामगिऱ्यांची आवड नव्हती. जींत राजमुगुट ढांसळून पडणार, अथवा नकाशांचे रंग फिरणार अशी कामागिरी मला पाहिजे होती.

इ. स. १९११ चा जून महिना युरोपांतील साऱ्या प्रधानमंडळांस फार जड गेला होता. जर्मनी आणि फ्रान्स हे एकमेकांवर गुरगुरत होते. फ्रान्स तर छाती अगदीं वर करून सर्व राष्ट्रांकडे पहात होता. त्याचे हातपाय वळवळत असावेत असें उघड दिसत होतें. फ्रान्सच्या वर्तणुकींत एक मुद्दा होता. प्रामाणिक जॉन बुलचा त्याला पूर्ण पाठिंबा होता. त्या वेळीं युरोपांतील सर्व वातावरण मोरोक्को आणि युद्ध या विषयांनीं दुमदुमून गेलें होतें. जर्मनींत युद्धाचा पक्ष प्रबळ होत चालला होता. युद्ध सुरू करण्यास केसरला भाग पाडावें, असे विचार या पक्षाच्या मनांत

घोळत होते. या पक्षात सैन्य आणि आरमार यांतले पुढारी आणि पुष्कळसे दारूगोळ्याचे कारखानदार इत्यादि लोकांचा समावेश झाला असून त्यांना लोकांचेंहि थोडेंफार पाठबळ मिळालें होतें. फ्रान्सबरोबर युद्ध सुरू करण्यासाठीं हा पक्ष जिवापाड मेहनत करीत होता.

रात्रीं साडेदहाचा ठोका पडला आणि वुइलहेल्मस्ट्रासींत मी हजर झालों. द्वाररक्षकास आपला नंबर कळवून पुढें काय होणार, याचा विचार करीत, मी तेथें उभा राहिलों.

इतक्यांत द्वाररक्षक परत आला आणि ग्राफ फॉ वेडेल यांच्या खोलींत मला घेऊन गेला. बाजूच्या दुसऱ्या एका खोलींत त्यांनीं मला व दुसऱ्या एका गृहस्थाला बसावयास सांगितलें. या गृहस्थाकडे मीं पाहिलें आणि त्यानें माझ्याकडे पाहिलें. बराच वेळ आम्हीं याप्रमाणें एकमेकांचें निरीक्षण केलें; पण आमच्या हेरखात्याच्या कायद्याला अनुसरून एकमेकांशीं आम्हीं भाषण केलें नाहीं. अशा रीतीने सुमारें अर्धा तास गेल्यावर काउन्ट वेडेल यांच्या खाजगी खोलींत आह्मांस नेण्यांत आलें. एका वेळीं एकाच मनुष्याची भेट घ्यावयाची, असा वुइलहेल्मस्ट्रासीचा नियम असतां आह्मां दोघांसही एकदम बोलावण्यांत आलें, या गोष्टीचें मला मोठे नवल वाटलें. खरोखर कांहीं तरी अननुभूत प्रकार घडत असावा, असें माझें मन मला सांगूं लागलें. काउन्ट यांनीं आह्मां दोघांचें स्वागत केलें आणि परस्परांची ओळख करून दिली. माझ्याबरोबर असलेल्या गृहस्थाचें नांव हर्र फॉ सेंडन असें असून तो पूर्वी एक लष्करी अम्मलदार होता.

काउन्ट ह्मणाले, "साडेअकरा वाजतां तुह्मांला एका दिवाणखान्यांत नेण्यांत येईल. दिवाणखान्याच्या मध्यभागीं गेल्यावर उजवीकडे वळून तुह्मी ताठ उभे रहा. तुह्मांला जे कांहीं प्रश्न विचारण्यांत येतील, त्यांचीं उत्तरें द्या; पण स्वतः अगदीं प्रश्न करूं नका अगर कांहीं टीकाहि करूं नका. तुह्मीं स्वतः अगदीं मूकवृत्ति स्वीकारली पाहिजे हें सांगावयास नकोच. समजलांत ?"

आम्हीं होकारार्थी मान हलविली. इतक्यांत तळघरांतून एका मोठ्या

घंटेचा नाद आमच्या कानीं आला. ' तयार असा ' इतकेच शब्द बोलून काउन्ट तेथून अदृश्य झाले. थोडक्याच वेळांत ते परत आले आणि आपल्या मागोमाग येण्यास त्यांनीं खुणाविलें. काउन्टचा चेहरा नेहमीं-पेक्षांहि आज अधिक गंभीर दिसत होता. एक जिना उतरून आम्ही खालीं गेलों, व एका लांबचलाब दालनांतून पुढें जाऊं लागलों. त्या मार्गाच्या शेवटीं दोन पहारेकरी उभे असल्याचें दिसलें. आम्हीं परस्परांशीं एक शब्दहि न बोलतां त्या पहारेकऱ्यांपर्यंत चालत गेलों. तेथें एक भक्कम ओक लांकडाचा दरवाजा आम्हांस दिसला. दरवाज्याच्या आंतल्या बाजूस आणखी एक पहारेकरी होता. दरवाजापासून थोड्याशा अंतरावर आह्मां दोघास उभे करून काउन्ट पुढें गेले आणि त्यांनीं दरवाजावर टिचकी वाजविली. दरवाजा उघडला आणि आह्मांस हुकूम झाल्याप्रमाणें आम्ही दोघेहि त्या खोलीच्या मध्यापर्यंत चालत जाऊन तेथें उभे राहिलों. त्या खोलींत मोठे दिवे लावून भरपूर प्रकाश केला होता; पण त्या खोलीच्या आंतल्या बाजूस दुसरी एक खोली होती, तींत फक्त एकच दिवा दिसत होता आणि त्यावर हिरव्या रंगाचें आच्छादन असल्यामुळें खोलींत उजेड बेताचाच होता. मध्यभागीं एक लिहिण्याचें मोठें टेबल असून टेबलाच्या मागील खुर्चीवर एक व्यक्ति बसली होती. माझ्याबरो-बरच्या सोबत्यानें या टेबलाकडे नजर फेंकली आणि त्याबरोबर कांहीं भीति व कांहीं आश्चर्य याचा मिश्र ठसा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागला. माझ्या सोबत्याची अशी स्थिति कां झाली, हें लवकरच माझ्या लक्षांत आलें. त्या टेबलाच्या मागील खुर्चीवर जर्मनीचे बादशहा दुसरे वुइलियम हे बसलेले होते.

पांच मिनिटेंपर्यंत चकार शब्दहि न काढतां आम्ही दगडी पुतळ्या-सारखे तटस्थ उभे होतों. बादशहा कांहीं लिहिण्यांत अगदीं गुंग होऊन गेलेले दिसले. मी स्वतः भित्रा आहें असें नाहीं. त्यांतून जो धंदा मीं स्वीकारला होता, त्यांत मनुष्य एकवार मुरला झणजे तो पक्काच निगरगट्ट बनतो. पण त्या वेळच्या स्थितींत माझ्या मनांत सुद्धां थोडी-फार गडबड सुरू झाली. खुद्द बादशहाच्या समोर फार वेळ तटस्थ उभें

राहणें हें मोठ्याशा सुखाचें खास नव्हे. युरोपखंडाच्या या कार्तिकस्वामीकडे जों जों मी टक लावून पाहूं लागलों, तों तों साऊथ आफ्रिकेंतील एकाद्या डोंगरी गुहेंत जाऊन बसण्याची इच्छा मला अधिकाधिक होऊं लागली.

एकाएकीं बादशहांनीं वर मान केली आणि उच्च व स्पष्ट स्वरांत ते ह्मणाले, " वेडेल, पहिल्यालाच घेऊन या. "

माझा सोबती हर्र सेंडन यास एकदम बाहेर नेण्यांत आलें. या कामगिरीवर त्याची योजना होत नाहीं असें स्पष्ट दिसलें. या सेंडनला मीं पुढें केव्हांहि पाहिलें नाहीं.

बादशहाच्या खुर्चीपासून तीन पावलांच्या अंतरावर मी पुढें जाऊन उभा राहिलों. या वेळीं फक्त तीन इसम त्या खोलींत होते. बादशहा खुर्चीवर बसलेले असून मेजाच्या उजव्या बाजूला काउन्ट वेडेल उभे होते व समोर मी उभा होतों. बादशहांना यापूर्वी पुष्कळ वेळां मीं पाहिलें होतें; पण इतक्या जवळून त्यांस पाहण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. कांहीं कागद वाचण्यांत बादशहा अगदीं गढून गेले होते, असें दिसलें. त्यांच्या चेहऱ्यावर उत्तम प्रकृतीचें तेज दिसत होतें; पण त्यांच्या तजबिरीवरून त्यांच्या वयाबद्दल जी कल्पना होते, त्याहून ते अधिक वयाचे दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर धुसर पिंगट रंगाची छटा आली होती. या वेळीं त्यांच्या चेहऱ्यांत फ्रेडरिक दी ग्रेटच्या चेहऱ्याचें विलक्षण साम्य दिसत होतें आणि उतार वयामुळें तर या साम्यांत अधिकच भर पडली होती. त्यांच्या डोळ्यांत एक विलक्षण तेज चमकत होतें. त्यांच्या कोणत्याहि चित्रावरून त्यांच्या डोळ्यांतील तेजाची कल्पना करतां येणें शक्य नाहीं. उंची पोलादाला निळ्या रंगाचें पाणी चढविलें, ह्मणजे जसें तें दिसतें, तसा त्यांच्या डोळ्यांचा रंग आहे. ते कोणाकडे पाहू लागले, ह्मणजे जणूं काय त्याच्या अंतःकरणाचा ते ठाव काढीत आहेत, असें वाटतें. त्यांच्या नजरेंतील हा विशेष वर्णनानें सांगतां येण्यासारखा नाहीं. आजपर्यंत दुसऱ्या फक्त चारच व्यक्तींचे डोळे असे आहेत, ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. लॉर्ड किचनर, टचूफिक पाशा, सेसिल

व्होड्स् आणि लि हुंग चंग या त्या चार व्यक्ति होत. जगाचें धनीपण आपण प्राप्त करून घेणार अशी त्यांची आत्मगत श्रद्धा या त्यांच्या नेत्रतेजावरून उघड होते.

बादशहांनीं वर मान करून माझ्याकडे पाहिलें आणि थोड्या कर्कश आवाजांत मला ह्मटलें, " तुह्मी नौकरींत किती वर्षें आहां ? "

" तीन वर्षें, सरकार. "

" मोरोको तुह्मांला माहीत आहे काय ? "

मोरोको ! फ्रान्स आणि जर्मनी ज्याबद्दल युद्धांत पडण्याच्या रंगांत आले आहेत, तेंच हें प्रकरण ! मी ह्मणालों, " होय, सरकार. "

" तुह्मी मोरोकोंत किती दिवस होता ? "

" सुमारें बारा महिने, सरकार. "

बादशहांचा कांहींच निश्चय होईना असें दिसलें. मी तर अगदीं गांबरून गेलों होतों. मोरोकोबद्दल कांहींच विचार त्या वेळीं माझ्या मनांत येत नव्हते. केसर यांच्या पोषाखाकडेच मी टकमकां पहात होतों. ग्रेनेडियर गार्ड पालटणीच्या कर्नलचा पोषाख या वेळीं त्यांनीं केला होता, त्यांचा निश्चय झालासें दिसलें. पुनः एकवार मजकडे पाहून ते ह्मणाले.

" केड म्याकलीनची व तुमची ओळख आहे काय ? "

" होय, सरकार. "

" त्याची व तुमची ओळख कशी झाली ? "

" सर हॅरी केड म्याकलीन यांच्या मी थोडासा उपयोगीं पडलों होतों. मोरोकोच्या सुलतानाकडे ते त्या वेळीं मुख्य सेनापति होते. "

माझ्या उत्तरानें बाहशहांस संतोष झाल्यासारखें दिसलें. ते ह्मणाले, " तुह्मी त्यांच्या उपयोगीं पडला या गोष्टीचें आतां त्यांना स्मरण असेल काय ? "

थोडा वेळ थांबून मीं उत्तर दिलें, " सरकार, दुसऱ्याच्या स्मरणशक्तीबद्दल मी कशी खात्री देऊं ? शिवाय याबद्दल त्या केडची परीक्षा ह्माणें मला बरें वाटत नाहीं. "

बादशहांची मुद्रा थोडी चमत्कारिक झाली. तथापि माझ्या उत्तरानें

स्यांना संतोष झाला. मग काउंट वेडेलकडे वळून ते म्हणाले, " हा गृहस्थ ठीक आहे. सारे कागदपत्र तयार करा. "

यत्किंचित्हि गडबड न करतां काउंट आंतल्या खोलींत एकदम निघून गेले. माझ्याकडे रोंखून पाहून बादशहा म्हणाले, " तुमच्याजवळ कांहीं सरकारी कागदपत्र देण्यांत येतील; पण त्याशिवाय प्यांथर जहाजाच्या कप्तानाला एक निरोप तुम्ही तोंडी कळवा. या निरोपांतील मजकूर तुम्ही पाठ करून घ्या. " असे म्हणून बादशहांनीं कागदाचा एक तुकडा माझ्या हातीं दिला आणि ते पुढे बोलूं लागले. " तुम्ही कोणत्या कामागिरीवर जात आहांत याची बातमी काउट वेडेलशिवाय दुसऱ्या कोणासही कळतां उपयोगी नाहीं. प्यांथर जहाजावरच्या कप्तानाला माझा एक निरोप तुम्ही तोंडी कळविणार आहांत, ही गोष्ट सुद्धां कोणासहि कळतां उपयोगी नाहीं. समजलांत ? "

" होय, सरकार. "

बादशहांनीं एकाएकीं आपलीं कोपरें पुढील मेजावर टेंकून दोन्ही हातावर आपलें तोंड ठेवलें आणि कांहीं तरी गूढ विचारांत ते निमग्न झाल्यासारखे दिसले. या वेळीं ते अगदीं वृद्ध झाल्यासारखे दिसत होते. चिंतेची स्पष्ट छटा त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. सारें जर्मनराष्ट्र युद्धासाठीं आतुर झालें आहे ही गोष्ट मला एकाएकीं आठवली. प्यांथर ! हें लढाऊ जहाज त्या वेळीं स्पेनच्या किनाऱ्यावर होतें. भूमध्यसमुद्रांतून मोरोकोला जाण्यासाठीं तें अगदीं उतावीळ झालें होते. याच जहाजाच्या कप्तानाला बादशहांचा निरोप मला कळवावयाचा होता.

बादशहानीं दिलेला कागद मीं उघडून पाहिला आणि त्यांतला मजकूर मनातल्या मनांत पाठ करूं लागलों. मी अगदीं आश्चर्यचकित झालों. बादशहा इतके चिंतामग्न कां झाले, याचें कारण माझ्या लक्षांत आलें. जहाजावरच्या कप्तानास हा मजकूर तोंडीच कळविण्याचें कारण काय होतें, हेंहि मी आतां समजलों. घाईघाईनें तो मजकूर मीं पाठ केला. इतक्यांत काउंट वेडेल परत आले, व बादशहांशीं अगदीं हलक्या

आवाजांत कांहीं कुजबुजूं लागले थोड्या वेळानें मजकडे पाहून बादशहा मला ह्मणाले, " मजकूर पाठ केला काय ? "

" होय सरकार. " बादशहांनीं तो कागद माझ्या हातून घेतला व काही पेटवून तो सर्व जळून जाईपर्यंत त्यांनीं तो काडीवर धरला होता. त्यांनीं मला एकदम निघून जाण्याची खूण केली व आम्ही दोघे–मी व वेडेल–तसेच दरवाज्याकडे मागें हाटत गेलों. या वेळीं बादशहांचें एक प्रचंड रहस्य माझ्या हातांत सांपडलें होतें. हें रहस्य जाणण्याकरतां फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या प्रधानमंडळांनीं आणि जगांतल्या कांहीं सट्टेबाज व्यापाऱ्यांनीं करोडो रुपये खर्च केले असते. बादशहास आपली पाठ न दाखवितां, आम्ही तसेच बाहेर पडलों.

एक उदास आणि जिच्या चेहऱ्यावर वृद्धपणाची छाया आली आहे, अशी व्यक्ति तेथें मी पहात होतों. एवढेच आतां माझ्या स्मरणांत राहिलें आहे. जर्मनीची सारी प्रजा निद्रेच्या शांत सुखाचा अनुभव घेत असतां त्या प्रजाजनांचे बादशहा मध्यरात्रीच्या भयाण वेळीं परराष्ट्रीय कचेरीच्या तळमजल्यांत आपल्या राज्यनौकेची दिशा निश्चित करीत होते ! या दिशेचा सुगावा काउन्ट वेडेल यांस आणि कदाचित् युवराज यांसच असला तर असेल.

दरवाजांत अखेरची कुर्निसात करून आम्ही बाहेरील दिवाणखान्यांत आलों आणि तो ओक लांकडाचा मजबूत दरवाजा बद झाला. वेडेल मला आपल्या खाजगी खोलीकडे घेऊन गेले. मोहोरबंद केलेलें एक कागदाचे पुडकें त्यांनीं माझ्या हातीं दिले आणि ते म्हणाले, " डॉक्टर, ही कामगिरी अत्यत महत्त्वाची आहे, हें ध्यानांत धरा. युद्धाचा प्रसग उद्भवणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. या प्रकरणाच्या मुळाशीं कोण आहे, याबद्दल थोडासा संशय आह्मांला आलेलाच आहे; पण त्याचें निराकरण करून घेतलें पाहिजे. या साऱ्या भानगडीची माहिती तुह्मांला आहेच; तेव्हां तुह्मांला अधिक कांहीं सांगावयाला पाहिजे, असें नाहीं. येथें सुद्धां एक पक्ष बादशहाला युद्धांत ओढण्यास खटपट करीत आहे, हें सुद्धां तुह्मांला ठाऊक आहेच. हे सरकारी कागद प्यारीस येथील

जर्मन वकिलातींत द्या. ते उद्यां दुपारपर्यंत तेथें पोंहोंचलेच पाहिजेत. पहांटे तीन वाजतां तुह्मी निघालां, म्हणजे दुपारपर्यंत प्यारीस गांठाल. प्यारीसच्या [illegible] तुह्मांला दुसरें पुडकें मिळेल, तें घेऊन तुह्मी माद्रिद (स्पेन) ला जा. हें दुसरें पुडकें तेथें दिल्यानतर प्यांथर जहाजावर जाण्यास तुह्मी मोकळे व्हाल. हें जहाज सध्यां बार्सिलोनाच्या बंदरांत आहे. या जहाजावरची कामगिरी संपली म्हणजे तुह्मी जिब्राल्टरला जा आणि तेथें ब्रिटिश काफिला किती मोठा आहे, आणि त्याची तयारी कशी काय आहे, याची चवकशी करा. " थोडा वेळ थांबून कौंट पुढें म्हणाले, " या कामगिरीला लागणाऱ्या पैशासाठीं तुह्मी सरकारी तिजोरीवर जाऊं नका. या वेळचा तुमचा खर्च बादशहांच्या खाजगी तैनातींतून दिला जाईल. फ्रेंच आणि स्प्यानिश नाणीं थोड्या वेळानें मी तुमच्या घरींच पाठवून देतों. सर्व बरोबर ध्यानांत आलें ना ? प्यांथरच्या कप्तानाला तोंडी सांगावयाचा बादशहांचा निरोप तुह्मी विसरणार नाहींच. "

सर्व कामगिरी माझ्या बरोबर ध्यानांत आली, असें कौंट यांना सांगून व त्यांचा निरोप घेऊन मी एकदम आपल्या बिऱ्हाडीं आलों. माझा नौकर प्रवासाची सर्व बांधाबांधी करीत असल्याचे दिसले. अशा प्रकारच्या प्रवासाला फारशा सामानाची जरूर नसते. थोडेसे पायजमे, एखादा डोक्याचा ब्रश, एक दोन वस्तरे, आणि एक दांत घासावयाचा ब्रश एवढ्या सामानावर मीं पृथ्वीचा पाऊण हिस्सा पालथा घातलेला आहे. मी आपल्या खिशांत सहा बारी पिस्तुल कधींच बाळगीत नाहीं. स्वतःच्या संरक्षणासाठीं म्हटलें, तर थोडी मिरच्यांची पूड, तपकीर आणि दुसरीं एक दोन रसायनें इतक्या चिजा बस्स होतात. आपल्यावर कोणीं हल्ला केलाच, तर यांपैकीं एखादी चीज त्याच्या तोंडावर उधळून दिली, म्हणजे आपला कार्यभाग होतो.

थोड्याच वेळानें वेडेल यांचा एक दूत पैशाच्या थैल्या घेऊन आला. यांत फ्रेंच आणि स्प्यानिश नाणीं भरलेलीं होतीं. पहांटेची गाडी निघण्यास अद्याप अर्ध्या तासाचा अवकाश होता, म्हणून स्टेशनावर जाण्यास मी पायानेंच निघालों. प्यारीसला जाणाऱ्या एक्स्प्रेस गाडींत गर्दी अतिशय

असते, यामुळें स्टेशनावर लौकर जाऊन आणि तेथल्या लोकांचे हात ओले करून चांगली जागा मिळविली नाहीं, तर या गाडींत प्रवाशांचे फार हाल होतात, असा माझा अनुभव होता. स्टेशनावर जाऊन मीं एक जागा पक्की केली आणि नंतर मी सर्व गाडीत फिरलो. आपल्या बरोबर कोण कोण प्रवास करीत आहेत, याचा शोध करण्याची माझी नेहमींचीच पद्धत असे, आणि सध्यांच्या प्रसंगीं असे करणें अधिकच अवश्य होतें. जर्मनींतल्या अगदीं अखेरच्या स्टेशनाच्या अलीकडल्या एका स्टेशनावर गाडी येऊन पोहोंचेपर्यंत विशेष महत्त्वाचे असें कांहीं घडलें नाहीं. या स्टेशनावर खिडकींतून डोके बाहेर काढून मी बाहेर पाहू लागलों, तों आमच्या शेजारच्या कम्पार्टमेंटांत तीन मनुष्यें चढत असल्याचे मला दिसलें. हीं मंडळी सर्व एकत्रच प्रवास करीत असावी, हे उघड दिसत होतें. पलीकडल्या कम्पार्टमेंटांत जागाहि मुबलक होती. आतां गाडी सुरू होणार, इतक्यांत त्या मंडळींतील एक स्त्री माझ्या कम्पार्टमेंटांत आली. 'शेजारच्या कम्पार्टमेंटांतील एक गृहस्थ मला निष्कारण त्रास देत आहे, याकरितां तुम्ही माझ्या मदतीला चला, असें ती मला म्हणाली, तिचें म्हणणें माझ्यानें अर्थातच नाकारवेना. तिचें सामान आपल्या कम्पार्टमेंटांत घेऊन येण्यासाठीं मी तिजबरोबर शेजारच्या कम्पार्टमेंटांत गेलो. तिच्या या कृत्यांत कांहीं गुप्त हेतु असेल अशी नुसती शंका सुद्धां मला हा वेळपर्यंत आली नव्हती. माझ्या प्रवासांत कोठून तरी व्यत्यय येईल अशी कल्पना करण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण माझ्या कामागिरीची माहिती कौट वेडेल आणि खुद्द बादशहा यांशिवाय तिसऱ्याच्या कानीं गेली नव्हती. आतां [illegible] स्वरूप विलक्षण होतें आणि मला नेमलेल्या ठिकाणीं जाऊं न देण्यांत ज्याचा डाव साधणार असा एक पक्ष तेथें अस्तित्वांत होता, ही गोष्ट मात्र खरी.

शेजारच्या कम्पार्टमेंटांत जाऊन त्या स्त्रीच्या सामानाला मी हात लावतों न लावतों इतक्यांत एक गृहस्थ मोठ्यानें ओरडून म्हणाला, "अहो शिष्ट, माझ्या बायकोच्या सामानाला हात लावणारे, तुम्ही कोण?"

ती स्त्री माझ्या मागच्या बाजूला उभी होती. माझी पाठ तिच्याकडे

वळलेली होती; पण समोर लावलेल्या आरशांत तिचें प्रतिबिंब मला दिसत असल्यामुळें तिनें त्या गृहस्थाला केलेली खूण माझ्या नजरेस आली. अर्थात् या साऱ्या प्रकरणात कांहीं वेगळाच हेतु असावा, हें तावडतोब माझ्या लक्ष्यांत आलें. हा सर्व बेत अगाऊच ठरविलेला होता, यावद्दल मला शका उरली नाहीं.

ही मंडळी पुढे काय करणार, याचा उलगडा हळुहळू होऊं लागला. गाडीचा कन्डक्टर तेथे आला, तेव्हां ते ' नौरोजी ' पुढें झाले आणि ' याला या स्टेशनावर उतरून घ्या ' अशी त्यांनीं त्याला विनंति केली. या त्यांच्या विनंतीला दुसऱ्या गृहस्थानेहि दुजोराच दिला; पण गम्मत ही कीं माझ्या मदतीची अपेक्षा करणारी ती स्त्री सुद्धा त्यांना जाऊन मिळाली. सर्व हकीकत जशी घडली, तशी ती मीं कन्डक्टरला सांगितली; पण ग्वालीं उतरण्याचें मात्र मीं साफ नाकारलें. कन्डक्टरने माझ्या कम्पार्टमेटला कुलूप घातलें आणि पुढच्या कोलोनच्या स्टेशनला गाडी गेली ह्मणजे तेथें स्टेशनमास्तराच्या ताब्यांत तुह्मांला देण्यांत येईल, असें त्यानें मला बजावले.

पुढच्या स्टेशनवर गाडी जाईपर्यंत या गोष्टीचा विचार करण्यास मला फुरसद मिळाली. खरें ह्मणाल, तर मला स्वतःचाच फार राग आला होता. गुप्त हेरांच्या खात्यात पुष्कळ कामगिऱ्यांचा अनुभव घेऊन मी या कामांतला अगदीं मुरब्बी ह्मणवीत होतों, अशा स्थितींत इतक्या सोप्या रीतीनें मी फसलों, यावद्दल माझा मलाच अतिशय राग आला. खरोखर म्हटलें, तर माझ्या शत्रूंनीं योजलेली युक्ति अतिशय साधी असल्यामुळेंच मी फसलों. मोठ्या कुशलतेनें केलेल्या योजना ज्याच्या चित्तांत सदोदीत असतात, त्याला अगदीं सोप्या सांपळ्याची युक्ति न समजली तर नवल नाहीं. आतां पुढें काय योजना करावी, याचा विचार मी करूं लागलों. असल्या भिकार आरोपावर फार वेळ ते मला अडकावून ठेवूं शकणार नाहींत, यावद्दल माझी खात्री होतीच. फार तर बर्लिनला एकादी तार दिली, कीं माझें काम होणार होतें. पण त्या गाडीनें मी पुढें न गेलों, तर दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत प्यारीसची मज़ल गांठणें मला शक्य नव्हतें.

आणि हुकुमाप्रमाणें मला तेथें दुपारींच पोहोंचणें अवश्य होतें. माझी बुद्धि तर अगदीं गुग होऊन गेली.

अशा महत्त्वाच्या प्रसंगीं थोडासा उशीर सुद्धां फार घातक होण्याचा संभव असतो. या सहा तासांच्या उशिरानें तर युद्धाग्नि भडकण्याचाहि संभव होता ! जर्मनींतला एक जोरदार तट युद्धांत पडण्यास उत्सुक होता. जर्मनीचें वातावरण युद्धाच्या प्रस्तावनेनें भरून गेलें होतें. एकाद्या सरकारी कामगाराची अगदीं क्षुल्लक चूक सुद्धां भडका उडविण्यास त्या वेळीं कारण झाली असती. फ्रान्सचें वातावरणहि चांगलेच क्षुब्ध झालें होते. प्यांथर जहाजाच्या कप्तानाला बादशहांचा तोंडीं निरोप वेळींच न पोहोंचला, तर युद्धाग्नि भडकण्याचा संभव होता ! मला अशा रीतीने अडकवून ठेवण्यांत या टोळीचा काय हेतु होता, हें माझ्या लक्षांत आलें; पण माझ्या कामगिरीचा सुगावा त्यांना कसा लागला, हें गूढ मात्र मला केव्हांहि उकलतां आलें नाहीं. मी वुईलहेल्मस्ट्राझींत जात असता त्यांनीं माझ्यावर पाळत राखली असावी आणि त्यांचें पुढील वर्तन बहुधा नुसत्या अनुमानधपक्यावरच झालेलें असावें.

रेलवेच्या टाईमटेबलाप्रमाणें एक्सप्रेस गाडी कोलोनच्या स्टेशनावर नऊ मिनिटें थांबावयाची; पण तेथल्या स्टेशन मास्तरनें या प्रसंगीं ती अकरा मिनिटें थांबविली. आम्ही सर्वजण खालीं उतरलों आणि स्टेशन-मास्तरच्या ऑफिसांत गेलों. स्टेशनमास्तरला जरा बाजूला बोलावून त्याना मीं आपल्या खात्याचा बिल्ला दाखविला. प्यारीस येथील जर्मन वकिलातीसाठीं जें मोहोरबंद पुडकें मी घेऊन जात होतों तेंहि मीं त्याला दाखविलें. हें पुडकें सरकारी रेशमी दोरीनें बांधलेलें असून त्याच्या पाठीवर परराष्ट्रीय खात्याची मोहोर उठविलेली होती. अशा रीतीची प्रस्तावना करून मीं स्टेशनमास्तरला झटलें, " माझ्यावरचा आरोप किती क्षुल्लक आणि मूर्खपणाचा आहे, याचा तुम्हीच विचार करा. मी कोण याबद्दल तुमची खात्री पटत नसेल, तर वुइलहेल्मस्ट्राझीला माझ्या खर्चानें तार देऊन ती खात्री करून घ्या. तुम्हीं मला अडकवून ठेविलें, तर पुढच्या परिणामाची जबाबदारी तुमच्यावर राहील, हें लक्षांत ठेवा. सर्व खरी

हकीकत मीं तुह्मांला सांगितली आहे. तुमच्या कर्तव्याच्या आड मी येऊं इच्छित नाहीं; तथापि कोणत्याहि गोष्टीचा दूरवर विचार करण्याइतकी तुमची विचारशक्ति प्रबळ आहे, असें मला वाटतें. "

स्टेशनमास्तरच्या मनांत कोणते विचार चालले असावेत, याची मला कल्पना करतां येण्यासारखी होती.

" हा मनुष्य ह्मणतो कीं आपण बादशहाचे दूत आहो. गाडी जर्मन हद्दीच्या बाहेर जाण्यास अजून आणखी तीन तास लागतील. हा ह्मणतो त्याप्रमाणें जर तो बादशहांचा दूत नसला, तर त्याला सरहद्दीवर पकडण्यास पुरेसा अवकाश मिळेल. पण त्याला मीं येथें अडकावून ठेवले आणि जर तो खरोखरच बादशहांचा दूत असला, तर मी मात्र फुकट पेंचांत सांपडेन. " अशा प्रकारचे विचार आमच्या ' सुविचारी ' मास्तरसाहेबांच्या मनांत घोळत असावेत.

अग्वेरीस आरोप अगदीं क्षुल्लक आहे, असें ह्मणून त्यांनीं आह्मां सर्वांस बाहेर घालवून दिलें. यानंतर ही टोळी मला पुनः दिसली नाहीं. मास्तरसाहेब माझ्या कम्पार्टमेंटपर्यंत मला पोहोंचविण्यास आले आणि कोलोन स्टेशनापासून तों थेट फ्रेंच हद्दीपर्यंत माझ्या कंम्पार्टमेंटांत दुसरा कोणताहि उतारू आला नाहीं. प्यारीसला आल्याबरोबर रूद लिलेच्या भागांत असलेल्या जर्मन वकिलातींत जाऊन बुइलहेल्मस्ट्रासींतून आणलेले पुडके तेथील चिटणिसाच्या स्वाधीन करून त्याची पावती मीं घेतली. या ठिकाणीं माद्रिद येथील वकिलातीला देण्यासाठीं दोन खलिते माझ्या स्वाधीन करण्यांत आले. प्यारीसच्या जर्मनवकिलातींतून घेतलेली पावती ताबडतोब बर्लिनला मीं पोस्ट मार्फत रवाना केली. अशा प्रकारच्या पावत्या मुख्य खात्याला ताबडतोब पाठवून देणें नेहमींच इष्ट असतें. यानंतर कोणतेंहि संकट न येतां मी माद्रिदला पोहोंचलों. या गाडीला या दिवशीं चार तास उशीर झाला होता ह्मणून त्या वेळीं वकिलातींत जाण्याचा माझा इरादा नव्हता; पण मी स्टेशनावर उतरतों तों वकिलातींतील एक मनुष्य मला भेटला. प्यारीसहून आणलेले कागद मीं त्याच्या स्वाधीन केले. त्याबद्दल त्याची पावती घेऊन आणि पूर्वीप्रमाणेंच बर्लिनला

ती रवाना करून मीं ताबडतोब बार्सिलोनास जाणारी गाडी गांठली. या शहराच्या बंदरांत कोठें तरी प्यांथर जहाज पुढील हुकमाची वाट पहात बसलें होतें.

फार वेळ खटपट करून शेवटीं मीं एक होडी भाड्यानें ठरविली आणि प्यांथर जहाजाकडे जावयास निघालों. त्या वेळीं दिवस अगदीं पूर्ण बुडून गेला असून दिवसाच्या अखेरचा संधिप्रकाश मात्र शिल्लक उरला होता. बराच वेळ होडींतून गेल्यानंतर अखेरीस क्षितिजावर प्यांथर जहाजाची काळी पडछाया दिसूं लागली. प्यांथर (चित्ता) हें नाव या वेळीं मला किती विलक्षण वाटलें! या आमच्या चित्त्यानें एकच उडी चुकून मारली असती, तर साऱ्या युरोपभर केवढा हाहाःकार उडाला असता! मी जहाजाच्या जवळ येऊन पोहोचलों, तेव्हां जहाजावरच्या पहारेवाल्यानें आह्मांस लांब उभें राहण्यास सांगितलें. मला कप्तानाला भेटावयाचें आहे, असें मीं मोठमोठ्यानें ओरडून त्याला सांगितलें; तथापि तो आह्मांस जवळ येऊ देईना. बराच वेळ अशी आरडाओरड केल्यानंतर जहाजावरील एक अम्मलदार कठड्याजवळ आला, तेव्हां त्याला मीं ओरडून म्हटलें, " कप्तानाला भेटण्याबद्दल मला सरकारचा हुकूम आहे. "

अम्मलदारानें आह्मांस जवळ बोलावून वर येण्यास मला परवानगी दिली. वर गेल्याबरोबर मला कप्तानाच्या खोलींत नेण्यांत आलें. जहाजाचा कप्तान म्हणजे तेवढ्या ठिकाणचा तो राजाच असतो. प्यांथर जहाजाचे कप्तान सुमारें चाळीस वर्षांच्या वयाचे होते. चेहऱ्यावरून ते मोठ्या आनंदी स्वभावाचे दिसत होते. कांहीं वेळानें माझ्याकडे रोखून पाहून कप्तानसाहेब म्हणाले, " कां, काय काम आहे? तुमचा नंबर काय आहे? "

" सतरा " मीं उत्तर दिलें.

नंबर सतरा भेटावयास येणार, अशा अर्थाची तार कप्तानाला अगोदरच आली असावी अशी माझी खात्री होती; तथापि अधिक खात्री करून घेण्याकरतां कप्तान पुढें म्हणाले, " तुह्मांला या कामगिरीवर प्रथम कोणीं नेमलें? "

" वेडेल यांनीं. "

" त्यानंतर तुमची कोणाशीं भेट झाली ? " हा प्रश्न विचारीत असतां तीक्ष्ण दृष्टीनें कप्तान माझ्याकडे पहात होते.

" खुद्द बादशहाशीं; आणि आतां त्यांचा स्वतःचा निरोप मी तुम्हांस सांगतों. हा निरोप तुम्हांस सांगितल्याबरोबर तुम्हीं खाजगी सांकेतिक भाषेचा उपयोग करून त्यांतील मजकूर खुद्द कौंट वेडेल यांस तारेनें ताबडतोब कळवा अशी विनंति आहे. "

कप्तान पाय न वाजवितां एकदम उठले आणि खोलीचें दार त्यांनीं मोठ्या त्वरेनें उघडलें. जवळपास कोणीहि दिसत नव्हतें. कप्तानसाहेब दार पुन्हा लावून घेऊन परत आले आणि मला म्हणाले, " ठीक आहे. निरोप मला सांगा. "

बादशहांनीं मजकडून पाठ करून घेतलेला निरोप मीं कप्तान यांस सांगितला. तो निरोप असा:—" प्यांथर जहाज अगादीरच्या बंदरांत गेल्यानंतर कोणत्याहि कारणासाठीं तुम्ही तेथें शस्त्रप्रहार करूं नका. सरकारी अधिकाऱ्यामार्फत तुम्हांस कोणताहि हुकूम मिळाला असला, अथवा यापुढें मिळाला, अथवा यापुढें घडून येणाऱ्या परिस्थितीमुळें कसलाहि प्रसंग आला, अथवा तुमचा कोणत्याहि रीतीनें अपमान करण्यांत आला, तरी फ्रान्स अथवा इंग्लंड यांच्या विरुद्ध तुम्हीं शस्त्र उचलूं नये. "

बादशहांनीं हा निरोप मला प्रथम सांगितला त्या वेळीं माझी जशी स्थिति झाली होती, तशीच आतां कप्तानसाहेबांची झाली. आश्चर्यानें ते अगदीं स्तंभित झाल्यासारखे दिसले. मोरोक्कोला जाऊन फ्रेंच आणि ब्रिटिश यांजविरुद्ध गडबड करावी, असा स्पष्ट हुकूम परराष्ट्रीय खात्याकडून त्यांस मिळाला होता, आणि आतां खुद्द बादशहाकडून मिळालेला निरोप सरकारी हुकुमाच्या अगदीं विरुद्ध होता. सरकारी हुकूम युद्ध उपस्थित करण्यासाठीं असून बादशहांचा निरोप युद्ध टाळण्यासाठीं होता. युद्धांत पडण्यास अगदीं उतावीळ झालेला असा एक बराच मोठा पक्ष त्या वेळीं जर्मनींत होता, हें मीं पूर्वीच सांगितलें आहे. युद्धमंदिरेचें आकंठ पान करून झिंगलेल्या या पक्षानें जर हा माझा निरोप ऐकला

असता तर आपल्या क्रोधाच्या प्रदर्शनानें त्यानें जर्मनींत आकाशपाताळ एक करून सोडलें असतें. सर्व राष्ट्र युद्धासाठीं एका पायावर उभें होतें; पण बुइलहेल्मस्ट्रासींतील तळघराच्या एका लहानशा खोलींत थकून बसलेल्या एका व्यक्तीला मात्र युद्ध नको होतें. जर्मनीच्या बादशहाला तेथें कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम् शक्ति आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण हा समज अगदीं चुकीचा आहे. या वेळीं युद्धांत न पडणें हेंच शहाणपणाचें आहे, असे बादशहांस वाटून त्यांनीं गुप्तपणें आपलें काम केलें. सर्व लोकांच्या मर्जीविरुद्ध तशा अर्थाचा सरकारी हुकूम प्यांथर जहाजाला उघडपणें सरकारीरीत्या पाठविणें, बादशहांस बरें वाटलें नाहीं. अशा रीतीनें वागण्यांतच राष्ट्राचें खरें हित साधणार आहे, असें त्यांना वाटलें.

यानंतरची हकीकत बहुतकरून सर्वांस अवगत असेलच. रविवार तारीख ७ जुलई रोजीं सकाळीं प्यांथर जहाज मोरोक्कोला कसें गेलें व अगादीर बंदरांत त्यानें आपला प्रवेश कसा करून घेतला व तेथें पंधरवड्याहून अधिक दिवस राहून बड्याबड्या राष्ट्रांत तेढ कशी उपस्थित कला, हें माझ्या वाचकांना विदित असेलच. तसेंच त्या वेळीं एक फ्रेंच आणि एक इंग्लिश लढाऊ जहाज तेथे येऊन तीं शेजारीं शेजारीं लढाईच्या पवित्र्यांत कशीं उभीं राहिलीं होतीं, हेंहि त्यांना आठवत असेलच. ब्रिटिश आणि फ्रेंच जहाजांनीं प्यांथरच्या कप्तानाला निर्वाणीचा खलिताहि पाठविला होता, हें कदाचित् कोणास ठाऊक नसेल. दिलेल्या मुदतीच्या आंत जर्मन जहाज बंदरांतून न निघालें तर त्याला जबरीनें हांकून देण्यांत येईल, असेंहि ब्रिटिश व फ्रेंच आरमारी अम्मलदारांनीं कळविलें होतें. अर्थात् हें युद्धाचें आव्हानच होतें.

प्यांथर जहाजाच्या कप्तानाला बादशहांचा निरोप कळेला नसता, तर त्याच्या शास्त्राप्रमाणें दंडाला प्रतिदंडाचा जबाब देणें त्याला अवश्य होतें. पूर्वीच्या उघड सरकारी हुकुमाप्रमाणें जर तो वागला असता, तर अगादीर बंदरांत अग्निज्वालांचा लाल प्रकाश भरून गेला असता. एकाद्या लहानशा बंदुकीच्या आवाजानेंहि युद्धाचा वणवा पेटावा अशी या वेळची

परिस्थिति होती; पण प्यांथर जहाज बंदरांतून मुकाट्यानें निघून गेल्यामुळें हा प्रसंग टळला.

या एकंदर परिस्थितींत बादशहांची विलक्षण चतुराई दिसून येते. इंग्लंड आणि फ्रान्स यांची दोस्ती आहे, ही गोष्ट बादशहांस ठाऊक होती; पण या दोस्तीचें स्वरूप कितपत पक्कें आहे, याचा अजमास त्यांना नव्हता. अगादीर बंदरांत प्यांथर जहाज पाठवून ही दोस्ती त्यांनीं कसाला लावली. तेव्हां तींत बराच राम आहे, ही गोष्ट त्यांना कळून चुकली. इंग्लंड आणि फ्रान्स हीं खांद्याशीं खांदा भिडवून लढतील अशी त्यांची खात्री झाली. सर्व जर्मनी युद्धासाठीं उद्युक्त झाला असतां एकंदर परिस्थिति निकरापर्यंत आणून नंतर तेथून ती परतविणें हें काम खरोखरच फार भयंकर होतें. हें काम बादशहांनीं आपल्या तोंडी निरोपानें साधलें.

आपल्या भोंवतीं कशा प्रकारची परिस्थिति आहे, याचा बरोबर अजमास बादशहांला लागला. आतां या दोन राष्ट्रांत फूट पाडून एकाशीं संधि करून दुसऱ्यास उघडें कसें पाडावयाचें इतकाच विचार राहिला. यानंतर फ्रान्सला उघडें पाडण्याचा डाव सुरू झाला. तो यशस्वी झाला असता, तर युरोपचा सगळा नकाशा पार बदलून गेला असता.

प्रकरण आठवें.

बाल्कन संस्थानें आणि युरोपची तटस्थवृत्ति.

फ्रान्स, इंग्लंड आणि जर्मनी यांच्या पूर्व परिस्थितींत असलेल्या ज्या घोटाळ्यांचा मला अनुभव आला होता, त्यांवरून कांहीं विलक्षण बनाव अचानकपणें घडून येणार असा अंदाज मीं पूर्वीच बांधला होता. तथापि १९११ सालाच्या आक्टोबर महिन्यांत जी एक विलक्षण गोष्ट घडली, ती मात्र माझ्या अंदाजाबाहेरची होती. इंग्लंड आणि फ्रान्स यांचें मित्रत्व भक्कम आहे, असा अनुभव जर्मनबादशहांस माराक्का प्रकरणांत आलाच

होता, आणि जर्मनीची राजकारणाची कुटिलता माझ्या अनुभवाची असल्यामुळें वुइलहेल्मस्ट्रासीचीं प्यादीं पुढें कशीं सरकणार, हें मला अगोदरच ठाऊक होतें. हीं प्यादीं पुढें सरकविण्याची वेळ आली, म्हणजे ती कामगिरीहि माझ्यावरच सोंपविली जाईल, असेंहि अनुमान मीं केलें होतें. या राजकारणांतील बऱ्याचशा भानगडी मला अगोदरच ठाऊक असल्यामुळें पुढील कामगिरीवरहि माझीच योजना व्हावी, हें तर्कशास्त्राला अनुसरूनच होतें.

माझा तर्क कांहीं चुकीचा नव्हता. पूर्वी अनुमान केल्याप्रमाणें मला बोलावणें आलें आणि एका कामगिरीवर माझी योजना झाली. या कामगिरीचें स्वरूप इतकें कांहीं विलक्षण होतें कीं, त्यावरून राजनीतीच्या कौटिल्याचें भयंकर स्वरूप माझ्या चांगलेंच अनुभवास आलें. मोठमोठे राजे आणि बादशहासुद्धां राज्याच्या हितासाठीं कसे निर्दय बनतात, हें या कामगिरींत मला कळून आलें.

पावसाळ्याच्या सुटीला सुरवात होऊन बरेच दिवस झाले होते. इतक्यांत मला वुइलहेल्मस्ट्रासीकडून बोलावणें आलें. दरवाजावरील नेहमींचा विधि उरकल्यानंतर कौंट फॉं वेडेल यांच्या खाजगी खोलींत मी गेलों. एका खुर्चीकडे बोट दाखवून कौंट यांनीं मला बसावयाला सांगितलें. माझ्या पूर्वीच्या कामागिरीबद्दल माझी बरीचशी स्तुति करून साडेसात हजार रुपयांचा चेक त्यांनीं माझ्या हातीं दिला. हा चेक खुद्द बादशहांकडून आलेला होता.

मी चेक हातांत घेत असतां त्यांनीं 'तुमच्या कामगिरीचें हें बादशहांकडून आलेलें बक्षीस' असें मला सांगितलें. यानंतर आपल्या नेहमीच्या पद्धतीला अनुसरून ते नव्या कामगिरीबद्दल माझ्याशीं बोलूं लागले. खुर्चीवर मागें रेलून आणि पायावर पाय ठेऊन ते म्हणाले, "हर्र फॉं किडरलेन वेक्टर यांजबरोबर खाजगी चिटणीस या नात्यानें तुम्हांस जावयाचें आहे. या कामासाठीं तुमचीच निवडणूक मीं केली आहे. याचें कारण हें कीं, तुम्हांला इंग्रजी भाषेचें ज्ञान असून या बाबतींतल्या पूर्वीच्या भानगडीहि तुमच्या माहितींतल्या आहेत. ट्यानसच्या जंगलांत एका ठर-

लेल्या जागीं कांहीं मुत्सद्दी परस्परांस भेटणार आहेत. या मंडळीची सर्व प्रकारची तरतूद लावण्याचें काम तुमच्या एकट्याकडेच सोंपविण्यांत येईल. तेथल्या सर्व बाबींकडे तुह्मांस लक्ष ठेवलें पाहिजे. तेथें कांहीं लिहिलेले कागद असतील, आणि दुसरे कांहीं टिपकागद असतील, तर ते तुह्मी सर्व जाळून टाका. फॉ किडरलेन वेक्टर यांच्या समोरच ते तुह्मी जाळा. "

एवढें बोलून ते थोडा वेळ थांबले; पण त्यांच्या मुग्धतेंतहि कांहीं विशेष अर्थ होता. त्यांच्या शब्दांचा अर्थ जसजसा माझ्या ध्यानांत येऊं लागला, तसतसें या कामगिरीचें विलक्षण स्वरूपहि मला उघड दिसूं लागून मी आश्चर्याने स्तंभित झालों.

कौंट वेडेल पुढें बोलूं लागले. " ही मडळी त्या जागीं जाण्याच्या अगोदर तीन दिवस तुह्मांस तेथें जावें लागेल. त्यांच्या जेवणाखाण्याची सारी व्यवस्था तुह्मांसच ठेवावी लागेल. कारण तुमच्याशिवाय दुसरा कोणीहि नौकर तेथें असणार नाहीं. हा सारा व्यवहार त्या भागांत अगदीं गुप्त राहील अशी व्यवस्था अगाऊच करण्यांत आलेली आहे. या गोष्टीचा यत्किंचितहि बभ्रा होतां उपयोगी नाहीं, ही गोष्ट नीट ध्यानांत धरा ही कोणी तरी मंडळी नुसत्या शिकारीसाठीं येथें आली आहे, अशा प्रकारचा समज तिकडे होईल, अशी कांहीं तरी तरतूद तुह्मी करा. ही तरतूद कशी करावयाची, हें तुमचें तुह्मीच पाहून घ्या. जे गृहस्थ तेथें येणार आहेत, त्यांपैकीं कोणी तुमच्या ओळखीचे असतील अथवा नसतील. त्यांचीं नांवें मी तुम्हांला लिहून देतों.

कौंटची लेखणी कागदावर कुरकुर वाजूं लागली आणि मलाहि पुढील विचाराकरतां थोडासा अवसर मिळाला. जर्मन राष्ट्राची भवितव्यता या वेळीं काळाच्या उदरांत होती. पुढें काय होणार, याचा अंदाज करतां येत नव्हता. आपल्या राष्ट्रावरील आपत्ति टाळण्याकरतां जर्मनीचे केसर राजकीय पटावरील मोहरीं चाळवीत होते, आणि या भानगडीपैकींच ही कांहीं तरी कामगिरी असावी, असा माझा समज होता; तथापि या भानगडीचें स्वरूप किती विलक्षण आणि महत्त्वाचें आहे, हें मात्र मला त्या जंगलांत गेल्यानंतरच कळून आलें.

कौंट वेडेल यांनीं एक कागदाचा तुकडा आपल्या जागेवरून माझ्याकडे सरकविला. त्याजवर त्यांनीं पुढील नांवें लिहिलीं होतीं. लॉर्ड–मि.–एम. पी (पार्लमेंट सभासद.) ॲडमिरल फाँ टिरपिझ, जनरल फाँ हिरिनजेन्, जनरल मॉरिदझ् रिटर फाँ आफेनबर्ग, हर फाँ क्रिडरलेन वेक्टर.

हा वेळपर्यंत या नौकरींत शिरून मला अकरा वर्षें झालीं होतीं. यामुळें मी अनेक प्रसंग पाहून निर्दावलों होतों. जर ही कामगिरी आरंभींच माझ्याकडे सोंपविण्यांत आली असती, तर तिच्या विलक्षण स्वरूपानें मी अगदीं गांगरून गेलों असतों. त्यानस अरण्याच्या एका ओसाड भागांत ही मोठमोठी मंडळी एकत्र जमण्याचें घाटत होतें. यावरून त्या वेळची परिस्थिति किती गंभीर स्वरूपाची होती, याची तुह्मीच कल्पना करा. त्या वेळचीं युरोपांतील वर्तमानपत्रें कोणीं चाळून पाहिलीं, तरी सुद्धां मी ह्मणतों या गोष्टीचा प्रत्यय त्याला येईल. इंग्लंड आणि जर्मनी हीं राष्ट्रें एकमेकांचीं नरडी धरण्यास अगदीं उतावीळ झालीं होतीं, असें वर्तमानपत्रांतील हकीकतीवरून दिसून येईल. जर्मन हेरांच्या सुळसुळाटाच्या वर्णनांनीं इंग्रजी पत्रांचे रकाने भरून निघत होते. अशा प्रकारची परिस्थिति असतां, ब्रिटिश प्रधानमंडळांतले दोन बडे गृहस्थ केसरच्या युद्धखात्याच्या प्रधानाला गुप्तपणें भेट देणार, हें ऐकून मला किती नवल वाटलें असेल, याची तुह्मीच कल्पना करा.

जर्मनीच्या परराष्ट्रीय खात्याच्या आमंत्रणावरून हे दोन्ही इंग्रज गृहस्थ पूर्वी एकवर गुप्त भेट घेऊन गेले होते, ही गोष्ट मला माहीत होती. जर्मनीची युद्धाची तयारी कशी आहे, याची जाणीव या दोन इग्रज मुत्सद्यांस करून देण्यांत आली होती. विशेषतः आकाशांतील युद्धासंबंधानें जर्मनीची तयारी कशी होती, हें त्यांस दाखविण्यांत आलें होतें. यांतहि जर्मनीचा कांहीं विशेष हेतु होता.

पण आतां फाँ वेडेल हे पुनः बोलूं लागल्यामुळें त्यांजकडे लक्ष देणें अवश्य आहे. वेडेल ह्मणाले, " चालू महिन्याच्या मध्याच्या सुमारास ही मंडळी स्क्रायांजेनबाद येथें परस्परांस भेटतील. त्यानसच्या डोंगराळ मुलखांत बादशहांची एक खास शिकारीची जागा आहे, ही गोष्ट तुह्मांला

ठाऊक आहेच. तुह्मी उद्यांच तेथें जा. तेथें कोणत्या प्रकारची आगाऊ तयारी करावी लागेल, हें तुह्मांला सांगावयास नकोच. "

याप्रमाणें सर्व बेतबात ठरल्यावर मी ताबडतोब तेथून घरीं निघून आलों आणि माझ्या झुलू छोकऱ्याला भावी प्रवासाचें बाडबिछाइत तयार करण्याला सांगून पुढील कामगिरीची चर्चा मीं आपल्या मनाशीं सुरू केली. कौंट वेडेल यांनीं दिलेली यादी मीं प्रथम वाचून पाहिली.

इंग्लंडचे लॉर्ड—बादशहाजवळ यांचें मोठेंच वजन. जवळ जवळ त्यांचे ते खाजगी दोस्तच ह्मणावयाला हरकत नाहीं. मि —एम. पी. हे ब्रिटनच्या आरमारी खात्यांत असतात. वेक्टर–जर्मनीचे परराष्ट्रीय प्रधान. यांना बादशाही मंडळांत बरेच जण प्रतिकूल असतांहि केसरच्या हे अगदीं विश्वासांतले. टिरपिझ–हे जर्मन आरमाराचे प्रमुख आणि फॉं हेरिन्जेन हे तर सेनेची अधिष्ठात्री देवता. हे दुसरे मोल्टकेच आहेत, असा सर्वत्र समज आहे. फॉ ऑफेनबर्ग हे ऑस्ट्रियन साम्राज्याच्या मुख्य प्रधानाचे आधारस्तंभ. अशा रीतीनें तीन बलाढ्य राष्ट्रांचा संगम आतां होणार होता. आपआपल्या राष्ट्राच्या शिरोभागीं असलेलीं हीं माणसें एका अरण्याच्या अगदीं उजाड आणि क्षुद्र भागांत एकत्र होणार ! फ्रान्ससंबंधी एकंदर लक्षण बरेंसें दिसत नाहीं. फ्रान्सवर या भेटीचा परिणाम काय होईल याचा नक्की अंदाज मला करतां येईना. माझ्या मनाची गुंतागुंत वाढूं लागली. तथापि या मंडळीची भेट झाल्यानंतर आपणाला बऱ्याचशा गोष्टी कळतील, एवढ्या आशेवरच मीं आपल्या मनाची समजूत केली.

मला हुकूम झाल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशीं अगदीं उजाडतांच हर्र फॉं किडरलेन वेक्टर यांच्या घरीं मी हजर झालों. ताबडतोब साहेबबहादुरांच्या खोलींत माझा प्रवेश झाला. ते एका टेबलाशेजारीं बसले असून कांहीं कामांत गुंतले होते. प्रथम कांहीं थोडे कुशल प्रश्न झाल्यावर ते पुन्हा आपल्या कामाकडे पाहूं लागले. या रिकाम्या वेळाचा फायदा घेऊन या साहेबबहादुरांचें आपण थोडेंसें निरीक्षण करूं. यांचा स्थूल देह, यांचा तांबूस चेहरा, आणि केंसाळ भिंवया हीं पाहून हे गृहस्थ मोठे राजका-

रणी असतील अशी शंकासुद्धां कोणाला यावयाची नाहीं; पण ते खरोखरच मोठे मुत्सद्दी होते, यांत मात्र संका नाहीं. त्यांच्या मृत्यूनें बादशहा आणि एकंदर जर्मनराष्ट्र यांस खरोखरच चुकल्या चुकल्यासारखें वाटत असेल. यांच्या शरिराचा उठाव आणि पोषाखाची ढब हीं पाहून हे सौथ आफ्रिकेंतले एकादे बोअर किंवा इंग्लंडांतले बडे शेतकरी असावेत असा कोणाचाहि समज झाला असता. त्यांचा पोषाख अजूनहि माझ्या स्मरणशक्तीला चिकटून बसला आहे. त्या वेळीं त्यांच्या अंगांत एक चटकदार रंगाचें आणि वर हिरवे टिपके असलेलें असें जाकीट होतें; पण एक वेळ त्यांनीं आपले पाणीदार व सूक्ष्मनिरीक्षक डोळे तुमच्याकडे फिरविले, का त्याचें जाकीट आणि इतर पोषाख यांच्या साऱ्या कल्पना तुमच्या डोक्यांतून निघून जाऊन तुह्मी तावडतोब शुद्धीवर यावयाचे. 'पुढील हुकूम घेण्यासाठीं मी आपणाकडे आलों आहें,' असें मी साहेबमहसुबांस सांगितलें.

एकंदर कामगिरीसंबंधीं अत्यंत गुप्तपणा राखण्याचा विशेष इषारा देऊन त्यांनीं मला दुसऱ्या कांहीं किरकोळ कामाची समजूत दिली; तथापि त्यांच्या बोलण्यावरूनसुद्धां पुढें काय घडणार आहे, याचा विशेषसा उलगडा मला झाला नाहीं. त्याची थोडीशी कल्पना मात्र मला आली. ह्या राजकीय उलाढालीमुळें केवढी वावटळ उठण्याचा संभव होता, यासंबंधीं साहेबबहादुरांनीं आपल्या भाषणांत एक अक्षरसुद्धां काढलें नाहीं.

शिकारीच्या मिषानें त्या अरण्यांत शिरावयाचें अशी वेडेल यांची जी सूचना होती, तिला अनुसरून मीं कांहीं बंदुकी मिळविल्या आणि स्क्वयांजेनबादला जाणारी साडेबारांची गाडी गांठण्याकरतां स्टेशनावर येऊन दाखल झालों.

आक्टोबर महिना नुकताच उजाडला होता. मी स्क्वयांजेनबाद येथील 'कर' हॉटेलांत जाऊन तेथील नोंदबुकांत बर्लिनचे हर्र ब्याम्बबर्गर असें स्वतःचें नांव दाखल केलें. तुह्मीं कधीं या गांवाला फेरी मारली, तर या हॉटेलांत जाऊन तें नोंदणीबुक अवश्य पहा. स्क्वयांजेनबाद हा गांव नॅसॉ संस्थानांत असून तो तेथील औषधी पाण्याच्या झऱ्यासंबंधानें प्रसिद्ध

आहे. आजूबाजूला ट्यानस नांवाचें अरण्य आहे. गांवापासून थोड्याच अंतरावर त्या अरण्यांत बादशहांचा शिकारी बंगला असून याच बगल्यांत चेंबेल यांनीं सांगितलेली भेट होणार होती.

कित्येक दिवसपर्यंत त्या हॉटेलांत मी एकटाच होतों. नंतर या बड्या मंडळीपैकीं एकेक जण नांवें बदलून तेथें येऊं लागला. प्रथम ऑस्ट्रियाचे जनरल मॉरित्स रिटर फाँ ऑफेनबर्ग हे आले. यांचा चेहरा दिसण्यांत मोठा उमदा असून स्वभावानें हे अगदीं शांत आहेत आणि स्वतःच्या मोठेपणाची मुळींच घमेंड न बाळगणारे असे आहेत. बादशहा फ्रान्सीस जोसेफ यांच्या हे पूर्ण विश्वासांतले आहेत, अशी ख्याति आहे. सालमन मासे धरण्याचा यांना मोठा शोक आहे, असें मला आढळून आलें. न्यूझीलंडमध्यें मासे मारण्याच्या अनेक गमतीच्या गोष्टी सांगून मीं त्यांची मर्जी संपादन केली.

यानंतर आडमिरल फाँ टिरपिट्झ आणि जनरल फाँ हेरिनजेन हे आले. अडमिरल हे शरीरानें धष्टपुष्ट, सहा फूट उंच, रुंद छातीचे असे गृहस्थ आहेत. त्यांचे निळे डोळे, भरदार दाढी आणि एकंदर रुबाब यांनीं जर्मन खलाशाबद्दल कोणालाहि चांगलीच कल्पना करून दिली असती. स्वभावानें हें अगदीं गोड आणि चालीरीतीला फार सभ्य असल्याचें मला आढळून आलें. फाँ हेरिनजेन हे यांच्या अगदीं उलट. अगानें अगदीं सडपाळ-किंबहुना रोडके. शरीरयष्टि वांकडी, खांद्याला पोंक आलेलें, अगदीं मुखस्तंभ, आणि खोल डोळ्यांचे, असे हे गृहस्थ आहेत.

स्मरण करतां त्या दिवशींची तारीख १२ आक्टोबर ही होती, असें मला आठवतें. त्या दिवशीं भल्या सकाळीं एक गाडी भाड्यानें करून तींत कांहीं खाण्याचे जिन्नस, दारूच्या बाटल्या, आणि दुसरें जरूरीचें सामान भरून मी त्या अरण्यांत सोळा मैलांवर असलेल्या एहरनक्रूग नांवाच्या शिकारी बंगल्यांत गेलों.

आजुबाजूला कित्येक मैलपर्यंत मनुष्यवस्तीचें एकहि चिन्ह नव्हतें. दगड आणि विटा अशा मिश्रणानें हा बंगला बांधलेला आहे. यांत पाहुण्यासाठीं पांच सहा खोल्या, एक मोठा दिवाणखाना आणि सकाळीं बस-

ण्याउठण्याकरतां एक लहानशी खोली, अशी व्यवस्था आहे. हा राजकीय कुटुंबाचा बंगला असल्यामुळें फॉरेस्ट खात्यांतले दोन पेनशनर नौकर येथें पहाऱ्यासाठीं ठेवलेले होते. मी पोहोंचलों त्या दिवशीं कडाक्याची थंडी पडली होती. विशेषतः आजुबाजुला झाडींनें भरलेले डोंगर असल्यामुळें तर हवेंत गारठा व सर्दी हीं विशेषच होतीं. मी गेल्याबरोबर रखवालदारांनीं शेगड्या पेटवून बंगला चांगला उबदार केला.

रस्त्यावर दोन्ही दिशांकडे पोलिसचा पहारा ठेवण्यांत आला होता. याशिवाय कित्येक पोलिसचे लोक अरण्यांत नाक्यानाक्यांनीं ठेवण्यांत आले होते. पोलिसची नजर चुकवून कोणालाहि तेथें प्रवेश करतां आला नसता. दुपारीं तीन वाजतां जर्मन व ऑस्ट्रियन गृहस्थ येऊन दाखल झाले, आणि यानंतर आणखी पाऊण तासानें दोन सुप्रसिद्ध इंग्रज मुत्सद्दी मोटारगाडींतून आले.

या दोघांपैकीं एक गृहस्थ वयानें वडील होते. यांस मीं पूर्वी पाहिलें नव्हतें. हे मोठे मितभाषी होते; तथापि वयोमानानें त्यांच्या अंगीं मार्दवहि आलेलें होतें. बोलण्याची यांची ढब लॉर्ड चेस्टरफिल्ड यांस साजेशी होती; तथापि दिसण्यांत हे एखाद्या धर्मगुरूसारखे दिसत. डोक्याला थोडेंसे टक्कल असल्यामुळें यांची स्वाभाविक संन्यस्तवृत्ति अधिकच खुलत होती.

दुसरे गृहस्थ तरुण असून यांची वृत्तीहि तरुणाला शोभेशीच थोडीशी उतावीळपणाची होती. बोलण्यांत आणि कृतींतहि घरबंद बेताचाच दिसत होता. आत्मप्रौढीची थोडीशी छटा यांच्या ठिकाणीं दिसत होती. या शिष्टसंमेलनांत हेच गृहस्थ सर्वांत वयानें लहान होते. बोअर युद्धाच्या वेळीं यांची व माझी दृष्टभेट झाली होती. आपला कोट काढीत असतां, ते माझ्याकडे निरखून पाहूं लागले. दक्षिण आफ्रिकेंत माझ्याशीं झालेल्या भेटीचें स्मरण त्यांस होऊन ते मला म्हणाले, " मीं पूर्वी तुह्मांला कोठें तरी पाहिलें आहे. "

" होय मेहेरबान. ब्लोएमफाँटीनच्या लष्करी इस्पितळांत युद्धाच्या वेळीं आपली भेट झाली होती. "

" ओहो ! बरोबर; बरोबर. "

त्या वेळीं त्यांची जखम मीं बांधली होती. त्यांनीं मला ओळखलें, यावरून त्यांच्या विलक्षण स्मरणशक्तीची ओळख मला पटली.

अल्पसा उपहार झाल्यानंतर सारी मंडळी सकाळच्या बसण्याउठण्याच्या खोलींत गेली आणि खोलीच्या दरवाज्यावर मी पहाऱ्याकरतां उभा राहिलों. आंत काय खलबत चाललें होतें, हें मला माहीत नाहीं; पण एक तासानंतर मला आंत बोलावण्यांत आलें. दरवाजा उघडून आंत जातांच सर्व प्रकार मोठ्या गंभीरतेचा आहे, असें माझी मनोदेवता मला सांगूं लागली. ते दोघे इंग्रज गृहस्थ टेबलाच्या दोन्ही बाजूंकडून एकमेकांकडे तीक्ष्ण नजरेनें पहात होते. या देखाव्यावरून बऱ्याच गंभीर गोष्टींचा तेथें खल होत असला पाहिजे, असें अनुमान कोणालाहि साहाजिकपणेंच करतां आलें असतें. हें टेबल खोलीच्या मध्यभागीं मांडलेलें असून त्यावर दोन मोठे दिवे टांगलेले होते. काळोख पडूं लागला असल्यामुळें दिवे पेटवून मी खोलीच्या एका कोपऱ्यांत जाऊन उभा राहिलों. या सहा असामींचे त्या वेळचे चेहरे माझ्या पूर्ण लक्षांत आहेत. मंडळी भावी इतिहासाची सामुग्री तयार करण्यांत गुंतली होती. कागद, इतर लिहिण्याचें सामान आणि कांहीं सरकारी खलिते त्या टेबलावर जिकडे तिकडे पसरले होते. या मंडळीच्या लिहिण्यानें भरलेले कित्येक कागद टेबलावर जेथें तेथें पडलेले होते. फक्त फॉं हेरिनजेन यांजपुढील कागद मात्र कोरे होते. कोण कोणि गोष्टीसाठीं ते बहुधा टांक बुचकळीत नाहींत. सर्व गोष्टींचें टांचण ते आपल्या डोक्यांतल्या स्मरणवहींतच करीत असतात

मी खोलींत शिरलों त्या वेळीं या मंडळींचीं परस्पर संभाषणें बहुतेक संपलीं होतीं. त्या वेळीं ऑस्ट्रियाचे मारिट्झ यांचे एकच वाक्य मला ऐकूं आलें. " हें सर्व साधण्यासाठीं बाल्कन राष्ट्रांचा संघ फोडणें जरूर आहे. "

टेबलाच्या वरच्या बाजूकडे किंडरलेन वेक्टर बसले होते, ते उठून उभे राहिले. या वेळींहि त्यांच्या अंगांत मारवाडी रंगाचें एक जाकीट होतेंच. आपल्या डाव्या हाताकडे वळून त्यांनीं त्या तरुण इंग्रज गृहस्थाकडे आणि टिरपिट्झ यांजकडे कांहीं वेळ टक लावून पाहिलें. नंतर त्यांची तीक्ष्ण

नजर मॉरिट्झकडे वळली. मॉरिट्झ यांनीं जो एक प्रश्न शेवटीं उपस्थित केला होता, त्याचें उत्तर मंडळीकडून मिळेल अशी अपेक्षा या वेळीं त्यांच्या मुद्रेवर दिसत होती. वेक्टर यांनीं आपली नजर मॉरिट्झ यांजकडून काढून ती हेरिनजेन यांजकडे वळविली आणि अखेरीस त्या दुसऱ्या इग्रज गृहस्थाकडे पाहून ते बोलूं लागले. त्यांचें भाषण अद्यापिहि मला चांगलें स्मरत आहे. ते ह्मणाले, " सद्गृहस्थहो, जनरल मॉरिट्झ यांनीं काढलेला मुद्दा सध्या तसाच राहूं द्यावा. विशेषतः त्याबद्दल आपल्या सरकारांची अनुमति प्रथम मिळवावी लागेल. लॉर्ड—यांनीं म्हटल्याप्रमाणे हा मुद्दा अधिक घोंटाळा उपस्थित करणारा आहे. बाल्कन राष्ट्रांसंबंधीं ऑस्ट्रियालाच सर्वांत विशेष काळजी आहे. आतां माझ्या सबंधीं ह्मणाल, तर ह्या मुद्याला कबुली द्यावी, आणि तशी कबुली देणें योग्यहि आहे, असे मला वाटतें. " (हें भाषण चालू असतां सर्वांच्या मुद्रा किती गंभीर झाल्या होत्या, हें अद्यापिहि मला स्पष्ट दिसत आहे. त्याचा अर्थ ह्मणजे बाल्कन प्रकरण हातघाईवर येणें हाच होय.)

किडरलेन वेक्टर ह्मणाले, " एकंदर मुख्य मुद्यासंबंधीं आपणां सर्वांचें एकमत झालेंच आहे. आपल्या भेटीचा मुख्य हेतु इतकाच होता, कीं हे मुद्दे सिद्धीस नेण्यासाठीं ज्या काहीं गोष्टी कराव्या लागतील, त्या गोष्टींसंबधीं वाटाघाट करून त्या नक्की करावयाच्या. खुद्द बादशहांनीं हेंच सांगितलें होतें. तथापि बाल्कन राष्ट्रांचा हा मुद्दा आपल्या वाटाघाटींत पूर्वीच यावयास पाहिजे होता. तो आला नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. याकरतां मुद्दा सध्यां तसाच ठेवून व त्याबद्दल आपापल्या सरकारांस कळवून आपण परस्परांची पुनः भेट घ्यावी अशी माझी सूचना आहे. जरूर पडल्यास या दुसऱ्या भेटीचा योग आपण येत्या बुधवारीं जमवून आणूं. "

पण या दुसऱ्या भेटीचें कारणच उरलें नाहीं. ऑस्ट्रियाच्या मुद्याला सर्वांनीं संमति दिली.

किडरलेन वेक्टर खालीं बसले, त्या वेळीं लॉर्ड—यांनीं आपली संमति स्पष्ट शब्दांनीं दिली आणि इतरांनीं त्याला माना डोलाविल्या. ही सभा

बरखास्त झाली, हें उघडच होय. पण येथें जमून त्यांनीं साध्य काय केलें ? त्यांच्या भाषणाच्या ओघावरून त्या सर्वांचें एक मत झालें, हें उघड दिसत होतें; पण हें एक मत कशाबद्दल झालें ? कदाचित् लौकरच समजेल.

किडरलेन वेक्टर मला हांक मारून म्हणाले, " ब्यॉम्बबर्गर, टेबलावर कांहीं चिठोरीं पडलीं असतील, तीं सगळीं गोळा करून शेगडींत टाकून दे. "

" जी साहेब. "

मग ते इतरांकडे वळून म्हणाले, " कोणाला कांहीं टांचणें ठेवावयाचीं असतील, तर तीं त्यांनीं ठेवून घ्यांवींत. बाकीचे सगळे कागद आतां भट्टींत जावयाचे आहेत. "

सर्व मंडळी आपआपलीं टांचणें शोधूं लागली. आपणास जरूर असलेले कागद त्यांनीं निवडून घेतले. त्या तरुण इंग्रज मुत्सद्यानें भाराभर टिपणें केलीं होतीं आणि वृद्धया हेरिनजेननें एक ओळहि लिहिली नव्हती, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. टेबलावर पडलेलीं सर्व कागदाचीं चिटोरीं, टिपकागद आणि खरडलेले अथवा कोरे कागद मीं गोळा केले. हे सर्व कागद अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडावयाचे होते.

मीं एकेक कागद हळुहळू शेगडींत नेऊन टाकण्यास सुरवात केली; पण तो अग्निमुखांत टाकण्यापूर्वी त्यावर एकदां नजर फिरविण्यास मात्र मी चुकलों नाहीं. महत्त्वाचा असा एकहि कागद अग्नींत जाऊं द्यावयाचा नाहीं, असा माझा निश्चय होता. मधून मधून बरीचशी माहिती मिळविण्याची संधि मला सांपडे. त्या गृहस्थांनीं टिपणें केलीं होतीं, त्यांच्या निरनिराळ्या तुकड्यांतून मिळालेल्या माहितीची संगति मी मनांतल्यामनांत लावूं लागलों, आणि या माहितीच्याद्वारें या गृहस्थांपैकीं प्रत्येकाच्या मनांत कोणत्या प्रकारचे विचार घोळत असावेत, याचें अनुमान मला करतां आलें. सैन्य आणि आरमार या संबंधींचें टांचण बरेंचसें विस्तृत होतें. त्या इंग्रज गृहस्थानें ऑस्ट्रिया आणि जर्मनी यांची युद्धविषयक तयारी कितपत पूर्ण होती. याचें विस्तृत टांचण केलें होतें. इंग्लंड आणि आस्ट्रिया यांच्या आरमाराबद्दल व सैन्याबद्दल किडरलेन वेक्टर यांनीं बरीच माहिती लिहिली होती. त्याचप्रमाणें मारिट्झ यांनीं इंग्लंड आणि

जर्मनी यांजबद्दलच्या युद्धविषयक माहितीचें टिपण केलें होतें. या एकंदर हकीकतीवरून येथें तिरंगी संधीची वाटाघाट चालली होती व हे गृहस्थ परस्परांस आपापल्या राष्ट्रांची युद्धविषयक तयारी माहीत करून देत होते, असें उघड दिसून येण्याजोगें होतें. सैन्याच्या टाचणाप्रमाणेंच कांहीं आरमारी टांचणेंहि माझ्या पहाण्यांत आलीं. या टांचणांचा हेतु वरीलप्रमाणेंच उघड होता.

थोड्या वेळानें सर्व मंडळी टेबलाजवळून उठली व जोडी जोडीनें इकडे तिकडे फिरूं लागली. किंडरलेन वेक्टर व इंग्लंडचे मि.–हे शेगडीच्या बाजूला गेले आणि तेथील लोखंडी दांड्यानें भट्टींतील कागद खालींवर करूं लागले. कागद जाळतां जाळतां ते आपसांत हळुहळू बोलूं लागले. टेबलावरील एकेक कागद नेऊन शेगडींत टाकण्याचा माझा क्रम सुरूच होता. दुसरे गृहस्थहि जोडी जोडीनें फिरत असून आपसात बोलत होते. यांच्या भाषणाचा जो कांहीं भाग माझ्या कानावर आला, त्याचा शक्य तितका मुळाबरहुकूम गोषवारा मी येथें देतों.

हेरिनजेन आणि लॉर्ड–हे एका बाजूला उभे होते. हेरिनजेन म्हणाले, "आमच्या राखून ठेवलेल्या सैन्यावर विशेष भार न घालतां पस्तीस लक्ष शिपायी कोणत्याहि वेळीं आम्ही उभे करूं शकूं. आणि ऑस्ट्रियाशीं जो आमचा अलेरचा करार झाला आहे, त्याप्रमाणें ऑस्ट्रियाहि वीस लक्षांची मदत आह्मास करील. आतां पैशाच्या पुरवठ्यासंबंधानें ह्मणाल तर ती गोष्ट अर्थातच माझ्या हातची नाहीं. "–यावर लॉर्ड–यांनींहि कांहीं जवाब दिला; पण तो मला नीटसा ऐकूं आला नाहीं; तथापि त्यांनींहि मान हालविली, तीवरून हेरिनजेन यांच्या ह्मणण्यास त्यांची अनुमति होती, असें दिसलें.

या वेळीं तो तरुण इंग्रज गृहस्थ किंडरलेन वेक्टर यांस सोडून टिरपिट्झ यांजबरोबर कांहीं बोलत होता, असें दिसलें. त्याला जर्मन भाषा चांगलीशी येत नव्हती, यामुळें त्यांचें भाषण कांहीं इंग्रजींत व कांहीं फ्रेंच भाषेंत असें चाललें होतें. टिरपिट्झ ह्मणाले, "कांहीं बाहेरची परिस्थिति उत्पन्न झाली, तर तीबाबत इंग्लंडनें जबाबदारी घ्यावी, अशी आमची

अपेक्षा आहे. युरोपच्या बाहेरची जबाबदारी तुमच्या आरमारानेंच स्वीकारली पाहिजे, हें अगदीं उघड होय. "

इंग्रज गृहस्थाचा चेहरा थोडासा सावधगिरीचा झाल्यासारखा दिसला. तो गृहस्थ म्हणाला, "कदाचित् आणखीएक तिसराच घोंटाळा उत्पन्न होयाचा संभव आहे. परिस्थितीच्या अमलाखालीं युनायटेडस्टेट्स पूर्णपणें आमच्या विरुद्ध गेलें, तर कसें ? "

यावर अडमिरल टिरापिट्झ यांनीं थोडीशी तिरस्काराची मुद्रा करून ' उंः ' एवढेंच उत्तर दिले. पुढें ते जें कांहीं बोलले त्याचा आशय असाः— युनायटेडस्टेट्सला (अमेरिकेला) घरच्याच भानगडी पुरेशा आहेत. यामुळें इकडच्या उलाढालींत हात घालण्यास त्याला फुरसतच नाहीं, आणि कदाचित् तशी कांहीं ढवळाढवळ करण्याचा यत्न त्याने केलाच तर त्याच्या स्वतःच्या सरक्षाणासाठीं त्याचें आरमार त्याला अडवून ठेवावें लागेल; तथापि या साऱ्या गोष्टींचा सर्व विचार अडमिरल यांनीं त्या इंग्रज गृहस्थावरच सोंपविल्यासारखें दिसलें.

किडरलेन वेक्टर आणि मारिट्झ हे बाल्कन्सच्या वाटाघाटींत चूर होऊन गेले होते.

मारिट्झ म्हणाले, " थोड्याशा महिन्याच्या अवधींत तो प्रश्न आम्ही निकालाच्या मार्गास आणूं यांत संशय नाहीं. "

याचा अर्थ, बाल्कन्सची गुतागुंत निकालास लावण्याचा मार्गास ऑस्ट्रिया लवकरच लागणार, असा मीं केला. किडरलेन वेक्टर यांची मुद्रा फार गभीर दिसत होती. ते म्हणाले, " तसें करणें अगदीं अवश्य आहे. "

अशाच रीतीचीं भाषणें त्या खोलींत जिकडे तिकडे चालू होतीं आणि त्या सर्वांचा विषय एकच होता. हळू हळू या भेटीसंबंधानें एकंदर गोष्टी मला स्पष्ट दिसण्यास सुरवात झाली; तथापि जाळण्यापूर्वी कांहीं कागद मी पाहीपर्यंत या वाटाघाटीचें स्वरूप किती गंभीर होतें, हें माझ्या लक्षांत आलें नाहीं. या कागदांत काय मजकूर होता, याची पारिस्फुटता करणें मला बरें वाटत नाहीं; पण या भेटीमुळें बाल्कन युद्ध सुरू असतां एकंदर युरोपची शांतता सुरक्षित राहिली हें मात्र खरें.

प्रकरण नववें.

बाल्कन संस्थानांत.

ट्यानस अरण्यांतील माझी कामगिरी संपल्यानंतर बाल्टिक समुद्राच्या तीरावरील आल्बेक नांवाच्या सुप्रसिद्ध हवा खाण्याच्या ठिकाणीं मी गेलों. वुइलहेल्मस्ट्रासीच्या कामगिऱ्यांमुळें सतत वर्षभर मला पायपीट करावी लागली होती. यामुळे मला विश्रांति घेण्याची जरूर फारच भासूं लागली होती. या गांवीं येऊन मी आपली राहण्याची वगैरे व्यवस्था लावतों न लावतों तोंच वुइलहेल्मस्ट्रासीची एक तार मला आली. तींत " सवडीप्रमाणें शक्य तितक्या लवकर निघून या " असा मजकूर होता. या हुकमांतील सवड या शब्दाचा अर्थ एकदम असा करावयाचा, हें मला माहीत होतें. आपल्या हेरांना हुकूम करतांना सुद्धां गुळचट भाषा वापरण्याची जर्मनीची नेहमींचीच पद्धत आहे.

ही तार वाचून मला खरोखर थोडेंसें चिडल्यासारखें झालें, हें मी प्रांजळपणें कबूल करतों. आल्बेक येथें राहून चार दिवस मजेनें विश्रांति घेण्याचा माझा बेत अर्थातच ढांसळला. कांहीं तरी महत्त्वाची भानगड उपस्थित झाली असावी, असा तर्क मीं केला. कारण तसें नसतें; तर हक्काची रजा सुरू होते न होते तोंच मला परत बोलावण्यांत आलें नसतें. " साडे सातच्या गाडीनें येतों " असा जबाब मीं बर्लिनला पाठविला. थोड्याच तासांच्या अवधींत मीं स्टेशन गांठलें आणि दक्षिण दिशेकडे आमची गाडी झपाट्यानें चालू लागली.

हा प्रवास तीन तास चालावयाचा होता. तेवढ्या अवधींत एकंदर परिस्थितीचें निरीक्षण मी मनांतल्या मनांत करूं लागलों. कसल्या प्रकरणाच्या कामगिरीवर माझी योजना आतां होणार, याचा कांहीं अदमास लागला तर पहावा, असा माझा विचार होता. आमच्या गुप्त खात्यांत एक गप्प बरीच पसरली होती. तिचा विचार करून पुढें कांहीं मार्ग सांपडतो कीं काय, हें मी पाहूं लागलों. फ्रान्स आणि इंग्लंड यांची जुट फोडण्यांत केसर बादशहांनीं जी विलक्षण मुत्सदेगिरी दाखविली आणि त्याब-

रोबर इंग्लंडशीं जें सख्य संपादन केलें, त्यामुळें बाल्कन संस्थानांत चालू असलेल्या ऑस्ट्रोजर्मनांच्या राजनीतीला मोकळी वाट सांपडली.

आमची गाडी बर्लिनकडे झपाट्यानें जात असतां आणखीहि एका गोष्टीचा मी विचार करूं लागलों. रूसो—जपानी युद्धानतर युरोपांतील राजकारणांत आपलें वजन कमी होऊं लागलें आहे, असा अनुभव राशियाला आला होता. आपलें हें गेलेलें वजन पुनः परत मिळविण्याकरितां रशिया निकरानें यत्न करील, व तसें करण्याला त्याला आतांच संधि आहे, ही गोष्ट मला माहीत होती. रूसो—जपानी युद्ध संपल्यानंतर राशियाची तलवार बोथट झाली आहे, असें पाहून हरजगोविना आणि बॉसनिया हे प्रांत ऑस्ट्रियानें ताबडतोब गिळंकृत केले. ऑस्ट्रियाच्या या कृत्यांत त्याला जर्मनीचें पूर्ण पाठबळ होतें. या बाबतींत जर्मनी व ऑस्ट्रिया या दोन्ही राष्ट्रांचें संगनमत पूर्वीच झाले होतें. ऑस्ट्रियाच्या या कृत्यानें बाल्कन्समध्यें रशियास खटपट सुरू करावी लागली, हेंहि मला माहीत होतें. ग्रीक, सर्वियन, बलगेरियन आणि मांटेनिग्रीन या राष्ट्रांत परस्पर एकभाव उत्पन्न होऊं लागला होता. हा वेळपर्यंत हीं राष्ट्रे परस्परांस पाण्यांत पहात होतीं; पण तो मनु बदलण्याचीं चिन्हें दिसू लागलीं होतीं. हिंदुस्थानांत जितक्या जाती व जितकीं वेगवेगळीं मानव कुळें आहेत, तितकींच तीं बाल्कन सस्थानांतूनहि आहेत. आपल्या नेतृत्वाखालीं या सर्वांचें एकीकरण करावें, असा रशियाचा उद्देश होता. हा उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं अचाट उलाढाली, पाण्यासारखा पैसा आणि विलक्षण दीर्घोद्योग हीं राशियास खर्चावीं लागलीं होतीं. सर्वियाच्या युवराजानें सोफायास (बल्गेरियाची राजधानी) जावें असा घाट राशियानें जुळवून आणला. रशियाची ही युक्ति सफळ झाली आणि सर्विया व बल्गेरिया यांजमधील भेदभाव संपुष्टांत येण्याच्या मार्गाला लागला. किंबहुना सर्विया आणि बल्गेरिया हे एकजीवच झाले, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. मग तुर्कांविरुद्ध जय मिळविल्यानंतर या दोघांत जो त्रेसष्टाचा आंकडा दिसला, त्याचें कारण काय ? असा प्रश्न सहजच उद्भवतो. बाल्कन संस्थानांच्या राजकीय परिस्थितींत अंतस्थ



फाँ डर गोल्ट्ज.



जर्मनीचे युवराज.

रीतीनें जे प्रकार चालू होते, ते मी आतां उघडच तुह्मांला सांगतों, ह्मणजे त्यांत वरील प्रश्नाचें उत्तर आपोआपच मिळेल.

उच्च दर्जाच्या सर्वियन कामगारांच्या मनांत आपल्या जुन्या राष्ट्राची पुनः उभारणी करण्याचे विचार घोळत असल्याचें मीं एकदां ऐकलें होतें. त्या गोष्टीची या वेळीं मला आठवण झाली. बल्गेरियाहि अशाच प्रकारच्या विचारांत गुंतला होता. वॉलाचिया, आणि मोल्डाव्हिया यांची एकी करून याशिवाय ट्रान्सिलव्हानिया, बुकोव्हिना आणि आणि टेमेस्वर हे प्रांत मिळविण्याची इच्छा रुमानियाच्या डोक्यांत घोळत होती. यांपैकीं प्रत्येक राष्ट्राची स्वतंत्र सेना असून तिचें प्रत्यक्ष सामर्थ्य काय आहे, हेंहि नुकतेंच अजमाविलें होतें; पण प्रत्येक राष्ट्राच्या आकाराच्या आणि उत्पन्नाच्या मानानें प्रत्येकानें विलक्षण मोठें सैन्य बाळगलें होतें, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. अशा परिस्थितींत प्रत्येकाला आपआपली राज्यमर्यादा वाढविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाल्यास नवल नाहीं.

बाल्कन संस्थानांत सैन्याची जमवाजमव सुरू होती, व त्याची तयारीहि पहिल्या प्रतीची होती, ही गोष्ट मला माहीत होती. या सैन्याचा खर्च उत्पन्नाच्या मानानें फारच अवाढव्य होता. हा पैसा कोठून येत होता ? युरोपांतील मोठ्या पटावरील प्याद्यांसारखीं हीं बाल्कन संस्थानें होतीं.

बर्लिन येथें येऊन मी आपल्या बिऱ्हाडाकडे गेलों. मी दाराजवळ पोहोचलों, त्या वेळीं आठ वाजण्याचा सुमार होता. किम दरवाजांतच उभा असून विलक्षण आतुर झालेला दिसला. त्या वेळीं मला भेटण्यासाठीं कोणी तरी आलें होतें. आपल्या खेट्यांसोबत्यांस भेटण्यास घरीं न बोलवण्याची माझी पद्धत असल्यामुळें किम अधिकच गांगरून गेलेला दिसला.

" राम राम धनिसाहेब. कोणी गृहस्थ भेटावयास आला आहे. हें बरें कीं वाईट तें कांहीं सांगतां येत नाहीं. तो गृहस्थ म्हणतो, मीं चांगली बातमी आणली आहे. "

त्या गृहस्थाच्या येण्यानें किम अगदीं घाबरून गेला होता, हें मला अगदीं उघड दिसलें. हा गृहस्थ कोण असावा, याबद्दल तर्कवितर्क

करीत मी आपल्या खोलींत शिरलों. तों तेथें बुइलहेल्मस्ट्रासींतले एक गृहस्थ बसले होते; यांचें नांव हर फॉं स्ट्यामर असें असून वेडेलसाहेबाचे ते अगदीं विश्वासांतले हस्तक होते, हें मला माहीत होतें; तथापि नेहमींच्या पद्धतीपेक्षां ही भेटीला बोलावण्याची नवीच तऱ्हा पाहून मला थोडेंसें चमत्कारिक वाटलें. बुइलहेल्मस्ट्रासींत येण्याबद्दल हुकूम करण्याची नेहमींची पद्धत होती. असो. या नव्या प्रकाराचें कारणहि पुढें समजेल.

हर फॉं स्ट्यामर म्हणाले, " डॉक्टरसाहेब, तुमच्या घरीं पहारा मोठा कडक दिसतो. तुमचा हा कृष्णमूर्ति मला आंत येऊं देत नव्हता. "

मीं अर्धवट हंसल्यासारखी मुद्रा केली. किमशी तंटाभांडण करण्यांत या गृहस्थाला बराच त्रास झाला अतावा, हें माझ्या तेव्हांच लक्षांत आलें.

" डॉक्टरसाहेब, आल्बेकहून आलेली तुमची तार मिळाली. कौंट वेडेल सध्या दुसऱ्या कामांत गुंतले असल्यामुळे तुमच्या कामगिरीची समजूत तुह्मांला देण्याचें काम मजकडे आलें आहे. "

इतक्यांत कांहीं विड्या घेऊन किम आंत आल्यामुळें स्ट्यामर बोलावयाचे थांबले. किम गेल्यावर ते पुढें बोलूं लागले.

" तुह्मी ताबडतोब बेलग्रेडला जाऊन तेथील सध्यांची परिस्थिति कशी आहे, याचा पक्का खुलासा काढावा, अशी कौंटची इच्छा आहे. अंतस्थ रीतीनें तेथे कसलीं प्रकरणें शिजत आहेत, याची माहिती तुह्मी काढा. सरकारीरीत्या जी काय माहिती यावयाची ती आलेली आहेच; पण रशियाचें वजन बेलग्रेड आणि सोफाया येथें खरोखर किती वाढलें आहे, याचा अजमास आह्मांला काढावयाचा आहे. राशियाची अंतस्थ खटपट कितपत दूरवर गेली आहे, आणि ती कितपत जाण्याचा संभव आहे, याचा खुलासा तुह्मी काढा. बेलग्रेड येथें ही माहिती न मिळाली, तर तुह्मी सोफायाला (बलगेरियाची राजधानी.) जा; पण हे काम अतिशय लवकर झालें पाहिजे ही गोष्ट मात्र विसरूं नका. एकदर परिस्थितीची माहिती शक्य तितक्या लवकर आमच्या हातीं पडली पाहिजे. " इतकें बोलून हर स्ट्यामर थोडा वेळ थांबले. या कामगिरीचें महत्त्व माझ्याहि लक्षांत हळुहळू येऊं लागलें.

फॉ स्टयामर पुढें म्हणाले, " या कामगिरींत जरूर पडल्यास ऑस्ट्रियन हेरखात्याची मदत तुह्मास मिळेल; तथापि त्यांच्या माणसांपैकीं तुमच्याबरोबर कोणीच नसणें अधिक इष्ट आहे, हें तुह्मांला सांगावयाला नकोच. कारण ऑस्ट्रियन हेरखात्यातलीं सर्व माणसें बाल्कन संस्थानांतल्या रशियन एजंटाच्या ओळखीचीं आहेत. तुह्मीं सध्यां बुडापेस्ट (हंगेरीची राजधानी) येथें जा आणि तेथें पुढच्या साऱ्या मदतीची जुळवाजुळव करा. तुह्मांस कोठून मदत मिळण्यासारखी आहे, याची माहिती क्यासिमिर [illegible] यांजकडून मिळेल. हा ऑस्ट्रियन एजंट असून तो डोनॉस्ट्रासी नं० २४ येथें राहतो. तुमची त्याची ओळख आहे का ? "

" नाहीं. "

" ठीक आहे. त्याची मी अगाऊ तजवीज करतों, ह्मणजे तुमचा पुढचा मार्ग लवकर मोकळा होईल. तुमच्याबरोबर परवाना (पासपोर्ट) मात्र अवश्य पाहिजे. पूर्वी तुह्मीं एका कामगिरीवर तिकडे गेला होतां, आणि त्या वेळीं बरीच भानगड उपस्थित झाली होती. तिजमुळे सध्यांच्या कामांत तुह्मांला अडथळा येईल, असें तुह्मांला वाटते काय ? "

ते कोणत्या प्रसंगाला उद्देशून बोलत होते, हें माझ्या लक्षांत आलें. आलेक्झांडर राजा व ड्रागा राणी यांचा १९०३ सालीं वध झाल्यानंतर एका आठवड्यानें मी सर्वियांत गेलो होतों. या कामागिरीचें स्मरण करणें सुद्धां मला अगदीं आवडत नाहीं, कारण त्या स्मरणाबरोबर सहा मॉसर बंदुकींच्या नळ्या माझ्या नजरेसमोर दिसू लागतात. ती सारी हकीकत माझ्या वाचकासहि आठवत असेलच.

त्या वेळची माझी ओळख ठेवण्यासारखीं दोनच माणसें तेथें होतीं. यांपैकीं कर्नल निगलीस हे मृत्यु पावले होते. राजाराणींच्या वधाच्या वेळीं त्यांचाहि वध झाला होता. दुसरे गृहस्थ स्टॉबोल हे अद्यापि हयात असून त्यांची व माझी गांठ पडण्याचाहि बराच संभव होता. माझी गांठ पडल्यास हा सद्गृहस्थ मला ओळखील एवढेंच नव्हे, तर कदाचित् माझ्या पाठींत लांबलचक सुऱ्याची बक्षिसीहि देईल, अशी माझी

खात्री होती. या कामागिरीवर जाण्याचें नाकारावे असे माझ्या मनांत येऊ लागलें. माझ्या पूर्वीच्या कामागिरीचा जो अनुभव मला आला होता, त्यामुळे येथील एकंदर लोकांबद्दल माझें मन अगदीं विटून गेले होतें. बाल्कन संस्थानाइतका भयंकर घोंटाळा जगांत दुसऱ्या कोठेहि नसेल. थोड्याशा रकमेच्या लालचीनें विश्वासघात करणारे अथवा प्रसंगीं खूनहि करणारे लोक तेथें वाटेल तितके आहेत. त्यांच्या एकदर चालचालुणुकीची थोडीशी चव मला मिळाली होती. तेवढ्यानें माझी जीभ अगदीं विटून गेली होती. माझ्या मनांत काय चाललें आहे, याचा सुगावा फॉ स्टचामर यांस लागला असावा. ते म्हणाले,

" काय डॉक्तरसाहेब, घाबरलां कीं काय ? "

मी मनांतून खरोखरच घाबरलों होतों, आणि मीं त्यांना तसें स्पष्ट सांगितलेंहि.

" या कामागिरीवर जाण्याची तुमची इच्छा नसणें स्वाभाविक आहे. याशिवाय एकसारखे पांच महिने तुम्ही कामाला जुंपले असल्यामुळें तुम्हांला विश्रांतीची जरूर आहे, हेंहि मला कबूल आहे; तथापि तुमच्याशिवाय या कामागिरीवर नेमण्याला लायक असा दुसरा इसम आमच्यापाशीं नाहीं, हेंहि तुम्हीं लक्षांत घ्यावें अशी माझी विनंति आहे. "

यानंतर फॉ स्टचामर आपल्या ' विनंतीला ' आणखी अशी कांहीं भर घालूं लागले कीं, ती कामागिरी मीं नाकारल्यास ती गोष्ट बुइलहेल्मस्ट्रासीच्या पसंतीस उतरणार नाहीं, हें मला पक्के कळून चुकलें. ही कामागिरी नाकारणें म्हणजे पुढील कामागिऱ्यांतूनहि स्वतःला वजा करण्यासारखेंच होतें. याशिवाय फॉ स्टचामर यांनीं दुप्पट बक्षिसाची लालूच लावली तें वेगळेंच. या बक्षिसाच्या रकमेनें माझ्या तोंडास पाणी सुटलें, ही गोष्ट मी मोकळ्या मनानें कबूल करतों. या कामागिरींत फार तर माझा महिनाभर मोडेल आणि नेहमींच्या बक्षिसाशिवाय ७ । ८ हजार रुपये माझ्या पदरीं पडतील, ते वेगळेच. माझ्या चित्तात विचाराचें द्वंद्व सुरू झालें. जावें कीं नाहीं याबद्दल अद्यापिहि माझा निश्चय होईना. मला तेथें ओळखणारे लोक भेटतील, आणि जेथें मला जावयाचें तेथले

लोक विलक्षण माथेफिरू व उतावळ्या स्वभावाचे. इंग्लड किंवा फ्रान्स या देशातल्या कामगिऱ्यांपेक्षां ही कामगिरी कितीतरी पटीनें आधिक कठिण आणि अधिक भयप्रद होती. त्यानस अरण्यातील कामगिरी फार कठिण होती, ही गोष्ट खरी; पण तींत माझ्या जीविताला धोका पोंचण्याचा यत्किंचितहि सभव नव्हता. अखेरीस फॉ स्ट्यामर हे जेव्हां माझ्या उत्तरासाठीं मला पुनः पुनः विचारूं लागले, तेव्हां विचारासाठीं मीं थोडींशीं मुदत मागून घेतली.मध्यरात्रींपूर्वी त्याच्या घरीं टेलिफोननें माझें उत्तर मी त्यांस कळवीन असे सागितल्यानंतर ते निघून गेले.

मी अद्यापिहि खिस्ताचा अनुयायी म्हणवितों आणि मी तसा आहे ही गोष्ट खरी; तथापि आफ्रिका आणि हिंदुस्थान या देशाचा मला बराचसा सहवास झाला असल्यामुळें त्याच्या भोळसरपणाचा संसर्गाहि मला लागलेला आहे. एखादी गोष्ट करावी कीं करूं नये, याबद्दल माझ्या चित्तांत निश्चय होईनासा झाला म्हणजे पत्त्यांचे दोन डाव घेऊन त्यांच्या खेळावरून मी आपल्या कामाचा निकाल करून घेत असें. तिहींपैकीं एक वेळ तरी माझ्या मनांतला इष्ट पत्ता मला मिळाला तर मी माझें काम हातीं घेत असें. हा पत्त्यांचा निकाल नेहमींच माझ्या पथ्यावर पडत आला आहे. या निकालाविरुद्ध मीं फक्त दोनदांच वर्तन केले आणि दोन्ही वेळ त्या कामगिऱ्या माझ्या गळ्याशीं आल्या.

फॉ स्ट्यामर यांना मीं निश्चयात्मक उत्तर दिलें नाहीं, याचें हेंच कारण, होय. मीं सांगितल्याप्रमाणें किम पत्त्यांचे दोन जोड घेऊन आला आणि मी खेळूं लागलों. दुसऱ्या वेळीं माझें इष्ट पान मला मिळालें. पत्ते फेकून देऊन मी ताबडतोब टेलिफोनवर गेलों आणि कामगिरीवर जाण्यास तयार असल्याचें फॉ स्ट्यामर यांस कळविलें. त्यानीं मला एकदम आपल्या घरीं बोलाविलें. त्यांच्या घरीं गेल्यानंतर त्यांनीं मला आणखी कांहीं माहिती दिली व बाल्कन संस्थानांत प्रवेश होण्यासाठीं अवश्य असणारे परवानेहि माझ्या स्वाधीन केलें.

दुसऱ्या दिवशीं पहाटे तीन वाजतां व्हिएन्नाच्या मार्गानें जाणाऱ्या ओरिएंट एक्स्प्रेस गाडीनें मी निघालों आणि बुडापेस्टला येऊन पोहों-

चलों. बुडापेस्ट येथें येऊन मी ताबडतोब डोनॉस्ट्राझी नं. २४ येथें मेलों आणि ऑस्ट्रियाचे एजंट कोवॉलस्की यांची गांठ घेतली. त्यांजपासून जी माहिती मला मिळाली, तिचा मला फार उपयोग झाला. बेलग्रेड येथें माझ्या उपयोगीं पडण्यासारख्या माणसांचे पत्ते त्यांनीं मला दिले. तसेंच कांहीं माणसांचीं–विशेषत–कांही स्त्रियांचीं नांवें देऊन त्यांजबद्दल फार सावधगिरी राखण्याविषयीं त्यांनीं मला सुचविलें. हीं माणसें रशियाच्या हेरखात्यांतलीं होतीं. त्याच रात्रीं मी बुडापेस्टहून निघालों आणि सर्वियाच्या बेलग्रेड राजधानींत येऊन दाखल झालों.

बेलग्रेडमध्यें हॉटेल दि प्यारीस नांवाच्या हॉटेलांत माझ्यासाठीं प्रथमच जागा मुक्रर करण्यांत आली होती. ही जागा सर्वांत अत्युच्च दर्जाची होती. एवढ्या श्रीमंती थाटाने येथें राहण्यांत माझा एक विशेष हेतु होता. बाल्कन संस्थानांत पैसा हाच काय तो एक परमेश्वर ओळखला जातो. आपण थेट प्यारीसच्या थाटाने राहणारे आहों, असा अभिमान बेलग्रेड येथील लोक बाळगतात. त्या ठिकाणचा प्रत्येक अम्मलदार एखाद्या रशियन ग्रँडडयूकच्या थाटाने रहात असतो. त्याचा पगार पाहिला, तर तो बहुधा अगदींच थोडा असतो. मग एवढ्याशा पगारावर हे इतक्या थाटानें कसे राहूं शकतात, याबद्दल एखाद्या परस्थाला खरोखर अचंबा वाटण्यासारखा आहे; पण या कोड्याचे उत्तर हेच कीं, त्यांच्या पाठीमागें रशियाची तिजोरी आहे, तोंपर्यंत त्यांच्या थाटामाटांत कांहीं उणीव येण्याचें कारण नाहीं. रशियाच्या सोन्यांत असा कांहीं गुण आहे कीं, बुडापेस्टच्या दक्षिण भागांत वाटेल ती जिन्नस त्याला प्राप्त करून घेतां येते. त्याची मात्रा मांटेनिग्रोंत किंवा उस्मानलींत मात्र चालत नाहीं.

मीं पाण्यासारखा पैसा उधळण्यास सुरवात केली; यामुळें लवकरच तेथें माझें नांव सर्वतोमुखीं झालें. चैनी लष्करी अम्मलदार माझी मैत्री संपादन करण्यासाठीं धडपडूं लागले. या अम्मलदारांत मेजर गोस्कीं या नांवाचा एक अम्मलदार होता. हे गृहस्थ मोठें चैनी असून त्यांना जुगारीचाहि नाद होता. ते एखाद्या ग्रँडडयूकच्या थाटानें रहात होते. अशा प्रकारच्या कामगिरींत असले चैनी आणि व्यसनी लोकच आह्मां

हेरांच्या फार पथ्यावर पडत असतात. या मेजरसाहेबांच्या खिशांत खुळखुळणारा पैसा रशियाकडून येत होता, ही गोष्ट मला माहीत होती. कोवॉलस्की यांनीं हें मला अगोदरच सांगितलें होतें. रशियाच्या पैशानें या भल्या गृहस्थाचे खिसे पिंवळे झाले असले, तरी त्याजकडूनच मला जरूर असणारी माहिती मिळेल, अशीहि माझी खात्री होती.

मेजरसाहेबांस आपल्या जाळ्यांत कसे धरावे याचा विचार मी करूं लागलों. हॉटेल दि प्यारीसमध्ये जगी मेजवान्या देण्याचा उपक्रम मीं सुरू केला. जेवण झाल्यानंतर मी मेजरबरोबर जुगार खेळूं लागलो. त्यात मेजरसाहेबच नेहमीं जिंकतील अशी व्यवस्था मी करीत असे. माझ्याकडून मिळविलेला पैसा ते दुसऱ्याबरोबर खेळून गमावीत; पण त्यांच्याबरोबर खेळत असतां डाव न जिंकण्याचा यत्न मी नेहमीं करीत असें, यामुळें मेजरसाहेब सदोदित माझ्या चौकशींत राहूं लागले. असल्या लोकांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणे हा मेजरहि बडा दारूबाज होता. सपाटून दारू पिऊन हे गृहस्थ अगदीं तर्र झाले म्हणजे यांची जिव्हाहि अद्वातद्वा वरळूं लागे. अशा वेळीं अनेक सूचक प्रश्न करून जरूरीची माहिती मिळविण्याचा यत्न मीं केला; पण त्यांत मला फारसें यश आलें नाहीं. एकाद्या प्रश्नाबद्दल थोडीशी शंका येतांच मेजरसाहेब आपल्या तोंडाला पक्कें कुलूप घालीत.

रेनी दुवल नावाच्या एका फ्रेंच बाईबरोबर मेजरसाहेबांचें विशेष संघटन असून ते नेहमीं तिच्या संगतींत असल्याचें मीं पाहिलें होतें. मेजरचें त्या बाईशीं बरेंच सूत असावें, असें उघड दिसून येत होतें. तिच्या एकंदर वागणुकीवरून तिचें मनहि मेजरवर जडलें असावें, असें अनुमान मीं काढलें. तिच्याशीं अधिक घरोबा संपादण्याचा यत्न मीं सुरू केला. सोन्याच्या अथवा इतर खटपटींच्या जाळ्यांत एकादें सावज गोंवले गेलें नाहीं, तरी पाणीदार डोळ्यांच्या जाळ्यांत तें खास गोंवलें जातें असा अनुभव मला आला. बेलग्रेडमध्यें अशा प्रकारचा धंदा करणाऱ्या स्त्रिया विलक्षण उघळ्या असतात, आणि दुवलबाईहि यांपैकींच एक होती. तिला जुगारीचा फार शोक होता. एके रात्रीं संधि साधून सुमारे तीनशें

रुपयाची रक्कम मीं तिला उसनी दिली. यानंतर तिचें व माझें दळणवळण वाढत चालले.

एकाद्या परराष्ट्राच्या खात्यात ही बाई नोकर असावी अशी शंका मला पूर्वी कव्हाहि आलेली नव्हती. उलट तिच्या वागणुकीवरून असल्या प्रकाराशी तिचा काही संबंध नसावा, असेच कोणालाहि वाटलें असते; पण हा धंदाच असा आहे की, त्यांतल्या प्रत्येक माणसाला सदोदित चोहोकडे काकदृष्टीने पाहण्याची सवय झालेली असते. दुवलबाई फ्रेंच भाषा उत्तम बोलत असे. तिची चेहरेपट्टीहि फ्रेंच पद्धतीचीच होती. तसेच तिची सर्व चालरीतहि फ्रेंच पद्धतीची होती; तथापि ती खरोखरच फ्रेंच स्त्री होती कीं नाही, याबद्दल माझे मन साशंक होतें. अशा प्रकारच्या स्थितींत आपले चित्त सदोदित साशंक ठेवणे हेच फार शहाणपणाचें असते. मीं तिजबद्दल बारीक तपास सुरू केला. तिच्याशीं संभाषण करताना बारीकसारीक सूचक प्रश्नहि मी तिला करीत असे. ती कांहीं तरी विशेष कार्यात गुंतली असावी असें मला हळूहळू दिसूं लागले. बाहेरून जी चवकशी मीं केली तीवरून ती बाई फ्रेंच असावी, असे दिसले; तथापि माझ्या मनाचें समाधान मात्र झालें नाहीं. अखेरीस माझी शंका अनाठायीं नव्हती असें सिद्ध झालें.

एके रात्रीं हॉटेल दि पॉरिसमधील आपल्या खोलींत दुवलबाईने एक मेजवानी दिली. भोजनानंतर जमलेल्या मंडळींत जुगार सुरू झाला. तिच्या या खाजगी बैठकीच्या जागेंत तिची जातकुळी निश्चितपणें सिद्ध करणारी एकादी तरी चीज आढळून येईल असा माझा अजमास होता. ती खरोखरच फ्रेंच आहे कीं माझ्या शंकेप्रमाणे ती दुसरीच कोणी आहे, याचा निकाल या बैठकींत लावण्याचा माझा विचार होता. मीं आपली काकदृष्टि चोहोकडे फिरविली; पण त्या बाईचा संबंध रशियाशीं जोडण्याजोगी एकहि वस्तु मला तेथें आढळून आली नाहीं. थोड्या वेळानें दुवलबाई तेथून आंत गेली आणि एक खडीसाखरेचा खाऊ खात खात बाहेर आली. या खाऊनें बाईची खरी जात जाहीर केली !

हा खाऊ फक्त रशियामध्येंच तयार होत असून अशाच प्रकारच्या

फ्रेंच किंवा तुर्की खाऊपेक्षां अगदीं वेगळ्या पद्धतीने हा तयार केलेला असतो. हे पक्कान्न म्हणजे गुलाबाचीं ताजीं पाकविलेलीं फुले होत. ज्या पद्धतीने ते बनविले जाते, त्या पद्धतीचें रहस्य फक्त मास्को येथील डेमीट्रॉफ अॅन्ड सन्स यांनाच माहीत आहे. पदार्थाच्या चवीची खुबी जन्मसिद्ध मस्कोव्हाईट (रशियन) शिवाय दुसऱ्या कोणास कळावयाची नाहीं. संयमीने या पदार्थाची लज्जत उत्पन्न करून घ्यावी लागते. जो जन्मतः रशियन असेल, त्याला किंवा पुष्कळ वर्षे रशियांत राहिला असेल त्यालाच या पदार्थाची लज्जत कळते.

दुवलबाईची मला पूर्वीची माहिती मुळीच नव्हती; तथापि असल्या प्रकारच्या स्त्रियांची माहिती युरोपांतील साऱ्या गुप्त पोलीस खात्यांना बहुधा हटकून असते. तिच्या जातकुळीबद्दल बहुतांशीं खात्री होऊन चुकलीच होती. तेव्हां तिजबद्दल आणखी माहिती मिळवून त्या बाईच्या एकंदर कुळकथेचा शोध करण्याचें मीं निश्चित केले मीं तिचे दोन फोटो मिळविले. तसेच तिच्या हस्तलेखाचा नमुनाहि मीं पैदा केला. यांपैकीं प्रत्येकीं एक फोटो व एक नमुना व्हिएन्ना व बर्लिन येथील गुप्तपोलीस खात्याकडे पाठवून त्या बाईबद्दल शक्य तितकी खुलासेवार माहिती तारेने मला कळविण्यास मीं त्या खात्यास विनति केली. अष्टेचाळीस तासांच्या अवधींत मला व्हिएन्नाहून जबाब आला. ही बाई ऑस्ट्रियन पोलीसाच्या पक्की ओळखीची होती. ग्यालिशिया प्रांतातिल चैनबाजाच्या एका जुगार खान्यात पहारा ठेवण्याचें काम ही करीत असे. एका खुनाच्या खटल्यांत तिजवर वहीम आल्यामुळे ती गॅलिशियांतून फरारी झाली होती. क्रॅको येथें तिनें पॉला असें नांव धारण केले होते, व पोलीस तिच्या शोधांत होतेच.

नंतर दुसऱ्या एका वेळी दुवलबाई एकटी आहे, असें पाहून मी तिच्या भेटीला गेलों. एक अत्तराची पेटी भेटीदाखल तिच्या हातांत देऊन मीं तिला एकदम म्हटलेः—

" पॉला, क्रॅकोपेक्षां तुझा येथला धंदा निराळाच आहे, नाहीं बरें ! " अशा गोष्टींत एकदम निकराचा हल्ला चढविणें फार शहाणपणाचें असतें.

उगीच इकडे तिकडे सूचक प्रश्न विचारल्यानें आपला प्रतिस्पर्धी सावध मात्र होतो. माझ्या प्रश्नाचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. तिचा चेहरा खरकन उतरला. एखाद्या स्त्रीवर मीं अशा रीतीनें तुटून पडावे व तिला एकदम नामोहरम करावें यावद्दल स्त्रीदाक्षिण्याच्या चाहत्यास विषाद वाटेल, व ते माझ्यावर पशुत्वाचा आरोप करतील, हें खरें; तथापि तसें करण्यावाचून मला गत्यंतरच नव्हते. या शिवाय अशा स्त्रियांना सदसद्विवेक बुद्धीची ओळखहि नसते हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

" अरे देवा ! तुम्ही आहां तरी कोण ? "

" मी कोणी कां असेना ? तुझी इतकी आणि याहूनहि अधिक माहिती मला आहे, एवढे मात्र ध्यानांत ठेव. तुझा ठावठिकाणा ऑस्ट्रियन पोलिसाला समजला तर त्यांना खरोखर फार आनंद होईल. त्यांना ही बातमी मी देऊ का ? "

" गप्प बसावयाला काय घ्याल ? "

" मला रशियासंबंधीं जी कांहीं माहिती पाहिजे आहे, ती तूं मिळवून दे, म्हणजे माझें तोंड बंद होईल. "

तिनें पूर्ण आश्चर्याची मुद्रा या वेळीं धारण केली.

" काय ? रशिया ? रशियाबद्दल मला कांहींच माहिती नाहीं. "

मी हसत हसत तिच्या टेबलाजवळ गेलों आणि तेथें असलेल्या एका चांदीच्या बर्शीतून पाकवलेले गुलाबाचें फूल उचललें. " पॉला, तूं मोठी धूर्त आहेस ही गोष्ट खरी, पण तितकीच तू निष्काळजीहि आहेस. रशियाची माहिती तुला यत्किंचितहि नाहीं; पण रशियनांच्या या आवडत्या पक्वान्नाची लज्जत मात्र तुला चांगली लागली आहे. पॉला, हें खरोखर मोठें आश्चर्य म्हटले पाहिजे. "

आपले ओंठ सडकून चावून ती म्हणाली, " तुह्मांला पाहिजे तरी काय ? "

" मला काय पाहिजे हे सांगण्यापूर्वी तुला एक गोष्ट बजावून सांगतों ती ध्यानांत धर. माझ्याशीं तुझे लपंडाव बिलकूल चालावयाचे नाहींत

तुझ्या मनांत असेल, तर माझा खून कायदेशीर रीतीनें करणें, ही गोष्ट फारशी अवघड नाहीं. "

तिच्या भोंवतीं लष्करी अम्मलदारांचा बराच घोळका जमत असे. यांपैकीं एखाद्याला मीं तिचा अपमान केला, असें समलें म्हणजे पुरे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो इसम माझ्याकडे येऊन मला द्वंद्वासाठीं आव्हान करावयाचा, आणि या भांडणाचा निकाल पिस्तुलाची एखादी गोळी माझ्या शरीरांत शिरून व्हावयाचा.

" ध्यानांत ठेव; जर माझें येथें कांहीं वाईट झालें, आणि दर सहा तासांला माझ्या सुरक्षितपणाची खबर व्हियेन्नाला गेली नाहीं, तर सातव्या तासाला तुझ्या हातांत कडींतोडे पडतील. ऑस्ट्रियन बादशाहीच्या वारंटानें तुला पकडण्यांत येईल तुझे दोस्त लष्करी अम्मलदार असले, तरी तुला मदत करण्याची त्यांची छाती नाहीं. बादशाहींतून आलेले वारंट फेंटाळून लावून ऑस्ट्रियाचा क्रोध सरविया आपणावर ओढून घेईल हें शक्यच नाहीं. पॉला, ध्यानांत ठेव; सरवियाच्या सरहद्दीवर या क्षणीं ऑस्ट्रियन फौजा जय्यत उभ्या आहेत. "

या वेळीं तिचा चेहरा तिच्या विषारी अंतःकरणाची पूर्ण साक्ष देत होता.

मीं आपलें भाषण पुढें चालविलें. " पॉला, मला आतां काय पाहिजे आहे, हे मी तुला सांगतो. मेजर गोस्कीं रशियन सरकारची तैनात खात आहे. येथे रशिया ज्या भानगडी करीत आहे, त्याची सारी गुरुकिल्ली त्याच्याजवळ आहे. रशिया येथें आपला पाय किती रोवणार, याचा बरोबर अंदाज त्याला आहे. ती गुरुकिल्ली मला हस्तगत करून घ्यावयाची आहे आणि ती तूं मला मिळवून दिली पाहिजे. मेजरला कशाची जरूर आहे याचा अजमास मीं काढला आहे. त्याला सध्यां पैशाची फार जरूर आहे. पैशासाठीं रशियाच्या रहस्याची विक्री करण्यास तो फारसा कांकूं करणार नाहीं. पण तुझी नजर त्याच्यावर असल्यामुळें तसें करावयास तो भितो. पॉला, येथल्या रशियन एजंटावर व विशेषतः या गोस्कींवर नजर ठेवण्याकरतांच रशियानें तुझी योजना केली आहे. ही गोष्ट मला पक्की

ठाऊक आहे. तेथल्या राजकीय घडामोडींची बित्त बातमी जितकी त्याला आहे, तितकी तुला नाहीं, हेंहि मला माहीत आहे. जर तुझ्याजवळ तशी बातमी असती, तर गोस्कींच्या मागें न लागतां तुझ्यापासूनच ती मीं घेतली असती. असो. आतां तुला काय करावयाचें आहे, तें सांगतों. तुझ्यावर माझी नजर नाहीं, असें गोस्कींला तूं कळव. गोस्कींनें रशियाचा विश्वासघात केला, तरी त्याच्याविरुद्ध तुझा रिपोर्ट जाणार नाहीं. असें तूं त्याला स्पष्ट सांगितलेंस म्हणजे तुझें काम संपलें. हे पहा, पॉला, तुझें त्याच्यावर प्रेमही जडले आहे. तेव्हां मी म्हणतों, असें करण्यांत तुला अवघड काहींच नाहीं. तो सुरक्षित रहावा अशी तुझी इच्छा असेल, तर मी म्हणतो असेच तुला केलें पाहिजे. नाहीं तर त्याचे जें होणें असेल तें होईलच. त्याच्याविरुद्धहि एक शस्त्र माझ्याजवळ तयार आहेच. "

हे शेवटचें वाक्य मी नुसत्या अनुमानधपक्यावरच बोलून गेलों होतो. पण त्याचा परिणाम तिच्यावर खूपच झाला. ती म्हणाली, "तुम्ही म्हणतां असें मीं केले, तर तुमच्या बाजूने तुम्ही आपलें वचन राखाल याचा काय भरंवसा ? "

मीं म्हटलें, " मीं आपले वचन कां राखावें याचें कारण इतकें सयुक्तिक आणि उघड आहे, कीं तें तुझें तुलाच समजलें पाहिजे. तुम्ही आम्ही जो धंदा करतों, त्यांत आपली मुख्य नजर अखेरच्या परिणामावर मात्र असते, हें तुला ठाऊक नाहीं काय ? मला जी माहिती पाहिजे, ती मिळल्यानंतर तुमच्या दुसऱ्या भानगडींत पडण्यापासून मला फायदा काय ? मी तुला वचन देतों कीं, तुझी ही क्रॅकोची भानगड मी अधिक पुढें जाऊं देणार नाहीं. याशिवाय तुला एकादा हिऱ्याचा दागिनाहि मी देतों, मग तर झालें कीं नाहीं ? आतां सबदा पक्का झाला ना ? "

त्या रात्रीच्या कामगिरीनें संतुष्ट होत्साता मी आपल्या हॉटेलांत परत आलों.

दुसऱ्या दिवशीं मेजरसाहेब मला भेटावयास आले. त्यांचा चेहरा विलक्षण चिंतातुर दिसत होता. प्रारंभींचा नमस्कारचमत्कार झाल्यानंतर मीं त्यांना म्हटलें, " दुवलबाईशीं तुमची भेट झाली वाटतें ! "

मेजरसाहेब एकदम दचकून म्हणाले, " हें तुह्मांला कसें कळले ? "

" मेजरसाहेब, तुमचें इतक्या सकाळीं आगमन आणि चिंतातुर चेहरा या गोष्टींची साक्ष देत आहे. मला आतां फारसा वेळ नाहीं. तुमचें हे धाकटे प्यारीस (बेलग्रेड) मजचे आहे खरें; पण मला आपला बाल्टिक किनारा आवडतो. तुम्हाला मला काहीं सांगावयाचें असेल, तर तें अगदीं थोडक्यांत आणि अगदीं चटपट सागा पाहूं. व्हिएन्नाला जाण्याकरतां मी आज दुपारींच निघणार आहें. तुमची कातडी शाबूत राहील, हें तुह्माला सांगावयास नकोच. तसेंच मी गेल्यानंतर राशियाकडची तुमची तैनातहि थांबणार नाहीं, हें उघड आहे. पण माझ्या पाठीमागें तुह्मी कसे वागाल हें पाहण्याचें कारण मला नाहीं. येथें व रुमानियांत राशियानें काय काय खटपटी केल्या आहेत, हे स्पष्टपणें तुह्मीं सांगितलें ह्मणजे माझें काम झालें. "

" रुमानियाबद्दल मला कांहींच माहिती नाहीं. "

" हे पहा, मेजरसाहेब, माझ्यापुढें असें वेड पांघरण्यांत काय बरें अर्थ आहे ? तुह्मांला येथली जितकी माहिती आहे, तितकीच रुमानियाचीहि आहे. एक तर मोकळेपणानें सारी माहिती मला द्या. नाहीं तर मुळींच बोलूं नका. माझ्यापासून तुह्मांला एकहि गोष्ट छपवितां येण्यासारखी नाहीं. हें दुवलबाईनें—अथवा पॉलानें ह्मणा—तुह्मांस सांगितलें असेलच. " अधिक आढेवेढे न घेता मेजरसाहेबानीं एकंदर सारी हकीकत मला स्पष्टपणें सांगितली. तिचें तात्पर्य असें:—

फ्रेंचांच्या तिजोरीच्या साह्याने बल्गेरिया आणि सर्विया यांना खूप पैसा चारून टर्कीविरुद्ध राशिया त्यांना मथवीत होता. पुष्कळसे नॉनकमिशन्ड फ्रेंच आणि राशियन लष्करी अम्मलदार बेलग्रेड आणि सोफाया यांमध्यें लोटत होते. बाल्कन संघाच्या सैन्यांत खडी लष्करी नौकरी बजावण्यास हे सर्व अम्मलदार एका पायावर तयार होते. सैन्यांतील मुख्य मुख्य लष्करी अधिकारी आणि कांहीं मुत्सद्दी राशियाची तैनात खात होते. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं तेथें वशीकरणाची क्रिया पूर्ण धडाक्यानें चालू होती. बाल्कनसंघ राशियाच्या पूर्ण कह्यांत आणण्याची ही

विद्या होती. बाल्कनसंघाच्या सैन्याला नव्या पद्धतीचा फ्रेंच तोफखाना पुरविण्यांत आला होता. रशिया आणि फ्रान्स यांच्या पैशानें बल्गेरिया आणि सर्विया यांचीं सैन्यें पोसलीं जात होतीं. या साऱ्या हकीकतींवरून फ्रान्सच्या साह्यानें रशियाचे पाऊल तेथें किती पक्कें रोंवलें गेलें होतें, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. ते इतके पक्कें रोंवलें गेले होतें कीं, आता तें मागें नेण्यांत रशियाला फायदा नव्हता.

बाल्कन संस्थानांत अशा प्रकारची परिस्थिति उत्पन्न झाली आहे, असा सशय जर्मनी व ऑस्ट्रिया यांना आलेला होताच; तथापि प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे, याचा शोध करण्याकरितां त्यांनीं माझी योजना केली होती. मला मिळालेल्या एकंदर माहितीवरून बाल्कन्समध्ये रशियाच्या वाढत्या वजनास आळा घालणें जर्मनीस व ऑस्ट्रियास किती अवश्य होतें हें दिसून आलें. त्याच रात्रीं मी ओरिएंट एक्स्प्रेस गाडीनें एकदम बर्लिनला आलों आणि कामागिरीचा रिपोर्ट फॉं स्टचामर यांस सादर केला. कौंट वेडेल हे केसरबरोबर कोठें बाहेर गेले असल्यामुळे मला खुद्द त्यांजकडे रिपोर्ट करतां आला नाहीं.

बाल्कन्समध्यें वाढलेलें रशियाचें वजन नाहींसें करण्याचा उपक्रम ऑस्ट्रिया व जर्मनी यांनीं ताबडतोब सुरू केला. रशियाच्या प्रमुखत्वाखालीं बल्गेरिया, सर्विया, मांटेनिग्रो यांचा संघ पक्का बनला असता, तर जर्मनी, ऑस्ट्रिया आणि इंग्लड यांच्या राजकारणांत तो एक जबरदस्त अडथळा आला असता. टचानसच्या अरण्यात एकत्र भेटून या तीन देशांच्या मुत्सद्यांनीं जो बनाव घडवून आणण्याचे योजिलें होतें, त्याला या गोष्टीनें अडथळा आला असता. याकरतां हा संघ फोडणें अवश्य झालें होतें. ऑस्ट्रिया व जर्मनी याच्या कारस्थानाने हा संघ फुटला.

बाल्कनसंघापैकीं रुमानिया हें छोटें राष्ट्र सर्वांच्या अघाडीस असून तें सर्वांत अधिक शक्तिमानहि आहे. गेल्या बाल्कन युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं रुमानिया कशा रीतीनें वागणार याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले होते. बाल्कनच्या द्वीपकल्पांत ज्या कांहीं घडामोडी व्हावयाच्या त्याचे सूत्रधार रुमानियाच्या पडद्यामागें बसून आपल्या हालचाली करीत होते.

या डावांचीं सगळीं सूत्रें हातीं बाळगणारी अशी मध्यवर्ती सत्ता कोणती? या सत्तेची गुरुकिल्ली जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांच्या हातीं होती. तुर्की-बाल्कन् युद्धाच्या आरंभीं रुमानियाच्या नैर्ऋत्य सरहद्दीवर सैन्य आलें असतें; तर तुर्कांवर बाल्कन् संघाला ज्या स्वरूपाचा जय मिळाला, त्या स्वरूपांत पुष्कळ फरक पडला असता; पण तुर्की–बाल्कन् युद्ध संपून जाऊन बाल्कनसंघाची परस्परांत यादवी सुरू होईपर्यंत हे सैन्य मागेंच राहिलें होतें. असें कां झालें, यांचीं कारणें मी आतां सांगतो.

सांप्रतच्या रुमानियाच्या राजघराण्याचे होहेनझोलर्न (प्रशियाचे चालूं राजघराणें) घराण्याशीं अगदीं जवळचे नाते आहे. रुमानियाची राणी कार्मेन सिल्व्हा व राजा क्यारोल हीं दोघेंहि जर्मन वंशांतील आहेत, एवढें सांगितलें, म्हणजे मीं वर सांगितलेल्या नात्यांची सत्यता लक्षांत येईल. त्याचप्रमाणें जर्मनी आणि रुमानिया यांमध्ये असलेला प्रत्यक्ष व्यापारी संबंधहि फार महत्त्वाचा आहे. सर्व बाल्कन् संस्थानांपैकीं रुमानियाला तुर्कांचा जाच कमी पोहोंचलेला आहे. यामुळें इतर बाल्कन् राष्ट्रांत तुर्कांबद्दल जो तीव्र द्वेष आढळून येतो. त्याला रुमानियात अस्तित्व नाहीं. याच कारणासाठीं रूसो–फ्रेंच राजकारणाला बल्गेरिया, सर्विया, मॉन्टेनिग्रो आणि आल्बेनिया या संस्थानांत जसें यश आलें, तसें तें रुमानियांत आलें नाहीं. रशियाचें राजकारण आणि पैसा यांना वश होऊन रुमानियाने तुर्कांविरुद्ध आपल्या फौजा समरांगणांत आणल्या असत्या, तर बाल्कन द्वीपकल्पाचा सगळा नकाशा आमूलाग्र बदलून गेला असता. तुर्की राज्याच्या वायव्य सरहद्दीवर रुमानियन फौज उतरली असती, तर बाल्कन फौजांचे मोर्चे थेट कान्स्टांटिनोपलला जाऊन पोहोंचले असते, यांत संशय नाहीं; पण रुमानियाचें सूत्रधारित्व ऑस्ट्रो-जर्मनांच्या हातीं असल्यामुळें रुमानियाची सेना घरच्या घरींच बसून राहिली. तिच्या तयारींत कोणत्याहि प्रकारची उणीव नव्हती; पण या तयारीचा उपयोग आपल्या कार्यासाठीं ऑस्ट्रो-जर्मनांनीं केला. आयत्या वेळीं ही फौज पुढें करून सर्विया आणि बल्गोरिया यांना ऑस्ट्रो-जर्मनांनीं जरबेंत ठेवलें. बल्गेरिया, सर्विया आणि मांन्टोनिग्रो यांना स्वतःच्या विजयामुळें मिळालेला मुलूख

आपल्या ताब्यांत कायमचा राहण्यास रशियाची मदत होईल, असा भरंवसा होता आणि तशा अर्थाचें वचनहि रशियाकडून त्यांना मिळाले होतें; पण चमत्कारिक परिस्थितींत सापडलेल्या रशियाला आपलें वचन पुरे करतां आले नाहीं. यामुळें वरील संस्थानांना केवळ स्वतःच्या मगदुरावरच युद्धाचा शेवट करून घेणें भाग पडलें.

बाल्कन् द्वीपकल्पांत झालेल्या युद्धाच्या निकालानें सर्वांस फार आश्चर्य वाटलें असेल; पण पडद्यामागें असलेल्या सूत्रचालकांस याचें कांहींच आश्चर्य वाटण्याचें कारण नव्हतें. तुर्कांविरुद्ध एकट्या बल्गेरियानेंच इतके जय मिळविले होते कीं, बराचसा मुलूख त्याच्या पदरांत पडणे अवश्य होते. हीच गोष्ट बाल्कन संघांतल्या इतर राष्ट्रांनाहि लागू आहे. या युद्धाचा शेवट झाला त्या वेळीं युद्धापूर्वीचीच स्थिति कायम राहिली, ही गोष्ट केवळ सूत्रचालकांनीं उत्पन्न केलेल्या असामान्य परिस्थितीमुळें घडून आली. असे कां झाले ?

पूर्वी एकमेकांस पाण्यांत पाहणारीं राष्ट्रें केवळ एकाद्या बाह्य शक्तीच्या दाबाने एकत्र झालीं असलीं, आणि पुढें ही बाह्य शक्ति ढिली पडली म्हणजे जे परिणाम घडून येतात, ते अनिवार्य असतात. अनिवार लोभ आणि परस्परांचा द्वेष हीं एकदम बाहेर पडतात. विशेषतः अशा प्रकारच्या द्वेषाला आणखी एखाद्या बाह्य शक्तीकडून प्रोत्साहन मिळालें म्हणजे तर बोलावयासच नको. बाल्कन संस्थानास जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांजकडून असेंच प्रोत्साहन मिळालें होतें आणि त्याचा परिणाम काय झाला, हें जगाला आतां महशूर आहेच. सर्विया बल्गेरियाचा द्वेष करीत होता. बल्गेरिया सर्वियाला पाण्यांत पहात होता. ग्रीस या दोघांचाहि द्वेष करीत होता. रुमानियाच्या पाठीमागें शक्तिमान् सूत्रचालक असल्यामुळें त्यांच्या प्रोत्साहनानें रुमानियानें या साऱ्यांसच आपल्या पायाखालीं दडपलें. हीं सारीं राष्ट्रें लढाया करून थकून गेलीं होतीं. युद्धाच्या भेसूर ध्वनीचा त्यांना पुरा वीट आला होता, आणि त्यांतून फ्राको–रूसो पैशाचें पाठबळहि बंद पडलें होतें. इतक्या गोष्टी एकसमयावच्छेदेकरून घडल्या नसत्या, तर जगानें पूर्वी कधींहि न पाहिलेला असा गळेकापूचा बाजार


बाल्कन द्वीपकल्पांत उघडला गेला असता. बाल्कन संस्थानांतील या परस्पर भांडणामुळें तुर्कीचा मात्र फायदा झाला. त्यामुळें आड्रियानोपल आणि थ्रेसचा बराचसा भाग त्यांस परत मिळवितां आला.

रशियाच्या नेतृत्वाखालीं बाल्कन संस्थानांचा संघ निर्माण होऊं नये, हें आस्ट्रो–जर्मन राजकारणाचें मुख्य धोरण होतें. तसेंच तुर्की सत्ताहि नामशेष होणें, हें त्यांस अनिष्ट होतें. मोडकळीस आलेला टर्की, आणि प्रसंगीं दहा लाखपर्यंत सैन्य ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर उभें करण्यास समर्थ व रशियाच्या कह्यांत गेलेला बाल्कन संघ, हा संयोग ऑस्ट्रियाला फार भयावह झाला असता. मध्य युरोपांत जर्मनीला जीं कांहीं कारस्थानें साधावयाचीं आहेत तींहि अशा परिस्थितीनें लंगडीं पडलीं असतीं. युरोपांतील शक्तिमान् राष्ट्रांत युद्ध सुरू झालें असतां दहा लक्ष बाल्कन फौज ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर उभी राहून रशियातर्फे ऑस्ट्रियाविरुद्ध लढूं लागली, तर ऑस्ट्रियाचें सारें सैन्य एकट्या बाल्कन हद्दीवरच गुंतवून ठेवणें भाग होईल. अशा स्थितींत रशियाचा सेनासमुद्र थोपवून धरण्याचा भार एकट्या जर्मनीवरच पडणार. हें साधण्याकरतां जर्मनीला आपलें अर्धेमुर्धें सैन्य रशियाकडेच गुंतवून ठेवावें लागणार, तसें झालें, ह्मणजे जर्मनीची फ्रेंको-बेल्जम-हॉलंड ही सरहद्द लंगडी पडणार. ही सारी अनर्थपरंपरा ऑस्ट्रो-जर्मनांनीं बाल्कन द्वीपकल्पांत केलेल्या कारवाईमुळें टळली.

बाल्कन संस्थानांत डॉक्टर आर्मगार्ड कार्ल ग्रेव्ज् हें नांव कोणाच्या ऐकिवांत नाहीं; पण तेथल्या चैनी आणि उधळ्या लष्करी अम्मलदारांस "कौंट आर्थर ज्यू वर्निग्रोड" यांचें नांव मात्र पक्कें स्मरत असेल.

प्रकरण दहावें.

इंग्लंडांतील कामगिरी आणि विश्वासघात !



१९११ सालीं एकामागून एक अनेक कामगिऱ्यांवर माझी योजना झाली होती. गेल्या कित्येक वर्षांत हें वर्ष युरोपच्या मुत्सद्यांना अतिशय त्रासाचें

गेलें. या सालीं ह्मणा किंवा पुढें लवकरच केव्हां तरी जगाला भिववून टाकणारें जें नाटक रंगभूमीवर येणार आहे, त्याच्या पहिल्या अकाला मांटे कार्लोच्या कामगिरीपासून सुरवात झाली. यानंतर मोरोक्कोची कामगिरी, टयानस अरण्यांतली कामगिरी, बाल्कन युद्धांतले घोंटाळे, इत्यादि गोष्टींनीं हें नाटक हळुहळू आपल्या नियमित पर्यवसानाकडे जात आहे. प्रचंड वादळापूर्वी ज्याप्रमाणें कांहीं काळ अगदीं सामसूम असतें, त्याचप्रमाणें बाल्कन युद्धानंतरची शांतता ही भावी झंझावाताचा निदर्शक मात्र आहे. इंग्लंड, जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांच्या मुत्सद्यांनीं टयानस अरण्यांत एकत्र जमून जो त्रिकुट संधि जमवून आणला होता, त्याजवर त्या त्या राष्ट्रांच्या सरकाराचें पक्कें शिक्कामोर्तब अद्यापि व्हावयाचें होतें. तारीख १८ नवंबर १९११ रोजीं या कामगिरीवर माझी योजना झाली त्या वेळीं हें शिक्कामोर्तब झालेलें नव्हतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

नेहमींप्रमाणें वुइलहेल्मस्ट्रासींतून मला बोलावणें आलें; पण या वेळीं कौंट वेडेल यांजसमोर मला न नेतां कोनिगरग्रॅडझर नंबर ७० येथील जर्मनीच्या आरमारी बातमीखात्यांत नेण्यांत आलें. येथें आरमारी खात्याचे प्रमुख क्यापटन् ट्यापकेन यांची व माझी गांठ पडली. इंग्लंडांतील एका कामगिरीवर माझी योजना होणार असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. या बातमीनें मला फारसा आनंद झाला नाहीं. उलट मला थोडीशी धास्तीच वाटली आणि माझी धास्ती अस्थानीं नव्हती, हें तुमच्या पुढें ध्यानांत येईलच. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें क्यापटनसाहेबांनीं माझी व तीन आरमारी तज्ज्ञांची गांठ घालून दिली. एक गृहस्थ जहाजें बांधण्याच्या कलेंत हुशार ह्मणून नाणावलेले होते आणि दुसरे दोघे पाणसुरुंग, आगमासे वगैरे स्फोटक हत्यारांचा उपयोग करण्यांत निष्णात होते. या तिघांनींहि निरनिराळ्या वेळीं आपापल्या धंद्यांतल्या गुरुकिल्ल्या माझ्या स्वाधीन केल्या. मी प्रथम जेव्हां या नौकरींत शिरलों त्या वेळीं कित्येक महिनेपर्यंत या विषयांचें शिक्षण मला देण्यांत आलें होतें, हें वाचकांना स्मरत असेलच. त्या साऱ्या विद्येची ही पुनः उजळणीच होती. दोन आरमारी अधिकाऱ्यांच्या शेजारीं बसून अनेक आरमारी नौकांचीं चित्रें

मी तासच्या तासपर्यंत बघत असें. हे नकाशे मोठाल्या भिंतीएवढाले प्रचंड होते. ब्रिटिश आरमारांतील प्रत्येक जहाजाची लांबी, रुंदी व त्याचें आकारमान यांची बरोबर नोंद त्या नकाशांत दिली होती. निरनिराळ्या जातींच्या नवीन बांधलेल्या इंग्रजी जहाजांच्या आकाशचित्रांचा अभ्यासहि या वेळीं मीं पुन्हां केला. या साऱ्या खटाटोपाचें कारण तुमच्या लक्षांत पुढें येईलच.

या रीतीनें मला विशिष्ट प्रकारचें शिक्षण देण्यांत स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर असलेल्या ब्रिटिश आरमारी ठाण्यांत जहाजांच्या ज्या कांहीं तालमी होतात, त्यांचे रिपोर्ट व तेथील जहाजांच्या तयारीसंबंधीं माहिती जर्मनीला पाठविणें हाहि माझ्या कामगिरींतला एक भाग होता.

या सुमारास इंग्लंड व जर्मनी यांजमधील नातें थोडेंसें चमत्कारिक झालें होतें, हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. ह्यानस अरण्यांत झालेल्या संधिपत्रावर सरकारी शिक्कामोर्तब अद्यापि व्हावयाचें होतें. या अरण्यांत झालेल्या खलबतासंबंधीं दोन्ही देशांतील सामान्य जनसमुहास यत्किंचितहि माहिती नव्हती हें उघडच आहे. निरनिराळ्या मुत्सद्यांनीं निरनिराळ्या प्रकारची ओरड करून या दोन देशांतील वातावरण भावी युद्धाच्या नादानें इतकें भारून टाकलें होतें कीं, हीं दोन मानवकुलें परस्परांवर तुटून पडण्यास तयार होऊन बसलीं होतीं. या वेळीं या दोन देशांतील परिस्थिति एकाद्या दारूच्या कोठारासारखी होती. भडका उठविण्यास एकादी बारीकशी ठिणगी या वेळीं पुरेशी झाली असती. अशा प्रकारची भयानक परिस्थिति असल्यामुळे गुप्त हालचाली केसर यांनीं कमी न करितां त्या उलट अधिक वाढविल्या होत्या. ' वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा ' हा अनुभव प्राचीन काळापासून आजपर्यंत एकसारखाच खरा आहे. दोन राष्ट्रांनीं परस्परांशीं संधि केला असला, तरी तेवढ्यामुळें दोघांच्याहि मनांतला पडदा गेलेला नसतो. अशा प्रकारें झालेले गुप्तसंधि आयत्या वेळीं अगदीं निरुपयोगी ठरतात, असा नेहमीं अनुभव येतो. युरोपियन राष्ट्रांत परस्परांत कितीहि तहनामे झाले असले, तरी त्यांची परस्परांवरील देखरेख कमी व्हावयाची नाहीं.

ही माझी कामगिरीची प्रस्तावना झाली. इंग्लंडांत मला जीं अनेक कामें करावयाचीं होतीं, त्यांतच ब्रिटिश आरमारावर देखरेख ठेवणें हेंहि एक काम होतें. स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर होणाऱ्या प्रत्येक हालचालीची बातमी जर्मन आरमारखात्यास तारेनें मला कळवावयाची होती. मला आकाशचित्रांचा अभ्यास पुनः कां करावा लागला, याचें कारण वाचकांच्या लक्षांत आलां आलें असेलच. रात्रींच्या वेळीं अथवा सकाळीं धुकें पडलें असतां जहाजें नांवानें ओळखणें अर्थातच शक्य नव्हतें; पण आकाशचित्रांची पुरी ओळख झाल्यानंतर कोणत्या नमुन्यांचीं गलबतें हालचाल करीत आहेत, हें समजणें कठिण नव्हतें. याकरतां बेडर जहाजें, प्रचंड क्रुइझरें, टारपेडो बोटी इत्यादि निरनिराळ्या जातींच्या आकाशचित्रांचा अभ्यास मजकडून करविण्यांत आला होता. नकाशे पाहून झाल्यानंतर त्यांजवरील नांवें झांकून टाकून तीं चित्रें मला ओळखण्यास सांगत. अशा रीतीनें अमुक हा ' क्वीन मेरीचा नमुना, ' हा दुसरा ' अॅजॅक्सचा नमुना' आणि तिसरा 'व्हायपर ड्रिस्ट्रायर' चा नमुना इत्यादि नमुने मला ओळखण्यास सांगत. ब्रिटिश अरमारातील जहाजें संचांनीं बांधलेलीं आहेत. यापैकीं प्रत्येक संचांतील जहाजें लांबीरुंदींत, आकारमानांत व एकदर बांधणींत एकसारखीं असतात. हे निरनिराळे संच सर्व बाबतींत प्रत्येकापासून पृथक् असतात. बर्लिनमधून निघण्यापूर्वी या साऱ्या संचांचीं आकाशचित्रे मजकडून पाठ करवून घेण्यांत आलीं होतीं.

या आरमारी विद्येशिवाय त्रिकोणमिति आणि भूनिरीक्षण यांची सुद्धां उजळणी मला करावी लागली. एडिंबरोजवळ रोझिथ बदरांत इंग्लंडनें जें नवें आरमारी ठाणें बांधलें आहे, त्याची यथातथ्य माहिती मिळविण्याकरतां नुसत्या दृष्टिक्षेपानें अंतरांची मोजणी करतां येणें अवश्य होतें. याशिवाय क्रोमार्टी येथील ब्रिटिश आरमारी हालचालींवरहि मला लक्ष ठेवावयाचें होतें.

विशेषतः रोझिथ येथील ठाण्यावर लक्ष ठेऊन तेथें नवीन प्रकारची शस्त्रसामुग्री अथवा नवीन उपयुक्त यंत्रें यांची भर करण्यांत आली, तर तिजबद्दलची सर्व माहिती जर्मन आरमारखात्याला पुरवावयाचें काम

मजवर सोंपविण्यांत आलें होतें. त्या वेळीं स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर ब्रिटिश आरमाराच्या तालमी सुरू होत्या. त्यांजवरहि मला नजर ठेवावयाची होती. हेलिगोलंड येथें जर्मनीनें मजबूत आरमारी ठाणें केल्यानंतर त्याला तोड म्हणून ग्रेटब्रिटननें रोझिथ आणि कोमार्टी येथें नवीं ठाणीं उठविलीं होतीं. जर्मनीच्या उत्तरकिनाऱ्यावर हल्ला करावयाचा असेल, तर तसें करण्यास स्कॉटलंडचा किनारा ही मोठी सोयीची जागा आहे. जर्मनी व ब्रिटन हे दोन्ही देश या वेळीं युद्धास उद्युक्त झाले होते, हें अगोदर सांगितलेंच आहे. एकाद्या क्षुल्लक कारणानेंहि कदाचित् युद्ध सुरू झालेंच, तर स्कॉटलंडच्या किनाऱ्यावरून ब्रिटिश आरमार हालल्यास त्याची बातमी ताबडतोब कळावी अशी व्यवस्था जर्मनीनें केली होती. रोझिथ किंवा क्रोमार्टी येथें यत्किंचितहि हालचाल दिसल्यास कोणत्या संचाचीं किती गलबतें बाहेर पडत आहेत व शक्य असल्यास या हालचालीचें कारण, इतकी माहिती तारेनें बर्लिन येथें पाठविण्याचा मला हुकूम होता.

ही माझी कामगिरी मीं कोणत्या रीतीनें उरकावी याजबद्दल बातमी खात्यामार्फत मला कांहीं विशेष हुकूम मिळाले नव्हते. अशा प्रकारचे हुकूम मिळावेत अशी माझी इच्छाहि नव्हती. या वेळीं विशेष सावधगिरी राखणें अवश्य झालें होतें. इंग्लंडचें वातावरण संशयाच्या ढगानीं भरून गेलें होतें. हेरांबद्दल एक कडक कायदा नुकताच तेथें पास करण्यांत आला होता. यामुळें अशा प्रकारच्या कामगिरीवर इंग्लंडांत जाणें फार धोक्याचें झालें होतें. बाल्कन संस्थानांतल्याप्रमाणें पाठींत सुरा बसण्याची तेथें भीति नव्हती ही गोष्ट खरी; पण आमच्यासारख्यांची हालचाल बंद करण्यास तुरुंगाचे दरवाजे 'आ' करून बसले होते. कायदे पास करण्याची नेहमींची तऱ्हा सोडून [illegible] कायदा तातडीनें पास करून घेण्यांत आला होता. या कायद्याचीं कलमें इतकीं लवचिक होतीं कीं नुसत्या संशयावरूनसुद्धां न्यायाधीश आणि जूरी यांस कोणाहि मनुष्यास दोषी ठरवितां आलें असतें. त्या कायद्यांतलें सामान्य तत्त्व म्हणून जें मला आठवतें तें असें:—" कोणाहि मनुष्यानें

अथवा मनुष्यांनीं ग्रेटब्रिटनच्या सुरक्षितपणास धोका येईल, अशी माहिती अथवा असा लेख मिळविला अथवा तयार केला, तर त्यानें बेकायदेशीर कृत्य प्रत्यक्ष केलें नसतांहि त्याला गुन्हेगार समजण्यांत यावें. आणि या गुन्ह्याला सात वर्षेंपर्यंत काळेपाण्याची सजा ठरविण्यांत यावी.

इंग्रजराष्ट्राच्या कायद्यांत या नव्या कानूची भर पडल्यामुळें तेथल्या सरकारची शक्ति किती वाढली होती, हें सांगण्यास कायदेपंडीत नको. हा कायदा तांतडीनें पास करून घेण्यांत आला होता, हें मीं तुह्मांला सांगितलेंच आहे. तसें करणें अवश्य होतें, हेंहि येथें कबूल केलें पाहिजे. केवळ सहा महिन्यांच्या अवधींत इंग्लंडांत तीन जर्मन हेर पकडण्यांत आले होते. या सर्व गोष्टींचा विचार करतां आणि इंग्लंडांतील सरकारी नोकरांची दक्षता पाहतां या कामगिरींत पडण्यास मी फारसा उत्सुक नव्हतों, हें साहाजिकच आहे. माझा धंदा उघडकीस आला तर, त्या अपराधाला सांगितलेली सात वर्षांची शिक्षा माझ्या डोळ्यांसमोर पिशाच्चासारखी उभी राहून मला एकसारखी भेडसावीत होती. कारण, काळें पाणी आणि नरकवास हीं सारख्याच योग्यतेचीं आहेत. इंग्लंडांत जाण्यास दाखला लागत नाहीं ही गोष्ट खरी; पण परस्थ लोक तेथें काय करीत असतात याची माहिती अधिकाऱ्यांना नसते असें मात्र नाहीं. इंग्लंडांत शिरणें सोपे आहे; पण तेथून बाहेर पडणें मात्र फार कठीण. याशिवाय या उभय सरकारांत कांहीं गुप्त तहनामा झाल्याची खबर मला असल्यामुळें या कामांत पडणें एकंदरीनें बरें नव्हे असें माझें मन मला सांगूं लागलें. पुढे जें कांहीं घडलें, त्यावरून माझ्या मनोदेवतेचा कल बरोबर होता, हें सिद्ध झालेंच.

अखेरीस मोठ्या मिळकतीची आशा आणि अधिकाऱ्यांच्या वजनाचें दडपण यांचा जय होऊन मीं माझ्या मनोदेवतेविरुद्ध या कामगिरीचा स्वीकार केला. मीं बर्लिन सोडलें त्या वेळीं या कामगिरीला लागणारीं सर्व प्रकारचीं आयुधें मजपाशीं सज्ज होतीं. ब्रिटिश आरमारांतील प्रत्येक गलबत, प्रत्येक दुर्ग, प्रत्येक आरमारी ठाणें, आणि प्रत्येक कोठाराचीं

ठिकाणें यांचे संकेत शब्द तयार केलेलें पुस्तक मजपाशीं होतें. बातमी-खात्याला तारेनें माहिती देण्यासाठीं ब्रुसेल्स, कोपेनहेगेन आणि प्यारीस या तीन ठिकाणीं व्यवस्था करण्यांत आली होती. प्रतिकूळ परिस्थितींत ब्रुसेल्सचें द्वार कदाचित् बंद झालेंच, तर या दुसऱ्या द्वारांचा उपयोग करावयाचा. सी. व्ही. नोएन्स रू द वेनिस नं. ३४ असा ब्रुसेल्सचा पत्ता होता. मजकडून येणाऱ्या सर्व तारा नोएन्स यानें बर्लिन येथील योग्य अधिकाऱ्यांकडे पाठवाव्या असें ठरविण्यात आलें होतें. तसेंच बर्लिन येथून येणारीं सर्व पत्रें त्यानें लंडन येथील एका तंबाखूच्या दुकानावर पाठवावींत व तेथून तीं पुन्हां टपालांत पडून माझ्या स्काटलंडांतील गांवीं तीं मला मिळावींत अशी व्यवस्था करण्यांत आली होती. पुढें मला ग्लासगो येथें पकडण्यांत आल्यानंतर सहा-तासांनीं या तंबाखूच्या दुकानदाराचा शोध पोलिसांनीं केला; पण तो दुकानदार अथवा नोएन्स यांपैकीं कोणीहि त्यांच्या हातीं लागला नाहीं.

अशाच प्रकारची व्यवस्था कोपेनहेगेनमध्यें हॉटेल स्टाड नांवाच्या खानावळीच्या म्यानेजराकडे करण्यांत आली होती. मी कोपेनहेगेन येथें एका कामगिरीवर गेलों असतां हा गृहस्थ जर्मन तैनातींत असल्याचें मला कळून आलें होतें. प्यारीसमध्यें रु द तिवोली भागांत मेरी ब्लांचीच्या दुकानींहि अशाच प्रकारची व्यवस्था करण्यांत आली होती.

हॉलंड आणि हार्वुईच या मार्गानें मी एडिंबरोला जाऊन पोहोंचलों. लंडनच्या मार्गानें न जाण्यांत माझा एक हेतु होता. विशेषतः त्या वेळचें वातावरण युद्धाच्या ढगांनीं व्याप्त झालेलें असल्यामुळें लंडनांत येणाऱ्या सर्व बोटी आणि गाड्या यांजवर सक्त नजर राखण्यांत येत असे. सामान्य प्रवाशाच्या लक्षांत ही गोष्ट फारशी येत नाहीं; तथापि प्रत्येक गाडीच्या वेळीं गुप्त पोलिसच नव्हे, तर सरकारानें नेमलेले कांहीं खास कामगारहि स्टेशनावर हजर असत ही गोष्ट खरी. त्यांच्या नजरेंतून बहुधा कोणतीहि गोष्ट चुकत नाहीं. इंग्रज नसलेला कोणीहि प्रवासी बोटींतून अथवा गाडींतून उतरल्याबरोबर एक वयातीत, करड्या केसांचा, उंच टोपीचा, हातांत छत्री असलेला असा पेन्शनर लष्करी अम्मलदारासारखा दिसणारा

गृहस्थ इकडे तिकडे पहात असलेला त्याला आढळून येईल. कोणाहि परस्थाबद्दल याला संशय आला, तर तो परस्थ लंडनांत शिरल्यापासून त्याजवर एकसारखी नजर राखण्यांत येते.

वरील सर्व भानगडींतून निसटण्यासाठींच मीं लंडनचा रस्ता टाळला आणि हॉलंडच्या रस्त्यानें एडिंबरोला उतरून प्रिन्सेस रस्त्यावरील बेलफर्ड हॉटेलमध्यें मीं आपला तळ दिला. या ठिकाणीं मी आपलें नांव ए. के. ग्रेव्हज एम. डी. असें नोंदून टचूरो, ऑस्ट्रेलिया, असा पत्ता दिला होता. स्कॉटलंडांतील सुप्रसिद्ध विद्यापीठांत अधिक शिक्षण घेण्याकरितां मी आलों आहें, असा समज करून देण्याचा माझा उद्देश होता. थोडे दिवस हॉटेलांत काढल्यानतर मिसेस म्याक्लिऑड नांवाच्या बाईच्या घरीं मीं स्वतंत्र बिऱ्हाड केलें. दर आठवड्याला मला हातिखर्चासाठीं सवा दोनशें रुपये मिळत असत. याशिवाय मेजवान्या, मोटारगाड्यांचे प्रवास वगैरे खर्च वेगळा मिळत असे.

पहिला पंधरवडा मीं सामान्य निरीक्षणांत घालविला. आपल्या आजुबाजूची परिस्थिति कशा प्रकारची आहे, याचें निरीक्षण या अवधींत मीं केलें. मी नुकताच आजारांतून उठलेला व हवा पालटण्याकरतां आलेला इसम आहें, असा समज मीं पसरविला. एडिंबरो शहर व त्याच्या आजुबाजूंचा भाग येथें फिरून मीं शहराची सामान्य माहिती करून घेतली. या माझ्या भटकण्यांत फोर्थच्या खाडीचें निरीक्षणहि मीं कित्येक केळां केलें. या खाडीच्या किनाऱ्यावर रोझिथचें आरमारी ठाणें आहे. या खाडीवरून पलीकडे जाण्यास एक लांबलचक पूल बांधलेला आहे. ठाण्यांतून निघणाऱ्या व ठाण्याकडे येणाऱ्या गलबतास या पुलाखालून जावें यावें लागतें. या पुलासंबंधीं ब्रिटिश आरमार खात्याच्या फायद्याची एक गोष्ट सांगण्यासारखी आहे, पण ती पुढें सांगेन.

हळुहळू त्या पुलाच्या पहारेवाल्यांपैकीं एकाच्या पोटांत मी शिरलों. या मनुष्याचें नांव देण्याचें कारण नाहीं. कारण तशानें त्या बिचाऱ्याचें नाहक नुकसान होईल. त्याचा स्नेह मीं संपादन केल्यामुळें त्या आरमारी ठाण्याचें निरीक्षण करण्याची संधि मला मिळाली. तसेंच मला जरूर

असणाऱ्या अनेक बारीकसारीक गोष्टींची माहितीहि त्याजकडून मला मिळाली. ही माहिती मला देण्यांत आपण कांहीं अपराध करीत आहों, अशी त्या बिचाऱ्याची कल्पनाच नव्हती. ही माहिती देण्यांत त्याला कवडीचीहि प्राप्ति नव्हती, आणि या दृष्टीनें त्याला देशद्रोही समजण्याचें कांहीं कारण नाहीं. त्याचा बराचसा विश्वास व मैत्री संपादन केल्यानें त्या पुलाची बांधणी व त्यांतील सर्व प्रकारच्या खुब्या यांचा सविस्तर अभ्यास करण्याची संधि मला मिळाली. आरमारी दृष्टया हा पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. या पहारेवाल्याच्या ओळखीनें खाडीच्या कित्येक संत्र्यांशींहि माझी दोस्ती जमली. स्कॉटलंडच्या इतिहासाची मला चांगली माहिती होती. तिच्या आधारावर रॉबी बर्न्स, वॉलटर स्कॉट, प्रिन्स चार्ली वगैरे गत पुरुषांबद्दल अनेक प्रकारच्या गप्पा मी ठोकीत असें, आणि शिवाय त्या गप्पा ठोकतां ठोकतां व्हिस्कीच्याहि कांहीं बाटल्या आमच्यांत रिकाम्या होत असत. या माझ्या अघळ पघळ वर्तनामुळें मी अर्धामुर्धा स्कॉचच आहें, असा त्यांचा समज झाला होता. या संत्र्यांपासून रोझिथ येथील ठाण्यासंबंधीं मला अधिक निश्चित माहिती मिळाली. या ठाण्याच्या आसपासच्या भूरचनेची माहिती मिळवावयाची म्हणजे, तेथें प्रत्यक्ष काम करीत असलेल्या लोकांकडूनच ती मिळविणे भाग होतें. या भूमीचे नकाशे बर्लिन येथे आमच्या सग्रहालयांत होतेच; पण त्यांतील माहिती असावी तशी बरोबर नव्हती. रोझिथ येथील दुर्गासंबंधाची शास्त्रीय माहिती मीं कांहीं लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांकडून मिळविली. यांपैकीं बहुतेक अम्मलदार चांगल्या उच्च दर्जाचे होते. यांना मेजवान्या वगैरे देऊन त्यांच्याशीं मीं बरेंच दळणवळण ठेवलें होतें.

मीं जो आकाशचित्रांचा अभ्यास बर्लिनमध्यें केला होता, त्याचा उपयोग होण्याची संधि आतां प्राप्त झाली. एके रात्रीं आरमारी जहाजांतून वाफ निघत आहे, अशी बातमी मला माझ्या पहारेकरी मित्राकडून मिळाली. मी त्या रात्रीं पुलावर जाऊन उभा राहिलों व पुढें काय होतें त्याची वाट पहात बसलों. हळुहळू पहांटे पांचाचा सुमार झाला. धुकें जिकडे तिकडे पसरलें होतें. त्या धुक्याच्या पडद्या पाठीमागून आर-

गारी जहाजें हालण्यास सुरुवात झाली. जणूं काय पिशाचांचा संघ फेरावयास निघाला आहे, असें त्या वेळच्या देखाव्यावरून वाटण्यासारखें होतें. जहाजांची एकंदर संख्या सोळा होती, असें मला दिसलें. त्यांच्या आकाशचित्रांवरून त्यांत कांहीं बेडर जहाजें, कांहीं क्रुझरें आणि कांहीं डेस्ट्रॉयर जहाजें होतीं. तावडतोब ही माहिती ब्रुसेल्स मार्गानें मी जर्मन आरमारखात्याला तारेनें कळविली. या गलबतांचें वर्णन देण्यांत मीं फक्त एकच चूक केली होती, असें मला पुढें आढळून आलें.

या ठिकाणीं इंग्लंडच्या हितासाठीं एक उपयुक्त सूचना मी त्याला फुकटांत देतों. माझ्या खटल्याच्या वेळीं मला चांगल्या रीतीनें वागवेल्याबद्दल हा मी मोबदलाच देत आहें, असें समजा. फोर्थ खाडीवरील पूल हा रोझिथ ठाण्याला एक मोठें धोक्याचें कारण आहे. तें कारण असें:--

रोझिथ ठाणें आणि बाहेरील समुद्र यांच्यामध्यें हा पूल असल्यामुळें याजपासून धोका उद्भवण्याचा संभव आहे. युद्धास सुरुवात झाल्यावर केंवा त्याच्या आधींहि थोडा वेळ हा पूल सुरुंगानें उडविणें अशक्य नाहीं. अशा रीतीनें हा पूल पडला गेला तर रोझिथ ठाण्याच्या तोंडाला चूच बसून आंतील सर्व आरमार जागच्या जागीं कोंडलें जाईल. शत्रूचीं जहाजें स्कॉटलंडच्या किनाऱ्याचा धुव्वा आपल्या तोफखान्यानें उडवीत असतां या कोंडलेल्या जहाजांना कोणतीच हालचाल करतां येणें कित्येक देवसपर्यंत शक्य होणार नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ ब्रिटनच्या परराष्ट्रीय खात्याच्या लक्षांत येईलच.

ज्या भूमीवर हा पूल बांधला आहे, त्या भूमींत मधून मधून नरम आणि भुसभुशीत मातीचे पदर आहेत. यामुळें तेथें सुरुंग भरून ठेवण्यास फार सोयीचें झालें आहे. फोर्थ खाडीच्या पुलाला एडिंबरोकडून जो मार्ग येतो, त्या मार्गावरील दोन बखळी व त्यांतील घरेंहि जर्मनांच्या मालकीचीं आहेत, ही गोष्टहि मला समजली आहे. या बखळींच्या खरेदीपत्रांतील मालकांचीं नांवें स्कॉच नांवांसारखीं भासतात, पण मालक खरोखर जर्मन आहेत. या पुलाच्या दोन्ही टोंकांना मच्छिमार लोकांचीं

खेडीं आहेत व त्यांत पुष्कळ कोळी बाह्यतः स्विडिश नांवें धारण केलेले आहेत, पण त्यांचीं नांवें अद्यापिहि जर्मनीच्या आरमारी रजिस्टरांत नोंदलेलीं आहेत. युद्धाचा प्रश्न उपस्थित झाल्यास वरील दोन घरांत भरून ठेवलेल्या स्फोटक द्रव्यांचा उपयोग करून पूल व आजूबाजूची भूमि यांचे राई राईएवढे तुकडे करणें या माणसांस अशक्य नाहीं.

तीन आठवड्यांनंतर माझ्या हालचालींसंबंधीं संशय उपस्थित होत आहे, अशी शंका मला येऊं लागली. एके रात्रीं मी घरीं गेलों असतां माझ्या कपड्यांच्या घड्या मोडून त्या पुन्हां घातल्या गेल्या आहेत, असें मला आढळून आलें. मीं घराच्या मालकिणीला तावडतोब हांक मारली आणि माझा शिंपी येऊन गेला कीं काय असा प्रश्न तिला मीं विचारला. त्यावर तिनें नाहीं असा जबाब दिला. मीं म्हटलें, " मग माझ्या कपड्यांना तुह्मांला हात लावण्याची काय जरूरी होती ? "

तिचा चेहरा एकदम गोरामोरा झाला. ती बरीच घाबरून गेल्यासारखी दिसली. अडखळत अडखळत ती म्हणाली, " मीं तुमच्या खोलींत पाऊल देखील ठेवलें नाहीं. हो-हो- पण आठवण झाली. तुमचा शिंपी आला होतासें वाटतें. नोकरानें त्याला तुमच्या खोलीचा दरवाजा उघडून दिला होता. "

घरधनीण [illegible]बाई मोठी वस्ताद होती. माझ्यापासून शक्य तितके पैसे वसूल करून अखेरीस माझ्या खटल्याच्या दिवशीं कोर्टांत म्हणाली, " हा हस्थ माझ्या घरीं राहिल्यापासून पंधराच दिवसांनीं हा जर्मन हेर असावा, असा मला संशय आला. "

सारीं कामें बाजूस ठेवून मीं तावडतोब शिंप्याच्या दुकानीं गेलों आणि त्याजपाशीं चौकशी करतां बाईची गोष्ट बनावट होती, असें मला आढळून आलें. तो शिंपी माझ्या बिऱ्हाडीं मुळींच गेला नव्हता. माझ्या हालचालींवर नजर राखण्यांत येत आहे कीं काय, याची शहानिशा करून घेण्याचा मीं निश्चय केला. दुसऱ्याच दिवशीं प्रिन्सेस स्ट्रीटवरील एका सुप्रसिद्ध विश्रांतिगृहांत मी गेलों. तेथील बाजूच्या एका खोलींत जाऊन मीं कांहीं पत्रें लिहिलीं व त्यांपैकीं मुद्दाम एक जमिनीवर खालीं टाकून

दिलें. नंतर हात धुण्याकरितां नळाकडे गेलों व पांच मिनिटांच्या आत परत येऊन पाहतों तों मीं जामिनीवर टाकलेलें पत्र गुप्त झाल्याचें आढळून आलें. तेथील चावीवाला व खिजमतगार यांजकडे या बाबतींत मीं चौकशी केली तेव्हां एक गृहस्थ तें पत्र खिशांत घालून चालता झाला, असें मला समजलें. माझ्या शकेचे निराकरण झालें. मजवर पाळत राखण्यांत येत होती, असें मला आढळून आलें.

आमच्या पाळतीवर असलेल्या या गुप्त पोलिसाला ग्रीक वाचतां येत असेल तर खरोखरच फार बहार उडाली असेल. कारण माझ्या पत्राचें भाषांतर करण्याचे श्रम घेऊन त्यानें आपला वेळ फुकट दवडला असेल, तर ' मेरीचें एक लहानसें कोंकरूं होतें ' या इंग्रजी कवितेचें ग्रीक भाषांतर त्यास पहावयास मिळाले असेल.

आतां कांहीं तरी शिताफीचें धाडस केलें पाहिजे, असा हा प्रसंग असल्याचें मला स्पष्ट दिसून आलें. मी तावडतोब एडिंबरो येथील मुख्य पोलिस ठाण्यावर गेलों आणि माझ्या नांवाचें कार्ड मुख्य अधिकारी रॉस यांस पाठवून दिलें. त्यांनीं मला खोलींत बोलाविलें. खोलींत गेल्याबरोबर मीं आपला तोफखाना एकदम सुरू केला.

" मी जर्मन हेर आहें, अशी शंका घेण्यास तुह्मांला कांहीं कारण आहे काय ? " माझ्या या प्रश्नाचा योग्य परिणाम त्या अधिकाऱ्यावर झाल्याचें मला दिसून आलें.

" छे ! छे ! मुळींच नाहीं. आपण काय म्हणतां याबद्दल मला मुळींच माहिती नाहीं. "

" मग माझ्यावर जी नजर राखण्यांत येत आहे, ती आपल्या हुकुमानें नव्हे तर ? "

" असें खरें. यासंबंधानें मीं कांहींच हुकूम दिलेले नाहींत. "

" अशा प्रकारच्या महत्त्वाच्या गोष्टींत आपल्या हुकुमावांचून खालचे अधिकारी आपणच कांहीं खटपटी करतील हें शक्य दिसत नाहीं. "

" पण तुमच्या हालचालींवर नजर ठेवण्यांत येत आहे, असें तुह्मांला वाटण्याला कांहीं कारण आहे काय ? "

" कारणें पुष्कळ आहेत. एका गुप्त पोलिसानें तर माझ्या खोलींत शिरून माझें सामानसुमानमुद्रां तपासलें. ही गोष्ट धडधडीत ब्रिटिश कायद्याविरुद्ध आहे, आणि अशा प्रकारची झडती घेण्यास वारंट लागत असतें, ही गोष्टहि तुह्मांला ठाऊक असेलच. मी जर्मन हेर आहें, अशी शंका घेण्यास तुह्मांला कांहीं कारण असेल, तर तुह्मांला काय करावयाचें असेल तें आतांच करा. नाहीं तर हा नसता मूर्खपणा तरी बंद करा. मी आतांपर्यंत या गोष्टी थट्टेवारी नेल्या. पण मनुष्याच्या थट्टेखोर स्वभावालासुद्धां कांहीं सीमा असतेच. "

माझें हें भाषण ऐकून रॉससाहेबांनीं गंभीर मुद्रा धारण केली. ते धिटाईनें ह्मणाले, " डॉक्टर, आम्ही हुकुमाचे धनी आहों, ही गोष्ट तुह्मांला ठाऊक आहेच. तथापि तुमच्या बाबतींत कांहीं तरी चूक झाली असावी अशी खात्री वाटते आणि अतःपर आमच्याकडून तुह्मांला उपसर्ग पोहोंचणार नाहीं. "

एवढें भाषण व परस्पर सलाम होऊन मी तेथून बाहेर पडलों. अर्थातच एवढ्यानेंच माझ्या मागचा शुक्लकाष्ठ सुटणार नाहीं, हें मला माहीत होतें; तथापि मी मुख्य पोलिस अधिकाऱ्याची भेट घेऊन आलों या एवढ्या गोष्टीनें पोलिसांची हालचाल थोडी मंदावेल अशी खात्री वाटून मी तिकडे अधिक लक्ष दिलें नाहीं. बर्लिनला तारा व पत्रें लिहिण्याचा माझा क्रम मीं धड्याक्यानें सुरू ठेवला व माझ्या एकंदर दिनचर्येंत मीं कांहींच फरक केला नाहीं. रॉससाहेबांची भेट होऊन आठ दिवस झाल्यानंतर ग्लासगो येथील बुहालियम बर्डमोअर आणि कंपनी ही ब्रिटिश सरकाराकरतां एक नवीन चौदा इंची तोफ तयार करीत असल्याची खबर मला कळली.

या बातमीवरून मी आपला मुक्काम हालवून ग्लासगोला गेलों व या तोफेसंबंधीं माहिती मिळविण्याचा निश्चय मीं केला. तेथें सेंट्रल स्टेशन हॉटेलमध्यें राहून थोड्याच आठवड्यांच्या अवधींत या नव्या हत्यारासंबंधीं समग्र माहिती मीं मिळविली. ती माहिती मीं कशी हस्तगत केली, याचा तपशील सांगणें फार कंटाळवाणें होईल; तथापि थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं ' दाम करी काम ' ही म्हण सर्वत्र सारखीच लागू पडते.

या नव्या तोफेची रचना, गोळ्या उडवण्याची पद्धत वगैरे सर्व प्रकारची माहिती मीं मिळविली. ग्लासगोस असतांना जेम्स स्ट्याफर्ड या नांवानें माझा पत्र व्यवहार चालत असे. या नांवानें आलेलीं दोन पत्रें मीं जनरल पोस्टआफिसांत जाऊन घेतलीं; पण तिसऱ्या खेपेस मी पत्र मागावयास गेलों असतां एस्. स्ट्याफर्ड या नांवानें एक पत्र आल्याचें मला सांगण्यांत आलें. ' पत्र माझेंच आहे, ' असें मीं म्हटलें.

तेथील कारकुनाचें समाधान झालें नाहीं असें दिसलें. तो म्हणाला, " तुम्ही जेम्स स्ट्याफर्ड असें नांव सांगतां, त्या अर्थी हें पत्र तुम्हांस मला देतां येत नाहीं. अशी गोष्ट करणें पोस्टाच्या कायद्याविरुद्ध आहे. "

कारकुनाविरुद्ध तक्रार करणें शक्य नसल्यानें मी तेथून तसाच बाहेर पडलों. पोस्टमार्फत येणाऱ्या पत्रांत कांहीं आक्षेप घेण्यासारखा मजकूर किंवा वस्तु घालण्याचा मूर्खपणा आमचे खातें करील, असें क्षणभरहि माझ्या चित्तांत आलें नाहीं. तथापि पुढें जें कांहीं घडून आलें, त्यावरून असा ' मूर्खपणा ' त्यांनीं केला होता, असें सिद्ध झालें. तसेंच नेहमींच्या शिस्तीला सोडून हें पत्र जेम्स स्ट्याफर्ड या नांवानें न येतां एस्. स्ट्याफर्ड या नावानें कां आलें, याचाहि उलगडा पुढें झाला. यापूर्वी मला येणारीं सर्व पत्रें डॉक्टर ए. के. ग्रेव्हज या नांवानें येत असून तीं लंडन येथील बरोज आणि वेलकम या नांवाच्या सुप्रसिद्ध गांधीच्या पाकिटांतून येत असत. ही पाकिटें व कागद या कामासाठीं मुद्दाम तयार करण्यांत आले होते. प्रथम हीं पत्रें लंडनला यावयाचीं व तेथें या पाकिटांत घालून तीं मजकडे रवाना व्हावयाचीं असा क्रम असे, युरोपांतील पोस्ट ऑफिसें फार संशयखोर झालीं आहेत. तेव्हां त्यांना या पत्रांचा संशय येऊं नये म्हणून ही व्यवस्था मुद्दाम करण्यांत आली होती. एडिंबरो येथील डॉक्टरला एखाद्या सुप्रसिद्ध गांधीकडून पत्रें येणें हें अगदीं स्वाभाविक होतें.

मी एडिंबरोहून चौदा इंच तोफेची माहिती काढण्यासाठीं निघालों, त्या वेळीं आमच्या लंडन येथील साथीदारांस जेम्स स्ट्याफर्ड या नांवानें साध्या पाकिटांतून पत्रें पाठविण्याचा इशारा मी दिला होता. पहिलीं दोन पत्रें बरोबर नांवाचीं व साध्या पाकिटांत घातलेलीं अशीं होतीं; पण या

तिसऱ्या पत्रावर नांव चुकीचें होतें. एवढेंच नव्हे, तर तें बरोज आणि वेलकमच्या पाकिटांतून आलें होतें. या 'मूर्खपणाचें' कारणहि मला पुढें कळलें.

तें पत्र पोस्टांतून घेण्यास कोणीच मालक न आल्यामुळें बरोज आणि वेलकमकडे तें परत पाठविण्यांत आलें. कंपनीनें तें पत्र फोडलें, तेव्हां त्यांत जर्मन भाषेंत टाइपरायटरनें छापलेलें एक पत्र व प्रत्येकीं दहा पौंडांची एक अशा बँक ऑफ इंग्लंडच्या पांच नोटा आंत निघाल्या. पत्रांतील मजकूर अशा स्वरूपाचा होता कीं, तें पत्र पोलिसकडे पाठविणें कंपनीस इष्ट वाटलें.

एप्रीलच्या १४ तारखेस संध्याकाळीं मी पोशाक करून आपल्या लिहिण्याच्या खोलींत बसलों होतों. त्या दिवशीं माझे कांहीं स्नेही आपल्या पंक्तीचा लाभ देण्यासाठीं संध्याकाळीं हॉटेलांत यावयाचे होते. त्यांची मी वाट पहात असतां एक नोकर माझ्या खोलींत आला आणि ह्मणाला, तुमची भेट घेण्यासाठीं कोणी इसम खालीं आला आहे.

माझें चित्त अस्वस्थ झालें. पुढें येणाऱ्या संकटाची छायाच जणूं मला दिसूं लागली. हे माझे स्नेहीच आले असते, तर मला खालीं येण्याची सूचना न करतां तेच वर आले असते. पोलीसनें मला धरावें अशीच ही वेळ असला, तर ती टळणार नाहीं, असेंहि मला स्पष्ट दिसलें. या धंद्यांत मनुष्य नेहमीं दैववादी बनतो; तथापि स्वसंरक्षणार्थ माझ्या आतल्या सद्याच्या खिशांत माझ्या औषधाची छोटी पेटी मीं घातली. जरूर पडलीच तर माझ्या संरक्षणाचें हेंच साधन होतें. नंतर मी खालीं आलों. त्या वेळीं माझा एक हात बाजूच्या खिशांत असून दुसरा कोटाच्या आंतील बाजूस होता. जरूर पडलीच तर त्या औषधांची पेटी चट्कन काढतां यावी असा माझा उद्देश होता.

मी जिना उतरून खालीं येऊं लागलों. जिन्याच्या शेवटच्या पायरीवर मी पोंचलों असेन नसेन इतक्यांत साधा पोषाख केलेल्या पोलिसांनीं मजवर झडप घातली. पुढें काय करावयाचें याचा मी फार झटपट विचार करूं लागलों. खिशांतील पुड्या शिपायाच्या तोंडावर उधळून मी तेथून

निसटलों असतों; पण तेवढ्यानें ब्रिटिश बेटांतूनच काय, पण ग्लासगो शहरांतूनहि मला बाहेर पडतां आलें नसतें. अशा पळण्यानें माझ्या वरील आरोपास उलट पुष्टि मात्र आली असती. असा विचार करून मी निमुटपणें त्यांच्या स्वाधीन झालों. नंतर थोडेंसें अवसान आणून मला कां धरतां असा प्रश्न मीं त्यांना केला.

इन्स्पेक्टर ह्मणाला, " तें तुह्मांला लवकरच समजेल. "

इतक्यांत माझ्या खोलींतील टेलीफोनची घंटा वाजली. इन्स्पेक्टर धांवतच तिकडे गेला. माझा एकादा साथीदार मला बातमी देत असावा असें त्यास वाटलें.

नंतर त्यानें माझा झाडा घेण्याचा हुकूम शिपायांना केला; परंतु माझ्या पाशीं एकादें पिस्तुल, बांबगोळा किंवा जंबिया अशांपैकीं कांहींच हत्यार सांपडलें नाहीं, हे पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. नंतर त्यानें मला माझ्या खोलींत परत नेलें आणि तेथें माझें सामानसुमान तपासून त्याचें एक गांठोडें त्यानें बांधलें. माझे पुढें काय होणार, याचा अजमास मला होताच; तथापि पोलिसला मीं अगदींच पोकळ सोडलें नाहीं. हॉटेलचे म्यानेजर मिस्तर—यांस आणखी एका साक्षिदारासह बोलावण्यास मीं सांगितलें. हे साक्षिदार आंत आले आणि त्यांनीं माझ्या साऱ्या चीजवस्तूंची नोंद केली. नंतर या साऱ्या वस्तू पोलिसानें आपल्या ताब्यांत घेतल्या. माझ्या सर्व खतापत्रांची नोंद योग्य रीतीनें होत आहे कीं, नाहीं याची मीं काळजीपूर्वक तपासणी केली. एकाद्या हेरावर खटला सुरू झाला ह्मणजे तपासणीच्या वेळीं त्याजवळ न सांपडलेले कागदहि पुष्कळ वेळां कोर्टांत येत असतात ! या सर्व प्रकरणाचा शोध आपणच एकट्यानें लावला असून लंडनच्या बरोज वेलकम कंपनीची आपणास कांहींच मदत झालेली नाहीं, अशा थाटानें तो इन्स्पेक्टर वागत होता. त्यानें मला धाकदपटशाहि देण्याचा यत्न करून पाहिला. माझें पकड वारंट मला वाचून दाखवा, अशी निकड मीं त्याच्या मागें लावली; तेव्हां मोठ्या नाइलाजानें त्यानें तें वारंट वाचून दाखविलें. पार्लमेंटांत घाईघाईनें पास केलेल्या गोपन-

स्फोटाच्या कायद्याखालींच तें वारंट काढलें असून ब्रिटिश साम्राज्याच्या सुरक्षितपणास धोका आणण्याचा आरोप त्यांत मजवर ठेवला होता.

ती रात्र मीं ग्लासगोच्या तुरुंगांत काढली. दुसऱ्या दिवशीं मला तेथील म्याजिस्ट्रेटापुढें उभें करण्यांत आलें. शेरिफच्या कोर्टांत चौकशी व्हावी, असा म्याजिस्ट्रेटनें हुकूम दिला. तारीख १२ जुलई रोजीं शेरिफच्या कोर्टांत माझा खटला निघाला. शेरिफनें अधिक चौकशी न करतां एडिबरो येथील हायकोर्टाकडे तो खटला वर्ग केला. कोणत्याहि प्रकारची चौकशी न करतां खटला वर्ग झाला, म्हणजे तो कोर्टांत येण्याची अधिकांत अधिक मुदत ब्रिटिश कायद्याप्रमाणे १०५ दिवसांची आहे. या मुदतीचें शेवटचें मिनिट भरेपर्यंत मला वाट पहावी लागली, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. माझ्या पूर्वचरित्राची माहिती मिळविण्याचा यत्न पोलिस करीत होते; पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

लॉर्ड प्रोव्हो यांजकडून मला एक पत्र आलें व माझ्या बचावाचीं सर्व साधने खटल्याचे आधीं एक दिवस मीं त्यांजकडे द्यावीं, असें त्यांनीं मला कळविलें होतें. त्या वेळीं मजपाशीं बचवाचीं कोणतींच साधनें नव्हतीं. मीं कोणतीहि गोष्ट नाकारली नाहीं, अथवा कबूलहि केली नाहीं. मीं कोणताच अपराध केला नसल्यामुळें मला कांहीं बचावहि करावयाचा नाहीं, असें मीं लॉर्ड प्रोव्हो यांना कळविलें. माझ्या या उत्तरानें लॉर्डसाहेब अधिकच बुचकळ्यांत पडले. माझीहि इच्छा तींच होती.

त्या वेळचीं इंग्रजी आणि स्कॉटिश वर्तमानपत्रें तुह्मीं पाहिलीं, तर इंग्लिश किंवा स्कॉटिश कोर्टांत इतका चळवळ उडविणारा खटला पूर्वी कधींहि आला नव्हता, असें वर्णन तुम्हांस आढळून येईल.

आतां या खटल्यासंबंधीं सविस्तर हकीकत मी उघडपणें सांगतों. माझी गुप्तपणें सुटका कशी झाली, आणि ती कोणीं व कां केली, हें गौप्यहि मी आतां उघड सांगणार आहें. मी अमेरिकेंत आहें, ही गोष्ट फुटेपर्यंत मी तुरुंगांत आहें, असा जर्मन परराष्ट्रखात्याचाहि समज होता.

सरकारतर्फे मजविरुद्ध एकंदर पंचेचाळीस साक्षिदार उभे करण्यांत आले होते. त्यांत ॲडमिरल, कर्नल, क्याप्टन, लष्करी आणि आरमारी

तसेच पोस्ट खात्याचे अधिकारी इत्यादि अनेक लहानथोर मंडळी होती. या सर्वांचेच हुद्दे मला आतां आठवत नाहींत. युरोपांतील सर्व भागांतून वर्तमानपत्रांचे बातमीदारहि आले होते. कारण, या खटल्यांत सर्व युरोपचाच संबंध होता. कोर्टाची विस्तीर्ण इमारत प्रेक्षकांनीं अगदीं गच्च भरून गेली होती, असें मला आतां आठवतें. खटल्याच्या संबंधांत बाहेर पडलेलीं बडीं बडीं नांवें, खटल्याची चमत्कारिक परिस्थिति आणि तो खटला एका जर्मन हेरावर होता ही गोष्ट, इतक्यामुळें या खटल्याला अपूर्वता प्राप्त झाली होती. त्यामुळें सर्वत्र विलक्षण चळवळ उडाली होती.

स्कॉटलंडचे लॉर्ड जस्टिस हे स्वतःच न्यायासनावर बसले होते.लष्करी बाबतींत हे गृहस्थ स्वतः फार निष्णात आहेत. सरकारतर्फे सॅलिसिटर जनरल सर ए. एम्. ॲंडरसन हे खटला चालवीत असून, ॲडव्होकेट डेप्युटी जी. मॉर्टन हे त्यांना मदत करीत होते. सरकारनें त्या वेळीं माझ्या विरुद्ध नामांकित कायदेपंडित उभे केले होते.

ब्रिटिश कोर्टांत खटले चालविण्याचें काम किती गंभीरपणानें चालविलें जातें, हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कळावयाचें नाहीं. १९१२ च्या जुलई महिन्याच्या २३ साव्या तारखेस सकाळीं दहांचा ठोका पडला आणि माझ्या खटल्यास सुरवात झाली. राजकीय थाटाचा लाल झगा परिधान करून लॉर्ड जस्टिस यांची स्वारी कोर्टाच्या प्रमुखस्थानीं विराजमान झाली. ' खामोश खामोश ' असा पुकारा चोपदारांनीं केला. एवढी प्रस्तावना झाल्यानंतर जूरी बोलावण्यांत आली. ज्यूरीपैकीं कित्येक गृहस्थांस मीं नापसंत केलें. गुप्त खात्यांतील बारा वर्षांच्या अनुभवानें चेहऱ्यावरून मनुष्याची पारख करण्याची विद्या मला बरीच साध्य झाली होती. ज्यूरीच्या पिंजऱ्यांत बसलेले पक्क्या डोक्याचे व सावध असे ते बारा स्कॉटिश गृहस्थ भक्कम पुराव्यावांचून मजविरुद्ध निकाल देणार नाहींत अशी माझी पक्की खात्री होती. मजविरुद्ध जमा केलेला पुरावा पोकळ आहे, व तेवढ्यावरून आरोपाची शाबिती मजवर होणार नाहीं, असें त्या वेळीं मला वाटत होतें, हें मी प्राजंलपणें सांगतों.

बॅरिस्टरची मदत मीं नाकारली, याबद्दल जजसाहेबांनाहि फार आ-

श्चर्य वाटलें व ' कायद्याच्या मुद्यांसंबंधीं मी तुमचें रक्षण करीन ' असें ते म्हणाले; व त्याप्रमाणें त्यांनीं केलेंहि. तरी पुढें माझ्या बाजूनें काम चालविण्यासाठीं एक बॅरिस्टर उभा करण्यांत आला होता. सॉलिसिटर जनरलच्या बऱ्याच मुद्यांविरुद्ध जज्जसाहेबांनीं निकाल दिला व बऱ्याच मुद्यांसंबंधीं त्यांच्याशीं वादविवादहि केला. एकंदरींत न्यायाची तराजू फारच समतोलपणें उचलली गेली, हें मी आनंदानें व प्रांजलपणें कबूल करतों. स्कॉटिश न्यायपद्धति किती चोख आहे, याचें माझा खटला हें एक उदाहरण होय.

पहिल्या दिवशीं आरमारी आणि लष्करी तज्ज्ञांवांचून इतरांची उलट तपासणी करण्याचें मीं नाकारलें. ग्लासगो येथील बर्डमोअर आणि कंपनीच्या तोफांच्या कारखान्याचे सुपरिन्टेंडेंट रियर-ॲडमिरल टी. बी. स्ट्रॅचनहडेर यांजवर उलट तपासणीचा जंगी भडिमार मीं केला. ॲडमिरलसाहेब दिसण्यांत चेंबरलेनसारखे दिसत होते. चेंबरलेनसाहेबांप्रमाणें त्यांनींहि एका डोळ्याला कांच लावली होती. सरकारतर्फेचे महत्त्वाचे साक्षिदार या नात्यानें ॲडमिरलसाहेबांनीं विशेषशी कामगिरी बजावली नाहीं. नव्या चौदा इंची तोफेसंबंधीं साक्ष देण्याकरतां यांना बोलावण्यांत आलें होतें. खुद्द ग्लासगो येथील कारखान्यांतून प्रत्यक्ष माहिती मिळविली असल्यावांचून या नव्या तोफेसंबंधीं इतकें तपशीलवार ज्ञान कोणासहि असणें शक्य नाहीं, हा मुद्दा या साक्षिदारामार्फत सरकारास सिद्ध करावयाचा होता. अर्थातच, तोफांच्या एकंदर यंत्ररचनेच्या शास्त्राचें विवरण सुरू झालें. ॲडमिरल यांना अनेक प्रश्न विचारून या विशिष्ट तोफेचा गोळा उडविण्याचें व निशाणांत घुसविण्याचें सामर्थ्य किती असतें या मुद्यावर त्यांस मीं घोंटाळ्यांत घातलें. बोलण्यावरून बोलणें वाढत चाललें आणि हे गृहस्थ ब्रिटिश आरमार खात्यांत रियर–ॲडमिरलच्या दर्जापर्यंत वाढले असतांहि स्वतःच्या तोफखान्यासंबंधीं मजहून त्यांना अधिक माहिती नाहीं, असें प्रेक्षकांस वाटूं लागलें. या प्रश्नोत्तरांच्या जाळ्यांत गुरफटतां गुरफटतां कांहीं गुप्त गोष्टींचा स्फोट करण्याच्याहि ते बेतांत आले; पण इतक्यांत सावध होऊन ते कोर्टाकडे वळून म्हणाले,

" न्यायाधीश महाराज, खुल्या कोर्टांत या मुद्याची अधिक चर्चा करणें ब्रिटिश सरकारच्या हितसंबंधास बाधक आहे. "

तोफांच्या रचनेसंबंधाचे माझें एकंदर ज्ञान अगोदरच इतकें विस्तृत होतें कीं, बर्डमोअर कपनीच्या कारखान्यांतून चोरून माहिती मिळविण्याचें मला कारणच नव्हते. हे माझें म्हणणें मी अखेरपर्यंत सोडलें नाहीं. यानंतर सरकारतर्फे आणखी एका आरमारी तज्ज्ञाची साक्ष झाली. त्यानें आपल्या उलट तपासणींत असें स्पष्ट कबूल केलें कीं, ' आरोपीला तोफखान्याचें जें सामान्य ज्ञान आहे, त्यावरून आमच्या नव्या चौदा इंची तोफेच्या रचनेचे बरोबर अनुमान करणें त्याला शक्य आहे ! "

ॲडमिरलसाहेबांच्या हाताखालील कांहीं अम्मलदारांची कित्येक नाटकी स्त्रियांशीं दोस्ती होती. या स्त्रियांच्या मार्फत जी माहिती मला मिळाली, तीच माहिती कोर्टांत माझ्या उपयोगी पडली, ही गोष्ट मी आतां ॲडमिरलसाहेबांस सांगितली, तर निःसंशय त्यांस मोठा आनंद होईल !

यानंतर माझ्या सामानांत सांपडलेली एक चिठ्ठी पुराव्यांत दाखल करण्यांत आली. तींत पुढील मजकूर होता.

" बुइलियम बर्डमोअर आणि कंपनी, पार्क हेड, ग्लासगो. बी. पहिली मागणी. एक नवी १३. ५ तोफ. एक आरमारी. लांबी ५१ फूट वजन ७३ टन. बारा इंचीपेक्षां लांबी १ फूट अधिक; पण वजनांत बारा टन अधीक. गोळ्याचे वजन १२५० पौंड. बारा इंची गोळ्यापेक्षां ४०० पौंड अधिक. "

पहिल्या दिवशीं कोर्टातील काम आटोपल्यानंतर नव्या तोफांचीं माहिती मिळविण्याच्या आरोपांतून मी मोकळा होईन अशी प्रत्येकाची खात्री झाली होती. ही माहिती मीं मिळविली होती ही गोष्ट मी आतां कबूल करतों.

कोर्टाला मधली सुट्टी झाली, तेव्हां कोर्टाचा चोपदार खुद्द जज्जसाहेबांकडून मला फराळाचें सामान घेऊन आला व जज्जसाहेबांनीं आपला सलामहि कळविण्यास सांगितलें आहे, असें तो म्हणाला. तेव्हां मला

फार आश्चर्य वाटून आनंदहि झाला. मी आरोपी नसून कोर्टाच्या पाहुण्याप्रमाणेंच मला वागविलें जात आहे, असें मला वाटलें.

दुसऱ्या दिवशीं बरोज आणि वेल्कम कंपनीचें पत्र पुराव्यांत दाखल झालें. पोस्टाच्या कामगारानें जें पत्र मला देण्याचे नाकारलें आणि त्याला मालक नसल्यामुळें जें सदरहू कंपनीकडे परत पाठविण्यांत आलें, तेंच हें पत्र. सरकारी वकिलांनीं मोठी गंभीर मुद्रा धारण करून तें पत्र कोर्टाला मोठ्यानें वाचून दाखविलें. त्यांतील मजकूर असा होता. " प्रिय महाशय ! तुम्हीं हातीं घेतलेल्या कामांत तुम्ही आपल्या मध्यस्तीचें काम यशस्वीपणें पार पाडलें, याबद्दल आम्हांस मोठा संतोष झाला आहे. मालाचा नमुना ताबडतोब पाठविण्याची कृपा करावी. तुमच्या दुसऱ्या कामगिरीसंबंधीं इतकेंच कळवावयाचें कीं, आम्हांला तिचा कितपत उपयोग होईल, हें सांगतां येत नाहीं. कसेंहि असलें तथापि आमची पेढी या कामाबद्दल आपणास शंभरांहून अधिक देण्यास खुष नाहीं. " पत्राच्या खालीं सही नव्हती.

पत्र वाचीत असतां प्रत्येकीं दहा पौंडांची याप्रमाणे पांच नोटा सर अँडरसन यांनीं आपल्या हातांत धरल्या होत्या. पत्र वाचून झाल्यानंतर आरोपास पुष्टि देण्याकरतां त्यांनीं जोरदार भाषण केले. त्याचा मतलब असा. " ज्युरींतील सभ्य गृहस्थहो, केवळ वरवर पाहणारास या पत्रांत कांहीं संशयास्पद मजकूर दिसणार नाहीं; पण ज्याकोबाईट बंडाच्या वेळीं सरकाराबद्दल उल्लेख करतांना पेढी किंवा कंपनी असा शब्द वापरण्यांत येत असे हें आपणांस स्मरत असेलच. हें पत्र प्रामाणिकपणें केवळ व्यापारधंद्याचेंच होतें, तर तें भलत्याच कंपनीच्या पाकिटांत कां आलें ? खुद्द त्या कंपनीला याबद्दल कांहींच माहिती नाहीं. त्याजवर सही कां नाहीं ? त्यांत रोकड कां होती ? शंभर पौंड देण्यास ती पेढी खुष आहे; पण ही रकम कशाबद्दल द्यावयाची ? सद्गृहस्थहो, या साऱ्या गोष्टींचीं कारणें अगदीं उघड आहेत. "

त्या पत्रानें ज्युरी, कोर्ट आणि वर्तमानपत्रें यांनाच नव्हे, तर साऱ्या इंग्लंडला घोंटाळ्यांत पाडलें होतें. आतां या घोंटाळ्याचा मी उलगडा करतों.

हें पत्र जर्मन सरकाराकडून आलें होतें. त्या पत्रांत नमुना या शब्दानीं ज्या वस्तूचा उल्लेख केला आहे, ती वस्तु म्हणजे नव्या चौदा इंची तोफेंत वापरण्याकरतां तयार केलेलें एक नवें स्फोटक द्रव्य. यांपैकीं थोडेंसें मीं मिळविलें होतें. याचा नमुना माझ्या सामानासुमानांत सांपडला नाहीं, अथवा आरोप शाबीत करण्यासारखी दुसरी कोणतीहि वस्तु मजपाशीं सांपडली नाहीं, ह्याचें कारण हेंच कीं अशा प्रकारें गुप्त काम करणाऱ्या आह्मां लोकांना अगोदर सावध रहाणें नेहमींच इष्ट असतें. अशा प्रकारच्या वस्तु सुरक्षित ठिकाणीं ठेवून त्या जागेची किल्ली एखाद्या विश्वासू मनुष्याजवळ ठेवून त्याला मुखत्यारपत्र दिलेलें असतें.

पत्रांत या नमुन्याचा उल्लेख आहे. तो नमुना म्हणजे हें नवें स्फोटक द्रव्य. तसेंच दुसऱ्याहि एका कामगिरीचा त्यांत उल्लेख आहे. ही दुसरी कामगिरी अत्यंत महत्वाची असून ब्रिटनच्या सुरक्षितपणाशीं तिचा अत्यंत निकट संबंध होता. पत्रांतील दुसरा कोणताहि मजकूर या मुद्याइतका महत्त्वाचा नव्हता.

क्रोमार्टी येथील ठाण्यांत दुसरे कांहीं हेर कामगिरीवर होते. त्यांचीं नांवें मला माहीत नव्हतीं. आपल्या कामगिरीचा रिपोर्ट ते मजकडे पाठवीत त्या वेळीं त्यावर ते आपल्या गुप्त खात्यांतला नंबर मात्र घालीत. त्यांच्याद्वारें मिळालेली माहिती जर्मनींत कळवून पुढें काय करावयाचें, हें मी ठरवीत असें. आतां ही दुसरी कामगिरी कोणती तें सांगतों, ब्रिटनच्या एका आरमारी अम्मलदाराला शंभर पौंड दरमहा द्यावयाचे व त्याच्या मोबदल्यांत युद्ध सुरू झाल्याबरोबर त्यानें एका बंदराच्या संरक्षित जागीं एक असें भयंकर विश्वासघाताचें व देशद्रोहाचें कृत्य करावयाचें कीं, त्याचा उच्चारहि माझ्यानें करवत नाहीं. दुसरी कामगिरी ती ही.

ज्यूरींतील गृहस्थांबद्दल माझी जी कल्पना होती, ती बरोबर ठरली. त्यांच्यावर या पत्राचा परिणाम कांहींच झाला नाहीं. त्यांतलि मजकूर इतका अस्पष्ट स्वरूपाचा होता, कीं, सरकारी वकिलाच्या जंगी शब्दपांडित्यानेंहि त्या मजबूत डोक्यांच्या पांच गृहस्थांवर त्याचा कांहींच परिणाम

झाला नाहीं. या खटल्याच्या अनकूल निकालाबद्दल माझ्या मनांत पूर्ण उमेद होती; पण इतक्यांत एक चपराशी सर अँडरसनजवळ आला आणि त्यानें एक पाकीट त्यांच्या हातांत दिलें. तें पाकीट मी ओळखलें आणि ताबडतोब मी अगदीं गारठून गेलों. वकिलानें तें वाचून पाहिलें आणि त्याच्या चेहऱ्यावर मंद स्मिताची लकेर दिसूं लागली. अखेरीस मी जाळ्यांत बांधला जाणार अशी माझी खात्री झाली.

कोर्टाकडे वळून वकिलानें पातळ कागदाचे दोन तुकडे जज्जसाहेबांपुढें केले आणि तो म्हणाला, " ग्रेटब्रिटनच्या हितसंबंधाविरुद्ध अत्यंत भयंकर असा सांकेतिक भाषेंत लिहिलेला पुरावा मला कोर्टाला दाखवावयाचा आहे. "

हा मजकूर खरोखरच भयंकर होता. या दोन कागदांत ब्रिटनच्या आरमारांतील प्रत्येक गलबत, प्रत्येक आरमारी ठाणें, प्रत्येक किल्ला आणि प्रत्येक माऱ्याची जागा यांची नोंद केली होती. त्यांत एकंदर दहा हजारांवर नांवें नोंदलीं होतीं आणि प्रत्येक नांवासमोर एक खुणेचा आंकडा होता. उदाहरणार्थ, किनमेरी या बेडर जहाजाला ८१३ हा नंबर देण्यांत आला होता. "

भवितव्यतेच्या गोष्टी कांहीं साधनांनीं अगोदरच समजतात, असा माझा विश्वास आसल्याचें, मीं यापूर्वीच कबूल केलें आहे आणि माझा असा विश्वास बसावयाला कारणेंहि झालीं. प्रथम या जाळ्यांत मला गुंतविण्यास बरोज आणि वेलकमचें पत्रच कारणीभूत झालें आणि आतां त्या जाळ्याची गांठ पक्की बसण्यास हीच कंपनी पुन्हां कारण झाली. डॉक्टर लोकांच्या उपयोगाकरतां ही कंपनी कांहीं पुस्तकें तयार करीत असते. याच पुस्तकांत सदरील संकेतचिन्हें मीं लिहिलीं होतीं.

सूक्ष्मदर्शक कांचेच्या सहाय्यानें हे सांकेतिक शब्द मीं अगदीं बारीक अक्षरांनीं लिहिले होते. कारण नांवें पुष्कळच असल्यामुळें तीं नुसतीं पाठ करून ध्यानांत ठेवणें अशक्य होतें. समोरासमोरच्या दोन पानांवर हीं नांवें लिहिलीं असून नंतर त्या पानांच्या कडा चिकटवून टाकल्या होत्या. ज्या वेळीं ब्रिटिश आरमारी जहाजांच्या हालचाली सुरू असल्याचें

मला समजे, त्या वेळीं मी एखाद्या उंच जागीं जाऊन त्या साऱ्या हालचाली पहात असें. नंतर गलबतांचीं आकाशचित्रें ध्यानांत ठेवून या पुस्तकाच्या सहाय्यानें मीं बर्लिनला बातम्या देत असें. उदाहरणार्थ—

२१४, ६९, ७००, ९१०, २१ इत्यादि. मध्यंतरी जरूर लागणारे शब्द ए. बी. सी. कोडाच्या सहाय्यानें मी भरून काढीत असें.

अशा रीतीनें बर्लिन येथील जर्मन आरमाराच्या बातमीखात्याला रोझिथ येथील आरमारी जाहाजांच्या हालचालीच्या बातम्या मी देत असें. वर सांगितलेल्या कोडांत सांकेतिक शब्द कसे वापरलेले असतात याचा नमुना येथें देतों. ' बातमी पसरली ' ' आंत येत आहे '' बाहेर जात आहे ' ' युद्धाची तयारी करीत आहे ' ' बचावाचीं जाळीं टाकलीं. ' तटबंदीवर शिबंदी ठेवली. ' ' संरक्षणाच्या हालचाली समुद्रावर सुरू आहेत. '' कोळसा आगगाडीनें येत आहे.'' राखून ठेवलेलें सैन्य बऱ्याच मोठ्या प्रमाणावर येत आहे. ' ' बंदराबाहेर सुरुंग पेरण्याचें काम सुरू आहे. ' ' सर्व स्तब्ध आहे. ' ' विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. ' ' व्यापारी जहाजें दिसूं लागली आहेत. ' इत्यादि.

हें संकेत चिन्हांचें पुस्तक सरकारच्या हातीं लागल्यानंतर पुढें अधिक चर्चेचें कारणच उरलें नाहीं. मीं आपल्यातर्फे दोन तीनपेक्षां अधिक साक्षिदार बोलाविले नाहींत आणि यांना तरी मी फक्त एकच प्रश्न विचारला,

" इंग्लंडासंबंधीं माझ्या मनाचा कल कसा असावा असें तुह्मांस वाटतें ? "

त्या सर्वांनीं हें स्पष्टपणें कबूल केलें कीं, मीं जरी एखाद्या परकीय राष्ट्राच्या वतीनें हेराचें काम करीत असलों, तरी व्यक्ति या नात्यानें इंग्लंडाविरुद्ध वैरभाव मीं केव्हांहि प्रगट केला नाहीं.

अशा साक्षींचा उपयोग माझी शिक्षा कमी करण्याकडे होईल, इतकीच मला आशा होती. ज्युरी आपलें मत ठरविण्यासाठीं बाजूला गेली आणि अर्ध्याच तासानें परत येऊन ब्रिटिशसाम्राज्याच्या सुरक्षितपणास धोका आणण्याचा अपराध मजवर शाबीत झाला असल्याचें तिनें सांगितलें.

हेरांच्या नव्या कायद्याप्रमाणें या गुन्ह्याला सात वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा सांगितलेली आहे, हें वाचकांना ठाऊक आहेच.

मुख्य न्यायाधीश ज्यूरीला खटला समजावून सांगत असतां दिसण्यांत उच्च दर्जाचे काळा पोषाक केलेले एक इंग्रज गृहस्थ कोर्टांत आले. यापूर्वी हे गृहस्थ कोर्टांत केव्हांच आढळले नव्हते. चपराशानें मोठ्या आदबीनें या गृहस्थांना जज्जसाहेबांपाशीं नेलें. दोन मिनिटेंपर्यंत हे गृहस्थ जज्जसाहेबांच्या कानाशीं कुजबुजत होते व जज्जसाहेब मधून मधून आपलें डोकें हालवीत होते. मला चांगली जबर शिक्षा मिळणार, असें या प्रकारावरून मला वाटलें. पण जज्जसाहेबांनीं निकाल दिला तो असाः—

" सर्व गोष्टी लक्षांत घेतां या गुन्हेगारास अठरा महिन्यांची सजा कोर्ट फर्मावित आहे. "

मीं हंसून आपल्याशींच म्हटले 'चला निघा आर्मगार्ड कार्ल ग्रेव्हज. "

शिक्षेबद्दल सर्व प्रेक्षकांस फार आश्चर्य वाटत असल्याचें उघड दिसून आलें. माझ्या आजुबाजूला आश्चर्याचे उद्गार सर्वत्र ऐकूं येत होते. विशेषतः परक्या देशांतल्या बातमीदारांना तर फारच नवल वाटलें. मला सात वर्षें काळ्यापाण्यावर जावें लागणार अशी प्रत्येकाची खात्री असतां अठरा महिन्यांच्या साध्या सजेवर मी निभावलों, ही गोष्ट खरोखरच कल्पनातीत होती. असें कसें झालें ?

एडिंबरो येथील कॉऊन्टहिलच्या तुरुंगांत मला प्रथम नेण्यांत आलें. यानंतर दोन आठवड्यांनीं ग्लासगोजवळील बारलेनी तुरुंगांत आमची बदली झाली. एकंदर परिस्थितीचा विचार करतां मला तुरुंगांत इतक्या चांगल्या रीतीनें वागविण्यांत आलें कीं, या गोष्टीचें मला खरोखरच आश्चर्य वाटलें. माझ्या खटल्याच्या वेळीं जी मेहरनजर मजवर दाखविण्यांत आली होती, तीच तुरुंगांतहि मजबरोबर आली होती. इकडे तिकडे प्रश्न विचारून माझ्यापासून कांहीं अधिक माहिती काढण्याचा यत्न बारलेनी तुरुंगाचे अधिकारी करीत होते, असें मला ताबडतोब दिसून आलें; पण या त्यांच्या प्रयत्नास यश आलें नाहीं; तथापि कांहीं सूचक वाक्यें बोलण्याचें त्यांनीं कमी केलें नाहीं.

" तुझी येथें फुकटचे कां अडकून पडलां ? " " तुझी बाहेर कां पडत नाहीं ? " " तुमच्या योग्यतेला अनुरूप असें कांहीं तरी—"

खालच्या वार्डरापासून तों थेट वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत अशा प्रकारचीं वाक्यें माझ्या कानीं पडत; तथापि मीं आपल्या तोंडाचें कुलूप केव्हांच काढलें नाहीं.

कॉमन्स सभेंत मजसबंधीं एका सभासदानें कांहीं माहिती विचारली असतां, सरकारकडून त्याला ती देण्यांत आली नाहीं, हें मीं आरंभींच सांगितलें आहे. ती माहिती आतां मी सांगतों.

मला तुरुंगांत नेल्यानंतर पांच आठवड्यांनीं तुरुंगाच्या गव्हरनरच्या ऑफिसांत मला नेलें. त्या वेळीं शिपायी बाण्याचा, आणि सडपातळ असा एक इंग्रज गृहस्थ तेथें बसला होता. हा रिसाल्यांत कोणी कामगार असावा, असें मीं तेव्हांच ओळखलें. लष्करी कामगार वारंवार पाहण्याची ज्याला संवय आहे, त्याला ते कोठेंहि ओळखूं येतात. ऑफिसांत गेल्याबरोबर गव्हरनर मला म्हणाले, " ग्रेव्हज, हे एक गृहस्थ तुला भेटण्यासाठीं आले आहेत. "

तो गृहस्थ गव्हरनरास म्हणाला, " मला जरा बराच वेळ लागेल. तुझी आपलें काम करा. " गव्हरनरसाहेब आह्मां दोघांस ऑफिसांत सोडून बाहेर गेले. तो परका गृहस्थ उठून मजजवळ आला आणि म्हणाला, " डॉक्टर, माझें नांव रॉबिनसन. या, असे खुर्चीवर बसा. "

मी कैदी असल्यामुळें मी उभाच राहिलों होतों, हें सांगावयास नकोच.

रॉबिनसननें मला प्रथम कुशल प्रश्न विचारण्यास सुरवात केली.

" आधिकारी तुह्मांला येथें कसे वागवितात ? "

" मला कोणतीहि तकरार करण्यास जागा नाहीं. "

" ही कैद तुह्मांस कंटाळवाणी झाली असेल ? "

" हो. हें स्वाभाविक आहे. मी पुरा दैववादी आहें. किस्मत ! क्यापटन्साहेब ! या साऱ्या नशिबाच्या गोष्टी. "

" ओहो ! तुझी क्यापटन म्हणतां ? हें तुह्मांला कसें समजलें ? आपली तर पूर्वी केव्हांहि भेट झाली नव्हती. "

" भेट झाली नव्हती हें खरें; पण लष्करी कामगार माझ्या पाहण्यांत इतके आले आहेत, कीं ब्रिटिश रिसाल्यांतील कामगार ओळखणें मला अशक्य नाहीं. आपण पूर्वी हुज्जार रिसाल्यांत कामगार होतां वाटतें ? "

" क्यापटन्साहेब कांहीं वेळ हंसतच राहिले. मुद्यावर गोष्ट कशी आणावी, यासाठीं ते मला प्रथम चाचपून पहात होते, असें दिसलें. नंतर मजकडे वळून ते एकदम म्हणाले,

" दोस्त, तूं जर्मनीच्या तर्फे आह्मांविरुद्ध काम करीत होतास हें आह्मांला समजलें आहे. तसेंच जातीनें तूं जर्मन नाहींस, हेंहि आह्मांला ठाऊक आहे. मग तूं आमच्या तैनातींत कां राहूं नये ? तसें करण्याला तुझीं कांहीं खाजगी कारणें आहेत का ? "

" क्यापटनसाहेब, केवळ पैशाच्या लोभानें अथवा केवळ कैदेंतून सुटण्यासाठीं आमच्या या धंद्यांतला कोणीहि मनुष्य आपल्या पहिल्या धन्याशीं निमकहरामी करणार नाहीं, हें तुह्मांला तरी ठाऊक असलें पाहिजे. आम्ही बोलून चालून उघड्या डोळ्यानेंच या धंद्यांत पडत असतों. डाव फसला, तर त्याचा परिणाम काय होणार, हेंहि आह्मांला चांगलें ठाऊक असतें. कांहीं कमी जास्ती झालें, तर त्याबद्दल आम्ही कधींहि ओरड करीत नाहीं. "

क्यापटनसाहेब कांहीं वेळ मजकडे रोखून पहात होते. थोड्या वेळानें ते म्हणाले, " तुमच्या संबंधानें जी कांहीं माहिती आह्मांला मिळाली, ती बरोबर होती असें दिसतें. इंग्लंडांत पाय ठेवल्यापासून तुह्मी आपली कामगिरी करीत असतां आणि तसेंच खटल्याचे वेळी व अखेरीस तुरंगांत जी मनाची शांत वृत्ति तुम्हीं दाखविली, ती पाहून आह्मांस खरोखरच फार आश्चर्य वाटतें. तसेंच या कामगिरींत तुमच्या सारख्या निष्णात मनुष्यानें जो थोडासा निष्काळजीपणा दाखविला, त्याचेंहि आह्मांस नवल वाटतें. एकंदरींत या कामगिरीसंबंधीं तुम्हांस फारसा उत्साह नव्हता, असें आह्मांस दिसून आलें. तुह्मीं जें कांहीं केलें, त्याहून बरीच अधिक कामगिरी तुम्हांस करतां आली असती. * * * तुह्मांला अगदींच अल्प शिक्षा मिळाली याचें तुह्मांला नवल वाटूं नये का ? "

थोडासा हंस्रा चेहरा करून मीं म्हटलें, " क्यापटनसाहेब, मला कोणत्याच गोष्टीचें आश्चर्य वाटत नाहीं. "

माझें उत्तर ऐकून क्यापटनसाहेब अधिकाधिक उत्सुक होत आहेत असें दिसलें. ते म्हणाले, " समजा, कीं या जाळ्यांत तुम्हांस तुमच्या सरकारानेंच गुंतविलें, असें आम्हीं सिद्ध केलें, तर पुढें कसें काय ? "

क्यापटनसाहेबांच्या या प्रश्नाचाहि मजवर फारसा परिणाम झाला नाहीं. असें केव्हां तरी घडून येणार, हें मला प्रथमपासूनच ठाऊक होतें. याकरतां इंग्लंडमध्यें जितकी कामगिरी करणें शक्य होतें, तितकी ती न करतां प्रथमपासूनच मी निष्काळजी राहिलों.

" तुम्ही म्हणतां असें असेल, तर तुमच्याशीं ठराव करण्यास मी नाकबूल नाहीं; पण जोंपर्यंत माझ्या समोर लोखंडी गज दिसत आहेत, तोंपर्यंत मी डोळे असून आंधळा आणि कान असून बहिरा झालों आहें. "

क्यापटनसाहेब हांसून म्हणाले, " ठीक आहे डॉक्टर. मी तुमची भेट पुन्हा लवकरच घेईन. "

" तसें तुम्ही कराल, यांत मला मुळींच शंका नाहीं; पण माझ्यासमोर मला जोंपर्यंत लोखंडी गज दिसत आहेत, तोपर्यंत माझ्या भेटींत जाणारा वेळ म्हणजे काळाचा अपव्यय होय, एवढें मात्र कृपा करून ध्यानांत ठेवा. "

" तें सारें माझ्यावर सोंपवा. " असें झणून क्यापटनसाहेब माझ्याशीं शेकह्यांड करून निघून गेले.

पुनः माझ्या कोठडींत मला नेण्यांत आलें. यानंतर दोन तीन रात्रीं मला चांगलीशी झोंप आली नाहीं, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. माझ्या खटल्याच्या वेळीं आणि त्यानंतर तुरुगांत जो शांतपणा मीं दाखविला, तो खरोखर नाटकी होता. क्यापटन रॉबिनसनच्या भेटीसारख्या प्रसंगीं मी शांतवृत्ति धारण करीत असें; पण तसें करण्यास मला अत्यंत प्रयास पडत आणि त्यामुळें माझी मानसिक शक्तीहि अत्यंत क्षीण झाली. यानंतरहि थोडे दिवस मी अगदीं बावरल्यासारखा झालों होतों. माझी झोंप साफ उडून गेली होती. रात्रीच्या वेळीं मी आपल्या खोलींत किती तरी वेळ नुसत्या येरझारा घालीत असें.

तथापि माझ्या कल्पनेप्रमाणें पुढच्याच आठवड्यांत क्यापटन रॉबिनसन पुनः माझ्या भेटीस आले. ते आले त्यावेळीं रात्र बरीच उलटून गेली होती. सर्व कैदी आपल्या कोठड्यांत स्वस्थ पडले होते. तुरुंगाच्या दुय्यम गव्हरनरानें स्वतः मला बोलावून ऑफिसांत नेलें. दुसरा कोणीहि वार्डर किंवा तुरुंगाचा दुसरा कोणताहि अधिकारी आमच्या नजरेस पडला नाहीं.

गव्हरनराच्या ऑफिसांत रॉबिनसन मला भेटलें. ते मला म्हणाले, " कसें काय डॉक्टर ? आतां तुमच्याशीं पक्का ठराव करण्याकरतां मी आलों आहे. तुमचा मला उपयोग होण्यासारखा आहे. तुमच्या शिक्षेंतले सोळा महिने आद्यापि शिल्लक आहेत. हे महिने तुह्मी आमच्या नौकरींत घालविण्यास राजी आहां काय ? तसें असेल, तर पैशासंबंधीं मग ठराव करतां येईल. तुमचे पाय जाळ्यांत गुंतविण्यास खुद्द जर्मन सरकारनेंच प्रयत्न केला, असें सिद्ध करण्याजोगा पुरावा मजजवळ तयार आहे. "

त्यांनीं जो पुरावा मजपुढें ठेवला, त्यांवरून त्यांचें म्हणणें खरें आहे, असें मला निःसंशय दिसून आलें. जर्मनीच्या इतक्या भानगडी मला समजल्या होत्या कीं, मी जगांत मोकळें रहाणें त्यांना अनिष्ट वाटलें. सात वर्षेपर्यंत बिनबोभाट मीं तुरुंगात कुजत पडावें, अशी युक्ति त्यांनीं योजिली. तेवढ्या अवधींत ट्यानस अरण्यांतलें खलबत पक्क दशेस येईल, अशी त्यांची कल्पना होती.

क्यापटनसाहेब म्हणाले, " आतां पुढें काय करावयाचें, याबद्दल तुह्मी कांहीं सूचना करतां कां ? "

" माझा उपयोग तुह्मांला थोडासाहि जरी करून घेणें असेल, तर माझ्या सुटकेची बातमी तिसऱ्या कानास कळतां उपयोगी नाहीं, हें मी तुह्मास सुचवून ठेवतों. हें साध्य कसें करावयाचें हें तुमचें तुह्मी पहा. माझी प्रकृति बरोबर नाहीं, अशी बातमी मी ऐडिंबरो येथें पसरविली होती. तशीच तुरुंगांतहि आहे, असा लोकांचा अद्यापहि समज असेल. या आधारावर माझी बदली दुसऱ्या तुरुंगांत झाल्याचा बहाणा तुह्मी करूं शकाल. मग पाहिजे तेथें तुह्मी मला न्या. दुय्यम गव्हरनर, गव्हरनर

आणि तुह्मी स्वतः यांवांचून आणखी कोणालाहि खरा प्रकार समजण्याचें कारण नाहीं. "

क्यापटन रॉबिनसन म्हणाले, " बरोबर, बरोबर. माझा स्वतःचा बेत असाच आहे. "

एवढें भाषण झाल्यानंतर रॉबिनसन निघून गेले आणि मी आपल्या कोठडींत परत आलों. दुसऱ्या दिवशीं पहांटे साडेपांच वाजतां तुरंगाच्या लेफटेनन्ट गव्हरनरानें मला उठविलें. ते एकटेच आले होते. वार्डर किंवा तुरुंगांतिल दुसरा कोणताहि अधिकारी जवळपास दिसत नव्हता. मी गव्हरनरच्या ऑफिसांत गेलों. त्या ठिकाणीं माझे कपडे आणि सारी चीज वस्त तयार करून ठेवली होती. मीं पोशाख केला आणि आह्मी दोघे तुरंगांतून बाहेर पडलों. नंतर एका भाड्याच्या मोटार गाडींत बसून ग्लासगोंतील क्यालिडोनियन स्टेशनावर आह्मी आलों. अद्यापि रात्र बरीच असल्यामुळें रस्त्यावर लोक हिंडूं फिरूं लागले नव्हते. यामुळें आह्मांला कोणी ओळखील अशी भितीहि नव्हती. पहांटेच्या गाडीनें आह्मी लंडनांस आलों. तेथें युस्टन स्टेशनांवर क्यापटन रॉबिनसन आह्मांला भेटले. आह्मी तिघे एका वेटिंगरूममध्यें गेलों. त्या ठिकाणीं मजबद्दलची पावती क्यापटन रॉबिनसन यांनीं लेफ्टेनंट गव्हरनर यांस दिली. पावती घेऊन लेफटेनन्ट गव्हरनर निघून गेले. थोड्या वेळानें माझ्या हातीं एक पाकीट देऊन रॉबिनसन हे निघून गेले. आतां मी एकटाच मागें राहिलों. माझ्या मनांत असतें, तर मला येथूनच पोबारा करतां आला असता. ब्रिटिश सरकारानें मजवर पूर्ण विश्वास टाकला होता, असें मला उघड दिसून आलें. स्टेशनापासून बाहेर पडून मी रसेल हॉटेलमध्यें गेलों व तेथें एक खोली ठरवून तेथल्या नोंदबुकांत मीं आपल्या नांवाची नोंद केली. खोलींत जाऊन रॉबिनसन यांनीं दिलेलें पाकीट मी उघडलें. यांत एक दहा पौंडाची नोट व एक चिठी होती. चिठींत पुढील मजकूर होता.

" मेफेअर परगण्यांतील नंबर—च्या टेलिफोनवर सकाळीं साडे दहा वाजतां हांक मारणें. "

चिठींत सांगितल्याप्रमाणें मीं त्या नंबरवर तार केली. क्यापटन रॉबिनसन यंत्राजवळ आले आणि त्यांनीं मला ट्राफलगार स्क्वेअरमधील मोलें हॉटेलमध्यें दुपारीं एक वाजतां भेटण्यास बोलावलें. मोलें हॉटेलमध्यें मि. मॉर्गन या नांवाचे आणखी एक गृहस्थ आह्मांस भेटले. हे गृहस्थ इंग्लिश हेर खात्यांत असावेत, असा मीं तेव्हांच तर्क केला आणि माझा तर्क बरोबर होता, असें मला पुढें कळलें. तुह्मी व क्यापटन रॉबिनसन दुपारीं डाऊनिंग स्ट्रीटमध्यें जा." असें मार्गन यानें मला सांगितलें. या ठिकाणीं प्रधानमंडळापैकीं एक गृहस्थ माझी भेट घेणार आहेत, असें-हि ते म्हणाले.

क्यापटन रॉबिनसन व मी डाऊनिंगस्ट्रीटवर गेलों. तेथल्या नोंदबुकांत सही केल्यानंतर मला एका बाजूच्या खोलींत नेण्यांत आलें. क्यापटन रॉबिनसन बाहेरूनच निघून गेले. यावें मीं आपलें नांव ट्रेन्टन स्नेल असें दिलें होतें.

या खोलींत वीस मिनिटें वाट पाहिल्यानंतर एक चपराशी मजकडे आला व आह्मी दोघे एका जिन्यानें वर गेलों. तेथील एका खोलीचें दार उघडून व मला आंत सोडून चपरासी निघून गेला. मीं वर पाहिलें तों सर एडवर्ड ग्रे तेथें बसले असल्याचें मला आढळून आलें.

सर साहेब एका मोठ्या हिरवें अस्तर घातलेल्या महागनी टेबलाजवळ बसले होते. ही खोली एखाद्या खाजगी लायब्ररीसारखी दिसत होती. पुस्तकें, स्मरणवह्या, पत्रें इत्यादि वस्तुंचे गंजच्यागंज टेबलांवरच नव्हे, तर खुर्च्यांवरहि पडले होते. तेथेंच एक भव्य व चामड्यानें मढविलेली आरामखुर्चीहि डोळ्यांत एकदम भरत होती.

ही आरामखुर्ची एवढी मोठी होती कीं, तिजवर बसलेले सर साहेब लहान मुलाप्रमाणें दिसत होते. कांहीं कागद वाचण्यांत ते अगदीं गढून गेले होते, असें दिसलें. त्यांजसमोर मी सुमारें दहा मिनिटें उभा राहिलों होतों, तरी त्यांनीं मजकडे लक्ष दिलें नाहीं. तथापि समोरच्या कागदाच्या कडेवरून ते मजकडे मधून मधून पहात होते असें माझ्या लक्षांत आलें. हातांतील कागद बाजूला ठेवून त्यांनीं मला बसावयास सांगितलें, तरी मी

तसाच उभा राहिलों. ग्रे साहेबांनीं टेबलाचा खण उघडून एक कागदाचें पुडके बाहेर काढलें. त्यांत मजसबंधींचा रिपोर्ट असावा, असा मला संशय आला. पुढें घडून आलेल्या गोष्टींनीं हा माझा संशय खराहि ठरला. सर साहेब आणखी कांही वेळ या कागदाकडेच पहात राहिले. मी येथें होतों, याचें जणूं काय त्यांना भानच राहिलें नाहीं. या वेळाचा फायदा घेऊन मींहि सरसाहेबांचें थोडेसें निरीक्षण केलें. हे गृहस्थ विलक्षण मितभाषी आणि अत्यंत थंड्या स्वभावाचे असावेत असा माझा समज झाला. इतकीं थंडीं माणसें इंग्लंडाशिवाय अन्यत्र कोठेंहि आढळून यावयाचीं नाहींत. पौर्वात्यांशीं सबंध शतकभर दाट परिचय झाल्यामुळें इंग्लंडांतहि पौर्वात्यस्वभावाचे काहीं विशेष आढळून येतात. मनांत कांहीं असले तरी चेहरा अगदीं निर्विकार ठेवून मनांत काय चाललें आहे, याचा मागमूस कोणासहि लागूं द्यावयाचा नाहीं, ही पौर्वात्यांची कला इंग्रज मुत्सद्यांसहि चांगली साधली आहे. त्यांच्या ठिकाणीं असलेली अत्यंत निरीक्षक दृष्टि आणि एकाग्रतेचें सामर्थ्य यांचा मागमूस त्यांच्या चेहऱ्यावरून केव्हांहि लागावयाचा नाहीं.

थोड्या वेळानें सरसाहेब म्हणाले, " जर्मनीच्या आरमारी तयारीसंबंधीं तुह्मांला बरींच माहिती असावी, असा माझा तर्क आहे. "

" होय साहेब. मला सामान्य माहिती आहे. माझी माहिती एका विशिष्ट भागापुरतीच आहे. "

" कोणत्या भागापुरती ? "

" आरमाराच्या बातमी खात्याचीच फक्त मला माहिती आहे. "

" त्यांचें बातमी खातें फार विस्तृत प्रमाणावर व फारच लायक रीतीनें चालतें अशी लोकवार्ता आहे. ही गोष्ट खरी आहे काय ? "

" ही गोष्ट सर्वथा खरी आहे. हें खातें कसें चालतें, हें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. "

माझें हें उत्तर ऐकून सर एडवर्ड कांहीं सूचक प्रश्न मला विचारूं लागले व मींहि त्यांना तशाच दर्जाचीं उत्तरें दिलीं. आमच्या संवादांत कांहीं

विशेष माहिती निर्माण होण्याचा रंग दिसेना. शेवटीं त्याच्या मनांत काय होते तें एकदम बाहेर पडलें.

" कांहीं आरमारी कामगार अथवा दुसरे अम्मलदार पैसे घेऊन परराष्ट्रीय बातमीदारांना माहिती पुरवितात. असें तुह्मांस वाटतें काय ? असे कांहीं अम्मलदार तुमच्या माहितींत आहेत काय ? "

' इंग्रज अम्मलदार ' किंवा ' इंग्रज कामदार ' असें सर एडवर्ड यानीं स्पष्ट म्हटले नव्हतें; तथापि त्यांच्या मनांत काय होतें, हें मीं ताडलें; पण मला असलेली सारी माहिती त्यांस न सांगण्याचा निश्चय मीं केला.

" असेहि कांहीं ऑफिसर आहेत. " माझ्या या उत्तरानें सर साहेबांच्या चित्तांत अगदीं गडबड उडालेली त्यांच्या चेहऱ्यावर दिसली.

" हें तुह्मांला कसे ठाऊक झाले ? असें ठांसून सांगण्यास तुमच्या जवळ काय पुरावा आहे ? " हे प्रश्न विचारीत असतां सर साहेबांची वृत्ति अधिकच बावरल्यासारखी दिसूं लागली.

" मजपाशीं प्रत्यक्ष पुरावा नाहीं. (असा पुरावा मजजवळ होता.) तरी किन मेरी आणि ॲजाक्स यांसारख्या बेडर जहाजांचे फ्रेंन जर्मनीच्या हातांत पडले, यावरून तुमच्या देशांतील वरिष्ठ कामगारांच्या मदतीखेरीज ही गोष्ट झाली नाहीं, हें उघड सिद्ध होतें. "

आणखीहि कांहीं तपशील मजकडून काढावा ह्मणून त्यांनीं यत्न करून पाहिला; पण मी अगदीं गप्प बसलों होतों. किन मेरी आणि ॲजाक्स यांच्या फ्रेंनबद्दल सर साहेबांस मला मोठी मजेची गोष्ट सांगतां आली असती. ते आणखी कांहीं वेळ एक लठ्ठसा रिपोर्ट वाचीत बसले. थोड्या वेळानें पुनः एकवार कांहीं सूचक प्रश्नांचा भडिमार त्यांनीं माझ्यावर केला. त्यांचा एकंदर मुद्दा माझ्या अगोदरच ध्यानांत आला होता. त्यांच्या एकंदर भाषणाचा सामान्य मथितार्थ मी येथें देतों.

उच्चदर्जाच्या कामगारांच्या संमेलनाच्या वेळीं तुह्मी केव्हां हजर होतां का ? उदाहरणार्थ–ट्यानस अरण्यांतल्या भेटीच्या वेळीं तुह्मी होतां काय ? तुह्मी हजर होता याबद्दल कांहीं लेखी पुरावा आहे काय !

या प्रश्नांनीं मी मुळींच भांबावून गेलों नाहीं. हे प्रश्न येणार हें मला अगोदरच ठाऊक होतें. त्यानस अरण्याच्या भेटीच्या वेळीं मी हजर होतों, ही गोष्ट छपविणें निरर्थक आहे, असें त्यांच्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीवरूनच मला कळून चुकलें. त्या भेटीस आलेल्या एका इंग्रज मुत्सद्यानें बोअर युद्धाच्या वेळची माझी ओळख काढली होती, हें वाचकांना अठवत असेलच. ही गोष्ट सर साहेबांस त्यानें सांगितली असण्याचा संभव होता. वास्तविक तेथें मी हजर असल्याचा कांहीं लेखी पुरावा मजजवळ नव्हता व तसें मीं सर साहेबांस सांगितले, तथापि त्यांच्या प्रश्नाचें एकंदर धोरण मला बरेंसे वाटले नाहीं. सरसाहेब दोहोपैकीं एक गोष्ट करीत असावे, असा मला संशय आला. एक तर या भेटीच्या वेळीं घडलेल्या साऱ्या गोष्टी त्यांस कळल्या नसाव्या किंवा त्या भेटींत नक्की काय निष्पन्न झालें, हें मजपासून काढण्याचा त्याचा बेत असावा. एकंदरींत अधिक न बोलतां बेताबाताने वागण्याचा हा प्रसंग होता.

यानंतर फ्रेंचांचे सैन्य आणि आरमार याबद्दल कांहीं खोंचदार प्रश्न त्यांनीं मला विचारले. ब्रिटिश आणि फ्रेंच यांची परस्पर तुलना मीं स्वानुभवानें करावी असा त्यांचा उद्देश दिसला. एकंदरीनें जर्मनी आणि ब्रिटन याजमध्ये चाललेली स्नेहसबधाचीं बोलणीं शेवटी कितपत फलद्रूप होतील, याजबद्दल सरसाहेबांच्या मनांत शका असावी असें दिसलें.

यानतर खुद्द जर्मन बादशहासाठीं केलेल्या कामगिऱ्यांची माहिती मीं सांगावी अशा धोरणानें आणखी कांहीं प्रश्न त्यांनीं विचारले; पण मीं त्यांस उत्तरें दिली नाहींत.

पुढें थोड्या दिवसानीं क्याप्टन रॉबिनसन यांजकडून पुढील योजनेचा नक्की बेत मला कळला. ब्रिटिश हेरखात्यातर्फे माझी पहिली कामगिरी मला मिळाली. नंतर दुसऱ्या एका कामगिरीनिमित्त मी न्यूयार्क येथे आलों व तेथें या धंद्यास अखेरचा रामराम ठोकला.

संपूर्ण.

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प आठरावें.

केसरची प्रभावळ !



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

भगवान् श्रीकृष्ण.

प्रकाशक—प्र. श्री. भसे, गिरगांव—मुंबई.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस,' ४३२ शनवार पेठ, पुणें.

द्वितीयावृत्ति.

१९१७.

(सर्व हक्क स्वाधीन.)

किंमत बारा आणे.

केसरची प्रभावळ!



जर्मन आरमाराचे जनक

फॉं टिरपिट्झ.



जर्मन आरमाराच्या प्रचंड उत्क्रांतीचा इतिहास ज्या वेळीं लिहिला जाईल त्या वेळी त्यांत एका नांवाचा अत्यंत प्रमुखत्वानें उल्लेख होईल. तें नांव ह्मणजे ग्रँड ॲडमिरल फॉं टिरपिट्झ हें होय. आरमारी राष्ट्रांत जर्मनीनें जे बरेच प्रमुखत्वाचें पद आज प्राप्त करून घेतलें आहे, ते संपादन करण्यास याच नरश्रेष्ठांचा उद्योग बहुतेकांशीं कारण झाला आहे. किंबहुना केसरच्या आरमाराचे जनकत्वच यांजकडे आहे, असें ह्मणण्यास काहीं हरकत नाहीं.

बर्लिन येथील लोक त्यांस "अनंत काळचे टिरपिट्झ" या नांवानें संबोधित असतात. गेलीं पंधरा सोळा वर्षें जर्मन आरमाराचीं सर्व सूत्रे एकसारखीं त्यांच्या हातीं आहेत. राजकारणांत नित्य घडून येणाऱ्या अस्मानीसुलतानींतून इतकीं वर्षें आपल्या जाग्यावर एकसारखे टिकलेले गृहस्थ फारच थोडे. आजपर्यंत यांच्या जोडीला फक्त बिस्मार्क यांनाच तेवढें बसवितां येईल. इतक्या अवधींत कित्येक चान्सेलर, कित्येक युद्ध-खात्याचे प्रधान आणि कित्येक तिजोरी कामदार आले व गेले; पण आरमारी कायद्यांची घटना करणारे हे गृहस्थ आपल्या जागीं अद्याप कायमच राहिले. समुद्रावर वर्चस्व स्थापण्याकरतां जर्मनीनें किती पक्का निश्चय केला आहे व या दृष्टीनें आजपर्यंत तो कसा पाळला आहे, हें यावरून स्पष्ट दिसून येतें. "केसर व्युइलियम आणि आरमार" या नांवाचें एक निमसरकारी पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे व त्यांत जर्मन आरमाराच्या जनकत्वाचा मान बादशहाकडे दिला आहे; पण खऱ्या दृष्टीनें विचार करतां १८९८ सालापासून जर्मन आरमाराच्या सेक्रेटरीच्या जागीं असलेले ग्रँड ॲडमिरल आलफ्रेड फॉं टिरपिट्झ यांसच हा मान

देणें योग्य होईल. असें करण्यांत जर्मनीच्या शहानशहाचा कांहीं उपमर्द होईल हें खरें; पण सत्य तें सत्यच.

आलफ्रेड टिरपिट्झ हे एका सामान्य घराण्यांत जन्मास आले. त्यांना पुढें आणण्यांत कोणीहि मोठ्या मनुष्याचा पाठिंबा नव्हता. ते अत्यंत खालच्या दर्जाच्या अधिकारापासून तों थेट मुख्य पदापर्यंत केवळ स्वतःच्या हिमतीने वाढले. यांचा उत्साह व सामर्थ्य हीं फार दांडगीं आहेत. तसेंच इच्छाशक्ति, महत्त्वाकांक्षा आणि कामाची तडफ, हे गुणहि त्यांच्या ठिकाणीं अपूर्व आहेत. पहिल्या प्रतीची मुत्सद्देगिरी, कामाचा उरक आणि आरमारी कौशल्य यां गुणत्रयींचा संयोग यांच्या ठिकाणीं जसा आढळतो, तसा तो जगांतील इतर आरमारी खात्यांत आढळत नाहीं.

त्यांच्या जागीं उत्तम प्रतीची मुत्सद्देगिरी असल्यामुळें मुख्य मंत्र्याच्या जागेसाठीं त्यांचें नांव आजपर्यंत अनेकवार सुचविण्यांत आलें आहे. या जागांसाठीं जशा योग्यतेचीं माणसें लागतात, तशा योग्यतेचीं माणसें जर्मनींत फार पैदा होत नाहींत. अशा थोड्या लोकांच्या कोटींतच यांची गणना होते. आरमारी खात्याचें त्यांचें काम आतां बहुतांशीं पूर्णावस्थेस आलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं जर्मनीला नवें आरमार उत्पन्न करून दिलें आहे. एवढेच नव्हे, तर सतत पंधरा वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानें या खात्याचें काम त्यांनीं इतक्या पूर्णावस्थेस नेलें आहे, कीं, त्यांच्या अभावीं त्या खात्याला योग्य माणसाची वाण पडणार नाहीं.

फॉं टिरपिट्झ मुख्य प्रधानाच्या जागीं आले, तर त्या देशाच्या राजनीतीचें एकच धोरण राहील. तें धोरण म्हणजे आरमारी बाबतींत कांहीं झालें तरी, आरमाराच्या वाढीला ते आपल्या अमदानींत खळ पडूं देणार नाहींत. नव्या आरमाराची पहिली कल्पना त्यांच्याच डोक्यांत जन्मास आली. आरंभीं म्हणजे १८९८ सालीं जर्मनीचा आरमारी खर्च अवघा साठ लक्ष पौंड होता. १९१३ सालीं दोन कोट तीस लक्ष पौंड झाला. ही सारी वाढ टिरपिट्झ यांच्याच मेहनतीचें फळ होय. पार्लमेंट आणि सामान्य जनता यांच्या मनोविकाराचा फायदा घेऊन त्या द्वारें त्यांनीं ही खर्चाची बाबत देशाकडून कबूल करून घेतली.

जर्मनीच्या सरकारी नौकरींत मानाच्या जागा फक्त उच्च दर्जाच्या घरंदाज लोकांना मात्र मिळतात. असा समज सर्वत्र आहे; पण हा समज किती खोटा आहे, हें फॉं टिरपिट्झ यांच्या उदाहरणावरून चांगलें व्यक्त होतें. ब्रांडनबर्ग परगण्यांतील ओडर नदीच्या कांठीं असलेल्या कुस्ट्रिन नांवाच्या गांवीं यांचा जन्म झाला. हा गांव समुद्रकिनाऱ्यापासून पुष्कळ लांब आहे. यांच्या घराण्यांत नाविक विद्या जाणणारा यापूर्वी कोणीहि नव्हता. यामुळें या विद्येचे कांहीं अनुवंशिक संस्कार यांच्या ठिकाणीं असण्याचा संभव नाहीं. हे सोळा वर्षांचे होईपर्यंत यांचा अभ्यास एका मध्यमप्रतीच्या शाळेंत झाला. यानंतर ते प्राशियन आरमारांत शिरले. या वेळीं प्रशियन आरमार ह्मणजे कांहीं लहान पडावांचा समुदाय होता. चार वर्षें काम केल्यानंतर यांना लेफटेनंटचा हुद्दा मिळाला. आणि आपल्या वयाच्या पंचाविसाव्या वर्षीं ते लेफटेनंट कमॉंडर झाले. आरमारांत हा हुद्दा विशेष महत्त्वाचा आहे, असें नाहीं; तथापि या हुद्यांवर असतां यांच्या बुद्धीचा कुशाग्रपणा उघडकीस येऊ लागला. स्वतःच्या मतांची छाप आपल्या वरच्या व खालच्याहि अम्मलदारांवर बसविण्याची यांची हातोटी याच वेळीं उघडकीस आली. त्यांचा भावी आयुष्यक्रम कशा प्रकारें जाणार हें याच वेळीं ठरलें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. केवळ दृश्य स्थितीच्या पलीकडे पाहण्यास अवश्य असणारी दूरदृष्टि यांच्याइतकी त्या वेळीं दुसऱ्या कोणासहि नव्हती. आरमारासंबंधीं नव्या नव्या कल्पना काढून त्यांचा प्रसार करण्याचा व त्या अमलांत येण्यासाठीं अनुयायी मिळविण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला. या वेळीं त्यांस जे अनुयायी मिळाले, ते त्यांच्यापेक्षांहि अधिक उत्साहानें त्यांच्या मसलती पार पाडण्यासाठीं उद्योग करूं लागले. आरमारी बाबतींत यांनीं सर्वांच्या आघाडीस असावें, असा जणूं काय ईश्वरी संकेतच होता. प्रशियाच्या लष्करांत आणि नुकत्याच जन्मास आलेल्या आरमारांत जुनाट लोकांचें या वेळीं बरेंच वर्चस्व असे. त्यांचा मोठेपणा मुख्यतः त्यांच्या जुनाटपणावरच अवलंबून असे आणि एवढ्याच कारणासाठीं सामान्यजनताहि त्यांचा मोठेपणा कबूल करीत असे; पण फॉं टिरपिट्झ हे या सामान्य

नियमास अपवाद होत. जुनें तें सोनें असें म्हणण्याची प्रवृत्ति यांनीं प्रथम साफ झुगारून दिली. या त्यांच्या गुणामुळें त्यांना उत्तम प्रकारचे अनुयायी मिळूं लागले. आरमारांत मानाच्या जागा मिळण्यास केवळ आंगचे गुणच उत्तम असावे लागतात, तें तत्त्व प्रथम यांनीं अमलांत आणलें. मोठें घराणें, श्रीमंत अथवा इतर बाबी या वास्तविक फारशा किंमतीच्या नाहींत, असें यांनींच स्पष्ट केलें.

इ. स. १८९१ मध्यें फॉ टिरपिट्झ हे कील ठाण्याच्या मुख्य अधिपतीच्या जागीं आले. जर्मनीच्या सर्व आरमारी कारभाराचें कील हें मुख्य ठाणे आहे. या जागीं आल्यामुळे आरमाराची संघटना आणि त्यांतील नव्या प्रकारच्या रचना करण्यास लागणारी जी बुद्धिमत्ता यांजपाशीं होती, तिच्या कार्यास चांगलाच अवसर मिळाला. त्यांनीं प्रथम टारपेडो (आगमाशाचें) खातें हातीं घेतलें. या खात्यांत पुष्कळ नवीन सुधारणा अमलांत आणून लवकरच त्यांनीं तें पहिल्या प्रतीचे खातें बनविलें. जर्मनीच्या आरमारांत एकदर प्राविण्याबद्दल या खात्याचा मोठा लौकिक आहे. इतर राष्ट्रांच्या आरमारांनींहि जर्मनीच्या या खात्याचें प्राविण्य कबूल केले आहे. जर्मनीचें हे खातें इतक्या नांवलौकिकास येण्यास मुख्यतः फॉ टिरपिट्झ याचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. हें खातें यांनीं हातीं घेतलें, त्या वेळीं जर्मन आरमाराच्या या शाखेंत मठभर लहानशा होडक्यांचा ताफा मात्र होता. यांतूनच त्यांनीं आपल्या कौशल्याने नवा शक्तिमान ताफा निर्माण केला. आगमाशाच्या विद्येंत लागणारी कुशलता ज्यांच्या आंगीं उपजतच आहे, असे आरमारी कामगार त्यांनीं निवडून काढले आणि अविरत उद्यमानें व उत्साहानें त्यांनीं या कामगारास त्यांच्या कलेंत निष्णात करून सोडलें. जर्मन आरमाराच्या या खात्यांत जी प्रवीणता आज आढळून येते, तिचा प्रारंभ अशा रीतीनें झाला आहे. अशा रीतीनें आगमाशाच्या विद्येंत त्यांनीं नव्या मन्वंतरास सुरवात केली व आरमाराची ही शाखा पूर्णावस्थेस आल्यानंतर त्यांनीं आपलें लक्ष खात्याच्या अंतर्रचनेकडे लावलें. खात्याच्या रचनेंत ज्या कांहीं उणीवा त्यांच्या नजरेस येत, त्यांजवर ते निर्भीडपणें टीका करीत.

बर्लिन येथील आरमारी कचेरी आणि बाल्टिक समुद्रावरील आरमारी ठाणीं याच्यात जें नातें या वेळीं होते, त्यावर त्यांनीं पुष्कळ कडक टीका केली. बर्लिन येथील आरमारी सेक्रेटरी व आरमारचे मुख्य अधिकारी यांजमधील संबंध कसे असावेत याची नवीन दिशा त्यांनीं शोधून काढली. या वेळीं त्यांना बर्लिन येथील आरमारी खात्यांतच जागा मिळाली. त्यांच्या उपपत्ती प्रत्यक्ष व्यवहारांत कितपत टिकतात, हें पाहण्याची संधि प्राप्त झाली. त्यांच्या कडक टीकेमुळें त्यांना शत्रूहि कांहीं कमी नव्हते. त्यांना कमीपणा आणण्याची संधि ते पहातच होते; पण स्वतःच्या अंगीकृत कार्यांत यश मिळविण्याची विद्या फॉ टिरपिट्झ यांस पूर्ण साध्य झाली होती. शत्रूंनीं केलेल्या अनेक कारस्थानांस भीक न घालतां त्यांनीं आपलें म्हणणे खरें केले. आपल्या उपपत्ती अव्यवहार्य नाहींत, ही गोष्ट त्यांनीं अवघ्या दोन वर्षांच्या अवधींत सिद्ध केली. या दोन वर्षांनंतर लवकरच त्यांना व्हाईस ॲडामिरल हे मानाचें पद प्राप्त झालें. एकंदर आरमारी खात्यांतहि त्यांनीं चांगले नांव मिळाविलें होते. आरमारी खात्यांतील लोक त्यांना 'डर मिस्टर' या लाडक्या नांवानें संबोधित असत. या जर्मन शब्दाचा अर्थ धनी किंवा मालक असा आहे. यावरून एकंदर खातें यांना किती मान देत असे, हे उघड दिसून येतें.

फॉ टिरपिट्झ हे आतां अधिकारसंपन्न झाले होते; तथापि स्वतःच्या परिस्थितीकडे पाहण्याची त्यांची दूरदृष्टि या वेळीं भविष्यकाळाचा ठाव काढीत होती. खात्याच्या अंतर्रचनेची सुधारणा करण्याचें अत्यंत अवघड काम पुरें केल्यानंतर जर्मनीच्या नांवलौकिकास साजेल, असें नवें आरमार निर्माण करण्याच्या उद्योगास ते लागले. जर्मनीची औद्योगिक उत्क्रांति या वेळीं पूर्ण भरास आली होती. देशाचा समुद्रावरील व्यापार एकसारखा वाढत्या प्रमाणावर होता. व्यापारी आगबोटींची भर एकसारखी पडत होती. प्रचंड आरमाराचें महत्त्व लोकांच्या मनांत उत्पन्न करून देण्यास ही संधि फार चांगली आहे, असें फॉ टिरपिट्झ यांना आढळून आलें. त्यांच्या या उपक्रमास प्रोत्साहक अशी आणखी एक नवीन गोष्ट या संधींत घडून आली. १८९९ सालच्या पावसाळ्यांत

प्रसिद्ध बंडस्रात प्रकरण उपस्थित झालें. जर्मनीची बंडस्रात नांवाची टपाली आगबोट आफ्रिकेकडे जात असतां एका इंग्लिश आरमारी जहाजानें तिला वाटेंत अडविलें. जर्मनीला आरमारी पाठबळ नसल्यामुळें जर्मनीचा समुद्रावरील व्यापार अगदीं असंरक्षित स्थितींत आहे, असें फॉं टिरपिट्झ यांनीं लोकांच्या मनांत भरवून दिलें. बंडस्रात प्रकरणाचा फायदा घेऊन सान्या देशभर त्यांनीं चळवळीस सुरवात केली, जर्मनीला मोठ्या आरमाराची अत्यंत आवश्यकता आहे, अशा अर्थाचीं व्याख्यानावर व्याख्यानें जिकडे तिकडे झडूं लागलीं. या प्रकरणावरून त्यांनीं लोकांत देशाभिमानाची एवढी लाट उसळून दिली कीं, १९०० सालींच नवा आरमारी कायदा जन्मास आला. हा कायदा पास झाल्याबरोबर त्यांना फॉं हें अत्यंत मानाचे उपपद प्राप्त झालें.

फॉं (von) ही पदवी जर्मनींतल्या वंशपरंपरेच्या सरदारकीची निदर्शक आहे. १९०२ सालीं नव्या कायद्याप्रमाणें तेरा हजार टनाचें बॉंश्विग नांवाचें नवें प्रचंड जहाज समुद्रांत ढकलण्यांत आले आणि त्या वेळीं फॉं टिरपिट्झ हे दुय्यम ॲडमिरलचे पूर्ण ॲडमिरल झाले. १९०७ सालीं त्यांनीं आणखी एक नवा आरमारी कायदा पास करून घेतला. सामान्य जनतेंत त्यांनीं आपलें नांव इतकें वाढाविलें होतें कीं, त्यांचा कायदा नापास करणें, जर्मन पार्लमेंटास शक्य नव्हतें. या नव्या कायद्याप्रमाणें जहाजाचा आकार व वजन वाढवून दरवर्षी चारांऐवजीं सहा जहाजें बांधण्याचें ठरविण्यांत आलें. फॉं टिरपिट्झ यांच्या या कामगिरीनें बादशहा इतके खूष झाले, कीं, त्यांनीं त्यांस ब्लॅकईगलचें पदक मोठ्या समारंभानें अर्पण केलें. हा मान जर्मनींत अत्यंत मोठा समजला जातो.

फॉं टिरपिट्झ हे इंग्रज राष्ट्राचे द्वेष्टे आहेत, हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. असें म्हणणें म्हणजे त्यांच्या नांवास निष्कारण कलंक लावण्यासारखें आहे. ब्रिटिशांच्या द्वेषाची कल्पनाहि कधीं त्यांस शिवली नाहीं. उलट पक्षीं इंग्रजांचे ते मोठे चहाते आहेत. त्यांच्या सर्व मुलांचें शिक्षण इंग्लंडांत झालेलें आहे. इंग्रजी राष्ट्राच्या नौकानयनाच्या पूर्वापर इतिहासाचें

अध्ययन हे मोठ्या कौतुकानें करीत असतात. 'तुह्मी इंग्रज नाविकासारखे व्हा, व त्यांचें उदाहरण सतत आपल्या नजरेपुढें ठेवा' असा उपदेश ते आपल्या जर्मन खलाशांस नित्य करीत असतात. त्यांनीं आरमारी कायदा पास करून घेतला, तेव्हां ब्रिटनशीं या बाबतींत चढाओढ करावी असा त्यांचा मुळींच उद्देश नव्हता. जर्मन आरमार आज प्रबळ होऊन ब्रिटनच्या समुद्रावरील वर्चस्वास कमीपणा आणीत असेल, तर तो दोष जर्मनीचा नसून ब्रिटनचा आहे. फॉं टिरपिट्झ हे दूरदर्शी व शहाणे मुत्सद्दी असल्यामुळें ब्रिटनच्या चुक्यांचा त्यांनीं फायदा घेतला. स्वतःच्या दूरदर्शित्वानें त्यांनीं कोणतीहि संधि वांया जाऊं दिली नाहीं, एवढी गोष्ट मात्र खरी.

फॉं टिरपिट्झ यांनीं आपल्या देशाची एकच कामगिरी केली असें नाहीं; तथापि त्यांची विशेष नांव घेण्यासारखी कामगिरी ह्मणजे जर्मन आरमारी खात्याची अंतर्रचना हीच होय. ते आरमारी खात्यांत शिरण्यापूर्वी त्यांत विलक्षण घोटाळा माजून राहिला होता. लष्कराच्या सुसंघटित व्यवस्थेचें नांवहि आरमारी खात्यांत नव्हतें. ही घटना करण्याचें मुख्य श्रेय फॉं टिरपिट्झ यांनींच संपादन केलें. हें खातें नवें निर्माण करणें एवढेंच काम त्यांस करावयाचें नसून लोकांत आरमाराची नवी आवडहि त्यांस उत्पन्न करावयाची होती. वेळोवेळीं उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन लोकमत त्यांनीं अनुकूल करून घेतलें व आपला मूळचा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं लोकांत नव्या नव्या चळवळी सुरू केल्या. 'नेव्ही लीग' व 'ॲडमिन्यालिटी प्रेसब्यूरो' हे दोन राष्ट्रीय संघ त्यांच्या कर्तृत्वाचीं जिवंत स्मारकें आहेत. 'जर्मनीची भवितव्यता समुद्रावर आहे' व 'जर्मनीला समुद्रावरील वर्चस्वाची अत्यंत जरूर आहे.' हीं ब्रीदवाक्यें आज जर्मनीनें जीं धर्माज्ञेप्रमाणें उराशीं बाळगिलीं आहेत, त्याचें श्रेयहि फॉं टिरपिट्झ यांजकडे आहे. नेव्ही लीग आणि इतर संस्था यांच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं, असें ते जर्मन पार्लमेंटात अनेक वेळ ह्मणाले आहेत; तथापि पर्यायानें या संस्थांच्या जनकत्वाचा मान त्यांसच देणें योग्य आहे. जर्मन आरमारांत केव्हांहि वाढ व्हावयाची

असली म्हणजे त्याच्या पूर्वी अनेक हस्तपत्रकांचा आणि वर्तमानपत्री लेखांचा सुळसुळाट साऱ्या जर्मनीभर होत असतो. या लेखांतील मजकुरावरूनहि टिरपिट्झशिवाय दुसऱ्या कोणा चालकाचा संबंध त्यांच्याशीं जोडतां येत नाहीं.

अत्यंत अट्टाहासाची चिकाटी हा टिरपिट्झ यांच्या वागणूकीचा एक विशेष आहे. याच त्याच्या गुणाने जर्मन आरमाराची आजची स्थिति त्यांस प्राप्त झाली आहे. बादशहा दुसरे वुइलियम हे कोणापुढेहि मान वांकवीत नाहींत अशी त्यांची ख्याती आहे, पण फॉ टिरपिट्झ हे या गोष्टीला अपवादक आहेत असें म्हणण्याला हरकत नाहीं. आपल्या मनांतील साऱ्या बेतांस बादशहांचें आनुकूल्य कसे मिळवावें, ही विद्या टिरपिट्झ यांस उत्तम अवगत आहे.

फॉ टिरपिट्झ हे अगदीं मोकळ्या मनाचे गृहस्थ आहेत. जर्मनीच्या हितसंबंधांत कांहीं महत्त्वाच्या भानगडी उपस्थित झाल्यास जर्मन राष्ट्राची आरमारी तयारी पहिल्या प्रतीची असली पाहिजे, असें हे स्पष्ट बोलून दाखवितात. जर्मनीच्या हितसबंधास यत्किंचितहि धोका पोहोंचेल अशीं चिन्हें दिसूं लागली, तर आपल्या देशबांधवांकडून आणखी वाटेल ती मदत ताबडतोब मागण्यास ते कमी करीत नाहींत. इंग्लंडच्या तीन जहाजांस आपलीं दोन जहाजें तरी नेहमीं तयार असलीं पाहिजेत, असें त्यांचें मत आहे. जर्मनीचें आरमार ब्रिटिश आरमाराच्या दोन तृतियांशाइतके असेल, तर जर्मनीविरुद्ध फ्रान्स आणि ब्रिटन हीं राष्ट्रें संगनमताने लढणार नाहींत, असे त्यांस वाटतें. जर्मनीचा आरमारी कायदा पास झाला; त्या वेळीं आरभीं त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, "पहिल्या प्रतीच्या आरमारी राष्ट्रासहि जर्मनीवर बिनधोकपणें हल्ला करतां येऊं नये, इतकें मोठें आरमार जर्मनीनें नित्य जय्यत राखलें पाहिजे." या मूळ हेतूला पोषक अशाच रीतीनें जर्मन आरमाराची वाढ त्यांनीं कायम ठेवली आहे. जर्मन तोफखाना साऱ्या जगांत पहिल्या प्रतीचा आहे, व प्रसंग येईल त्या वेळीं हा तोफखाना जर्मनीचें आरमारी वर्चस्व पृथ्वीवरील साऱ्या समुद्रावर गाजवील असा त्यांचा विश्वास आहे. आरमारी चढाओढीमुळें युरोपांतील

साऱ्या देशांस जर्मनी भिकेस लावीत आहे, हें ह्मणणें टिरपिट्झ यांस कबूल नाहीं. जर्मनीचें आरमार परराष्ट्रांचा उच्छेद करण्यासाठीं नाहीं, असें ते निक्षून सांगत असतात, आणि परस्परांच्या अनुमतीनें युरोपीय राष्ट्रांनीं आपापली आरमारी वाढ बंद करावी या मतालाहि ते सर्वथा प्रतिकूल आहेत. आपल्या मतांचा प्रसार त्यांनीं आपल्या अनुयायांतहि पूर्ण करून दिला आहे. आरमारावरील प्रमुखपणाची जागा त्यांनीं सोडून दिली, तरी त्यांच्या मागें त्यांचें व्रत चालविण्यास योग्य माणसांची उणीव पडणार नाहीं. आतां यापुढें त्यांची नेमणूक वुइलहेल्मस्ट्रासीच्या अधिक उच्च जागीं झाली अथवा सर्व दगदग सोडून ते स्वस्थ बसले, तरी जर्मन राष्ट्राची जी अमूल्य कामगिरी त्यांनीं बजावली आहे, ती चिरकाल त्यांच्या मागें राहील.

फॉं टिरपिट्झ यांस मुख्य प्रधानाचें पद मिळालें, तर जर्मनराष्ट्राचीं सूत्रें फार शहाणपणानें चालविलीं जातील यांत शंका नाहीं. आज त्यांचें वय सुमारें बासष्ट वर्षांचें आहे, तरी ते एकाद्या तरुणाप्रमाणें निधड्या छातीचे आणि शाबूत डोक्याचे गृहस्थ आहेत. कौटुंबिक सुखहि त्यांस चांगलें प्राप्त झालें आहे. मुख्य प्रधानाच्या पदास हे गृहस्थ सर्व दृष्टीनें पूर्ण योग्य आहेत, असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं; पण त्यांची योजना मुख्य प्रधानाच्या जागीं झाली, तर जर्मनीच्या आरमारी खात्यांत मात्र मोठी उणीव पडेल यांत शंका नाहीं.

अलबर्ट बॉलिन.

हँबर्ग बंदराच्या कांठीं असलेल्या एका भव्य दगडी इमारतीच्या मुख्य कमानीवर "सारें जग हेंच माझें कार्य-क्षेत्र" अशा अर्थाचे शब्द कोरलेले आहेत. हँबर्गहून अमेरिकेला जाणाऱ्या आगबोटींच्या ऑफिसावर दुसरें कोणतेंहि ब्रीदवाक्य याहून अधिक खुलणार नाहीं. हँबर्ग–अमेरिकन आगबोट कंपनी ही एक खाजगी व्यापारी मंडळी आहे. तथापि केसर बादशाहा आणि सर्व जर्मनराष्ट्र यांना जर्मन आरमाराइतकीच ही

कंपनी प्रिय आहे. या कंपनीचें संपूर्ण जर्मन नांव "हँबर्ग–अमेरिक्यानिश प्याकेटफार्ट–अॅक्टीन्–गेसेलशॉप्ट्" असें आहे. सोयीसाठीं या कंपनीला जर्मन राष्ट्रानें "हॅप्पाग" असें आंखुड नांव दिलें आहे. ही कंपनी व हिचीच दुसरी बहीण "नॉर्थ जर्मन लॉइड" या दोघींनीं मिळून जर्मन माल पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पोंहोंचविण्याचें व्रत अखड चालविलें आहे. हँबर्ग–अमेरिका कपनीच्या शिरोभागीं अलबर्ट बॉलिन ही अधिष्ठात्री देवता आहे. जर्मनीच्या आरमारांत फॉ टिरपिट्झ यांचे जें महत्त्व आहे, तेच व्यापारी जहाजाच्या बाबतींत अलबर्ट बॉलिन यास दिलें पाहिजे. जर्मन आरमाराला सध्यांची स्थिति जशी टिरपिट्झ यांच्या [illegible] प्राप्त झाली जाहे, त्याप्रमाणे जर्मनीच्या समुद्रावरील व्यापारी वर्चस्वास बॉलिन यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत. आरमारी वर्चस्वाचें जनकत्व जसें टिरपिट्झ यांजकडे आहे, त्याच-प्रमाणें व्यापारी वर्चस्वाचें जनकत्व बॉलिन यांजकडे आहे. आपल्या लष्करी, आरमारी आणि व्यापारी संस्था पहिल्या प्रतीच्या करण्याकरतां जर्मन राष्ट्रानें किती धडपड चालविली आहे, त्याचा इतिहास पुढें जेव्हां लिहिला जाईल, त्या वेळीं हॅबर्ग येथील या अत्यत शालीन अशा यहुदी गृहस्थाचें नांव त्यांत प्रमुखत्वाने आढळून येईल. अनेक नांवांच्या पदव्या आणि राष्ट्रांतील मानाच्या जागा त्यांजकडे चालत आल्या होत्या, पण असल्या दिखाऊ गोष्टींपैकीं एकीचाहि त्यांनीं स्वीकार केला नाहीं.

प्रशियांतील एका लष्करी ठाण्यांत नव्या भरतीच्या वेळीं एका तरुणाची इतिहासाच्या विषयांत परीक्षा घेतली जात होती. "साऱ्या जर्मनींत आज मोठा कोण?" असा प्रश्न परीक्षकानें त्याला विचारतांच त्यानें "बॉलिन" असें चटकन् उत्तर दिलें. लक्षावधि जर्मन जनतेच्या मनांत आज कोणतें नांव घोळत आहे, हें या उत्तरावरून उघड होतें. दुसऱ्या वुइलियम बादशाहाच्या कारकीर्दीत थेट बादशहापासून तों सामान्य जर्मन मनुष्यापर्यंत यांच्याशिवाय दुसरें कोणतेंहि नांव अजरामर जर्मनांच्या यादींत पडण्याच्या योग्यतेचे नाहीं, असें जर्मन जनतेस वाटतें. जर्मन-राष्ट्राची साप्रतची भव्य इमारत ज्या कारागिरांच्या कौशल्याने उभारली

गेली आहे, त्यांत बॉलिन यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. तिसऱ्या नेपोलियनच्या कारकीर्दींत रॉथशाइल्ड अथवा पहिल्या वुइलियमच्या कारकीर्दींत ब्लीक्रोडर आणि बिस्मार्क यांस जें महत्त्व होतें, तेंच दुसऱ्या वुइलियमच्या कारकीर्दींत बॉलिन यांस आहे. दुसऱ्या वुइलियम बादशहानें अनेकवार त्यांस प्रधानगिरी देऊं केली होती; पण 'वुइल-हेल्मस्ट्रासीपेक्षां आल्स्टरडॅममध्येंच आपला अधिक उपयोग होईल' असें ह्मणून बॉलिन यांनीं प्रधानपदाचा स्वीकार केला नाहीं; तथापि अनेक बाबतींत त्यांचा खाजगी सल्ला बादशहा नित्य घेत असतात. वुइल-हेल्मस्ट्रासींत सुरू असलेल्या एकमुखी राज्यपद्धतींत बॉलिनसारख्या गृहस्थाचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे. प्रधानमंडळांतील एकादी जागा अथवा 'फॉ' हें सरदारी उपपद बादशहांनीं जेव्हां जेव्हां बॉलिन यांस देऊं केले, तेव्हां तेव्हां बादशहाच्या एका फोटोचा स्वीकार मात्र त्यांनीं केला. बादशहांनीं आपला जो एक फोटो ह्यांस नजर केला, त्यावर पुढील मजकूर त्यांनीं स्वहस्ते लिहिला आहे. "आमच्या राष्ट्राच्या निर्गत व्यापाराचे दुरदर्शी आणि दीर्घोद्योगी कर्णधार यांस नजर." फॉ एक्स्लेन स्टाट् सेक्रेटर अथवा दुसऱ्या सरदारीच्या निदर्शक पदव्यां पेक्षां हॅबर्गच्या या अनभिषिक्त राजाला व्यापाराचे कर्णधार या पदवीचा अधिक अभिमान वाटतो. सामान्य जर्मन जनता ज्या पदव्या मिळविण्या-करतां सारा जन्म धडपड करीत असते, त्या पदव्या घरीं चालून आल्या असतांहि अलबर्ट बॉलिन यांनीं त्यांचा स्वीकार केला नाहीं.

बॉलिन हे केवळ स्वतःच्या कर्तबगारीने उदयास आलेले गृहस्थ आहेत. हॅबर्ग येथील एका सामान्य मुनिमाच्या उदरीं यांचा जन्म झाला. तरुणपणीं व्यापाराचें ज्ञान मिळविण्यासाठीं ते तेथून इंग्लंडास गेले, नौकानयनविद्येंतील अगदीं बारीकसारीक देखील माहिती आपलीशी करण्याचा त्यांनीं अटोकाट प्रयत्न केला. जर्मनींत परत आल्यावर 'कार' नांवाच्या आगबोट कंपनींत त्यांनीं नौकरी धरली. ग्यालिशिया, पोलंड आणि हंगारी येथून हॅबर्ग येथें येऊन जे लोक परदेशगमन करतात, त्यांची व्यवस्था करण्याचें काम प्रथम यांजकडे सोंपविण्यांत आलें. हें

काम करीत असतां त्यांची संघटनाशक्ति आणि त्यांचा निरलस उत्साह यांचें वजन त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर इतकें पडलें कीं, बॉलिन हे अधिक वरिष्ठ दर्जाच्या जागेसाठीं योग्य आहेत, असें ते ह्मणू लागले. त्यांच्या या धंद्यांत त्यांना प्रथम मानाची जागा मिळाली, तेव्हां त्यांचें वय अवघें पंचवीस वर्षांचें होतें. परदेशगमन करणाऱ्या लोकांचे तांडेच्या तांडे आपखुषीनें कार कंपनीला आश्रय देतात, ही गोष्ट इतर आगबोटवाल्यांच्याहि लक्षांत ताबडतोब आली. विशेषतः हाच धंदा करणाऱ्या हँबर्ग–अमेरिकन कंपनीला तर ही गोष्ट अधिकच जाणवू लागली. परदेशगमन करणाऱ्या उतारूंची ने-आण करण्याचा धंदा हँबर्ग-अमेरिकन कंपनी पुष्कळ वर्षांपासून करीत होती व कार कंपनी नवी असून तिच्या बोटी लहान असतांहि तिची चढाओढ हँबर्ग अमेरिकन कंपनीला जाणवूं लागली. कार कंपनीच्या भरभराटीच्या मुळाशीं बॉलिन या नांवाची कोणी व्यक्ति आहे, असा शोध हँबर्ग अमेरिकन कंपनीला लागल्यावर तिनें ही चढाओढ बंद करण्याकरतां सगळी कार कंपनी विकत घेण्याचा खटाटोप केला. १८८६ सालीं सर्व कार कंपनी व त्याजबरोबर बॉलिन हे सुद्धां हँबर्ग-अमेरिकन कंपनीच्या ताब्यांत आले. हँबर्ग-अमेरिकन कंपनीची जी अभूतपूर्व भरभराट सध्यां दिसून येते, तिचा प्रारंभ या बेळेपासूनच झाला.

ही भरभराट कशी झाली, तें प्रत्यक्ष आंकड्यांनींच सिद्ध होतें. १८८६ सालीं बॉलिन हपॅग कंपनींत आले, त्या वेळीं तिचें संकलित भांडवल ७५०००० पौंड होतें. आज तें ७५००००० झालें आहे. पूर्वीचा वार्षिक नफ्याचा आंकडा १२५००० पौंडांचा होता. तोच १९१२ सालीं २८२५००० पौंडांवर गेला. १८८६ सालीं कंपनीच्या मालकीच्या फक्त सव्वीस आगबोटी होत्या, आज तोच आंकडा १८० झाला आहे. बॉलिन यांचा लाभ हपॅग कंपनीला होण्यापूर्वी त्या कंपनीच्या सर्व आगबोटींचें संकलित वजन ६०००० टन होतें आणि १९१२ सालापासून इंपरेटर नांवाची ५०००० टनी एकच नवी आगबोट या कंपनीच्या निशाणाखालीं समुद्रावर फिरूं लागली आहे. इच्यांच

जोडीला आणखीहि कित्येक राक्षसी गलबतें बांधलीं जात आहेत आणि हॅपॅग कंपनीच्या ताब्यांतील एकंदर गलबतांचें वजन लौकरच १५०००० टनाच्या घराला येईल. युरोपांतील पांच सहा राष्ट्रें मिळून सुद्धां एवढी भरती होईल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

बॉलिन यांना जे एवढें प्रचंड यश मिळालें, याचें कारण प्रत्येक तपशिलाचाहि अत्यंत बारकाईनें ते विचार करीत असतात, हें होय. ज्या क्षुल्लक गोष्टींकडे कोणाचेंहि लक्ष फार करून जात नाहीं, अशा गोष्टींचाहि फार बारकाईनें विचार करून त्यांची तपशीलवार यादी ते आपल्या मनोरूपी कपाटांत सांठवीत असतात. या धंद्याचा अभ्यास इंग्लंडांत करीत असतां, त्यांस रोजमुरा मिळत नसताहि केवळ धंद्यांत प्रावीण्य मिळविण्यासाठीं ते ठरीव वेळाहून अधिक वेळ काम करीत असत. या वेळीं धंद्यांतील अगदीं बारीकसारीक खुब्यांचाहि त्यांनीं मनःपूर्वक अभ्यास केला. धंद्यांतील कोणतीहि मख्खी त्यांच्या अवलोकनांतून सुटली नाहीं. या त्यांच्या गुणामुळें त्यांची स्मरणशक्तीहि विलक्षण वाढली. कोणतीहि एकादी नवी गोष्ट समजली कीं, तिचा योग्य रीतीनें संग्रह करण्यास ते कधींहि चुकत नाहींत. ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, हॉलंड आणि स्क्यांडिनेशिया येथील सर्व व्यापारी कंपन्यांचें एक मोठें संमेलन अलीकडे भरत असतें. त्या संमेलनांत बॉलिन हे जी माहिती देत असतात, ती ऐकून बाहेर देशचे व्यापारी आश्चर्यानें थक्क होऊन जातात. कार कंपनीच्या साऱ्या धंद्याबरोबर बॉलिन यांचा प्रवेश हॅपॅग कंपनींत झाला, त्याच वेळीं जर्मनीच्या व्यापारी निशाणाचा प्रवेश पृथ्वीच्या दुसऱ्या टोंकापर्यंत कसा करावा याजबद्दल साऱ्या उपायांची जंत्री बॉलिन यांजपाशीं तयार होती.

हॅपॅग कंपनीचीं सर्व सूत्रें बॉलिन यांच्या हातीं आलीं, त्या वेळीं त्यांचें वय तिशीच्या आंतच होतें. यामुळें या कंपनीच्या बुढ्ढ्या व जुन्या चालींत मुरलेल्या मालकांवर जय मिळविणें हें सोपें काम नव्हतें. नव्या पद्धतीच्या जोड पंख्याच्या आगबोटी बांधाव्या ही बॉलिन यांची कल्पना त्यांस संमत झाली नाहीं. नव्या आगबोटींत केवळ सामान्य सुखसोयींहून अधिक

वैनींचाहि संग्रह केला पाहिजे, असें बॉलिन यांचें म्हणणें होतें, पण हें म्हणणें त्या वृद्ध कपीस मान्य होईना. कित्येक दिवस एकसारख्या समुद्रांत फेरत राहूं शकतील एवढ्या मोठाल्या बोटी बांधणें ही गोष्ट त्यांस शक्यतेच्या कोटीबाहेरची वाटत असे; पण नौकानयनाच्या इतिहासांत, असा दिवस लवकरच उगवणार, याचें स्वप्न बॉलिन यांस अगोदरच पडलें होतें. आपला मार्ग निष्कंटक करण्याची तयारी बॉलिन हे हळू हळू करीत होते. अखेरीस क्रमाक्रमानें या पुराण्या माणसांवर त्यांनीं विजय मिळविला. यांचा कधींहि न पडणारा उत्साह, त्यांची चिकाटीची उद्यमशीलता आणि त्याची सदा विजयी आत्मश्रद्धा या गुणांचा अखेरीस विजय झाला. कंपनीचीं सारीं सूत्रें हातांत घेण्यास हेच एक लायक गृहस्थ आहेत, अशी या पुराण्या मंडळीची सर्व तऱ्हेनें खात्री झाली. १९०० सालीं त्यांस कंपनीचे डिरेक्टर जनरल नेमण्यांत आलें. त्या वेळेपासून कंपनीचीं सारीं सूत्रें अप्रतिहतपणें त्यांच्या एकट्यांच्याच हातीं आलीं आहेत.

बॉलिन यांनीं ही कंपनी भरभराटीस आणली त्यांत दोन विशिष्ट पद्धति त्यांनीं अंमलांत आणल्या. प्रथम त्यांनीं नव्या पद्धतीचीं गलबतें बांधून कंपनीच्या आगबोटींत सुखसोयीचा व चैनीचाहि समावेश केला. अद्यापहि नव्या नव्या पद्धतीच्या गलबतांची भर कंपनीच्या संग्रहांत पडत असते. केवळ चैन मारण्यासाठीं समुद्र प्रवास करणाऱ्या लोकाची सख्या दिवसेंदिवस वाढत जाणार, ही गोष्ट बॉलिन यांस आगाऊच कळली होती व या दिशेनें पाऊल टाकण्यास त्यांनीं एकदम सुरवाताहि केली. ऑटलांटिक समुद्रावर आपल्या कंपनीचें वर्चस्व स्थापित झालें, तर तिचा फारच मोठा फायदा होईल, ही गोष्ट ते जाणून होते. या दृष्टीने त्यांनीं डयुशल्यँड नांवाची एक आगबोट १९०० सालीं बांधली. प्लायमौथ व न्यूयार्क या दोन बंदरांमधील प्रवास या आगबोटीनें पांच दिवस सात तास आणि अडतीस मिनिटांत संपविला. १९०० सालापर्यंत एवढ्या जलद चालीची दुसरी कोणतीहि आगबोट या दोन बंदरांत फिरत नव्हती. यानंतर तीन वर्षांनीं नॉर्थ जर्मन लॉयड कंपनीनें याहूनहि जलद चालीची एक बोट बांधली. १९०७ सालापर्यंत सदरील दोन बंदरांमधील उतारूंचा व्यापार

या दोन आगबोटीमुळें जर्मनीच्या हातांत राहिला. परंतु १९०७ सालीं ल्युसिटानिया नांवाची बोट बांधून इंग्लंडनें आपल्या हातांतला गेलेला व्यापार पुनः परत मिळविला. यानंतर हपॅग कंपनीच्या बोटींचा संचार साऱ्या जगभर करावा याकरतां बॉलिन यांनीं खटपट सुरू केली. पनामाच्या कालव्याच्या द्वारें युनायटेड स्टेटसच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांत दळणवळण लौकरच सुरू करण्याच्या विचारांत ते आहेत. स्वतःच्या कंपनीची इतकी व्यवस्था झाल्यानंतर कंपनीची व्यापारी स्थिति सुसंरक्षित राहील अशी व्यवस्था करण्याच्या विचारास ते लागले. या दृष्टीनें नॉर्थ ॲटल्यांटिक युनियन या नांवाचा बोट कंपन्याचा एक संघ त्यांनीं तयार केला. ॲटल्यांटिक महासागरावर आगबोटींच्या द्वारें चालणाऱ्या व्यापाराचीं सर्व सूत्रें या संघाच्या हातीं आलीं. निरनिराळ्या बोट कंपन्यांनीं एकमेकांशीं चढाओढ करून भाड्याचे दर कमी करूं नयेत, अशासाठीं बॉलिन नेहमीं खटपट करीत असतात. सर्वांनीं एकमेकाच्या अनुमतानें काम करावें असें त्यांचें मत आहे, तथापि चढाओढीचा प्रसंगच आल्यास त्यांतहि ते माघार घ्यावयाचे नाहींत. याचा अनुभव लिव्हरपूर आणि सौथहॅम्टन येथील बोटवाल्यांस आहेच. १९०१ सालीं पिवर पॉंड मार्गन यांनीं ओशनट्रस्ट नांवाचा जो व्यापारी संघ केला, त्याच्याशी सहकारिता करून इंग्लिश, डच आणि इतर बोटवाले यांच्या अनुमतानें पुढील धंद्याचें धोरण बॉलिन यांनीं निश्चित करून टाकलें.

जर्मन लोकांवर बोटींच्या व्यापाराच्या बाबतींत ताशेरा झाडण्याची खोड लॉर्ड पामर्स्टन यांस फार होती. जर्मन लोक शेतकी चांगली करतील व वाटल्यास मनोमय किल्लेहि उभारतील; पण समुद्रोल्लंघन ते केव्हांहि करूं शकणार नाहींत, असें पामर्स्टन ह्मणत असत. या बाबतींत जर्मनीची चढाओढ इंग्लंडाशीं कधींहि होणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती; पण एकोणिसावें शतक संपण्यापूर्वी तोच जर्मन आज व्यापारी जहाजें आणि आरमार यांत इंग्लंडच्या पहिल्या प्रतीचा प्रतिस्पर्धी होऊन बसला आहे. ल्युसिटानिया आणि मॉरेटानिया यांची जोड इंग्लंडास मिळाली याचेंहि कारण जर्मनीच होय, असें बॉलिन म्हणत असतात.

कारण इंग्लंडचा जो विशिष्ट व्यापार जर्मन आगबोटींनीं त्याजपासून हिरावून घेतला आहे, तो परत मिळविण्याकरतांच इंग्लंडनें त्या दोन बोटी बांधल्या. या दोन बोटी बांधण्याकरतां खुद्द ब्रिटिश सरकारनें कुनार्ड कंपनीला पैशाची मदत केली. अशाप्रकारच्या मदतीच्या अभावी अशा प्रकारें बोटी बांधून त्या चालविण्याचें धैर्य कोणाहि आगबोट कंपनीला झालें नसतें. अशा प्रकारें सरकारी मदत घेऊन धंदा चालविणें बॉलिन यांस श्रेयस्कर वाटत नाहीं. धंद्यांत सरकारी मदतीचें पिल्लूं एकवार शिरलें म्हणजे नाशकारक प्रतिस्पर्धी दोन राष्ट्रांत सुरू झाल्यावांचून रहात नाहींत. अशा प्रकारे मदत मिळत गेल्यास धंदेवाल्यांच्या अंगांत जी आत्मश्रद्धा व धमक असावी लागते, तिचा नाश होतो, असें त्याचें मत आहे. साखरेच्या धंदेवाल्यांस पूर्वी सरकारी मदत मिळत असे; पण युरोपांतील प्रमुख राष्ट्रांनीं परस्परांच्या अनुमतानें ही मदत देण्याचें बंद केलें. अशाच रीतीने बोटवाल्यांसहि सरकारी मदत मिळूं नये असा ठराव सर्व राष्ट्रांनीं करावा, या मताचा प्रसार बॉलिन हे करीत असतात. बोटी बांधण्याच्या कामांत अमेरिकन संस्थानें मागासलेलीं असल्यामुळें तेथील कंपन्यांना मात्र कांहीं थोडे दिवस सरकारी मदत मिळाल्यास हरकत नाहीं, असें ते कबूल करतात.

डचेशल्याँड बोट बांधल्यानंतर तिच्याहून अधिक जलद चालीची बोट त्यांनीं अद्यापि बांधली नाहीं. ॲटल्याँटिक महासागर ओलांडण्यास सहा सात दिवस लागल्यास प्रवाशांनीं कुरकुर करण्याचें कारण नाहीं, असें आज त्यांचें म्हणणें आहे; पण बॉलिन चढाओढींत उद्यां पडणार नाहींत, असें कोणीं सांगावे ? ब्रिटनच्या बोटीहून अधिक जलद चालीच्या बोटी बांधून ते ब्रिटनशीं पुनः प्रतिस्पर्धा करूं लागतील, असें म्हणणें फारसें चुकीचें होणार नाहीं.

बॉलिन हे स्वभावानें अतिशय शालिन आहेत–इतके कीं, ते अगदीं लाजाळू गृहस्थ असावेत असेंच एकाद्यास वाटेल–जेथें तेथें पुढें पुढें करणें त्यांना आवडत नाहीं. बांध्यानें ते वामनमूर्ति आहेत. सकाळीं बरोबर नऊ वाजतां ते आपल्या ऑफिसांत हजर होतात. सर्व कंपनीचा मुख्य

आधिकार त्यांच्या हातांत आहे, आणि ते केवळ नांवाचेच अधिकारी आहेत, असें नाहीं, तर कंपनीच्या कारभारांतील सर्व बारीकसारीक बाबींवरहि त्यांची प्रत्यक्ष नजर असते. ऑफिसांतील सर्व कामगारांच्या आधीं येऊन सर्वांच्या मागून जाण्याचा त्यांचा क्रम अद्यापिहि चालू आहे. कोणी भेटावयास आल्यास त्याच्याशीं निरर्थक गप्पा मारीत बसणे त्यांस आवडत नसल्यामुळें फार करून ते कोणाची भेटच घेत नाहींत. बादशहांची स्वारी ज्या ज्या वेळीं हँबर्गला जाते, त्या त्या वेळीं बॉलिन यांच्या छोटेखानी बंगल्यांत त्यांची भेट घेण्यास ते चुकत नाहींत. बॉलिन हे कोठेंहि गेले, तरी आतां ते सर्वांस हवेसे वाटतात यांत नवल नाहीं. मोठमोठीं जुनीं आणि सरदार घराणीं त्यांच्या भेटीसाठीं उत्सुक असतात; पण आपलें ऑफिस किंवा घर यांवांचून दुसऱ्या कोठेंहि जाण्याचा त्यांचा परिपाठ नाहीं. यांना एक कन्या एवढेंच अपत्य आहे. बॉलिन हे पहिल्या प्रतीचे मातृभक्त आहेत. आपली वृद्ध माता जीवंत असेपर्यंत आपला सारा रिकामा वेळ ते तिच्या शुश्रूषेंत घालवीत. यहुदी धर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे; तथापि ते धर्मवेडे मात्र नाहींत. कोणाहि यहुद्याला तो केवळ धर्मबंधु ह्मणून हपॅग कपनींत त्याला एकादी मोठीशी जागा यांनीं दिल्याचें उदारण नाहीं. पुष्कळ जर्मनयहुदी लौकिक फायद्याच्या आशेनें खिस्ती धर्माचा स्वीकार करतात, या गोष्टीचा त्यांस फार राग येतो. स्वतःच्या धर्मावर इतकी श्रद्धा ठेवणाऱ्या या यहुद्याला केसर इतका मान देतात, या गोष्टीचा पुष्कळ जर्मन सरदारांस मोठा विषाद वाटतो. हपॅग कंपनीशीं यांचा संबंध जडल्यास १९१० सालीं पंचवीस वर्षें झालीं. या प्रसंगानिमित्त सिल्व्हर ज्युबिली करावी व हा प्रसंग मोठ्या थाटाने व दिमाखानें साजरा करावा, अशी हँबर्ग येथील जनतेची इच्छा होती. जूनच्या २ तारखेस हीं पंचवीस वर्षें पुरीं व्हावयाचीं होतीं; पण त्या तारखेपूर्वी एक आठवडा बॉलिन हे स्वतःच्या खास बोटींत बसून कोठें नाहींसे झाले. ते कोठें गेले होते, हें कोणासहि समजलें नाहीं. 'ज्युबिलीचा' लोकांना पूर्ण विसर पडल्यानंतर एके दिवशीं हळूच ते आपल्या ऑफिसांत हजर झाले.

प्रशियाचे प्रिन्स हेनरी.

खुद्द राजाचा भाऊ होणें, ही गोष्ट पुष्कळ वेळा मोठ्या अडचणीची असते. राजाची प्रभावळ शोभविण्यावांचून भाऊ झालेल्या या व्यक्तीला बहुधा अधिक महत्त्व नसतें. यामुळें राजाच्या भावाला नैसर्गिकपणें असणारें महत्त्व कायम ठेवणें हें मोठे कठिण काम आहे. हें कठिण काम चांगल्या रीतीनें पार पडल्याचे दाखले फारसे आढळत नाहींत.

सांप्रतच्या जर्मन बादशहांचे बंधु प्रशियाचे प्रिन्स हेनरी, हे या सामान्य नियमास अपवाद आहेत. जर्मन आरमाराच्या इन्स्पेक्टर जनरलच्या हुद्यावर सध्यां ते आहेत आणि यांच्या तोडीची जर्मन राष्ट्राची महत्त्वाची सेवा चालू कारकीर्दीत दुसऱ्या कोणींहि बजावली नाहीं. ग्रँड ॲडमिरल फॉं टिरपिट्झ हे जर्मन आरमाचे जसे आद्यजनक आहेत, तसेच ग्रँड ॲडमिरल प्रिन्स हेनरी हे त्याचे आद्य गुरु आहेत. आपलें पूर्वीचें बालरूप टाकून जर्मन आरमार तारुण्याच्या भव्य रूपांत येऊं लागलें, त्या वेळीं प्रिन्स हेनरी हे आरमारचे मुख्य अधिपति—कमान्डर इन चीफ होते. जर्मन आरमाराच्या वाढींत हा काल मोठा आणीबाणीचा होता. प्रचंड आकाराचीं व नुसत्या प्रचड तोफांनीं सज्ज झालेलीं नव्या जातीचीं बेडर जहाजें याच वेळीं जन्मास आल्यामुळें दर्यायुद्धाच्या पद्धतींत विलक्षण क्रांति घडून आली होती. लढाऊ जहाजांची बांधणी, लढाईचे व्यूह आणि गोलंदाजीचे शिक्षण यांचें जुनें शास्त्र समूळ मोडलें जाऊन नवें शास्त्र तयार होण्याचा हा काळ होता. अशा काळीं खुद्द बादशाहाच्या भावाच्या नजेरेखालीं जर्मन आरमार आपल्या नव्या स्वरूपांत उदयास आलें. जर्मन आरमाराची ही क्रांति इतक्या त्वरेनें आणि इतक्या उत्तम शिस्तीनें घडून आली, कीं, जर्मन आरमाराची ही तयारी दुसऱ्या कोणत्याहि नव्या आरमाराच्या जोडीची झाली. जणूं काय, एका रात्रीच्या अवधींतच सारें जुनें जर्मन आरमार आपली कात टाकून एकदम नवें झालें. यामुळेंच ग्रँड ॲडमिरल प्रिन्स हेनरी यांनीं जर्मन राष्ट्राच्या हृदयांत मोठ्या प्रेमाची आणि मानाची जागा पटकाविली आहे. राष्ट्रीय

विभूति या सदरांत ज्या कांहीं थोड्याशा व्यक्ति, बिस्मार्कच्या काळानंतर झाल्या, त्यांतच प्रिन्स हेनरी यांची गणना होते.

एकसारखीं तीस वर्षें समुद्राशीं संघट्टन असल्यामुळें प्रिन्स हेनरी यांचा स्वभाव इतका दिलदार बनला आहे कीं, त्यांच्या वागणुकीवरून ते राजकीय पुरुष नसून एकाद्या खलाशाच्या घराण्यांत जन्मास आले असावेत, असें वाटतें. राजघराण्यांतील पुरुषांच्या अंगीं नित्य आढळून येणाऱ्या चैनबाजीच्या गंधहि यांस नाहीं. ते अत्यंत कर्तव्यदक्ष असल्यामुळें चैन करण्यास त्यांस वेळच नाहीं आणि याशिवाय त्यांची मनःप्रवृत्तीहि चैनबाजीस फारशी अनुकूल नाहीं. राजघराण्यांत नित्य चालणारे चैनीचे प्रकार त्यांस आवडत नाहींत. समुद्रपर्यटन करणें हाच त्यांच्या शौकाचा विषय आहे. आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं हे आरमारांत प्रथम दाखल झाले. या वेळीं जर्मन आरमाराला लहान होडग्यांच्या समुद्रयानावांचून अधिक भव्य रूप नव्हतें. वयाच्या तिसाव्या वर्षीं यांना कप्तानाची जागा मिळाली व त्यानंतर चार वर्षांनीं ते रीअल ॲडमिरल झाले. १९०६ सालीं मुख्य अधिपतीच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. या वेळीं जर्मन आरमाराला भव्य स्वरूप प्राप्त झालें होतें. जरूर पडेल, त्या वेळीं गदाघात करण्यास हे आरमार जय्यत तयार व उत्सुक होऊन बसलें होतें. आपल्या आरमाराची प्रतिक्षणीं पूर्ण तयारी असली पाहिजे व कोणत्याहि क्षणीं युद्धाचा प्रसग आल्यास जर्मन आरमार निर्वाणीचा तडाखा देण्यास सज्ज असलें पाहिजे, अशा दृष्टीनें यांनीं सर्व आरमारी शिक्षणाचें काम केलें असल्यामुळें जर्मन साम्राज्याच्या मुख्य आरमारी सेनापतीच्या जागीं नेमण्यास यांजहून दुसरा अधिक योग्य पुरुष सांपडणार नाहीं.

कील बंदर हें त्यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण आहे. खुद्द बादशहांच्या तर्फे कारणपरत्वें परदेशीं जावें लागलें, तरच ते आपल्या ठाण्यांतून बाहेर पडतात. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या कारणावांचून एक दिवसहि आपल्या ठाण्यांतून ते बाहेर फिरावयास जात नाहींत. कड्र्या शिस्तीचे ते चहाते असल्यामुळें इतरांप्रमाणेंच स्वतःवरहि या शिस्तीचा

अम्मल चालविण्यास ते कमी करीत नाहींत. त्यांची कर्तव्यदक्षता आणि कामाची हौस यांचें वजन आरमारांतील सर्व शाखांत दिसून येतें. ते स्वतः कामचुकावू नसल्यामुळें आरमारांतील सर्व नौकरांसहि कर्तव्यदक्ष राहणें भागच पडतें. जर्मनींतले सारे आरमारी कामदार विलक्षण कष्टाळू आहेत, अशी त्यांची ख्याति जगभर पसरली आहे. एकसारखे काम करण्याच्या बाबतींत प्रिन्स हेनरी यांचें जीवंत उदाहरण त्यांच्या डोळ्या समोर नित्य असते. गोलंदाज तयार करण्यास प्रिन्स हेनरी यांनीं विशेष मेहनत घेतली. नाविकांच्या शिक्षणाकरतां जर्मन आरमार जेव्हां जेव्हां बाहेर पडतें, तेव्हां तेव्हां वेळ अवेळ न पहातां व स्वतःच्या शारीरिक सुखाची यत्किंचितहि पर्वा न करतां जातीनिशीं ते आरमाराबरोबर जात असतात. व्यूहरचना आणि युद्धाचें जें कांहीं कौशल्य जर्मन आरमारानें सध्यां मिळविलें आहे, त्याचें सारे श्रेय प्रिन्स हेनरी यांजकडे आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. चार वर्षांपूर्वी आरमाराच्या अधिपतित्वाचीं सूत्रें त्यांनीं सोडलीं, त्या वेळीं त्यांच्या स्वतःच्या जहाजावरून त्यांस किनाऱ्यावर पोहोंचविण्यासाठीं जी होडी निघाली होती, तींत कांहीं आरमारी कामगारांनीं स्वतः वल्हीं मारण्याचें काम केलें. आरमारांतील सर्व कामगारांस ते किती प्रिय झाले आहेत व त्यांजबद्दल त्यांच्या मनांत कसा आदर वसत आहे, हें यावरून स्पष्ट होतें.

जर्मन राष्ट्राची भवितव्यता समुद्रावर आहे, असें दुसऱ्या वुइलियम बादशहानीं एक वेळ म्हटलें होतें. हेंच ब्रीद वाक्य प्रिन्स हेनरी यांनींहि उराशीं बाळगलें आहे. प्रिन्स हेनरी हे निधड्या छातीचे आणि स्वतंत्र बाण्याचे गृहस्थ असल्यामुळें कित्येक आरमारी बाबतींत केसरशीं मतभेद होण्याचे अनेक प्रसंग यांजवर आलेले आहेत; तथापि जर्मन राष्ट्राला पहिल्या प्रतीचें आरमार पाहिजे, या मुख्य सिद्धांताबद्दल मात्र दोघांचीहि पूर्ण एकवाक्यता आहे. जर्मनीला मोठें आरमार अवश्य पाहिजे. ही गोष्ट साऱ्या जर्मन जनतेंत पक्की बिंबविण्याकरितां 'नेव्ही लीग' या नांवाची एक संस्था जर्मनींत स्थापन झाली आहे. प्रिन्स हेनरी हे या संस्थेच्या उत्पादकांपैकींच एक असल्यामुळें तिच्या सर्व कारभारांत ते पुढाकार घेत असतात.

प्रिन्स हेनरी हे सध्यां त्रेपन्न वर्षांचे असून केसरपेक्षां साडेतीन वर्षांनीं ते लहान आहेत. सन १८७५-७७ च्या दरम्यान क्यासेल येथील शाळेंत या दोघां बंधूंचा अभ्यास एकत्रच झाला. यानंतर बादशहा बान येथील विश्वविद्यालयांत गेले व प्रिन्स हेनरी हे कील येथील आरमारी विद्यालयांत दाखल झाले. प्रिन्स हेनरी हे आपल्या आईबापांचे फार लाडके होते.

सांप्रतच्या बादशहांचे वडील एंपरर फ्रेडरीक हे गादीवर असतां एक अमेरिकन वकील बादशहास भेटण्यासाठीं गेला. त्या वेळीं भाषणाच्या ओघांत युवराजांची—ह्मणजे सध्यांच्या बादशहांची त्यानें बरीच स्तुति केली. ती सारी ऐकून घेऊन फ्रेडरीक बादशहा ह्मणाले, " वुइलियम चांगला मुलगा आहे, ही गोष्ट खरी; पण माझ्या हेनरीला तुह्मीं पाहिलें असतें, तर काय ह्मटलें असतें ? " प्रिन्स हेनरी यांस जलपर्यटणाचा विलक्षण शौक आहे. हा शौक त्यांच्या इंग्रज मातेच्या द्वारें त्यांच्या रक्तांत आला असावा. ते सोळा वर्षांचे असतां प्रिन्स ॲडेलबर्ट नांवाच्या आरमारी जहाजावर दोन वर्षेपर्यंत त्यांची रवानगी करण्याचें ठरलें. हें जहाज या दोन वर्षांच्या अवधींत पृथ्वी प्रदक्षणा करणार होते. आपला धाकटा मुलगा इतका काळ समुद्राच्या स्वाधीन करणें, प्रिन्सेस विक्टोरिया यांच्या जिवावर आलें. त्या वेळीं सांप्रतच्या बादशहाचे आजे पाहिले वुइलियम हे गादीवर होते. प्रिन्स हेनरी यांस इतका काळ या जहाजाबरोबर पाठवूं नये, अशी त्यांच्या मातेनें बादशहांपाशीं विनवणी केली; पण बादशहा पाहिले वुइलियम हें स्वतः शिपायी गड्डी असल्यामुळें व आपल्या सर्व मुलांबाळांनीं हाच कित्ता गिरविला पाहिजे, अशा मताचे ते असल्यामुळें त्यांनीं आपल्या सुनेच्या विनवणीकडे लक्ष दिलें नाहीं. ते ह्मणाले, " या मुलाचें भावी आयुष्य ज्या अर्थीं समुद्रावरच जावयाचें आहे, त्या अर्थीं पुढें येण्याच्या संकटाची ओळख त्यानें आजपासूनच करून घेतली पाहिजे. त्याचें सारें शिक्षण अगदीं सामान्य खलाशाप्रमाणें झालें पाहिजे. " या दोन वर्षांच्या अवधींत एका मोठ्या वादळाच्या सपाट्यांत हें जहाज सांपडलें होतें. आपल्या भावी आयुष्यक्रमांत कसे प्रसंग येण्याचा

सभव आहे, याचा अल्पसा अनुभव प्रिन्स हेनरी यांस बंगालच्या उपसागरांत मिळाला.

१८१७ सालीं, जर्मन क्रुइझरांचा नंबर दोनचा काफिला चीनकडे जाण्यास बाहेर पडला, त्या वेळीं त्याचें आधिपत्य प्रिन्स यांस दिलें होतें. हीच त्यांची महत्त्वाची पहिली नेमणूक. कील बंदरांतून हा काफिला बाहेर पडला त्या वेळीं त्यांस निरोप देतांना केसर यांनीं मोठें विलक्षण भाषण केलें. ते ह्मणाले, " आपल्या हक्कावर घाला घालण्यासाठीं जो कोणी यत्न करील, त्याजवर सशस्त्र मुठीचा—mailed Fist—आघात करावयाला चुकूं नका. " वडील भावाबद्दल प्रिन्स हेनरी यांच्या मनांत असलेला आदर या वेळीं व्यक्त झाला. बादशहांच्या भाषणास उत्तर देतांना ते ह्मणाले, " मोठे विजय मिळवून धन्य व्हावें, अशी माझी महत्त्वाकांक्षा नाहीं, तर बादशहांचें नांव सर्व पृथ्वीवर गाजवावें इतकीच माझी इच्छा आहे. "

प्रिन्स हेनरी यांचा काफिला चीनला पोहोंचला, त्या वेळीं तेथें मोठी उलथापालथ सुरू होती. एका जर्मन मिशनऱ्याचा खून झाल्याबद्दल कियाचऊचें बंदर याच वेळीं जर्मनीनें चीनपासून घेतले. यानतर लवकरच अमेरिकेनें फिलिपाईन बेटें घेतलीं. ॲडमिरल फाँ डॉयडेरिक याच्या मूर्खपणामुळें जर्मनी आणि अमेरिका यांजमध्ये युद्ध जुंपण्याच्या बेतांत आलें; पण तो प्रसंग टळला. या स्वारीहून परत आल्यानंतर प्रिन्स हेनरी हे लौकरच व्हाइस ॲडमिरल झाले.

या वेळीं अमेरिका आणि जर्मनी यांजमधील परस्पर संबंध असावे तितके सलोख्याचे नव्हते. याच प्रसंगीं प्रिन्स हेनरी यांची मुत्सद्देगिरी जर्मनीच्या उपयोगीं पडली आणि यानतरहि त्यांच्या मुत्सद्देगिरीचा उपयोग जर्मन सरकारांनीं अनेक प्रसंगीं करून घेतला आहे. चिनांतील स्वारीहून परत येऊन फार दिवस झाले नाहींत, तोंच १९०२ सालीं त्यांची अमेरिकेंत रवानगी करण्यांत आली. केसर यांनीं खास आपल्यासाठीं एक नौका अमेरिकेंत बांधविली होती, ती तयार होऊन पाण्यांत लोटण्याचा समारंभ व्हावयाचा होता. बाह्यतः या समारंभाकरतां प्रिन्स यांची रवानगी अमेरिकेंत झाली होती; पण य.

भेटीचा अंतःस्थ हेतु बेगळाच होता. अमेरिकेशीं जो हितसंबंध केसर यांस जोडावयाचा होता, त्याचा प्रारंभ प्रिन्स हेनरी यांनीं ह्या भेटींत केला. आपण श्रेष्ठ प्रतीचे लोक आहों व कनिष्ठाशीं मिसळणें आपणांस इष्ट नाहीं, असें पुष्कळ जर्मन लोकांना वाटतें. प्रिन्स हेनरी अमेरिकेंत जाण्यास निघणार, ही बातमी ऐकून या लोकांस मोठें नवल वाटले. लहान-थोरपणाचा भेद न पाळणाऱ्या अमेरिकेंत होहेनझोलार्न घराण्याचा मोठेपणा कसा सांभाळला जाईल, याची भीति या लोकांस वाटत होती; पण प्रिन्स हेनरी यांच्या मनांत ही शंका सुद्धां आली नाहीं. न्यूयार्क येथे झालेल्या एका बड्या मेजवानींत प्रिन्स हेनरी यांनीं अमेरिकन वर्तमानपत्रकारांस मोठ्या मानमरातबानें वागविले. प्रशियन सेनानीस ज्या प्रकारचा मान प्रशियात मिळतो, तशाच प्रकारचा मान प्रिन्स यांजकडून वर्तमानपत्रकारांस मिळाला. वर्तमानपत्रकार ह्मणजे कःपदार्थ असा प्रशियन लोकांचा समज आहे. अशा स्थितींत प्रिन्स यांची ही वर्तणूक पाहून त्यांस काय वाटलें असावें ? एके वेळीं प्रिन्स चिकागो शहरांत गाडींतून हिंडत असतां वर्तमानपत्रे विकणारा एक पोरगा मोठ्यानें ओरडून त्यांना ह्मणाला, "ओहो! हँक् आपली तब्बेत कशी आहे ?" हा सवाल ऐकून प्रिन्स खदखदां हंसून ह्मणाले, "ठीक आहे. तुझी तब्बेत बरी आहे ना ?" या भेटीच्या प्रसगीं प्रिन्स सर्व दर्जाच्या अमेरिकन लोकांशीं किती मिळूनमिसळून वागले, याचें हें एक उदाहरण आहे. या त्यांच्या वर्तणुकीमुळें अमेरिकेंत ते फार लोकप्रिय झाले. अमेरिका व जर्मनी यांजमध्यें जो मित्रभाव दिसून येतो, त्याचा प्रारंभ याच प्रसंगीं झाला. यानंतर इंग्लंड, रशिया, जपान व युरोपांतील दुसऱ्या कित्येक देशांस प्रिन्स यांनीं भेटी दिल्या आणि या साऱ्या प्रसंगीं प्रिन्स हेनरी यांच्या चातुर्याचा आणि राजकारणकुशलतेचा उपयोग त्यांच्या मातृदेशास फार झाला.

प्रिन्स हेनरी यांस दर्यावर्दीपणाची जशी आवड आहे, तशीच उघड्या हवेंतील खेळांचीहि आहे. जगांतील सर्व प्रकारच्या उघड्या हवेंतील खेळांचें एक बडें सम्मेलन बर्लिन येथें दरसाल भरत असतें. या

सम्मेलनांतहि जर्मनीचा नंबर वर लावावा यासाठीं प्रिन्स यांची नित्य खटपट सुरू आहे. आपल्या लोकांस सर्व खेळांची गोडी लावण्याकरतां ते नेहमीं खटपट करीत असतात. प्रिन्स हेनरी हे पहिल्या प्रतीचे शिकारी आहेत. तसेंच ते मोठे वस्ताद पोहणारे असून गोल्फ आणि टेनिस हे खेळहि ते चांगल्या प्रकारें खेळतात. नौकांच्या शर्यतींत आपली नौका ते स्वतः हाकीत असतात. कील येथें दरसाल एक आठवडा नौकांच्या शर्यती होत असतात व प्रिन्स यांच्या खटपटीनें हा समारंभ सध्यां जगांतील एक अत्यंत प्रेक्षणीय देखाव्याप्रमाणे झाला आहे. जर्मनींतील इम्पीरियल आटोमोबाईल क्लब या संस्थेचे ते अधिपति असून या संस्थेमार्फत होणाऱ्या मोटार गाड्यांच्या शर्यतींतहि ते स्वतः गाडी हांकीत असतात. या कलेंतहि जन्मभर हाच धदा केलेल्या माणसाइतके ते निष्णात आहेत. जर्मनींत तयार झालेल्या मोटार गाड्यांचा प्रसार जगभर चालू व्हावा, यासाठींहि त्यांची खटपट चालू आहे. त्यांच्या उदाहरणामुळेंच खुद्द जर्मनींत मोटार गाड्यांचा प्रसार वाढत आहे.

प्रिन्स हेनरी हे विमानें चालविण्यांतहि कुशल आहेत. झेपेलिनमध्यें प्रवास करणारे असे, राजघराण्यांतील हे पहिलेच पुरुष होत. या वेळीं झेपेलियन विमान सध्यांइतकें पूर्णत्वास आलें नव्हतें. या पहिल्याच प्रवासांत कांहीं वेळपर्यंत सुकाणूं धरण्याचें काम त्यांनीं केलें. विमानांचा प्रचार जर्मनींत लोकप्रिय करण्यासाठीं त्यांनीं फार मेहनत घेतली आहे.विमान चालविण्यास योग्य अशाबद्दलचा जो दाखला सरकारांतून प्रत्येक वैमानिकास घ्यावा लागतो, तशाप्रकारचा दाखला प्रिन्स यांस मिळाला असून त्यांचा नंबर ३८ आहे. जर्मनीचें सैन्य आणि आरमार यांस या कलेचा उपयोग कोठवर करून घेतां येईल, या विचारांत सध्यां त्यांचें मन गुंतलें आहे.

प्रिन्स हेनरी यांच्या पत्नीचें नांव ऐरीन असें असून त्या रशियाच्या राणीच्या भगिनी आहेत. या खाजगी नात्यामुळें रशियाचे झार बादशहा व प्रिन्स यांजमध्यें चांगला स्नेहसंबंध जडला आहे. प्रिन्स यांस जर्मन आणि इंग्रजी या दोन भाषांचें उत्तम ज्ञान असून गप्पागोष्टी करण्यांतहि ते मोठे कुशल आहेत.

जर्मन आरमारावर त्यांचें जसे प्रेम आहे, त्याच्या खालोखाल ब्रिटिश व अमेरिकन आरमारे हीं सुद्धां त्यांचा प्रेमाचा विषय असून त्यांजबद्दल त्यांस मोठा अभिमान आहे. या दोन्ही आरमारांची खडानखडा माहिती त्यांस असून त्याच्यांतील पुष्कळ अम्मलदारांशीं त्यांचा चांगला स्नेहहि आहे. आंग्ल जर्मन आरमाराचें प्रचंड युद्ध कधीं काळीं जुपले तर, लढाईच्या भर गर्दीच्या ठिकाणीं यांची मूर्ति दिसल्याशिवाय रहावयाची नाहीं. ब्रिटन व ब्रिटिश आरमार यांचा द्वेष करणाऱ्या आपल्या देशबांधवांची कडक रीतीनें कान उघाडणी करण्यास ते कमी करीत नाहींत. ड्रेक आणि नेल्सन यांचें वंशज जर्मनीच्या आरमाराबरोबर दोन हात करण्यास लायक नाहींत, असें म्हणणाऱ्या सवाई देशभक्त जर्मनांचे ते मोठे भोक्ते आहेत. इंग्लंड व जर्मनी यांच्या आरमारानीं खांद्याशीं खांदा लावून दोघांच्याहि शत्रूंचा निःपात करावा, अशी त्यांची इच्छा आहे.

कौंट झेपेलीन.



विसाव्या शतकांतील जर्मनींतील ' अद्वितीय पुरुष ' अशी पदवी केसर दुसरे वुइलियम यांनीं कौंट फॉं झेपेलीन यांस एका प्रसंगीं दिली. पांच वर्षांपूर्वी झेपेलीन विमानांतून एक सफर करून कौंट परत आले, त्या वेळीं बादशहा तेथें हजर होते. तेव्हां एक मोठें उत्साहजनक भाषण करून कौंटसंबंधीं त्यांनीं वरील उद्गार काढले होते. बादशहांनीं आपल्या उत्साहाच्या भरांत कौंटची केवळ व्याजस्तुति केली असेल, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. झेपेलिन विमान यशस्वी करण्यांत कौंट यांनीं जीं सोळा वर्षें घालविलीं, त्या वेळीं त्यांची चेष्टा करणारे लोक पुष्कळ होते, व त्यापैकीं कांहीं आज हयातहि असतील; पण आज झेपेलीन विमानें शेंकडों उतारू सुरक्षितपणें जर्मनीच्या एका टोंकाहून दुसऱ्या टोंकास नेत असतात, व्हाईन नदीवर पहारेकऱ्यांचें काम करीत असतात व उत्तर

समुद्रावरील आरमारी ठाण्यांचें संरक्षण गरुडासारख्या तीक्ष्ण नजरेनें करीत असतात. त्यांच्या शत्रूस आता त्यांची नालस्ती करणें अशक्य आहे. अद्वितीय पुरुषांच्या यादींत त्यांनीं आपलें नांव अजरामर केलें आहे, हें कोणासहि कबूल करावें लागेल.

कौंट झेपेलीन यांचें वय आतां सुमारें ७८ वर्षांचें आहे. ते सत्तर वर्षांचे असतां कीर्तीनें त्यांस माळ घातली; पण ही कीर्ति प्राप्त होण्यापूर्वी किती तरी काळ अत्यंत कष्टांत आणि दुर्दशेंत त्यास घालवावा लागला. नानाप्रकारच्या युक्त्यांचा शोध ज्यांनीं लाविला, त्यांस पुष्कळ दुःखें भोगावीं लागलीं असल्याचे व पुष्कळ वेळां त्यांची निराशा झाली असल्याचे दाखले इतिहासांत पुष्कळ सांपडतील; पण कौंट यांस जे कष्ट पडलें, तितके कष्ट फारच थोड्यांच्या नशिबीं आले असतील. दुःखें, निराशा, आणि लोकांचा उपहास यांच्याशीं एकसारखीं वीस वर्षें ते झगडत होते. इतके कष्ट सोसून व अखेरीस आपलें म्हणणें सिद्ध करून कीर्तिमंदिराच्या उच्च शिखरावर आरूढ होणारा पुरुष विरळाच सांपडेल. कौंट झेपेलिन यांचा हा इतिहास पाहिला म्हणजे केसर यांनीं केलेली त्यांची स्तुति अवास्तव होती, असें म्हणण्याचें कारण नाहीं.

झेपेलिन विमानांनीं आज हवेवर जय मिळविला आहे, ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली असून त्यांची भावी कर्तबगारी अद्यापि काळाच्या उदरांत आहे, असें म्हणणे अतिशयोक्तीचें नाहीं. जलद चालीच्या बाबतींत छोट्या आकाशयानांची बरोबरी हीं हवेंतील प्रचंड गलबतें करूं शकत नाहींत ही गोष्ट खरी; तथापि इतर बाबतींत यांची बरोबरी इतर कोणत्याहि जातीचीं आकाशयानें करूं शकत नाहींत. हवेंत वादळ असतां, व पाऊस आणि हिमपात होत असतां, मध्यें कोठेंहि विश्रांति घेतल्याशिवाय पांचपन्नास माणसें आंत घेऊन झेपेलिन यानें एकसारखीं चोवीस तास परिभ्रमण करूं शकतात. वारा अनुकूल असला, तर दर तासास पन्नास मैल जाणें हा या यानांचा पोरखेळ आहे. वेळीं सतरा अठरा खंडींपर्यंत ओझें हीं यानें सहज उचलून नेतात, हें सिद्ध झालें आहे. वारा अगदीं विरुद्ध दिशेनें वहात असतां उत्तर समुद्र आणि बाल्टिक समुद्र

याजवरून या आकाश जहाजांनीं अनेक सफरी केल्या आहेत. या जहाजांना शोधक बत्त्या, बिनतारी संदेशयंत्रें, बांबगोळे टाकणाऱ्या नळ्या आणि यांत्रिक तोफा इत्यादि जोडलीं असून इतक्या समारंभासह यांनीं लांबलांबचे प्रवास केले आहेत. ग्रेटब्रिटनचा सर्व किनारा अथवा फ्रान्सची सर्व सरहद्द फिरून हीं परत येऊं शकतात, असें आतां सिद्ध झालें आहे. सैन्य आणि आरमार यांच्या उपयोगासाठीं झेपेलिन यानें बांधण्याचा कायदा जर्मनीनें पास केला, हीच गोष्ट कौंट झेपेलिन यांच्या विजयाची व महत्त्वाची साक्ष देत आहे.

जर्मनी आणि स्विट्झर्लंड याच्या सरहद्दीवर असलेल्या कान्स्टन्स नांवाच्या प्रचंड सरोवराच्या काठीं असलेल्या एका गांवीं कौंट झेपेलिन यांचा जन्म झाला, यांच्या वडिलांचे नांव कौंट फर्डिनंड फॉं झेपेलिन असे असून त्यांस वर्टेमबर्गच्या दरबारीं एक असामी होती. तरुणपणीं आपल्या क्षात्रकुलास अनुरूप अशी सैन्यांतील नौकरी त्यांनीं पत्करली. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते रिसाल्याचे लेफ्टनंट झाले. या वेळीं वर्टेमबर्ग दरबारतर्फे ते अमेरिकेंत मिलिटरी अटॅची होते, त्या वेळीं अमेरिकेंतील संस्थानांत दुफळ्या होऊन एक अंतस्थ युद्ध सुरू झालें होतें. एका संघाच्या सैन्याचा तळ मिसिसिपी नदीच्या कांठीं पडला होता. या ठिकाणीं कार्लस्कर्झ या नांवाचा एक जर्मन अम्मलदार तोफखान्यावर कामगार होता. कौंट झेपेलिन यांस युद्धाच्या गर्दींत शिरण्याचें कारण नव्हतें, तथापि कौंट यांच्या मनोवृत्ति अत्यंत प्रबळ असल्यामुळें केवळ तमासगिरासारखें युद्धाच्या बाहेर उभें न रहातां ते कार्लस्कर्झ याच्या हाताखालीं तोफखान्याचें काम करूं लागले. यानंतर थोडे दिवसांनीं फ्रेड्रिकबर्ग या ठिकाणीं जी हातघाईची लढाई झाली, तींत यांनीं आपला घोडा इतका पुढें घातला कीं, ते शत्रूच्या हातांत पडण्याच्या बेतांत आले; परंतु ते छातीचे मजबूत व खंदे स्वार असल्यामुळें शत्रूची फळी फोडून सुरक्षित बाहेर पडले.

याच वेळीं हवेंत उडण्याचा प्रसंग त्यांस प्रथम प्राप्त झाला. ते ज्या सैन्यांत होते, त्या सैन्याच्या तर्फे शत्रुसैन्याची पहाणी करण्याकरतां एक

फुग्याचें विमान उडविण्याचें ठरलें व या यानावर कौंट झेपेलिन यांची योजना झाली. त्यांनींहि मोठ्या उत्साहानें तिचा स्वीकार केला. त्यांचा हा पहिला हवेंतील प्रवास इतका यशस्वी झाला, कीं हें युद्ध चालू होतें तोंपर्यंत शत्रुसैन्याची टेहळणी करण्याचें काम पुढें अनेकवार त्यांजवर सोंपविण्यांत आलें. जर्मनींने हवेवर जो सांप्रत विजय मिळविला आहे, त्याचा पाया अमेरिकेंतील डिक्सीया गांवीं अशा रीतीनें पडला.

अमेरिकेंतील युद्ध संपून कौंट झेपेलिन स्वदेशीं परत आले न आले, तोंच आस्ट्रो–प्रशियन युद्धास सुरवात झाली. १८६६ सालीं प्रशिया व आस्ट्रिया याजमध्यें झालेलें युद्ध थोड्या अवधींत संपून त्यांत आस्ट्रियाचा पूर्ण पराभव झाला. या युद्धांत कौंट झेपेलिन अव्वलपासून अखेरीपर्यंत कामगिरीवर होते. यानंतर १८७० सालीं जें जंगी फ्रांको–प्रशियन युद्ध झालें, त्यांत कौंट झेपेलिन हे प्रथम प्रसिद्धीस आले. १८७० सालच्या जुलई महिन्याच्या २४ साव्या तारखेस युद्ध पुकारले गेलें. त्याच दिवशीं कौंट झेपेलिन यांस शत्रूंच्या हालचालीची बातमी काढण्यासाठीं एका फ्रेंच प्रांतात पाठविण्यांत आलें होतें. यांजबरोबर दुसरे चार लष्करी अम्मलदार व सात शिलेदार होते. या प्रदेशांत जर्मन सैन्यानें तोंपर्यंत प्रवेश केलेला नव्हता. कौंट झेपेलिन यांजमध्यें ढळढळीत आढळून येणारा गुण झटला म्हणजे त्यांची निधडी छाती हा होय. त्यांच्या साऱ्या आयुष्यक्रमांत याच गुणाचें आविष्करण सर्वत्र दिसून येतें. शत्रूच्या मुलखांत कसले प्रसंग येण्याचा संभव आहे, याजबद्दल यत्किंचितहि फिकीर न करतां ते त्या फ्रेंच प्रांतांत एकदम घुसले. जर्मन टेहळ्यांचा प्रवेश झाल्याची बातमी फ्रेंच सैन्यांत ताबडतोब पसरली. या जर्मन स्वारांस ठार करण्याकरता अथवा जिवंत धरून आणण्याकरतां एका फ्रेंच तुकडीची रवानगी झाली. जरूर असलेली माहिती मिळवून जर्मन टेहळ्यांचें हें पथक स्वदेशीं जाण्याकरतां परत फिरतें न फिरतें, तोंच सरहद्दीवरील एका खेड्यांत फ्रेंचांच्या तुकडीनें त्यांस गांठलें. या चकमकींत झेपेलिन याच्या घोड्यास जखम झाली. ताबडतोब पायउतार होऊन झेपेलिन यांनीं आपल्या शत्रूवर तरवारीचा असा सपा-

ट्याचा वार केला कीं, तो तावडतोब आपल्या घोड्यावरून जमिनीवर आदळला. क्षणार्धांत झेपेलिन यांनीं त्याच्याच घोड्यावर उडी मारून त्याला टांच दिली. वाटेंत असलेलीं वुइसेनबर्ग, ओर्थ आणि दुसरीं कित्येक खेडीं झपाट्यानें मागें टाकून जर्मन टेहळ्यांचे हे छोटेंसे पथक रीशॉफ गांवीं पोहोंचलें. या ठिकाणीं दुसरी एक फ्रेंचांची तुकडी त्यांस भेटली. या दुसऱ्या चकमकींत लेफ्टनंट वुइन्स्लो नांवाचा एक लष्करी अम्मलदार बंदुकीस बळी पडला. फ्रांको-प्राशियन युद्धांतील हा पहिला जर्मन बळी होय. बाकी उरलेल्या अम्मलदारांस व शिलेदारांस फ्रेंच टोळीनें घेरलें. याहि वेळीं शत्रूच्या एका स्वाराला आपल्या तरवारीचें पाणी पाजून व त्याच्याच घोड्यावर स्वार होऊन शत्रूच्या फळींतून कौंट मोठ्या मुष्किलीनें बाहेर पडले. त्याच्याबरोबरचे सर्व लोक शत्रूच्या हातीं सांपडले. फ्रेंच घोडेस्वारांनीं आजूबाजूला सर्व प्रदेश त्रिखंड शोधिला; पण झेपेलिनचा पत्ता त्यांस लागला नाहीं. शत्रूंच्या हालचालीच्या महत्त्वाच्या बातम्या मिळवून झेपेलिन स्वसैन्यांत सुरक्षित दाखल झाले. या युद्धांत झेपेलिन यांनीं त्यांगला पराक्रम गाजविल्यामुळें त्यांस भराभर बढती मिळून युद्ध संपलें, त्या वेळों ते कर्नलच्या हुद्यावर होते. युद्ध संपल्यानंतर एका तुकडीच्या अधिपतीचें काम त्यांस मिळालें. यानंतर कांहीं दिवस किल्लेदाराचें काम केल्यावर बर्लिन येथील मुख्य अधिकारी सभेंत ते वर्टेंबर्गतर्फे प्रतिनिधि होते. १८९१ सालीं सैन्यांतील नौकरी यांनीं सोडली, तेव्हां ते घोडेस्वारांचे सेनापति होते.

आकाशसंचाराची हौस कौंट झेपेलिन यांस प्रथमपासूनच होती. इच्छेस येईल तिकडे आकाशांतून संचार करण्यास समर्थ असें एकादें यान बांधण्याचा त्यांचा पुष्कळ दिवसांचा हेतु होता. १८९२ सालीं या दिशेनें त्यांनीं आपल्या उद्योगास सुरवात केली. वास्तविक पहातां धाडसाच्या उद्योगांत हात घालण्याचे त्यांचें आतां वय नव्हतें; पण एकाद्या तरुण बांडास शोभेशा उमेदीनें यंत्रशास्त्र, विद्युत्शास्त्र, हवामापनशास्त्र इत्यादि शास्त्रांचा अभ्यास त्यांनीं केला. आपला हेतु काय आहे, हें त्यांनीं या वेळीं स्वतःच सांगितलें होतें. ते म्हणालेः—

" मनुष्याला वाहनाच्या सामान्य साधनानें जेथें पोहोंचणें शक्य नसतें, अशा जागीं जाण्यासाठीं एकादें वाहन बांधण्याचा माझा विचार आहे. मनुष्याला अद्यापि अज्ञात असलेले किनारे अथवा पृथ्वीचे अंतरभाग शोधून काढण्यासाठीं अशा प्रकारचें एकादें वाहन हवे आहे. समुद्र अथवा जमीन उल्लंघून सरळ रेषेनें या वाहनांतून जातां आलें पाहिजे. बरोबर मनुष्ये अथवा खलिते घेऊन सैन्यांतील एका तुकडीची बातमी दुसऱ्या कोणत्याहि तुकडीस कितीहि अतरावर पोचविण्याचें काम यांनीं केलें पाहिजे. शत्रूंच्या सैन्याच्या अथवा आरमाराच्या हालचालींचें निरीक्षण त्यांतून करतां आले पाहिजे. एकाच वेळीं हें विमान कित्येक दिवसपर्यंत हवेत तरतें राहिले पाहिजे. नवीन साठा घेण्यासाठीं खालीं येण्याचें कारण त्यास पडूं नये. तसेंच ठरलेल्या मुदतींत विशिष्ट ठिकाणीं पोंचण्याइतकी त्याची चाल जलद असली पाहिजे. सामान्य हवामानात खालीं चढून पुन्हा वर चढणें व प्रवास करणे या क्रिया होत असता त्यांत कसलीहि अडचण उपस्थित न होईल अशी या यानाची रचना असली पाहिजे. "

झेपेलिन यांचे हे विचार प्रसिद्ध झाल्याबरोबर साऱ्या जर्मनींत मोठी चळवळ उडाली. शास्त्रनिपुण लोकांसहि या विचारास प्रत्यक्ष स्वरूप येईल असें वाटलें नाहीं. यामुळे कौट झेपेलिन हे एक थट्टेचा विषय होऊन बसले. वृद्धापकाळामुळे कौटचे मन अस्थिर झालें असावें असें वाटून कित्येकांस त्यांची दयाहि आली. झेपेलिन यांस म्हातारचळ लागला असावा, असे कित्येक म्हणू लागले. या वेळीं आपले सर्वस्व गहाण लावून देऊन त्यावर पांच हजार पौंडांची रक्कम झेपेलिन यांनी एका अमेरिकन लखपतीजवळ मागितली होती. यावर त्या लखपतीने उत्तर दिलें, ' अर्धवट मेंदूच्या व स्वप्नसृष्टींत भटकणाऱ्या मूर्खांच्या नादीं मी लागत नसतो. ' अशा प्रकारे सर्वत्र थट्टा होत असतांहि कौंट आपला उद्योग करीतच होते. हळू हळू त्याची स्वकष्टार्जित व वडिलोपार्जित मिळकत गडप होत चालली. एकामागून एक नमुन्याचीं यानें बांधण्याचा व मोडण्याचा त्यांचा क्रम चालूच होता. उपपत्तीच्या दृष्टीनें हीं

यानें ठीक दिसावीं व प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळीं तीं कुचकामी ठरावीं असें होऊं लागलें. असा प्रकार अनेक वेळां घडल्यामुळें कौंटचे जे थोडेसे खेही व चहाते उरले होते, तेहि आपला पाय हळू हळू मागें घेऊं लागले. सरकारी विमानखातें त्यांजकडे बिलकुल लक्ष देईनासें झालें. वर्तमानपत्रांत लेख लिहून लोकांच्या मदतीची त्यांनीं मागणी केली. अखेरीस निःसंशय यश येईल, असें ते लोकांस सांगूं लागले; पण कोणासहि त्यांचा भरंवसा वाटेना. पण फ्रेंच सैन्याची फळी फोडणाऱ्या या बहाद्दरानें अशा स्थितींतहि मागें पाऊल घेतलें नाहीं. निराशा, अपयश आणि लोकांची चेष्टा हीं कौंटच्या अंगवळणीं पडल्यासारखीं झालीं. लोक जों जो चेष्टा करीत तों तों त्यांचा हुरूप आधिकच वाढे. अखेरीस येन केन प्रकारेण त्यांनीं तिसरें झेपेलिन बांधण्यापुरता पैसा गोळा केला. आणि १९०७ सालाच्या उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत या विमानांतून त्यांनीं सहा वेळ उड्डाण केलें. अखेरच्या खेपेस सुमारें आठ तास हवेंत तरतें राहून व २०० मैलांवर प्रवास करून ते सुखरूपपणे परत आले, तेव्हा साऱ्या देशभर मोठी खळबळ उडून गेली.

बर्लिनमध्यें कौंटच्या शत्रूंचा पक्ष इतका काळ मोठा प्रबळ होता; पण या उड्डाणानंतर तो पक्ष संपुष्टांत येत चालला आणि अखेरीस झेपेलिन विमानांच्या यशस्वितेबद्दल खुद्द जर्मन सरकारची जेव्हा खात्री झाली, तेव्हां तर हा पक्ष नामशेषच झाला. सरकारनें हे नंबर ३ चे विमान विकत घेतलें व आणखी प्रयोग करण्याकरतां २५००० पौंडांची रक्कम कौंट झेपेलिन यास देण्याचें मजूर केलें. याहूनहि अधिक लागणारें द्रव्य मिळविण्याकरतां कौंट यांस सोडत काढण्याचा परवाना पार्लमेंटने कायदा पास करून दिला. यानंतर कौंट यांचे प्रयोग पुन्हा सुरू झाले व पुन्हा अपयशाशीं त्यांस झगडावें लागलें. १९०८ सालीं आगष्ट महिन्यात त्यांनीं नवें व मोठें बांधलेले यान झेपेलिन नं. ४ हें फुटलें त्या वेळीं त्यांचा अपयशाचा जणूं कळसच झाला. हें यान उत्तरेकडून निघून कान्स्टन्स सरोवराकडे जाणार होतें; पण तें मुक्कामास न पोहोंचतां वर्टेंमबर्ग संस्थानांतील एक्टरडिनजेन गांवच्या मैदानांत फुटून पडलें;

पण या वेळीं झेपेलिन विमानांच्या यशस्वितेबद्दल जर्मनराष्ट्राची इतकी खात्री झाली होती कीं, हा अपघात एखाद्या राष्ट्रीय आपत्तीसारखा त्यास जाणवला. झेपेलिन यांस आणखी मदत करण्याचा निश्चय लोकांनीं केला. या वेळीं जर्मन जनतेच्या औदार्यास जणूं काय महापूर आला होता. केवळ सहा आठवड्यांच्या अवधींत लोकांच्या वर्गणीनें जमलेली ४५००००० रुपयांची रक्कम कौंट झेपेलिन यांच्या हातीं पडली. पैशाची तजवीज काय करावी, अशी जी भीति कौंट यांस एकसारखी भेडसावीत होती, ती आतां अखेरची दूर झाली. कान्स्टन्स सरोवराकांठीं असलेल्या फ्रेड्रिकसेव्हन गांवीं झेपेलिन यानें बांधण्याकरतां त्यांनीं एक गोदी उभारली. अत्यंत प्रचंड आकाराची झेपेलिन–आकाशनौका–या गोदींत एका महिन्यात तयार व्हावी अशा प्रकारची यंत्रसामग्री येथे आहे. एक्टरडिनजेन येथील अपघातानंतर आणखीहि पांच सहा आकाशनौकांस अपघात झाला; पण त्यांत कोणीहि मनुष्य दगावलें नाहीं. हे अपघात यांत्रिक कमतरतेमुळें घडून आले नसून पुष्कळ वेळां निष्काळजीपणामुळें व कित्येक वेळां इतर बाह्य कारणानीं घडून आले होते. १९०९ सालच्या वसतमासांत आणखी एका नव्या पद्धतीची आकाशनौका झेपेलिन यांनीं बांधली. कौंटच्या अंगांत काय कर्तबगारी होती. ती या नौकेनें सिद्ध करून सर्वांस आश्चर्यानें थक्क चरून सोडलें. ही नौका फ्रेड्रिकसेव्हन येथून निघून साक्सनी प्रातात गेली व तेथून पुन्हा वर्टेंमबर्गला परत आली. अशा रीतीनें एकसारखी ३८ तास हवेंत राहून तिनें एक हजार मैलांचा प्रवास केला.

कौंट झेपेलिन हे स्वभावानें अत्यंत नम्र व शालीनतेची केवळ मूर्ति आहेत. कीर्तीच्या व वैभवाच्या अत्युच्च शिखरावर आज ते आरूढ झाले आहेत; पण त्यांचा मार्ग त्यांस भयंकर अडचणींतून काढावा लागला आहे. ते मध्यम उंचीचे असून शरीरानें फार बांधेसूत व दिसण्यांत क्षात्रतेजानें युक्त असे आहेत. चोहोंकडून त्यांजवर स्तुतीचा वर्षाव होत असतां त्यांच्या नम्र स्वभावांत यत्किंचितहि फरक झाला नाहीं. गर्व त्यांस कधीं शिवलाहि नाहीं. स्टट्गार्ट गांवीं एकाद्या सामान्य मनुष्याच्या पद्धतीनें ते

रहात असतात. नवी नौका तयार झाली झणजे तिच्या पहिल्या उड्डाणाचे बेळीं सुकाण्याचें काम अद्यापीहि ते स्वतःच करतात. स्वतःच्या नांवाची टिमकी ते कधींहि वाजवीत नाहींत. या बाबतींत लॉर्ड रॉबर्टस यांजसारखीच यांची वागणुक आहे. 'आपलें खरें राहाण्याचें ठिकाण मेघ लोक हेंच आहे' असें ते झणत असतात. ते कधीं काळीं बर्लिनला गेले, तर तो दिवस सार्वजनिक उत्सावाप्रमाणें गाजला जातो; पण युद्धखातें किंवा आरमारी खातें यांच्याशीं कांहीं जरूरीचें खलबत करणें असेल, तर तेवढ्यापुरते ते राजधानीला जाऊन येतात. एका कन्येवाचून त्यांस दुसरी संतति नाहीं. तिचा विवाह बर्लिन येथील एका लष्करी अम्मलदाराशीं झाला आहे. आकाश-नौका-नयनाच्या कलेंत तीहि अत्यंत प्रवीण असून नव्या नौका बांधण्याच्या कामात आपल्या वडिलांस ती पुष्कळ मदत करीत असते. झेपेलिन नौकांची बांधणी व तींतील संचार यंत्रें यांची उत्तम माहिती तिला आहे. कौंट झेपेलिन यांचा एकंदर आयुष्यक्रम एकाद्या मनोराज्यासारखा भासतो; पण अद्यापीहि त्यांचें एक मनोराज्य अपूर्णावस्थेंत आहे. वृद्धापकाल प्राप्त होण्यापूर्वी उत्तर ध्रुवाकडे प्रवास करून तिकडील अज्ञात प्रदेशाचा शोध लावावा. असा त्यांचा बेत आहे. सरकार आणि लोकमत यांचा पूर्ण पाठिंबा यांस आहे, हें सांगावयास नकोच. या दिशेनेंहि त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे. आणखी थोड्याच वर्षांच्या अवधींत महासमुद्रांचें उल्लंघन करून झेपेलिन आकाशनौका एका देशाहून दुसऱ्या देशीं सुखरूप प्रवास करतील असें झणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

क्रप फाँ बॉह्लेन.

तुर्की बाल्कन युद्धांत बाल्कन संस्थानच्या फौजा तुर्कीचा चक्काचूर करून त्यांस आशियाखंडाकडे एकसारख्या रेटीत सुटल्या, त्या वेळीं तुर्कीच्या या अपयशाचें खापर क्रपच्या तोफखान्यांवर फोडण्यांत आलें. क्रपनें पुरविलेला

तुर्की तोफखाना अयशस्वी झाल्यामुळें तुर्कांचा खुर्दा उडाला, असें साऱ्या युरोपचें—किंबहुना साऱ्या जगाचें—मत झालें. या मुद्यावर मत भेद होण्याचा पुष्कळ संभव आहे; तथापि एक परिणाम मात्र या वेळीं विशेषेंकरून दृष्टीस पडला. तो हा कीं, युरोपच्या असल्या टीकेनें जर्मन राष्ट्रांत अत्यंत विषाद उत्पन्न झाला. जर्मनींत तयार झालेल्या वस्तूंवर अनेकांनीं अनेक प्रकारच्या टीका आजपर्यंत केल्या असतील; पण या वेळीं जर्मन राष्ट्राला जें दुःख झालें, तसे तें या पूर्वी केव्हाहि झालें नसेल. क्रपचा कारखाना हा जर्मन राष्ट्राच्या अभिमानाचा विषय आहे. होहेनझोलार्न घराण्याबद्दल जी पूज्यबुद्धि व जो आदर जर्मन राष्ट्राच्या मनांत वसत आहे, तितकाच तो क्रपच्या कारखान्याबद्दलहि आहे. त्या कारखान्याची निंदा करणें, ह्मणजे सर्व राष्ट्रावर शितोडा उडविणे होय, असें त्यांस वाटतें. कारखान्याच्या कीर्तीला जो हा डाग क्षणैक लागला आहे, तो लवकरच पुसून जाईल यांत संशय नाहीं.

लुलेबर्गास आणि कर्क किलेसी या लढायांतील तुर्कांचा पराभव जर्मन तोफखान्यामुळें झाला, हें तज्ज्ञाचें ह्मणणें खरें असेल, तर जगांतील बावन युद्ध खातीं अर्ध्या शतकभर एक मोठी चूक करीत आहेत, असें ह्मणणें भाग पडते. इतक्या युद्ध खात्यांनीं आजपर्यंत तीस हजारावर प्रचंड क्रप तोफांची खरेदी केली आहे. क्रपच्या तोफांना आश्रयदाते युरोपांतील तेवीस राष्ट्रे असून यांशिवाय अमेरिकेतील १८, आशियांतील ६ आणि आफ्रिकेतील पांच राज्यें या तोफा खरेदी करीत आहेत. खुद्द जर्मन राष्ट्राची खरेदी या सर्वांहून मोठी असल्यामुळें जर्मनी इतक्या मूर्खांच्या शिरोभागीं आहे, असें ह्मणणें भाग पडतें. एवढ्या मोठ्या राष्ट्रसंघास मूर्खांचा बाजार ह्मणणें धाष्टर्याचें नव्हे काय?

१८५१ सालीं लंडन येथें एक मोठें प्रदर्शन भरलें होतें. या प्रदर्शनांत व्हाईन नदीकांठच्या एका अप्रसिद्ध कारखानदारानें सहा पौंडांचा गोळा फेंकणारी एक तोफ मांडली होती. ही तोफ बनविण्याकरतां उपयोगांत आणलेल्या पोलादाचा गुण पाहून सर्व लष्करी लोक आश्चर्यानें थक्क

झाले. या वेळेपासून जर्मनीच्या लष्करी आणि आरमारी खात्यांनीं क्रपच्या तोफा घेण्यास सुरुवात केली. आजपर्यंत त्यांनीं सुमारें २९००० तोफांची खरेदी केलेली आहे. जर्मन राष्ट्र एखाद्या युद्धात पडलें, तर मेट्झ आणि कॉनिग्जबर्ग येथील बुरुजांवरून कडकडणारा क्रपचा तोफखाना, भेदरलेल्या अ णि अशिक्षित तुर्कांच्या तोफखान्याहून निराळ्याच प्रकारची कर्तबगारी दाखवील. अशा प्रचंड युद्धाच्या वेळी जर्मन तोफखान्याच्या मागे खरे मर्द सज्ज असल्याचे दिसून येईल.

तुर्को बाल्कन युद्ध संपल्यानंतर वुइलियम बादशाहाच्या जन्म दिवशीं क्रपच्या कारखान्याचा वाढदिवस साजरा करण्यांत आला. या वेळीं या कारखान्यांतील निरनिराळ्या शाखाचे मुख्य अधिकारी व एंजिनियर मिळून दोन तीन हजार लोकांचा समुदाय जमला होता. यांत एक अत्यंत विनयशील व दिसण्यांत सरदारी रुबाबाचा असा एक तरुण पुरुष आला होता. मुख्य वक्तयाचे काम त्या दिवशीं या तरुण पुरुषाकडेच होतें. तो ह्मणाला, "क्रपचा तोफखाना आणि क्रपची एकंदर कारागिरी यांजबद्दल चोहोंकडून सध्यां प्रतिकूल टीका करण्यांत येत आहे. असल्या दंतकथांवर विश्वास ठेवणारा तुह्मामध्यें एक तरी आहे काय ? क्रपचा तोफखाना समागमें घेऊन रणमैदानांत उतरणे भाग पडेल, तर जगांतील कोणत्याहि शत्रुविरुद्ध तसे करण्यास माझी तयारी आहे, व तशीच ती तुह्मां सर्वांची असेल, याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. आपण ज्या कांहीं कारागिरीच्या वस्तु तयार केल्या आहेत, त्या वस्तु जणू काय आमच्या प्रत्यक्ष देहाचे भागच आहेत व त्यांजबद्दल आपणां सर्वांस अत्यंत अभिमान आहे हे मला पक्के माहीत आहे." या वक्त्याचें नांव डॉ. गस्टाव्ह क्रप फॉं बॉह्लेन ॲंड हॉलबॅक असें होते. क्रपच्या कारखान्याची एकटीच मालकीण बर्था क्रप हिच्याशीं यांचा विवाह झालेला आहे.

एवढ्या मोठ्या कारखान्याच्या मालकिणीचे हे गृहस्थ यजमान आहेत एवढ्यावरच त्यांची सांप्रतची कीर्ति अवलंबून नाहीं. साऱ्या जर्मनींतील अत्यंत श्रीमान् ह्मणून नांवाजलेल्या घराण्याशीं यांचा शरीरसंबंध झाला,

हें त्यांच्या कीर्तीचें कारण नव्हे. डॉ. क्रप फॉं बोहलेन हे क्रपच्या कारखान्याच्या शिरोभागीं आज आहेत, याचें कारण शरीरसंबंध हें नसून त्यांच्या आंगचे गुणच कारण आहेत. पूर्वी परराष्ट्रीयखात्यांत हे एक कामगार होते. ही कामगिरी त्यांस वशपरंपरा प्राप्त झाली होती आणि तींतहि त्यांनीं चांगले यश मिळाविले होते. या नौकरीचा राजीनामा देऊन क्रप कारखान्याच्या शिरोभागीं ते आरूढ झाले आणि तेव्हांपासून या कामांतहि स्वतःच्या आंगची कर्तबगारी उत्तम प्रकारे त्यांनीं जगाच्या निदर्शनास आणली आहे. क्रपच्या कारखान्याच्या मालकाबद्दल जो आदर गेल्या तीन पिढ्या त्यांतील कामगारांच्या मनांत वसत आहे, तोच आदर त्या कारखान्यांतील पंचाहत्तर हजार कामगारांच्या व एकदरींत तीन लक्ष मनुष्यवस्तीच्या मनांत डॉ. क्रप फॉं बोहलेन यांजबद्दल आजहि दिसून येतो. पृथ्वीच्या कोणत्याहि भागांत जाण्याचे कारण डॉ. क्रप यांस पडलें, तर तीन लक्ष मनुष्यें डोळे मिटून त्यांच्या मागून जाण्यास सिद्ध आहेत.

उत्तर समुद्रापासून बर्लिनपर्यंत पसरलेल्या पश्चिम प्रशियांत ज्या कोणीं प्रवास केला असेल, त्यांना तेथील धुराड्यांचे अरण्य आणि हजारों धूर सोडणाऱ्या लहान लहान नळ्या आठवत असतीलच. रूर नदीच्या खोऱ्यांत असलेल्या एसेन गांवीं या प्रचंड कारखान्याची उभारणी झाली आहे. मुख्य कारखान्यानें १२०० एकर जागा व्यापली असून त्यांपैकीं २३५ एकरांवर कारखान्याच्या इमारती बांधलेल्या आहेत. इंग्लंडांत शेफिल्ड आणि अमेरिकेंत पिट्सबर्ग हीं दोन शहरें लोखंडाच्या कारखान्याबद्दल नांवाजलेली आहेत. हीं दोन्ही शहरें जणूं काय एकत्र होऊन जोडीनेंच एसेन गांवीं अवतीर्ण झालीं आहेत कीं काय, असा भास होतो. क्रप कंपनीचा फक्त एसेन येथील कारखानाच एवढा मोठा आहे. याशिवाय पेमेन येथें १५ मैल लांबीची जागा या कंपनीच्या ताब्यांत असून तेथें तोफाचा पल्ला अजमाविण्यांत येत असतो. या ठिकाणीं ३९००० लोक कामावर आहेत. तसेंच ॲनन् आणि ब्रुसन् येथें चिलखतांचें पोलाद करण्याच्या शाखा

असून त्या कारखान्यास लागणारा कोळसा त्यांच्या मालकीच्या खाणींतून घुरविला जातो. या खाणी व्हाइन नदीच्या कांठीं वेस्टफ्यालिया प्रांतांत असून याशिवाय सायलेशियांतहि कांहीं कांहीं खाणी या कपनीच्या मालकीच्या असून त्या सर्वांत मिळून दहा हजार कामकरी कामावर आहेत. लोखंडाचा रस करण्याच्या शाखा व्हीनहासन्, डुइसबर्ग, न्यूबीड, आणि एगर्स येथें असून यांत १५००० कामकरी आहेत. कील येथें क्रपची जर्मानिया नांवाची एक गोदी असून तिनें ५६ एकर जागा व्यापली आहे. या ठिकाणीं ६१०० कामकरी बेडर जहाजें, आगमाशांचीं जहाजें आणि पाणबुड्या बांधण्याच्या कामांत गुंतले आहेत. तसेंच जर्मनींत आणि स्पेनमध्यें कंपनीच्या मालकीच्या ज्या लोखडाच्या खाणी आहेत, त्यांत ५००० माणसें अशुद्ध लोखड खणण्याच्या कामावर आहेत. ही अशोधित धातु भट्टिवर आणण्याकरतां कंपनीनें स्वतःच्या मालकीच्या आगबोटी बांधल्या आहेत. ह्या आगबोटींतून अशोधित धातु प्रथम राटरड्याम येथें नेली जाते. या बंदरांतहि कपनीच्या मालकीची एक गोदी आहे. ही धातु राटरड्याम येथून भट्टिवर नेली जाते आणि पुढें कांहीं दिवसांनीं ती जहाजांचीं चिलखतें, वेढ्याच्या प्रचड तोफा आणि प्राणहारक गोळे इत्यादि जर्मन कारागिरीच्या रूपानें बाहेर पडते. क्रप कंपनीला कामगारांचा पगार वांटण्यास दरसाल साडेसात कोट रुपये लागतात.

डॉ. फाँ क्रप बॉहलेन यांनीं क्रपच्या मालकिणीशीं लग्न केलें, तेव्हां पोपच्या दरबारीं असलेल्या प्राशियन वकिलाचे ते चिटणीस होते. यांचें पूर्वीचें नांव डॉ. फाँ बॉहलेन अँड हॉलबॅक असें असून या तोफांच्या मालकिणीशीं त्यांचा विवाह झाल्यानंतर क्रप हें आणखी एक नांव जोडण्याची परवानगी बादशहांनीं त्यांना दिली. यापूर्वी अमेरिकेच्या वाशिंगटन राजधानींत असलेल्या जर्मन वकिलातींत व पेकीन येथील जर्मन वकिलातींत ते कामावर होते. त्यांचा जन्म शांतता पारिषदसंबंधानें सुप्रसिद्ध असलेल्या हेग शहरीं झाला. त्या वेळीं त्यांचें वडीलहि परराष्ट्रीय खात्यांत कामगार होते. डॉ. क्रप फाँ बॉहलेन यांचें वय सध्यां ४५

वर्षांचें आहे. त्यांच्या मातापितरांच्या द्वारें यांचा संबंध अमेरिकेशींहि पोहोंचतो. यांचीं मातापितरें फिलाडेलफिया येथें जन्मलीं होतीं. यांचे आजे हे युनायटेडस्टेटच्या सैन्यांत एक सेनापति होते. क्रुपच्या कारखान्याची मालकीण आपल्या आईबरोबर इटली देशांत प्रवास करीत असतां तिच्या लग्नाचा योग याच्यांशीं जुळून आला व १९०६ च्या आक्टोबर महिन्यांत एसेन येथिल क्रुपच्या बंगल्यांत त्यांचा विवाह झाला. या प्रसंगीं बादशहा स्वतः हजर होते आणि साऱ्या राष्ट्राच्या वतीनें त्यांनीं या जोडप्यास आशीर्वाद दिले. 'जर्मन राष्ट्राची सुरक्षितता आणि त्यांची भावी उत्क्रांति हीं क्रुपच्याच हातांत आहेत,' असे बादशहा या वेळीं ह्मणाले.

क्रुपच्या कारखान्याच्या तिसऱ्या पिढीचे (यांच्या पूर्वीचे) मालक फ्रेड्रीक आल्फ्रेड क्रुप हे अठेचाळीस वर्षांचे होऊन १९०२ सालीं वारले. यांना पुत्रसंतति नव्हती. यामुळे कारखन्याची मालकी त्यांची वडील कन्या बर्था इजकडे आली. त्या वेळीं कायद्याप्रमाणे ही मुलगी अज्ञान होती. हिच्या आईलाच हिचे पालक नेमण्यांत आलें होतें. १९०३ सालीं या कारखान्याचें स्वरूप पालटून त्याला संयुक्त भांडवलाच्या कारखान्याचें स्वरूप आलें. एकदर भागांपैकीं फक्त चार भाग खेरीज करून बाकीचे सर्व बर्था क्रुप हिच्या नांवाने नोंदण्यांत आले. हिची धाकटी बहीण बर्बरा हिला तिच्या बापाने स्वतंत्र उत्पन्न करून दिलें आहे. हें उत्पन्नहि पुष्कळ मोठे आहे; पण बर्था हिच्या उत्पन्नाच्या मानानें तें कांहींच नाहीं. बर्थाचें वार्षिक उत्पन्न सुमारें साडेसतरा कोट रुपयांजवळ असावे, असा अदमास आहे. उत्पन्नाच्या बाबतींत सुद्धां ती बादशहाहूनहि अधिक श्रीमंत आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

जर्मनींतील या अत्यंत श्रीमान घराण्याची राहणी मात्र अतिशयच साधी आहे. तींत भपक्याचा किंवा चैनीचा यत्किंचितहि समावेश झालेला नाहीं. मध्यम स्थितींतील हजारों जर्मन घराणीं यांच्याहून अधिक भपक्यानें वागत असतात. डॉ. क्रुप बॉहलेन व त्यांची पत्नी हीं उभयतांहि अत्यंत साध्या स्वभावाचीं असून क्रुपचा कारखाना ही एक पवित्र ठेव आपल्या ताब्यांत आली आहे, असें तीं समजतात. कारखान्यांतील मजुरां-

पैकीं जे कोणी आजारानें अथवा इतर कारणांनीं निकामीं होतील, त्यांच्या मदतीसाठीं त्यांनीं एक मोठा फंड उभारला असून त्यांत सदोदित भर टाकणें एवढेंच व्यसन या जोडप्यांस आहे. कारखान्यांतील कामगारांसाठीं स्वतंत्र वसाहती बांधण्याचें काम त्यांनीं सुरूं केलें असून त्यांच्या फुरसतीचा बराचसा वेळ या कामांत जातो. तसेंच पेन्शनांत गेलेल्या वृद्ध कामगारांसाठींहि स्वतंत्र घरें बांधण्याची व्यवस्था त्यांनीं केली आहे. एकदरींत स्क्रीडर–क्रूसो (फ्रान्स) व व्हिकर्स–म्याक्झीम्. (इंग्लड.) यांच्याशीं तोफांच्या बाबतींत चढाओढ करून अधिक श्रीमंत होण्यापेक्षां आपल्या कारखान्यांतील कामगारांची योग्य तरतूद करणे त्यांस अधिक श्रेयस्कर वाटतें. मोठमोठीं सरदार घराणींच काय, पण अनेक राजवाडेहि त्यांचा सत्कार करण्यास खुले होऊन बसले आहेत; पण हें जोडपें आपल्या कौटुंबिक सुखाचा त्याग करून कोठेंहि फार करून जात नाहीं. बर्लिन येथें मोठमोठे सरदार व घरंदाज यांचा समाज दरबारी उत्सवासाठीं जमला असतां, त्यांत हर्र आणि फ्राउ (मिस्टर आणि मिसेस) क्रप हें जोडपें फार करून आढळून यावयाचे नाहीं. फारच झालें, तर क्वचित् प्रसंगीं एकाद्या हवा खाण्याच्या ठिकाणीं थोडेसे दिवस ते जात असतें. जून महिन्यांत कील येथें जी नौकांची मोठी शर्यत होते, तिला मात्र हें जोडपें अवश्य हजर असावयाचें. या शर्यतींत बादशहांची नौका मिटिआर व क्रपची नौका जर्मानिया यांची चढाओढ मोठी प्रेक्षणीय असून तींत पुष्कळ वेळां बादशहांचा पराभव झाला आहे. समुद्रावर फिरण्याचा त्यांस मोठा शौक आहे, ही गोष्ट खरी; तथापि त्यांचा बहुतेक वेळ कारखान्यांतील कामदारांच्या व स्वतःच्या तीन मुलांच्या तैनातींतच जातो. याप्रमाणें हें जोडपें परोपकाराच्या कार्यांत सदोदित गुंतलें असतांहि स्वतःच्या कारखान्याच्या वाढीकडे त्यांनीं बिलकुल दुर्लक्ष केलेलें नाहीं. १९०८ सालीं हर्र क्रप फाँ बॉह्लेन यांनीं कंपनीचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. त्या वेळेपासून सकाळीं बरोबर नऊ वाजतां एकाद्या सामान्य कामगाराप्रमाणें ते आपल्या ऑफिसांत हजर होतात. दुपारचे बारा वाजेपर्यंत कारखान्यांतील मुख्य अधिकाऱ्यांच्या भेटीचे काम चालू असतें. कारखान्यांतील


सर्व घडामोडीची यत्तावत् माहिती ते रोज मिळवित असतात. पोलाद बनविण्याच्या कृतींतील सर्व बारीकसारीक खुब्या ते उत्तम प्रकारें जाणतात. कारखान्यांत बऱ्याच सुधारणा स्वतःच्या अक्कलहुशारीनें त्यांनीं घडवून आणल्या आहेत. तोफा व चिलखते तयार करण्याच्या कलेंत फ्राउ क्रप यांहि तरबेज आहेत. या कलेत त्यांच्या वडिलांनीं त्यांस उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें होते. त्याहि रोज कारखान्यांत जात असतात, आणि कित्येक वेळां आपल्या पांच वर्षांच्या मुलाला हातीं धरून त्याला कारखाना दाखवीत त्या फिरतात. क्रपच्या कारखान्याचे भावी मालक म्हणजे हे छोटे गृहस्थ अशा रीतीने आतांपासूनच आपल्या भावी उद्योगाची ओळख करून घेत आहेत. कारखान्याच्या डायरेक्टरांच्या सभेंतहि फ्राउ फॉ बॉह्लेन कित्येक वेळां हजर असतात व कित्येक वेळां अशा कांहीं मार्मिक सूचना करतात कीं, स्वतःच्या धंद्यांत निष्णात असलेल्या डायरेक्टरांसहि त्यांच्या बुद्धिमत्तेचें मोठें आश्चर्य वाटतें.

फ्राउ क्रप यांस त्यांच्या वडिलांकडून जसें धंद्यातील शिक्षण उत्तम मिळालें, तसेंच त्यांच्या आईकडून घरगुती शिक्षणहि त्यांस उत्तम मिळालें असून घरधनीण कशी असावी याचा नमुना त्यांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष पहाण्यास सांपडतो. स्त्रियांस मतांचा आधिकार असावा, असल्या प्रकारच्या अलीकडच्या चळवळींत त्या कधींहि पडत नाहींत. तसेंच नटून, मुरडून गांवभर भटकत फिरण्याचा शोकहि त्यांस नाहीं. गांवांतल्या उठाठेवी करण्यापेक्षां अथवा स्त्रीस्वातंत्र्याच्या वगैरे चळवळी करण्यापेक्षां रिकामा वेळ आपल्या मुलांच्या संगतींत घालविणें व त्यांस शिक्षण देणें हेंच त्यांना अधिक आवडतें. खुद्द एसेन गांवींहि होणाऱ्या सार्वजनिक समारंभांस त्या फार करून हजर रहात नाहींत. आपल्या वडिलांचा वाढ दिवस अद्यापीहि मोठ्या समारंभानें त्या साजरा करीत असतात. कारखान्यांत ज्यांची नौकरी पुरी २५ वर्षें झाली असेल अशा लोकांना या दिवशीं शेला, पागोटीं त्या देत असतात. दर वर्षीं असे ग्राहक सुमारें चारशें असतात. या सर्वांशीं हास्तांदोलन करून त्यांस पारितोषिकें देण्याचा

त्यांचा परिपाठ आहे. स्वतःच्या कारखान्यांतील मजुरांचें हित चिंतणें हा त्यांचा एक धर्मच होऊन बसल्यामुळें कारखान्यांतील लोकांचेंहि त्यांजवर मातेप्रमाणें प्रेम जडलें आहे.

क्रपच्या राहत्या घराचें नांव व्हिला ह्युजेल असें असून त्यांत चैनीच्या वस्तूचा समावेश केल्याचें कोठेंहि आढळून येत नाहीं. यांच्या घरीं येणारे सर्व पाहुणे यांच्या साध्या रहाणीनें चकित होतात. तथापि प्रापंचिक सुखाचा इतका उत्तम नमुना आपणास दुसऱ्या कोठें आढळला नाहीं, असेंहि ते ह्मणतात. चैनीचा व भपक्याचा इतका विलक्षण सुकाळ साऱ्या जगभर झाला असतांहि अगदीं साध्या रहाणीनें जगाला ललामभूत होणारीं माणसें अद्यापि थोडीं तरी आहेत, असे या कुटुंबावरून आढळून येते. श्रीमंती आणि दुर्व्यसनें यांचा संबध जगाच्या आरंभापासून नित्य आढळून येत आहे; परंतु श्रीमंतीचा सदुपयोग केल्याचीं जीं थोडींशीं उदाहरणें आढळून येतात, त्यांतच या कुटुंबाची गणना करणें भाग आहे.

फाँ डर गोल्डज्.



आपल्या सैन्याचें बळ वाढविण्याकरतां जर्मनी सव्वा पांच कोट पौंड दरसाल खर्च करतो. या द्रव्यनिधीचा मुख्य प्रवाह पूर्व सरहद्दीवरील ठाणीं बळकट करण्याकडे होत आहे. युरोपांत स्लाव्ह वंशानें अधिराज्य मिळवावें, कीं, या खंडाचें पुढारीपण जर्मन वंशाच्या हातीं जावें, याचा निकाल लवकरच केव्हां तरी लागणार असून त्यासाठीं ही सारी तयारी आहे. रशिया, फ्रान्स, बल्गेरिया, ग्रीस, सर्व्हिया आणि मॉंटेनिग्रो इतक्या राष्ट्रांच्या सैन्याशीं तोंड देण्यास समर्थ असें सैन्य जर्मनी आणि आस्ट्रिया-हंगारी या दुकलीनें अथवा त्रयीनें उभारणें अत्यंत आवश्यक आहे, असा समज साऱ्या जर्मनींत झालेला आहे. नवा बाल्कनसंबंध निर्माण होण्यापूर्वी आस्ट्रियाचें सैन्य रशियास पुरें पडण्याइतकें होतें, व जर्मनीवर फक्त

पश्चिम सरहद्दीचीच जबाबदारी येईल, असा समज होता; पण यानंतर ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या, त्यामुळें पूर्व युरोपातील सामर्थ्याचें केंद्र बदललें. लष्करीदृष्ट्या आस्ट्रियाची जी मदत जर्मनीला झाली असती, तिच्यांत नव्या परिस्थितीमुळें निदान शेंकडा चाळीस या प्रमाणाने उणीव आली. बाल्कनसंघ आस्ट्रो-जर्मनांच्या विरुद्ध गेला, तर रशिया आणि फ्रान्स या दोन्ही सरहद्दी सांभाळण्याचे काम एकट्या जर्मनीवरच पडणार आहे.

स्लाव्ह कीं टयूटन? या प्रश्नाचा निकाल लागण्याची वेळ येईल, त्या वेळीं त्या रणयज्ञांत फिल्ड मारशल जनरल ब्यारन फॉं डर गोल्डज् यांस बहुधा अध्वर्युत्वाचा मान मिळेल, असा बराच संभव आहे. तुर्कीचें सैन्य गोल्डज् यांच्या हातीं तयार झालें होतें व गेल्या तुर्को-बाल्कन युद्धांत तुर्कांची जी दुर्दशा झाली, ती पाहून या सेनानायकाच्या कौशल्याबद्दल पुष्कळांचीं मनें साशंक होतीं, यांत संशय नाहीं. गोल्डज्पाशाच्या कीर्तीला कर्ककिलेसी आणि लुलेबर्गास येथें कायमची मूठमाती मिळाली, असा समज सर्वत्र पसरला आहे. बाल्कन युद्ध संपल्यानंतर निंदेने भरलेलीं जीं अनेक पत्रें गोल्डज् यांस आलीं, त्यांवरून निंदकांत पुष्कळसे त्यांचे देशबांधवहि आहेत, हें उघड सिद्ध होतें; तथापि जर्मनीच्या लष्करी-खात्यावर मात्र या गोष्टीचा कांहीं परिणाम झाला आहे, असे दिसत नाहीं. नंबर २ च्या सैन्याची पाहणी करण्याचें इन्स्पेक्टर जनरलचें काम अद्यापीहि फॉं डर गोल्डज् यांजकडे आहे. साऱ्या जर्मन सैन्यांत गार्डस्चें पथक अत्यंत श्रेष्ठ समजलें जातें. या पथकाची पाहणीहि गोल्डज् हेच करीत असतात. जनरल गोल्डज् हे तोंडाचे थोडेसे फटकळ असल्यामुळे बादशहांची मर्जी त्यांजवर फारशी फिदा नाहीं. अशा स्थितींत त्यांची अपकीर्ति पसरली असतांहि एवढ्या महत्त्वाच्या जागीं अद्याप ते काम करीत आहेत, यावरूनच त्यांची योग्यता सिद्ध होते. विस्तुला नदी उतरण्याचा प्रसंग प्राप्त झाल्यास, आघाडीच्या घोड्यावर गोल्डज्पाशाची स्वारी विराजमान होईल, असा पुष्कळांचा समज आहे. जर्मनीच्या सेनानायकांच्या शिरोभागीं बसण्यास तेच योग्य आहेत, ही जाणीव सामान्य जर्मन राष्ट्राच्या मनांतून अद्यापि नाहींशी झालेली नाहीं.

१९०२ आणि १९०७ या दोन सालाच्या दरम्यान प्रशियन सरहद्दीवरील कोनिग्जबर्ग येथील सैन्यावर ते मुख्य अधिपति होते व त्या वेळीं त्या सैन्याची जी व्यवस्था त्यांनीं लावली, ती त्यांच्या कीर्तीस प्रथम कारणीभूत झाली. हे पूर्व प्रशियांतील रहिवाशी असल्यामुळें तेथल्या सैन्याचें आधिपत्य त्याना स्वतःला प्रिय होतें आणि तसेंच त्या प्रदेशाची सर्व बाबींची माहिती त्यांना असल्यामुळे सर्वांशीं सहकारितेनें त्यांस आपले हेतु पार पाडतां आले. कोनिग्जबर्ग येथील सैन्याची तयारी किती जय्यत आहे, याची खुलासेवार माहिती अर्थातच गुप्त राखण्यांत आली आहे; तथापि ती तयारी अत्युत्कृष्ट आहे, याबद्दल मात्र सर्वांची खात्री आहे. जनरल गोल्डज् हे प्रतिभावान् आणि स्वतंत्र विचाराचे शिपायी गडी असल्यामुळें या सरहद्दीवर त्यानीं केलेली तयारी शत्रु व मित्र या दोघांलाहि प्रसंगविशेषीं चकित करून सोडील यांत शंका नाहीं. पूर्वी कोणाच्या ध्यानांतहि आली नसेल, इतकी ती तयारी अप्रतिम आहे, असें पूर्व प्रशियांतील सामान्य लोकमत आहे. सैन्याच्या व्यूहरचनेच्या शास्त्रेंत गोल्डज् हे पहिल्या प्रतीचे सेनापति आहेत व त्यांच्या कौशल्याचें पुरें तेज पडण्यास कोनिग्जबर्ग ही योग्य रणभूमि आहे. या सरहद्दीवर होणाऱ्या युद्धांत निरनिराळ्या हालचालींचें लष्करी महत्त्व काय आहे, याची माहिती सर्व सैन्यास करून देण्याची खटपट त्यांनी प्रथम केली. शिपायी होणें म्हणजे नुसते खेळाचें काम नसून प्रत्येकाने आंग मोडून मेहनत केली पाहिजे, हें तत्त्व त्यांनीं सर्व अम्मलदारांच्या व शिपायांच्या गळीं उतरविले. या बाबतींत स्वतःच्याच उदाहरणाने त्यांनीं धडा घालून दिला. सैन्याच्या हालचाली होत असता त्यासंबंधीं ते जीं सूचनापत्रें काढीत, तीं लष्करी माहितीनें पूर्ण भरलेलीं असत. प्रत्येक वेळीं कांहीं तरी नवा धडा त्यांजकडून शिपायांस मिळत असे. गोल्डज् यांच्या हाताखालीं तयार झालेला अम्मलदार म्हणजे लष्करी विद्येंतला मुरब्बी असा त्यांचा लौकिक पसरला आहे.

गोल्डज् याचें वय सुमारें ७३ वर्षांचें असून त्यांपैकीं पन्नासापासून अधिक वर्षें त्यांनीं स्वारीशिकारींत, लष्करी कामांत व लष्करी ग्रंथरचनेंत

घालविलीं आहेत. खऱ्या शिपाई बाण्याचा गडी कसा असावा हें फिल्ड मारशल कौंट फाँ हेसेलर यांजपासून आपण शिकलों, असें गोल्डज् म्हणत असतांत. कौंट हेसेलर हेहि एक नाणावलेले सेनापति असून अद्यापि ते हयात आहेत. गोल्डज् यांची नेमणूक पूर्व प्रशियांत झाली असतां हेसेलर हें फ्रेंच सरहद्दीवरील सैन्य अजिंक्य करण्याच्या तयारींत गुतले होते. फ्रांको—प्रशियन युद्धाच्या वेळीं प्रिन्स फ्रेडरिक कार्ल यांच्या सैन्याचें आधिपत्य हेसेलर यांजकडे होते व जनरल गोल्डझ् हे त्यांच्या हाताखालीं दुय्यम अधिकारी होते. त्या वेळीं आपल्या हाताखालच्या या तरुण अम्मलदारास हेसेलर एकदां म्हणाले, " मनुष्यें आणि जनावरें यांच्या अगांत गुप्त कर्तबगारी किती असते, हें तूं येथे शिकून घे. या माहितीचा तुला पुढें उपयोग होईल. " त्या वेळच्या युवराजाच्या सैन्यांत यांची महत्त्वाच्या जागीं नेमणूक झाली असता, आपणास सैन्याच्या हालचालीचा विलक्षण युद्ध चमत्कार पहावयास सांपडेल, असें त्यांस वाटत होतें. या-संबधीं गोल्डज् स्वतःच एके ठिकाणी म्हणतातः—" तुमच्या लष्करी उपपत्तीपेक्षां माणसें आणि घोडीं यांचे गुप्त सामर्थ्य काय आहे, हें पक्कें माहीत असणें अधिक महत्त्वाचें आहे. ही गोष्ट या वेळेपर्यंत माझ्या लक्षांत आली नव्हती. एकाद्या अम्मलदारानें सकाळीं चार तास व दुपारीं तीन तास नोकरी केली म्हणजे त्याचें मुख्य कार्य संपलें, असा माझा समज होता. इतकी नौकरी बजावल्यानंतर दुसऱ्या कांहीं करमणुकींत वेळ घालविण्याचा हक्क अम्मलदारांना आहे, असा माझा समज होता; पण कौंट हेसेलर यांच्या हाताखालीं काम करूं लागल्या-पासून हा माझा समज बदलला. कौंटसाहेब झोंप केव्हां घेतात, आणि जेवणखाण तरी केव्हां उरकतात, हेच मला समजेना. मग करमणुकीची गोष्ट तर बोलावयासच नको.पहाव तेव्हां ते कोणत्याना कोणत्या लष्करी कामांत गुंतलेले आढळावयाचे. तेव्हांपासून एकादी क्षुल्लक गोष्ट सुद्धां करून टाकीपर्यंत अम्मलदारानें विश्रांति घेतां उपयोगी नाहीं, हें तत्त्व मी शिकलों. माझ्यावरील मुख्य अधिकारी कौंट हेसेलर हे विलक्षण कंटक वृत्तीचे आहेत. चैन कशी ती त्यांस ठाऊकच नाहीं. तसेंच त्यांची

शिस्त इतकी कडक होती की, धार्मिकसारिक गोष्टींतहि ते कोणाचा मुलाहिजा ठेवीत नसत. कसल्याहि अडचणीनें ते कधीं गांगरून गेले नाहींत आणि कित्येक वेळां सामान्य मनुष्याच्या दृष्टीनें अनुल्लंघ्य अशा अडचणींतून हे आपल्या उद्योगानें पार पडून गेले. अशा प्रकारच्या अधिकाऱ्याच्या हाताखालीं मला लष्करी शिक्षणाचा लाभ झाला नसता, तर माझा आयुष्यक्रम कांहीं निराळ्याच तऱ्हेने रेखाटला गेला असता. "

फिल्ड मारशल फॉ डर गोल्डज् हे पहिल्या प्रतीचे लष्करी ग्रंथकार आहेत. यांनीं कोणत्याहि लष्करी कामगिऱ्या केल्या नसत्या, तरी केवळ लेखांच्या द्वारें यांची कीर्ति अजरामर झाली असती. हे लष्करी खात्यांत शिरले; त्या वेळीं लहान वयांतच यांची साहित्याची आवड दृष्टोत्पत्तीस आली. आरंभीं कादंबऱ्या लिहिण्याचा नाद यांना होता. हीं गोष्टींचीं पुस्तकें विकून उत्पन्न झालेला पैसा हे आपल्या विधवा मातोश्रीस देत असत. यानंतर लष्करी दृष्टचा महत्त्वाच्या " लिऑं ग्याबेटा आणि त्याचें सैन्य " या नांवाचा एक ग्रंथ त्यांनीं लिहिला. या ग्रंथानें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली; पण त्यामुळें ते थोड्याशा पेंचांतहि आले. लष्करी नौकरी तीन वर्षांऐवजीं दोन वर्षांची करावी, असें म्हणणारा एक पक्ष या वेळीं जर्मनींत आस्तित्वांत आला होता. हा पक्ष जर्मन सरकारला नावडता झालेला होता. प्रस्तुत ग्रंथांतहि याच मताचें परंपरया समर्थन केलें असल्यामुळें गोल्डज् सरकारच्या रोषास पात्र झाले. बादशहाच्या तैनातींत असलेल्या लष्करी अम्मलदारानें अशी वर्तणूक करणें सरकारास गर्हणीय वाटलें. या त्यांच्या कृतिबद्दल शिक्षा म्हणूनच कीं काय त्यांची बदली जेरा येथील ठाण्यावर करण्यांत आली. हें पुस्तक १८७७ सालीं प्रसिद्ध झालें आणि तेव्हापासून सर्व राष्ट्राचें लक्ष या प्रश्नाकडे लागलें आणि त्या वेळीं गोल्डज् यांजवर सरकारची इतराजी झाली, तरी खुद्द सरकारनेंच सोळा वर्षांनतर हें तत्त्व प्रत्यक्ष अमलांत आणलें.

१८८३ सालीं गोल्डज् यांनीं लिहिलेलें ' राष्ट्राची लष्करी तयारी ' (A nation in Arms.) हें पुस्तक फार सुप्रसिद्ध आहे.

राष्ट्रांतील सर्व तरुणांनीं लष्करी शिक्षण अवश्य घेतलें पाहिजे, या तत्त्वाचें समर्थन या ग्रंथांत फार चांगल्या रीतीने केलें आहे. लॉर्ड रॉबर्टस हे या तत्त्वासाठीं इंग्लंडांत कित्येक वर्षें चळवळ करीत होते. त्यांच्या विरुद्ध गडबड करणाऱ्या लोकांनीं गोल्डज् यांचा ग्रंथ एक वेळ तरी अवश्य वाचून पहावा. युरोपांतील बहुतेक भाषांत त्याचें भाषांतर झालें असून हें तत्त्व बहुतेक सर्व देशांत आतां मान्य झालें आहे. जर्मनींतील सोशियालिस्ट पक्षानें या तत्त्वाविरुद्ध चळवळ आरंभिली तेव्हां, ती हाणून पाडण्याकरतां 'तरुण जर्मन सघ' (young German League.) या नांवाची एक संस्था निर्माण होऊन तिचें अध्यक्षपद गोल्डज् यांना देण्यांत आलें. यानतर गोल्डज् यानीं लिहिलेल्या पुस्तकांत 'फ्रेड्रिक धी ग्रेटने केलेलीं युद्धें' 'सेनानित्व' व 'एकोणिसाव्या शतकांतील जर्मन युद्धांचा इतिहास' हीं पुस्तकेंहि नांवाजलेलीं आहेत. शेवटच्या पुस्तकांत 'जर्मनीचें महत्त्व तलवारीच्या धारेवर अवलबून आहे' या मताचा अनुवाद केला आहे. गोल्डज् म्हणतात, "आपल्या मानसिक तरलतेनें नव्हे, तर तलवारीच्या तीक्ष्णतेमुळे आपलीं स्वप्ने प्रत्यक्ष सृष्टींत खरीं ठरण्याच्या मार्गाला लागलीं आहेत. सर्व बाजूंनीं जर्मन राष्ट्राची वाढ फार झपाट्याने होत आहे; पण हीच वाढ भावी सुरक्षिततेस भयावह आहे. कारण, तीमुळें आपण सुरक्षित आहों असा भ्रम वाढून लोकांत चैनीची प्रवृत्ति होते. चैन आणि सुरक्षितपणाचा भ्रम हीं दोन्हीहि राष्ट्रास नेहमीं विघातक होतात. राष्ट्राच्या एकंदर वाढीबरोबर पौरुषाचीहि वाढ होणें अवश्य आहे. ज्या राष्ट्रांत ही वाढ जोडीनें होईल तेंच राष्ट्र इतिहासांतील आपलें महत्त्व राखू शकेल." भाषासौष्ठव आणि उत्कृष्ट वर्णनशैली हीं गोल्डज् यांच्या लेखांचीं प्रमुख अंगें आहेत. त्यांच्या ठिकाणीं भाषाप्रभुत्व केवढें आहे, हें यावरून दिसून येतें.

पुष्कळ सैन्य असलें म्हणजे लढाईत यश अवश्य येतें, या नेपोलियनच्या मताचा पुरस्कार गोल्डज् करीत नाहींत. लक्षावधि बाजारबुणग्यांपेक्षां उत्तम लष्करी शिक्षण मिळालेली एकच पलटण अधिक उपयोगी आहे, असें यांचें मत आहे.

सुलतान अबदूल हमीद यांच्या कारकीर्दीत तुर्कांना लष्करी शिक्षण देण्याच्या कामावर सन १८८३ सालीं यांची नेमणुक झाली. १९०५ पर्यंत या कामावर हे होते. हे काम यांनीं हातीं घेतलें त्या वेळीं तुर्की सैन्याची खरी लष्करी किंमत बाजारबुणग्याहून अधिक नव्हती. असल्या प्रकारच्या लोकांतून शिस्तवार लष्कर उभें करणें हें मोठ्या त्रासाचे काम होतें. तशांतून गोल्डज् यांच्या विरुद्ध कान्स्टांटीनोपल येथें होणारे कट, खुद्द बादशहाची उदासीनता आणि संशयी वृत्ति हीं लक्षांत घेतलीं ह्मणजे बारा वर्षांच्या अवधीनंतरहि गोल्डज् यांनीं आपल्या कार्यांत इतकें तरी यश कसें मिळविलें, याचेंच आश्चर्य वाटतें. सुलतान अबदुल हमीद यानीं आपल्या हेरांचें जाळें यांच्या भोंवतीं पसरून ठेवलें होते. गोल्डज् यांनी हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत खो घालण्याचें सत्कार्य हे लोक करीत असत. एके वेळीं सैन्याची लटकी लढाई करण्याचे अभिवचन गोल्डज् यांनीं सुलतानापासून मोठ्या मिनतवारीनें मिळविलें; पण अखेरीस खलीपानें ही लढाईसुद्धां बंद केली. या लढाईचा खरा उद्देश तक्ताविरुद्ध कट उभारण्याचा आहे, असें आजूबाजूच्या हुजऱ्यांनीं खलिफाच्या मनांत भरविलें. त्या भित्र्या सुलतानालाहि हें ह्मणणें खरें वाटलें. सुलतानाचा भित्रेपणा इतक्या परमावधीस पोहोंचला होता, कीं गोळी असलेलीं काडतुसें त्यांनीं शिपायांस कधींहि दिलीं नाहींत. तोफखान्यांतहि गोळे वापरण्याची त्यांनीं सक्त मनाई केली होती. जर्मनींतून तुर्की-सैन्याकरतां मासर बंदुका येऊन पडल्या होत्या; पण सहा वर्षांत त्या पेट्यांचे खिळेहि बाहेर निघाले नाहींत. तुर्की लष्कर तयार करण्याचें काम गोल्डज् यांस कशा परिस्थितींत करावे लागलें, याची कल्पना या उदाहरणावरून कोणासहि येईल. तथापि आज नाहीं उद्यां, ही परिस्थिति पालटेल, या आशेवर भिस्त ठेवून गोल्डज् यांनीं आंगीकृत कार्य सोडलें नाहीं. मोठ्या धीरानें व भगीरथ प्रयत्नांनीं त्यांनीं तुर्की सैन्यास अंशतः तरी चांगलें स्वरूप दिले. कान्स्टांटीनोपल सोडून ते बाहेर पडले, त्या वेळीं बऱ्याच प्रकारें तयार झालेले लष्करी अम्मलदार, राखून ठेवलेलें 'लॉंडव्हर व लॅन्सर' सैन्य, एक लष्करी पाठशाळा, युद्धविषयक नकाशे

तयार करण्याचें खातें आणि सैन्य भरतीची योजना, इतक्या निशाण्या गोल्डज़ यांनीं मागें ठेवल्या आहेत. सैन्याला नव्या बंदुका व नव्या तोफखाना त्यांनीं दिला. तसेंच तुर्कस्थानास जेथें जेथें युद्धांत उतरण्याचा संभव दिसला, तेथील सर्व योजनांचे नकाशेहि त्यांनीं आगाऊ तयार करून ठेवले. १९०९ सालीं तुर्कस्थानांत राज्यक्रांति होऊन तरुण तुर्कांचा पक्ष अधिकारारूढ झाला. तुर्की सैन्य तयार करण्याकरतां गोल्डज् यांस पुनः पाचारण करण्यांत आलें; पण या बोलावण्याचा स्वीकार त्यांनीं केला नाहीं. १९१० सालीं पुनः दोन महिने ते कान्स्टांटीनोपल येथें जाऊन राहिले होते. ते जर्मनींत परत आले, त्या वेळीं तुर्की लष्कर योग्य माणसांच्या हातीं आहे, अशी त्यांची समजूत झाली होती; पण १९१२ सालीं घडलेल्या तुर्कोबालकन युद्धानें त्यांचें भ्रमनिरसन होऊन त्यांस अतिशय दुःख झालें.

तुर्को-बाल्कन युद्धांत तुर्कांचा झालेला खुर्दा, हाच जर्मनीचा पराभव होय, या समजांत स्वाभाविक तत्त्व कांहींच नाहीं. तुर्कांच्या लष्करी सामर्थ्याची अतःस्थ माहिती ज्यांस आहे, असे सर्व तज्ज्ञ यासंबंधाचा दोष जर्मनीला मुळींच देत नाहींत. बल्गेरिया, सर्विया, ग्रीस आणि मान्टेनिग्रो यांच्या लष्करी धडाडीपुढें ज्या तुर्की सैन्याचा चक्काचूर झाला, तें सैन्य वस्तुतः गोल्डज् यांच्या हाताखालीं तयारच झालेलें नाहीं. या तुर्की सैन्याची खरी लष्करी योग्यता बाजारबुणग्याहून आधिक नसून तयारीच्या दृष्टीनेंहि त्यांत उणीवा होत्या. अन्नसामग्री आणि दारूगोळा यांचा भरपूर पुरवठा तुर्की लष्करांत नव्हता, यामुळें आरंभापासूनच तुर्की लष्कर हताश स्थितींत होतें. त्याच्या जर्मन गुरूंनीं जें शिक्षण त्यांस दिलें होतें, तें सारें घरीं ठेवून हें लष्कर युद्धास उद्युक्त झालें होतें. तोफखाना कोणत्या रीतीनें उभा करावा ही विद्या तें साफ विसरून गेलें होते. शत्रुसैन्याच्या नजरेस अगदीं सहज रीतीनें येईल, इतक्या उघडपणें तोफा उभ्या करण्याचें शिक्षण गोल्डज् यांजकडून त्यांस खास मिळालें नव्हतें. एका तुर्की ठाण्यावर गुप्त तोफखाना होता व त्यावर जर्मन लष्करी अधिकारी होते. हा तोफखाना अखेरपर्यंत बंद पाडतां आला नाहीं, अशी

हकीकत कांहीं बल्गेरियन लष्करी अम्मलदारांनींच प्रसिद्ध केली आहे. ॲड्रियानोपलच्या शिबदींत साठ जर्मन अम्मलदार होते. हा किल्ला अखेरपर्यंत भांडला ही गोष्ट सर्वत्र महशूर आहे. तुर्की सैन्याप्रमाणेंच तुर्की आरमाराचीहि या युद्धांत दैना झाली. तुर्की आरमार तयार करण्याचें काम इंग्रज ॲडमिरल गॅबल याजकडे होतें, आणि तुर्की सैन्याचे मुख्य सेनापति नाझीमपाशा हे फ्रान्सांतील सेन्टसीर येथील लष्करी पाठशाळेंत तयार झाले होते. तुर्की सैन्याच्या अपयशाबद्दल ब्रिटिश आरमारी शिक्षण अथवा फ्रेंच लष्करी पद्धत जशी जबाबदार धरतां येत नाही, त्याचप्रमाणें या अपशयाचें खापर गोल्डझ् यांच्या माथीं मारतां येत नाहीं. अनेक अंतःस्थ कारणांनीं तुर्की सैन्याची स्थिति आंतून पोखरलेल्या झाडासारखी झाली होती. तुर्कोबाल्कन युद्धांत तुर्कांना अखेरीस अपेश आलें, तथापि त्यांचे पिढीजाद लष्करी गुण अद्यापि लुप्त झालेले नाहींत, असें जनरल गोल्डझ् हे स्वतः अजूनहि ह्मणतात. ॲड्रियानोपलच्या वेढा व स्कुटारी चाटलूजा आणि जॉनिना येथील रणसंग्राम तुर्कांच्या पिढीजाद लष्करी गुणाची अद्यापीहि साक्ष देतात, असें त्यांचें ह्मणणें आहे. कर्क-किलेसे, लुले-बर्गास आणि कुम्यानोवा येथें तुर्कांनीं मार खाल्ला असला, तथापि त्यांच्या नाड्यांत अद्यापीहि प्रेव्नाच्या वीरांचें रक्त खेळत आहे, असें गोल्डझ् ठांसून सांगतात.

सामान्यतः बाह्यस्वरूपांत गोल्डझ् हे लष्करी बाण्याचे दिसत नसून त्यांची मुद्रा एकाद्या पंडिताला किंवा अध्यापकाला शोभण्यासारखी आहे. जर्मनराष्ट्र आणि खुद्द बादशहा यांच्या मनात त्यांजबद्दल अत्यंत आदर वसत असून अनेक पदव्यांचा वर्षाव त्यांनीं त्यांजवर केला आहे. १८६६ सालीं झालेल्या आस्ट्रो-प्रशियन युद्धांत हे दुय्यम लेफ्टनंट होते. त्यावेळीं त्यांच्या खांद्यास तोफेच्या गोळ्याची जखम झाली होती. या खालच्या दर्जापासून वाढत वाढत आज ते फील्डमारशलच्या अत्युच्च जागीं विराजमान झाले आहेत व त्यांस नाईट ऑफ दी ब्लॅक ईगल हा बहुमानाचा चांद मिळाला आहे. चवदाव्या लुईच्या कारकीर्दीत फ्रान्स देशांत गोल्डझ् या नांवाचा एक गृहस्थ मारशल ऑफ फ्रान्स ह्मणजे फ्रान्सचा मुख्य

सेनाधिपति होता. हाच गोल्डझ् आपला पूर्वज आहे, असें जनरल गोल्डझ् ह्मणतात. यांची मुद्रा अत्यंत सौम्य आहे; तथापि ते निधड्या छातीचे व खंबीर मनाचे आहेत. एकादा मनुष्य जगाच्या दृष्टीनें मोठा, एवढ्याच साठीं ते त्याजपुढे कधींहि मान वांकवावयाचे नाहींत. वरिष्ठाशीं वाकून रहावयाचे व कनिष्ठास दयार्द्रतेनें वागवावयाचे असा त्यांचा बाणा आहे. भपकेबाज लष्करी पोषाख घालून व बिल्ले आणि चांद छातीवर लटकावून दिखाऊ समारंभांत मोरासारखें नाचणें त्यांना आवडत नाहीं. कांहीं राजकीय समारंभ झालें, तर त्यांच्या हुद्याचा पोषाख घालून हजर राहणें त्यांना भाग पडतें व अशा प्रसंगीं बादशहांची तलवार सांभाळण्याचा मान त्यांजकडे असतो. तथापि अशा प्रसंगीं सुद्धां केवळ कर्तव्य ह्मणून ते हजर राहतात व अशा प्रसगीं आपणास मोठा मान मिळाला, असें त्यांना वाटत नाहीं.

जर्मन राष्ट्राच्या लष्करी रक्षणासाठीं जो नवा कायदा पास झाला, त्यांत या विषयाबद्दलचीं गोल्डझ् याचीं मतें स्पष्टपणें व्यक्त झालीं आहेत. चाऱ्ही सरहद्दींवर जर्मन लष्करांची कडेकोट तयारी सदोदित जय्यत असली पाहिजे, असे त्यांचें मत आहे. जर्मनीनें लष्करी मदतीसाठीं कोणाच्याहि तोंडाकडे पाहतां कामा नये, असें ते स्पष्ट ह्मणतात. बाल्कन युद्धांत तुर्कांस आलेल्या अपयशामुळें त्यांच्या कीर्तिसूर्यावर जर्मनींत कसलीहि छाया पडलेली नाहीं. तुर्की सैन्य भुसकुटासारखें उडून गेलें, ह्मणून एकाद्या महायुद्धाच्या प्रसंगीं जर्मन लष्कराचीहि तीच दशा होईल, असें कोणास वाटत असेल, तर तो त्याचा भ्रम आहे. महायुद्धाचा वणवा युरोपांत पेटला व अखेरीस विजयश्रीनें कोणासहि माळ घातली, तरी जर्मन लष्कर वाटतें तितकें कुचकें नाहीं, असें निःसंशय सर्वांच्या प्रत्ययास येईल.

महायुद्धात तुर्कस्थानांतल्या लष्कराचीं सूत्रें चालविण्याचें मुख्य सेनापतित्व यांजकडे होतें. थोड्या दिवसापूर्वी हे गृहस्थ परलोकवासी झाले.

अँडमिरल फाँ कोस्टर.

जगांतील पार्लमेंटांच्या इतिहासांत अननुभूत अशा प्रकारचा एक देखावा १९०९ च्या मार्च महिन्याच्या आरंभीं जर्मन पार्लमेंटांत दिसून आला. जर्मन आरमाराच्या वाढीकरतां तीस कोटी रुपये खर्चावे, अशा आशयाचा एक कायदा यावेळीं एकाहि विरुद्ध मतावांचून जर्मन पार्लमेंटांत पास झाला. या कायद्यानें तीन सवाईबेडर जहाजें, एक मोठें क्रुइझर आणि याच प्रमाणावर धाकटीं क्रुइझरें, आगमाशांच्या बोटी आणि पाणबुड्या बांधण्याची परवानगी जर्मन राष्ट्रानें आपल्या सरकारास दिली. या कायद्याच्या मसुद्यावर वादविवाद झाला, त्यावेळीं त्या विरुद्ध एक अक्षरहि कोणीं उच्चारलें नाहीं किंवा एकाहि सभासदानें असंतोष प्रदर्शित केला नाहीं. एवढ्या मोठ्या खर्चाची बाब अंगावर येत असतां त्या विरुद्ध कोणींहि तकरार केली नाहीं, ही गोष्ट जगाच्या पार्लमेंटांच्या इतिहासांत खरोखरच अननुभूत आहे.

आपलें सैन्य जय्यत राखण्यासाठीं जर्मनराष्ट्र प्रतिवर्षीं सुमारें दीड अब्ज रुपये खर्चीत आहे. हा पैसा उत्पन्न करण्यासाठीं जर्मनराष्ट्रावर लादलेलें करांचें ओझें जवळ जवळ असह्य होण्याइतकें मोठें असताहि आरमाराप्रीत्यर्थ त्यानें एवढ्या मोठ्या खर्चाची परवानगी बिनतकरार दिली, या गोष्टीवरून जर्मनराष्ट्राच्या मानसिक परिस्थितीची ओळख पटते. ही परिस्थिति येण्यास काय कारणें झालीं असावींत, याचा विचार करणें फार मनोरंजक आहे. १८९८ सालीं जर्मनीचा आरमारी खर्च नऊ कोट रुपये होता. तो १९१३ सालीं चवतीस कोटींच्या वर गेला. एवढ्या खर्चाच्या वाढीला जर्मनराष्ट्रानें बिनतकरार अनुमति दिली, याचें सर्व श्रेय 'जर्मन नेव्ही लीग' या संस्थेस दिलें पाहिजे. आजपर्यंत जर्मनराष्ट्र कवींचें व तत्त्वज्ञांचें आहे, असा त्याचा लौकिक होता; पण यापुढें हा मनु बदलून तें राष्ट्र नाविकांचेंहि आहे, असें जगाच्या प्रत्ययास येईल. समुद्रावर वर्चस्व मिळविण्याकरतां जर्मनराष्ट्रानें आपलें सर्व बळ खर्च केलें पाहिजे, या तत्त्वाचा प्रसार करण्यांत सदरहू लीगनें जिवापाड खट-

पट केली आहे. कोरड्या सभा भरवून ठराव पास करणे आणि वर्षाच्या अखेरीस सर्वांनीं मिळून एकादी मेजवानी झोडणे, असल्या प्रकारचें कार्य या लीगनें केलेले नाहीं. या संस्थेचे सुमारें दहा लक्ष सभासद असून आपल्या तत्त्वांचा प्रसार करण्याकरतां यांपैकीं प्रत्येक जण शक्य तितकी मेहनत करीत असतो.

अशा प्रकारच्या राष्ट्रीय चळवळी सुरू झाल्या ह्मणजे त्यांना एकादा मोहोरक्या असतोच. त्याप्रमाणें या चळवळीचा पुढाकारहि ॲडमिरल फॉं कोस्टर यांनीं घेतला आहे. कोस्टर हे जर्मन आरमारातले एक सुप्रसिद्ध व बुद्धुक कामदार आहेत. यांच्याच परिश्रमानें या संस्थेला तिचें सांप्रतचें स्वरूप प्राप्त झालें असून तिचे उद्देश इतके फलद्रूप होण्यासहि त्याचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. अगदीं हलक्या दर्जापासून वाढत वाढत पन्नास वर्षांच्या नौकरींत ॲडीमरलच्या अति श्रेष्ठ पदावर हे केवळ स्वकष्टानें चढले आहेत. सुमारें आठ वर्षांपूर्वी नेव्ही-लीगचें अध्यक्षपद त्यांस प्राप्त झालें. या संस्थेच्या कारकीर्दींत हा काळ अगदीं आणीबाणीचा होता. पूर्वीच्या अध्यक्षाच्या माथेफिरूपणामुळें ही संस्था बुडण्याच्या पंथास आली होती. ही संस्था नामशेष झाली असती, तर सरकारी आरमारखात्यालाहि भविष्यत् कालीं फार अडचणी उपस्थित झाल्या असत्या. समुद्रावर आरमारी वर्चस्व मिळविण्याकरतां जें घोरण जर्मन सरकारनें स्वीकारलें आहे, तें सारें ढांसळून पडण्याचा संभव होता. याच सुमारास ग्रँड ॲडमिरल कोस्टर यांनीं आरमाराचें आधिपत्य नुकतेंच सोडलें होतें. फिल्डमार्शल ही जशी लष्करांतील अति श्रेष्ठ पदवी आहे, तशीच ग्रँड ॲडमिरल ही आरमारांतील श्रेष्ठ पदवी आहे. वृद्धापकाळीं सुखानें राहतां येईल अशी त्यांची सांपत्तिक स्थिति होती; तथापि केवळ आळसांत काळ घालविण्यापेक्षां देशहिताच्या कोणत्या तरी उद्योगात तो घालविणें त्यांना अधिक श्रेयस्कर वाटलें. आरमारीसंघ डबघाईस आला आहे, असें पाहून त्याला चिरस्थाई स्वरूप देण्याचें कार्य यांनीं आपल्या शिरावर घेतलें. सर्व कामें शिस्तवार रीतीनें हाताखालच्या लोकांकडून उरकवून घेण्याची विद्या उपजतच फॉं कोस्टर यांच्या अंगीं

होती. आरमारीसंघांत पडणाऱ्या फाटाफुटीस त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें आळा घातला आणि ही संस्था लौकरच जोरानें कार्य करूं लागेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं.

" जर्मनीचा भावी उदय समुद्रावर आहे. " हें ब्रीद वाक्य बादशहा वुइलियम यांनीं चालू शतकाच्या आरंभीं उच्चारलें. जर्मनराष्ट्राला जगांत कांहीं महत्त्व प्राप्त करून घ्यावयाचें असेल, तर मोठें आरमार बांधून आपलें वर्चस्व त्यानें समुद्रावर प्रस्थापित केलें पाहिजे व घरच्या घरीं माशा मारीत न बसतां जर्मन लोकांनीं महासागरांचें आलोडन केले पाहिजे, असें बादशहा ह्मणाले. अशा प्रकारच्या उत्साहजनक भाषणांनीं जर्मनराष्ट्राच्या कल्पनाशक्तीस नवें चैतन्य मिळाले होतें. जर्मन पार्लमेंटांत या वेळीं अनेक पक्ष अस्तित्वांत होते. पक्षभेदाच्या अडचणींतून सुरक्षितपणें आपला मार्ग शोधून काढणें आरमारीखात्यास फार जड झालें होतें. हें कठिण कार्य या वेळीं ग्रँड अॅडमिरल फॉ टिरपिट्झ यांनीं बऱ्याच अंशीं सिद्धीस नेलें; तथापि या कामीं टिरपिट्झ यांस देशाचें पाठबळ मिळवून देण्याचें अधिक कठिण काम जर्मन आरमारीसंघाने केलें. प्रसंग पडेल त्याप्रमाणें कधीं उत्साहजनक लेखांनीं व भाषणांनीं, तर कधीं दुसऱ्या राष्ट्रांबद्दल भीति उत्पन्न करून जर्मनराष्ट्राचा उत्साह या आरमारीसंघानें या वेळीं कायम राखला होता. नवे नवे आगगाडीचे फांटे बांधण्याकरतां अतोनात खर्च करणें जर्मनराष्ट्राच्या आंगवळणीं अगोदरच पडलें होतें. त्याचप्रमाणें आरमारी खर्चाची वाढहि त्याच्या आंगीं आतां पूर्णपणें मुरून गेली आहे. गेल्या सतरा वर्षांच्या अवधींत जर्मन आरमारीसंघानें जे भगीरथ प्रयत्न केले, तसे प्रयत्न दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांत कोणत्याहि चळवळीसाठीं झाले नसतील.

या आरमारीसंघाच्या सभासदांची संख्या सध्या जवळ जवळ साडेबारा लक्ष असून त्यांच्या पसतीसशें शाखांचें जाळें सर्व देशभर पसरलें आहे. कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें या संघाचा प्रवेश न झालेलें असें एक खेडेंसुद्धां साऱ्या राष्ट्रांत सांपडावयाचें नाहीं. कील बंदरापासून ५०० मैल अंतरावर बव्हेरिया प्रांतांत विन्स्यांजेन् या नांवाचें एक

खेडें आहे. एकदां एक प्रवासी या खेड्यांत गेला होता. या खेड्यांतील लोकांनीं कधीं स्वप्नांतहि मोटारगाडी पाहिली नव्हती; तथापि बेडर जहाजाबद्दल मात्र त्यांना पूर्ण माहिती होती, असें या प्रवाशाला आढळून आलें. हें खेडें सोडून निघतांना हा प्रवासी तेथील पाटलास भेटावयास गेला. तेव्हां आरमारीसघाच्या सभासदाच्या अर्जाचा नमुना त्याच्यापुढें करून पाटीलबोवांनीं त्यावर सही करण्याची त्याला हळूच विनति केली.

नेव्ही लीगचें गुंतविलेले भांडवल तीन लक्ष रुपये असून सभासदांकडून येणारें वार्षिक उत्पन्न जवळ जवळ अडीच लक्ष रुपयांचें आहे. या लीगचे डायफॉट नांवाचे वर्तमानपत्र असून त्यांतील जाहिरातींचें उत्पन्न वर्षाकाठीं पाऊण लक्ष रुपयांचे होतें. यांत बहुधा तोफांचे व बोटींचे कारखानदार यांच्याच जाहिराती असतात. आरमाराबद्दल लोकाच्या मनांत उत्साह कायम राखण्यासाठीं हा संघ सुमारें चार लक्ष रुपये दरसाल खर्च करीत असतो. डायफॉटच्या तीन लक्ष साठ हजार प्रति जर्मनींत व बाह्यदेशीं दरमहा पसरवून संघाची चळवळ जिवत ठेवीत असतात. खेडींपाडीं, मध्यम गांवें आणि मोठीं शहरें यांत हजारों प्रचारक नित्य फिरत असून आपल्या मिठ्ठया भाषणांनीं लोकांचीं मनें या कार्याकडे ओढण्यासाठीं खटपट करीत असतात. या कपनीच्या मालकीचे वीस सिनेम्माटोग्राफ असून ते देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सदोदित फिरते ठेवले जातात. अशा प्रकारें प्रत्यक्ष चित्रांच्या द्वारें आरमाराचे महत्त्व निरक्षर लोकांपर्यंतहि पसरविण्याचें कार्य हा संघ करीत असतो. प्रतिवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टींत अनेक शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थीवर्ग यांस निरनिराळ्या बंदरीं फिरतीवर नेऊन तेथील गोद्या व आरमार यांची प्रत्यक्ष ओळख त्यांस करून देण्यांत येते. या प्रसंगीं जमलेल्या शिशुगणांच्या चित्तांत अशा प्रकारच्या उत्साहाचें बीजारोपण केलें जातें, कीं येथून आपल्या गांवीं परत गेलेला प्रत्येक विद्यार्थी संघाचा उत्साही प्रचारक बनतो. अशाच रीतीनें संघाच्या सभासदांसहि फिरतीवर नेण्यांत येत असतें. समुद्रापासून दूर असलेल्या भागांत ही चळवळ जिवंत ठेवण्याची खटपट हा संघ विशेष जारीनें

करीत असतो. हँबर्ग, ब्रेमेन, ड्यॉंझिग्, स्टेटिन इत्यादि बंदरच्या लोकांना दर्याची ओळख बाळपणापासून असल्यामुळें आरमाराचें महत्त्व त्यांस उपजतच कळत असतें, यामुळें त्यांच्यासाठीं विशेष खटपट करण्याचें अर्थातच कारण नाहीं; पण पूर्व आणि पश्चिम प्रशिया, बव्हेरिया, ऱ्हाइनल्यॉड, वेस्टफालिया, सॅक्सनी इत्यादि भागांत जन्मांत समुद्राचें दर्शन न झालेले अनेक लोक आहेत. यामुळें या संघाची विशेष चळवळ याच लोकांत आहे. आरमारच्या हालचाली पाहण्यासाठीं या लोकांतून अनेकास नेण्यांत येतें आणि आरमाराचे महत्त्व त्यांच्या चित्तांत बिंबविण्याची खटपट अशा रीतीनें एकसारखी सुरू असते.

मोरोक्कोसारख्या राजकीय भानगडी उपस्थित झाल्या ह्मणजे या संघाला अधिकच स्फुरण चढत असतें. अशा वेळीं हा संघ प्रत्यक्ष अथवा परंपरेच्या अशा कोणत्याहि मार्गाचा अवलंब करण्यास चुकत नाहीं. हस्तपत्रकें, सभांतील भाषणें आणि वर्तमानपत्रांतील लेख हीं सारीं एकवटून जनतेवर निकराचे हल्ले करूं लागतात. 'अगादीर' सारखीं प्रकरणें उपस्थित होऊन लोकमत खवळले, तर अशा संधीचा फायदा घेऊन त्या खळबळींत भर टाकण्यास हा संघ चुकत नाहीं. निरनिराळ्या प्रकारचे भयसूचक मथळे वर घातलेलीं हस्तपत्रकें देशांत जिकडे तिकडे दिसूं लागतात. पार्लमेंटाचे सभासद रस्त्यानें चालले ह्मणजे 'अधिक बेडर जहाजें बांधा' असा प्रचंड घोष त्यांच्या कानांवर एकसारखा चोहोंकडून आदळत असतो. "जर्मनीचा कडेलोट, भावी युद्ध, जर्मनीला खग्रास ग्रहण," असल्या प्रकारचे मथळे घातलेलीं हस्तपत्रकें कोट्यवधींनीं वांटलीं जातात. जर्मनीच्या आरमारी खर्चास पार्लमेंटानें निमुटपणें मान कशी डोलावली, हें या खटपटीवरून सहज ध्यानात येईल.

अशा रीतीनें साऱ्या जर्मनराष्ट्रांत खळबळ करून सोडणारे ग्रँड अॅडमिरल कोस्टर यांची मुद्रा बाह्यतः शांत दिसते. यांची प्रत्यक्ष माहिती ज्याला नाहीं, अशा एकाद्या गृहस्थाला, हे कोणी धर्मगुरु असावेत, असेंच वाटावयाचें. १९०५ सालीं जर्मनीच्या लार्डांच्या सभेचे यांस कायम सभासद करण्यांत आलें आहे. बांध्यानें ते उंच, धिप्पाड व ताठ

असून स्वभावानें अगदीं शांत आहेत. जर्मन आरमार परक्यांशीं भांडण्याकरतां उभारलें जात नसून केवळ स्वसंरक्षणासाठीं आहे, असें ते म्हणत असतात. प्रिन्स हेनरी किंवा ॲडमिरल टिरपिट्झ यांच्याप्रमाणेच ब्रिटिश आरमाराचे हे चाहते आहेत. इंग्लंडशीं सदोदित सल्ला ठेवणें जर्मनीला इष्ट आहे, असें त्यांचे मत आहे; तथापि परस्परांबद्दल परस्परांच्या ठिकाणीं योग्य आदर असल्यावांचून राष्ट्रीय प्रेम कायम राहूं शकत नाहीं व याकरतां इंग्लंडच्या मनांत आदर उत्पन्न करण्यासाठीं जर्मनीनें मजबूत आरमार बाळगलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. संधाची चळवळ कायम ठेवण्यासाठीं, जेव्हां जेव्हां ते स्वतः भाषणें करतात, तेव्हां तेव्हां या तत्त्वाचा अनुवाद ते करीत असतात. जर्मनीनें गुप्तपणें आपलें आरमार वाढविले आहे, हें म्हणणें निराधार असल्याचें ते सांगतात. जर्मनी जें जें कांहीं करतो, तें सारें उघड मार्गानेंच करतो, असें ते निक्षून सांगत असतात. जर्मनीला जलद चालीच्या क्रुझरांची अतिशय जरूरी आहे, हे मत हा संघ सध्यां प्रचालित करीत आहे.

ॲडमिरल कोस्टर यांचा जन्म १८४४ सालीं स्केरीन् गांवीं झाला. मनुष्याच्या आयुष्यांत आनुवंशिक संस्काराचें फार महत्त्व आहे, या मतांत कांहीं तथ्य असतें, तर ॲडमिरल कोस्टर हे मोठे कवि झाले असते. त्यांचे वडील हे बरेचसे नाणावलेले कवि होते. त्यांची आई श्लेजल् कवीची चहाती असून शेक्सपीयरचें भाषांतर करणाऱ्या सुप्रसिद्ध कवींच्या कुलांत जन्मली होती. आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षीं फौं कोस्टर प्राशियन आरमारांत शिरले. वयाच्या तिसाव्या वर्षी क्यापटन् होऊन त्यांनीं जगाचा प्रवास केला. १८९१ सालीं जर्मन आरमारांत शिक्षक म्हणून त्यांची योजना झाली, त्या वेळीं ते दुय्यम ॲडमिरलच्या हुद्यावर होते. १९०३ सालीं थोरल्या काफिल्याचें मुख्य आधिपत्य त्यांस प्राप्त झालें. या कामावर ते तीन वर्षें असून तेवढ्या अवधींत आरमाराची त्यांनीं उत्कृष्ट तयारी केली. कील बंदरीं असतां त्यांस शत्रूहि पुष्कळ उत्पन्न झाले होते; तथापि स्वतःच्या करारीपणानें व बुद्धिसामर्थ्यानें साऱ्या अडचणी बाजूस सारून त्यांनीं आपल्या कार्यांत यश संपादन

केलें. प्रशियाचे प्रिन्स हेनरी हे जर्मन आरमाराचे इन्स्पेक्टर जनरल झाले, त्या वेळीं सर्व आरमार अगदीं जय्यत स्थितींत आहे, असें ॲडमिरल कोस्टर यांनीं त्यांच्या प्रत्ययास आणून दिलें.

अठराव्या शतकाच्या अखेरीस ब्रिटिश आरमारांत ॲडमिरल जर्व्हिस या नांवाचे एक विख्यात गुरु होऊन गेले. त्यांचीच योग्यता फॉ कोस्टर यास आहे, असें त्यांचे शिष्य प्रेमानें म्हणत असतात. ट्रॅफलगारचा अद्वितीय जय नेलसन यांस मिळविण्यास जसे जर्व्हिस यांचे श्रम कारणीभूत झाले, तसेच जर्मनीची भावी ट्रॅफलगार जिंकण्याची तयारी ॲडमिरल कोस्टर यानीं केली आहे. जर्मनीची आरमारी तयारी कसास लागण्याची वेळ कधीं काळीं आलीं, तर आरमारांतिल लोकांच्या चित्तांत त्या वेळीं ॲडमिरल कोस्टर यांची मूर्ति खास उभी राहील.

आर्थर फाँ ग्विनर.

ज्या मानववंशांत रॉथशाइल्डसारखा पुरुष निर्माण झाला, त्याच वंशांत बुद्धिमान् कुबेर निर्माण व्हावेत, हें अगदीं साहजिक आहे. अशा प्रकारचे अनेक पुरुष जर्मनराष्ट्राला सुदैवानें आज लाभले आहेत. इतर राष्ट्रांना एका काळीं बर्लिनमधून कर्जाऊ पैशाचा पुरवठा होत असे. ही स्थिति आलिकडे बदलून बर्लिन इतरांकडून कर्ज घेत आहे, ही गोष्ट खरी; तथापि व्यापारीदृष्ट्या बर्लिनचें महत्त्व कितीतरी पटीनें वाढलें आहे. सध्यांच्या काळीं जगांतील व्यापारी उलाढालीचें प्रमुख ठिकाण वॉलस्ट्रीट न्यूयार्क हें आहे. वॉलस्ट्रीटमधील भावांच्या चढती पडतीवर सर्व जगाचे बाजार अवलंबून असतात. बर्लिन येथील सराफकट्ट्याला एवढें महत्त्व अद्यापि प्राप्त झालें नसलें, तरी लंडन, न्यूयार्क आणि पारिस येथील सराफकट्ट्यास बर्लिन सराफकट्ट्याचें अस्तित्व जाणवूं लागलें आहे, यांत मात्र शंका नाहीं. जगाचा व्यापार एके काळीं इंग्लंडची ब्यांक, जे. पी. मार्गन कंपनी (अमेरिका) आणि क्रेडिट लि ओने (पारिस) या त्रयींच्या हातीं होता; पण आतां त्यांत एक नवा भागिदार लवकरच

घुसणार, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ज्या ज्या भूमिभागांत हा भागिदार घुसतो, तेथें तेथें स्वतःचें महत्त्व प्रस्थापित केल्यावांचून तो रहात नाहीं. या भागीदाराचें नांव 'डयूश ब्यांक' असें आहे.

जर्मनींत एकंदर नऊ मोठ्या ब्यांका असून त्यांचीं भांडवलें प्रत्येकीं साडेचार कोटींपासून पंधरा कोट रुपयांपर्यंत आहेत. यांशिवाय सर्व राष्ट्रांत नाणावलेले मेडेलसोन किंवा ब्लिकरोडर सारखे कुबेरहि हा ब्यांकेचा धंदा करीत असतात. या धंद्यांत कलिफर्स्टेनबर्ग, पॉल फॉं श्वाब्याग, पॉल म्यांकिव्हिट्ज्, ब्यारन ऑपेन्हीम, स्पेअर्स, वारबर्ग, यूजेन गुटमन्, आर्थर सालोमनसन् इत्यादि व्यापारी विशेष नाणावलेले असून त्यांच्या हातानें करोडो रुपयांची घडामोड प्रत्यहीं होत असते; तथापि या साऱ्या घडामोडीचें नेतृत्व मुख्यतः डयूश ब्यांकेकडे आहे. बर्लिनमधून सर्व पृथ्वीला आक्रमण करणारा पैशाचा प्रचंड प्रवाह या ब्यांकेच्या तिजोरींतून उगम पावतो. जर्मनीच्या राष्ट्रीय ब्यांकेचें नांव रीश्ब्याँक असे असून पैशाचा चढाव वगैरे कामें हिजमार्फत होतात; तथापि साता-समुद्रापलीकडे असलेल्या जर्मन व्यापाऱ्यांस पैशाचा पुरवठा डयूश ब्यांकेतूनच होतो. जर्मन राष्ट्रांत खुद्द सरकारचे जितकें महत्त्व आहे, तितकेंच ते डयूश ब्यांकेचे आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं. ही ब्याँक स्थापन झाली, तेव्हां वर्षाच्या कांठीं जवळ जवळ वीस कोट रुपयांची उलाढाल तिनें केली. ही उलाढाल वाढत वाढत सध्यां एक खर्व रुपयांच्या घरास पोहोंचली आहे. यावरून जर्मनराष्ट्राच्या सापत्तिक आयुष्य-क्रमांत तिचे केवढें महत्त्व प्रस्थापित झालें आहे, हें उघड सिद्ध होते.

या ब्याकेला एवढें महत्त्व प्राप्त होण्यास मुख्यतः आर्थर फॉं गिनर यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. या ब्यांकेसाठीं आपण विशेष कांहीं केलें नाहीं, असें ते म्हणतात; पण ही त्यांची शालीनता आहे. त्यांच्या नांवाचें आद्याक्षर हें वर्णमालेंतील पहिलें अक्षर असल्यामुळें ब्यांकेच्या डिरेक्टरांच्या यादींत यांचें नांव आरंभींच नमूद करण्यांत आलें; पण डिरेक्टरांच्या शिरोभागीं बसण्याचा हा मान केवळ एवढ्याच काकतालीय न्यायावर अवलंबून नसून त्यांची वास्तविक योग्यताच तशी आहे. जुने

डिरेक्टर पाळीपाळीनें जाऊन नवे त्यांच्या जागीं येतात, त्या वेळीं वर्णानुक्रमानें ज्यांचें नांव ग्विनर यांच्या आधीं येईल, असा मनुष्य न निवडण्याचा या ब्यांकेचा जणूं काय नियमच आहे, असें दिसतें. ब्यांकेच्या डिरेक्टरांपैकीं आपण एक सामान्य सभासद आहों, असें ग्विनर ह्मणत असतात; तथापि ज्या ज्या वेळीं डचूश ब्यांक एकादें नवें महत्त्वाचें कार्य संपादिते, त्या त्या वेळीं त्याच्या मुळाशीं ग्विनर हेच आहेत, याबद्दल जर्मन राष्ट्राची—किंबहुना—साऱ्या जगाची खात्री असते. ग्विनर हे साऱ्या सराफांचे अध्वर्यु आहेत, अशी सर्वांची खात्री नसती, तर बादशहांनीं सरकारी तिजोरीच्या किल्ल्या अनेकवार आग्रहानें त्यांस देऊं केल्या नसत्या. ग्विनर यांनीं प्रधानमंडळांत शिरून सरकारी तिजोरी हातीं घ्यावी, अशी इच्छा केसर यांनीं अनेकवार प्रगट केली आहे. हे कट्टे देशभक्त आहेत; तथापि स्वतःच्या धंद्यातच अखेरपर्यंत राहून आपणास मातृभूमीची सेवा उत्कृष्ट रीतीने बजावता येईल, असें बॉलिनप्रमाणेंच यांचेंहि मत आहे. यामुळे प्रधानमंडळांतील मानाच्या जागेचा स्वीकार त्यांनीं केला नाहीं.

डचूश ब्यांकेची स्थापना १८७० सालीं झाली. बिस्मार्क आणि मोल्टके यांच्या फौजा फ्रान्सच्या अघाडीकडे जात असता इकडे डचूश ब्यांकेची मुहूर्तमेढ रोंवली जात होती. फ्राँको–प्रशियन युद्धाच्या पोटांतून नवे जर्मन साम्राज्य उदय पावले व त्याच वेळीं या ब्याकेचाहि उदय झाला. या दृष्टीनें जर्मन साम्राज्याशीं या ब्याकेचें सहोदरत्वाचें नातें आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. जर्मन राष्ट्राची सांपत्तिक भरभराट आणि या ब्यांकेची वाढ हीं सुद्धां आजपर्यंत जोडीनेच चालत आलीं आहेत. अगदीं आरंभापासूनचा या ब्यांकेचा सोळा सालाचा आढावा तपासून पाहतां ही वाढ एकसारखी साम्राज्याच्या वाढीबरोबर पाऊल टाकीत आहे, असें दिसून येतें. देशांतील उद्योगधंद्याची वाढ पुष्कळ अंशीं ब्यांकांच्या मदतीवर अवलंबून असते ही गोष्ट खरी; तथापि जर्मनींत हा संबंध जितका अभेद्य आहे, तितका तो दुसरा कोठेंहि नाहीं. प्रत्येक धंद्याला पत ही थोडीबहुत लागतेच; पण सारा धंदा केवळ पती-

वरच चालत नाहीं, अशी स्थिति बहुतेक साऱ्या राष्ट्रांत आढळून येते; पण जर्मनींत कित्येक धंदे नुसत्या पतीवरच अवलंबून आहेत. यामुळें कित्येक धनोत्पादक कारखाने, खाणी आणि समुद्रावरील वाहतुकीचा व्यापार इत्यादि धंदे सर्व या ब्याँकांच्या अमलाखालीं गेले आहेत. कित्येक ब्याँकांचें सारे भांडवल केवळ अशा प्रकारच्या उद्योगधद्यांत गुतलें आहे. अशा रीतीनें ब्याँका आणि उद्योगधदे यांजमध्यें होणारा अभेद्य संबंध एकंदरीनें हितावह आहे कीं काय, याबद्दल पुष्कळ परकीय सराफांच्या मनात शका आहे; तथापि अशा प्रकारच्या संबंधामुळें जर्मन व्यापारानें साऱ्या जगांत महत्त्वाचें स्थान पटकावले आहे, हे मात्र नाकारतां येत नाहीं.

जार्ज फॉ सायमेन्स या नांवाच्या गृहस्थांनीं डच्यूश ब्याँक प्रथम स्थापन केली. हे गृहस्थ सांप्रत हयात नाहींत, तरी जर्मनीच्या सांपत्तिक इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें आहे. डच्यूश ब्याँकेनें बाह्यदेशीं गेलेल्या जर्मन व्यापाऱ्यांना पैशाची मदत करावी, ही योजना सायमेन्स यांनीं प्रथम अमलांत आणली. सायमेन्स यांच्या या योजनेमुळें जर्मनीचा व्यापार साऱ्या जगभर पसरण्यास मदत झाली. १८८८ सालीं आनाटोलियन् (तुर्कीराज्य) रेलवे बांधण्याची सवलत सायमेन्स यानीं मिळविली. जर्मनीचा तुर्कीसाम्राज्याशीं जो महत्त्वाचा संबंध पुढें घडला, त्याला येथूनच प्रत्यक्ष सुरुवात झाली. या वेळीं आर्थर ग्विनर हे सायमेन्स यांचे पट्टशिष्य व मदतगार होते. १९०१ सालीं सायमेन्स परलोकवासी झाले, तेव्हां यांचा सर्व कारभार ग्विनर यांच्या हातीं आला. बगदाद रेल्वे बांधण्याची परवानगी ग्विनर यांनीं सुलतान अबदुल हमीद यांजपासून १९०३ सालाच्या मार्च महिन्यांत मिळविली. याच सालीं या दोन ह्मणजे आनाटोलियन व बगदाद रेलवे कंपनी यांचे ते मुख्य अध्यक्ष झाले व त्यांचा कारभार ते मुखत्यारीनें पाहूं लागले. आज मित्तीस सुमारें वीस कोट रुपयांचें जर्मन भांडवल या दोन रेलवेंत गुंतलें आहे. आनाटोलियन रेलवे हैदरपाशा येथून निघून कान्स्टान्टीनोपलला गली आहे, व तेथून दुसरे दोन फांटे एस्की शहर व अंगोरा यांजकडे गेले आहेत.

एक्सी शहराचा फांटा यापुढें कोनियाला गेला आहे. विख्यात लेखक सिसरो यानें कोनियाहून आपल्या एका स्नेह्याला पत्र लिहिले, त्या वेळीं त्यांत तो ह्मणाला, "या देशांत माणसाहून गाढवांचीच सख्या अधिक आहे." ग्विनर यांचे सर्व हेतु सफल झाले, तर तुर्काहून जर्मनांची संख्या तेथे अधिक होईल यात शंका नाहीं. अनाटोलियन रेलवेची एकदर लांबी ६५० मैल आहे आणि ही रेलवे जेथे संपते, तेथेंच बगदाद रेलवेस आरंभ होतो. बगदाद रेलवे कोनियापासून निघून इराणच्या आखातापर्यंत येऊन भिडावयाची आहे. याशिवाय भूमध्यसमुद्रावरील आलेक्झांड्रिया बंदरापर्यंत या रेलवेचा एक फाटा जावयाचा आहे. खिस्ती शतकाच्यापूर्वी ३३३ साव्या सालीं याच जागीं आलेक्झांडर आणि इराणचा बादशहा यांजमध्यें मोठें युद्ध होऊन त्यात इराणी बादशहाचा पूर्ण पराभव झाला. बगदाद आणि इराणचा उपसागर यांजमधील फांट्याच्या बांधणीस अद्याप सुरुवात झालेली नाहीं. याच प्रदेशांत जर्मनी आणि इंग्लंड यांच्या तंट्याचें मूळ आहे. इराणच्या उपसागरापर्यंत रेलवे बांधण्याचा हक्क आपणास आहे, हे जर्मनीचें ह्मणणे इंग्लंडच्या मनास येत नाहीं. जर्मनीच्या मालकीची व जिचा सर्व कारभार जर्मनांच्या हातीं आहे, अशी रेलवे हिंदुस्तानच्या जवळपास येणे ही गोष्ट इंग्रजांस रुचली नाहीं, किंबहुना ती त्यांस अनर्थावह वाटली, तर त्यांत नवल नाहीं. समुद्रावरील मार्गापेक्षां हा खुष्कीचा रस्ता दहा दिवसांनीं कमी लांबचा आहे.

बगदाद रेलवे बांधण्यांत ग्विनर यांचा कांहीं हेतु आहे, असें ह्मणावयास जागा नाहीं. फक्त डचूश ब्यांकेला अधिक फायदा कसा मिळेल, व जर्मनीचा व्यापार पूर्वेकडे अधिक मोठ्या प्रमाणावर कसा फैलावेल, इतकीच चिंता त्यांस आहे. १९०९ सालाच्या नाइन्टिंथ सेंचुरी नांवाच्या मासिकाच्या जूनच्या अंकांत एक लेख लिहून त्यांनीं आपलें हेंच ह्मणणें जाहीर केलें आहे.

आपलें आरमार आणि सैन्य जय्यत राखण्यासाठीं जर्मनी जो अवाढव्य खर्च करीत आहे, तो योग्यच आहे, असें ग्विनर यांचें ह्मणणें आहे.

जर्मनीच्या वाढत्या व्यापाराचें सरक्षण करण्यासाठीं अशा प्रकारें खर्च करणें, अत्यंत आवश्यक आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. जर्मन राष्ट्राच्या खजिन्याच्या चाव्या ग्विनर यांच्या हातीं असत्या, तर कित्येक वेळां या खात्यांत जो गोंधळ दृष्टीस पडतो, तो कधींहि पाहण्यांत आला नसता. १९१० सालीं केसर यांनीं त्यांस लॉर्डीच्या सभेचे सभासद केलें, त्या वेळीं त्यांनीं जें पहिले भाषण केलें, त्यांत तिजोरींतील अंदाधुंदीबद्दल त्या खात्यावर त्यांनीं यथास्थित कोरडे उडविले होते. जर्मनींतील सर्व रेलवे सरकारनें आपल्या हातीं घेऊन स्वतःचे उत्पन्न वाढवावें, असें त्यांचें मत आहे. या वेळीं ब्यारन फॉ व्हीन बॅचन हे तिजोरी कामदार होते. पार्लमेंटांत ग्विनर यांचें भाषण झाल्यानतर थोड्याच दिवसांनीं त्यांनीं राजिनामा दिला.

ग्विनर यांचा जन्म १८५६ सालीं मेन नदीच्या कांठीं असलेल्या फ्न्यांकफोर्ट गांवीं झाला. जर्मनींतील प्रमुख सराफकट्टा याच गांवीं असल्यामुळें सराफीचे बाळकडू ग्विनर यांस येथेच पाजलें गेलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांचे वडील हे एक नांवाजलेले गृहस्थ असून ते तत्त्ववेत्ता शापेनहार याचे परम मित्र होते. शापेनहाराच्या मागें त्यांनींच त्याच्या इस्टेटीची व्यवस्था लावली. शापेनहारचें एक चरित्रहि त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. हे गृहस्थ अद्यापि हयात असून १९०९ सालीं बादशाहाकडून त्यांस वशपरा सरदारीचीं वस्त्रे मिळालीं. बादशाहाच्या मनातून हा मान वस्तुतः आर्थर ग्विनर यांसच द्यावयाचा होता, असा लोकांचा समज आहे. १८८४ सालीं आर्थर ग्विनर यांची नेमणूक म्याड्रिड (स्पेन) येथें जर्मन कान्सल (व्यापारी वकील) या नात्यानें झाली. १८८५ सालीं फ्न्यांकफोर्ट येथील फिलिप्स्पेअर नांवाच्या एका प्रख्यात सराफाच्या मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. या विवाहामुळें युरोप आणि अमेरिका यांतील पुष्कळ पेढ्यांशीं त्यांचें दळणवळण सुरू झालें. १८८८ सालीं त्यांनीं आर्थर ग्विनर आणि कंपनी या नांवाची एक पेढी बर्लिन येथें स्थापन केली. १८९४ पर्यंत ही पेढी चालविल्यानंतर जॉर्ज फॉ सायमेन्स यांनीं त्याना डयूश ब्यॉंकेचा कारभार पाहण्या-

साठीं बोलावलें. नार्दर्न प्यासिफिक रेलवे कंपनीची पुनर्घटना १८९६ सालीं झाली, त्या वेळीं भागीदारतर्फे काम पहाण्यास ड्यूश ब्यांकेची नेमणूक झाली. ड्यूश ब्यांकेनें हें काम आर्थर ग्विनर यांजवर सोंपाविलें. हें काम त्यांनीं इतक्या उत्तम रीतीनें पार पाडलें कीं, कंपनीच्या पुनर्घटनेंत जुन्या भागिदारांस कोणतेंहि नुकसान सोसावें लागलें नाहीं. सराफीच्या धंद्यांत ग्विनर यांचें नांव प्रथम या वेळीं सर्वतोमुखीं झालें व यानंतरहि त्यांनीं अनेक वेळां आपल्या बुद्धीचा पराक्रम गाजविला आहे.

बारिकसारिक धंदे हातीं घेण्यापेक्षां प्रचंड कामे स्वीकारण्याकडेच त्यांची प्रवृत्ति आहे. लहानसहान रकमांचे शेंकडों उद्योग न करतां एकच प्रचंड उद्योग हे सदोदीत पहात असतात. जर्मनींतील कित्येक भुयारी रेलवे कंपन्या ड्यूशब्यांकेच्या हातीं आहेत; तथापि त्याचा कारभार ग्विनर पहात नाहींत. हजारो मैलांच्या लांबीच्या नार्दर्न-प्यासिफिक व बगदाद रेलवे येवढ्यांचेच काम त्यांजकडे आहे. अमेरिकेंतील स्टचार्डर्ड ऑईल कपनीनें पेट्रोलचा जर्मनींतील सर्व व्यापार आपल्या हातीं घेतला आहे. त्या धंद्यांत स्टचांडर्ड कंपनीला तेथें कोणी प्रतिस्पर्धी नाहीं. यामुळें ही कंपनी या धंद्यांत तेथें सुलतानी अम्मल गाजवीत असते. स्टचांडर्ड कंपनीचें हें बड मोडून टाकण्याचा उद्योग त्यांनीं सध्या हातीं घेतला आहे. रुमानियांतील कित्येक तेलाच्या विहिरी ड्यूश ब्यांकेच्या हातीं आहेत. याचा सर्व कारभार जर्मन साम्राज्य सरकारानें आपल्या हातीं घ्यावा व एकंदरीनें पेट्रोल तेलाचा सर्व व्यापार खाजगी कंपन्यांकडे न राहता तो साम्राज्य सरकारच्या हातीं जावा, अशी खटपट ते करीत आहेत. या खटपटीस यश आलें, तर अमेरिकन रॉकफेलरचे (स्टचांडर्ड ऑईल कपनीचे मालक.) जर्मनींतील बंड मोडलें जाईल, यांत शंका नाहीं.

ग्विनर हे पराकाष्ठेचे स्पष्टवक्ते आहेत. प्रशियन पार्लमेंटांत तिजोरी कामदाराचे त्यांनीं वाभाडे काढले, त्यावेळपर्यंत अशा प्रकारची स्पष्टोक्ति पार्लमेंट सभेंत कोणाच्याहि ऐकिवांत आली नव्हती. एका वेळीं एका मोठ्या मेजवानीसाठीं कित्येक मोठमोठे अमेरिकन व्यापारी व प्रत्यक्ष

अमेरिकन वकील व्यापारी सभेच्या दिवाणखान्यांत जमले असतां ग्विनर यांनीं अमेरिकन तिजोरीच्या कारभारावर अगदीं उघडपणें कडक टीका केली. ग्विनर यांस स्वभाषेशिवाय इंग्लिश, फ्रेंच आणि स्पॅनिश या भाषांचें उत्कृष्ट ज्ञान आहे. इंग्रजी भाषेवर एकाद्या मोठ्या पंडितासारखें त्यांचें प्रभुत्व आहे. या सर्व भाषांतील ग्रंथांचें विस्तृत परिशीलन त्यांनीं केलें असून त्याची स्मरणशक्तिहि मोठी तीव्र आहे. शेक्सपीयर, मोलीअर, गटे, शीलर इत्यादि कवींचे कित्येक ग्रंथ त्यास मुखोद्गत आहेत. एके वेळीं डचूश ब्यांकेतील एक कागद त्यांच्या माहितीसाठीं त्यांजकडे पाठविण्यांत आला होता, त्यावर सही करून कारकुनाकडे तो परत पाठवितांना बाजूंच्या समासांत देवघेवीच्या व्यापाराबद्दलचें शेक्सपीयरचें एक वचन लिहिलें होतें. प्रशियन पार्लमेंटांत एकदां ते म्हणाले, "कर्ज फार काढण्यानें आपला घोटाळा झाला आहे, असे नाहीं. उलट वाजवीपेक्षा कमी रकमा आपण उसन्या घेतल्या आहेत. योग्य रीतीनें कर्ज कसे काढावे हें समजणें अगत्याचें आहे. पैशाच्या कारभारांत चांगली बुद्धिमत्ता पाहिजे ही गोष्ट खरी, तथापि कर्ज काढण्यांत तर अलौकिक बुद्धीचीच जरूर आहे."

डचूश ब्यांकेचें मूळ भांडवल पधरा कोट रुपयांचें असून तिची गंगाजळी साडेसात कोट रुपयाची आहे. सुमारें सव्वा अब्ज रुपयांची लोकांची ठेव या ब्यांकेपाशीं आहे. खुद्द जर्मनींत या ब्यांकेच्या बारा शाखा असून त्यांशिवाय लंडन, कॉन्स्टान्टीनोपल व ब्रुसेल्स येथेंहि एकेक शाखा आहे. एकंदर कामगारांची संख्या सहा हजार आहे. या स्वतःच्या शाखांशिवाय दुसऱ्या खाजगी व्यापाऱ्याच्या द्वारेंहि या ब्यांकेचा कारभार साऱ्या जगभर पसरला आहे. दक्षिण अमेरिकेंतील अर्जेंटाइन, चिली, पेरु, बोलिव्हिया, ब्राझील, मेक्सीको इत्यादि देशांतील अनेक धंदे या ब्यांकेच्या हातीं आहेत. जर्मनींतील एका मोठ्या विजेच्या कंपनीचीहि मालकी या कंपनीकडे आहे. जर्मन साम्राज्यात या ब्यांकेचा कारभार इतका वाढला आहे, कीं ज्यांत प्रत्यक्ष अथवा परंपरेनें या ब्यांकेचा हितसंबंध नाहीं, असा एकहि धंदा तेथें नाहीं. ग्विनर यांचा संबंध या ब्यांकेशीं

जडल्यास सुमारें वीस वर्षांचा काळ लोटून गेला. या अवधींत आपल्या भागीदारांस केव्हांहि दहा टक्क्याहून कमी नफा या ब्यांकेनें दिला नाहीं. गेलीं पांच वर्षें हें नफ्याचें प्रमाण साडेबारा टक्क्यांचें झालें आहे.

जर्मनीचे युवराज.



सध्यांचे जर्मनीचे युवराज गादीवर आले, म्हणजे साम्राज्य शांति-सुखाचा अनुभव घेईल, असें एका सुप्रसिद्ध इंग्रज लेखकानें म्हटलें होतें. सध्यांचे केसर वुइलियम यांचा स्वभाव अत्यंत चळवळ्या असून त्यांचें कर्तृत्वहि पुष्कळ वरच्या प्रतीचें आहे. युवराजांच्या आंगीं हे गुण इतक्या स्पष्टपणें निदर्शनास येत नाहींत, इतकाच या इंग्रज लेखकाच्या ह्मणण्याचा अभिप्राय आहे. त्यांचा स्वभाव उलाढाल्या करण्याचा नसल्यामुळे केसर वुइलियम यांच्या कारकीर्दीत जी अस्थिरता साऱ्या जर्मनीभर दिसून येते, ती मंदावेल असा अजमास आहे.

युवराजांचा स्वभाव कसा आहे ? असें एकाद्या जर्मनास कोणीं विचारलें तर त्याला एकच उत्तर तो पूर्वी देत असे. 'युवराज हे कोऱ्या कागदासारखे आहेत,' असें जर्मन लोक पुष्कळ वर्षांपासून ह्मणत असत. युवराजासारख्या उच्च दर्जाच्या मनुष्याच्या स्वभावाची पारख त्याच्या भाषणादिकांवरून होत असते; पण सांप्रतचे बादशाहा विलक्षण बोलके असल्यामुळें युवराजास तोंड उघडण्याची संधि त्यांनीं बहुधा कधीं प्राप्त होऊंच दिली नाहीं. राजकुलीन माणसास सामान्य जनसमुहापुढें येण्याचे प्रसंग अगोदरच थोडे, त्यांतून सर्व भाषणाचा भाग खुद्द बादशहांनींच आपल्या शिरावर घेतल्यावर युवराजास लोकांपुढें येण्याची संधि प्राप्त व्हावी कशी ? पण ही गोष्ट पुष्कळ वर्षांपूर्वीची झाली. युवराज अल्पवयाचे होते, तेव्हांची ही गोष्ट आहे. ते वयानें वाढत गेले, तसतशी त्यांची लोकांना अधिक ओळख पटूं लागली. आपल्या वयाच्या एकतिसाव्या वर्षीं ते कर्नल झाले आणि त्या वेळेपर्यंत ज्या ज्या प्रसंगीं जनतेसमोर

येण्याची संधि त्यांस सांपडली, त्या त्या प्रसंगीं त्यांचें बुद्धिस्वातंत्र्य आणि त्यांचा करारी स्वभाव याची ओळख त्यांनीं लोकांत पटविली. एकादा मनुष्य केवळ मोठ्या अधिकारावर आहे ह्मणूनच त्याचें सारें म्हणणें ऐकावयाचें असा युवराजांचा स्वभाव नाहीं; ही गोष्ट त्यांनीं लोकांच्या प्रत्ययास पूर्णपणें आणून दिली आहे. होहेनझोलार्न घराण्याचा हा स्वभावविशेष पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. सांप्रतचे बादशहा आणि त्यांचे वडील हे सुद्धां स्वतंत्र वृत्तीचे होते. युवराजांच्या उमद्या आणि करारी स्वभावाची ओळख लोकांस जों जों पटूं लागली, तों तों त्यांची लोकप्रियताहि वाढू लागली. वडिलांचे काहीं विशिष्ट गुण यांच्या अंगीं नाहींत; तथापि एकंदर साम्राज्याची यांच्यावर फार भक्ति आहे, एवढी गोष्ट मात्र खरी. ते राजमुकुट धारण करतील त्या वेळीं साऱ्या जर्मन साम्राज्यास मनःपूर्वक आनंद होईल यांत शंका नाहीं. त्यांची कारकीर्द शांततेची व अबादानीची राहील, असें साऱ्या जर्मन लोकांस वाटत आहे.

जर्मन युवराज हे दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणारे नाहींत, याबद्दलचा पहिला अनुभव त्यांच्या विवाहप्रसंगीं लोकांस आला. आपलें प्रेम जिच्या ठिकाणीं असेल, अशीच स्त्री पत्नी करावयाची, असा त्याचा निश्चय होता. जर्मन राजघराण्यांत आजपर्यंतचे बहुतेक विवाह शुद्ध प्रेमाचे नसून बरेचसे राजकीय दृष्टीचे होते; पण ही पद्धत साप्रतच्या युवराजांनीं मोडून टाकली. यांच्या भावी वधूची व यांची प्रथम भेट १९०५ सालच्या वसंत ऋतूंत झाली. तिचें नांव सेसिली असें असून म्यायलेनबर्ग स्क्रेरिन प्रांताची ती डचेस आहे. बर्लिन राजधानींत तिचा प्रथम प्रवेश झाला, तेव्हां लोकांनीं मोठ्या अपूर्व उत्साहानें तिचें स्वागत केलें. हिजपासून युवराजांस चार पुत्रांची प्राप्ति झाली आहे.

युवराज हे अगदीं स्वतंत्र वृत्तीचे आहेत, या गोष्टीचा दुसरा दाखला १९०७ सालीं आला. बादशहाभोंवती असलेल्या लोकांची वर्तणुक असावी तशी चोख नाहीं, अशाबद्दल 'झकुम्फट्' नांवाच्या एका पत्रांत कांहीं प्रच्छन्न लेख येऊं लागले. या पत्राच्या चालकाचें नांव म्याक्झीमिलियन हार्डन् असें होतें. हा लेखक विलक्षण स्पष्टवक्ता आहे, अशी

त्याची ख्याति होती. खुद्द बादशहा सर्व वर्तमान पत्रें स्वतःच वाचीत असत असें नाहीं. वर्तमानपत्रांतील महत्त्वाचा मजकूर कापून तो त्यांजकडे पाठविण्यांत येत असे व त्यांतील कांहीं भाग त्यांच्या अवलोकनांत येई. यामुळें बादशहांचे दोस्त प्रिन्स मुलेनबर्ग व त्यांचे लष्करी हस्तक जनरल कौट कुनो फॉ मोल्टके यांजवर सदरील पत्रानें लिहिलेले कडक लेख त्यांच्या अवलोकनांत आले नाहीत; पण या लेखांनीं साऱ्या देशभर अगदीं चळवळ उडवून सोडली होती. अगदी पोरांसोरांपासून तों बुढ्ढ्यालोकांपर्यंत तो एक चर्चेचा विषय होऊन बसला होता; पण बादशहांस मात्र या गोष्टीची गन्धवार्ता नव्हती. लोकांत अशा प्रकारची चर्चा चालू आहे, ही गोष्ट बादशहांच्या कानावर घालण्याचें धैर्य कोणास होईना. खुद्द आपल्या मित्रमंडळीवर वर्तमानपत्रांत उघडपणे कडक टीका होत आहे, ही गोष्ट अर्थातच कोणाला रुचण्यासारखी नव्हती. ही अप्रिय; पण पथ्यकर गोष्ट बादशहांच्या नजरेस आणण्याचा निश्चय युवराजांनीं केला. युवराजांकडून सर्व हकीकत कळल्यानंतर मुलेनबर्ग आणि मोल्टके यांस बादशहांनीं राजवाडा बंद केला. यानंतर त्या पत्राचा सम्पादक हार्डन याजवर कोर्टांत फिर्याद होऊन त्या वेळी झालेल्या चौकशींत फार विलक्षण गोष्टी बाहेर पडल्या. यामुळे मुलेनबर्ग–मोल्टके मंडळाचें बादशहांवरील वजन साफ नाहींसें झालें. अशा प्रकारच्या गलिच्छ गोष्टींचा खल भरकोर्टांत होऊ नये, अशी जर्मन लोकांची पुष्कळ इच्छा होती; तथापि एकंदरीनें झालें तें योग्यच झालें, असें त्यांस वाटले. बादशहाभोंवतीं अशुद्ध दानतीच्या लोकांचा पडलेला गराडा युवराजांनीं फोडून टाकला, याबद्दल लोकांस फार संतोष वाटला.

योग्य प्रसंगीं लोकांची क्षिति न बाळगता अथवा स्वतःच्या मोठेपणाच्या खोट्या अभिमानास बळी न पडतां न्याय्य गोष्टी करण्यासाठीं ते किती निर्धाराने वागतात, याचें आणखी एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. कौट फॉ हॉचबर्ग या नांवाचे त्यांचे एक स्नेही होते. त्यांजवर अमेरिकेंत पैशाच्या अफरातफरीसंबंधीं एक खटला चालू झाला. या बाबतींत युवराजांकडून आलेलीं कांहीं खाजगी पत्रें पुराव्यांत दाखल कर-

ण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्या पत्रांत युवराजांच्या थोर पदास कमीपणा आणण्याजोगा काहीं मजकूर असण्याचा सभव आहे, असें वाटून तीं भर कोर्टात वाचलीं जाऊं नयेत अशी जर्मन लोकांची इच्छा होती. कारण तीं पत्रे प्रसिद्ध करण्यासाठीं लिहिलीं नसून तीं केवळ खाजगी स्वरूपाचींच होतीं. हीं पत्रें पुराव्यांत दाखल करण्याची परवानगी कौट यांनीं युवराजांपाशीं मागितली. युवराजांनींहि आपल्या मित्राच्या बचावासाठीं तीं कोर्टात दाखल करण्याची परवानगी दिली. पत्रें कोर्टात वाचलीं गेलीं, तेव्हां युवराजांच्या थोरवीस कमीपणा आणणारा एक शब्दहि त्यांत नसून मित्रप्रेमानें त्यांचें अंतःकरण किती भरलें होतें, हें मात्र उघडकीस आलें. युवराजांच्या दानतीचें इतकें स्पष्ट चित्र दुसऱ्या कोठेहि पहावयास सांपडावयाचें नाहीं. वरील पत्रांपैकीं एकांत ते ह्मणतात, "कधीमधी बाबा मजपाशीं राजकारणाच्या गोष्टी बोलत असतात. असे प्रसग मला फार प्रिय आहेत; पण ते अगदीं थोडे येतात, याचेंच मला वाईट वाटतें." यावरून राजकारणाचीहि युवराजांस किती आवड आहे, हे उघड दिसून येते. वरील खटला संपल्यानंतर थोड्या दिवसांनीं बादशहांच्या उजव्या हातास कांहीं इजा झाल्यामुळें सरकारी कागदपत्रावर राजमोहोर करण्याचें काम थोडे दिवस युवराजांकडे आलें होतें.

युवराज कोणाचीहि भीडमुरवत ठेवीत नाहींत. या त्यांच्या स्वभावाचा विशेष दाखला १९११ सालीं आला. मोरोक्को प्रकरणांत आपला लाग साधला नाहीं, असा जर्मन लोकांचा समज झाला होता. फ्रान्सशीं युद्ध पुकारण्यास सारें राष्ट्र एकमतानें उद्युक्त झालें असतां बादशहांनीं पडती घेऊन युद्ध थांबविलें, याबद्दल सारें जर्मन राष्ट्र संतापानें खवळून गेलें होतें. या वेळीं भरलेल्या पार्लमेंटाच्या सभेंत या प्रकरणासंबंधीं कडाक्याचे वादविवाद झाले. लोकपक्षाच्या सभासदांनीं सरकारावर उघडपणें भेकडपणाचा आरोप केला. कान्सरवेटीव पक्षाचे पुढारी हर्र फॉं हाइड ब्रँड यांचें भाषण अत्यंत कडक असें झालें. सभेंतील आपल्या नेमलेल्या जागीं युवराज बसले होते. जर्मनीचे मुख्य प्रधान डॉ० फॉं बेथमन हालवेग् यांजवर हाइड ब्रँड हे कोरडे उडवूं लागले, तेव्हां तें भाषण युवराजांस

फार मानवल्याचें उघड दिसून आलें. लोकांच्या नजरेस येईल इतक्या उघडपणें ते मोठ्यानें टाळ्या वाजवूं लागले. वडिलांच्या धोरणाविरुद्ध खुद्द त्यांच्याच वडील चिरंजिवांनीं आपलें मत इतक्या स्पष्टपणें प्रगट करावें, याचें सर्वांसच फार आश्चर्य वाटलें. हाइड ब्रॅड यांस उत्तर देतांना मुख्य प्रधानांनीं त्यांजवर माथेफिरूपणाचा स्पष्ट आरोप केला व परंपरेनें युवराजांवरहि ताशेरा झाडण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं; पण या प्रकरणासंबंधीं वास्तविक सामान्य लोकांचें मत काय होतें, हें युवराजांनीं उघड करून दाखविलें. या प्रसंगामुळें ते लोकांत अत्यंत प्रिय झाले.

वर सांगितलेल्या गोष्टींवरून युवराजांचा स्वतंत्र बाणा आणि कोणतीहि गोष्ट करण्यास लागणारें मनोधैर्य त्यांजपाशीं कसें आहे, हें स्पष्ट दिसून येतें. युवराज खरे स्वार आहेत असा त्यांचा लौकिक सैन्यांत यापूर्वीच पसरला आहे. कार्लरुहार्स्ट येथें झालेल्या घोड्याच्या शर्यतींत उच्च ताटीवरून आपला घोडा उडवून त्यांनीं एक वेळ पहिलें बक्षीस मिळविलें. ही धाडसीपणाची—अथवा बादशहांच्या दृष्टीनें वेडेपणाची—गोष्ट बादशाहांच्या कानीं गेली, तेव्हां बराकींत थोडा वेळ अटकेंत राहण्याची शिक्षा त्यांनीं युवराजांस फर्माविली होती. कोणतीहि धाडसाची गोष्ट करण्यास त्यांचा पाय सदोदित पुढे असतो. एके वेळीं झेपेलिन यानांत बसण्याची इच्छा त्यांस झाली. त्या वेळीं झेपेलिन विमान हल्लींइतक्या पूर्णावस्थेस पोहोचलें नव्हतें. आव्हील राइट नांवाच्या वैमानिकास पॉटस्ड्याम येथें बोलावून त्याजबरोबर एका यानांतून ते वर गेले आणि सुखरूप परत आल्यानंतर आपल्या आकाश प्रवासाची गोष्ट त्यांनीं आपल्या वडिलांस कळविली. ते किती निधड्या छातीचे शिकारी आहेत, याचा प्रत्यय त्यांच्या हिंदुस्थानच्या प्रवासांत अनेकवार आला आहे.

सर्व प्रकारच्या मैदानी व मर्दानी खेळांचीहि त्यांस फार आवड आहे. अशा प्रकारच्या खेळांत ते इतके दिवस घालवितात कीं, आपला खरा राजकीय पेशा हे विसरले कीं, काय अशी शंका लोकांस येऊं लागते; पण वस्तुस्थिति तशी नाहीं, हें मात्र खरें आहे. होहेनझोलार्न

घराण्याचा शिपाईबाणा त्यांच्या आंगीं पूर्णपणें भरलेला आहे. बर्लिन आणि पॉटस्ड्याम यांजसारखा चैनी शहरांपासून लांब अंतरावर असलेल्या ड्यांझिगच्या किल्ल्यांत त्यांनीं दोन वर्षें लष्करी नौकरी केली आहे. या अवधींत लष्करी कामाशिवाय दुसऱ्या कोणत्या कामांत त्यांनीं आपलें मन गुंतविलें नव्हते. मधून मधून नाटकें पाहणें, आकाश यानांतून प्रवास करणें अथवा समुद्रांत नौकाविहार करणें इत्यादि गोष्टींची आवड त्यांस असली; तरी लष्करी शिक्षण घेण्याकडे त्यांचें लक्ष कमी नाहीं. ते कर्नलच्या हुद्यापर्यंत चढले, ते केवळ मोठेपणामुळें नसून स्वतःच्या मेहनतीनें व कर्तबगारीनें चढले आहेत. लष्करांच्या हालचालींत ते कुशाग्रबुद्धीने काम करतात, असें अभिप्राय अनेक तज्ज्ञांनीं अनेक वेळां प्रगट केले आहेत. कसा तरी वेळ घालवावा, एवढ्याचसाठीं ते मर्दानी खेळ खेळतात असे नाहीं. मर्दानी खेळांची आवड लोकांत उत्पन्न व्हावी यासाठींच अशा प्रकारच्या खेळांत ते व त्यांचे चुलते प्रिन्स हेनरी पुढाकार घेत असतात. गोल्फ, हॉकी, फुटबॉल, पोलो इत्यादि खेळांची जर्मन लोकांस तादृश आवड नव्हती. ती आवड प्रिन्स हेनरी व युवराज यांनीं प्रथम उत्पन्न केली.

युवराजांची शरीरयष्टि उंच असून ते सडपातळ असल्यामुळें ते अशक्त असावेत, अशी कल्पना आरंभीं साहजिक मनांत येते. त्यांच्या शरीराच्या आकारावरून व चेहऱ्यावरून त्यांच्या शरीरशक्तीची व बुद्धिमत्तेची खरी अटकळ करतां येत नाहीं. होहेनझोलार्न घराण्याचा लष्करी बाणा त्यांच्या ठिकाणीं असेल, असें त्याच्या बाह्यस्वरूपावरून कोणासहि वाटावयाचें नाहीं. वुइलियम बादशाहांच्या चेहऱ्यावरील उग्रपणा त्यांच्या ठिकाणीं नाहीं. उलट त्यांच्या चेहऱ्यावर बालत्वाचें हास्य अजूनहि स्पष्टपणें दिसतें. ते अंतःकरणाचे कोमल असावेत, असें त्यांच्या हंसऱ्या चेहऱ्यावरून उघड लक्षांत येतें आणि ते तसे आहेतहि. अतःकरणाची कोमलता हा विशेष गुण त्यांचे आजे फ्रेड्रिक यांजपासून त्यांस प्राप्त झाला आहे. त्यांना संगीताची फार आवड असून व्हायोलिन (सारंगी) त्यांस फार उत्तम वाजवितां येतें. ते स्वभावानें सौम्य आणि

अगदीं शालीन आहेत. राजकुलीनत्वाचा खोटा अभिमान त्यांच्या ठिकाणीं मुळींच नाहीं. पॉटस्ड्याम येथील एका चांभाराकडे झालेल्या लग्नाच्या मेजवानीस ते हजर राहिले होते. मोटार गाडी भरधांव पळवीत नेण्याचा त्यांना मोठा शोक आहे. एके वेळीं अशाच रीतीने आपली मोटार चालवीत असता रस्त्याच्या कडेला एक गरीब शेतकरी आजारी होऊन पडल्याचें त्यांस आढळलें. त्याला तावडतोब आपल्या गाडीत घालून त्यांनीं त्याला इस्पितळात पोहोंचविलें.

आपली पत्नी व आपलीं मुले यांजवर त्यांचें अतिशय प्रेम आहे व त्यांच्या खालोखाल त्यांच्या प्रेमाचा विषय झटला झणजे नेपोलियन बादशहा हा होय. पॉटस्ड्याम येथील त्यांच्या राहत्या राजवाड्यांत नेपोलियन बादशहाचीं चित्रे, दगडी पुतळे, छोट्या मूर्ति इत्यादिकांचा भरणा जिकडे तिकडे आढळून येतो. नेपोलियनने आपल्या काळीं प्रशियाची वाताहत करून त्याला फ्रान्सचा एक प्रांत बनविलें होतें. तथापि तो खरा योद्धा असून राज्याचा गाडा योग्य रीतीने हाकण्याची कला पूर्णपणें जाणत होता, असें युवराजांचें मत असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं युवराजांची भक्ति जडली आहे. युवराज आपल्या वडिलांपेक्षांहि लष्कराला अधिक प्रिय झाले आहेत. जर्मनींत प्रबळ असलेल्या लष्करी पक्षाला बादशहाचीं शातिसूत्रे पसत पडत नाहींत. त्यापेक्षां युवराजांचीं लष्करी बाण्याचीं भाषणें त्यांस अधिक आवडतात.

हिंदुस्थानात त्यांनीं केलेल्या प्रवासाविषयींचें 'माझी शिकारी रोजनिशी' या नांवानें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत एके जागीं ते झणतात. "माझे पूज्य पूर्वज फ्रेड्रिक दी ग्रेट यांच्या मताप्रमाणेंच माझेंहि मत आहे. आपल्या प्रजाजनांपैकीं प्रत्येकाला स्वतःच्या सुखाचा व मुक्तीचा मार्ग स्वमतानें आक्रमूं द्यावा, असें फ्रेड्रिक बादशहाचें मत होतें. मलाहि तसेंच वाटतें." युवराज तक्तानाशिन झाल्यानंतर त्यांचें हेंच मत कायम राहिलें, तर जर्मन राष्ट्राला चांगले दिवस येतील यांत शंका नाहीं.

आगस्ट थायसेन.

जर्मनीच्या अवाढव्य व्यापारी इमारतीच्या आद्य जनकापैकीं, आगस्ट थायसेन या नांवाचे एक गृहस्थ आहेत. "विश्रांति घेतली, तर मी गंजून जाईन" If I rest, I rust. हे शब्द नेहमीं त्यांच्या तोंडांत असतात आणि एवढ्याच मोजक्या शब्दांत त्यांच्या जीवनक्रमाचें सारें रहस्य सांठविलेलें आहे. किंबहुना याच मूळ पायावर त्यांच्या जीवनक्रमाची उभारणी झाली आहे. पोलाद, लोखंड आणि दगडी कोळसा या जिनसांचा एवढा प्रचंड व्यापार त्यांनीं उभारला आहे की, त्यांना लोकांनीं राजा थायसेन ही पदवी दिली आहे. त्यांना कोणी कोणी जर्मन कार्नेगीहि म्हणत असतात. जर्मनीनें आपला व्यापार सांप्रत विलक्षण अट्टाहासानें साऱ्या जगभर वाढविला आहे. जर्मन व्यापाराची अशी वाढ होण्यास जे पुरुष कारण झाले, त्यांत दीर्घोद्योग आणि चिकाटी या बाबतींत थायसेन यांची बरोबरी करणारा क्वचितच आढळेल. फ्राकोप्रशियन युद्धानंतर जर्मन व्यापाराची इतकी विलक्षण भरभराट झाली कीं, ती खरोखर असंभवनीय कोटींतीलच असावी असें वाटतें.

१८८५ पासून १९१० पर्यंतच्या केवळ पंचवीस वर्षांच्याच इतिहासांत जर्मनीची लोखंडापुरतीच वाढ कशी झाली ती पहा. १८८५ सालीं जर्मनींत ३६,८८,००० टन लोखंड पैदा झालें आणि ही पैदास वाढता वाढतां ती १९१० सालीं सुमारें १,४८,००,००० टनापर्यंत हेऊन पोहोचली. त्याचप्रमाणें कोळशाच्या पैदाशींतहि दोनशे पटीहून अधिक वाढ झाली. पंचवीस वर्षांपूर्वी इंग्लंड या बाबतींत किती तरी जर्मनीच्या पुढें होतें. आतां या जिनसांतली जर्मनीची पैदास कांहीं बाबतींत इंग्लंडच्या दुप्पटीजवळ झाली असून पोलादाची वाढ तर अडीचपटीच्याजवळ आली आहे. त्याचप्रमाणें पोट्याश, जस्त, शिसें, तांबें इत्यादि जिनसांची वाढ चाळीस वर्षांच्या अवधींत साडेसहा पटीनें झाली आहे. लोखंड आणि पोलाद या बाबतींत जर्मनीहून पुढे असलेला देश आज फक्त अमेरिका

हाच आहे, युरोपांत जर्मनीची बरोबरी करणारा तर एकहि देश नाहीं, फक्त दगडी कोळशाच्या बाबतींत मात्र जर्मनी इंग्लंडच्या मागें आहे.

या अवाढव्य व्यापाराचीं सूत्रें ज्या व्यक्तींच्या हातांत आहेत, त्यांतच रूर नदीवरील मुलहीम ग्रामवासी आगस्ट थायसेन यांची प्रमुखत्वाने गणना करतां येईल. अमेरिकेंत तेलाच्या व्यापारांत रॉकफेलर आणि पोलादाच्या व्यापारांत कार्नेगी यांचें जे महत्त्व आहे, तेंच आगस्ट थायसेन यांचे जर्मनींत आहे, असे म्हणावयास हरकत नाहीं. या तिघांच्या एकंदर जीवनक्रमांतहि काही बाबतींत विलक्षण साम्य आढळून येते. हे तिघेहि अगदीं अकिंचन स्थितींतून सांप्रतच्या वैभवाच्या शिखरास पोहोंचले आहेत. रॉकफेलर हे अद्यापहि एकसारखे कार्यव्यापृत असतात आणि तसेच थायसेनहि कोणत्या तरी कामांत सदोदीत गुंतलेले असतात. कार्नेगी यांनी व्यापारांतून आपले अंग काढून ते आतां विश्रांति घेण्याच्या मार्गास लागले आहेत. पुस्तकालये बांधणें आणि इतर लोकोपयोगी कार्ये करणे अशा उद्योगांत कार्नेगी आतां पडू पहात आहेत; पण थायसेन यांनीं आपल्या मानेवरील जू अद्यापि झुगारून दिलेले नाहीं. कोळसे खणून काढण्यात आणि पोलादाचा रस काढण्यांत अद्यापहि त्यांस आनंद वाटत आहे. काम करतां करतां मरण यावें असें बिस्मार्क म्हणत असत. ही म्हण थायसेन यांस अक्षरशहा लागू पडते. त्यांस अद्यापपर्यंत विश्रांतीची जरूर केव्हांहि भासली नाही. कित्येक प्रसंगीं एका दिवसांत त्यांनीं तीन चिटणिसांस दमविलें आहे. स्वतःच्या धंद्यानिमित्त सदोदीत फिरतीवर राहण्यात त्यांचा काळ जातो. खुद्द त्यांचें रहातें घरहि धंद्याच्या जागेसारखेंच सजाविलेलें आहे. त्यांच्या निजावयाच्या खोलीला जोडून त्यांची काम करण्याची खोली आहे माणसें आणि लोखंड हीं निरुद्योगी राहिलीं म्हणजे त्यास गंज चढतो, असें त्यांचे म्हणणें आहे.

अमेरिकेंत ज्याप्रमाणें कित्येक व्यापारांची वाढ अगदीं विलक्षण रीतीनें झाली, त्याचप्रमाणें थायसेन यांच्या धंद्याची वाढहि अगदीं विलक्षण रीतीनें झाली आहे. रॉकफेलर व ऑड्र्यूज या पेढीनें आपला तेलाचा धंदा केवळ १४५०० पौंडाच्या भांडवलावर चालू केला. याच सुमारास

आगस्ट थायसेन यांनीं आपल्या धंद्यास सुरुवात केली. त्या वेळीं त्यांजपाशीं फक्त १२०० पौंडाचें भांडवल होतें. या भांडवलावर त्यांनीं एक लोखंडाची गिरणी सुरू केली. त्या वेळीं त्यांत साठ मजूर कामावर लावले होते. त्याच कारखान्यांत आज पन्नास हजार मजूर कामावर आहेत. हॅम्बे नगांवीं डयूशर केसर या नांवाची त्यांची स्वतःची एक दगडी कोळशाची खाण असून तींतून २६००० बेलदार पन्नास लक्ष टन कोळसा दरसाल बाहेर काढीत आहेत. त्यांच्या इस्टेटीची नक्की किमत अद्यापि कोणीं केलेली नाहीं; पण ती दोन कोट पौंडांपर्यंत असावी असें ह्मणतात. आज मित्तीला कित्येक दगडी कोळशाच्या खाणी, पोट्याश वगैरे क्षारांच्या खाणी आणि कित्येक लोखंडाचे कारखाने त्यांच्या मालकीचे असून ऱ्हाइन नद्यांच्या कांठीं असलेल्या हॅम्बोर्न, डचशबर्ग, मुलहीम, इत्यादि बंदरांच्या द्वारें त्यांच्या व्यापाराचें जाळें साऱ्या जगभर पसरत आहे. लोखंडाच्या कित्येक खाणी त्यांच्या मालकीच्या असून त्या अशोधित धातूंतून पक्के जिन्नस तयार करण्याचे कारखानेहि त्यांच्या मालकीचे आहेत. हे जिन्नस स्वतःच्या मालकीच्या आगबोटींतून, स्वतःच्या मालकीच्या गोद्यांत भरून बाहेर देशीं पाठविण्याचें काम ते करीत असतात. काळ्या समुद्रावरील रशियन हद्दींतील निकोलेफ बंदरीं त्याच्या स्वतःच्या गोद्या व बखारी बांधलेल्या असून तेथून अशोधित धातू ऱ्हाइन नदीकाठच्या त्यांच्या लोखंडाच्या कारखान्यात येत असतात. ब्राझील देशांत व हिंदुस्थानांतहि स्वतःच्या मालकीच्या बखारीवर आपल्या पितृदेशाचें निशाण त्यांनीं फडकाविलें आहे. ज्या अपेशी मोरोक्को प्रकरणांत जर्मनीला हार खावी लागली, त्यांत आगस्ट थायसेन यांचें अंग होतें; ही गोष्ट फार करून कोणास ठाऊक नसेल. सुलतान अबदुल अझीज यांना एक मोठी रक्कम कर्जाऊ देऊन तिच्या बदल्यांत मोरोक्कोंतील एका प्रचंड लोखंडाच्या खाणीचा हक्क मिळविण्याचा बेत त्यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी केला होता; पण त्या वेळीं जर्मन सरकारास तो बेत पसत पडला नाहीं; पण पुढें थोड्याच वर्षांनीं डयूसेलडॉ आणि रेमशीज येथील एका व्यापारी पेढीनें थायसेन यांच्या कल्पनेस मूर्त रूप दिलें व या वेळीं या पेढीला सरकारचें पाठबळहि मिळालें. पुढें या प्रकरणांत राज-


हीय स्वरूप येऊन फ्रान्स व जर्मनी ह्यांमध्यें युद्ध जुंपण्याचा प्रसंग कसा आला, हें जगाला आतां विदित झालेंच आहे.

दोन तीन सलग्न धंदे एकत्र चालवून त्या सर्वांचें खेळतें भांडवल एकत्र करावयाचें, ही कल्पना हे प्रथम अमेरिकेपासून शिकले. एक दगडी कोळशांची कंपनी, एक लोखंड गाळणारी कंपनी आणि एक पोलाद तयार करणारी कंपनी असे तीन उद्योग त्यांनीं प्रथम एकत्र केले, आणि अशा रीतीनें कोळसा, लोखंड आणि पोलाद यांचा सर्व व्यापार हळू हळू त्यांनीं एका केंद्रांत आणला. यामुळें या जिनसांची पैदास आणि त्याचे बाजारभाव याचें योग्य नियमन त्यांस स्वतः करता येऊं लागलें. व्यापारी संघ निर्माण करून एकादी जिन्नस त्या संघानें पूर्णपणें आपल्या हातांत ठेवावी, या कल्पनेचा मूळ उगम अमेरिकेत झाला. अमेरिकेंतील तेलाचे व पोलादाचे 'ट्रस्ट' हीं या कल्पनेचीं दृश्य फळें होत. अलीकडे हे ट्रस्ट लोकांस फार नावडते होऊं लागले आहेत. एकादी जिन्नस पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेऊन मग ती वाटेल त्या किंमतीनें विकावयाची, हाणजे सभ्यपणें व कायदेशीर रीतीनें लोकांस बुचाडणेंच होय, असा आक्षेप या ट्रस्टांवर अलीकडे येऊं लागला आहे. तथापि आगस्ट थायसेन हे या कल्पनेचे पूर्ण भक्त आहेत. कित्येक वेळां एकाद्या जिनसाची वाजवीपेक्षां फाजील पैदास होऊन त्यामुळें व कित्येक वेळा व्यापाऱ्यांच्या फाजील चढाओढीमुळें सबध धंद्यास धोका येत असतो. अशा प्रकारचा धोका टाळण्यास ट्रस्ट हेंच उत्तमोत्तम साधन आहे, असें त्यांचें हाणणें आहे. ॲटलांटिक महासागराच्या परतीवरून आणलेल्या या कल्पनेच्या कमलावर त्यांनीं स्वतःची अशी आणखीहि एक मखलाशी केली आहे. अमेरिकेंतील डिरेक्टरांच्या मंडळाऐवजीं एकाच व्यक्तीच्या हातीं त्या मंडळाचे सर्व अधिकार राहतील, अशी व्यवस्था त्यांनीं केली. स्टॉन्डर्ड ऑइल कंपनी, स्टील कारपोरेशन, आणि अमेरिकेंतील इतर अवाढव्य धंदे यांच्या तुलनेनें थायसेन यांचा उद्योग अति अल्प आहे, ही गोष्ट खरी; तथापि सदरील अमेरिकन कंपन्यांच्या भागीदारांच्या सभेंत कित्येक वेळां जसे हातघाईचे प्रसंग येतात, तसा

प्रकार थायसेन यांच्या सभेंत कधींहि घडत नाहीं. कारण थायसेन यांचे ट्रस्ट ह्मणजे त्यांतील भागीदारहि तेच आणि डिरेक्टरहि तेच असें झालें आहे. ट्रस्टांसंबंधीं सर्व अधिकार एकाद्या सुलतानाप्रमाणें ते एकटेच गाजवीत असतात. यांचा एक भाऊ व वडील मुलगा असे दोन भागीदार याच्या धंद्यांत आहेत; पण ते केवळ नांवाचे मात्र भागीदार आहेत. धंद्यातील सारी सत्ता जितकी या मुलहिमच्या सुलतानाच्या ताब्यांत आहे, तितकी अमेरिकन ट्रस्टवाल्यांच्या स्वप्नींहि आली नसेल. हा सुलतान कोणत्याहि ब्याकेर्शी संबंध ठेवून त्यांची गुंतागुंत आपल्या धंद्याशीं होऊं देत नाहीं. ट्रस्टांची पद्धत मोडून टाकावी याकरतां अमेरिकन सरकार विलक्षण खटपट करीत आहे. उलटपक्षीं त्यांचें साम्राज्य जर्मनींत अधिक अधिक वाढत्या प्रमाणांत आहे. जर्मनींतील एकेक ब्यांक अनेक धदे एकाच वेळीं आपल्या हातीं घेऊ लागली आहे. पुष्कळ मोठ्या धंद्याच्या डिरेक्टरांच्या मंडळांत ब्यांकांचे डिरेक्टरहि प्रमुखत्वानें काम करीत असतात. ड्रेसडेनर बॅंक नावाच्या पेढीच्या हातीं, दोनशें कंपन्यांचें काम असून सव्वा दहा कोट पौंडांहून अधिक किंमतीच्या रकमा या कंपन्यांच्या धंद्यांत गुंतल्या आहेत; पण सुलतान थायसेन यांच्या धंद्यांत एकाहि ब्यांकेचें बोट शिरकलेले नाहीं. त्यांच्या कोणत्याहि धंद्यांतले भाग बर्लिनच्या सराफकट्ट्यावर विक्रीसाठीं नसतात. सट्ट्याच्या खरेदीविक्रींतहि ते कधीं पडत नाहीत. सट्ट्याच्या धंद्यांत आपणास अक्षरहि समजत नाहीं, असें ते ह्मणत असतात. प्राप्तिवरील करासाठीं त्यांनीं आपलें वार्षिक उत्पन्न दीड लक्ष पौंडाचें नोंदविलें आहे. त्यांचें वास्तविक उत्पन्न याहून कितीतरी पटीनें अधिक आहे; पण अधिक होणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग धंद्याच्या वाढीकरता भांडवलाच्या रूपानें करण्याची त्यांची पद्धत असल्यामुळें ते जास्त करास पात्र होत नाहींत. अगदीं अल्प प्रमाणावर त्यांनीं आपल्या धंद्यास आरंभ केला, तेव्हांपासून धंद्याची वाढ करण्याकडे त्यांची एकसारखी दृष्टि आहे. प्रत्येक वेळीं हजार पांचशें रुपये जमा झाले, कीं ते ताबडतोब धंद्याच्या वाढीकडे लावावयाचे असा त्यांचा परिपाठ आहे. पुष्कळ पैशाची नुसती ऊब



क्रप फाँ बॉहलेन.



कौंट झेपेलीन.

घेऊन त्यांत समाधान मानणें, त्यांस पसंत नाहीं. पैशाचा उपयोग सदोदित धंद्याच्या वाढीकडेच झाला पाहिजे, असें त्यांचें मत आहे. दगडी कोळसा, लोखंड आणि पोलाद यांतील व्यापाराची सारी सत्ता अविच्छिन्नपणें त्यांच्या हातीं आली आहे. अशोधित धातू त्यांच्या मालकीच्या खाणींतून बाहेर पडतात. ज्या आगबोटींतून ती कारखान्यांत जाते, त्या आगबोटीहि त्यांच्या मालकीच्या आहेत. आगबोटी ज्या धक्क्यार्शी लागतात, ते धक्के सुद्धां त्यांनीं आपल्या मालकीचे बांधलेले आहेत. कारखान्याच्या भट्ट्यांना लागणारा कोळसा त्यांच्या मालकीच्या खाणींतूनच निर्माण होतो. या कोळशांतून व लोखंडांतून कोक, पोलादीपत्रा, चिलखतीपत्रा, नळ्या, रूळ, अमोनिया, डांबर आणि याशिवाय कित्येक रासायनिक पदार्थ तयार करण्याचे स्वतंत्र कारखाने त्यांनीं उभारले आहेत. प्रत्येक जिन्नसेच्या पैदासीकरतां लागणारा खर्च कमी कमी कसा करतां येईल, याकडे त्यांचें चित्त सदोदित गुंतलेलें असतें. याच तत्त्वावर कोणताहि धंदा यशस्वी करतां येतो, असें त्यांचें म्हणणें आहे. या तत्त्वाचें प्रतिपालन एकंदर जर्मनराष्ट्रानें चांगलें केलें असल्यामुळेंच त्यांच्या उद्योगधंद्याची राक्षसी वाढ झाली आहे. जर्मनीच्या प्रत्येक धंद्यांत यंत्रकलानिपुण लोक फार आढळतात, यांचेंहि कारण हेंच. कोणत्याहि एकाद्या गिरणींत अथवा कारखान्यांत दर दहा मजूरांमागें निदान एक यंत्रकलानिपुण इंजिनियर असावयाचाच. केरसुद्धां फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं, असा जर्मन कारखानदारांचा बाणा आहे. एकादा जिन्नस तयार करतांना त्याच्या खर्चांत काटकसर करण्याकरतां किंवा त्याच खर्चांत त्या पदार्थांतून दुसरे त्याचे आनुषंगी व्यापारी पदार्थ बनविण्याकरतां उपाय शोधून काढण्यांत जर्मन कारखानदार वर्षांचीं वर्षें मेहनत करीत असतात. चिकागोंतील कारखान्यांत पुष्कळसे आनुषंगी पदार्थ फुकट जात असतात; पण आगस्ट थायसेनच्या कारखान्यांत धुराशिवाय बाकीच्या सर्व वस्तूंचा उपयोग केला जातो. आतां या धुरांतूनहि एकादी व्यापारी वस्तु निर्माण करतां येईल कीं काय, हें पाहण्यासाठीं चार्लेटनबर्गचे कित्येक पदवीधर त्यांच्या कारखान्यांत प्रयत्न करीत आहेत.

सुमारें चार पांच वर्षांपूर्वी थायसेन यांच्या गुणाची किंमत खुद्द जर्मन सरकारनेंहि केली. बर्लिन येथील आरमाराच्या कारखान्यांत शिस्त लावण्याकरतां, सरकारनें त्यांची नेमणुक केली होती. कील येथील सरकारी गोद्यांत धंद्याच्या दृष्टीनें पुष्कळ उणीवा असल्याचें आढळून आलें होतें. खर्चांत बचत करण्याकडे कोणाचें फारसें लक्ष नव्हतें. कँट्राटदारांनीं आरमाराच्या पैशाची नुसती लुट चालविली होती. ॲडमिरल फाँ टिरपिट्झ हे इतर बाबतींत फार दक्षतेनें काम चालवीत असतांहि खर्चाची काटकसर त्यांस साध्य झाली नाहीं. या अंदाधुंदीस आळा घालण्याठीं कोणा तरी खऱ्या व्यापारी दृष्टीच्या मनुष्याची जरूर होती. अशा प्रसंगीं आगस्ट थायसेनसारख्या खऱ्या व्यापारी बुद्धीच्या मनुष्याकडे आरमार-खात्याची नजर गेली, हें योग्यच झालें. यानंतर जीं बेडर जहाजें बांधलीं गेलीं, त्यांत पंधरा लक्ष रुपयांची बचत झाल्याचें आढळून आलें. यापुढें आरमारी उद्योगांत लुट करणें अशक्य आहे, असें कील येथील कंट्राटदारांस आढळून आलें. अशा रीतीनें जिनसांची खरेदी कशी करावी, ही विद्या राजा थायसेन यांनीं टिरपिटझ् यांस शिकविली.

परस्पर राष्ट्रांत जे अनेक गुंतागुंतीचे राजकीय प्रश्न उपस्थित होतात, त्यांचें वास्तविक स्वरूप राजकीय नसून ते शुद्ध व्यापारी रूपाचे असतात, असें थायसेन यांचें मत आहे. ब्रिटिश मुत्सदी चेंबर्लेन यांचेंहि असेंच मत आहे. इंग्लंड आणि जर्मनी यांचे परस्पर संबंध असावे तसे मित्रत्वाचे नसण्यास परस्परांतील व्यापारी चढाओढच कारण आहे, असें थायसेन यांचें मत आहे. राष्ट्रांचीं राजकीय सूत्रें पंडितांच्या हातून काढून तीं इंजिनियर, व्यापारी व कारखानदार यांच्या हातीं द्यावीं, असें त्यांचें म्हणणें आहे. सर्व राष्ट्रांचे परस्पर व्यापारी संबंध एकमेकांशीं इतके संलग्न झाले आहेत कीं, त्यांच्या राजकीय हितसंबंधांतील तडजोड व्यापारी हितसंबंधाच्या दृष्टीनें करणें अशक्य आहे, असें थायसेन स्पष्टपणें बोलतात. जर्मनी आणि इंग्लंड यांजमधील व्यापारी हितसंबंधाची मांडणी योग्य पायावर झाली तर, या राष्ट्रांत चांगला सलोखा उत्पन्न होईल, असें त्यांस वाटतें. साऱ्या जगभर प्रसार पावणाऱ्या कोळशासारख्या वस्तूंचे भाव सर्व

राष्ट्रांनीं मिळून एक मतांनीं ठरविल्यास त्या योगें जगाची शांतता नांदण्यास जितकी मदत होईल, तितकी तहांनीं, बेडर जहाजांनीं, व सैन्याच्या पथकांनीं होणार नाहीं, असें ते ह्मणतात.

थायसेन यांचें वय सध्यां ७४ वर्षांचें आहे. स्वभावानें ते अगदीं बेमुर्वतखोर व विलक्षण मितभाषी आहेत. त्यांच्या रहाणींतहि अगदीं सामान्य मनुष्याइतका साधेपणा आहे. पदव्यांच्या मागें लागणें त्यांस मुळींच आवडत नाहीं. तसेंच समारंभादिकांतहि हजर रहाणें त्यांस आवडत नाहीं. धर्मानें ते जुन्या रोमन क्याथोलिक पंथाचे आहेत. धार्मिक बनण्याइतका मी आतां वृद्ध झालों आहें, असें ते ह्मणत असतात. आपल्या मजूरदारांचें कांहीं तरी कल्याण करावें, अशी प्रबळ इच्छा ते सदोदीत मनांत बाळगीत असतात व यासाठीं ते हातानें खर्चहि करतात. त्यांना तीन मुलगे आहेत; पण त्यांचे सारे गुण फक्त एका वडील मुलाच्याच आंगांत उतरले आहेत.

त्यांचें रहातें घर मात्र त्यांच्या प्रचंड संपत्तीस साजेसें आहे. हें ड्यूमल डार्फ शहराजवळ रूर नदीच्या कांठीं बांधलें असून ही इमारत फारच प्रेक्षणीय आहे. हिची बांधणी जुन्या रोमन पद्धतीची आहे. ही जागा त्यांनीं १९०३ सालीं विकत घेतली आणि तींत इमारती बांधून तिची किंमत किती तरी पटीनें त्यांनीं वाढविली. त्यांच्या राहात्या बंगल्याचें नाव कॅसल ल्यांडस्बर्ग असें असून तो खरोखर एकाद्या राजास रहाण्यास योग्य इतका सुंदर आहे. सांप्रतहि तेथें खरोखर एक सुलतानच रहात असतो; पण आपली योग्यता मजुरदाराहून अधिक नाहीं, असें तो म्हणतो व रोजच्या कृतीनें तें सिद्धहि करून दाखवितो. मरेपर्यंत आपण असेच मजुरदार राहणार, असें तो म्हणत असतो.

आगस्ट स्कर्ले.



रोमन क्याथोलिक लोकांनीं चालविलेलें " जर्मानिया " या नांवाचें एक रोजचें वर्तमानपत्र बर्लिन येथें प्रसिद्ध होत असतें. या पत्राला सरासरीनें

तीस वर्षांच्या अवधींत एक, अशा रीतीनें तारा येत असतात. फक्त पोपच्या मृत्यूची बातमी मात्र या पत्रांत तारेनें येते. बाकीच्या साऱ्या अंकांत ताजी बातमी या सदराखालीं कोणताहि मजकूर त्यांत प्रसिद्ध होत नाहीं. सुमारें तीस वर्षांपूर्वी जर्मनींत एकंदर वर्तमानपत्रांची स्थिति या जर्मानियाप्रमाणेंच होती. सध्यांचे बादशहा गादीवर येईपर्यंत वर्तमानपत्रांस बहुतेक बातम्या वुल्फ टेलिग्राफ एजन्सी पुरवीत असे. यांची बातम्या देण्याची पद्धति अगदीं जुनाट आणि शिळ्या झालेल्या ठरीव रीतीची होती. ही मंडळी निमसरकारी स्वरूपाची असल्यामुळें तिनें पुरविलेल्या बातम्याहि त्याच स्वरूपाच्या असत. यामुळें बातम्यांऐवजीं सरकारी रिपोर्ट अथवा तशाच प्रकारचे दुसरे बेचव लेख या मंडळीमार्फत पुरविले जात. मुख्य लेखहि बहुधा चालू विषयावर लिहिलेले नसून एकाद्या जुन्या विषयावर केलेलें पांडित्य मात्र त्यांत पहावयास सांपडे. असल्या प्रकारच्या पत्रांचा त्या काळीं खपहि फारसा नव्हता, हें सांगावयास नकोच. एकाद्या पत्राच्या ५।४ हजार प्रति खपल्या झणजे तें पत्र मोठें भाग्यवान् समजलें जाई. या वेळीं जर्मन लोक पत्रें घरीं न घेतां आपली वाचनाची लालसा सुख–शांतिगृहांत अथवा दारूच्या दुकानांत फुकट पुरविल्या जाणाऱ्या जुन्यापान्या पत्रांवर भागवीत असत.

आज बर्लिनमध्यें सहा रोजचीं वर्तमानपत्रें असून त्यांचा खप प्रत्येकीं दीड लक्षापासून चार लक्षांपर्यंत आहे. याशिवाय हँबर्ग, फ्रँकफोर्ट, कलोन, ब्रॅसला, लिपझिक, ड्रेसडेन येथेंहि दैनिक पत्रें निघत असून त्यांचा खप प्रत्येकीं लाखाहून अधिक आहे. लंडन, न्यूयार्क व पारिस येथल्याप्रमाणें तेथें अद्यापि दरतासास ताज्या तारा प्रसिद्ध होऊं लागल्या नाहींत, ही गोष्ट खरी; तथापि पूर्वीच्या स्थितींत आतां विलक्षण पालट झाला आहे, हें मात्र खरें. जर्मनींतील दोन तीन वर्तमानपत्रें पारिस, लंडन किंवा न्यूयार्क येथील पहिल्या दर्जाच्या पत्राहून कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहींत.

केवळ तीस वर्षांच्या अवधींत जर्मनीच्या वर्तमानपत्रांत जी ही विलक्षण क्रांति घडून आली, तिचें सारें श्रेय मुख्यतः आगस्ट स्कर्ल नांवाच्या एकाच व्यक्तीकडे आहे. 'बर्लिनर लोकल आंझिगर' नांवाच्या पत्राचे

आगस्ट स्कर्ल हे मालक आहेत. डयूसेलडार्फ गांवच्या एका पुस्तकें-विक्याच्या पोटीं हे जन्मले. ते बर्लिनमध्यें आले, तेव्हां त्यांचा खिसा जवळ जवळ रिकामाच होता; पण त्यांचा मेंदू मात्र अनेक कल्पनांनीं पूर्ण भरलेला होता. सुमारें दहा वर्षांच्या अवधींत जर्मन वर्तमानपत्रांचें स्वरूप त्यांनीं पूर्णपणें बदलून टाकलें. वर्तमानपत्रें हीं केवळ थोड्याशा विद्वान लोकांसाठीं नसून सामान्य जनसमूहाकरितांहि आहेत, हें तत्त्व या अवधींत त्यांनीं सिद्ध केलें. जुन्यापान्या विषयांवर पांडित्यप्रचुर लेख लिहिण्यापेक्षां जगांतील बातम्या अधिक प्रमाणावर पुरविणें अधिक इष्ट आहे, ही गोष्ट वर्तनमापत्रांच्या चालकांच्या लक्षांत त्यांनीं आणून दिली. बातम्यांकरतां केवळ टपालावर अवलंबून न राहतां टेलिफोन आणि तारा यांचा अधिक उपयोग करण्यास त्यांनीं सुरवात केली. १८८३ सालीं 'लोकल अंझिगर' हें पत्र त्यांनीं सुरू केलें. पहिलीं दोन वर्षें तें साप्ताहिक होतें. १८८५ सालच्या आगस्ट महिन्यांत तें दैनिक झालें. हें पत्र आपल्या नव्या स्वरूपांत प्रगट झाल्याबरोबरच त्यानें साऱ्या बर्लिनमध्यें चळवळ उडवून दिली. शापेनहार, कँट, ट्रीचे, इत्यादि पंडितांच्या नमुन्यावर लिहिलेले लेख या पत्रांत नसलेले पाहून जुन्या पद्धतीचे जर्मन लोक त्या-विषयीं फार साशंक झाले. जर्मन राष्ट्रांवर ही एक मोठी आपत्तिच कोसळली असें त्यांस वाटलें. आठवड्यानें किंवा पंधरवड्यानें जर्मनीला जी बाह्य जगाची खबर हा वेळपर्यंत लागत होती, ती आतां रोज येऊन आदळणार, हें पाहून हे जुनाट लोक खरोखरच चिंताकुल झाले असतील. तथापि वर्तमानपत्राच्या स्थितींत क्रांति होण्याची टळणार नाहीं, ही गोष्ट त्यांस तेव्हांच दिसून आली. 'लोकल अंझिगर' पत्राचा वाचकवर्ग एक-सारखा वाढूं लागला. त्यांत राजकीय विषय फार करून येत नसत. यामुळें तर लोकांना तें पत्र अधिक आवडलें. राजकीय क्लिष्ट विषय वाचून वाचून लोक अगदीं कंटाळून गेले होते. यामुळें पिष्टपेषण ज्यांत केलेलें नसून ज्यांत जगांतील पुष्कळ बातम्या दिलेल्या असतील, असें पत्र लोकांस हवें होतें. ही उणीव आगस्ट स्कर्ल यांच्या लोकल अंझिगरनें प्रथम भरून काढली. अमेरिकेंतील बेनेट आणि पुलिटझर अथवा इंग्लं-

डांतील हार्मस्वर्थ यांनीं या बाबतींत जी कामागिरी केली, तीच कामगिरी आगस्ट स्कर्ल यांनीं केली आहे.

वर्तमानपत्रें कशा रीतीनें चालवावीं, याबद्दल ज्या कांहीं कल्पना जर्मनींत १८८५ सालापर्यंत रूढ होऊन बसल्या होत्या, त्या आगस्ट स्कर्ल यांनीं झुगारून दिल्या एवढेंच नव्हें तर, पत्रें व पत्रांचा प्रसार करण्याच्या पद्धतींतहि त्यांनीं बदल करून टाकला. लोकांच्या घरोघर पत्रें जाऊन पडावीं, अशी व्यवस्था त्यांनीं सुरू केली. आपला प्रसार वाढविण्यासाठीं जर्मनपत्रें या काळापर्यंत फारशी खटपट करीत नसत. अशी खटपट करणे आपल्या मानास कमीपणा आणणारें आहे, असें ते समजत असत; पण या जुन्या मताची पर्वा न करतां स्कर्ल वर्गणीदार जमा करण्यासाठीं बाहेर फिरत असत आणि अशा रीतीनें त्यांनीं आपल्या पत्राचा खप वाढविला. घरोघर पत्रें वांटण्याची पद्धत त्यांनीं प्रथम सुरू केली. या कामाकरितां त्यांनीं अनेक स्त्रिया नौकरीस ठेवल्या होत्या. पत्रें वांटण्याचें काम जर्मनींत सध्यांहि स्त्रियाच करीत आहेत. आपल्या मुख्य ऑफिसाच्या शाखा बर्लिन शहरांत त्यांनीं जागोजाग उघडल्या. यामुळें वर्गणीदारांना शक्य तितक्या लवकर पत्र मिळण्याची व्यवस्था झाली. कित्येक महत्त्वाच्या प्रसंगीं जादा अंक काढून आपल्या वर्गणीदारांस ते फुकट वांटण्याची व्यवस्था त्यांनीं केली. यामुळें त्यांच्या पत्राचा प्रसार एकदम वाढत चालला. याशिवाय गरीब लोकांकरतां असलेल्या जाहिराती एका पुरवणींत छापून ही पुरवणी मजूरदारांच्या मोहल्ल्यांतील रहिवाशांत फुकट वाटण्याची व्यवस्था त्यांनीं केली. तसेंच मजूरदारांच्या मोहल्ल्यांतील रहिवाशांसच महत्त्वाची वाटणारी अशी एकादी गोष्ट घडली, तर तिची सविस्तर बातमी एकाद्या निराळ्या पुरवणींत छापून ती पुरवणी त्या मोहल्ल्यांतील अंकांत घालण्याची व्यवस्था त्यांनीं सुरू केली. याशिवाय अंटर डेनलिंडन नांवाच्या मोठ्या रस्त्यावर जगांतील बातम्या दर तासास वाचावयास मिळण्याची व्यवस्था त्यांनीं केली. नव्या नव्या कल्पना काढण्यांत आगस्ट स्कर्ल यांचा हात धरणारा मनुष्य मिळणें

दुरापास्त आहे. अशा स्थितींत लोकल अंझिगरचा खप वाढत चालल्यास नवल नाहीं. तत्त्वज्ञान व साहित्यशास्त्र यांची चर्चा करणारीं पत्रें लोक पूर्वीप्रमाणेंच आवडीनें वाचीत असत; तथापि बातम्यांसाठीं लोकल ऑझिगरचा खप जितका होतो, तितका दुसऱ्या कोणत्याही पत्राचा होत नाहीं.

१८८९ सालीं लोकल ऑझिगर दिवसांतून दोन वेळ प्रसिद्ध होऊं लागले. या दोन्ही प्रतींची मिळून दरमहा वर्गणी फक्त बारा आणे आहे. याशिवाय याच्च वर्गणींत रविवारच्या खास अंकाच्या प्रतीहि वर्गणीदारांस फुकट देण्यांत येतात. पत्र दिवसांतून दोनदां निघूं लागले, तेव्हां अधिक बातम्या मिळविण्याचीहि व्यवस्था स्कर्ल यांनीं केली. बातम्या मिळविण्यासाठीं यापूर्वीहि ते सढळ हातानें खर्च करीत असत. तत्त्वज्ञानविषयक लेखांवर खर्च करण्यापेक्षा तोच पैसा बातम्या मिळविण्याकडे खर्च केला, तर धंद्याच्या दृष्टीनें तें अधिक किफायतशीर होतें, असें त्यांच्या अनुभवास आलें. देशांतील गांवोगांवीं व शहरोशहरीं त्यांनीं खास बातमीदारांची नेमणूक केली. परराष्ट्रांतील राजधान्यांच्या शहरींहि त्यांचे खास बातमीदार असून बातमी पाठविण्यास लागणाऱ्या खर्चांत त्यांनीं काटकसर करूं नये, अशी स्कर्ल यांची त्यांस सक्त ताकीद आहे. बाह्यदेशीं खास बातमीदार पाठविण्याची चाल जर्मनींत यापूर्वीं फारशी नव्हती. कलोनग्याझेट, फ्रँकफुर्टरझिटंग इत्यादि कांहीं पत्रांनीं फ्रँको-जर्मन युद्धाच्या वेळीं आपले खास बातमीदार रणभूमीवर पाठविले होते; पण स्कर्ल हे याहिपुढें गेले. जगांत कोठेंहि एखादा अस्मानीसुलतानीचा प्रसंग झाला, तर त्या ठिकाणीं स्कर्ल यांचे बातमीदार हजर असावयाचेच. कोठें धरणीकंप झाला, कोठें महापूर आला, एकाद्या देशांत बंड झालें, अथवा एकाद्या देशांत दुसरी एकादी महत्त्वाची चळवळ सुरू असली, तर त्या ठिकाणीं लोकल ऑझिगरचे खास बातमीदार धांवत जावयाचेच. या बातमीदारांत ऑटो फॉ गॉटबर्ग हे फार विख्यात असून राष्ट्रांच्या परस्पर हितसंबंधाविषयीं एकादी गोष्ट घडून आली, तर तीविषयीं अंतस्थ बातम्या काढण्यांत हे फार पटाईत आहेत. गेल्या पंधरा वीस वर्षांत अशा प्रकारची एकहि गोष्ट त्यांच्या नजरेंतून सुटली नाहीं.

बातम्या मिळविणें आणि त्यांचा प्रसार करणें या बाबतींत जशा नव्या पद्धति स्कर्ल यांनीं शोधून काढल्या, त्याचप्रमाणें छपाईच्या बाबतींतहि अगदीं नव्या पद्धतीचें अवलंबन त्यांनीं केलें आहे. ठसे जुळण्याकरितां लिनो टाईप यंत्राचा उपयोग जर्मनींत यांनीं प्रथम सुरू केला. वर्तमान पत्रांत चित्रे घालण्याची पद्धतहि त्यांनींच प्रथम सुरू केली. डॉयबोश नांवाचें एक सचित्र साप्ताहिक त्यांनीं सुरू केलें. हें पत्रहि फार लोकाप्रिय झालें आहे. यानंतर लवकरच दुरंगी चित्रें छापण्याची कला प्रथमच अस्तित्वांत आली, तेव्हां दुरंगी चित्राचें एक डरटॅग नांवाचें नवें दैनिक त्यांनीं सुरू केलें. दुरंगी छपाईची कीर्ति साऱ्या युरोपभर पसरण्यास हेंच दैनिक कारण झालें आहे. अशा रीतीनें प्रकाशनाच्या कार्यांत सालोसाल ते भर घालूं लागले. आज मितीस पांच दैनिकें आणि डझनभर साप्ताहिकें त्यांच्या मालकीचीं आहेत. यांतील कित्येक शिकारी लोकांसाठीं, व कित्येक कांहीं धंद्यांच्या लोकांसाठीं असून कांहीं साप्ताहिकें मैदानी खेळास वाहिलेलीं आहेत. त्यांचा खपहि फार दांडगा आहे. स्कर्ल यांच्या धंद्याचीं ऑफिसें साऱ्या साम्राज्यभर पसरलेलीं आहेत. खुद्द बार्लिन शहर व त्याच्या आजूबाजूंचीं उपांत नगरें यांत बेचाळीस ऑफिसें असून इतर प्रांतांत अडीचशें ऑफिसें आहेत. १८९४ नंतर त्यांनीं नियत भांडवलाची मंडळी उभारून ही सारी मालमत्ता तिच्या नांवानें केली आहे. हा सर्व कारखाना चालण्याकरतां बर्लिनच्या मध्यवस्तींत कित्येक प्रचंड इमारती त्यांनीं उभारल्या असून त्यांत पांच हजारांहून अधिक माणसें काम करीत आहेत.

हर्र स्कर्ल हे अगदीं व्यवहारी असले, तरी मनानें ते बरेच कोमल आहेत. व्यवहारांत अवश्य लागणारा निष्ठुरपणा आणि भावनांची कोमलता यांचें विलक्षण मिश्रण त्यांच्या ठिकाणीं आढळून येतें. ते आज विलक्षण संपत्तिमान झाले आहेत व त्यांनीं काढलेलीं सारीं पत्रें पैशाच्या दृष्टीनें यशस्वी झालीं आहेत, ही गोष्ट खरी; तथापि अगदीं प्रथमपासून सुद्धां कोणतेंहि पत्र केवळ पैसा मिळविण्यासाठीं त्यांनीं सुरू केलें नाहीं. गरीब लोकांचा आयुष्यक्रम थोडा तरी अधिक सुखाचा व सोयीचा करावा

हाच त्यांचा मूळ हेतु होता. या हेतूला पोषक अशा दुसऱ्याहि अनेक संस्था त्यांनीं निर्माण केल्या आहेत. पत्रें, पुस्तकें अगदीं थोड्या किंमतींत गरीबांस मिळावींत याकरतां कित्येक फिरतीं वाचनालयें त्यांनीं सुरू केलीं आहेत. गरीबांस पैशाचा संग्रह करतां यावा याकरतां नव्या पद्धतीच्या सेव्हिंग ब्यांका त्यांनीं स्थापिल्या आहेत. याशिवाय कित्येक नाटकगृहेंहि त्यांनीं बांधलीं असून गरीबांस शहराच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत लवकर जातां यावें म्हणून एकरुळाची गाडीहि त्यांनीं सुरू केली आहे. पुष्कळ पैसा खर्चून या युक्तीच्या उत्पादकापासून ती त्यांनीं विकत घेतली व थोड्या खर्चानें तिचा उपयोग सर्वांस सुलभ करून दिला. आकाश यानांतून प्रवास करण्याची गोडी आपल्या देशबांधवांस लागावी व आकाश यानाचें महत्त्व त्यांच्या चित्तावर बिंबावें याकरतां दर आठवड्यास कांहीं माणसांस आकाश यानांतून पदर खर्चानें ते फिरवून आणीत असतात.

जर्मन राष्ट्राच्या सांप्रतच्या अननुभूत वाढीच्या मुळाशीं ज्या लोकांचे श्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांतच आगस्ट स्कर्ले यांची गणना करणें अवश्य आहे; तथापि त्यांचें दर्शन ज्यांना झालें आहे, अशीं मनुष्यें साऱ्या जर्मन साम्राज्यांत अवघीं शंभरहि मिळावयाचीं नाहींत. डामडौलाच्या अशा एकाद्याहि लौकिक समारंभास ते आजपर्यंत कधीं हजर राहिले नाहींत. अरण्यांत राहणाऱ्या एकाद्या तापशाच्या राहणीला अनुरूप अशी त्यांची राहणी आहे. खुद्द बादशहांची भेट घेणें एक वेळ सोपें आहे; पण त्यांची भेट मात्र कोणास होऊं शकत नाहीं. १९०० सालीं आपली चिनांतील मोहीम संपवून विजयी झालेले फिल्ड मार्शल कौंट फॉं वाल्डरसी हे एके वेळीं त्यांची भेट घेण्याकरतां सुमारें महिनाभर खटपट करीत होते; पण त्यांच्या खटपटीस यश आलें नाहीं. ते आपल्या खाजगी खोलींतून फारसे बाहेर पडत नाहींत, व आपल्या चिटणिसावांचून दुसऱ्या कोणाची भेटहि ते घेत नाहींत. असें आहे; तथापि त्यांच्या प्रचंड धंद्यांतली एकहि बाब त्यांच्या नजरेंतून सुटलेली नसते. आपल्या धंद्याचीं सारीं सूत्रें त्यांनीं आपल्याच हातीं ठेविलीं आहेत आणि त्यांतील

सर्व बाबी ते अत्यंत लक्षपूर्वक पहात असतात. वर्तमानपत्राच्या बाबतींत कोणत्याहि नवीन कल्पनेचा उदय बर्लिनमध्यें झाला, तर तिचें मूळ झिमरस्ट्रासीवरील आगस्ट स्कर्ल यांच्या खोलींतच आहे, ही गोष्ट साऱ्या जर्मनींतील आबालवृद्धांस आतां माहीत झाली आहे. त्यांच्याशीं चढाओढ करणारे लोक अर्थातच पुष्कळ आहेत व यांपैकीं पुष्कळांची चढाओढ योग्य मार्गानीं चालली आहे, ही गोष्ट खरी; तथापि नव्या नव्या कल्पना काढण्यांत त्याचा हात धरणारा अद्यापिहि कोणी नाहीं. थिओडर वुल्फ यांचें 'बर्लिनर टागेब्लाट' हें वर्तमानपत्र हल्लीं घुष्कळच पुढें आलें असून तें फार चांगल्या प्रकारे चाललें आहे; पण या सर्व पत्राचें काम यशस्वी रीतीनें चालण्यास एका प्रकारें आगस्ट स्कर्ल यांचेच श्रम कारणीभूत झाले आहेत, असें ह्मणावयास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांची चटक लोकांत प्रथम उत्पन्न करण्याचें बिकट काम त्यांनींच पहिल्यानें केलें. पडित जागेंतील कांटेकुटे काढून टाकून तेथें त्यांनीं राजरस्ता उत्पन्न करून दिला व त्या रस्त्यानें इतर लोक आतां सुखानें मार्गक्रमण करीत आहेत.

लोकल ऑझिगर पत्राला जर्मन सरकारचा आश्रय आहे, ही गोष्ट इंग्लंडांतील व अमेरिकेतील पुष्कळ लोकांना आतां ठाऊक झाली आहे. जर्मनींचीं राजकीय सूत्रें हातीं वागविणाऱ्या लोकांशीं लोकल ऑझिगरचा जितका निकट संबंध आहे, तितका तो दुसऱ्या कोणाशींहि नाहीं. या पत्राची सत्ता लोकांच्या मनोवृत्तींवर किती बसली आहे, हें जर्मन मुत्सद्यांस चांगलें ठाऊक झालें आहे आणि आपणाला अनुकूल अशा कोणत्याहि कल्पनांचा फैलाव साऱ्या राष्ट्रभर करून देण्यास ते लोकल ऑझिगरचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करीत असतात. ज्या पत्रासंबंधीं लोकांत अगोदरच आदर वसत आहे, त्याच्या मार्फतच आपल्या मतांचा केलेला प्रसार सामान्य लोकांत अधिक दृढमूल होतो, हें तत्त्व जर्मन अधिकारीवर्ग विसरलेला नाहीं.

स्कर्ल यांचें पांखरांवर फार प्रेम आहे; पण पांखरें पाळण्यांपेक्षां ती पिंजऱ्यांतून मोकळीं सोडून देण्यांतच त्यांस फार आनंद होतो. "पांखरांचें

स्मरण ठेवा." असें वाक्य लोकल ॲंझिगर पत्रांत वारंवार व अनेक जागीं मोठ्या अक्षरांनीं छापण्यांत येत असतें. लहानपणीं एका पाखराच्या घरट्यांतील पिलें त्यांनीं चोरलीं त्या वेळीं त्या पांखरांनीं केलेल्या किलबिलाटानें त्यांचें चित्त द्रवलें. आपल्या लहानपणच्या या कृतीचें स्मरण अद्यापिहि त्यांस होत असतें. अजूनहि मधून मधून बाजारांत जाऊन ते पुष्कळ पक्षी विकत घेतात व टायरगार्डन बागेंत नेऊन त्यांस मोकळ्या हवेंत सोडून देतात. अशा रीतीनें कित्येक वेळां पक्ष्यांचे थवेच्या थवे त्यांनीं मोकळे सोडले आहेत.

स्कर्ले याचें वय आज सहासष्ट वर्षांचें आहे. तथापि त्यांची कल्पनाशक्ति एकाद्या तरुणाइतकीच ताजोतवानी आहे. जर्मन राष्ट्रास सांप्रतची उन्नतावस्था प्राप्त करून देण्यास ज्यांनीं श्रम केले, त्यांत यांची बरोबरी करणारीं माणसें फारच थोडीं सांपडतील. जर्मन भाषा ज्या ज्या ठिकाणीं चालते, त्या त्या प्रत्येक ठिकाणीं आगस्ट स्कर्ले यांचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे.

पॉल अर्लिक.



आपल्यांतील नाणावलेल्या पुरुषांचें कांहीं तरी स्मारक त्याच्या जिवंतपणींच करावयाचें, अशी संवय जर्मन लोकांस आहे. यामुळें फ्रॅंकफर्ट येथील वैद्यकीय शोधशाळेकडे जाणाऱ्या मनुष्याला पॉल अर्लिक स्ट्रासी (रस्ता) वरून जावें लागतें. याच रस्त्यावर पॉल अर्लिक यांची शोधशाळा असून तेथेंच त्यांनीं ६०६ हे प्रख्यात औषध तयार केलें. घटसर्पावर औषध तयार करणारे प्रोफेसर बेहरिंग हे त्यांचे समकालीन असून त्यांचाहि एक पुतळा बर्लिन येथें लोकांनीं उभा केला आहे. १९०९ सालीं प्रोफेसर अर्लिक यांनीं आपलें उपदंशावरील ६०६ हें रामबाण औषध शोधून काढलें व तेव्हांपासून त्याचें नांव युरोपांत सर्वत्र प्रसिद्ध झालें. तथापि त्यापूर्वीच निद्रारोगावर औषध शोधून काढण्याच्या कामांत त्यांनीं बरेंच यश

संपादन केलें होतें. शास्त्रीय शोधाचें सुवर्णपदक १९०३ सालींच त्यांस बादशहांकडून मिळालें होतें व १९०५ सालीं आक्सफर्ड, गार्टिंजेन व शिकागो या विश्वविद्यालयांनीं वैद्यशास्त्रांतील उच्च पदव्या त्यांस अर्पण केल्या होत्या.

अर्लिक यांनीं उपदंशावर जें रामबाण औषध शोधून काढलें, त्याला त्यांनीं ६०६ हें नांव दिलें. याचें कारण असें कीं, हें औषध तयार करण्याकरतां त्यांनीं जे प्रयोग केले, त्यांत सहाशें सहाव्या प्रयोगाच्या वेळीं त्यांस यश आलें. या औषधाचें खरें शास्त्रीय नांव द्यावयाचें म्हटलें, तर तें 'डाय आक्सी डाय ॲमिडो–ॲर्सिनो बंझाल' असें वांकडें तिकडें नांव द्यावें लागेल. औषधी विकणाऱ्या व्यापाऱ्यांत तें साल्व्हरसीन या नांवानें प्रसिद्ध आहे. ६०६ या औषधाची वैद्यकीयदृष्ट्या खरी किंमत काय आहे, हें अद्यापि निश्चित झालेलें नाहीं. उपदंशावर याचा उपयोग निश्चितपणें होतो कीं नाहीं, याबद्दल वैद्यकमण्डळांत अद्यापि एकमत झालेलें नाहीं. या रोगावर तें रामबाण आहे, असें ह्मणणारे जसे अनेक धन्वंतरी आहेत, तसेंच तें निरुपयोगी आहे, असें ह्मणणारेहि भिषग्वर बरेच आढळतात हें औषध जगापुढें आणण्यापूर्वी अर्लिक यांनीं दहा हजार रोग्यांवर तें अजमावून पाहिलें व यांपैकीं अगदीं थोडे रोगीखेरीजकरून बाकीचे सारे अगदीं थोड्या वेळांत निखालस बरे झाल्याचें आढळून आलें. कांहीं थोड्या रोग्यांस त्याचा गुण आला नाहीं, याचें कारण औषधाचें प्रमाण आपणास निश्चित करतां आलें नाहीं, हें आहे, असें अर्लिक ह्मणतात. औषधाचा उपयोग करतांना निदान तें अपायकारक तरी होणार नाहीं, अशी खबरदारी प्रथम घेणें हें अत्यंत आवश्यक आहे. यासाठीं योग्य अधिक प्रमाणावर औषधाचा उपयोग करणें प्रशस्त न वाटल्यामुळें कांहीं रोग्यांस तें गुणावह झालें नाहीं. ६०६ हें औषध उपदंशाच्या सर्वच अवस्थांत सारखें लागूं पडतें असें नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि त्या रोगावर तें बिनमोल उपयोगीं पडतें, यांत मात्र मुळींच शंका नाहीं. आतां त्याच्या योगानें रोगाचें समूळ उच्चाटन होतें कीं नाहीं,हें पुष्कळ वर्षांच्या अनुभवाबांचून ठरवितां येणार नाहीं. अनेक वैद्यांनीं आजपर्यंत त्याचा जो कांहीं

उपयोग करून पाहिला, त्यावरून त्याच्या गुणाबद्दल सर्वांची बहुमतांशीं खात्री होऊन चुकली आहे आणि वैद्यमंडळानें आपल्या औषधीसग्रहांत त्याला कायमचें स्थान दिलें आहे. हें औषध सर्वांगांनीं परिपूर्ण आहे, असें खुद्द अर्लिक यांचेंहि म्हणणें नाहीं. त्यांत उणीवा आहेत ही गोष्ट ते स्वतःच उघडपणें सांगतात व त्या नाहींशा करून तें पूर्णत्वास आणण्याचा उद्योग ते अद्यापीहि करीत आहेत. सांप्रत त्यांचें लक्ष काळपुळी आणि निद्रारोग यांकडे लागलें असून त्यांजवर रामबाण औषधें शोधून काढण्यासाठीं त्यांचे प्रयोग चालू आहेत.

क्लॉड बर्नार्ड, हेल मोल्डझ, पाश्चूर आणि अर्लिक हे सर्व एकाच दर्जाचे रसायन शास्त्री आहेत व रोगनिवारण शास्त्रासंबंधीं त्यांनीं महत्त्वाचे शोध लावण्यांत सारखीच बुद्धिमत्ता प्रगट केली आहे, असें एका रसायनशास्त्रविशारदानें म्हटलें आहे; तथापि या सर्व मंडळींत अर्लिक हे कल्पनाशक्तीनें अधिक श्रेष्ठ आहेत, यांत संशय नाहीं. रोगनिर्मूलनाचीं साधनें शोधून काढण्याच्या बाबतींत अर्लिक यांची कल्पनाशक्ति असामान्य कोटींतील असून त्यांची बुद्धिहि या बाबतींत तशीच असामान्य आहे. त्यांचे शोध केवळ एकाद्या शास्त्रालाच चिटकून न राहतां ते रयायन शास्त्र, रोगजंतुशास्त्र, मज्जातंतुशास्त्र, आणि औषधीक्रिया या साऱ्या शास्त्रांत एकसमयावच्छेदेंकरून चालू असतात. असें आहे; तथापि त्यांत कोणत्याहि प्रकारची विसंगतता नसून हे निरनिराळ्या शास्त्रांतील परिश्रम कोणत्या तरी एका विशिष्ट हेतूस धरून चालू असतात, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अर्लिक यांच्या शोधशाळेंतील एका मदतनिसाच्या पत्नी मिसेस मॉक्स यांनीं १९१० सालीं एक लेख लिहून त्यांत अर्लिक यांच्या शोधांचा मूळ पाया काय आहे, याचें थोडक्यांत वर्णन दिलें आहे. या लेखांत मिसेस मॉक्स म्हणतात, "प्रत्येक जीवांत जंतु कांहीं विशिष्ट पदार्थांसाठीं चुंबकता दाखवीत असतो. मग तो जंतु एकादा रोगजंतु असो अथवा दुसऱ्या एकाद्या जीवंत जंतूला भक्षण करून स्वतः जगणारा जंतु असो. कोणत्याहि जातीचा जंतु म्हाला, तरी अनेक पदार्थांपैकीं एकाच पदार्था-

कडे विशेष ओढ तो दाखवीत असतो. एकाद्या औषधाचा प्रवेश शरीरांत झाला, ह्मणजे त्या मिश्रणांतील सर्व औषधें सर्व शरीरभर सारखींच वांटलीं जात नाहींत. अथवा शरीरांतील सर्व इंद्रियांवर त्यांचा सारखाच परिणाम होत नाहीं. उदाहरणार्थ, अफू किंवा कुचला यांचा परिणाम मज्जातंतूंवरच घडतो. डिजिट्यालिस या औषधाचा परिणाम हृदयाच्या क्रियेवरच घडतो. अशा रीतीनें प्रत्येक जीवंत इंद्रिय निरनिराळ्या पदार्थांसाठीं आपली आसक्ति प्रगट करीत असतें. ही गोष्ट सर्व वैद्यांस ठाऊक झालेलीच आहे. हीच कल्पना मूळ पायादाखल घेऊन तीवर अर्लिक यांनीं आपली घुढील इमारत उभारली. अशा रीतीनें त्यांनीं दोन औषधें तयार करून त्यांचे प्रयोग करून पाहिले. त्यांवरून शरीराच्या कोणत्याहि भागास इजा न पडतां भयंकर रोगांच्या जंतूंचा मात्र नाश करतां येतो, असें त्यांनीं सिद्ध केलें. अशा रीतीचें प्रत्येक जातीच्या जंतूंचें समूळ उच्चाटन करणारीं औषधें निर्माण करणें शक्य आहे, ही गोष्ट पॉल अर्लिक यांनीं निःसंशय सिद्ध केली आहे. "

अर्लिक तरुण असतां त्यांची बुद्धि कुशाग्र आहे, ही गोष्ट प्रोफेसर राबर्ट कोच यांच्या लक्षांत आली आणि त्यांनीं आपल्या बर्लिन येथील शोधशाळेंत त्यांची १८९० सालीं नेमणुक केली. त्यापूर्वी बारा वर्षें निरनिराळ्या रसायनशास्त्रविशारदांकडे अर्लिक हे एक छोटेसे मदतगार या नात्यानें काम करीत होते. रक्तांतील मूलद्रव्यासंबंधीं त्यांनीं जे शोध प्रगट केले, त्यायोगानें त्यांचें नांव सर्व जगास प्रथम महशूर झालें. हा काळपर्यंत रक्तासंबंधीं झालेल्या सर्व प्रयोगांत ताज्या रक्ताचाच सर्वत्र उपयोग करतां येत असे; पण वाळून गेलेल्या व निरनिराळ्या रंगीत पदार्थांशीं मिश्र झालेल्या रक्ताच्या डागांत कांहीं अनुकूल गोष्टी आढळून येतात, असा शोध अर्लिक यांनीं प्रथम लावला. रक्ताशीं निरनिराळ्या रंगांचें मिश्रण केलें, तर त्यांतील घटक वेगळे करतां येतात, ही गोष्ट अर्लिक यांनीं प्रथम सिद्ध केली. त्यांनीं तयार केलेला रंग रक्ताच्या सफेत भागांत मिसळला, तर त्या रक्तांत पांच निरनिराळ्या घटकांचें मिश्रण आढळून येतें. या शोधामुळें रोगनिदान ठरविण्यास हल्लीं

सुलभ मार्ग झाला आहे. अर्लिक यांच्या शोधांमुळें रक्तबिंदूवरून रोग-निदान ठरविण्याच्या क्रियेंत नवे नवे शोध अस्तित्वांत आले. त्यानंतर क्षयरोगाचे जंतु इतर जंतूंपासून निश्चितपणें कसे शोधून काढावेत, याचा शोध त्यांनीं लावला.

यानंतर अर्लिक यांची कुशाग्र बुद्धि रोगप्रतिबंधाकडे वळली. एकाद्या मनुष्याला देवी किंवा गोंवर यासारखा रोग एकवार होऊन त्यांतून तो वांचला, तर तोच रोग बहुधा त्यास पुनः होत नाहीं, असा अनुभव आहे. असें होण्याचें कारण काय असावें, याचा शोध शास्त्रीय दृष्ट्या ते करूं लागले. पुष्कळ वेळां या शोधांत निराशेचें दुःख भोगण्याचेंहि त्यांच्या नशिबीं आलें; तथापि स्वभावतः ते दीर्घोद्योगी असल्यामुळें आपले प्रयोग पुढें चालू ठेवण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. हजारों प्रयोगांच्या अंतीं त्यांस यश आलें व रोगप्रतिबंधक शास्त्राचा मूळ पाया त्यांनीं शोधून काढला. याच सुमारास घटसर्पावरील बेहरिंग यांचें पिचकारीचें औषध प्रासिद्धीस येऊं लागलें होतें. अशा प्रकारच्या औषधींत शरीराच्या इतर भागास हानिकारक असे बरेच दोष त्या वेळीं आढळून येत. हे दोष नाहींसे करून औषधें निखालस खात्रीचीं करण्याचा उद्योग त्यांनीं सुरू केला. याहि उद्योगांत त्यांस यश येऊन त्यांच्या पद्धतीचा स्वीकार जर्मन सरकारनें केला. यानंतर थोड्याच दिवसांनीं इतर सरकारांनींहि जर्मन सरकारचें अनुकरण केलें. हा नवा शोध लावण्यांत अर्लिक यांनीं जें महद्यश संपादिलें, त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्याकरतां प्रशियन सरकारने बर्लिनजवळील एका सरकारी शोधशाळेच्या मुख्याच्या जागीं त्यांची नेमणूक केली. रोगजंतूंचा नाश करणारीं औषधें शोधून काढण्याकरितांच या शाळेची स्थापना झाली आहे; पण अर्लिक यांच्या शोधांचा विस्तार वाढतां वाढतां इतका वाढला कीं, त्यांच्या शोधांस ही शोधशाळा घुरेनाशी झाली. तेव्हां फ्रँकफर्ट येथें नवीनच स्थापलेल्या प्रचंड सरकारी शोधशाळेवर त्यांची नेमणूक झाली.

यानंतर अर्लिक यांचें लक्ष निद्रारोगाकडे वळलें. केवळ तीन वर्षांच्या अवधींत या रोगानें ब्रिटिश आफ्रिकेंत एक लाख वस्तीचा सप्पा उडविला

होता. या बाबतींत त्यांनीं निरनिराळ्या प्राण्यांवर शेंकडों प्रयोग करून पाहिले. प्रयोग करतां करतां चारशें अठराव्या प्रयोगांत त्यांस यश आलें व ४१८ या औषधाचा शोध लागला. या औषधाला अर्सेनो फेनिल-ग्लायसिन असें शास्त्रीय पारिभाषिक नांव त्यांनीं दिलें आहे. अगदीं आसन्नमरणस्थितींतील प्राणीहि या औषधाच्या एका पिचकारीनें साफ बरा होतो, असा अनुभव आला आहे. हेंच औषध आफ्रिकेंत सांप्रत सर्वत्र उपयोगांत आणलें जात आहे. त्याचा उपयोग फारच काळजीपूर्वक करावा लागतो आणि त्याच्या गुणाचा पुरा अनुभव घेण्यास आणखी कांहीं काळ लोटला पाहिजे. टोगोच्या वसाहतींत त्याचा फारच चांगला परिणाम झाला. सामान्यतः दोन पिचकाऱ्यांनीं टोगोमधील रोगी बरे झाले. फिलेपाईन बेटांत सुरा नांवाच्या घोड्यांच्या रोगावरहि या पिचकारीचा चांगला उपयोग झाल्याचें आढळून आलें आहे.

काळपुळीसंबंधींहि अर्लिक यांनीं कांहीं शोध चालविले आहेत. या-संबंधांत आपले पाऊल किती पुढें पडलें आहे, हें त्यांनीं स्वतः कोणासहि सांगितलेलें नाहीं. तथापि त्यांतहि बरेंचसें यश त्यांनीं संपादन केलें आहे, अशी बोलवा आहे. या रोगावरहि रसायनशास्त्र पुढें मागें खचित जय मिळवील एवढेंच ते ह्मणतात. हजारों प्रयोगांच्या अंतीं यश मिळेल, अशी त्यांची खात्री आहे. या प्रयोगांत त्यांचे पट्ट शिष्य फॉ वासरमन हे प्रयोग करीत असून त्यांत कांहीं यश त्यांनीं मिळविलें आहे.

विश्वविद्यालयांत कोणत्याहि शास्त्राचा अभ्यास करणें ह्मणजे काळाचा अपव्यय करणें होय, असें ह्मणणारे कांहीं लोक अलीकडे निर्माण झाले आहेत. या मताला अर्लिक यांच्या उदाहरणावरून चांगलीच पुष्टि मिळण्यासारखी आहे. पॉल अर्लिक हे ब्रेसला, स्ट्रास्बर्ग, फ्रीबर्ग, आणि लिपझिग इतक्या विश्वविद्यालयांत होते; पण तेथें त्यांनीं किती ज्ञानमौक्तिकें वेंचलीं, याची नक्की माहिती कोणासहि नाहीं; तथापि हजिरीपेक्षां गैरहाजिरीचेच दिवस त्यांचे अधिक असत. रसविद्येंत त्यांनीं जें कांहीं यश संपादन केलें, त्याला त्यांचे स्वतःचेच श्रम कारणीभूत झाले आहेत. रसायनशास्त्राचा अभ्यास विश्वविद्यालयीन पद्धतीवर त्यांनीं कधींहि केला

नाहीं. कोणतीहि विद्या साध्य होण्यास त्या विद्येसंबंधीं उच्च भरारी मारणारी कल्पना अत्यावश्यक आहे, असें त्यांचें मत आहे. त्या शास्त्राशीं आपलें चित्त सदोदित खेळत राहिलेलें असावें आणि आपल्या कल्पना-शक्तीला वाटेल तिकडे भटकण्यास पूर्ण वाव द्यावा, म्हणजे त्या शास्त्राचें रहस्य साध्य होतें, असें ते म्हणतात. औषधीक्रियेंतहि पुष्कळसे शोध असेच केवळ सुदैवानें लागले आहेत, असें त्यांचें मत आहे. अमुक एक गोष्ट शक्य अथवा दुसरी अमुक अशक्य असें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय ते कधींहि म्हणत नाहींत. आपला शाळेंतला क्रमिक अभ्यास ते नीट रीतीनें कधीं करीत नसत; तथापि त्यांच्या शाळागुरूंनींहि त्याबद्दल त्यांस कधीं त्रास दिला नाहीं. यामुळें पाठशाळेंत पांच वर्षें घालवून कोणतीहि परीक्षा ते पास झाले नाहींत. यानंतर आणखी एक वर्षाच्या शेवटीं युनिव्हर्सिटीची सनद त्यांस मिळाली; पण ती ठरींव विषयासंबंधीं नसून त्यांच्या स्वतंत्र शोधासाठीं ती त्यांस देण्यांत आली होती.

पॉल अर्लिक हे सायलेशिया प्रांतांतले रहिवाशी आहेत. त्यांचें वय सध्यां साठ वर्षांचें आहे. त्यांचे वडील हे उदीमधंदा करणारे गृहस्थ होते; पण त्यांचे आजे वनस्पति शास्त्राचे गुरु होते व या शास्त्रांतील शिक्षणाचें काम आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत ते करीत होते. याच अजोबाकडून पॉल अर्लिक यांस रसायन शास्त्रांचें बाळकडू मिळालें. अर्लिक हे देहयष्टीनें जवळ जवळ सुदामदेवच आहेत. उंचीनेंहि ते पुरे पांच फूट सुद्धां नाहींत. त्यांची लांब दाढी आणि डोळ्याचे केंस करडे झाले असून, आतां तंबाखूच्या धुराच्या पुटांनीं ते पिवळे होऊं लागले आहेत. त्यांना चिरूट ओढण्याचें भयंकर व्यसन आहे. हातांत चिरूट नाहीं, अशा स्थितींतला त्यांचा एकहि फोटो कोणास अद्याप उपलब्ध झाला नाहीं. त्यांचा स्वभाव भयंकर विसरभोळा आहे. फक्त चिरूटाचा त्यांस कधीं विसर पडत नाहीं; पण चिरूटावर जमलेली राख झाडून टाकण्याचें भान न राहिल्यामुळें ती नेहमीं त्यांच्या अगावरील कपड्यांचा आश्रय करीत असते. त्यांच्या कपड्यांच्या बाबतींतला हा नीटनेटकेंपणा त्यांच्या रसशाळेंत आणि संग्रहालयांतहि आढळून येतो. टेबलें, खुर्च्या, पलंग,

पुस्तकें, वर्तमानपत्रें आणि इतर फाटके कागद हीं सारीं केवळ स्वेच्छेनें कोठे तरी पडलेलीं असतात; पण या खोलींत प्रवेश करून तेथें व्यवस्था करण्याची कोणाचीहि छाती होत नाहीं. अर्लिक यांनीं एके वेळीं आपले कांहीं ग्रंथ आपल्या मित्रांस वाचावयास देऊन त्यांजकडून कांहीं पुस्तकें आणलीं होतीं. बरेच महिने हीं पुस्तकें परस्परांकडे तशींच पडून होतीं. एके दिवशीं अर्लिक यांच्या मित्रानें त्यांचीं पुस्तकें परत करून सोबत एक चिठ्ठी लिहिली, आपण लग्न केलें असून आपल्या ग्रंथसग्रहालयाची व्यवस्था आपण लावीत आहों, असें तींत त्यानें लिहिलें होते, त्याला अर्लिक यांनीं उत्तर दिलें, " आपला विवाह झाला. हें ऐकून मला फार संतोष होत आहे. माझीं पुस्तके आपण परत पाठविलीं, याबद्दल मी आपला फार आभारी आहें; पण यामुळें आपलीं पुस्तकें मी परत करीन असा आपला समज असेल, तर तो मात्र अगदीं चुकीचा आहे. " रस शाळेंतील उपकरणें पुसण्यासाठीं चिंध्या गोळा करण्याचा त्यास विलक्षण नाद आहे. विशेषतः जुने हातरुमाल आणि सद्रे यांवर त्यांचे विशेषच प्रेम आहे. एके वेळीं व्याख्यान देत असतां घाम पुसण्यासाठीं आपल्या खिशांतून हातरुमाल ते बाहेर काढूं लागले, तों त्यांच्या पत्नीचें एक सबंध जुनें जाकीट बाहेर पडलें.

त्यांच्या विवाहाच्या वेळीं त्यांच्या पत्नीची बरीचशी मिळकत त्यांजकडे आली होती आणि याशिवाय त्यांच्या औषधींनींहि त्यांस चांगलीच द्रव्यप्राप्ति करून दिली आहे; तथापि त्यांस कसल्याहि प्रकारची चैन माहीत नाहीं. कडक चिरूट हीच काय ती चैनीची वस्तु त्यांस माहीत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी एका विश्व विद्यालयांत रसायनाच्या अध्यापकाच्या जागीं ते काम करीत होते. त्या वेळीं मिळणाऱ्या पगारांतून आपला चिरूटाचा खर्च जेमतेम भागत असे, असें ते स्वतःच सांगतात.

त्यांनीं ६०६ व्या औषधाचा शोध लावला, त्या वेळीं बादशहांनीं त्यांस एक्स्लेंझ ही मानाची पदवी दिली. ही पदवी मिळविणारे ते पहिलेच यहुदी आहेत. धंद्यानें ते रसायनशास्त्री आहेत ही गोष्ट खरी; पण वास्तविक पाहतां ते खरोखर तत्त्ववेत्ते आहेत असेंच म्हटलें पाहिजे. ते

केवळ रसायनशास्त्री नसून रसायनशास्त्रांतील तत्त्वदर्शी आहेत, असेंच ह्मटलें पाहिजे. अनेक रोगांनीं पीडलेल्या मानव जातीला आणखीहि त्यांच्या श्रमाचा उपयोग होईल, अशी आशा जर्मन राष्ट्रास आहे.

प्रो० अर्लिक हे थोड्या महिन्यांपूर्वी परलोकवासी झाल्याचें समजतें.

अरन्स्ट फाँ हाइडब्रँड्.



प्रत्येक वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत बोजड चहऱ्याच्या, मोठ्या टोप्या घातलेल्या आणि धुळीनें आंग भरलेल्या; अशा धष्टपुष्ट लोकांची एक स्वारी बर्लीनवर होत असते. ही मंडळी बर्लिनमध्ये जमा झाली ह्मणजे साऱ्या शहरभर मोठी चळवळ उडून जाते. जर्मन राष्ट्रभूमीच्या बऱ्याचशा भागाची खरी मालकी या मंडळीच्या हातीं असते. जर्मन राष्ट्राच्या साप्रतच्या वैभवांत आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणाचे हिस्सेदार आहों, ही गोष्ट ही मंडळी बर्लिनच्या ऐटबाज नागरिकांना पटवीत असते. जर्मनीच्या शेतकऱ्यांनीं 'बंडरल्यॉडवर्ट' नांवाची संस्था स्थापिली असून तिची बैठक प्रतिवर्षी बर्लिनमध्यें भरत असते.

केवळ शेतकीच्याच प्रश्नांचा खल करावा या उद्देशानें ही संस्था प्रथम निर्माण झाली; पण आतां तिला राजकीय स्वरूप प्राप्त झालें असून तिचे प्रयत्नहि साप्रत अतिशय वाढले आहेत. जर्मनीच्या लोकसंख्येंत शेतकऱ्यांचें प्रमाण फक्त शेंकडा २८ इतकेंच आहे; तथापि राज्यकारभाराचीं बरींचशीं सूत्रें आपल्या हातीं पक्कीं आहेत, ही गोष्ट दरवर्षी हे शेतकरी राष्ट्राच्या लक्षांत आणून देत असतात. या संस्थेविरुद्ध जर्मनींत पुष्कळ लोकांनीं ओरड केली आहे व त्यांच्या जुलमी अमलापासून सरकारनें जनतेचें रक्षण केलें पाहिजे, अशीहि मागणी पुष्कळ लोक मागत असतात; तथापि यांची जूट व शक्ति अद्यापिहि फुटलेली नाहीं. या शेतकरी मंडळीपुढें १९०९ सालीं सरकारासहि मान वांकवावी लागून त्यासाठीं उद्योग-

धंदे आणि व्यापार यांजवर अधिक कर लादण्यांत आले. या शेतकऱ्यांची चळवळ हाणून पाडण्यासाठीं हंसालीग नांवाची एक संस्था स्थापना झाली; पण या नांगऱ्यांस स्थानभ्रष्ट करण्यास ती समर्थ झाली नाहीं.

या संस्थेचें अध्यक्षपद डॉ. अरन्स्ट फॉं हाइडब्रँड यांजकडे असून त्यांस प्रशियाचे अनभिषिक्त राजे अशी पदवी प्रशियन शेतकरी वर्गोनीं दिली आहे. प्रशियाच्या किंवा साम्राज्याच्या पार्लमेंटांत या मंडळीच्या सभासदांची संख्या फार आहे, असें नाहीं; तथापि सरकारवर त्यांचें वजन मात्र अतिशय आहे. खुद्द मुख्य प्रधानालाहि या मंडळीच्या मताविरुद्ध वागण्याचें धाडस करवत नाहीं. असें धाडस प्रिन्स बुलो यांनीं केलें; पण अखेरीस त्यांस प्रधानपद सोडावें लागलें. हाइडब्रँड यांनीं नजर वर उचलून बेथमन् हॉलवेग यांजकडे पाहिलें कीं, ते कांपूं लागतात, अशी लोकवार्ता आहे. फार काय; पण खुद्द बादशहासहि या लोकांविरुद्ध उघडपणें बोलण्याची सहसा छाती होत नाहीं. गेलीं कांहीं वर्षें बर्लिनमध्यें भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कांग्रेसमध्यें बादशहा स्वतः हजर राहूं लागले आहेत. एके वेळीं बादशहांनीं एका जुन्या कायद्यांत कांहीं सुधारणा सुचविली; पण हाइडब्रँड यांस ती नापसंत झाल्यामुळें हा कायदा अद्यापीहि तसाच चालू आहे.

प्रशियन पार्लमेंट आणि रीचस्ट्याग—झणजे साम्राज्याचें पार्लमेंट—या दोन्ही सभांत हाइडब्रँड हे सभासद आहेत व या दोन्ही सभांतील त्यांच्या बाजूच्या सभासदांचें पुढारीपण यांजकडे आहे. व्यक्ति या नात्यानें ते पार्लमेंटांत मोठे शक्तिमान् गृहस्थ आहेत; तथापि शरीरानें मात्र ते अगदीं रोडके व खुजे आहेत. उंचीनें ते पुरे पांच फूटहि नाहींत आणि ते खुर्चीवर बसलेले असले झणजे पुढच्या टेबलावर पडलेल्या कागदाच्या ढिगाऱ्यांत त्यांची मूर्ति पुरती दिसत देखील नाहीं. उंच व धष्टपुष्ट हालवेग साहेबांसमवेत ते एकादे वेळीं भाषण करीत असले झणजे बळी आणि वामन या जोडीचीच एकाद्यास आठवण व्हावयाची. फॉं हाइडब्रँड हे जसे पोषाकानें तसेच स्वभावानेंहि अगदीं साधे गृहस्थ आहेत.

त्यांच्या पोशाकांत भपक्याची यत्किंचित् छटा देखील दिसून यावयाची नाहीं. तसेंच त्यांच्या भाषणांत अलंकारहि कधीं असावयाचा नाहीं. पार्लमेंटच्या प्रत्येक बैठकीस हजर राहण्यास ते कधीं चुकत नाहींत; तथापि ते फार करून कधीं भाषणहि करीत नाहींत. त्यांचा सारा वेळ लोकांचीं भाषणें ऐकण्यांत व विचार करण्यांतच जातो. एकाद्या आणीबाणीच्या प्रसंगीं मात्र ते स्वतः भाषण करतात. त्या वेळीं त्यांच्या वक्तृत्वाचें आणि वादविवादकुशलतेचें तेज लोकांस चांगलेंच दिसून येतें. एकाद्या प्रसंगीं, ते भाषण करणार ही गोष्ट लोकांस आगाऊ समजली, तर सभासदांच्या बैठकी आणि प्रेक्षकांचे सज्जे हीं चिकार भरून जातात.

फाँ हाइडब्रँड यांना प्रशियन शेतकऱ्यांनीं राजाची पदवी दिली आहे, आणि त्या पदवीला साजेसें त्यांचें अंतःकरणहि अगदीं निर्भय आहे. कोणाचाहि मुलाहिजा न ठेवतां त्यांस योग्य वाटेल, तें सरळपणें ते बोलत असतात. पार्लमेंटांतील एकाद्या विशिष्ट पक्षावर तुटून पडण्याची वेळ आली, तर तसें करण्यास हाइडब्रँड कधींहि कचरावयाचे नाहींत. अशा प्रसंगीं त्यांच्या भाषणांत तीव्रता आणि जोम हीं अशीं वर उसळून येतात कीं, या खुष्या मुदामदेवाच्या तोंडांतून एवढी जोरदार भाषा बाहेर पडते तरी कशी, याचेंच श्रोत्यांस मोठें नवल वाटतें. १९११ च्या नोवेंबर महिन्यांत मोरोक्को प्रकरणासंबंधानें त्यांनीं केलेलें भाषण जर्मन सरकार विसरून जाणार नाहीं. त्या वेळेस डॉ. फाँ बेथमन् हालवेग आणि हर फाँ किडरलेन वेक्टर यांजवर नामर्दपणाचा आरोप हाइडब्रँड यांनीं उघड भाषेंत केला. सरकारास तलवार खुळखुळावयाचें सामर्थ्य मात्र असून ती बाहेर काढण्याचें सामर्थ्य त्यास नाहीं, असें ते म्हणाले. प्रशियाच्या प्राचीन काळाच्या उज्ज्वल यशाची आठवण त्यांनीं सभेस करून दिली. ज्या ज्या वेळीं साऱ्या युरोपाविरुद्ध एकटा प्रशिया लढला, त्या त्या वेळींच त्यांचें खरें क्षात्र तेज प्रगट झालें आहे, असें ते म्हणाले. आणीबाणीच्या वेळीं नामर्दपणें अशीच माघार घ्यावयाची होती, तर एवढें प्रचंड लष्कर आणि जंगी आरमार कां उभारण्यांत आलें ? असा प्रश्न त्यांनीं सरकारास केला. त्यांच्या या भाषणाच्या वेळीं एक तरुण लष्करी अम्मलदार सभा-

गृहांतील राजेलोक बसण्याच्या जागीं बसला होता व या वक्त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक कडक शब्दाला तो आपली संमति उघडपणें दर्शवीत होता. हा तरुण अम्मलदार ह्मणजे सध्यांचे जर्मन युवराज होत. हाइडब्रँड यांचें भाषण संपलें, त्या वेळीं टाळ्यांचा कडकडाट एवढा प्रचड झाला, कीं, त्यानें सारें सभागृह हादरलें. हें भाषण केवळ लष्करी बाण्याचेंच होतें व त्यांत मुत्सद्दी दृष्टि फारशी नव्हती, ही गोष्ट खरी; तथापि जर्मनराष्ट्राचा कल त्या वेळीं कसा वहात होता, हें मात्र स्पष्टपणें निदर्शनास आलें. या भाषणावर उत्तर देतांना डॉ. हालवेग यांनीं या अनभिषिक्त राजावर पुष्कळसा ताशेरा झाडून माथेफिरूपणाचा आरोप त्याजवर केला; तथापि त्यामुळें हाइडब्रँड यांच्या भाषणाची जी छाप लोकांवर बसली, ती कमी झाली नाहीं.

बिस्मार्क यांनीं मुख्य दिवाणगिरीचीं सूत्रें सोडल्यानंतर या शेतकरी राजाला राजकीय सामर्थ्य प्राप्त होऊ लागलें. बिस्मार्क यांच्यावर कौंट क्याप्रिव्ही हे मुख्य प्रधानाच्या जागीं आले. यांचा कल उद्योगवृद्धीकडे असल्यामुळें जर्मनसाम्राज्याच्या जवळपासच्या राष्ट्रापाशीं त्यांनीं लांब मुदतीचे कित्येक व्यापारी तह केले. या तहामुळें जर्मनीच्या शेतकीस थोडासा धोका प्राप्त झाला. राशियांतील गहूं, आस्ट्रियांतील राय धान्य, डेन्मार्कमधील लोणी व इतर प्राणिज पदार्थ आणि हंगेरींतील बार्ली यांजवरील कर बरेच कमी करण्यांत आले व याच्या बदल्यांत या राष्ट्रा-कडून जर्मन कारखान्यांत तयार झालेल्या जिनसांवरील कर कमी करून घेण्यांत आले. शेतकऱ्यांस राजकीय व्यवहारांत आपलें घोडें पुढें दामट-ण्यास हीच संधि होती. या कलापर्यंत जर्मनी हा मुख्यतः शेतकीचा देश होता; यापुढें शेतकी कमी होऊन कारखाने वाढणार, अशीं चिन्हें उघड दिसूं लागलीं. शेतकरी आणि कारखानदार यांजमध्यें होणाऱ्या भावी संग्रामाचा पायां या वेळीं पडला. पूर्व आणि पश्चिम प्रशिया, पोमे-रानिया, मॅक्लेनबर्ग, सायलेशिया आणि ब्रँडनबर्ग येथील जमीनदारांनीं क्याप्रिव्ही यांचे तह मुदत संपल्यानंतर पुनः अस्तित्वांतून येऊंन देण्याची खटपट चालविली. १९०२ सालीं क्याप्रिव्ही यांच्या तहाची मुदत संपली

व त्या सालचे मुख्य प्रधान प्रिन्स ब्युलो यांजकडून या जमीनदारांनीं आपल्या इच्छेप्रमाणे धान्यावरील करांत फेरबदल घडवून आणविला. या नव्या कायद्याचा रोख शेतकी वाढाविण्याचा होता. त्याचप्रमाणें या कायद्यामुळें जर्मन कारखाने मागें पडूं लागले, ही गोष्टहि खरी.

प्रशियांतील जमीनदार हे स्वतःस राजरक्षक ह्मणवीत असतात. राजनिष्ठेविषयीं भाषणें करतांना त्यांची जीभ जितकी लांब होते, तितकी ती दुसऱ्या कोणाचीहि होत नाहीं. जर्मनीच्या प्राचीन रीतिभाती व त्या राष्ट्राचे प्राचीन लष्करी वैभव कायम ठेवण्याचा मक्ता ईश्वराने आपणांकडे दिला आहे, असा या जमीनदार मंडळीचा समज आहे. सरकारी खातीं, लष्कर, आणि परराष्ट्रीय खातीं या सर्वांत अद्यापिहि या जुनाट फाँ मंडळीचें वर्चस्व सर्वत्र आढळून येतें. जुन्या चालीरीति मोडूं पाहणाऱ्या सोसियालिस्ट लोकांस ही मंडळी अगदीं पाण्यात पहाते. कोणीं सोसियालिस्ट पाहिला कीं, त्यास खाऊ कीं गिळू असें यांस होतें. जर्मनराष्ट्राची राजकीय व सामाजिक पद्धति ईश्वरानेंच निर्माण करून दिली आहे, असा यांचा पक्का समज आहे. जर्मनीवर राज्य करण्याचा हक्क आपणांस प्रत्यक्ष परमेश्वराकडून मिळाला आहे, असें ज्याप्रमाणे होहेनझोलर्न घराण्याला वाटतें, त्याचप्रमाणें जर्मनीच्या राजकीय व सामाजिक पद्धतीचें रक्षण करण्याचें काम परमेश्वरानें आपणांवर सोंपविलें आहे, असे या फाँ मंडळीस वाटतें. बादशहाचे एकादे ह्मणणें रिचस्ट्याग पार्लमेंटनें फेटाळून लावलें, तर एक लष्करी अम्मलदार व दहा शिपाई पाठवून सभेची बैठक ताबडतोब मोडून टाकण्याचा अधिकार बादशहास असावा, असें हर फाँ ओल्डनबर्ग हे एकदां स्पष्ट ह्मणाले. इंग्लंडांतील डेली टेलिग्राफ पत्राच्या बातमीदाराची मुलाखत स्वीकारून केसर यांनीं आपलीं कांहीं राजकीय मतें त्यांजपाशीं अगदीं मोकळेपणानें बोलून दाखविलीं. या मुलाखतीची हकीकत प्रसिद्ध झाल्यानंतर बादशहाच्या तारतम्यावर सारें जर्मनराष्ट्र तुटून पडलें. या वेळीं त्यांची बाजू सांभाळण्यास या जमीनदारांवांचून दुसरें कोणीहि पुढें आलें नाहीं. या वेळीं फाँ हाइडब्रँड यांनीं जें एक भाषण केलें व त्यांत केसरची जी तरफदारी

केली, ती लोकांच्या लक्षांतून कधींहि जाणार नाहीं. या वेळीं प्रिन्स ब्यूलो हे केसरच्या विरुद्ध होते. हाइडब्रँड यांचें भाषण झाल्यानंतर प्रिन्स ब्यूलो आपलें प्रधानपद सोडतील अशी लोकांची खात्री झाली व त्या प्रमाणें पुढें घडलेहि.

बर्लिन येथें कांहीं काम नसलें, ह्मणजे हाइडब्रँड हे सायलेशियांतील आपल्या खेड्यांत जाऊन राहतात. या खेड्याची मालकी शंभराहून अधिक वर्षें त्यांच्याच घराण्यांत आहे. शतसांवत्सरिक उत्सवाच्या वेळीं हाइडब्रँड यांनीं गरुडाचा एक मोठा दगडी पुतळा करून तो आपल्या घरावर लावला. त्यांचें घर विस्तीर्ण असून त्याची बांधणी एकाद्या जुन्या पद्धतीच्या भुइकोट किल्ल्यासारखी आहे. या किल्ल्याच्या भिंतीवर शिकारीच्या वस्तु जिकडे तिकडे लटकावलेल्या आढळतात. फॉ हाइडब्रँड यांस शिकारीचा अतिशय नाद आहे. त्यांच्या घरांत अलीकडील पद्धतीचें कोणतेहि भपकेबाज सामानसुमान आढळून यावयाचे नाहीं. शोभेसाठीं फक्त हाइडब्रँड घराण्यांतील पूर्वपुरुषांचीं चित्रें मात्र त्यांनीं चोहोंकडे लटकाविलीं आहेत. या ठिकाणीं त्यांचा बहुतेक वेळ पूर्ण विश्रांतींत जातो. ते देशाच्या राजकीय कारभारांत मन घालतात; तथापि आपलें घोडें, आपलीं औतें आणि आपल्या जमिनी हींच त्यांस फार प्रिय आहेत.

फॉ हाइडब्रँड हे स्वभावानें साधे गृहस्थ आहेत. दुसऱ्यावर वरपगडा बसविण्याची उत्सुकता त्यांस मुळींच नाहीं. तथापि ते निर्भय अंतःकरणाचे व करारी बाण्याचे असल्यामुळें लोकांवर त्यांचा पगडा आपोआपच बसतो. हे कायद्याची परीक्षा पास झाले आहेत व सार्वजनिक कामांत गेलीं पंचवीस वर्षें त्यांनीं खर्च केलीं आहेत. प्रशियाच्या ज्या भागानें आजपर्यंत मोठे राजकर्ते, प्रचंड वीर आणि धुरंधर मुत्सद्दी निर्माण केले, त्याच भागांत यांचा जन्म झाला असल्यामुळें साम्राज्याची भवितव्यता सारी आपल्याच शिरावर आहे, असें त्यांस मनःपूर्वक वाटतें. बिस्मार्क हे त्याच भागांत निर्माण झाले. असिधाराव्रताबद्दल बिस्मार्क यांची प्रसिद्धि आहे व हेंच व्रत त्यांच्या या प्रांतस्थ मंडळींनीं अद्यापिहि तसेंच पुढें चालविलें आहे, याची साक्ष हाइडब्रँड यांच्या चरित्रांत दिसून येते.

मार्शल फाँ बायबरस्टीन.

जर्मनीचें आरमारी सामर्थ्य वाढत चाललें, तेव्हां युरोपांतील एकंदर राष्ट्रापैकीं त्यांचा संबंध इंग्लंडशीं वारंवार येणार, ही गोष्ट निश्चित झाल्यासारखीच होती. अशा प्रसंगीं दुसऱ्या वुइलियम बादशहानें साम्राज्यांतील पहिल्या प्रतीच्या मुत्सद्यांस परराष्ट्रीय नीतीचीं सूत्रें आपल्या हातीं घेण्यास सांगावें हेंहि ओघालाच आलें. ब्यारन मार्शल फाँ बायबरस्टीन हे १९१२ सालच्या वसंतांत जर्मनीचे वकील या नात्याने इंग्लंडांत आले. इंग्लंड व जर्मनी यांजमधील हितसंबधांत आढळून येणारा विरोध दूर करण्याचें अत्यंत कष्टप्रद काम यांच्या वांट्यास आलें होतें; पण या कार्याचीं पुरीशीं सूत्रें त्यांच्या हातीं येण्यापूर्वीच ते परलोकवासी झाले; पण मरणापूर्वी जर्मन साम्राज्याचें जेवढें हित त्यांनीं साधलें, तेवढ्यानेंच त्यांचें महत्त्व जर्मन साम्राज्याच्या इतिहासांत कायम टिकेल. तुर्कीची युरोपांतील सत्ता नष्ट झाली; तथापि आशियामायनरमध्यें जें कायमचें महत्त्व बायबरस्टीन यांनीं जर्मनीस मिळवून दिलें, तेंच त्यांचें चिरकालीन स्मारक राहील. "आनाटोनिया प्रांतांत जर्मनीचे अत्यंत महत्त्वाचे हितसंबंध गुंतले आहेत व या प्रांतावर आज किंवा यापुढें झडप घालण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं." असे उद्गार ब्यारन फाँ ब्यांगेनहीम यांनीं काढले. ब्यांगेनहीम हे कान्स्टांटीनोपल येथें जर्मन साम्राज्याचे वकील या नात्यानें रहात आहेत. आनाटोनिया प्रांतांत दुसऱ्या कोणाचाहि प्रवेश होऊं नये, याकरतां जर्मन बादशहाचें लष्कर आपल्या सगिनीसह तेथें कधीं काळीं सज्ज झाल्याचें दिसलें, तर त्या प्रांतांतील जर्मनीचें एवढें महत्त्व उत्पन्न होण्यास मार्शल फाँ बायबरस्टीन यांची मुत्सद्देगिरीच कारण झाली आहे, ही गोष्ट जर्मन साम्राज्य विसरणार नाहीं.

फाँ बायबरस्टीन हे शरीरानें धिप्पाड व मजबूत असून त्यांस थोडेंसें पोंक आलें होतें. त्यांच्या बुद्धिमत्तेचें तेज त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेलें दिसत असे. ते पहिल्या प्रतीचे हजर-जबाबी व विलक्षण निधड्या छातीचे होते. त्यांची वागणुकीची तऱ्हाहि असामान्य कोटींतील होती.

अघळपघळ भाषण करतां करतांच प्रसंग पडला, तर आपलें तोंड घट्ट मिटून घेण्याची विलक्षण कला त्यांस पूर्णपणें साध्य झाली होती. प्रसंग पडेल त्याप्रमाणें आपल्या वर्तणुकीचा रोंख एकदम कसा बदलावा, हें ते जाणून होते. जर्मनराष्ट्र हें साऱ्या जगांतील पाहिल्या प्रतीचें राष्ट्र होणार आहे, व असें होण्याचा यत्न कोणत्याहि मार्गानें जर्मन राष्ट्रानें करणें योग्य आहे, असें त्यांचें ठाम मत होतें. एवंगुणविशिष्ट मुत्सद्यावर ब्रिटनचा स्नेह संपादण्याचें कार्य दुसऱ्या वुइलियम बादशहानें सोंपविलें होतें. बोअर युद्ध सुरू होण्याच्या पूर्वी प्रेसिडेंट क्रूगर यांस दुसऱ्या वुइलियम बादशहांनीं एका विशेष प्रसगीं एक अभिनंदनपर तार पाठविली होती. यामुळें सर्व युरोपभर व विशेषतः इंग्लंमडध्यें मोठी खलबळ उडून गेली होती. ती गोष्ट तत्कालिन इतिहासांत प्रसिद्धच आहे. अशा प्रकारची तार पाठविण्यास बादशहास बायबरस्टीन यांनीं प्रोत्साहन दिलें, अशी आफवा त्या वेळी लोकांत पसरली होती. अशा रीतीनें इंग्लंडशीं उघडपणें शत्रुत्व दाखविणाऱ्या बायबरस्टीन यांस इग्लंडशीं सलोखा करण्याच्या कामावर बादशहांनीं नेमिलें आहे, असा गवगवा साऱ्या जर्मनीभर झाला. या तारेच्या प्रकरणांत आपलें मुळींच अंग नव्हतें, असें बायबरस्टीन म्हणत असत. इंग्लंडांतील लोकमत या वेळीं जर्मनीविरुद्ध अतिशय खवळून गेले होते. अशा वेळीं आपला मोठा धुरंधर मुत्सद्दी तेथें पाठवून या दोन राष्ट्रांत सख्य जोडण्याचा उपक्रम आणखी एकवार करून पाहण्याचा प्रयत्न वुइलियम बादशहांनीं केला असावा. मार्शल बायबरस्टीन यांसहि ही नेमणूक फार पसंत पडली. हें काम अत्यंत अवघड होतें, ही गोष्ट ते जाणून होते; पण अवघड कामास हात घालण्यांत ते सदोदितच उत्सुक असल्यामुळे ही कामगिरी त्यांनीं मोठ्या संतोषानें पत्करली. कान्स्टान्टिनोपल येथील कामागिरी त्यांनीं सोडली, त्या वेळीं केलेल्या एका भाषणांत " जर्मनसाम्राज्याच्या अवघड कामाकरताच हा देह वाहिलेला आहे. " असे स्पष्ट उद्गार त्यानीं काढले. या प्रयत्नांत बायबरस्टीनसारख्या अस्सल मुत्सद्यांस अपयश आलें असतें, तर या परस्पर राष्ट्रांत स्नेहभाव जडणें अशक्य कोटींतील आहे, असेंच साऱ्या जर्मनीनें म्हटलें असतें.

आपल्या सरकाराकडून हुकूम होतील त्याप्रमाणें नुसतें इकडून तिकडे करावयाचें, एवढेंच परराष्ट्रीय वकिलांचें काम आहे, असें बिस्मार्क ह्मणत असत; पण हें तत्त्व ब्यारनमार्शल यांस मुळींच लागू नव्हतें. केवळ असलें निरोप्याचें काम करावें, यासाठीं त्यांचा जन्मच नव्हता. कोणतेंहि राजकाज स्वतः शिरावर घेऊन आपल्या जबाबदारीवर तें पार पाडण्यास लागणारी स्वतंत्र बुद्धि व हिंमत यांचा भरपूर पुरवठा बायबरस्टीन यांजजवळ होता. परदेशांतील एकाद्या राजकारणांत स्वतंत्रपणें प्रथम कामगिरी करावयाची आणि तिचा रिपोर्ट मागाहून करावयाचा असा त्यांचा परिपाठ होता. प्रत्येक गोष्टींत "हुकुमासाठीं" वरिष्ठांच्या तोंडाकडे पाहण्याची सवय त्यांस कधींच नव्हती.

ते जन्मसिद्ध मुत्सद्दी होते. (ReaI doitker) असा त्यांचा लौकिक साऱ्या जर्मनसाम्राज्यभर पसरला होता. प्रत्यक्ष वस्तुस्थिति सोडून केवळ उच्च कल्पनांच्या मागें पळत सुटण्याची संवय त्यांस नव्हती. प्रत्यक्ष व्यवहार कोणत्या तत्त्वावर चालतो, हें लक्षांत ठेवूनच तदनुसार ते वागणूक करीत असत. जर्मनीला काय हवें आहे, हें त्यांच्या मुखानें एकवार इंग्लंडला समजलें असतें, ह्मणजे या दोन देशांत जीं पुष्कळशीं निरर्थक कागदीं घोडीं नाचतात तीं नाचलीं नसतीं, आणि परस्पर मुत्सद्यांतील नुसत्या पवित्र्याच्या भाषणांचा पाऊसहि थांबला असता. आपणास काय हवे आहे, तें शक्य तितक्या स्पष्ट शब्दांनीं सांगावें अशी बायबरस्टीन यांची चाल असे. आपल्या स्पष्टोक्तीनें कोणाचा मनोभंग झाला, तरी त्याचीहि ते पर्वा करीत नसत; पण यामुळें त्यांच्याशीं व्यवहार करणारास द्विरुक्तीचा व निरर्थक घोंटाळ्यांत पडण्याचा प्रसंग सहसा येत नसे. हेग परिषदेच्या एका सभेच्या प्रसंगीं बायबरस्टीन जर्मनीतर्फे हजर होते. तेव्हां लष्करी व आरमारी वाढींत जर्मनी कधींहि मागें घेणार नाहीं, असे स्पष्ट उद्गार त्यांनीं काढले. साम्राज्याची वाढ होणें जर्मनीस अत्यंत आवश्यक आहे, या मतास त्यांची पूर्ण मान्यता होती. या दिशेनें साम्राज्याचें पाऊल पुढें पडण्यासाठीं १५ वर्षें त्यांनीं स्वतः कसून मेहनत केली. आशियामायनर व तुर्कस्थान यांमध्यें जर्मनीचें

वर्चस्व होऊन त्या द्वारें जर्मनीच्या व्यापाराला इराणच्या उपसागरांत मुक्तद्वार मिळावें, ही जर्मनसाम्राज्याची महत्त्वाकांक्षा सरकारीरीत्या उघडपणें प्रसिद्ध झाली नसली, तरी ती जर्मनसाम्राज्याच्या मनांत कायमची आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच. बगदाद रेलवेच्या द्वारें जर्मनसाम्राज्यानें आपलें पाऊल या दिशेनें हळूच पुढें सरकाविलें आहे. जर्मनीची महत्त्वाकांक्षा पुरी करण्याठीं जे लोक धडपडत आहेत व होते, त्यांतच बायबरस्टीन यांची गणना प्रमुखत्वानें केली पाहिजे. ब्रिटिश राजकारणाचा जेथें जेथें संबंध आला, तेथें तेथें त्यानीं ब्रिटिश हितसबधाविरुद्ध वर्तन केलें आहे. ब्रिटिश हितसंबंधाशीं विरोध करणें, हा त्यांचा ठरीव कार्यक्रम झाला होता. दक्षिण आफ्रिका, हेग आणि तुर्कस्थान या साऱ्या ठिकाणीं त्यांची ही मनःप्रवृत्ति उघड झाली होती.

सुप्रसिद्ध 'क्रूगरतार' त्यांनीं स्वहस्तें लिहिली नसली, तरी बादशहास त्यांनीं या कामीं प्रोत्साहन दिलें, असें त्या वेळच्या एकदर परिस्थितीवरून उघड झालें आहे. दक्षिण आफ्रिकेंतील बोअर सस्थानें स्वतंत्र असण्यांतच जर्मनसाम्राज्याचें हित आहे, अशा अर्थाचें एक अनावृत्त पत्र त्या वेळीं युरोपांतील सर्व राष्ट्राकडे पाठविण्यांत आलें होतें. हें पत्रहि बायबरस्टीन यांच्या हातचेंच असावें, अशी पुष्कळांची खात्री झाली होती. दक्षिण आफ्रिकेंतील जेमिसन बंडाची समाप्ति झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं वुइलियम बादशहांनीं आपल्या मुत्सद्यांचे एक कौन्सिल भरविलें. त्या वेळीं बादशहास सल्ला देण्यासाठीं मुख्य प्रधान प्रिन्स होहेनलो, परराष्ट्रीय प्रधान ब्यारनमार्शल व आरमारी चिटणीस ॲडमिरल हॉलमन् हे परराष्ट्र कचेरींत जमले. क्रूगरतारेचा मसुदा मेजावर समोरच पडला होता. अशा प्रकारें तार पाठविण्याच्या बाबींत खुद्द बादशहा अगदीं विरुद्ध होते; पण ही तार पाठविलीच पाहिजे, असें मार्शल म्हणाले. या वेळीं अशी तार पाठविणें आपल्या भावी कार्यास साधक असून जर्मन जनतेलाहि त्यामुळें संतोष होईल, असें मार्शल म्हणूं लागले. अखेरीस बादशहांनीं ही तार पाठविण्यास संमति दिली; तथापि त्या तारेच्या मूळच्या मसुद्यांतहि त्यांनीं बरीच फिरवाफिरव केली. दक्षिण-

आफ्रिकेंतील ब्रिटिश हितसंबंध हाणून पाडावेत, अशा मताचे जे कांहीं मुत्सद्दी युरोपांत होते, त्यांत ब्यारन मार्शल हे अगदीं प्रमुख होत.

परराष्ट्रीय चिटणीसाच्या जागीं ते काम करीत असतां, त्यांच्या अमदानींत इंग्लंड व जर्मनी यांजमधील संबंध विकोपास जाण्याच्या पंथास लागला होता. यानंतर थोड्याच दिवसांनीं तुर्कस्थानांतील वकिलाच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. ही जागा पत्करण्यांत तुर्कस्थानांतील ब्रिटिशहितसंबंधास विरोध करावा हाच त्यांचा हेतु होता. हा त्यांचा हेतु किती उत्तम प्रकारें तडीस गेला, ही गोष्ट तत्कालीन इतिहासज्ञांस अवगतच आहे. कान्स्टान्टिनोपल येथें जर्मनीस जें वर्चस्व प्राप्त झालें, त्यास ब्यारन-मार्शल यांचेच श्रम कारणीभूत आहेत, असा सर्वांचा समज आहे. तथापि ही गोष्ट सर्वथा खरी नाहीं. या गोष्टीचा मूळ पाया कान्स्टा-न्टिनोपल येथें तत्पूर्वी कित्येक वर्षें रोंवण्यांत आला होता. ब्यारन-मार्शल तेथें जाण्यापूर्वी खुद्द बादशहांनीं तेथें प्रवास केला होता. प्यालेस्टाइन प्रांतांत यात्रेस जातांना वाटेंत सुलतान अब्दूल हमीद यांची भेट घेण्यास वुइलियम बादशहा विसरले नव्हते. कान्स्टान्टिनोपल येथें जर्मन बादशहांनीं आपल्या वर्चस्वाची मुहूर्तमेढ अशा रीतीनें पूर्वीच रोंवून ठेवली होती. बादशहांनीं स्वहस्तें पेरलेल्या या बीजाला पाणी घालण्याचें काम मात्र ब्यारनमार्शल यांनीं केलें.

जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेस बाधक होईल, असा एक शब्दहि सुलतानानें आपल्या तोंडून बाहेर काढूं नये इतक्या गुलामगिरीच्या स्थितीस सुलतानाला आणून सोडण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. परकीयराष्ट्रांच्या राजधानींत वकील या नात्यानें कराव्या लागणाऱ्या भानगडींची विद्या ब्यारनमार्शल यांस या वेळीं अवगत नव्हती. परराष्ट्रीय वकिलाचें काम हा वेळपर्यंत त्यांनीं कधींच केलें नव्हतें; तथापि थोड्याच महिन्यांच्या अवधींत ही विद्या त्यांनीं पूर्णपणें साध्य करून घेतली. परराष्ट्रीय खात्यांत व एकंदरीनें तुर्कस्थानच्या राज्यकारभारांत थोड्याच दिवसांत त्यांनीं आपलें वजन पक्कें बसविलें. कोणत्याहि तुर्काची अथवा परकीय मुत्सद्याची मात्रा त्यांच्यापुढें चालेनाशी झाली. सुलतानानें त्यांस उघडपणें वजिरी दिली

नव्हती इतकेंच. बाकी वस्तुतः वजिराचे सर्व अधिकार त्यांनीं आपल्या हातीं घेतले होते. तुर्कस्थानांतील जर्मनीच्या वजनास आळा घालणारा तेथें कोणीहि उरला नाही. मार्शल बायबरस्टीन हे सर्वसमर्थ आहेत, असें सामान्य प्रजाजनांसहि वाटूं लागलें. या आपल्या वजनाचा पूर्ण फायदा त्यांनीं करून घेतला. जर्मनीच्या फायद्याकरतां प्रसंगीं दडपशाही करण्यासहि त्यांनीं कमी केले नाहीं. आस्ट्रियानें तुर्कांचा बास्नीया प्रांत खाल्ला, त्या वेळीं तुर्की जनतेचीं मनें आस्ट्रियाविरुद्ध खवळून गेलीं होतीं. त्या वेळीं एका जर्मन गलबतांतून माल बाहेर काढण्याचें मजुरांनीं नाकारलें. त्या आगबोटीच्या कप्तानानें बायबरस्टीन यांची भेट घेऊन हा संप मोडण्यास त्यांची मदत मागितली. बायबरस्टीन स्वतः बंदरावर गेले आणि त्यांनीं एक वेळ ओरडून हांक मारल्याबरोबर मजुराचा सारा घोळका चकार शब्दहि न काढता निमुटपणें कामावर हजर झाला.

सुलतान अबदूल हमीद यांच्या कारकिर्दींत मार्शल यानींच सारा सुलतानी अम्मल गाजविला. पुढें थोड्याच दिवसांनीं सुलतान अबदूल हमीद पदच्युत होऊन तरुण तुर्कांच्या अम्मलास सुरुवात झाली. सुलतान अबदूल हमीद यांजबरोबरच मार्शल यांचे व त्यांच्या द्वारें जर्मनीचें वजन संपुष्टांत येणार, असें सर्वांस वाटूं लागलें, पण वारा येईल तशी पाठ फिरविण्याची विद्या ब्यारन बायबरस्टीन यांस कशी करतलमलवत् होती, ही गोष्ट लोकांस ठाऊक नव्हती. सुलतानावर आपले वजन बसविण्यास ज्या युक्त्यांचा उपयोग त्यानीं केला होता, त्या सर्व टाकून देऊन त्यांनीं नवीनच पद्धत स्वीकारली. प्रथम ते कांहीं दिवस अगदीं स्वस्थ बसून राहिले. नव्या राज्यपद्धतीला स्थिरता येईपर्यंत त्यानीं कांहींच हालचाल केली नाहीं. पुढें तरुण तुर्कांपैकीं कांहीं लोक सल्लामसलतीसाठीं त्यांच्याकडे जाऊं लागले; तेव्हा या संधीचा फायदा घेऊन तरुण तुर्कांवर आपला अम्मल बसविण्यास त्यानीं सुरुवात केली. सुलतान अबदूल हमीदची राज्यपद्धति शुद्ध एकतंत्री असल्यामुळें त्यांच्याशीं संबंध ठेवणें आपणांस आवडत नसतांहि केवळ जरूरीमुळें प्राप्त झालें, असें ते म्हणूं लागले; पण तुर्कस्थानांत ज्या अर्थी नव्या सनदशीर राज्यपद्धतीस

सुरुवात झाली आहे, त्या अर्थी त्यांच्याहि सेवेला आपण आनंदानें हजर राहूं, असें त्यांनीं तरुण तुर्कांस सांगितलें. अबदूल हमीदच्या कारकिर्दींत त्यांनीं गाजाविलेला सुलतानी अम्मल व बास्नीया आणि त्रिपोली प्रकरणें, इतक्या गोष्टी यांच्या कारकिर्दींत तुर्कांच्या मनाविरुद्ध घडल्या असतांहि तुर्कस्थानांतील जर्मनीच्या वजनास धोका आला नाहीं. एवढ्यावरूनच ब्यारन मार्शल यांच्या मुत्सद्देगिरीची परीक्षा होते.

दक्षिण जर्मनींतील बेडन प्रांतांत ब्यारन मार्शल यांचा जन्म झाला. मृत्युसमयीं त्यांचें वय ६९ वर्षांचें होतें. १२ वर्षें सरकारी वकिली केल्यानंतर राजकीय खात्यांत ते शिरले व त्याच वेळीं जर्मन साम्राज्य पार्लमेंटांत त्यांचा प्रवेश शाला. कार्लस्रूहे येथील कोर्टांत त्यांनीं चांगली कीर्ति मिळविली असल्यामुळें बर्लिन येथील सर्व संस्थानांच्या कौन्सिलांतहि बेडन संस्थानचे प्रतिनिधी ह्मणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्या वेळीं फाँ हालस्टीन या नांवाचे एक मुत्सद्दी जर्मन साम्राज्याचीं सूत्रें चालवित होते, हालस्टीन यांचें वजन या वेळीं इतकें होतें कीं, त्यांच्या विरुद्ध जाण्यास कोणाचीहि छाती होत नसे. ब्यारन मार्शल हे हालस्टीनच्या पक्षाला जाऊन मिळाले. यानंतर थोड्याच दिवसांनीं सुप्रसिद्ध बिस्मार्क यांचे चिरंजीव कौंट हरबर्ट बिस्मार्क यानी आपल्या परराष्ट्रीय चिटणीशीचा राजीनामा दिल्यानंतर त्या जागीं बायबरस्टीन यांची योजना हर फाँ हालस्टीन यांनीं केली.

केवळ वकिलीचा धंदा करणाऱ्या व परराष्ट्रीय संबंधांत नवशिक्या असलेल्या अशा मनुष्याची योजना एवढ्या महत्त्वाच्या जागीं हालस्टीन यांनीं केली, ही गोष्ट बऱ्याचशा धंदेवाल्या मुत्सद्यांना आवडली नाहीं. तशांत परराष्ट्रीय खात्याला ही वेळहि मोठी आणीबाणीची होती. खात्यांतले बरेच अतस्थ धोटाळे या वेळीं बाहेर आले. कांहीं प्रकरणें कोर्टांत गेलीं, पुष्कळशीं कृष्णकृत्यें उघडकीस आली आणि कांहीं प्रकरणें तर प्रत्यक्ष हातघाईस आलीं. या साऱ्या भानगडींतून बायबरस्टीन अगदींच कोरे बाहेर पडले नसले, तरी बऱ्याच अंशीं या वेळीं त्यांनीं आपली कीर्ति सांभाळली, यांत मात्र शंका नाहीं. यांच्या कारकिर्दींत

ऑस्ट्रिया, इटली व जर्मनी यांच्या तिरंगी संधीस नवजीवन मिळालें. चीन–जपान युद्धानंतर जपानला दपटशा देण्यास रशिया, फ्रान्स व जर्मनी हे यांच्याच अमदानींत एकत्र झाले. पूर्व वयांत त्यांनीं केलेल्या वकीलीचा त्यांस या वेळीं चांगला उपयोग झाला. पार्लमेंटांतील वादविवादांत प्रतिपक्षास आपल्या वक्तृत्वानें चीत करून टाकण्यांत त्यांचा हातखंडा होता. १८९७ सालीं परराष्ट्रीय चिटाणिशीचा राजीनामा त्यांनीं दिल्यानंतर बादशाहांनीं त्यांची नेमणूक कान्स्टांन्टीनोपल येथें केली.


ब्यारन मार्शल शरीरयष्टीनें उंच व बांध्यानें धिप्पाड होते. ते फार मितभाषी असत; तथापि त्यांच्या भाषणांत उग्रता केव्हांहि आढळून आली नाहीं. त्यांचा स्वभावहि फार शांत असून वागणूक फार सभ्य असे. त्यांना इंग्रजी भाषेचें उत्कृष्ट ज्ञान असून त्या भाषेंत त्यांचें वक्तृत्वहि अस्खलित चालत असे. फ्रेंच भाषा त्यांस साधारण बोलतां येत होती. ते हिंडलबर्ग विश्वविद्यालयाचे पदवीधर होते. सहा फुटांहून अधिक उंची आणि तिला योग्य अशी रुंदी अशी जोड त्यांच्या ठिकाणीं एकवटल्यामुळें केवळ बाह्य दृष्टीनें पाहणारासहि त्यांच्या शापादपि शरादपि स्वभावाची तावडतोब ओळख पटत असे. चालतांना थोडें पोंक काढण्याची त्यांस संवय होती; पण त्यांमुळें ते अशक्त असावे असें कोणासहि वाटलें नाहीं.

बुद्धिबळांचा त्यांस मोठा शोक होता. तसेंच संगीत आणि बागाइत या कलांचाहि त्यांना फार नाद असे, रिकाम्या वेळीं ते बहुधा बुद्धिबळें खेळतांना आढळत. अशा वेळीं एकदा खेळगडी न मिळाला, तर सुप्रसिद्ध कवि व तंतकार विहोव्हन् याचें एकादें गाणें पियानोवर छेडीत बसलेले ते असावयाचे. बास्फरस नदीच्या कांठीं असलेल्या जर्मन वकिलातीच्या भोंवतीं गुलाबांचा सुंदर बगीच्या त्यांनीं तयार केला होता व साऱ्या फुलझाडांची निगा ते स्वहस्तें राखीत असत.

ब्यारन मार्शल यांस अनुकूल वेळींच मृत्यु आला असें झटलें पाहिजे तुर्की साम्राज्यावर त्यांचें एक प्रकारचें प्रेम जडलें होतें. अधिक काळ ते जगले असते, तर बाल्कन युद्धांत झालेली तुर्की साम्राज्याची वाताहत

पाहून त्यांस मरणप्राय दुःख झालें असतें, यांत शंका नाहीं. तुर्की साम्राज्य बलवान व्हावें, एतदर्थ त्यांनीं पुष्कळ खटपट केली होती, व या खटपटीस बरेंच यश आलें असावें, असा त्यांचा समज होता. त्यांच्या अखेरच्या दिवसांत हा समज खोटा पडल्याचें त्यांस आढळून आलें असतें, तर त्यांच्या हृदयास पीळ पडल्यावांचून राहिला नसता. या महद्दुःखांतून ते वांचले, ही परमेश्वराची मोठी कृपाच होय.

एमील रॅथेनॉ.



कोणीहि प्रवासी जर्मनींत हिंडूं लागला. ह्मणजे *A. E. G.* हीं तीन अक्षरें वारंवार त्याच्या नजरेस पडतात आणि वारंवार तीं कर्णपथावरहि आदळत असतात. कोणतेंहि वर्तमानपत्र त्यानें उघडलें, तर तेथें सुद्धां हीं अक्षरें त्याचा पिच्छा सोडीत नाहींत. तसेंच सामान्य संभाषणांतहि त्यांचा उल्लेख वारंवार कानीं येतो. फ्रान्सांत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या कल्पनांचीं निदर्शक अशीं तीन अक्षरें *L. E. F.* चोहोंकडे आढळून येत असतात. हीं अक्षरें फ्रान्स देशाचें राष्ट्रीय ध्येय दाखवीत असतात. त्याचप्रमाणें जर्मनींतहि *A. E. G.* या तीन अक्षरांत असेंच राष्ट्रीय ध्येय सांठविलें आहे कीं काय, असें एकाद्यास वाटेल; पण या अक्षरांनीं राष्ट्रीय ध्येय दर्शित होत नसलें, तरी तीं जर्मनीच्या एका प्रचंड उद्योगाची साक्ष पटवितात, हें मात्र खरें. जर्मन इलेक्ट्रीक कंपनीच्या जर्मन नांवाचीं हीं आद्याक्षरें आहेत. या कंपनीचें वसतिस्थान बर्लिन येथें आहे; पण तिचे हितसंबंध रशिया, फ्रान्स, आस्ट्रिया, इटली, स्वीडन, स्पेन, स्विट्झर्लंड, तुर्कस्थान, दक्षिण आफ्रिका, अर्जेंटाईन संस्थानें, युरागवे, चिली आणि डच ईस्ट इंडिज बेटें इतक्या ठिकाणीं पसरले आहेत. खुद्द जर्मन साम्राज्यांत तर लष्कर किंवा आरमार यांसारख्या राष्ट्रीय संस्थांइतकेंच तिचें वजन आहे. जर्मनीची सांप्रत जी कांहीं स्थिति आहे, ती मिळण्यास ही संस्था

सुद्धां बऱ्याच अंशीं कारण झाली आहे. केवळ धंद्याच्या दृष्टीनें पहातां ही संस्था अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे, असें झटलें पाहिजे. क्रपच्या कारखान्याप्रमाणें तिजवरून चार पिढ्यांचा काळ लोटलेला नाहीं. एमील रॅथेनॉ यांनीं ही संस्था केवळ स्वतःच्याच बळावर तीस वर्षांपूर्वी निर्माण केली. त्या वेळीं तिचें एकंदर भांडवल अडीच लक्ष पौंडांचें होतें. आज तेंच वीस कोट पौंडांचें झालें आहे. १८७१ सालीं फ्रान्सला पादाक्रांत केल्यानंतर जर्मनीनें त्याजपासून बरोबर इतकीच रक्कम खंडणीदाखल घेतली होती.

हँबर्ग येथील बॅलिनप्रमाणेंच रॅथेनॉ हे जातीनें यहुदी असून बॅलिन-सारखेच केवळ स्वतःच्या बुद्धिबळानें ते इतक्या वैभवास चढले आहेत. जर्मनीच्या व्यापारी साम्राज्यांतील बॉलिन, थायसेन, आणि रॅथेनॉ हे तीन महाराजे होत. अत्यंत जरूरीच्या वेळीं योग्य मनुष्य पैदा करणे हा जर्मन राष्ट्राचा उपजत गुण दिसतो. जर्मन संस्थानें विस्खळित असून परस्परांच्या भांडणानीं परक्यांच्या भक्ष्यस्थानीं पडण्याच्या बेतांत आली होतीं. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं बिस्मार्क यांचा जन्म झाला. बिस्मार्क यांनीं या घोंटाळ्यांतून मजबूत व सुबुद्ध असें जर्मन साम्राज्य निर्माण केलें. केवळ पंचवीस वर्षांच्या अवधींत त्यांनीं एवढी अजब मुत्सद्देगिरी दाखविली, कीं जर्मन साम्राज्याच्या संघटनेच्या बाबतींत एकहि काम करावयाचें त्यांनीं शिल्लक ठेवलें नाहीं. साम्राज्य घटनेनंतर मुत्सद्देगिरीची जरूरच तेथें उरली नाहीं; पण या वेळीं व्यापारी दृष्ट्या धोरणी माणसांची वाण भासूं लागली होती. अर्थशास्त्रदृष्ट्या विस्खळित अतलेल्या जर्मनीस सुसंघटित व्यापारी साम्राज्याचें रूप प्राप्त करून देणारीं माणसें या वेळीं हवीं होतीं. जर्मन साम्राज्याची बुद्धिमत्ता या वेळीं आपोआप व्यापाराकडे वळली. राजकीयदृष्ट्या देशाला सुव्यवस्था अगोदरच प्राप्त झाली अस-ल्यामुळें देशांतील बुद्धिमत्तेचा सारा ओघ व्यापाराकडे सहजगत्या वळला. त्यामुळेंच सांप्रत जर्मनींत मुत्सद्देगिरी कमी प्रमाणावर दिसत असून व्यापारी वर्गांत अलोट बुद्धिमान पुरुष पुष्कळ निपजत आहेत. बिस्मार्क यांनीं मुत्सद्देगिरीचें कारणच उरविलें नसल्यामुळें त्यांच्या मागें महत्त्वाच

मुत्सद्दीहि निर्माण झाला नाहीं. व्यापारी दृष्ट्या जर्मन देश त्या वेळीं फारच हीन स्थितींत असून मागासलेला होता. मोठ्या प्रमाणावर असा एकहि धंदा देशांत नव्हता. असल्या प्रकारच्या अशुद्ध स्थितींतील द्रव्यापासून सुसंघटित व्यापारी साम्राज्य जर्मनींतील बुद्धिमान पुरुषांस निर्माण करावयाचें होतें. जर्मनीचा व्यापार बहुतांशीं अमेरिकेच्या हातांत होता. अमेरिकेसारख्या अनेक साधनांनीं सुसंपन्न असलेल्या देशांशीं टक्कर मारण्याचें अवघड काम त्यांच्या शिरावर पडलें होतें. आपल्या संघटनाचातुर्यानें, शास्त्रीय शोधानीं, निधड्या छातीनें, आणि अविरत परिश्रमानें त्यांनीं ही गोष्ट साध्य केली.

व्यापारधंद्याच्या बाबतींत जर्मनीला आज जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे, त्यांत एमील रॅथेनॉ हे एक प्रमुख वांटेकरी आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे ध्वनिवाहक यंत्र आणि विद्युद्दीप याची योजना जर्मनींत प्रथम त्यांनींच केली. वीज निर्माण करण्याचा कारखाना जर्मनींत त्यानींच प्रथम स्थापन केला. कारखान्यांत विजेचा उपयोग करण्यास प्रथम त्यांनींच प्रोत्साहन दिलें. विजेच्या शक्तीनें ट्रॅमगाड्या चालविणें त्यांनींच प्रथम शक्य केलें. विद्युच्छक्तीचे निरनिराळे अनंत उपयोग त्यांनीं शोधून काढले आणि ते व्यवहार्य करण्याकारितां अनेक विद्युद्यंत्रेंहि त्यांनीं निर्माण केलीं. आपण पुढें जो कांहीं जिन्नस तयार करणार, त्यासाठीं लोकांत आगाऊ मागणी निर्माण कशी करावी, हें शास्त्र त्यांनीं प्रथम निर्माण केलें. तसेंच आपले जिन्नस गरीब लोकांना सवलतीनें देण्याची पद्धतहि त्यानीं नवीनच सुरू केली. अशा रीतीनें इंजिनियर, व्यापारी, कारखानदार आणि सावकार इतक्यांचे धंदे जणूं त्यांनीं एकवटूनच टाकले. रॅथेनॉ यांनीं केलेल्या कर्तबगारीचें सामान्य वर्णन अशा रीतीनें दहापांच ओळींत करतां आलें, तरी त्यांच्या काळानंतर त्यांनीं आपल्या उद्योगांनीं जर्मनींत जो व्यापारी मनु निर्माण केला, त्याचें यथार्थ वर्णन विश्वकोशाएवढा ग्रंथ लिहूनहि होणार नाहीं.

रॅथेनॉ यांचा जन्म बर्लिन येथें झाला. या कुटुंबाची वस्ती पूर्वीच्या एक दोन पिढ्या बर्लिन येथेंच होती. आरंभींचीं त्यांचीं कांहीं वर्षें

कोणत्याहि एकाच धंद्यांत गेलीं नाहींत. आपल्या वयाच्या सुमारें १५ व्या वर्षीं सायलेशिया प्रांतांतील एका लोखंडी कारखान्यांत ते शिक्षणासाठीं उमेदवार म्हणून राहिले. या ठिकाणीं त्यांचीं चार वर्षें गेलीं. यानंतर कांहीं नातेवाइकांकडून त्यांस सुमारें ७५० पौंडांचा वारसा मिळाला. ही रक्कम त्यांनीं हॅनोव्हर आणि झुरीच येथील यंत्रपाठशाळेंत शिक्षण घेण्यांत खर्च केली. यंत्रकलानैपुण्यांत इंग्लंड हें या वेळीं सर्वांच्या आघाडीस होतें. त्यासाठीं इंग्लंडांत यांत्रिक शिक्षण मिळण्याची सोय ते पाहूं लागले, व अखेरीस अगबोटीचीं इंजिनें तयार करणाऱ्या जॉनपेन आणि कंपनी नांवांच्या पेढीच्या ग्रीनिच येथील कारखान्यांत त्यांचा प्रवेश झाला. या कारखान्यांतून बाहेर पडून ते परत स्वदेशीं गेले, त्या वेळीं एक हजार हॉर्स पावरच्या इंजिनचें यांनीं स्वतःच्या कल्पनांनीं तयार केलेलें एक रेखाचित्र मात्र त्यांजपाशीं होतें. स्वदेशीं परत आल्यानंतर थोड्याच वेळांनीं त्यांनीं एक लोखंडाचा कारखाना स्वतःच्याच मालकीवर सुरू केला. त्यांजपाशीं द्रव्यसहाय्य भरपूर नव्हतें, किंवा त्यांस उसनावर पैसे देण्यासारखाहि कोणी इसम नव्हता; पण त्यांची महत्त्वाकांक्षा मोठी आणि बेत दांडगे असल्यामुळें या लहानशा कारखान्यानें त्यांच्या चित्ताचें समाधान झालें नाहीं. अखेरीस त्यांनीं हा कारखाना विकून टाकला. या कारखान्याच्या बाबतींत अनुभवावांचून दुसरा कसलाहि फायदा त्यांस झाला नाहीं; पण या वेळीं मिळालेला अनुभव पुढील आयुष्यांत त्यांच्या फार उपयोगी पडला. या वेळीं आलेल्या अनुभवावरून हातांत भांडवल असल्याशिवाय धंद्यात पाऊल घालावयाचें नाहीं, असा नियम त्यांनीं करून टाकला. आरंभींच्या काळांतील आलेल्या साऱ्या अनुभवांचा फायदा सध्यांच्या धंद्यांत त्यांस मिळत आहे. त्यांनीं आपला पहिला कारखाना उभारला त्या वेळीं कांहीं पेढ्यानीं त्यांस पैशाची मदत करण्याचें आश्वासन दिलें होतें; पण त्यांजकडून वेळेवर पैशाची मदत न झाल्यामुळें त्यांस तो धंदा बंद करणें भाग पडलें.

पहिला धंदा बंद झाल्यानंतर रॅथेनॉ हे जवळ जवळ दहा वर्षें स्वस्थ होते,

असें म्हटलें असतां चालेल. फ्रँको–प्रशियन युद्ध नुकतेंच संपून गेले होतें व युद्धामुळें उत्पन्न झालेल्या पैशाच्या अडचणींतून जर्मनी अद्यापि मोकळा झाला नव्हता. युद्धाचे परिणाम साऱ्या धंद्यांस थोडे फार जाणवत होते. अशा वेळीं स्वतःच्या डोक्यांतील महत्त्वाकांक्षेस व प्रचंड बेतांस वाव मिळणार नाहीं, ही गोष्ट रॅथेनॉ यांच्या लक्षांत आली. त्यांच्या बुद्धीची ही कुशाग्रता आजपर्यंत अनेकवार उघड झाली आहे. परिस्थिति कशी आहे, हें पाहून तदनुरूप आपल्या धंद्याची मांडणी करावयाची कला, त्यांच्या आंगीं पूर्णपणें वसत आहे. अमेरिकेंतील धंद्यास इतकी ऊर्जितावस्था येण्याचे मुख्य कारण त्यांचें यंत्रकलानैपुण्य होय, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली होती. माणसांचे श्रम वांचविणारीं यंत्रें अमेरिकन लोकांनीं निर्माण केल्यामुळेंच साऱ्या धंद्यांत त्यांची एवढी प्रगति झाली, ही गोष्ट त्यांस ठाऊक होती. फ्रँको–प्रशियन युद्धांत फ्रेंचाच्या आठ लक्ष चासपॉट बंदुका जर्मन लष्करी खात्याच्या हातांत पडल्या होत्या. यांत थोडा फेरबदल करून त्या नव्या घडणीच्या करावयाच्या होत्या. त्या वेळीं अमेरिकन यंत्रांच्या सहाय्यानें हें काम आपण एक तृतियांश खर्चांत करूं, असें बोलणें त्यांनीं लष्करी खात्याकडे लावलें; पण अमेरिकन यंत्रावर जर्मनीचा भरंवसा त्या वेळीं नसल्यामुळें हें काम त्यांस मिळालें नाहीं.

१८७६ सालीं फिलाडेलफिया येथें एक शतसांवत्सरिक प्रदर्शन भरलें होतें. हें प्रदर्शन रॅथेनॉ यांनीं पाहिलें. कोणताहि धंदा प्रचंड प्रमाणावर सुरू केल्याखेरीज व्यापारी दृष्ट्या तो फायदेशीर होत नाहीं, ही गोष्ट या प्रदर्शनांत त्याच्या लक्षांत आली. अमेरिकेंतील प्रत्येक धंद्याचें विशालत्व त्यांच्या चित्तांत तुडुंब भरून राहिलें. विशेषतः या प्रदर्शनांत प्रथमच मांडलेल्या ध्वनिवाहक यंत्राकडे (टेलिफोन) त्यांचे लक्ष विशेषच वेधलें. ध्वनिवाहक यंत्रें तयार करण्याची युक्ति जर्मनींत आपल्या हक्काची करावी, असा त्यांचा प्रथम विचार होता; पण तो बदलून बर्लिनमध्ये ध्वनिवाहक यंत्रें स्थापण्याचा हक्क मिळविण्याच्या उद्योगास ते लागले. सरकारी कामगारांनीं त्यांच्या या बेतासहि अडथळे आणले. ध्वनिवाहकयंत्रांचा उपयोग बर्लिनमध्यें फारकरून कोणी करणार नाहीं, असें ते म्हणूं लागले;

पण अलेरीस हा हक्क त्यांस मिळून त्यांनीं या यंत्राचा प्रचार सुरू केला; तेव्हां थोड्याच अवधींत सरकारी अधिकाऱ्यांचें ह्राणणें खोटें पडल्याचें उघड दिसून आलें.

१८८१ सालीं पॅरीस येथें एक मोठें विजेचें प्रदर्शन भरलें होतें. अमेरिकेंतील सुप्रसिद्ध एडिसन् यांनीं आपला विजेचा दिवा प्रथम या प्रदर्शनांत मांडला. हा शोध जगांत महत्त्वाची जागा पटकावणार ही गोष्ट रॅथेनॉ यांच्या लक्षांत आली. जर्मनींत विजेचे दिवे तयार करण्याचा हक्क मिळविण्याचा निश्चय त्यांनीं केला आणि या हेतूनें 'जर्मन एडिसन कंपनी' या नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापन केली. याच मंडळींतून सध्यांची 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी' नंतर निर्माण झाली.

एडिसन कंपनी स्थापन केल्यावेळेपासून रॅथेनॉ यांची भरभराट होण्यास सुरवात झाली. एकाहून एक वरचढ असे अनेक उद्योग ते हातीं धरीत गेले आणि त्यांत त्यांस यशहि येत गेलें. एडिसन् कंपनींतून १८८७ सालीं जनरल इलेक्ट्रिक कंपनी निर्माण झाली. मोठ्या प्रमाणावर विद्युतयंत्रें तयार करण्याचा कारखाना त्यांनीं सुरू केला. या वेळीं विद्युद्दीपाचा प्रचार जर्मनींत फारसा झाला नव्हता. खर्चाच्या दृष्टीनें हे दिवे महाग पडत असल्यामुळें चैनी श्रीमंताखेरीज त्यांचा उपयोग फारसा कोणी करीत नसे. ही स्थिति पालटून हे दिवे स्वस्त होऊन गरिबांच्या घरीं यांचा प्रवेश होईपर्यंत आपल्या कंपनीस फारसा फायदा होणार नाहीं, असें रॅथेनॉ यास आढळून आलें. त्यानीं प्रथम बर्लिन इलेक्ट्रीकसिटी वर्क्स या नांवाची वीज उत्पन्न करण्याचा एक कारखाना सुरू करून रस्त्यावर दिवे लावण्याचा हक्क म्युनिसिपालिटीकडून मिळविला. तसेंच रस्त्यातून तारा घालून विजेचे दिवे लांब अंतरापर्यंत थोड्या खर्चानें मिळण्याची सोय त्यांनीं केली. शहरांत विजेचे दिवे पुरविण्याच्या कारखान्याची आजची किंमत सुमारें साठ लक्ष पौंड आहे. रस्त्यांचा हक्क दिल्याबद्दल १८८९ सालीं बर्लिनच्या शहर म्युनिसिपालिटीला या कंपनीकडून साडे सातशें पौंड मिळाले होते. आज सालीना याच हक्काबद्दल त्या कंपनीकडून तीस लक्ष पौंड म्युनिसिपालटीस मिळत आहेत.

विद्युद्दीपांचा प्रसार अशा रीतीनें केल्यानंतर रॅथेनॉ यांचें लक्ष ट्रॅम-गाड्यांकडे वळलें. या वेळीं सायमेन्स आणि हॉलस्क या नांवाची एक जुनी विद्युत् कंपनी होती. लहानसहान कारखाने चालण्यास लागणाऱ्या विद्युत्शक्तीचा पुरवठा ही कंपनी करीत असे. अशा रीतीनें विजेच्या शक्तीचा उपयोग करण्यापेक्षां स्वतःच्याच कारखन्यांत वीज उत्पन्न केल्यास कारखानदारांस ती गोष्ट फायदेशीर होईल, असें रॅथेनॉ यांच्या लक्षांत आलें. तेंव्हां या दोन कंपन्यांच्या धंद्यांत चढाओढ होऊं नये म्हणून सायमेन्स कंपनीशीं त्यांनीं एक करार केला. शहरातून किंवा बाहेरील संस्थानांतून सायमेन्स यांस विजेचा पुरवठा करण्याची मागणी आली तर त्या धंद्यांत बर्लिन कंपनीनें चढाओढ करूं नये व कोठेंहि विद्युत् उत्पादक कारखाना चालविण्याची मागणी आली, तर त्या बाबतींत सायमेन्स कंपनीनें चढाओढ करूं नये. केवळ वरवर पाहणारास हा करार गरीबसा दिसतो; पण धंदा आपणाकडे चालून येतो, कीं नाहीं, याची वाट पहात न बसतां धंद्याकडे चालून जाऊन तो आपलासा करण्याची रॅथेनॉ यांची प्रवृत्ति आहे. या गोष्टीची ओळख सायमेन्स कंपनीस पटली नव्हती. हळू हळू रॅथेनॉ यांची ही पद्धत हटकून यशस्वी होते असा अनुभव सर्वांस येऊं लागला.

व्यापाराच्या व फडणीशीच्या बाबतींत रॅथेनॉ यांची बुद्धि अचाट आहे, याबद्दल आतां सर्वांची खात्री होऊन चुकली होती. त्यांच्या विजेच्या कपनीची भरभराट इतक्या झपाट्यानें होऊं लागली कीं, तिच्या वाढत्या धंद्यास लागणारें भांडवल पुरें पाडण्याकरतां नवे नवे मार्ग शोधण्याची जरूर भासू लागली. या भांडवलाच्या उभारणीसाठीं १८९५ सालीं रॅथेनॉ यांनीं झुरीच येथें एक ब्यांक स्थापिली. या ब्यांकेच्या कामाची रूपरेखा अमेरिकन पद्धतीवर त्यांनीं आंखली होती. शक्य तितक्या द्वारांनीं विजेच्या उपयोगाचा प्रसार करून तो व्यापार पूर्णपणें आपल्या हातीं ठेवावयाचा, असा या ब्यांकेचा मूळ उद्देश सांगण्यांत आला होता. यानंतर या मूळ कंपनींतून ज्या अनेक शाखा जर्मनींत व इतर युरोपीय देशांत निर्माण झाल्या. त्यांजवर देखरेख

ठेवण्याकरतां त्यांनीं आणखी दोन ब्यांका स्थापन केल्या. १९०२ सालीं बर्लिनची दुसरी एक विजेची कंपनी त्यांनीं विकत घेतली; तथापि तेवढ्यानेंहि त्यांची तृप्ति न होतां १९१० सालीं फ्रँकफर्ट आणि मूलहीन येथील समुद्रांतून तारा घालणाऱ्या कंपन्यांचा धंदा त्यांनीं आपल्या कंपनीस जोडला.

एमील रॅथेनॉ यांस त्यांच्या धंद्यांत जें एवढें अपूर्व यश आलें, त्याचीं मुख्य दोन कारणें आहेत. एक दूरदृष्टि, व दुसरें मागणी उत्पन्न करणें. अमुक एका जिनसाची गरज लोकांस लागेल कीं नाहीं, याची वाट पहात न बसतां ती आपण उत्पन्न करावयाची; हें यांच्या धंद्यांतील आदितत्त्व होय. विजेचा उपयोग लोकांत वाढत्या प्रमाणावर करून देण्याकरतां त्यांनीं यासंबंधाचे अनेक धंदे हातीं घेतले. वाफेच्या आगगाड्या बंद होऊन विजेच्या गाड्या सुरू करण्याच्या खटपटींत सध्यां ते आहेत. बर्लिन आणि हँबर्ग यांजमधील रेलवेच्या फाट्यावर विजेच्या गाड्या आपण आपल्या खर्चानें सुरू करतों असें बोलणें, त्यांनीं सरकाराकडे लावलें आहे. विजेची गाडी बिनधोकपणें तासास सव्वाशें मैल प्रवास करूं शकते, हें सिद्ध करण्याकरतां थोड्या वर्षांपूर्वी त्यांनीं सव्वा लक्ष पौंड पदरचे खर्च केले.

रॅथेनॉ हे मोठे विलक्षण बुद्धिमान पुरुष आहेत असें नाहीं. केवळ बुद्धीच्या दृष्टीनें पाहतां ते अगदीं सामान्य बुद्धीचे आहेत. गुंतागुंतीचे धंदे त्यांस समजत नाहींत व तसल्या धंद्यांची त्यांस आवडहि नाहीं. जी गोष्ट एकाद्या लहान मुलासहि उघडपणें समजेल, तीच हातीं धरावयाची असा त्यांचा बाणा आहे. कोणतीहि गोष्ट ते इतक्या साध्या खुलाशानें लोकांपुढें मांडतात कीं, त्यांच्या ह्मणण्याच्या सयुक्तिकपणाबद्दल लोकांची ताबडतोब खात्री पटून लक्षावधि पौंडांचें भांडवल हां हां ह्मणतां गोळा होतें. दूरदृष्टि त्यांजपाशीं अपूर्व आहे. आजपासून दहा वर्षांनीं लोकांना कशाची जरूर लागेल, हें त्यांस आज समजतें. आजपर्यंत त्यांच्या साऱ्या यशाच्या मुळाशीं हीच दूरदृष्टि आहे. एमील रॅथेनॉ यांस स्वतःच्या धंद्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची आवड नाहीं. रिकाम्या

वेळांतहि स्वतःच्या धंद्याव्यतिरिक्त दुसऱ्या कसल्याहि गोष्टीचे विचार त्यांच्या चित्तांत येत नाहींत. धंद्याखेरीज त्यांचें लक्ष ओढणारी दुसरी एकच बाब आहे. ती बाब ह्मणजे परोपकार. मदतीस योग्य असा कोणीहि इसम त्यांजकडून आजपर्यंत विन्मुख परत गेला नाहीं. रॅथेनॉ यांचें वय सध्यां ७८ वर्षांचें आहे व त्यांची शरीरप्रकृतिहि फारशी चांगली नाहीं; तथापि एवढ्या अवाढव्य धंद्यांतील साऱ्या बाबी ते जातीनिशीं पहात असतात.

मॅक्स रीनहार्ट.

सुमारें २५ वर्षांपूर्वी हर आटोब्रॅम या नांवाचा एक प्रसिद्ध जर्मन नाटक मंडळीचा म्यानेजर आपल्या कंपनीला कांहीं पात्रें मिळविण्यासाठीं ब्हिएन्नाला गेला होता. त्या वेळीं त्यानें तेथें बरेच प्रयोग पाहिले. त्यांपैकीं, एका प्रयोगांत वृद्धाचें सोंग घेतलेल्या एका तरुण नटाकडे त्याचें विशेष लक्ष वेधलें. या तरुण नटाचें नांव मॅक्स रीनहार्ट असें होतें. मॅक्स रीनहार्ट यानें कांहीं काळानंतर स्वतःची एक मंडळी स्थापन करून तो जर्मनींत खेळ करूं लागला. हळू हळू प्रेक्षकांवर त्याची छाप बसूं लागली. सध्यां तर सारा जर्मनी तो झुलवीत आहे, असें झटल्यास वावगें होणार नाहीं. त्याला जसे निंदक पुष्कळ आहेत, तसेच त्याचें अनुकरण करून पुढें येऊं पाहणारेहि पुष्कळ आहेत; पण लोकांवर त्याची जी एकवार छाप बसली, तींत त्याच्या प्रयत्नांनीं यत्किंचितहि उणीव आली नाहीं. त्याची कीर्ति एकसारखी वाढतच गेली आणि सध्यां केवळ जर्मनींतच नव्हे, तर साऱ्या युरोपभर आणि अमेरिकेंतहि पसरली आहे. लंडन येथें केवळ तीनच प्रयोग करून सारें शहर त्यांनीं हलवून सोडलें. प्यारीस, न्यूयार्क, पेट्रोग्राड (सेन्टपिटरबर्ग), मास्को, ब्हिएन्ना, बुडापेस्ट आणि स्टॉकहोम या साऱ्या राजधानींच्या शहरींहि त्यानें मोठे विजय संपादन केले आहेत. विसाव्या शतकांतील प्रमुख नट अशी त्याची कीर्ति साऱ्या युरोपभर पसरली आहे.

कामाची चिकाटी, लीनता, चित्ताची एकाग्रता आणि वाढती महत्त्वाकांक्षा हे रीनहार्ट याचे प्रमुख गुण आहेत. तो एकसारखें इतकें काम करतो, कीं तो सामान्य मनुष्य नसून असामान्य कोटींतील असावा असेंच एखाद्यास वाटतें. त्याची शरीर यष्टि मजबूत व बांधेसूद असून त्याच्या शरीर सामर्थ्याची खूण तीवरून ताबडतोब पटण्यासारखी आहे. या शारीरिक सामर्थ्यालाच मानसिक सामर्थ्याची जोड मिळालेली असल्यामुळें त्याचे गुण उत्तम रीतीनें विकास पावले. त्याच्या पाणीदार चेहऱ्यांतच त्याचें मानसिक सामर्थ्य व्यक्त होतें. निर्जीव यंत्र ज्याप्रमाणें कित्येक तास एकसारखें काम करतें, त्याप्रमाणें रीनहार्टहि तासांचे तास आपल्या कामांत घालवीत असतो; पण त्या वेळीं सुद्धां तो आपली शांतवृत्ति कधींहि सोडीत नाहीं. कोणत्याहि कारणांनीं त्याला कधीं क्रोध येत नाहीं. बर्लिनमध्यें त्याला शत्रू पुष्कळ आहेत, तथापि त्यांच्यावर चिडल्याचें त्याला कोणीं पाहिलें नाहीं. नाटककारांनीं लिहिलेल्या नाटकाच्या तंत्रानें न चालतां रंगभूमीवरील प्रयोगाला तें साजेसे करून घेणें हा रीनहार्ट याच्या नाट्यकलेंतील विशेष होय. अमर-कीर्ति मिळविलेल्या प्राचीन नाटककारांच्या कृतींतहि जरूर ते फेरबदल करण्यास रीनहार्ट चुकत नाहीं. सुप्रसिद्ध नाटकरांच्या कृतींची यामुळें मोडतोड मात्र होते, असें ह्मणणारेहि बरेच लोक जर्मनींत आहेत आणि मूळ नाटकांत अनेक फेरबदल तो करतो ही गोष्टहि खरी आहे. कोणताहि प्रयोग मग तो एकाद्या आनंदपर्यवसायी नाटकाचा असो कीं, एकाद्या किरकोळ फार्साचा असो, तो बापदाद्यांनीं लावून दिलेल्या रूढीनें न करतां तो स्वतःच्याच पद्धतीनें पुढें मांडण्याचा त्याचा जणूं काय निश्चय आहे. कान आणि डोळे या दोन्ही इंद्रियांचे हक्क रंगभूमीवर सारखेच आहेत, असें त्याचें ह्मणणें आहे. प्राचीन नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर अणतांनाहि त्यांचें स्वरूप नाट्यकलेच्या दृष्टीनें योग्य बनविल्याशिवाय तो ते रंगभूमीवर आणीत नाहीं. या त्याच्या गुणामुळेंच कांहीं अहंमन्य टीकाकारांची त्याजवर गैरमर्जी झाली आहे. प्रयोगाला योग्य स्वरूप देण्याकरतां कित्येक वेळां मुळांतील प्रवेशच्या प्रवेश तो छाटून टाकतो. यामुळें कांहीं जुन्या कवींच्या

अंधभक्तांचें पित्त खवळून जातें तथापि अशा गृहस्थांनाहि त्यानें केलेल्या एकाद्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर प्रत्यक्ष पाहिला ह्मणजे ते आश्चर्यानें थक्क होतात. विंटर्सटेल वगैरे दोन तीन शेक्सपीयरच्या नाटकांचे प्रयोग त्यानें रंगभूमीवर केले, तेव्हां ते पाहून एक टीकाकार पंडित अगदीं भांबावून गेले. शेवटीं त्यांनीं इतकाच अभिपाय दिला कीं, हे प्रयोग रंगभूमीवर फार उत्कृष्ट वठले; पण हे शेक्सपीयरच्या नाटकाचे प्रयोग झाले नाहींत. सुप्रसिद्ध जर्मन नाटककार शीलर याच्या एका नाटकाची अशीच गोष्ट झाली. गटे यांच्या फॉस्ट या नाटकाचा प्रयोग डचुश थियेटरमध्ये झाला, त्या वेळींहि 'अरे, हा गटे नव्हे' अशी ओरड या टीकाकारांनीं केली; पण टीकाकारांनी कितीहि ओरड केली, तरी रीनहार्ट हा सारें जग आज झुलवीत आहे, ही गोष्ट मात्र खरी. रीनहार्टच्या नाट्यकलेवर पुष्कळ टीकाकार तुटून पडले आहेत; पण त्यांच्या शिव्यांचा उपयोग ओव्यांसारखा झाला आहे. नाट्यकला ही साहित्याची अथवा नीतितत्त्वाची पोषक असलीच पाहिजे असें नाहीं; हें त्याचें मत तो दिवसें दिवस अधिकाधिक जोरानें लोकांपुढें मांडीत आहे. मनुष्याची दानत सुधारावी याच उद्देशानें नाट्यकला अस्तित्वांत आली नाहीं, किंवा रंगभूमीवर येण्यास अपात्र अशा सात्विक प्रमेयांचें लोकापुढें प्रदर्शन करणें, हेहि नाट्यकलेचे काम नव्हे, असें तो ह्मणतो. दुसऱ्या अनेक कलांप्रमाणें नाट्य हीसुद्धां स्वतंत्र कला आहे, असें त्याचें ठाम मत आहे आणि केवळ याच मताला अनुसरून सर्व प्रयोग तो रंगभूमीवर आणीत असतो. सृष्टीचें हुबेहुब चित्र डोळ्यापुढें धरणें. हेंच माझ्या रंगभूमीचें कार्य आहे, आणि मानवी चरित्रांत दिसून येणाऱ्या सर्व घडामोडी स्पष्टपणें निदर्शनास आणणें, हें रंगभूमीचें कार्य आहे. दैवाच्या सर्व विचित्र लीला रंगभूमीवर प्रत्यक्षाइतक्याच स्पष्ट रीतीनें प्रगट झाल्या पाहिजेत. दैवाचे दुःखोत्पादक आणि भेसूर प्रकार व अत्युच्च आनंदोत्पादक प्रकार हे सारख्याच उत्कटतेनें प्रकट झाले पाहिजेत. या ठिकाणीं हास्य आणि रुदन हीं एकसारखींच दाखविलीं गेलीं पाहिजेत. 'क्वचित् वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितं' हा

जगांत नित्य घडून येणारा उलट सुलट देखावा, येथेंहि तसाच दिसला पाहिजे. प्रत्यक्ष व्यवहारांतहि सुखदुःखांचा जो परिणाम मानवी मनावर होतो, तोच परिणाम रंगभूमीनेंहि उत्पन्न करून दिला पाहिजे.

वर सांगितलेल्या संहितेस धरूनच रीनहार्ट आपल्या नाटकांचे प्रयोग बसवीत असतो. नाटकांतील सर्व भाग चित्ताकर्षक करण्याकरतां नित्य नव्या योजना शोधून काढण्यांत त्याचें मन सदोदित गुतलेलें असतें. यासंबंधीं तो स्वस्थ बसून असल्याचें कधींहि आढळून येत नाहीं. कांहीं प्रयोगांसाठीं त्यानें फिरत्या रंगभूमीची योजना केली आहे. अर्नस्ट स्टर्न आणि रोलर या नांवाचे दोन प्रख्यात रंगभूमि लेखक त्यानें आपल्या मदतीस घेतले असून त्यांच्या मदतीनें देखाव्यांचे भाग तो इतके चित्ताकर्षक बनवीतो, कीं वस्तुस्थिति आणि रंगभूमि यातील यत्किंचितहि भेद प्रेक्षकांच्या लक्षांत येत नाहीं. रंगभूमीवर मांडण्याच्या वस्तूतूनहि प्रतिनिधि वस्तूंचा त्यानें पूर्णपणें निषेध केलेला आहे. पुस्तकें, खुर्च्या, टेबलें; फुलें आणि खिडक्या, दारें वगैरे सुद्धां त्याच्या रंगभूमीवर खरींच मांडलीं जातात. या ठिकाणीं नाटकी नकली वस्तूचा विटाळहि तो आपल्या रंगभूमीला होऊं देत नाहीं. एकाद्या काफीपानगृहाचा देखावा त्याच्या रंगभूमीवर आला, तर अस्सल काफीच्या वासाने सारें नाटकगृह दरवळून जातें आणि प्रेक्षकांच्या तोंडासहि पाणी सुटतें. एकाद्या राजमहालाचा देखावा त्याच्या रंगभूमीवर आला, तर एकाद्या खऱ्या राजमहालालाहि आपल्या वैभवानें तो दिपवून टाकील. उलटपक्षीं दरिद्रतेचें चित्रहि तिला साजेशा निष्ठुरपणानें आपल्या रंगभूमीवर तो उभें करतो. आपण नाटक पाहिलें नसून प्रत्यक्षाचाच अनुभव घेतला, या भावननेंच त्याचा प्रत्येक प्रेक्षक डयुश थिएटरांतून बाहेर पडतो.

रंगभूमि सजविण्यासाठीं रीनहार्ट जितकी काळजी घेतो, तितकीच नटांच्या शिक्षणासंबंधानें घेतो. नटांनीं आणि नटींनी केवळ शिकविल्याप्रमाणें यंत्रासारखें वागावें, असा त्याचा हेतु नाहीं. स्वतंत्र कर्तबगारी दाखविण्याचा वाव त्यानें प्रत्येक नटाला ठेवला आहे; तथापि नाटकासाठीं नट असून नटासाठीं नाटकें नाहींत, हें मात्र कोणाहि नटानें विसरूं

नये, अशाबद्दल तो फार सक्त खबरदारी घेत असतो. एकाद्या नटाचें तेज पडावें एवढ्याच उद्देशानें कोणताहि खेळ तो रंगभूमीवर आणीत नाहीं. कोणतेंहि चांगलें नाटक नाट्यकला या दृष्टीनें रंगभूमीवर उत्तम वठावें याकरता रंगसज्जा आणि नट हीं जितकीं उत्तम तयार करतां येतील, तितकीं करण्यांत यत्किंचित्हि कसूर करावयाची नाहीं, असा त्याचा निश्चय आहे आणि हा निश्चय तो अत्यंत निष्ठुरपणें पाळीत असतो.

नट आणि प्रेक्षक यांचें एकदील तादात्म्य करून देणें हेंच नाट्याचार्यांचें अखेरचें साध्य आहे, असें त्यानें एक वेळ बोलून दाखविलें होतें. नट आणि नाट्यवस्तु यांत कोणतीहि उणीव राहिली असतां, ती या साध्यांत उणीव आणल्यावांचून रहात नाहीं. रीनहार्टचीं नाटकें रंगभूमीवर येऊं लागलीं, तेव्हां जर्मनींत नव्याच नाट्यमनूचा उदय झाला, असें म्हटले पाहिजे.

' मेऱ्याकल ' या नांवाचा खेळ त्यानें इंग्लंडात केला, त्या वेळीं सारें इंग्लड आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेले. नट आणि श्रोता यांचा एकजीव कसा होऊन जातो, हें त्या वेळीं पूर्णपणें लोकांच्या निदर्शनास आलें. आपण केवळ नाटक पहात नसून त्यांतील सर्व भावनांचा व विकारांचा प्रत्यक्ष आपल्या ठिकाणीं अनुभव घेत आहों, असें प्रेक्षकास वाटत होतें. नाटकांत गोधळलेल्या, आनदाच्या, दुःखाच्या आणि भीतीच्या भावनांशीं सर्व प्रेक्षकाचें इतकें तादात्म्य होऊन जात असे, कीं नाटक चालू असेपर्यंत त्यांना बाह्य जगाचा विसर पडे. अशा रीतीने दहा दहा हजार प्रेक्षकांसमोर खेळ करून त्यांचें तादात्म्य करावयाचें, अशी रीनहार्ट याची महत्त्वाकांक्षा आहे. अशा रीतीनें सुमारें पांच सहा हजार लोकांसमोर ज्युलियस सीझर तो करणार असून या दृष्टीनें तो सध्यां तें नाटक बसवीत आहे.

बर्लिन येथें येऊन त्यानें ' डूंकननेस ' या नाटकाचा पहिलाच प्रयोग केला व या पहिल्याच वेळीं त्यानें लोकावर छाप बसविली. यानंतर ' स्यालोम ' या नांवाचें दुसरें नाटक तो रंगभूमिवर आणणार होता; पण सरकारी परीक्षकांनीं तें नापास केल्यामुळें तें रंगभूमीवर आलें नाहीं;

तथापि त्याचा एक खाजगी प्रयोग त्यानें केला व तो फारच उत्कृष्ट वठला. यानंतर कांहीं विद्वानांच्या खटपटीनें या नाटकास परवाना मिळून तें जर्मनींत अत्यंत लोकप्रिय झालें. स्यालोम हें नाटक ऑस्करलाईल्ड नांवाच्या इंग्रज कवीनें लिहिलेलें आहे. यानंतर म्यक्झीन्गोरकी नांवाच्या प्रसिद्ध कवीस त्यानें हाताशीं धरलें. त्याच्या 'नाईट असायलम' नाटकाचा प्रयोग त्यानें रंगभूमीवर आणला. या नाटकाचे एकट्या बर्लिन शहरांतच ओळीनें पांचशें प्रयोग झाले. यानंतर शेक्सपीयरचीं व विद्यमान कवि बर्नार्ड शा याचीं नाटकें त्यानें रंगभूमीवर आणलीं.

१९०५ सालीं डयूश थिएटर त्यानें विकत घेतलें. बारा वर्षांपूर्वी याच थिएटरांत तो पगारदार नट ह्मणून नाचत होता. हें थिएटर त्यानें ताब्यांत घेतलें, तेव्हां शेक्सपीयरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकाचा प्रयोग त्यानें प्रथम मालकीच्या हक्कानें पुढें आणला. या मर्चंटचे अनेक प्रयोग जर्मनींत लोकांनीं पाहिले होते; पण या प्रयोगानें शेक्सपीयरची जणूं काय नव्यानेंच आपणास ओळख होत आहे, असें लोकांस वाटलें. पुढें थोड्याच दिवसानीं डयूश थिएटरजवळ त्यानें एक लहानसें नवें थिएटर बांधलें. यांत फक्त तीनशें लोक बसण्यापुरतीच जागा असून त्यांत फक्त निवडक विद्वान् प्रेक्षकांसाठींच खेळ होतात. हें थिएटर इंद्रभुवनाप्रमाणें सुंदर व सुखकर आहे. या ठिकाणीं कांहीं निवडक नाटकांचे प्रयोग निवडक माणसांसाठींच होतात.

रीनहार्ट याचा तरुण माणसांवर अधिक भरंवसा आहे. धंद्यांत फार वर्षें मुरलेल्या नटास तो आपल्याकडे आश्रय देत नाहीं. नाट्यकलेचें शिक्षण तरुणपणींच मिळाल्यास त्या कलेंत नटाची बुद्धि कुशाग्र होते, असा त्याचा अनुभव आहे. त्याचे रंगभूमीवरील सर्व मदतगार त्याजवर जिवापलीकडे प्रेम करणारे आहेत. स्टर्न या नांवाचा गृहस्थ पोषाख आणि रंगभूमीवरील देखावे हीं तयार करीत असतो. याचप्रमाणें दुसरेहि अनेक शास्त्रकोविद त्याच्या मदतीस असून या साऱ्यांच्या मदतीनें रंगभूमि तयार करण्याचें काम तो करीत असतो. हीं सर्व माणसें अगदीं तरुण आहेत. मॅक्स रीनहार्ट याला एडमंड या नांवाचा एक भाऊ असून

धद्याच्या तिजोरीचें काम तो पहात असतो. आपल्या कामांत एडमंड हाहि फार वाकबगार आहे.

रीनहार्ट याला गृहसौख्य फार चांगलें आहे. त्याची पत्नीहि उत्तम नटी असून ती कांहीं खेळांत काम करीत असते. त्याला पोहण्याचा फार नाद आहे व फावल्या वेळीं वाचनाचाहि शोक आहे. त्याचा स्वभाव अगदीं साधा व निगर्वी असून कोणाहि प्रेक्षकाशीं तो मोठ्या प्रेमानें बोलत असतांना आढळून येतो.

पोस्याडोस्की.

जर्मन पार्लमेंटांत लहान मोठे मिळून एकंदर चवदा तट आहेत. या पार्लमेंटांत एका सरदार घराण्यांतील शुभ्र दाढीचे एक वृद्ध गृहस्थ बसत असतात. वर सांगितलेल्या चवदा तटापैकीं ते आपणास कोणत्याहि एका तटाचे ह्मणवीत नाहींत. अमुक एका पक्षाच्या अथवा तटाच्या वतीनें पार्लमेंटांत ते काम करीत नसून साम्राज्यांत अंतरंगत सुव्यवस्था ज्या मार्गानें करतां येईल, तो मार्ग हे वृद्ध गृहस्थ निर्भयपणें स्वीकारीत असतात. या वृद्ध गृहस्थांचें नांव डॉक्टर कौट आर्थर फॉं पोस्याडोस्की वेनर असें आहे. वेस्ट फ्यालिया प्रांताच्या बिलफील्ड भागाच्या तर्फे ते पार्लमेंटचे सभासद आहेत. जर्मनींतील सामान्य जनतेच्या कल्याणाकरतां यांनीं जेवढी मेहनत घेतली आहे, तेवढी ती दुसऱ्या कोणीहि घेतलेली नाहीं. १९१२ सालच्या निवडणुकींत सोसियालीस्ट पक्षाचा विजय जिकडे तिकडे होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्या वेळीं वेस्ट फ्यालियांतील सोसियालिस्ट उमेदवारांविरुद्ध त्या प्रांतांतील लोकांनीं निवडणुकीसाठीं पोस्याडोस्की यांस उभें केलें. ते कोणत्याहि एकाच पक्षाला वाहिलेले नसल्यामुळें व सामान्य जनतेच्या कल्याणाची इच्छा त्यांच्या मनांत प्रबळ आहे, अशी सर्वांची खात्री असल्यामुळें सोसियालिस्टांस टक्कर देण्यास तेच एक समर्थ आहेत, अशी सर्वांची खात्री होती. वेस्ट फ्यालिया प्रांतांतील कान्सरवेटीव,

क्याथोलिक, न्याशनल, लिबरल, ऱ्याडिकल, इत्यादि पक्षाच्या लोकांनीं आपल्या वतीनें उमेदवार होण्याची विनंति पोस्याडोस्की यांस केली, तेव्हां आपण कोणत्याहि विशिष्ट पक्षास चिकटून राहणार नाहीं, अशा अटीवर उमेदवार होण्याचें त्यांनीं कबूल केलें. यानंतर बादशाही प्रधान मंडळांत काम करण्याचा मानहि त्यांस मिळाला; तथापि तेव्हांहि आपलें लोकसेवेचें व्रत त्यांनीं सोडलें नाहीं. अशा रीतीने 'नृपति जनपदांना दुर्लभः कार्यकर्ता' या दुर्मिळ कोटींत त्यांनीं स्थान मिळविलें आहे. दोन तीन वर्षांपूर्वी जर्मनींत लष्करी विमानांची संख्या फ्रान्सहून आधिक करण्याची चळवळ सुरू करणारा एक पक्ष उत्पन्न झाला. लोकांच्या वर्गण्यांनीं मोठ्या रकमा जमवून जर्मनीच्या अस्मानी आरमाराची वाढ करावयाचा बेत त्यानीं केला. या कामीं कौंट पोस्याडोस्की यांची मदत मिळेल, तर सारा देश वर्गण्या घेऊन धांवत येईल, अशी या पक्षाची खात्री होती. त्याच्या विनंतीस मान देऊन पोस्याडोस्की यांनीं याचें अध्वर्युत्व स्वीकारलें. सहा महिन्यांच्या अवधींत जवळ जवळ अर्ध कोट रुपये वर्गणी जमली व या वर्गणीनें अस्मानी आरमार जवळ जवळ फ्रेंचांच्या दुप्पट झालें.

जर्मनीच्या सामान्य जनतेची स्थिति सुधारण्यांसाठीं पोस्याडोस्की यांनीं जी खटपट केली, तीवरून त्यांचें नांव अजरामर झालें आहे. वृद्ध, अशक्त व आजारी लोकांस सरकारनें मदत केली पाहिजे, असा जो कायदा जर्मनींत आहे, त्याचें मूळ जनकत्व पोस्याडोस्की यांजकडे नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि ती मूळ कल्पना त्यांचीच असून तिचा प्रसार साऱ्या देशभर त्यांनीं अगाऊच करून ठेवला होता. या त्यांच्या खटपटीमुळेंच हा कायदा जर्मनींत अस्तित्वांत आला. दुबळ्यांची काळजी सरकारनें वाहणें, हें सरकारचें कृत्य म्हणजे परोपकार नसून, हें त्याचें एक प्रमुख कर्तव्य आहे, असें पोस्याडोस्की यांचें मत आहे. दिवसें दिवस प्रबळ होत जाणाऱ्या उच्छृंखल सोसियालिस्ट पक्षाला लगाम घालण्याचा उपाय यावांचून दुसरा नाहीं, अशी त्यांनीं प्रधान मंडळाची खात्री करून दिली. दुबळ्यांना सरकारी मदत मिळावी; ही गोष्ट न्यायाची व दुबळ्यांच्या हक्काची आहे, हें तत्त्व त्यांनीं सामान्य जनतेच्याहि मनांत

भरवून दिलें. गरीबांचीहि काळजी वाहणें हा परोपकार नसून, तें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांनीं श्रीमंतांस शिकविलें. समाजबंधनें कायम राहून त्यांतील सर्व घटकांस स्वतःची वाढ स्वतःच्या दिशेनें करण्यास सर्व योग्य सवलती देणें, हें सर्व समाजाचें आद्य कर्तव्य आहे, हें तत्त्व त्यांनीं जर्मन जनतेच्या मनांत भरविलें. समाजाच्या सर्व अंगांची वाढ सारख्या प्रमाणानें झाली नाहीं, तर एकंदर समाज दुबळा होतो, असें त्यांचें मत आहे. प्रधान मंडळांत असल्या प्रकारचे विचार स्पष्टपणे बोलून दाखविणें हे सुद्धां मोठें अवघड काम आहे. जर्मनींतील प्रधानमंडळ बहुधा जुन्या सरदार घराण्यांतील लोकांचें बनलें असून सुलतानी अम्मल गाजविण्यास चटावलेलें आहे. पूर्वग्रहांनीं ज्यांचीं डोकीं कठीण झालीं आहेत, असल्या लोकांपुढें हे विचार मांडण्यांस असामान्य धैर्य पाहिजे होतें. सोसियालिस्ट पक्ष दिवसेंदिवस प्रबळ होत चालला होता. त्याची नांगी मोडण्याकरितां बिस्मार्कशाहींतील दपटशांच्या कायद्यांचे पुनरुज्जीवन केलें पाहिजे, अशाबद्दल कांहीं पक्ष ओरड करूं लागले होते. सोसियालिस्ट पक्षाचा जमाव वाढत चाललेला पाहून कारखानदार लोक घाबरून गेले होते. संपाच्या वेळीं कांहीं मजूर त्यांतून फुटून आपल्या कामावर गेले, तर त्यांस संपवाले लोक अनेक प्रकारें त्रास देतात, असा अनुभव आहे. संपवाले अशा मजुरांना फितुरी समजत असतात. अशा मजुरांस संपवाल्यांनीं त्रास दिल्यास त्यांस कांहीं मुदत काळ्या पाण्याची शिक्षा व्हावी, अशी ओरड कारखानदारांनीं चालविली होती. अशा वेळीं गरीब मजुरांच्या तर्फेनें बोलण्यास केवढ्या धैर्याची अपेक्षा होती, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

मजूरदारांच्या मागण्या रास्त असून औद्योगिक चळवळ यशस्वी होण्यास मजूरदारांची स्थिति सुधारणें, हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे, असें या वेळीं पोस्याडोस्की यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें. सोसियालिस्ट लोकांचा उच्छृंखलपणा आणि मजूरदारांच्या योग्य मागण्या यांतील भेद लक्षांत ठेवून मजूरदारांस समाजांतील इतर घटकांप्रमाणेंच सवलती

मिळणें न्यायाचें आहे, हें तत्त्व पोस्याडोस्की यांनींच प्रथम जाणलें. सोसियालिस्ट पक्षांतील लोकांशींहि त्यांचें वर्णन सहानभूतीचें होतें. कारण मजूरदारांचें राजकीय पुढारीपण याच पक्षाकडे होतें. याकरतां या पक्षांशीं मिळूनमिसळून वागून त्यांच्या मार्फतच कामदारांच्या हिताहिताचा प्रश्न सोडविणें सोपें होतें.

१८९७ सालीं पोस्याडोस्की यांची नेमणूक होम सेक्रेटरीच्या जागीं झाली. या वेळीं त्यांनीं जें भाषण केलें, त्यांत आपल्या पुढील कार्याची रूपरेखा त्यांनीं स्पष्ट आंखून ठेवली होती. समाजबंधनाच्या बाबतींत फार कायदे आणि नियम असणें हितावह नाहीं, असें ते ह्मणाले. उद्योगधंद्यांत पोलिसला वारंवार आपला हात शिरकविण्याची संधि देणें, ह्मणजे धंद्याची वाढ खुंटविणेंच होय. लोकांस सदोदित कायद्याच्या कात्रींत धरणें अत्यंत अनिष्ट आहे. अशा रीतीनें देशाला एक मोठा कैदखाना बनविणें ह्मणजे लोकांच्या स्वतंत्र विचारशक्तीचा नाश करणें होय, असें ते या वेळीं ह्मणाले होते. या भाषणांत पोस्याडोस्की यांनीं आपलें समाजसुधारणेचें आदितत्त्व स्पष्ट करून दाखविलें होतें. आपले विचार चारचौघांसमोर उघड बोलून दाखविण्यास ते कचरत नसत. या निर्भीडपणाच्या बाबतींत त्यांच्या इतका स्पष्टवक्ता जर्मन प्रधान मंडळांत त्या वेळीं दुसरा कोणीहि नव्हता. सरकारकडून मिळणाऱ्या मानमरातबांची आणि बिल्ल्यांची त्यांनीं कधींहि पर्वा केली नाहीं. सरकार त्यांच्यावर खुष नव्हतें यामुळेंच जणूं काय लोकांत त्यांजबद्दल प्रेम उत्पन्न झालें. खुद्द बादशहाशीं बोलतांना सुद्धां स्पष्ट बोलण्यास ते कचरत नसत. यामुळें दरबारी मंडळीचा त्यांजवर मोठा रोष झाला होता. यांच्या भाषणाच्या वेळीं बादशाहानीं ब्यांड सुरू करून त्यांनीं यांच्या कटकटीपासून आपली सोडवणूक करून घेतली, अशी कांहीं दरबारी मंडळींनीं गप्प उठविली होती, यावरून त्या मंडळीस हे किती अप्रिय झाले होते, हें उघड दिसून येतें. १९०७ सालीं पोस्याडोस्की यांनीं प्रधान मंडळांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला. या दहा वर्षांच्या अवधींत बड्या सरदार मंडळास ते इतके अप्रिय झाले होते, कीं, कोणत्याहि

खाजगी दरबारी समारंभास त्यांस बोलावणें नसे. तथापि दुसऱ्या वुईलियम बादशाहांच्या कारकीर्दीत यांच्याइतका निरलस, स्पष्टवक्ता आणि हुषार कामगार प्रधानमंडळांत दुसरा कोणीहि झाला नाहीं, अशी यांची कीर्ति मात्र सर्वतोमुखीं झाली.

आपल्या कारकीर्दीत पोस्याडोस्की यांनीं घडवून आणलेल्या सुधारणाची नुसती यादी देऊन त्यांचें महत्त्व लक्षांत येण्यासारखें नाहीं. कामगार वर्गाचे जन्मसिद्ध हक्क ओळखून तदनुसार समाजरचनेंत योग्य जागीं त्यांची रचना करणें अवश्य आहे, हें या सुधारणांचें आदितत्त्व आहे. या आदितत्त्वाला मूर्तस्वरूप देण्याच्या बाबतींत त्यांनीं प्रथम दुबळ्यांचा विमा उतरण्याचा कायदा हातीं घेऊन त्यांत मजूरदारांच्या दृष्टीनें सुधारणा केली. यानंतर मजूरदारांचे तटे तोडण्यासाठीं स्थापन झालेल्या लवाद पद्धतींतहि त्यानीं सुधारणा घडवून आणल्या. आजारामुळें बेकार झालेल्या मजूरदारांस ताबडतोब मदत मिळावी, याकरतां त्या कायद्यांतहि त्यांनीं इष्ट सुधारणा केली. समुद्रावरील खलाशी मजुरांची स्थिति सुधारण्याकरतांहि नवे कायदे त्यांनीं अस्तित्वांत आणले. लहान मुलांस कामावर लावण्याच्या बाबतींत त्यांनीं कडक नियम अमलांत आणले. चार्लटनबर्ग येथें मजुरांकरतां एक पदार्थसंग्रहालय त्यांनीं स्थापन केलें असून त्यात आरोग्यरक्षणाचीं व कारखान्यांत अपघात घडूं न देण्याचीं साधनें मांडून ठेवलीं आहेत. अशा प्रकारचें पदार्थसंग्रहालय साऱ्या जगांत हें एकच आहे. लहान पगाराच्या सरकारी नौकरांकरतां थोड्या भाड्याचीं घरें बांधण्यास त्यांनींच प्रथम सुरुवात केली. रात्रीं नऊ वाजतां सर्व दुकानदारांनीं आपल्या नौकरांस सोडलें पाहिजे, असा कायदा त्यांनीं पास केला. १९०० सालीं स्टेट् इन्शुअरन्स (गरीबांस मदत देण्याच्या) कायद्यांत सुधारणा करण्याकरतां एक नव्या कायद्याचा मसुदा त्यांनीं पार्लमेंटापुढें आणला. शेतकीकडील मजूर आणि उद्योगधंद्यांतील मजूर यांच्या हितसंबंधांत पूर्वीच्या कायद्यानें जो पक्षपात केला होता, तो या नव्या कायद्यांत नाहींसा करण्यांत आला होता. दोन्ही पक्षांचा समतोलपणा यांत इतक्या उत्तम रीतीनें राखण्यांत आला होता, कीं त्याला

सोसियालिस्ट लोकांच्या पक्षालाहि हरकत घेतां आली नाहीं. बादशहांच्या नांवानें पुढें आलेल्या कायद्यास सोसियालिस्ट लोकांच्या पक्षाची मंजुरी या वेळीं प्रथमच मिळाली. यानंतर १९०३ सालीं याच कायद्यांत आणखी सुधारणा होऊन आजारी मजुरांना सरकारी मदत मिळण्याची मुदत तेरा आठवड्यांची सव्वीस आठवडे करण्यांत आली. दिवसें दिवस अधिकाधिक लोकांस अधिकाधिक प्रमाणावर सरकारी मदत मिळूळन देणें हा पोस्याडोस्की यांच्या कायद्याचा रोंख होता.

१९११ सालीं उपलब्ध झालेल्या आंकड्याप्रमाणें या कायद्याअन्वयें साडेबारा कोट पौडांचे उत्पन्न होऊन त्यांपैकीं आठ कोट, साडे सतरा लक्ष पौंड मदतीच्या रूपानें मजूरदारांस देण्यात आलें. या कायद्याप्रमाणें सुमारें दीड कोट लोकांचा विमा उतरण्यांत आलेला आहे. यात या पद्धतीनें साडेसात कोट पौडांचें भांडवल गुंतलें असून त्यांपैकीं दोन कोटी साडेबत्तीस लक्ष पौड मजूरदारांचीं घरें बांधण्याच्या कामीं व्याजीं लावले आहेत. पंचाहत्तर लक्ष पौंड आरोग्य साधनांच्या कामीं खर्चीं पडले आहेत. पन्नास लक्ष पौंड शेतकऱ्यांस कर्जाऊ दिले आहेत. पंचेचाळीस लक्ष पौंड दवाखाने व आरोग्यभुवने याकरतां खर्च झाले असून साडे सदतीस लक्ष पौंड मजुरांच्या शिक्षणाकडे लागले आहेत. याखेरीज कित्येक दवाखाने, क्षयरोग्यांकरतां आरामस्थानें, आजारी लोकांसाठीं शुश्रूषास्थानें वगैरे बाबतींत अठ्ठावीस लक्ष पौंड गुंतले आहेत. गरीबांस व वृद्धांस मदत देण्याच्या बाबींत जर्मनीनें साऱ्या जगांतील राज्यांचे गुरुपद स्वीकारलें आहे, अशी त्याची कीर्ति कां झाली, हें या आंकड्यावरून उघड दिसून येतें. इतर राष्ट्रें या बाबीचा विचार करूं लागण्यापूर्वीच जर्मनीनें या बाबतींत पुष्कळ आघाडी मारली आहे. हल्लीं ७० वर्षांचें वय होईपर्यंत मजुरांना पेन्शन मिळत नाहीं; पण ६५ व्या वर्षींच त्याला पेन्शन मिळावें अशी सुधारणा या कायद्यांत होण्याचें घाटत आहे. हा कायदा अद्यापि सर्वांगांनीं परिपूर्ण झाला आहे असें नाहीं, तथापि त्यांत सुधारणा अजूनहि घडून येतील. विधवा स्त्रिया, पोरकीं पोरें व बेकार

मजूर यांना सरकारी आश्रय मिळूं लागेपर्यंत जर्मन समाजसुधारणा स्वस्थ बसणार नाहीं, असें म्हणावयास हरकत नाहीं.

कौंट पोस्याडोस्की हें मूळचे सायलेशिया प्रांतांतले रहिवाशी असून त्यांचें वय जवळ जवळ पाऊणशें वर्षांचें आहे. त्यांचें घराणें मुळचें खानदानीचेंच होतें; पण फ्रेडरिक दि ग्रेटच्या कारकीर्दीत त्याला कौंट हा किताब मिळाला. पोस्याडोस्की यांचा त्या काळचा पूर्वज फ्रेडरिकच्या सैन्यांत घोडदळाचा सेनापति असून सायलेशिया प्रांतांतील लढायांत त्यानें अतुल शौर्य गाजविल्यावरून त्याला कौंट ही पदवी मिळाली होती. कौंट पोस्याडोस्की हे ब्रेसला युनिव्हरसिटीचे कायद्याचे पदवीधर आहेत. सरकारी नौकरींत त्यांची प्रथम नेमणूक पोझेन येथें झाली. त्या वेळीं पोझेन येथील फडणविशींत विलक्षण घोटाळा माजला होता. पोस्याडोस्की हे हिशोबी कामांत वाकबगार असल्यामुळें हा घोटाळा साफ मोडून टाकून तें खातें त्यांनीं उत्तम शिस्तीस लावलें. यामुळें त्यांची हुषारी बर्लिन येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नजरेस येऊन १८९३ सालीं बादशाही फडणिशीच्या जागीं त्यांची योजना झाली. खर्चांत काटकसर करण्याची विद्या जर्मन राष्ट्रास या वेळेपर्यंत ठाऊकच नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. आद्याबाहेर खर्च करावयाचा नाहीं, हें तत्त्व पोस्याडोस्की यांनीं प्रथम अमलांत आणलें. सरकारी कर्ज फुगत जात होतें, त्यास एकदम आळा घालून मूळच्या कर्जाची फेड करण्यास त्यानीं सुरवात केली.

व्यापाराच्या संरक्षणाचे कायदे, आणि अबकारी कायदे, या बाबतींतहि पोस्याडोस्की यांनीं बरीच खटपट केली आहे. आजूबाजूच्या राष्ट्राशीं १९०२ सालीं जर्मनीनें जे व्यापारी करारनामे केले, त्यांत पोस्याडोस्की याचें बरेंच अंग होतें. एकमेकांविरुद्ध कर बसवून राष्ट्रांनीं व्यापारी भांडणें भांडावीत ही गोष्ट त्यांस नापसंत आहे. दारूच्या प्रसारास आळा घालण्याकरतां १९०३ सालीं ब्रेमेन येथें भरलेल्या मद्यपाननिषेधक महासभेंत त्यांनीं पुढाकार घेतला होता. स्वतः दारूला ते कधीं शिवलेहि नाहींत. एके बाजूस खुद्द बादशहा आणि दुसऱ्या बाजूस सोशियालिस्ट पक्ष हे एकमेकांशीं विळ्या-भोंपळ्यासारखे वागणारे

पक्ष या बाबतींत एकदिलानें काम करीत असतांहि या व्यसनांत जर्मनींत अजून चांगलासा आळा बसला नाहीं.

सरकारी नौकरीचें जूं खांद्यावरून झुगारून देऊन कौंट पोस्याडोस्की हे आतां जर्मन पार्लमेंटाचे स्वतंत्र सभासद झाले आहेत. पूर्वी प्रधानमंडळांत काम करून नंतर सरकारावर स्पष्टपणें टीका करण्यास न भिणारे असे हे जर्मन प्रधानमंडळांतील पहिलेच कामगार आहेत. ग्रेटब्रिटन आणि युनायटेडस्टेट येथील उदारमतवादी संस्थांचे ते पूर्ण भोक्ते आहेत. जर्मनींत अशा संस्थांचा प्रसार करण्याकरतां कायावाचामनानें ते खटपट करीत असतात.

जर्मनीचें लष्कर.

(डॉ० आर्मगार्ड कार्ल ग्रेव्हज याच्या १९१२ च्या लेखावरून.)

जर्मनीचें लष्करी मनुष्यबळ, त्याची प्रांतवार वांटणी आणि त्याची युद्धविषयक तयारी; यांजबद्दल सामान्य लोकांसहि बरीच माहिती आहे; तथापि सुमारें अर्धकोट मनुष्यांवर प्रमुखपणें अधिकार चालविणारा मेंदु कोठें आहे आणि त्याची काम करण्याची पद्धत कशी आहे, यांबद्दल मात्र फारशी तपशीलवार माहिती कोणास नाहीं. जर्मनीच्या युद्धयंत्राच्या अंतर्गतभागाची आणि त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीची माहिती, आज प्रथमच प्रसिद्ध करण्यांत येत आहे. ही माहिती सर्व प्रकारें पुरी आहे असें नाहीं. कारण, एकाच मनुष्यास सर्व तपशील कळणें शक्य नाहीं; तथापि सामान्य वाचकांस एवढ्या माहितीवरून बरेंच अनुमान करतां येईल, यांत शंका नाहीं. जर्मनीची हेर खात्यांत पुष्कळ वर्षें काम केल्यामुळे व या धंद्यासंबंधानें प्रमुख लष्करी आणि आरमारी अधिकाऱ्यांशीं भेटीचा प्रसंग नित्य पडत गेल्यामुळें जर्मनीच्या अंतस्थ युद्धयंत्राची अंतःस्थ माहिती मिळण्याचा योग मला आपोआपच आला आणि या योगाचा फायदाहि मीं चांगला करून घेतला. या ठिकाणीं मी जें कांहीं नमूद करणार आहें, तें माझ्या अनुभवाचें आहे.

मनुष्याच्या मेंदूंतून ज्या ज्या युक्त्या निघण्याचा संभव आहे, त्या साऱ्यांचा उपयोग जर्मनीनें आपल्या युद्धयंत्रांत करून घेतला आहे. हें युद्धयंत्र केवळ युद्ध आणि नासधूस करण्याकरतांच निर्माण झालें नसून जर्मन साम्राज्यांतील बुद्धिमत्तेचा जणूं काय कस लावण्याचेंहि काम येथें चालतें. युद्ध खात्यांत समाविष्ट केलेल्या अनेक युक्त्यांचा उपयोग रोजच्या व्यवहारांतहि नित्यशः दिसून येतो. या यंत्राच्या मूळ उत्पादकाचें नांव जनरल स्टीन असें होतें. यानें हें यंत्र सुप्रसिद्ध नेपोलियन याच्या धामधुमींत निर्माण केलें. यानंतर अनेकांनीं त्यात नवी भर घातली आणि त्याचें कार्यक्षेत्र विस्तृत केलें. हें यंत्र सर्वथा बादशहाच्या सत्तेखालीं असतें. यावर दुसऱ्या कोणत्याहि मुत्सद्याची अथवा इतर कोणाहि व्यक्तीची यत्किंचितहि सत्ता चालत नसल्यामुळें तें यंत्र सांप्रतच्या पूर्णावस्थेंत पोहोंचलें असून अगदीं सुरळीत चालते. मुत्सद्यांतील परस्पर चुरस व पक्षभेद यांजपासून तें अगदीं अलिप्त असून एकहातीं असल्यामुळें त्याच्या वाढीस केव्हांहि अडथळा आलेला नाहीं. जर्मन साम्राज्याच्या लष्करावर एकमुखी सत्ता चालविणाऱ्या संस्थेस ग्रोस जनरल स्टॉब अथवा ग्रेट जनरल स्टॉफ असें नांव आहे. अद्वितीय बुद्धिमत्ता, काम पार पाडण्याचें सामर्थ्य आणि उत्तम प्रतीचें शास्त्रीयज्ञान यांची जोड असल्यावांचून या संस्थेंत कोणाचाहि प्रवेश व्हावयाचा नाहीं. येथें वशिला अथवा मोठें नांव अथवा पुष्कळ पैसा, यांपैकीं एकाचीहि डाळ शिजावयाची नाहीं. येथें तरणेबांड अम्मलदार आणि केंसांची अबाडी झालेले सेनापति एकत्र काम करतांना आढळून येतात. येथें एकाद्या सामान्य घिसाड्यापासून तों अत्यंत निष्णात इंजिनियरापर्यंत सर्व दर्जाचे लोक गुण्यागोविंदानें नांदत असल्याचें आढळून येतें. हें यंत्र शक्य तितक्या उत्तमोत्तम स्थितीस आणणे या एकाच उद्देशानें हीं सर्व माणसें जणूं काय चढाओढीनें काम करतात असें वाटतें. या यंत्राची अधिष्ठात्री देवता खुद्द बादशहा हेच असून चेफडेस ग्रोसन जनरल स्टॉब किंवा चीफ ऑफ दी ग्रेट जनरल स्टॉफ या आपल्या हस्तकाच्या द्वारें सर्व कामकाज ते जातीनिशीं पहात असतात. या संस्थेस एकंदर १८० पासून २०० पर्यंत अम्मलदार कामावर असतात.

ईलाव आणि फ्रिडलंड येथील लढायांत नेपोलियननें प्रशियन सैन्याचा खुर्दा उडविल्यानंतर प्रशियाच नव्हे, तर सारा मध्य यूरोप नेपोलियनच्या अंगाखालीं आला व नेपोलियनच्या या मोहिमेची परिसमाप्ति टिलसिटच्या तहानें झाली. या वेळीं प्रशियाचें संस्थान मोडून टाकावें असें सर्व फ्रेंच मुत्सद्यांचें म्हणणें होतें. विशेषतः नेपोलियनानें गुरुपदीं मानलेल्या ट्यालिऱ्याँड याचा व नेपोलियनच्या सेनापतींचा आग्रह तर या कामीं विशेषच होता; पण नेपोलियनला ही गोष्ट पसंत पडली नाहीं ह्मणा किंवा तो एका सुंदर चेहऱ्याला बळी पडला ह्मणा, प्रशियाचें स्वांतंत्र्य त्या वेळीं त्यानें हरण केलें नाहीं. साऱ्या जगाचा इतिहास एकाद्या क्षुल्लकशा भासणाऱ्या गोष्टीनेंहि कसा बदलतो, याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. तहाची वाटाघाट करण्याकरतां टिलसिट येथें उभय पक्षांचे मुत्सद्दी जमले असतां त्या ठिकाणीं त्या वेळचीं प्रशियाची राणी लुइसी ही हजर होती. अनुपम स्वरूपाबद्दल तिची ख्याति होती. तिच्या चेहऱ्याकडे पाहण्याबरोबर प्रशियाचें स्वातंत्र्य हरण करण्याचा नेपोलियनचा विचार मनांतल्या मनांतच जिरला. प्रशियानें स्वतंत्रपणे थोडेंसें सैन्य ठेवावें इतका अधिकार देण्यासाठीं राणीनें नेपोलियनची विनवणी केली. तिच्यावर भाळलेल्या नेपोलियननेंहि बारा हजार खडें सैन्य ठेवण्याची परवानगी प्रशियास दिली. ही परवानगी मोठ्याशा महत्त्वाची होती, असें केवळ वरवर पाहणारास वाटणार नाहीं. नेपोलिनसारख्या अफाट सैन्य बाळगणाऱ्या रणधुरंधर योध्यास बारा हजार सैनिकांची मोठीशी भीति बाळगण्याचें कारण नव्हतें; पण या क्षुद्रबीजापासून प्रशियन देशभक्तांनीं जो प्रचंड वृक्ष निर्माण केला, त्यावरून नेपोलियनला त्यांनीं कसें सपशेल फसविलें, हें पाहून कोणासहि मोठा चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं.

आणीबाणीच्या प्रसंगीं करतीं माणसें निपजविणें, हा अजब गुण प्रशियाच्या मेंदूंत फार काळापासून आहे. या प्रसंगींहि असाच एक विशाल लष्करी बुद्धीचा पुरुष तेथें निर्माण झाला. त्यानें प्रशियांतील प्रत्येक प्रांत, प्रत्येक जिल्हा, प्रत्येक शहर आणि प्रत्येक खेडेंपाडें यांची

जंत्री तयार करून त्यांतील साऱ्या धष्टपुष्ट माणसांची यादी तयार केली. या यादींतून नेपोलियनच्या परवानगीप्रमाणें प्रथम बारा हजारांची निवड त्यानें केली. त्यांना कवाइत व युद्धोपयोगी शिक्षण त्यानें दिलें. बारा हजारांचा हा पाहिला संघ युद्धनिष्णात झाल्याबरोबर त्यास रजा देण्यांत आली आणि दुसऱ्या बारा हजारांस लष्करी शिक्षण देण्याची सुरुवात झाली. सांप्रतच्या जर्मनीच्या लष्करी कायद्याचें बीजारोपण जनरल स्टीन यांनीं अशा प्रकारें केलें, व सांप्रतच्या प्रचंड लष्कराचाहि उगम येथेंच झाला. तीन वर्षांच्या अवधींत प्रशियाजवळ एक लक्ष ऐशी हजार जय्यत फौज निर्माण होऊन याशिवाय एक लक्ष बीस हजार राखून ठेवलेलें सैन्य जमा झालें. रशियाच्या स्वारींत नेपोलियनच्या सैन्याची उपासमार होऊन तो मास्कोहून परत फिरला, त्या वेळीं बारा हजारांहून अधिक सैन्यास आपणास तोंड द्यावें लागेल, अशी कल्पनाहि त्याला नव्हती; पण त्याला अनुभव वेगळाच आला. युरोपच्या या सुलतानाला धुळीस मिळविण्यास हेंच सैन्य थोड्या फार अंशीं कारण झालें.

यानंतर सन १८६४, १८६६ आणि १८७० या सालीं प्रशियानें जीं युद्धें केलीं, त्यांत या सैन्यांत अधिकाधिक भर पडत चालली. प्रसगानुसार सैन्याच्या निरनिराळ्या भागांस अधिकाधिक पूर्णावस्था प्राप्त झाली. ही पूर्णावस्था प्राप्त करून देण्याच्या कामांत अनेकांचे श्रम खर्ची पडले आहेत. या कामीं अनेक युद्धनिष्णात पुरुषांनीं जी अचाट मेहनत केली, आणि जे बारीकसारीक तपशिल रचिले, त्यांचें वर्णन केलें, तर तें कोणास खरेंहि वाटणार नाहीं. युद्धाची आरंभींची तयारी कशी करावी, या एकाच विषयावर १८७१ सालचे रणधुरंधर सेनानी हेलप्रथ फॉं मोल्टके यांनीं एक मोठें शास्त्र रचून ठेवलें आहे. याच शास्त्राच्या अनुरोधानें जर्मन लष्कर अद्यापीहि चालतें.

पूर्वीचे सेनापति मोल्टके आणि सांप्रतचे मुख्य सेनापति जलरल हेरिनजेन यांजमध्यें मोठें विलक्षण साम्य आहे. दोघेहि सारखेच उंच, दोघेहि सारखेच रोडके, दोघेहि सारखेच मूकवृत्तीचे, दोघांच्याहि चेहऱ्यावर सारखीच तरतरी, फार काय; पण दोघांच्या आवडीनिवडींतहि

असेंच साम्य आढळतें. मोल्टके बुद्धिबळाच्या खेळाचे भोक्ते होते. हेरिनजेन हे आपल्या शिशांच्या शिपायांबरोबर फावल्या वेळीं खेळत असतात. त्यांजपाशीं तीस हजार शिशाच्या शिपायांचें सैन्य आहे, अशी लोकवार्ता आहे. सुप्रभातीं डोळे उघडल्याबरोबर या सैन्याचें निरीक्षण करणें हें त्यांचें पहिलें काम झालें आहे. मोल्टके जागे झाल्याबरोबर प्रथम बुद्धिबळांचा पट मागवीत असत. लष्करी लोकांत मोल्टके यांज सारखेंच हेरिनजेन यांचें वजन असून ते मोल्टकेप्रमाणेंच युद्धशास्त्र-विशारद आचार्य आहेत, असा साऱ्या लष्करी अम्मलदारांचा समज आहे. युरोपांत कोठेंहि गडबडीचें चिन्ह दिसलें, व विशेषतः फ्रान्सशीं थोडीशीहि कूरबूर उपस्थित झाली, तर जनरल हेरिनजेन किंवा त्यांचे सहाध्यायी जनरल फॉं थुलसेन हेसेलर हे मेटझ् किल्ल्याचीं लष्करीं सूत्रें तत्क्षणींच हातीं घेतात, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जर्मन साम्राज्यांत मेटझ् हें एक फार महत्त्वाचें व नाकेबंदीचें लष्करी ठाणें आहे.

मेटझ्चा किल्ला व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश यांची माहिती जनरल फॉं हेरिनजेन यांस इतकी आहे, कीं तिच्या अर्ध्या हिश्शानेंहि माहिती असलेला साऱ्या जर्मनींत दुसरा कोणी नाहीं. कडाक्याच्या थंडीच्या दिवसांत बर्फ पडत असतां व दादळ होत असतां भर मध्यरात्रींनंतरहि एक थोडीशी लंगडणारी आकृति मेटझ्च्या आजूबाजूस फिरत असतांना तेथील संत्र्यास आढळते. या आकृतीच्या अंगावर लांब लष्करी कोटा-शिवाय दुसरें अधिक मौल्यवान् अथवा मोठा दर्जा दर्शविणारें वस्त्र नसतें. या व्यक्तीबरोबर कांहीं अनुचर असून त्यांजजवळ विजेच्या बत्त्या, रात्रींच्या वेळीं लांब पहातां येईल अशा काचेच्या दुर्बिणी, इकडून तिकडे सहज नेतां येतील, अशा प्रकारच्या छोट्या घडवंच्या आणि टेबलें, इत्यादि सामान असतें. दुसऱ्या एकाद्या अनुचराच्या हातांत कागद व पेन्सिल असून या आकृतीच्या तोंडून निघालेले तुटक तुटक शब्द हा अनुचर मोठ्या काळजीनें टिपून घेत असतो. अशा रीतीनें पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण या चारी दिशांकडे जमिनीच्या प्रत्येक वाराची पाहणी ही व्यक्ति करीत असते. ही व्यक्ति म्हणजे जनरल फॉं हेरिनजेन हीच होय. फ्रान्सच्या छातीकडे

ांखून धरलेला हा मेटझचा पोलादी बाण जोंवर असल्या रक्षकांच्या हातीं आहे, तोंवर तो आपलें काम चोख बजावील, याबद्दल शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं.

ग्रोसन जनरल स्टॅब या खात्याच्या अधिपतीला डरग्रोस जनरल स्टॅब असा किताब असून त्याची मुख्य कचेरी बर्लिन येथें आहे. प्रत्येक सैन्य-समूहास (आर्मीकोर) एकेक क्लीन जनरल स्टॅब असून यांपैकीं निवडक व हुषार असे अधिकारी बर्लिन येथील मुख्य खात्यांत असतात. या लष्करी अधिकाऱ्याच्या मदतीस अत्यंत निष्णात रसायानशास्त्री, इंजिनियर आणि यंत्रकलानिपुण लोक दिलेले असतात. हीं माणसें आपापल्या कलेंत अत्यंत निष्णात अशीं असतात. अशा रीतीनें ग्रेट जनरल स्टाफ ही संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेचें आधिपत्य कायद्यानें बादशहाकडे आहे.

ह्या जनरल स्टाफच्या इमारतींत एक लहानशी कोंदट व विशेष न सजविलेली अशी खोली आहे. परराष्ट्रांशीं कांहीं कटकट उभी राहिली, तर या खोलींत पांच माणसांची सभा भरते. अध्यक्षस्थानीं खुद्द सरकार स्वारी असते. अध्यक्षाच्या उजव्या बाजूस चीफ आफ दी जनरल स्टाफची स्वारी बसलेली असते. डाव्या बाजूस लष्करी प्रधान असतो आणि समोर रेलवेचा प्रधान आणि आरमारी स्टाफचा मुख्य, असे बसलेले असतात. याशिवाय इतर कोणताहि प्रधान अथवा मुत्सद्दी तेथें आढळावयाचा नाहीं. कारण एकाद्या राजकारणाची मजल मुत्सद्देगिरीच्या आवांक्याबाहेर गेली, म्हणजेच ही पांचांची छोटेखानी सभा भरते. या वेळीं तोंडाचें काम संपून हातांचें काम सुरू होण्याची वेळ आलेली असते. या खोलींत बसून बादशहानें आपल्या लेखणीला हात लावला कीं, पन्नास लक्ष वीरांच्या तलवारी ताबडतोब म्यानातून बाहेर उडी घालतात.

मोरोक्को प्रकरणासंबंधीं सर्व जर्मनीभर खळबळ उडून गेली असतां एके दिवशीं जनरल फॉं हेरिनजेन हे बागेंत फिरावयास जाण्यासाठीं नेहमींप्रमाणें आपल्या घरांतून बाहेर पडले, तों दरवाज्यांतच कित्येक

लष्करी अम्मलदारांनीं त्यांस गांठून विचारलें, 'सेनापतीसाहेब, तलवार काढण्याची वेळ आली का?' त्यांजकडे पाहून व थोडें हंसून सेनापति ह्मणाले, "सात अक्षरांचा अद्याप अवकाश आहे."

हीं सात अक्षरें ह्मणजे सैन्य जमविण्याचा हुकुमाच्या सरकारी यादी-वरील बादशहांची सही होय.

या प्रचंड युद्धयंत्राची साधारणपणें बरीचशी कल्पना येण्याकरितां त्याच्या निरनिराळ्या भागांचें निरनिराळें वर्णन देणें अवश्य आहे. हें युद्धयंत्र खऱ्या युद्धाला कितपत जय्यत आहे, हें समजण्यास त्याच्या आगाऊ तयारीच्या पद्धतीची माहिती असणें अवश्य आहे. माणसांची जमवाजमव, त्यांना लागणाऱ्या शस्त्रसामुग्रीचा पुरवठा, त्यांस लागणारे कपडे, त्यांस लागणारे अन्न, आणि त्यास इकडून तिकडे हलविण्याकरिता लागणारीं वाहनें, इतक्या गोष्टींचा अंतर्भाव पूर्वतयारी या एका विषयांत होतो. सुमारें अर्धकोट मनुष्यांस शक्य तितक्या थोड्या वेळांत इतक्या गोष्टींचा पुरवठा करणें व ही सारी तयारी देशाच्या कोणत्याहि ठिकाणीं जय्यत राखणें, हें काम केवढें प्रचंड आणि अवघड असेल हें वर्णनानें सांगतां येणें शक्य नाहीं. यांत आणखीहि एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, जर्मनीचें सारें लष्कर कोणत्याहि सरहद्दीवरील कोणत्याहि ठाण्यावर एकदम जय्यत स्थितींत वज्रासारखे लोटतां आलें पाहिजे, या मूळ तत्त्वावरच जर्मन सैन्याचें सारें शिक्षण झालेलें असून त्याची आगाऊ तयारीची पद्धतहि याच तत्त्वास अनुसरून आखली गेली आहे. शत्रूच्या देशांतच रणमैदान करणें फायद्याचें व अगत्याचें आहे, ही गोष्ट पूर्वानुभवानें जर्मनीच्या लक्षांत आलेली आहे. युद्धाग्नीच्या ज्वाळांचा स्पर्शहि स्वदेशास लागणें अनिष्ट आहे, असें जर्मनीचें पहिलें लष्करी तत्त्व आहे. यामुळें जर्मन लष्कराची उभारणी करतांना ती स्वसंरक्षणाच्या तत्त्वावर केलेली नसून युद्धाचा आखाडा शत्रूंच्या देशांत पाडावा या तत्त्वावर केलेली असते. या आगाऊ तयारींत चार शाखांचा अंतर्भाव होतो. त्या चार शाखा अशाः—

१ जमवाजमव.

२ वाहतुक.

३ पुरवठा.

४ बातम्या.

या प्रत्येक शाखेंतहि आणखी अनेक पोटशाखा असतात. या शाखांचा क्रमशः विचार करतां करतां पोटशाखांचें वर्णनहि त्यांत ओघानें येईलच.

१ जमवाजमव.

जर्मन सैन्याचे मुख्य तीन विभाग आहेत. खडें सैन्य, राखून ठेवलेलें सैन्य आणि लँडवर सैन्य.

खड्या सैन्यात शिपाई व अम्मलदार मिळून सात लक्ष नव्वद हजार लोक असतात. हें सैन्य कोणत्याहि क्षणीं पूर्णपणे युद्धाच्या तयारींत असतें. जमवाजमव करावयाची तीं फक्त राखून ठेवलेल्या सैन्यासाठीं करावी लागते. त्यासाठीं जर्मनीनें अनेक पद्धतीचें एक मोठें प्रचंड जाळें निर्माण करून ठेवलें आहे. राखून ठेवलेल्या सैन्यांत दोन वर्ग आहेत. त्याचप्रमाणें लँडवर सैन्यांतहि पहिला आणि दुसरा असे दोन वर्ग आहेत. कोणताहि सशक्त पुरुष २१ वर्षांचा झाला ह्मणजे लष्करी नौकरींत त्यास दाखल करता येतें. तथापि अशा प्रत्येक पांच मनुष्यांपैकीं एक मनुष्य सध्या दाखल केला जातो. जरूरीपेक्षां लोकसंख्येंतून अधिक माणसें घेतां येण्याजोगीं असल्यामुळें या सर्वांचा समावेश होणें शक्य नाहीं. याकरतां एकच मनुष्य दाखल करण्याची चाल आहे. याला पायदळ, रिसाला, तोफखाना, इंजिनियर तुकडी किंवा आरमार यांपैकीं कोणत्या तरी शाखेंत घेतलें जातें. पायदळ सैन्यांतील शिक्षणाचा काळ दान वर्षांचा, रिसाल्यांतील तीन वर्षांचा, तोफखान्यांतील तीन वर्षांचा, आरमारांतील तीन वर्षांचा आणि इंजिनियर तुकडीचा दोन वर्षांचा आहे. या काळांत उत्तम वर्तणुकीबद्दल दाखला मिळाल्यास दोनपासून चार महिन्यांची सूट मिळते; पण यावरून लष्करी अधिकारीवर्ग मोठा उदार आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. पार्लमेंटानें पास केलेल्या कायद्याला सभ्यपणें तुडवून जाण्याची ही एक युक्ति आहे. दोन चार महिन्यांच्या या सव-

लतीमुळें आणखी ७५,००० लोक पार्लमेंटच्या संमतीवांचून बादशहास ठेवतां येतात. विश्वविद्यालयाचे पदवीधर अथवा दुसऱ्या परीक्षा पास झालेले लोक प्रत्येक शाखेंत फक्त एकच वर्ष शिक्षण घेत असतात. राखून ठेवलेल्या सैन्यास लागणाऱ्या अंमलदारांचा पुरवठा बहुशः याच वर्गातून होतो. खड्या सैन्यांतील अम्मलदार हे बहुधा जुन्या जमीनदार घराण्यांतून येतात. तसेंच जुन्या लष्करी अंमलदारांचीं मुलेंहि खड्या सैन्यांत अम्मलदार ह्मणून नेमलीं जातात. यांचे लष्करी शिक्षण जर्मनींतील कोणत्या तरी लष्करी कॉलेजांत झालेलें असतें. सर्व कॉलेजांत बर्लिन येथील कॉलेज फार प्रसिद्ध आहे. याशिवाय जर्मन सैन्यांतील दुय्यम अम्मलदारांच्या वर्गांत शिपायांतील माणसांची त्यांच्या हुषारीप्रमाणें भरती करण्यात येते. जर्मन सैन्याचें खरें बळ मात्र दुय्यम अम्मलदारांवर अवलंबून असतें. किंबहुना जर्मन साम्राज्याचे व विशेषतः प्रशियन राजघराण्याचे मुख्य आधारस्तभ म्हटले, तर हे दुय्यम अम्मलदारच होत. बारा वर्षें शिपायाची नोकरी केल्यानंतर यांची नेमणूक कोणत्या तरी मुलकी खात्यांत केली जाते. सैन्यांतील बारा वर्षांच्या नोकरीमुळे त्यांच्या अंगीं आज्ञाधारकता, शिस्त व चिकाटी हे गुण चांगले मुरलेले असतात. या बारा वर्षांनतर त्यांची नेमणूक रेल्वे, टपालखातें, अबकारी, म्युनसीपलखांत किंवा पोलीस यांपैकीं एखाद्या खात्यांत केली जाते. अशामुळें लढाईच्या कामांत तरबेज असलेलीं हीं माणसें कोणत्याहि क्षणीं युद्धखात्याच्या हातांत कशीं असतात, हें वाचकांच्या लक्षांत येईल. अशाच रीतीनें लष्करी नोकरी कांहीं वर्षें झाल्यानंतर लष्करी अम्मलदाराची नेमणूक मुलकी खात्यांत उच्च अधिकारावर केली जाते. सैन्याचे एकदर मुख्य पंचवीस विभाग किंवा फौजा आहेत. (25 Army corps) यांची वांटणी लष्करी दृष्ट्या योग्य अशा ठाण्याठाण्यांनीं केलेली आहे. आल्सेस लारेन प्रांतांत आणि व्हाईन नदीच्या कांठच्या ठाण्यांत फौजांची सर्वांत अधिक संख्या आहे. बाकीच्या फौजा प्रशिया आणि रशिया यांच्या सरहद्दीवर वांटून देण्यांत आल्या आहेत. सर्व देशाचे लष्करी जिल्हे केले असून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं

ज्या त्या जिल्ह्याचें लष्करी दप्तर असतें. या दप्तरांत जिल्ह्यांतील प्रत्येक धट्टया-कट्टया पुरुषाची, प्रत्येक मोटार गाडीची, प्रत्येक घोड्याची आणि प्रत्येक जातीच्या कोणत्याहि वाहनाची नोंद ठेवलेली असते. या शिवाय जिल्ह्यांतील धान्य व कोळसा यांचें कोठार केवढें आहे, व गवत-काडी वगैरे किती मिळण्याचा संभव आहे, यांचीहि नोंद असते. एकंदरीनें सैन्याच्या उपयोगी पडणारी अथवा सैन्यास जरूर असणारी प्रत्येक जातीची वस्तु येथें नोंदलेली असते. राखून ठेवलेल्या सैन्यांतील अथवा लष्कराच्या दुसऱ्या कोणत्याहि शाखेंतील प्रत्येक मनुष्यास आपली हजिरी देण्याची जागा ठाऊक असते. हुकूम झाल्यापासून चोवीस तासांच्या अवधींत त्यानें हजिरी दिली पाहिजे, असा कायदा आहे. या कामीं थोडीशी हयगय झाली, तरी कायद्यानें त्याला जबर शिक्षा ठेवली आहे. अगदीं शांततेच्या काळींहि हा कायदा फार कडक पाळला जातो. मग युद्धाच्या प्रसंगीं तर बोलावयासच नको. हुकूम झाल्याबरोबर शक्य तितक्या लवकर माणसें व सामानसुमान जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एकत्र जमतील अशा धोरणानेंच ही मुख्य ठिकाणीं जागा उघडलेली असते. या जिल्हा ठिकाणच्या जागीं बहुधा अनेक आगगाड्यांचे फांटे एकत्र झालेले असतात. यामुळें अनेक ठाण्यांतून माणसांची व सामानाची एकदम भरती झाली, तरी त्यांची रवानगी वांटणीप्रमाणें योग्य स्थळीं करण्यास यत्किंचितहि अडचण पडत नाहीं. सैन्याच्या व सामानाच्या वाहतुकीबद्दल काम कसें चालतें, हें मी पुढें सांगेन. जिल्ह्याचीं मुख्य ठाणीं हीं त्या त्या जिल्ह्याचीं मुख्य कोठारेच होत. या ठिणाणीं जिल्ह्यांतील माणसांना लागणारे कपडे, शस्त्रास्त्रें व दारू गोळा हीं जय्यत भरून ठेवलेलीं असतात. आज मुलकी नौकरींत असलेला मनुष्य उद्यां एकदम शिपायी कसा बनतो, हे सांगून कोणास खरेंहि वाटावयाचें नाहीं. ज्या यक्षिणीच्या कांडीनें ही उलथापालथ घडविली जाते, ती कांडी प्रत्यक्ष पाहिल्यावांचून नुसत्या वर्णनानें तिची खरी कल्पना कधींहि यावयाची नाहीं. पद्धतशीर शिक्षण आणि वारंवार केलेल्या तालमी, यांनींहि ही यक्षिणीची कांडी सदोदित पूर्ण जय्यत स्थितींत ठेवली जाते. या लष्करी

तालमी फार खर्चाच्या आहेत, ही गोष्ट खरी; तथापि लष्करी माणसास सदोदित तरबेज राखण्याकरतां आणि सेनापतीस प्रचंड लष्कराच्या हालचाली कशा कराव्या हें शिकविण्याकरतां हा खर्च करणें आवश्यक आहे, अशी जर्मनीची भावना आहे. एका तालमीच्या प्रसंगीं ५–६ लाख माणसें सर्व सामानासह सरहद्दीवरील कोणत्याहि ठाण्यावर एकत्र केलीं जातात. साम्राज्याच्या एका टोंकाहून दुसऱ्या टोंकाला एवढा मोठा लोंढा वहात जात असतांहि, त्यांत कोणताच अडथळा उपस्थित होत नाहीं.

शांततेच्या अथवा युद्धाच्या वेळीं लष्कराचें सर्व स्वामित्व बादशहांच्या हातीं असतें. लष्करांत कोणतीहि घडामोड करावयाची झाली, तरी ती बादशहा एकटे करतात. लष्करी बाबतींत कोणाहि मुत्सद्यांचीं अथवा लोकांचीं मतें घेण्याचे कारण बादशहास पडत नाहीं. मुत्सद्यांचा परस्परांत मत्सर असला, तरी लष्कराशीं त्यांचा कोणताहि संबंध नसल्यामुळें त्याचा परिणाम लष्कराच्या तयारीवर होत नाहीं. आज्ञाधारकता आणि तयारी हीं लष्करी लोकांस प्रथम शिकविलीं जातात. मुत्सद्यांचीं भांडणें आणि लष्करी लोकांतील परस्पर मत्सर यांचे दुष्परिणाम रशियाच्या पूर्वेकडील मोहिमेंत जसे दिसून आले, अथवा फ्रान्सच्या आरमारांत मुत्सद्यांनीं केलेला घोंटाळा जसा बाहेर पडला, तशी गोष्ट जर्मनींत होणें शक्य नाहीं. कारण, जर्मन लष्कर आणि जर्मन आरमार यांजवर एकटी बादशहांचीच सत्ता आहे. आणि ही सत्ता प्रसंगीं ते पूर्णपणें गाजवितातहि. लष्करांत एकादा सेनापति यत्किंचित् ढवळाढवळ करीत आहे, अशी नुसती शंका आली, तरी बादशाहा त्यांचें कडक पारिपत्य केल्यावांचून रहात नाहींत. बादशहांनीं दिलेल्या शिक्षेवर एकाद्या प्रधान मंडळाकडे अथवा चेंबर ऑफ डेप्युटीजकडे अपील करण्याची सोयहि जर्मनींत नाहीं. सैन्याची आगाऊ जमवाजमव करण्याच्या बाबतींत पैशाच्या तरतुदीचा विचारहि अवश्य केला पाहिजे. १८७१ सालीं फ्रान्सकडून लढाईच्या खर्चाबद्दल जर्मनीला जी सुमारें तीन अब्ज रुपयांची खंडणी मिळाली, तिच्यापैकीं जवळ जवळ अर्धी रक्कम युद्धाची गंगाजळी ह्मणून निराळी सांठवून ठेवण्यांत आली. ज्या इमारतींत ही गंगाजळी ठेवण्यांत आली आहे,

तिचें नांव जुलियस थर्म असें असून ती स्पँडा नांवाच्या गांवीं आहे. या गंगाजळींत प्रति वर्षी सुमारें ४५०००० रुपयांच्या किंमतीच्या सोन्यांच्या नाण्यांची भर करण्यांत येत असते. १८७१ सालापासून प्रत्येक आक्टोबर महिन्याच्या पहिल्या तारखेस नवीन पाडलेल्या सोन्याच्या नाण्यांनीं भरलेल्या तीन दारू गोळ्याच्या गाड्या आपला माल या इमारतींत रिकामा करतात. हा माल सांठविण्याकरतां जुलियस थर्ममध्यें एक खोल तळघर केलें असून तें सर्व बाजूनीं जाड लोहकवचांनीं मढविलें आहे. जर्मनीच्या युद्ध यंत्रास चालना देण्याचे बादशाहानें मनांत आणलें, ह्मणजे ही सारी गंगाजळी त्याला मदत करण्यास तयार असते. या तिजोरींत आज मितीस (इ. स. १९१२) सुमारें चाळीस कोट रुपयांचें नगद सोनें भरलेलें आहे. एवढ्यावर साऱ्या जर्मन लष्कराचा दहा महिन्यांचा खर्च भागतो. युद्ध चालविण्यास लागणाऱ्या पैशासाठीं रीच स्टॅग किंवा पार्लमेंट यांजकडे तोंड वेंगाडण्याचें कारण सरकारास नाहीं. निदान युद्धाच्या आरंभीं तरी तसें कारण पडत नाहीं. युद्ध पुकारलें जाऊन एकवार त्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली, ह्मणजे गरज लागल्यास अधिक पैसा लोक आपोआपच देतात.

स्पँडा येथील गंगाजळी सर्वस्वी लष्करी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आहे. स्पँडाची गंगाजळी ही निव्वळ दंतकथा आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण ही गंगाजळी खरोखरच अस्तित्वांत आहे, याबद्दल आतां पुरी खात्री झालेली आहे. जर्मनीवर कसलाहि प्रसंग आला, अथवा खजिन्यांत पैशाची कितीहि टंचाई पडली, तरी या गंगाजळीस बोटहि लावलें जात नाहीं. तिचा उपयोग फक्त युद्धाच्या वेळींच करावयाचा आहे. या इमारतीवर फारच कडक पहारा ठेवला जातो, हें सांगावयास नकोच. इमारतीभोंवतीं पहाऱ्याचीं तीन कडीं आहेत. यांशिवाय जवळून वाहणाऱ्या हाबेल नदींतून पाण्याचा एक प्रवाह जवळ आणून ठेवला आहे. जरूर पडल्यास हा प्रवाह सोडल्याबरोबर सारी गंगाजळी पंधरा फूट पाण्यांत बुडून जाते. दर वर्षी खुद्द बादशहा अथवा युवराज या इमारतीची दोनदां तपासणी करणात. नाणीं मोजण्यासाठीं

अतिशय सूक्ष्म फरक दाखविणारे तराजू तेथें ठेवले आहेत. या तराजूंची रचना अशी खुबीची केली आहे कीं, तथील सारें सोनें मापून पाहण्यास पुरे दोन तासहि लागत नाहींत. तसेंच हे तराजूं इतके चोख आहेत कीं, खजिन्यांत एका नाण्याची कमतरता असली, तरी तेवढी सुद्धां ते दाखविल्यावांचून रहात नाहींत.

२ वाहतुक.

सैन्याची पहिली जमवाजमव करण्याच्या बाबतींत वाहतुकीची बाबत सर्वांत अत्यंत महत्त्वाची आहे. स्किपियोविरुद्ध हॉनिबॉलनें केलेल्या स्वाऱ्या आणि नेपोलियनच्या मध्य युरोपांतील मोहिमा इतक्या यशस्वी झाल्या, याचें कारण त्यांची सैन्याची झपाट्याची वाहतुक हेंच होय. सध्यांच्या काळीं तर वेळाचें महत्त्व पूर्वीपेक्षां दसपट वाढलें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. दारूगोळा, माणसें, तोफखाना इत्यादि युद्ध सामग्रीसंबंधीं पहातां युरोपांतील सर्व राष्ट्रें थोडीं फार सारख्याच तोलाचीं आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं. तसेच धैर्य, शौर्य, चिकाटी, आवेश इत्यादि वैय्यक्तिक गुणांतहि साऱ्यांचे शिपायी सारख्याच तोलाचे आहेत. व्यक्तिदृष्ट्या फ्रेंच, रशियन, इंग्लिश, अथवा जर्मन शिपायी यांत [illegible] फरक आढळून यावयाचा नाहीं. या बाबतींतील सर्वांचा समतोलपणा लष्करी तज्ज्ञांच्या लक्षांत येऊन चुकला आहे. जो कांहीं फरक आहे, तो फक्त तयारीच्या आणि शिस्तीच्या बाबतींत असून वाहतुकीच्या गतींतहि कांहीं फरक पडण्याचा संभव आहे. कोणत्याहि ठाण्यावर ठराविक मुदतींत, शक्य तेवढें मोठें सैन्य जय्यत स्थितींत जें राष्ट्र उभें करूं शकेल, त्याच्याच पदरांत आरंभीचा फायदा पडेल, हें उघड आहे. या वाहतुकीच्या बाबतींत एक दोन मुद्दे विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. ठराविक ठिकाणीं जाऊन पोहोंचेपर्यंत माणसें आणि जनावरें हीं थकून जाणार नाहींत, अशा रीतीनें हें काम झालें पाहिजे. दुसरें असें कीं देशाच्या ज्या भागांतून त्यांचा हा प्रवाह वहावयाचा असेल, त्या भागाला सैन्याकडून यत्किंचित्हि उपसर्ग पोहोंचतां कामा नये. सैन्याच्या वाहतुकीमुळें त्या भागातील रहिवाशांच्या

सामान्य व्यवहारांत यत्किंचित्हि व्यत्यय येऊं नये, अशा रीतीनें हें वाहतुकीचें काम चाललें पाहिजे. हे हेतु साध्य होण्याकरतां देशांत अनेक मार्गांची आगाऊ सिद्धता असली पाहिजे. जर्मनीचे भीष्माचार्य यांचें एक लष्करी सूत्र अद्यापिहि जर्मन लष्करानें पाठ करून ठेवलें आहे. तें सूत्र असें:—" वाहतुक निरनिराळ्या रस्त्यानें करावी; पण मोहिम एकमतानें चालवावी. "

ज्या देशांतील रेलवे रस्ते, मोठ्या सडका, टपालखातें आणि तारखातें हीं सर्वस्वी सरकारच्या ताब्यांत असतील, त्याच देशांत वाहतुकीचें काम अत्यंत शिस्तीनें पार पाडतां येणें शक्य आहे. जर्मनीच्या जनरल स्टाफच्या हातांत हीं सारीं साधनें जय्यत आहेत. जर्मनींतील सर्व रेल रस्ते विशेषतः गेल्या बीस पचवीस वर्षांत बांधलेले रेल रस्ते, केवळ लष्करी दृष्टीनेंच आखून बांधलेले आहेत. बर्लिन शहर मध्यबिंदु कल्पून जर्मनीच्या रेल्वेचा नकाशा पाहिला, तर कोळ्याच्या जाळ्याशीं त्याचे पुष्कळसें साम्य आढळून येते. बर्लिनपासून तों थेट फ्रेंच आणि राशियन सरहद्दीपर्यंत कित्येक रेल्वेंचे रस्ते पसरलेले असल्याचे आढळून येईल. हे रस्ते एकेरीच आहेत, असें नसून ते बहुतेक दुहेरी व कित्येक ठिकाणीं तर तिहेरी आणि चौहेरीहि आहेत. वाटेंत या रस्त्यांना दुसरे आडवे रस्ते ठिकठिकाणीं नाक्यांच्या जागीं येऊन भेटतात. म्याकडेबर्ग, हॉनोव्हर, नॉर्डासेन, क्यासेल, फ्रॅंकफर्ट, कोलोन, स्ट्राफबर्ग इत्यादि अनेक नाकीं कोळ्यांच्या जाळ्याप्रमाणें दोन्हीं सरहद्दींच्या साऱ्या लाबीवर पसरलीं आहेत. या रेल्वे नाक्यांच्या ठिकाणीं पूर्वी सांगितलेलें जिल्ह्यांचें मुख्य कोठार असून त्या ठिकाणीं शिबंदी, दारूगोळा आणि शिधासामग्री यांचा बारा महिन्यांचा भक्कम पुरवठा असतो.

रेल्वेच्या द्वारें रक्कमबंद माल किती झपाट्यानें आणि किती लौकर नेतां येईल, याचा तपशील अत्यंत काळजीनें व प्रत्यक्ष अनुभवानें आगाऊ ठरविलेला आहे. मुख्य मुख्य नाक्यांच्या सर्व ठिकाणीं कांहीं इंजिनें व मालांचे आणि माणसांचे डबे लष्करी खात्याच्या उपयोगाकरितां खास राखून ठेवण्यांत आलेले आहेत. मोरोक्कोसारखें प्रकरण उपस्थित होऊन

राजकीय वातावरण क्षुब्ध झालें, तर हीं इंजिनें अहोरात्र पेटवून सज्ज करून ठेवलेलीं असतात.

रेल्वेंतील अधिकारी वर्गांत शेंकडा नव्वद लोक जुने लष्करी अधिकारी असतात, हें पूर्वी सांगितलेंच आहे. यामुळें बादशहांनीं मोहिमेच्या तयारीच्या हुकूमावर सही केल्यापासून पांच मिनिटांच्या अवधींत जर्मन साम्राज्यांतील प्रत्येक रेल्वेचा फाटा लष्करी अधिकारी वर्गास आपल्या ताब्यांत घेतां येतो. वाहतुकीचें कामकाज करण्यांत विशेष निष्णात असलेले जनरल स्टाफमधील लोक रेल्वेचा सारा कारभार आपल्या ताब्यांत घेतात. याखेरीज खड्या सैन्यांत रेल्वे बांधण्याच्या कामांत वाकबगार अशा लोकाची एक खास तुकडी असते. रेल्वेचा कारभार लष्कराच्या हातांत गेल्याबरोबर गाड्यांचीं जुनीं वेळापत्रकें ताबडतोब बदलून त्यां जागीं नवीं लष्करी वेळापत्रकें सर्व स्टेशनांवरून चिकटविण्यांत येतात. हीं लष्करी वेळापत्रकेंहि आगाऊच छापून ठेवलेलीं आहेत. वर्षांतून दोन वेळ मोठ्या तालमी होतात, त्या वेळीं या वेळापत्रकांचा उपयोग प्रत्यक्ष अजमाविण्यांत येत असतो.

वर सांगितलेली रेल्वेची गोष्ट, मोठ्या सडका व जलमार्ग यांसहि लागू आहे. कित्येक ठिकाणीं लहानशा खेड्यापाड्यांतूनहि रुंद प्रशस्त आणि पक्के रस्ते बांधलेले असून त्यांजवर केव्हांहि फारशी रहदारी नसते, हें पाहून एकाद्यास फार आश्चर्य वाटेल; पण हे रस्ते सामान्य वाहतुकीसाठीं बांधलेले नसून त्या केवळ लष्कराच्या नाड्या आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. बर्लिन येथील जनरल स्टाफच्या कचेरींत देशांतील सर्व रेल्वेंचे रस्ते खोदीव नकाशांनीं तयार करून ठेवलेले आहेत. हे नकाशे मोठमोठ्या टेबलांवर बसविलेले असून त्यांजवर कांचेचीं तावदानें आहेत. या नकाशांत जर्मनीचे उंच सखल भाग व रेल्वे रस्त्यांचा सारा तपशील प्रत्यक्ष दाखविलेला आहे. या टेबलांशेजारीं बसून व तेथें ठेवलेल्या वाटतील त्या किल्ल्या फिरवून तेथील लोक सर्व वाहतुकीचें काम करतात.

या पद्धतीनें वाहतुकीचें काम किती चोख होतें, हें दर्शविणारी एक

लहानशी गोष्ट सांगतों. थोड्या वर्षांपूर्वी पश्चिम प्रशियांत सैन्याच्या तालमी सुरू होत्या. त्या वेळीं इंग्लंडांतील मिडलंड रेलवेचा नकाशा जनरल स्टाफच्या कचेरींत पोहोंचविण्याकरतां मी गेलों होतों. मी तेथें उभा असतां जनरल स्टाफमधील एक कामगार तेथें आला आणि त्याची पलटण घेऊन जाणारी गाडी कोठपर्यंत पोहोंचली आहे, याचा शोध करूं लागला. नकाशाच्या टेबलाजवळ बसलेल्या एका कामगारानें कांहीं हस्तीदंती बटणें दाबून केवळ अडीच मिनिटांत त्या गाडीचा नक्की पत्ता त्या कामगाराला सांगितला. ती गाडी त्या वेळीं बर्लिनपासून ३१० मैलांच्या अंतरावर असलेल्या दोन स्टेशनांच्यामध्यें होती. गाडीचा नक्की पत्ता कळण्यास किती वेळ लागतो, हें कळण्याची जिज्ञासा मला असल्यामुळें मी घड्याळ काढून पहात होतों. जर्मनीच्या आगबोट कंपन्यांच्या सर्व मालांच्या व उतारूंच्या बोटी आणि त्याचप्रमाणें साम्राज्यांतील सर्व मोटारगाड्या, भाड्याच्या अथवा इतर खाजगी गाड्या आणि सर्व खटारे सरकारला कायद्यानें आपल्या ताब्यांत घेतां येतात. अशा प्रकारें वाहतुकीची तयारी अत्यंत परिणतावस्थेस पोहोंचली असल्यामुळें अठ्ठेचाळीस तासांच्या अवधींत सर्व प्रकारें जय्यत असलेलें दहा लक्ष लष्कर कोणत्याहि सरहद्दीच्या कोणत्याहि ठाण्यावर जर्मनीला जमवितां येतें. आणि आणखी साठ तासांत हीच संख्या दुप्पट करतां येते.

३ पुरवठा.

सैन्याच्या हालचाली पोटावर अवलंबून आहेत, असें नेपोलियन ह्मणत असे. ही ह्मण त्या काळाइतकीच आजहि लागू पडते. लष्करी शास्त्रांत अन्नपाणी आणि दाणावैरण यांची तरतूद हा एक मोठा महत्वाचा भाग आहे. पांच सात लाख लोकांस काटकसरीनें अन्नपाणी पुरविणें हें शांततेच्या वेळीं देखील मोठें कठिण काम आहे. आणि युद्धाच्या वेळीं म्हटलें, तर याच्या इतकें दुसरें अवघड कामच नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांतून जर्मनीसारखें जें राष्ट्र शिधासामग्रीचा कांहीं भाग बाहेर देशांतून आणतें, त्याला तर हें काम फारच अवघड जातें, यांत नवल नाहीं. युद्ध उपस्थित झाल्यास जर्मनीचा जगाशीं असलेला

संबंध तुटून आपला कोंडमारा होईल, ही गोष्ट जर्मन लष्करी अधिकाऱ्यांच्या लक्षांत आलेली असून आपल्या नेहमींच्या पद्धतीनें त्यांनीं तिजवर तोडहि योजून ठेवली आहे. सैन्यांतील प्रत्येक मनुष्याला बारा महिने पुरेल इतकी शिधासामग्री व चंदीवैरण सरकारी कोठारांत व खाजगी व्यापाऱ्यांकडे कोणत्याहि क्षणीं तयार ठेवलेली असते. एवढी तरतूद अपुरी वाटण्याचा संभव आहे; तथापि युरोपांतील युद्ध बारा महिन्यांहून अधिक काळ चालू राहण्याचा फारसा संभव नाहीं, ही गोष्ट जर्मन लष्करी अधिकाऱ्यांस माहीत आहे.

प्रत्येक वर्षीं हीं सर्व कोठारें उपसून टाकून त्यांतील खराब झालेला अथवा शिळा होत चाललेला माल काढून टाकून त्या जागीं नवा माल भरण्यांत येतो. खाण्याच्या पदार्थांनीं भरलेले लक्षावधि जस्ती डबे दर वर्षीं [illegible] किती तरी कमी दरानें लष्करी कोठारांतून विकले जातात. चंदी, वैरण बहुधा शेतकरी वर्गांत विकली जाते आणि खाण्याच्या पदार्थांचे डबे गरीब लोकांस विकले जातात. त्याचप्रमाणे लष्कराला लागणारें धान्य व गवतकाडी यांची खरेदी खुद्द शेतकऱ्यांकडून केली जाते. यामुळें लष्करी कंत्राटावर पोसल्या जाणाऱ्या ऐतखाऊ कंत्राटदारांचा वर्ग जर्मनींत अस्तित्वांत नाहीं. कित्येक देशांतील कत्राटदार लोक आपल्या मातृदेशाशीं किती निमकहरामीनें वागतात, याबद्दलची माझी माहिती मीं तुह्मांस सांगितली, तर तुह्मांस खरोखर फार आश्चर्य वाटेल. असल्या मातृद्रोही लोकांस जर्मनीनें केव्हांहि आश्रय दिलेला नाहीं.

याशिवाय आणखीहि एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. जर्मन लष्कर सदोदित इतक्या जय्यत स्थितींत ठेवलेलें असतें, कीं युद्ध सुरू झाल्यापासून थोड्याच काळाच्या अवधींत युद्धाचा आखाडा शत्रूच्या मुलुखांत जाऊन पडतो. यामुळें जर्मन लष्कर पोसण्याचा भार अर्थातच शत्रूच्या प्रांतावर पडतो. शत्रूच्या मुलुखांतून शिधासामग्री मिळविण्याची विद्या जर्मन लष्करी अधिकाऱ्यांस चांगली अवगत आहे. बोअर युद्धांत इंग्रज अधिकाऱ्यांनीं या कामीं जी चपळायी दाखविली, तितकीच प्रशियन अधिकारीहि दाखवितील, याबद्दल माझी खात्री आहे.

शिधासामुग्रीच्या बाबतींतहि शास्त्रीय पद्धतीचा किती उपयोग केला जातो, हें दाखविण्याकरतां एकच उदाहरण सांगतों. वाटाणे, कणिक, डुकराचें मांस, मीठ आणि मसाला हीं एकत्र करून तीं कोरड्या हवेच्या दाबानें वाळवून व एकजीव करून त्याचे तुकडे जस्ती डब्यांत भरून ठेवलेले असतात. प्रत्येक डब्यांत हें अन्न पाव रत्तल असतें. हें वजनांत फार हलकें, अतिशय पौष्टिक, कधींहि न नासणारे, प्रकृतीस पथ्यकर व अत्यंत रुचकर असतें. डबा उघडून आतील तुकडा कढत पाण्यांत मिसळल्याबरोबर अन्न तयार होतें. या अन्नाची करोडों डबडीं लष्करी कोठारांत सैन्यासाठीं भरून ठेवलेलीं असतात.

४ बातम्या.

ज्याच्या मेहनतीवर आणि बातम्यांवर जर्मनस्टाफचें काम मुख्यतः अवलंबून असतें, असें खातें म्हणजे, बातमीखातें हेंच होय. इतर राष्ट्रांनीं लाविलेले शास्त्रीय शोध, त्यांची लष्करी बाबतींत प्रगति, त्यांनीं बांधलेले नवे किल्ले व तयार केलेली नवी यंत्रसामुग्री याजबद्दल बातमी-खात्यांतून ज्या स्वरूपाची बातमी मिळेल, त्यावरच जनरल स्टाफचें भावी कार्य अवलंबून असतें. यामुळें या खात्यांत अत्यंत तरतरीत अशा तरुण कामगारांचा भरणा केलेला असतो, हें रास्तच आहे. या खात्यांतील मनुष्यांचें शिक्षण व ज्ञान हीं अति उच्च प्रतीचीं असून त्यांना कामहि फार कसून करावें लागतें. केवळ एकाच विषयाकडे पुष्कळ वर्षें—किंबहुना सारें आयुष्य खर्च केलें आहे, अशीं माणसें या खात्यांत कामावर असतात.

स्वतःच्या देशाबद्दल जशी खडानखडा माहिती जर्मन जनरल स्टाफच्या कचेरींत असते, त्याचप्रमाणें युरोपांतील साऱ्या देशांसंबंधानेंहि नित्य जमवून ती संग्रहीं ठेवण्याचा उद्योग प्राशियन लष्करी अधिकारी कित्येक वर्षांपासून करीत आहेत. १८७०-७१ च्या फ्रांको-जर्मन मोहिमेंत अगदीं खालच्या दर्जाच्या लेफटेनंटपर्यंत फ्रान्सांतील प्रत्येक प्रांताचे प्रत्येकाजवळ नकाशे, आणि खेड्यापाड्यासुद्धां सर्व ठिकाणची तपशीलवार माहिती होती. खुद्द फ्रेंच सेनापतींना सुद्धां जितकी माहिती नसेल, तितकी माहिती प्रत्येक प्राशियन लेफ्टेनंटाजवळ होती. न्युसेनबर्ग, ओथ आणि मेट्झ

येथील पराभवानंतर फ्रेंच सेनापतींनीं कित्येक माऱ्याचीं ठिकाणें फुकटांत सोडून दिलीं, हें आतां सर्वश्रुतच आहे. त्या विशिष्ट जागांची योग्य प्रकारची माहिती त्यांजपाशीं नसल्यामुळें त्यांचें महत्त्वच त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. स्वतःच्याच देशाबद्दल त्यांजजवळ इतके अज्ञान होतें. प्रशियाच्या बाबतींत अशी चूक होण्याचा कधीं संभवच नाहीं. ज्यांतील भूमीचे नकाशे प्रत्येक तपशिलासुद्धां जर्मनीनें तयार केलेले नाहींत, असा एकहि देश साऱ्या युरोपांत नाहीं. जनरल स्टाफच्या दप्तरांत या सर्व बाबी योग्य रीतीनें नोंदून ठेवलेल्या आहेत. अशा प्रकारें जगांतील सारीं लष्करी खातीं आपापली तयारी करीत असतातच; पण या बाबतींत जर्मनी-इतकी मेहनत दुसरें कोणतेंहि राष्ट्र घेत नाहीं.

कोनिगर ग्राटझर स्ट्रासीवरील आरमारी खात्यांत माझें शिक्षण चालू असतां, एके वेळीं इंग्लंडांतील लिंकनशायर परगण्यांतील दोन शहरांमधील अंतराबद्दल माझ्या शिक्षकाचा व माझा वाद झाला. तेव्हां आमच्या भांडणाचा निकाल लावण्याकरता आमच्या गुरुमहाराजांनीं टेबलाजवळील एक खुंटी पिरगळून नं. ६४ चा नकाशा मागविला व त्याबरोबर त्या नकाशेखात्याच्या कामगारालाहि बोलाविलें. तावडतोब तो नकाशा घेऊन ते कामगार हजर झाले. हा अम्मलदार पंचवीस वर्षांहून अधिक वयाचा नव्हता. लिंकनशायर परगण्यांतील ज्या गावांबद्दल आमच्यांत वाद चालला होता, त्या गांवाबद्दलची सर्व माहिती सरळ इंग्रजी भाषेंत मला तो खडाखड सांगूं लागला. त्या प्रांतांतील सारे रस्ते, त्या रस्त्यांवरचीं घरें, शेतकऱ्यांच्या झोंपड्या आणि घिसाड्यांचीं दुकानें, यांचें सुद्धां वर्णन त्यानें आपल्या माहितींत सोडलें नाहीं. त्या भागाची त्याला इतकी खडा-नखडा माहिती आहे, हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. 'तूं त्या प्रांतांत बरीच वर्षें घालविलीं असावींस!' असें मीं त्याला म्हटलें; तेव्हां तो क्षणाला; 'जर्मनीच्या बाहेर अद्यापि मीं पाऊलहि ठेवलें नाहीं. माझा फार लांबचा समुद्रांचा प्रवास झटला, म्हणजे मी एकदां हेलिगोल्यांडला गेलों होतों, तेवढाच.' त्याचें हें उत्तर ऐकून मला किती आश्चर्य वाटलें असेल, याची तुम्हीच कल्पना करा. यानंतर मीं जी कांहीं चौकशी केली

व निरनिराळ्या खात्याशीं जो माझा संबंध जडला, त्यावरून इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांचे तपशीलवार नकाशे बातमीखात्यांत असल्याचें मला कळून आलें. यांपैकीं प्रत्येक देशाचे वेगवेगळे भाग केलेले असून या प्रत्येक भागावर दोन अधिकारी आणि एक चिटणीस यांची नेमणूक केलेली असते. त्या भागाची अगदीं बारीकसारीक सुद्धां माहिती ह्यांस आपल्याजबळ ठेवावी लागते. जर्मन हेरांचें जाळें सर्व युरोपभर दाट पसरलेलें असल्यामुळें [illegible] माहिती रोजच्या रोज येत असते.

बातमीखात्यांत व्यक्तिविषयक पलटण म्हणून हेरांची एक स्वतंत्र तुकडी असते. दोन मोठ्या राष्ट्रांतील लष्करी आणि आरमारी कामदारांबद्दल व्यक्तिविषयक माहिती मिळविणें हें या तुकडींतील लोकांचें काम आहे. मुख्य ॲडमिरलापासून तों कर्नलापर्यंत प्रत्येक अम्मलदाराच्या परिस्थितीबद्दल माहिती यांस गोळा करावी लागते. त्यांच्या खाण्यापिण्याच्या संवयी, त्यांचा स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी आणि त्यांची सांपत्तिक स्थिति, यांजबद्दलची माहिती जर्मन बातमीखात्यांत नेहमीं तयार असते. या पद्धतीचा फायदा कसा होतो, हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच. सामान्य वाचकाला मात्र हें रहस्य तत्काळ समजावयाचें नाहीं. लढाईच्या वेळीं शत्रूच्या सेनापतीचा स्वभाव कसा आहे, याची बित्तम बातमी ज्याला आहे, असा अधिकारी या माहितीचा फायदा पुष्कळ प्रकारें करून घेतो. स्वतःच्या गिऱ्हाइकाबद्दल पूर्ण माहिती असलेल्या एकाद्या वाण्याला ज्याप्रमाणें फायदा मिळवितां येतो, त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे, हें तत्त्व जर्मन लष्करी अम्मलदारांनीं पुरातनकाळापासून ओळखलें असून तदनुसार आपली वर्तणूक ठेवली आहे.

आकाशयानें.



युरोपियनराष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यांत क्रांति करून टाकणारें एक नवेंच यंत्र सांप्रत उपस्थित झालें आहे. हें यंत्र म्हणजे आकाशसंचारक विमानें हें होय.

जगांत ज्या ज्या कांहीं युक्त्या निघतील, आणि जो जो नवा शास्त्रीय शोध लागेल, त्याचा संग्रह आपल्या युद्धयंत्रासाठीं करावयाचा, अशी जर्मनीची पद्धत कित्येक वर्षांपासून चालू आहे. लिलियनथॉल यानें पहिलें विमान उडविल्यास आज बराच काळ लोटून गेला. त्याचें यान आकाशांत फक्त चारच मिनिटें तरंगत होतें. तेव्हांपासून आकाशसंचाराची कला वाढतां वाढतां तिला केवढें स्वरूप आलें आहे, पहा ! आतां पंचवीस माणसें व बारा टन दारूगोळा बरोबर घेऊन सांप्रतचें अस्मानी जहाज पंचवीस तासांची फेरी खुशाल करूं शकतें. जर्मनीनें एक अस्मानी जहाज असें बांधलें होतें कीं; ते शहाण्णव तास एकसारखें हवेत होतें व या अवधींत तें एकसारखें दर तासास अडतीस मैल या वेगानें धांवत होतें. यांतहि विशेष मौज ही कीं, त्याला जवळ जवळ चाळीस मैल वेगाचा तोंडचा वारा सहन करावा लागला. असल्या प्रकारच्या युक्त्यांनीं युद्धसाहित्यांत क्रांति होऊन गेली, तर नवल नाहीं.

आकाशसंचाराच्या विद्येंत जर्मनी किती पुढें सरसावला आहे, व त्यानें यांत किती प्राविण्य मिळविलें आहे, हे दाखविण्याचाच माझा उद्देश आहे. पूर्वी कोणीहि प्रसिद्ध न केलेली अशी माहिती आज प्रथमच मी सांगणार आहें. ही माहिती बर्लिन येथील जनरल स्टाफवांचून बाहेरच्या कोणाहि इसमाला नाहीं. युरोपांतील प्रधानमंडळांनाहि ती समजलेली नाहीं.

अगदीं नव्याच पद्धतीचें अस्मानी आरमार जर्मनीजवळ आहे, ही गोष्ट निःसंशय खरी आहे. १९०८-९च्या सरकारी अंदाजपत्रकांत बारा झेपेलिनें बांधून तीं जय्यत ठेवण्यास लागणाऱ्या खर्चाची सरकारनें मंजुरी दिलेली आढळून येते. जर्मनीच्या अस्मानी आरमाराबद्दल जगाला जी कांहीं माहिती आहे, ती इतकीच; पण सरकारी रीत्या उघडपणें प्रसिद्ध केलेल्या संख्येच्या तिप्पट अस्मानी आरमार जर्मनीजवळ आहे, यांत शंका नाहीं.

आकाशी आरमाराचीं मुख्य ठाणीं जर्मनींत पांच असून त्यांची योजना फार नाजुक अशा माऱ्याच्या जागीं केलेली आहे. यांपैकीं दोन

ठाणीं फ्रेंच सरहद्दीवर असून एक रशियन सरहद्दीवर, एक अटलांटिक किनाऱ्यावर व एक खुद्द बर्लिन येथें आहे. स्ट्रास्बर्ग, मेननदीवरील फ्रॅंकफर्ट, पोझेन, वुइलियमशेवन आणि बर्लिन इतक्या ठिकाणीं हीं ठाणीं आहेत. यांखेरीज उत्तर समुद्रांतील हेलिगोल्यांड येथें असलेलें ठाणें वेगळेंच. त्याचा संबंध फक्त इंग्लंडापुरताच आहे. हेलिगोल्यांड येथील ठाण्याबद्दल कोणालाच फारशी माहिती उपलब्ध झालेली नाहीं. फक्त तेथल्या नियमित कामदारांशिवाय दुसऱ्या कोणासहि हजार यार्डांच्या मर्यादेच्या आंत येऊं दिलें जात नाहीं. या ठाण्यासंबंधानें मला जी कांहीं माहिती मिळाली आहे, ती मी येथें नमूद करतों.

या लष्करी ठाण्याशिवाय कांहीं व्यापारी स्टेशनेंहि ठिकठिकाणीं असून त्यांचा उपयोग लोकांस करून देण्यांत येतो; तथापि व्यापारी समुद्रयानावर जर्मन सरकारची ज्याप्रमाणें पूर्ण सत्ता असते, त्याचप्रमाणें या अस्मानी जहाजावरहि सरकारची सत्ता असून कांहीं द्रव्य देऊन सरकारांनीं ती आपल्याकरतां राखून ठेवलेलीं आहेत. थोड्याशा तासांच्या मुदतींत त्यांचें व्यापारी स्वरूप पालटून व त्यांस लष्करी रूप देऊन सरकारास त्यांचा उपयोग करतां येतो. अशा रीतीनें लष्करी व व्यापारी अस्मानी जहाजांची मोजणी केली, तर युद्धाच्या प्रसंगीं जर्मनीला पन्नास प्रचंड अस्मानी जहाजें उपयोगांत आणतां येण्यासारखीं आहेत. झेपेलिन जहाजास वारंवार अपघात होत असतात व त्यांत अनेक प्रकारचें वैगुण्य आढळून येत असतांहि जर्मनराष्ट्र आपल्या अस्मानी आरमारावर दरसाल दीडकोट रुपये खर्च करण्यास हट्ट कां करतें, याचें कित्येकांस मोठें नवल वाटेल. खरोखर हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. यासंबंधीं एक विशेष खुबीची गोष्ट मला प्रत्यक्ष माहीत आहे. ही गोष्ट जनरल स्टाफला व अस्मानी कप्तानांनाहि अर्थातच माहीत आहे. कांहीं अस्मानी जहाजें लष्करी दृष्टीनें तालमीच्या प्रसंगीं उपयोगांत आणलीं जात असतांहि हींच जहाजें उतारूंची ने आण करतांनाहि वापरलीं जातात ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. या पद्धतीबद्दल वर्तमानपत्रांतून पुष्कळ वेळां उघड चर्चा होत असल्यामुळें तिची माहिती सर्व जगाला झाली आहे.

अस्मानी जहाजें वापरण्याची दुसरी एक पद्धत असून ती अगदीं गुप्त राखण्यांत आली आहे. लष्करी तालमीच्या वेळींहि या पद्धतीचा उपयोग केला जात नसून कांहीं विशेष प्रसंगीं तिचा उपयोग अत्यंत गुप्तपणें केला जातो. या पद्धतीनें अस्मानी जहाजांचा उपयोग केल्यास अपघातांचें भय पंचाहत्तर टक्क्यांनीं कमी करतां येतें, असा अनुभव आला आहे. यासंबंधाची सारी माहिती व आंकडे फक्त जनरल स्टाफला मात्र माहीत आहेत.

यासंबंधीं तज्ज्ञांनीं केलेल्या टीकेचा विचार आपण येथें करूं. जर्मन झेपेलिनपेक्षां एरोप्लेन किंवा साधीं आकाशयानें अधिक श्रेष्ठ आहेत. असें म्हणणारे टीकाकार मुख्य तीन मुद्दे पुढें आणतात. १. झेपेलिन जहाज आकाशयानापेक्षां बांधणींत अधिक जड व आकारानें मोठें. २. ज्या वायूच्या जोरावर हें जहाज आकाशांत वर चढतें, तो वायु पेटण्याची भीति असते. ३. जरूरीइतका वेळ आकाशांत तरंगत राहण्यास पुरेसा वायु त्यात भरतां येत नाहीं.

जर्मनीच्या युद्धखात्यानें या तिन्ही बाबींत रामबाण युक्त्या योजिल्या आहेत. अस्मानी जहाज फार जड होऊं नये म्हणून एक नवेंच मिश्रण जर्मन रसायनशास्त्रज्ञांनीं शोधून काढलें आहे. हें मिश्रण अलिमिनियमपेक्षां हलकें असून अलिमिनियमचा चिवटपणा त्याच्या अंगीं पूर्णपणें आहे आणि याशिवाय पोलादांतील स्थितिस्थापकत्व गुणहि त्याच्या अंगीं अधिक आहे. जर्मनीच्या अंदाजपत्रकांत बारा अस्मानी जहाजें उघडपणें दाखविलीं आहेत. यांत या मिश्र धातूचें जहाज नाहीं. हें मिश्रण कसे केलें आहे. हें रहस्य जर्मनसरकारनें सात कुलुपांत ठेवलें असून तें मिळण्याकरतां युरोपांतील कोणताहि देश करोडो रुपये खर्चण्यास राजी होईल.

अस्मानी जहाज उचलणारा वायु पेटूं नये यावरहि युक्ति योजण्यांत आली आहे. स्पँडा येथील सरकारी रसशाळेंत एक नवा डाय ऑक्सिजन ग्यास तयार करण्यांत येत असतो. हायड्रोजन वायूपेक्षां हा वायु तिप्पट हलका असून त्याशिवाय हायड्रोजनप्रमाणें तो पेट घेत नाहीं, हा गुण

त्यांत विशेष आहे. या वायूचे केलेले प्रयोग मीं स्वतः पाहिले आहेत. प्रकाश देण्याकरतां या वायूचा उपयोग करतां येत नाहीं. या वायूनें भरलेलीं जहाजें स्फोटानें दगावत नाहींत. या वायूंत आणखीहि एक विशेष गुण असा आहे कीं, तो प्रवाही रूपांत तयार करतां येतो. अस्मानी जहाजांत या गुणाचा उपयोग केवढा होतो, हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. या पाण्यासारख्या प्रवाही वायूचा संयोग हवेशीं होण्याबरोबर त्याची वाफ होऊन तिचें अदृश्य वायूत रूपांतर होतें. सहा इंची व्यासाच्या आणि दोन फूट लांबीच्या धातूच्या नळींत प्रवाहिरूपानें हा वायु कितीतरी सांठविता येतो. अशा नळ्या प्रवाही वायूंनीं भरून जहाजावर घेतल्या, म्हणजे हवेंतल्या हवेंत या वायूचा नवा पुरवठा दीर्घ काळपर्यंत करतां येणें अवघड नाहीं, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. अशा रीतीनें झेपेलीन जहाजांतले दोष जर्मन लष्करी-खात्यानें कसे नाहींसे केले आहेत, हें वाचकांस कळून येईल.

१९१२ सालीं एक्स (X) या नांवाचें एक झेपेलीन जहाज युद्ध-खात्यानें तयार करून त्याचा प्रयोग पाहिला. हें जहाज स्टेटीन येथून निघालें, तें बाल्टिक समुद्रावरून स्वीडनमधील उपसाला या गावीं जाऊन तेथून पुनः फिनलंडच्या उपसागरांतील रिगा बंदरावर येऊन व तेथून स्टेटीन येथें परत आलें. या प्रवासांत या जहाजानें ९७६ मैलांचें अंतर तोडलें. या अस्मानी जहाजावर २५ मनुष्यें आणि पांच टन वजन होतें. हा प्रवास मार्च महिन्यांत झाला. हवा वादळी असून पाऊस व गारा हीं सपाट्यानें पडत होतीं. या प्रवासानें कोणती महत्त्वाची गोष्ट सिद्ध केली, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. स्ट्रास्बर्ग किंवा डुसेलडॉर्फ येथून पॅरीस किंवा इतर फ्रेंच महत्त्वाच्या जागेचें अंतर सुमारें ३०० मैल आहे. अर्थात् एकादें झेपेलीन पॅरीसला जाऊन व तेथें आजूबाजूला फेऱ्या घालून स्वस्थळीं सुखरूप परत येणें शक्य आहे. याशिवाय जर्मन लष्करीखात्यानें जे अनेक अनुभव घेऊन पाहिले आहेत, त्यावरून जळण किंवा वायु यांचा नवा पुरवठा घेण्याकरतां मध्यें कोठेंहि न उतरतां झेपेलिन यानें लांबलांबचा प्रवास करूं शकतात. ही गोष्ट निःसंशय सिद्ध झाली आहे.

जर्मनीच्या अस्मानी सैन्याची रचना कशी आहे, हें आतां सांगतों. या सैन्यांत एकंदर दहा तुकड्या असून प्रत्येक तुकडींत ३५० माणसें असतात. केवळ याच कामासाठीं यांना शिक्षण दिलेलें असतें. यांतील सर्व माणसें पहिल्या प्रतीच्या कारागिरांतून निवडलेलीं असतात. अतिशय शूर व बुद्धिमान् अशाच तरुणांची नेमणूक अम्मलदाराच्या जागीं केली जाते. सैन्यांत दिल्या जाणाऱ्या पगाराच्या मानानें या माणसांच्या पगाराचें प्रमाण फारच अधिक असतें. जर्मनीच्या लष्करी यंत्रांपैकीं दुसऱ्या कोणत्याहि खात्यांतील लोकांस एवढा मोठा पगार मिळत नाहीं. या सैन्याची भरती सामान्य वर्गांतून केली जात नाहीं; लष्करी कायद्याचा दोन वर्षांचा नियम या खात्यास लागू नाहीं. बहुतेक लोक बऱ्याच लांबपर्यंतच्या मुदतीच्या करारानें बांधलेले असतात. विवाहित तरुणांस बहुधा या खात्यांत नोकरी मिळत नाही. या नौकरींत जिवाला अधिक धोका आहे, हे उघड आहे. अस्मानी जहाजांचीं सर्व ठाणीं फारच तपशीलवार रीतीनें सज्ज केलेलीं असतात. मनुष्याच्या बुद्धीला सुचणाऱ्या साऱ्या युक्त्या या ठाण्यांत तुह्मांला आढळून येतील. प्रत्येक ठाणें सदोदित पूर्ण स्थितींत सज्ज ठेवलेलें असतें. कोणत्याहि जिनसेकरतां एका ठाण्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागत नाहीं. उदाहरणादाखल हेलिगोल्यांड येथील ठाण्याचें वर्णन मी येथें देतों. हें ठाणें नवीनच बांधलें असून त्याबद्दलची सर्व माहिती गुप्त राखण्यांत आली आहे.

हेलिगोल्यांड बेटाच्या अगदीं पूर्वेकडील कोपऱ्यांत वाळूचे मोठमोठे ढीग दिसत असतात. येथेंच लंबचौकोनी आणि धुरकट रंगाच्या प्रचंड अशा तीन इमारती बांधलेल्या आहेत. या इमारतींपासून १,००० यार्डांच्या अंतराच्या आंत कोणासहि फिरकूं दिलें जात नाहीं. या भागाकडे जाण्यास एकच रस्ता असून त्या रस्त्यावर तीन चौक्या आहेत. या रस्त्याकडे तुह्मी जाऊं लागलां, तर पहिल्या चौकीपासून १०० यार्डांवरच सूचनांच्या पाट्या तुह्मांस आढळून येतील. ही हद्द ओलांडून गेल्यास गुन्हेगारास ताबडतोब शिक्षा होईल, असें या पाट्या तुह्मांस स्पष्टपणें सांगतात. या पाट्यांचा हुकूम अमान्य केल्यास ताबडतोब जबर

शिक्षा होते, असा अनुभव पुष्कळ जर्मन प्रवाशांसहि आला आहे; तथापि न भितां आपण आणखी थोडें पुढें जाऊं या.

आकाशयानासाठीं बांधलेल्या इमारतीपासून पन्नास यार्डावर जाऊन आपण पोहोंचलों, म्हणजे कांटेरी तारांचें एक उंच कुंपण आपणांस दिसतें. या तारा मागल्या दोन चौक्यांशीं विद्युत्प्रवाहानें जोडलेल्या आहेत. एखादा घाडसी हेर रात्रीच्या वेळीं येथवर आला व या तारांतून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागला, तर त्यांस त्याचा स्पर्श होण्याबरोबर या दोन्ही चौक्यांवर एकदम घंटांचा गजर होऊ लागतो. अशा रीतीनें एकामागें एक सहा कुंपणें आहेत. हीं कुंपणें ओलांडून आपण आणखी पलीकडे जाऊं. या कुंपणांच्या मागें एक अष्टकोनी उंच मनोरा उभा आहे. या मनोऱ्याच्या शिखरावर दोन प्रखर उजेडाच्या शोधक बत्त्या आहेत. तसेंच या ठिकाणीं बिनतारांचें सदेशयंत्रहि ठेवलेलें आहे. हें यंत्र सर्व झेपेलिन जहाजांबरोबर असतें. येथील शोधक बत्त्यांचा प्रकाश इतका उज्ज्वल आहे कीं, अमावास्येच्या मध्यरात्रींहि भर मध्यान्हाचा प्रकाश त्यांतून उत्पन्न होतो. वर सांगितलेल्या तीन इमारती एकाच ओळींत शेजारीं शेजारीं बांधलेल्या आहेत. यांतील मधली इमारत सर्वांत मोठी असून तींत पूर्ण तयारीचीं दोन अस्मानी जहाजें राहूं शकतात. दुसऱ्या दोन इमारतींपैकीं प्रत्येकींत एकेक जहाज असतें. या इमारतींची लांबी ८०० फूट असून रुंदी २०० फूट आणि उंची १५० फूट आहे. या इमारती सुमारें चाळीस डिग्रीपर्यंत हालवितां येतात. एंजिनचें तोंड फिरविण्यासाठी स्टेशनावर केलेल्या योजनेप्रमाणेंच ही योजना आहे. वारा कोणत्याहि दिशेनें वहात असला, तरी त्रास न होतां जहाज बाहेर काढतां यावें, या हेतूनें ही योजना करण्यांत आली आहे. आजूबाजूच्या दिसणाऱ्या चिन्हांवरून येथें आणखीहि कांहीं इमारती उठविण्याचा बेत जर्मन सरकारचा असावा असें वाटतें. किंबहुना आणखी निदान एका तरी इमारतीची पूर्व तयारी आपणांस येथें आढळून येते. सरकारचें एक हवामापक खातें येथें ठेवलेलें असून त्यांत हवामानाचा अगदीं सूक्ष्मभेदहि दाखविणारीं यंत्रें जोडीजोडीनें ठेवलेलीं असतात.

या यंत्रांची देखरेख करणारे कामदार आपापल्या विद्येंत अत्यंत निष्णात असे आहेत.

मी हेलिगोल्यांड येथें गेलों होतों, तेव्हां येथील तटबंदींत बराच महत्त्वाचा फेरफार झाला असल्याचें मला आढळून आलें. पूर्वी या तटबंदीवरील लष्करी तयारी अगदीं पहिल्या प्रतीची होती; पण येथें आरमारी ठाणें झाल्यापासून या तटबंदीची तयारी दुय्यम प्रतीची झाली आहे. पूर्वीच्या शिबंदींतील सगळीं माणसें कमी झालीं असून त्यांची रवानगी दुसऱ्या कोठें करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें तेथील तोफखानाहि बराच कमी झाला आहे. या बेटांतील पूर्वेच्या बाजूच्या कोंपऱ्यांत तेथील प्रत्यक्ष कामदारावांचून दुसऱ्या कोणाचाहि प्रवेश आजवर झालेला नाहीं. या ठिकाणीं पूर्वी पांच अस्मानी जहाजें ठेवण्याची तयारी होती, हें मला प्रत्यक्षच माहीत आहे. त्यानंतर या तयारींत भर पडली नसेल, असें घेऊन चालले, तरीसुद्धां येथल्या तयारीपुढें कोणाहि शत्रूचा पाड लागण्यासारखा नाहीं. हेलिगोल्यांडला तटबंदी अथवा बुरूज यांचें कारणच उरलेलें नाहीं. हे नवे हवेंतले किल्ले एकवार आकाशांत गेले कीं, तेथून आजूबाजूस प्रत्यक्ष मृत्यूचें साम्राज्य सुरू करतील. त्यांतून होणाऱ्या वज्रपातापुढें कोणाचाहि टिकाव लागण्याचा संभव नाहीं.

हेलिगोल्यांड हें बेट पूर्वी इंग्लंडच्या मालकीचे होतें. आतां तें इंग्लंडचें हितशत्रु होऊन बसलें आहे. लॉर्ड साल्सबरी हे इंग्लंडचे मुख्य प्रधान असतां त्यांनी हेलिगोल्यांड बेट देण्याचें साटे बिस्मार्क यांजकडे करून त्याच्या बदल्यांत पूर्व आफ्रिकेंत कांहीं सवलती जर्मनीकडून मिळविल्या. आतां हें हेलिगोल्यांड बेट जर्मनीचें मुख्य संरक्षक होऊन बसलें आहे. जर्मनीच्या व्यापारी नाड्यांचें केंद्रस्थान हँबर्ग या बंदरीं असून हँबर्गची शेंडी हेलिगोल्यांडच्या हातांत आहे. पांच हवेंतल्या किल्ल्यांनीं सज्ज झालेलें हेलिगोल्यांड हँबर्गचें रक्षण करण्यास उभें आहे, तोंवर त्याच्या केंसासहि धक्का लावण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. एका बाजूनीं हँबर्गचें रक्षण हेलिगोल्यांड याप्रमाणें करीत असतां, समोरच अस-

लेल्या इंग्लंडकडे तें डोळे वटारून पहात आहे. यांतील हवेंतील किल्ले समुद्र ओलांडून पलीकडे केव्हां जातील हें कोणीं सांगावें ? सुखासमाधानानें नांदत असलेल्या राष्ट्रांतहि वैराग्नि केव्हां भडकेल, हें कोण सांगू शकेल !

आतां या अलीकडच्या अस्मानी जहाजांचें सामर्थ्य काय असतें, याचा विचार करूं. या नव्या पद्धतीच्या जहाजांत नव्या पद्धतीचा वायु भरलेला असल्यामुळें हवेंत उडण्याची त्याची शक्ति पूर्वीपेक्षां तिपटीनें वाढली आहे तसेंच डीझल पद्धतीची सुधारणा केलेलीं नवीं एंजिनें यांत बसविलीं आहेत. या एंजिनांचें रहस्यहि जर्मन सरकारनें अगदीं गुप्त ठेवलें आहे. वुइलियमसेव्हन आणि कील येथील गोद्यांत या जातीचीं पन्नास एंजिनें जोडून तयार आहेत. युद्ध सुरू झाल्याबरोबर हीं एंजिनें पाणबुड्यांत किंवा अस्मानी जहाजांत ताबडतोब बसवितां येतील, अशा पद्धतीचीं आहेत. या नव्या एंजिनांनीं झेपेलिन जहाजांचें सामर्थ्य किती वाढलें आहे, हें कोणाच्याहि लक्षांत आलेलें नाहीं. सध्यांतरी तें कल्पनातीत आहे, ही गोष्ट खरी. आरंभीं हीं जहाजें फक्त पन्नास मैल ये जा करण्यापुरतीं उपयोगांत पडत असत; पण त्यांचें हें सामर्थ्य आतां ७००।८०० मैलांपर्यंत वाढलें आहे. X १५ या नांवाचें एक झेपेलिन जहाज २४ मनुष्यें, सहा जलदबारी तोफा आणि सात टन दारूगोळा एवढें साहित्य बरोबर घेऊन स्टेटीनहून निघालें, तें बाल्टिक समुद्रावरून स्वीडनमधील स्वेंडबोर्ग गांवीं जाऊन तेथून पुन्हां जर्मनीच्या स्वाईनमुंड गांवीं येऊन उतरलें. त्या वेळींहि त्यांत आणखी छत्तीस तासांच्या प्रवासाची सर्व सामग्री शिल्लक होती. हें सारें अंतर ५००–६०० मैल आहे. इंग्लंड आणि जर्मनी यांमध्यें युद्ध सुरू झालें, तर या यानांचें सामर्थ्य काय करूं शकेल, हें अधिक सांगणें नकोच.

या जहाजांत फक्त सातच टन दारूगोळा जातो, असें नाहीं. जरूर पडल्यास हें जहाज चौदा टनांपर्यंत वजन घेऊं शकेल, असें एका तज्ज्ञानें मला सांगितलें आहे. हीं जहाजें जों जों अधिकाधिक मोठीं होतील, तों तों तीं अधिकाधिक वजन उचलतील, हें निर्विवाद आहे.

असल्या जातीच्या बारा राक्षसी गिधाडांनीं एकाद्या मोठ्या शहरावर हल्ला केला, तर त्याची काय दशा होईल, याची कल्पना करा. संरक्षणासाठीं म्हणून आजपर्यंत निघालेल्या सर्व युक्त्या या गिधाडधाडीपुढें रद्द पडतील. झेपेलिन जहाजें ७-८ हजार फूट उंच उडत असल्यामुळें तीं फुटबॉलहून अधिक मोठी दिसत नाहींत. झेपेलिन यानें दहा बारा हजार फूट उंच उडाल्याचें मला प्रत्यक्ष माहिती आहे. इतक्या उंचीवरहि आंतील माणसांस थंडीची बाधा न होण्याची व्यवस्था केली आहे. माणसांस बसण्याकरतां केलेल्या खोल्या कृत्रिम साधनांनीं इतक्या उबदार ठेवतात कीं, जणूं काय आपण आपल्या घरींच बसलों आहों, असें आंत बसणारास वाटतें. या जहाजांची ज्यांना अर्धवट माहिती आहे, त्यांना असें वाटतें, कीं छोटीं आकाशयानें यांना निकामीं करू शकतील. आतां सहा हजार फूट उंचीवर गेलेल्या छोट्या आकाशयानांची (एरोप्लन) दशा काय असते, ते पहा. झेपेलिन जहाज त्यावर आणखी ३।४ हजार फूट असतें याचा विचार करा. सहा हजार फूट उंचीवर गेलेल्या छोट्या आकाशयानांतील मनुष्य थंडीनें इतका गारठून गेलेला असतो, कीं, आपलें यान कसेंबसें सांभाळण्याहून अधिक कांहीं करण्याचें सामर्थ्य त्यांस राहिलेलें नसतें. अशा स्थितींत स्वतःच्या डोक्यावर दोन तीन हजार फूट असलेल्या झेपेलिनयानास तो कितपत इजा करूं शकेल, याचा तुम्हीच विचार करा. एखादा मनुष्य छोट्या आकाशयानांतून प्रसंगीं आठ हजार फूटपर्यंत वर गेला, तर थंडीनें त्याची काय अवस्था होते, हें त्याचें त्यालाच विचारलें पाहिजे. थंडीनें धनुष्य वळलेला मनुष्य उबदार जागेंत चैनीनें शांतपणें बसलेल्या मनुष्यास कितपतशी इजा करूं शकेल ! जर्मन लोक या प्रश्नाला आपल्या लष्करी भाषेंत ' क्रॅश ' एवढेंच उत्तर देतील.

झेपेलिन जहाज आठ हजार फूट उंचीवर दर तासास ३५ पासून ६० मैलांच्या वेगानें धांवत असतें. इतक्या उंचीवर त्याचा आकार एकाद्या चेंडूएवढा दिसतो. अशा स्थितींत जमीनीवरच्या तोफखानाचा त्याजवर लागू पडण्याचा संभव फारच थोडा आहे. त्यांतूनहि या गिधाडाला

अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेतां येतो, हें वेगळेंच. तसेंच दिवसा-ढवळ्या एकाद्या ढगाच्या मागें लपून राहण्याचीहि त्यांस सवलत असतेच. आतां इतक्या सवलती असलेलें हें गिधाड एकाद्या मोठ्या शहरावर गेलें; तर वरून कुलपी गोळ्यांचा भडीमार करून त्या शहराची तें किती दुर्दशा करूं शकेल, याची तुम्हीच कल्पना करा. तेथें मोठ्या निशाण-बाजीचेंहि काम नको. एकाद्या विशिष्ट पदार्थावर त्यांना निशाण मारावयाचें नसतें. जर्मन लष्करी खात्यानें नवीन पद्धतीनें तयार केलेले कुलपी गोळे नुसते इतस्ततः पेरीत जावयाचें, इतकेंच त्यांचें काम आहे. हा नव्या पद्धतीचा कुलपी गोळा जेथें पडेल, तेथें आगीचा प्रचंड लोळ उद्भवितो. अशा रीतीनें एकाद्या मोठ्या शहराची होळी हें जहाज हां हा म्हणतां करूं शकेल.

एरोप्लेन, बायप्लेन, मोनोप्लेन इत्यादि असंख्य जातीचीं चिलटवजा आकाशयानें झेपेलिन जहाजास इजा करूं शकतील, असें कित्येकांस वाटतें. या बाबतींत जर्मन लष्करी अधिकाऱ्यांनीं हजारों प्रयोग करून पाहिले आहेत. झेपेलिनयानांची संख्या वाढविण्याचा उद्योग जर्मन सरकार अट्टाहासानें करीत आहे, यांतच या साऱ्या प्रश्नाला पूर्ण उत्तर मिळतें. युद्धांत उपयोगी पडण्याजोगी जी जी नवी युक्ति निघेल, तिजवर सहस्रशः प्रयोग करून तिचा उपयोग सर्व दृष्टींनीं पूर्णपणें अजमावून ठेवण्याची खटपट जर्मन लष्करीखातें जितकी करतें, तितकी खटपट जगांतील दुसरें कोणतेंहि लष्करीखातें करूं शकत नाहीं. अशाच रीतीनें छोटीं चिलटवजा यानें आणि झेपेलिन यांजवर प्रयोग करून त्या दोहोंचाहि उपयोग त्या खात्यानें अजमावून ठेवला आहे. या दोन्ही प्रकारच्या आकाशयानांवर कित्येक वर्षें काम करून जे या कलेंत निष्णात झाले आहेत, त्यांनीं स्पष्टपणें आपला अभिप्राय असा प्रगट केला आहे, कीं, चिलटवजा यानांकडून झेपेलिन जहाजास यत्किंचित्हि उपद्रव होण्याची भीति नाहीं.

लष्करी तयारी!

युरोपच्या नकाशांत बरेचसे फेरफार पुढें मागें होण्याचा संभव आहे. सध्यांच्या स्थितीवरून सामान्य वाचकांची युरोपाबद्दल जी कांहीं कल्पना होते, तीवरून युरोप बाह्यतः शांतसा दिसतो; पण युरोपांतील सामाजिक व आर्थिक परिस्थिति इतकी चमत्कारिक व घोंटाळ्याची झाली आहे, कीं, तिच्यामुळें युरोपांत लवकरच अदलाबदल झाली पाहिजे. विशेषतः मध्य-युरोपांतील राजकीय महत्त्वाकांक्षेनें या घोटाळ्यांत आणखी भर पाडली आहे. यामुळें तेथील राष्ट्रांच्या सरहद्दींत कांहीं तरी फेरफार लवकरच घडून आल्यावांचून राहणार नाहींत. हे फेरफार कदाचित् शांततेनेंहि घडतील; अथवा कदाचित् तरवारीनें घडतील; तथापि ते तरवारीनेंच घडण्याचा अधिक संभव आहे. कोणत्याहि गोष्टीबद्दल भांडण उपस्थित झालें, तर तें नुसत्या वादविवादानें मिटविण्यापेक्षां दंडादंडीनेंच मिटविण्याकडे मानवी मनाचा अधिक कल आहे, अशी साक्ष इतिहास आजवर देत आला आहे. जगांत शांतीचें साम्राज्य व्हावें, एतदर्थ अनेक महात्म्यांनीं व पुण्यपुरुषांनीं आजवर खटपट केली आहे. पण अजूनपर्यंत या खटपटीस यश आल्याचीं चिन्हें फारशीं दिसूं लागलीं नाहींत. स्वतःचें साध्य सिद्ध करण्यासाठीं आगाऊ तयारीच्या दृष्टीनें मनुष्यप्राणी ज्या ज्या युक्त्या योजितो त्यांचें पर्यवसान आजपर्यंत युद्धांतच होत आलें आहे. ख्रिस्त कालापूर्वी मनुष्य जितका भांडखोर होता, तितकाच भांडखोर तो अजूनहि राहिला आहे. युरोपानें ख्रिस्ति धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांतील भांडणाच्या पद्धतींत फेर पडला असेल, पण अंतीं परिणाम एकच. भांडणाचें शेवटचें 'अपील' न्यायाच्या तराजूकडे न जातां तरवारीच्या तीक्ष्ण धारेकडे जातें.

मध्य युरोपांत अत्यंत जिवट आणि परपक्षी अशी एकादी शक्ति असेल, तर ती जर्मनी हीच होय. जर्मनी या शब्दांत जर्मन किंवा टयूटन वंश जेथें जेथें पसरला आहे, त्या साऱ्या भागांचा अंतरभाव करण्यास हरकत नाहीं. जर्मन भाषा बोलणारा आस्ट्रियाचा भाग, हॉलंड,

स्वित्सर्लंड, स्वीडन, नार्वे आणि डेन्मार्क एवढ्या भूमीचा अंतर्भाव स्थूल दृष्टीनें जर्मनी या शब्दांत करण्यास हरकत नाहीं. या प्रांतांचीं सामाजिक व व्यापारी ध्येयें जवळ जवळ एकच असून यांतील कांहीं देश स्वतंत्र राण्याचे असले तरी, मध्य जर्मनीशीं एक सघ करण्याकडे त्यांचा कल आहे. स्वीडन, नार्वे आणि डेन्मार्क हे देश स्वतंत्र आहेत व राजकीय दृष्ट्या ते तसेच स्वतंत्र राहतील, यांत संशय नाहीं; पण सामाजिक आणि व्यापारी उन्नतीपुरतें मध्य जर्मनीशीं बांधून घेण्याची त्यांची तयारी दिसते. स्वतंत्र मानववंशाच्या दृष्टीनें एकदर युरोपखंडाचे सामान्यतः तीन विभाग झाले आहेत. ते विभाग ह्मणजे टयुटॉनिक वंश, लॅटीन वंश आणि स्लॅव्हॉनिक वंश हे होत. टयुटॉनिक वंशांत अँग्लो सॅक्सन्, जर्म्यानिक आणि नॉर्स अशा तीन उपशाखा आहेत. लॅटीन वंशांत फ्रेंच, इटालिन आणि स्पॅनिश या राष्ट्रांचा अतर्भाव होतो आणि स्लॅव्हॉनिक वंशांत स्लॉव, मस्कोव्हाईट, झेच्, पोल, क्रोट, सर्व, बलगर इत्यादि अनेक उपशाखांचा अंतर्भाव होतो. चालीरीती, विचार-परंपरा, साध्यें आणि महत्त्वाकांक्षा या बाबतींत हे तीन मानववंश परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत. या मूळच्या भिन्नतेंत निरनिराळ्या धर्मपंथांनीं व अर्वाचीन व्यापारी वाढीनें अधिकच भर घातली असून त्यांचे हितसंबंध पुरे विभागून टाकले आहेत. सर्व जगांतील संपत्ति एके ठिकाणीं आणून त्याच ठिकाणीं ती डाबून ठेवावयाची, हा हल्लींच्या व्यापारी युगाचा अंतिम हेतु आहे. नेपोलियनच्या वेळच्या युद्धांनंतर जर्मन वंश आरंभीं हळु हळू; पण आतां सपाट्यानें संघटित होत आहे. गेल्या पंचवीस तीस वर्षांत या निरनिराळ्या शाखांचें एकीकरण होऊन व्यापारी दृष्ट्याहि त्यांचें पाऊल विलक्षण झपाट्यानें पुढें पडत आहे. बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क आणि स्वित्सर्लंड हीं राष्ट्रें इतकीं छोटीं आहेत, कीं, त्यांच्या शेजारपाजारच्या राक्षसी राष्ट्रांनीं त्यांची केव्हांच चटणी करून टाकली असती; पण हीं मोठीं राष्ट्रें एकमेकांस पाण्यांत पहात असल्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य आजवर टिकलें आहे. आता या राष्ट्रांतहि संघटनेच्या इच्छेचा प्रादुर्भाव होऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें

दिसूं लागलीं आहेत. त्या त्या राष्ट्रांच्या राजकर्त्या पुरुषांस ही गोष्ट पसंत वाटत नसली; तथापि सामान्य जनतेचीं मनें एका मध्यवर्ती संस्थेकडे ओढलीं जात आहेत, यांत मात्र संशय नाहीं. अशाच प्रकारची साऱ्या युरोपभर दाब ठेवणारी मध्यवर्ती शक्ति मध्ययुरोपांत निर्माण करावी, हीच होहेनझोलार्न घराण्याची मुख्य महत्त्वाकांक्षा आहे.

फार प्राचीन काळापासून या महत्त्वाकांक्षेला आरंभ झाला आहे. नरेन्बर्गचे कौंट हे ब्रॅन्डन्बर्गचे इलेक्टर झाल्यापासून आणि फ्रेड्रीक दि ग्रेटच्या काळापासून तों थेट सध्याच्या बादशहापर्यंत या होहेनझोलार्न घराण्यानें विलक्षण जिवटपणा दाखविला आहे. युरोपच्या अर्वाचीन इतिहासांत याच्या इतकें जिवट राजघराणें दुसरें नाहीं. या घराण्यांतील सर्वच पुरुष मोठे बुद्धिवान् होते, असें नाहीं, तथापि आपला हेतु साध्य करण्यास लागणाऱ्या मोठ्या माणसांची निवडणुक करून त्यांजकडून आपला हेतु साधावयाचा, ही दुर्मिळ कला मात्र या घराण्यांतिल पुरुषांस साध्य झाल्याचें इतिहासावरून दिसून येतें.

मध्ययुरोपांत आणि विशेषतः जर्मनींत अद्यापि जुन्या जमीनदारी आणि सरदारी पद्धतीचा पूर्ण प्रादुर्भाव असल्यामुळें शिस्त व चिकाटी यांची तेथें आवश्यकता असते. डोकें शांत ठेवून सामान्य जनतेची सांपत्तिक वाढ आणि संस्कृति यांस अडथळा होऊं न देण्याची खबरदारी जोपर्यंत सरकार घेत आहे. तोंपर्यंत तेथील राजशासन पद्धतींत क्रांति घडून येण्याचा यत्किंचित्हि संभव नाहीं.

जर्मनी आणि आस्ट्रिया या देशांत सोसियालिझम प्रबळ होत चालला आहे, व त्यामुळें सध्यांच्या राजशासनपद्धतींत मोठी क्रांति घडून येण्याचा संभव आहे, असा प्रवाद सर्वत्र ऐकूं येतो; पण या दोन देशांतील परिस्थितीचें निरीक्षण ज्यानें सूक्ष्म दृष्टीनें केलें असेल, त्याला या प्रवादांत कांहीं तथ्य आढळून येणार नाहीं. राजशासनपद्धति कशा प्रकारची असावी, याबद्दलचा सूक्ष्म आणि तात्त्विक विचार करण्याची संवय टयूटॉनिक वंशाला फार प्राचीन काळापासून आहे; पण अशा प्रकारें तत्त्वशोध करीत असतांहि प्रत्येक गांष्टचा विचार ते व्यावहारिक दृष्टीनेंहि

करीत असतात, हें विसरतां कामा नये. कोणत्याहि शासन पद्धतींतील गुणावगुणांचा परिणाम प्रत्यक्ष व्यवहारांत कसा दिसून येतो, यांकडेहि ते लोक लक्ष पुरविण्यास चुकत नाहींत. जर्मन सोसियालिस्ट हा प्राणी कल्पनाविवश होणारा असला, तरी तो त्या कल्पनेबरोबर भलतीकडे कधींहि वाहवत नाहीं. कल्पनावेशानें तो व्यवहारपरांगत होत नाहीं. ल्याटिन वंशांतील सोसियालिस्ट प्राणी याच्या अगदीं उलट आहे. तो आपल्या कल्पनावारूवर एकदां आरूढ झाला, कीं, व्यवहाराशीं फारखत करून बेगुमानपणें वाटेल तिकडे पळत सुटतो. ल्याटीन सोसियालिस्ट हा पाऱ्यासारखा पकडण्याला मोठा कठिण आहे. लोकांच्या सुखाभिवृद्धीवर सिंहासनाचें चिरस्थाइत्व अवलंबून आहे, हा धडा जर्मनीच्या राजघराण्यांनीं पक्का गिरविला आहे. अशा प्रकारें पुष्कळ काळपर्यंत एकच घराण्याचें राज्य झाल्याचा दाखला इतिहासांत दुसरा सांपडत नाहीं, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. संस्कृति मार्गावर ज्याचें पाऊल एकसारखें घुटें पडत आहे, आणि ज्याची भरभराट अव्याहतपणें आजपर्यंत झाली आहे, असा देश जर्मनीशिवाय जगांत दुसरा एकहि नाहीं; पण याच भरभराटींत भावी अनर्थाचें बीज आहे. वाढत असलेला कोणताहि वृक्ष अधिक वर वर गेल्यावांचून रहात नाहीं. आकाशांतील अधिक अधिक जागेचें आक्रमण तो एकसारखा करीत असतो. तसेंच पैशाच्या आणि सामर्थ्याच्या दृष्टीनें सरळ असलेलें जर्मनराष्ट्र योग्य काळाची वाट पहात स्वस्थ बसेल, असाहि संभव नाहीं. लौकरच दोहोंपैकीं एक गोष्ट घडून येण्याचा निश्चित संभव दिसतो. एक तर जर्मनी आपले हात पाय शांत मार्गांनीं ईशानीकडे आणि पश्चिमेकडे पसरील किंवा उल्हाटयंत्रांच्या प्रचंड कडकडाटानें सारें जग हलवून सोडील !

शांततेच्या आणि सौजन्याच्या उपायांनीं जर्मनीच्या योग्य वाढीस अवसर मिळेल, असा भरंवसा जर्मन मुत्सद्यांस बिलकूल नाहीं. जर्मन लोक जात्याच अत्यंत व्यवहारी आणि मितव्ययी आहेत. असल्या प्रकारचे लोक क्रोडो रुपये आणि अमूल्य वेळ व श्रम यांचा खर्च करणार नाहींत, हें कोणाच्याही लक्षांत येईल, आणि ज्या अर्थी या साऱ्या अमूल्य

चिजांचा उपयोग त्यांनीं लष्कराच्या जय्यत तयारीकडे केला आहे, त्या अर्थीं त्याच्या आवश्यकतेबद्दल त्यांची पुरी खात्री झाली असली पाहिजे; यांत संशय नाहीं. जर्मन राष्ट्र आज मित्तीस प्रबळ आणि संपत्तिमान आहे, तथापि त्यालासुद्धां हा लष्करी खर्च डोईजड झाला आहे. या करितां बाकीचीं कारणें बगळलीं तरी, या एकाच कारणामुळें युरोपांतील नकाशाचे रंग लवकरच फिरण्याचा संभव आहे, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

युरोपांत अशी क्रांति घडून येणार, यांत शंका नाहीं; पण ती केव्हां घडून येईल याची नक्की तारीख ठरविणें मात्र शक्य नाहीं. कदाचित उद्या सुद्धां या क्रांतीला आरंभ होईल. कांहीं झालें तरी युरोपची शांतता आठ दहा वर्षांपलीकडे टिकावयाची नाहीं, हें मात्र निश्चित होय. आस्ट्रियाचा बादशहा फ्रान्सीस जोसेफ मरण पावला, तर या क्रांतीस ताबडतोब सुरवात होईल.

दुसरी एक धार्मिक बाबहि येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. क्याथोलिक पंथांच्या लोकांचें पुढारीपण आस्ट्रियन पादशाहीकडे आहे. ही पादशाही नामशेष झाली, तर त्यांना दुसरा कोणी तरी पुढारी पहावा लागेल. त्यांचें पुढारीपण नीट रीतीनें सांभाळून पथाचें महत्त्व व मान कायम राखील असा एकहि क्याथोलिक राजा सध्यां युरोपांत नाहीं. जर्मन बादशहा हा प्राटेस्टंट पंथाचा पुस्तकर्ता आहे, ही गोष्ट खरी; तथापि तो खिस्ताचा खरा अनुयायी आहे. याशिवाय आजवर त्यानें जी तीक्ष्ण आणि लांब दृष्टि दाखविली आहे, तिजमुळें त्याच्या साम्राज्यांत पंथापंथांतील तेढ्यास वाव उरलेला नाहीं. क्याथोलिक पंथाच्या लोकांस स्वधर्माचरणाची पूर्ण मुभा ज्याप्रमाणें अमेरिकेंत किंवा ब्रिटिश साम्राज्यांत मिळते, त्याचप्रमाणें जर्मनींतहि ती मिळते. जर्मनीशिवाय युरोपांतील इतर कोणत्याहि देशांत क्याथोलिक पंथास इतकें स्वातंत्र्य मिळत नाहीं. याशिवाय पोपशीं बादशहांचा खाजगी स्नेहसंबंधहि फार उत्तम प्रकारचा आहे. मधून-मधून इटलींत जाऊन पोप महाराजांच्या चरणीं वंदन करण्यास दुसरा वुइलियम बादशहा चुकत नाहीं, हें पुष्कळांस ठाऊक असेलच.

तुर्कांशीं स्नेह संबंध जोडून ज्याप्रमाणें जर्मनीनें तुर्कस्थानाचा उपयोग उंटाप्रमाणें करून जसा आपला दक्षिण भागाचा दरवाजा सुरक्षित केला आहे, त्याचप्रमाणें उत्तरेच्या बाजूला स्वीडन व नार्वे यांच्याशीं स्नेहसंबंध जोडून या दिशेलाहि एक उंट विरेला घालण्याची तजवीज केली आहे. स्वीडन आणि नार्वे हे देश रशियाशीं केव्हांहि मैत्री दाखवीत नव्हते. प्राचीन काळापासून रशियाशीं त्यांचा उभा दावाच आहे. गेलीं कांहीं वर्षें या त्यांच्या मनःस्थितींत आणखी भरच पडली आहे. हे दोन्ही देश स्वातंत्र्याचे विलक्षण अभिमानी आहेत. स्वतःस जर्मन साम्राज्यांत ते सामील करून घेणार नाहींत. जर्मन साम्राज्याची तशी इच्छा नाहीं, ही गोष्ट त्यांस पूर्णपणें अवगत आहे. उलटपक्षीं रशिया आपणाकडे लोभी दृष्टीनें पहात आहे, हेंहि त्यांस माहीत आहे. यामुळें संरक्षणार्थ जर्मनीची मदत त्यांस हवी आहे. जर्मनीच्या मदतीनें हीं राष्ट्रें प्रसग पडल्यास सात आठ लक्ष पहिल्या प्रतीचें सैन्य उभें करूं शकतील. आणि हें सैन्य रशियाच्या नाजुकभागीं घाव घालूं शकेल.

होहेनझोलार्न घराण्याला राजकीय दृष्ट्या अर्थातच पुष्कळ महत्त्व आहे; पण याशिवाय सांपत्तिक आणि स्नेहसंबंध दृष्टीनेंहि या घराण्यानें आपलें महत्त्व युरोपांत विलक्षण वाढविलें आहे. बाहशहाच्या मुलांचे विवाह मोठमोठ्या आणि श्रीमंत घराण्यांतील राजकन्यांपाशीं झालेले आहेत. त्याशिवाय बादशहांची खाजगी दौलत फार मोठी असून व्यापारांतहि त्यांचा पुष्कळ पैसा गुंतलेला आहे. यामुळें व्यापारी वर्गांतहि बादशहांचें महत्त्व पुष्कळ वाढलें आहे.

केसरचीं कांहीं कारस्थानें.

सध्यांच्या बादशहांचे आजे पहिले वुइलियम हे गादीवर असतां सध्यांचे बादशहांस त्यांनीं पाहिल्या ड्रॅग्युन गार्डचे कर्नल नेमलें. ही पलटण त्यावेळीं पाटस्ड्याम येथील शिबन्दींत होती. एके वेळीं हा तरुण कर्नल भर मध्यरात्रीं आपल्या पलटणीच्या बराकींत अचानक गेला. त्यावेळीं

आपले बहुतेक अम्मलदार मदिरापानांत धुंद झाले असल्याचें त्यास आढळून आलें. कर्नल प्रिन्स वुइलियम यांनीं त्या सर्वांस एकदम कैद करून बराकींत ठेवलें. हे सर्व अम्मलदार प्रशियांतील जुन्या व मोठ्या सरदार घराण्यांतील होते. त्यांचीं कुटुंबें राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या मोठीं वजनदार गणलीं जात असत. वृद्ध बादशहाला खाजगी रीतीनें भेटून कांहीं जुन्या वजनदार माणसांनीं ही हकीकत त्यांच्या कानीं घातली आणि अम्मलदारांची मुक्तता करण्याची विनंति केली. बादशहांनीं कर्नल साहेबांस बोलावून आणून अम्मलदारांना सोडण्याबद्दल सुचविलें. प्रिन्स वुइलियमनें आपल्या आजास झटलें, " पहिल्या ड्रॅगून गार्डीचा मी कर्नल आहेना ? "

" अर्थात्. तूं कर्नल आहेस. "

" त्या पलटणीची सर्व जबाबदारी मजवर आहेना ? "

" निःसंशय. "

तरुण राजपुत्रानें कमरेची तरवार काढून ती बादशहापुढें ठेवली आणि कुर्निसात करून म्हटलें, " सरकारचरणीं मी कर्नलच्या जागेचा राजीनामा सादर करतों. "

बादशहा एकदम चकित झाले; तथापि मनांतल्या मनांत त्यांस फार संतोषहि झाला. त्यांनीं ती तरवार राजपुत्राच्या हातीं परत देऊन त्याचा राजीनामा स्वीकारण्याचें नाकारलें. अम्मलदारांची मित्रमंडळी बादशहाच्या भेटीस पुन्हां गेली, तेव्हां बादशहा त्यांस झणाले, " काय करावें ? तुमचें झणणें मान्य करण्यास मी आनंदानें तयार आहे; पण तशी कर्नलची इच्छा नाहीं, त्यास निरुपाय आहे. " यांतील बरेचसे अम्मलदार नौकरींतून कायमचे वजा झाले.

* * *

जर्मन साम्राज्याचे पहिले मुख्य प्रधान कौंट बिस्मार्क यांना जर्मन पार्लमेंटांतील क्याथोलिक पक्षाचें पाठबळ नसल्यामुळें सैन्य व आरमार यांजवरील वाढत्या खर्चाचें बील नामंजूर झालें. यानंतर बिस्मार्क यांच्या जागीं कौंट होहेनलो यांची नेमणूक झाली. हे एका सुप्रसिद्ध क्याथोलिक

कुटुंबांतील गृहस्थ होते. त्यांच्या नेमणुकीमुळें क्याथोलिक पक्ष आणि राजपक्ष यांचा समेट होऊन लष्करी खर्चास पार्लमेंटाची मंजुरी मिळाली. यानंतर या पक्षाचें पाठबळ कायम राखण्यासाठीं दुसऱ्या वुइलियम बादशहानें आणखी एक युक्ति योजली.

पोप पिटर याच्या गादीवर जे जे पोप आजपर्यंत बसत आले, त्या सर्वांना एकाद्या शक्तिमान् राजाच्या स्नेहाची अपेक्षा वाटत होती. ऐहिक विषयांशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं, असा बाणा हे धर्मगुरू जरी बाह्यतः बाळगीत होते, तरी स्वतःचें महत्त्व कायम राखण्यासाठीं शक्तिमान् राजांच्या कच्छपीं ते लागत असत. युरोपांत स्पेनचें महत्त्व नष्ट झाल्यानंतर या धर्मगुरूंनीं आपल्या जहाजाचा नांगर फ्रान्सांत टाकला. यानंतर फ्रान्सांत प्रचंड राज्यक्रांति होऊन बादशाही सत्ता नष्ट झाली, तेव्हां पोपचें हें तारू व्हिएन्नाच्या बंदरीं गेलें; पण हें बंदरहि फार काळ आसरा देऊं शकणार नाहीं, ही गोष्ट या धर्मगुरूंच्या ध्यानीं लवकरच आली. अनेकविध पंथांच्या पसाऱ्यानें बुजबुजलेल्या आस्ट्रियापेक्षां एकाच महत्त्वाकांक्षेनें संयुक्त झालेल्या जर्मन साम्राज्यांत आपणास आसरा मिळाल्यास तें अधिक हितावह होईल, असें त्यांस वाटूं लागलें. त्यांच्या वाटेंतील मोठा कांटा जो प्रिन्स बिस्मार्क तो याच सुमारास उपटला गेला आणि अशा रीतीनें धर्मगुरूंचें आद्यपीठ आणि जर्मनी यांजमधील स्नेहसंबंधाचा मार्ग मोकळा झाला.

बर्लिन येथील आपल्या तबेल्यांतून सुंदर, शुभ्र आणि आकाशीरंगांनीं रंगविलेली व तिच्या बाह्यभागीं प्रशियाचें गरुडांकित राजचिन्ह रंगविलें आहे, अशी गाडी बाहेर पडली. सुख सोयीच्या दृष्टीनें या गाडीशीं तुलना करण्यास योग्य अशी दुसरी एकहि गाडी सांपडावयाची नाहीं. या गाडीला पांच डबे असतात. पहिल्या डब्यांत बादशहांचे रेलवे कामदार व इतर अम्मलदार असतात. दुसऱ्या डब्यांत बादशहांच्या खास तैनातीचे लोक असतात. मधल्या (तिसऱ्या) डब्यांत खुद्द बादशहाची स्वारी असते. सौंदर्य आणि सुख या दृष्टीनें हा डबा मानवी कौशल्याचें एक अप्रतिम स्मारक आहे. यांत शंका नाहीं. याच डब्यांतील एका कोपऱ्यांत बाद-

शहांची कामास बसावयाची जागा आहे. येथें मात्र कसल्याहि चैनीचा अथवा संपत्तीचा मागमूसहि लागत नाहीं. या ठिकाणीं बादशहांसाठीं जो पलंग मांडला आहे, व त्यावर जी गादी आहे, तसली गादी एकाद्या रेलवे कंपनीनें आपल्या डब्यांत घातली, तर खरोखर तिजवर शिव्यांचा भडिमार होईल.

प्रवासांत असतांहि दुसऱ्या वुइलियम बादशहांच्या दिनचर्येंत फरक पडत नाहीं. प्रवासांत त्यांजबरोबर सुप्रसिद्ध लेखक, कवि आणि भौतिक शास्त्र विशारदपंडित नेहमीं असतात. फुरसतीच्या वेळीं यांजबरोबर संभाषण करून साहित्यसंगितादिकलांची झालेली वाढ व भौतिकशास्त्रांतील अगदीं नवे शोध यांजबद्दल बादशहा माहिती मिळवीत असतात. बादशहांची स्मरणशक्ति विलक्षण उज्ज्वल आहे. एकादा लांबलचक निबंधहि एकदां वांचून ते जवळ जवळ अक्षरशः ह्मणून दाखवितात. बादशहांना प्रवासाची विलक्षण हौस आहे. 'भरारी केसर' असें यांचें जर्मनींत नांव पडलें आहे. पहिले वुइलियम, तिसरे फ्रेड्रीक आणि दुसरे वुइलियम यांचें वर्णन अगदीं थोडक्यांत कसें करतां येईल, याबद्दल एका विद्वान् मंडळांत वाद निघाला असतां एक विद्वन्मणि ह्मणाले, "१ सज्जन केसर, २ मुका केसर आणि ३ भरारी केसर एवढ्यांत या तिन्ही बादशहांचें गुणवर्णन येईल." या कोटीबद्दल या विद्वन्मणीस सहा महिने सरकारचा फुकट पाहुणचार मिळाला.

बादशहांची गाडी मुक्कामाला पोहोंचेपर्यंत वाटेंत तिला कोठेंहि थांबविण्यांत येत नाहीं. मुख्य गाडीच्या आगेमागें पांच-पांचशें यार्डांच्या अंतरावर सुटीं इंजिनें रक्षक या नात्यानें धांवत असतात.

रोम शहर आज नटून सजून तयार झालें होतें. दुसरे वुइलियम बादशहा आपणास आज भेट देणार याबद्दल रोम शहराला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या.

रोम शहराला भेट देण्यांत केसरचा अंतस्थ हेतु वेगळाच होता. दरबारी मेजवानीनंतर आठ तासांनीं बादशहांची गाडी कसलाहि थाटमाट

न करतां गुरूमठाच्या–पोपच्या–दाराशीं जाऊन उभी राहिली. केसर-दुसरे वुइलियम–मोठ्या आदबीनें दरवाजांतून आंत शिरले.

इ. स. १०७७ सालीं सातव्या ग्रेगरी या नांवाच्या पोपनें त्या वेळचा जर्मनीचा बादशहा चवथा हेनरी याजवर बहिष्कार घातला होता. तेव्हां तो बादशहा पोपकडे गेला व त्यांजसमोर बर्फ पडत असतांहि अनवाणी उभा राहिला. तेव्हां ग्रेगरीनें कृपावंत होऊन त्याजवरील बहिष्कार दूर केला. या प्राचीन गोष्टीस अनुलक्षून बिस्मार्क यांनीं 'आह्मीं क्याथोलिक पक्षाची मनधरणी कधींहि करणार नाहीं!' असे उद्गार काढले होते. पण ते उद्गार विसरून पोपशीं सलोखा ठेवणें जर्मन साम्राज्यशक्तिस आज अधिक उचित वाटलें. 'वारांगनेव नृपतिनीतिरनेकरूपा!'

धर्मगुरु दहावे लिओ, सर्व खिस्त्यांचे धर्मगुरु, रोमचे बिशप, सेन्ट पिटरच्या गादीचे मालक आणि दुसरे वुइलियम प्रशियाचे राजे आणि जर्मनीचे शहानशहा यांची खासगी भेट झाली. धर्मगुरूंच्या पाठबळाचें महत्त्व काय आहे, ही गोष्ट केसरच्या ध्यानीं आगाऊच आली होती. या भेटींत परस्परांनीं परस्परांचा स्नेहसंबंध उत्कृष्ट राखण्याचीं वचनें परस्परांस दिलीं.

* * *

धुडुम! धुडुम!! धुडुम!!!

तुर्कीच्या आरमारी जहाजांतून सलामीच्या तोफा सुटूं लागल्या. बादशाही नौका होहेनझोलार्न सलाम्या घेत घेत पुढें जात होती. अखेरीस एका ठिकाणीं तिनें नांगर टाकला. इतक्यांत एक सुंदर नौका होहेनझोलार्नकडे येऊं लागली. शुभ्र पोषाक केलेले व फेज टोप्या घातलेले अठेचाळीस घष्टपुष्ट खलाशी ही नौका वल्हवीत होते. या नौकेंतून तुर्कस्थानचे सुलतान व महंमदानुयायांचे अधिपति पादशहा अबदुल हमीद हे प्रशियाचे राजे व जर्मनीचे बादशहा दुसरे वुइलियम यांच्या भेटीसाठीं जात होते.

सुलतानची नौका जवळ आली, तेव्हां होहेनझोलार्न मधून सलामीच्या तोफा कडकडल्या. सुलतान आपल्या मुख्य वजिरासह होहेनझोलार्न-

वर चढले. त्या ठिकाणीं जर्मन बादशहा व त्यांचे मानकरी हे सुलतातचें स्वागत करण्यासाठीं उभे होते.

ही भेट मोठी अपूर्व होती. राजकारणाशीं संबंध नसलेल्या एकाद्या त्रयस्थ निरीक्षकाला हा प्रसंग केवळ अभ्यासाच्या दृष्टीनेंहि मोठा लोकोत्तर वाटला असता, यांत संशय नाहीं. एका बाजूला जर्मन आरमारांतील उंच, धिप्पाड आणि निवडक खलाशी दिसत होते. त्यांचा पोषाक अगदीं साधा; पण स्वच्छ आणि नीटनेटका होता. दुसऱ्या बाजूला पौर्वात्य खलाशी दिसत होते. यांच्या बांध्यांत प्रमाण म्हणून कसलेंच दिसत नव्हतें. ठेंगणे, बांध्यानें बोजड, लठ्ठ पोटाचे व आजाऱ्यासारखे दिसणारे असे हे दुसरे खलाशी होते. त्यांच्या पोषाखांत इद्रधनुष्यांतील सारे रंग दिसत होते आणि हे रंग झांकून टाकण्याकरितां सोनेरी कलाबतूचा मनमुराद उपयोग करण्यांत आला होता. हे खलाशी जणूं काय आपापल्या राष्ट्राची स्थितीच दर्शवीत होते. जर्मन खलाशांच्या देखाव्या-बरून तें राष्ट्र जिवट व उदयोन्मुख आहे, हे कोणाच्याहि लक्षांत आले असतें. उलटपक्षीं तुर्की खलाशांकडे पाहून त्यांच्या राष्ट्राचा कमजोरपणा व निद्राप्रियता हीं कोणाच्याहि लक्षांत आलीं असतीं.

हे दोन बादशहा एकमेकांस भेटले. दुसऱ्या वुइलियम बादशहानें ॲडमिरलच्या हुद्याचा पोषाक केला होता. त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या मानसिक स्थितीचा ठसा पूर्णपणें उमटला होता. भविष्यत् काळाकडे दुसऱ्या वुइलियमची नजर पूर्ण आशेनें पहात आहे, असें उघड दिसत होतें. सुल-तान अबदुल हमीद हे नुकतेच झोंपेंतून उठल्यासारखे दिसत होते. आपली झोंपमोड झाल्याचें त्यांस जणूं काय वाईट वाटत होतें. आपलें निद्रापद स्वीकारण्याची इच्छा त्यांच्या चेहऱ्यावर व्यक्त होत होती. ही भेट संपल्याबरोबर होहेनझोलार्न बरोबरच्या छोट्या राजनौकेंत सर्व मंडळी बसली व ती नौका सुवर्णशृंगाकडे—गोल्डनहार्नकडे गेली. सुवर्णशृंगावर या मंडळीचें स्वागत करण्यासाठीं लक्षावधि जनसमूह जमला होता.

राजवाड्यांतील बडी मेजवानी आटोपल्यानंतर जर्मनीची महाराणी व तिच्या तैनातींतील मंडळी आपल्या नौकेवर परत आली. थोड्या वेळानें

बादशहा व सुलतान हे मुख्य मशिदीकडे गेले. या वेळीं हे दोघे राजपुरुष शुभ्र अरबी घोड्यांवर बसले होते. जर्मन बादशहानें तुर्की सेनापतीचा पोषाख केलेला असून डोक्याला लाल फेज टोपी घातली होती. रस्त्यानें लक्षावधि लोक स्वागत करण्यास उभे होते. ही स्वारी मशिदीच्या पुढें थांबली. मशिदींतून प्रचंड घंटेचा नाद व त्याबरोबर 'अल्ला–इल–अल्ला-सेफका–इल–महंमद' असा प्रचंड ध्वनि बाहेर येत होता. क्षणार्धांत ही गडबड बंद झाली व तो सारा प्रचंड जनसमूह मक्केकडे तोंड करून गुडघे टेंकून बसला.

मशिदीच्या द्वाराशीं शेख–उल–इस्लाम याने जर्मन बादशहांचें स्वागत केलें. आपल्या बुटावर सपाता घालून बादशहांची स्वारी मशिदींत शिरली. कांहीं शतकापूर्वी याच बादशहांच्या पूर्वजांनीं तुर्की अर्धचंद्राला युरोपांतून अर्धचंद्र देण्यासाठीं आपले देह धारातीर्थीं अर्पण केले होते! आणि आजचा हा देखावा त्याच्या अगदीं उलट होता. सर्व इस्लामाचे मुख्य सुलतान आणि एक ख्रिती बादशहा हे हातांत हात घालून महंमदीयांच्या अत्यंत पवित्र मशिदींत प्रवेश करीत होते! मशिदींतून जर्मन बादशहा बाहेर पडले, त्या वेळीं मुख्य शेखनें हाजीची निशाणी त्यांस नजर केली. ज्यांनीं मक्केची महायात्रा केली असेल, त्यांसच ही 'हाजी' पदाची खूण मिळत असते. अशा रीतीनें जर्मन बादशहा महमदीयांतील हाजी बनल्यामुळें तुर्कांत त्यांचें विलक्षण वजन वाढलें, यांत नवल नाहीं. सांप्रतच्या केसरनीं महंमदी धर्माचा स्वीकार केला आहे, असा समज तुर्की सैन्यांत जिकडे तिकडे पसरला आहे. तुर्की सैन्यांत अद्यापिहि धर्मवेड्यांचा भरणा फार असल्यामुळे परकीय अंमलदारांच्या हाताखालीं रहावयास ते फारसे उत्सुक नसावयाचे; पण वरील समाजामुळें जर्मन अम्मलदारांचा उर्मटपणा सुद्धां ते निमुटपणें सहन करतात.

दुसऱ्या वुइलियम बादशहांच्या या स्वारीसंबंधीं साऱ्या युरोपभर पुष्कळ प्रतिकूळ टीका झाल्या; तथापि यांत बादशहांचा फार खोल असा राजकीय हेतु असून तो त्यांनीं मोठ्या शिताफीनें सिद्धीस नेला, यांत शंका नाहीं. ही भेट होण्यापूर्वी तुर्कस्थानांत फ्रान्सचें वजन अगदीं अबाधितपणें

वाढत होतें. केवळ तुर्कस्थानच नव्हे, तर जगांतील सारीं महंमदी राष्ट्रें फ्रान्साला आपला रक्षण कर्ता असें समजत होतीं; पण या भेटीनंतर फ्रान्सच्या वजनास एकदम उतरती कळा लागली आणि मुसलमानी राष्ट्रांचें पितृपद जर्मनीला प्राप्त झालें. या भेटीमुळें मुसलमानी राष्ट्रें आणि जर्मन साम्राज्य यांचे हितसंबंध सलोख्याचे झाले. यानंतर लवकरच जर्मनींतून सुमारें तीस कोट रुपयांची युद्ध सामुग्री तुर्कस्थाननें खरेदी केली. तुर्की सैन्य जर्मन लष्करी अम्मलदारांच्या हाताखालीं तयार होऊं लागलें व सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही, कीं, या वेळीं जर्मनीला बगदाद रेलवेचा परवाना मिळाला. जर्मन व्यापाराचे प्रमुख एजंट खुद्द जर्मन बादशहाच आहेत, असें कोणी म्हणतात, त्यांत पुष्कळ तथ्य आहे.

* * *

१९१० सालच्या आक्टोबर महिन्याची सातवी तारीख. चंद्राभोंवतीं हिरवट पिंवळ्या रंगाचें खळें पडलें होतें. मधून मधून काळेकुट्ट ढगहि इकडून तिकडे हिंडत होते. स्वाइनमुंडहून स्टेटीन बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यावर आज नेहमींपेक्षां दुप्पट पहारा ठेवला होता. या रस्त्यावर कोणासहि जाण्याची आज मनाई होती. इतक्यांत एक मोटारगाडी स्वाइनमुंडहून मोठ्या त्वरेनें येत होती. त्या गाडींत पांच स्वाऱ्या बसल्या होत्या. रस्त्यावरच्या पहारेकऱ्यानें चट्कन् उडी मारून गाडी थांबविण्याबद्दल सुचविलें. गाडीच्या पुढच्या जागीं बसलेल्या मनुष्यानें एक शब्द उच्चारतांच पहारेकरी चपापून एकदम मागें गेला आणि गाडी सपाट्यानें पुढें चालू झाली. समुद्राच्याकांठीं असलेल्या एका उंच इमारतीजवळ ही गाडी उभी राहिली. हीं पांच मनुष्यें त्या इमारतीच्या आंत मोठ्या आतुरतेनें डोकावून पाहू लागलीं. आंतील बाजूस एक चांदीसारखा चकाकणारा व माशाच्या आकाराचा प्रचंड पदार्थ दिसत होता.

एकादा प्रचंड देवमासा हवेंत तरंगावा, त्याप्रमाणें हा चकचकीत पदार्थ सहा फूट उंचीवर तरंगतांना दिसत होता. वर सांगितलेल्या गाडींतून दोन तरुण गृहस्थ बाहेर पडले व या राक्षसी पदार्थाकडे चालत गेले आणि त्या माशाच्या पोटांतून बाहेर लोंबत असलेल्या लोखंडी शिडीनें

वर जाऊन त्याच्या पोटांत जणूं काय गडप झाले. गाडींतील बाकीचे उतारू ही सर्व कृति लक्षपूर्वक पहात होते. इतक्यांत एक मृदुध्वनि होण्यास सुरुवात झाली आणि तो राक्षसी मासा आपलें नाक वर करून आकाशांत चढूं लागला व चढतां चढतां अखेरीस तो दिसेनासा झाला. गाडींतील दोन मनुष्यांनीं हें सर्व कृत्य निमुटपणें पाहिलें. तो राक्षसी मासा दिसेनासा झाल्यानंतर या दोहोंपैकीं एक गृहस्थ उठून उभा राहिला आणि लष्करी थाटाचा सलाम करून म्हणाला, " सरकार, माझें वचन मीं आज पुरें केलें. "

बादशहांची नजर अद्यापि आकाशाकडेच लागलेली होती. त्या सलाम करणाऱ्या व्यक्तीचा हात आपल्या हातांत घेऊन बादशहा म्हणाले, " सरदारसाहेब, पितृभूमि तुमची सदैव ऋणी राहील. "

अशा रीतीनें हवेंतील पहिल्या बेडर जहाजांच्या उड्डाणाचें निरीक्षण दुसरे वुइलियम व ग्राफ (कौंट) फॉं झेपेलिन यांनीं केले.

तें प्रचंड झेपेलिन आपला आकाशमार्ग मोठ्या सपाट्यानें आक्रमण करीत होतें. त्याची गति अत्यंत त्वरेची असतांहि आंतील मनुष्यांस ती विशेषशी समजूनहि आली नाहीं. या आकाशी जहाजांचा सुकाण्या पुढील भागीं असलेल्या आपल्या जागेंत बसला होता. वर सांगितलेल्या गाडींतून उतरलेल्या प्रवाशांपैकीं एक प्रवाशी सुकाण्याजवळ गेला व त्याशीं कांहीं गप्पा मारूं लागला. जहाजांतील चालक यंत्रें इतक्या शांतपणें चाललीं होतीं कीं, आंतील मंडळीस परस्परांच्या संभाषणावांचून दुसरा कोणताहि ध्वनि ऐकूं येत नव्हता. तीन हजार फूट उंचीवरून जमीन आणि पाणी हे भाग स्पष्ट दिसत होते. बाल्टिक समुद्राचा किनारा रुप्याच्या पत्र्याप्रमाणें चमकत होता. आतां खालीं सर्वत्र सपाटी दिसूं लागली. भूमीचे कोणत्याहि प्रकारचे उच्च नीच भाग खालीं दिसत नव्हते. मधून मधून समुद्रावर पडलेला चंद्राचा प्रकाश परावर्तित होऊन दिसत होता. जहाज सपाट्यानें पुढें चाललेंच होतें.

स्वीडनचा किनारा यावयास अद्यापि दोन तासांचा अवकाश असल्यामुळें ' सर्व जहाज पहावयास चला ! ' असें कप्तानसाहेब म्हणाले. त्यांच्या

म्हणण्यास रुकार देऊन आंतील सर्व पाहुणे मंडळी कप्तानाबरोबर त्याच्या खोलींतून बाहेर पडली. खोलीच्या बाहेरील जिना उतरल्यांबरोबर एक सुंदर भोजनगृह दिसलें. थोडेंसें पुढें गेल्यावर कप्तानसाहेबांनीं एका खोलीचा दरवाजा उघडून पाहुणे मंडळीस त्या खोलींत नेलें. ही खोली अर्धचंद्राकार होती. या खोलीचा उपयोग हवेंतील टारपेडो सोडण्याकडे केलेला होता. अशा प्रकारच्या आगमासे सोडणाऱ्या खोल्या दोन असून प्रत्येकींत पन्नास पन्नास पौंड वजनाचे सहा सहा आगमासे असतात. अर्थातच सध्यां या खोल्या रिकाम्या होत्या. यानंतर सर्व मंडळी इंजिनच्या खोलींत गेली. येथें दोनशें हॉर्सपावरचें डीझल इंजिन चालू होतें. व त्याच्यायोगें जहाजाला गति देणारे दोन पंखे झपाट्यानें चालले होते. इंजिन इतक्या सपाट्यानें चाललें होतें, तरी तेथें कसलाहि आवाज किंवा गडबड होत नव्हती. या खोलीला जोडूनच एक विद्युत्गृह असून तेथे विद्युत् उत्पादक यंत्रें व संदेश यंत्रें ठेवलेली होतीं. एकंदरींत योजकाची चतुरता सर्वत्र एकसारखीच व्यक्त होत होती.

जहाजावर बारा खलाशी व अडीच टन इतर वजन इतक्यांचा समावेश होण्यासारखा होता. विद्युत् गृहांतून बाहेर पडून ही सर्व मंडळी एका लोखंडी जिन्यानें वर गेली. या जागीं ग्यासच्या पिशव्या ठेवलेल्या होत्या. जहाजाच्या प्रत्येक बाजूस बारा व आगेमागें एकेक याप्रमाणें एकंदर सव्वीस पिशव्या होत्या. जवळच लहान लहान नळकांडीं पडली होतीं. 'हीं नळकांडीं कशाचीं ?' असा प्रश्न करतांच कप्तानसाहेब म्हणाले, "यांत झेपेलिनची उड्डाण करण्याची शक्ति भरलेली आहे." यापुढें आणखी एक जिना लागला. यानें वर जाऊन ही सर्व मंडळी जहाजाच्या अगदीं शिखरावरच्या भागास पोहोंचली. जहाजाच्या पुढच्या व मागच्या टोंकास तोफांच्या बैठकी जोडलेल्या असून त्यांत वाटेल तेव्हां जलदबारी तोफा बसविण्याची योजना केली होती. तसेंच या वरच्या भागांत दोन प्रचंड शोधक बत्त्याहि बसविल्या होत्या.

इतक्यांत एका खलाशानें कप्तानसाहेबांस, 'स्वीडनचा किनारा दिसूं लागला' म्हणून सांगितलें. सर्व मंडळी पुन्हा कप्तानसाहेबांच्या खोलींत

येऊन खिडकींतून समोर पाहूं लागली; तेव्हां भूभागाची कृष्णवर्ण रेषा दिसूं लागली. या वेळीं जहाज तीन हजार फूट उंचीवर आहे, असें पाहून तें चार हजार फुटांवर नेण्यास हुकूम दिला. जहाजाच्या सुकाण्यानें काहीं दांडे हालविल्याबरोबर जहाजांचें नाक वर होऊं लागलें आणि पुनः थोड्या वेळानें सर्व जहाज समांतर रेषेंत आलें. आतां आजूबाजूस सर्वत्र ढग दिसत होते. इतक्यांत कप्तानसाहेब ह्मणाले, 'स्वीडनच्या कोणाहि माणसानें हें जहाज पहावें अशी आमची इच्छा नाहीं."

आतां जहाज स्वीडनबोर्गवर पोहोंचलें. स्वाइनमुंडपासून जहाजाने सुमारें सव्वातीनशें मैलांचा प्रवास केला. तेथून पुढें 'उपसाला' शहरावर जाऊन नंतर तें परत घरीं येण्यास निघालें.

या जहाजानें एकंदर अठरा तास प्रवास करूत सुमारें साडे आठशें मैलांचें आक्रमण केलें. जहाज परत आलें, त्या वेळींहि मोटारगाडींत मागें राहिलेल्या त्या दोन व्यक्ति त्या जहाजाचें स्वागत करण्यास हजर होत्या. जहाज किनाऱ्यावर उतरल्याबरोबर आंतील सर्व मंडळी मोटारगाडीनें कोणीकडे निघून गेली. मोटारगाडींतल्या मुख्य गृहस्थाच्या हुकुमावरून जहाजाखालीं कांहीं दारूचे भोत ठेवून त्यांस बत्ती देण्यांत आली. त्याबरोबर प्रचंड आवाज होऊन सर्व जहाजाचा चक्काचूर झाला. जहाजाचे जे यांत्रिक भाग अद्यापीहि चांगल्या स्थितींत होते, ते वाफेच्या घणानें फोडण्यांत आले. नंतर या सर्व तुकड्यांच्या ढिगाला जलसमाधि देण्यांत आली.

दुसऱ्या दिवशीं सर्व वर्तमानपत्रांनीं असा एकच कोलाहल करून दिला कीं, नवें X झेपेलियन अपेशी ठरून त्याचा भडका झाला.

हें जहाज फोडून टाकल्यानंतर सांप्रतचें युद्ध सुरू होईपर्यंत त्याचे वेगळे वेगळे भाग तयार करून त्यांचा संग्रह करण्यांत आला होता; पण शांततेच्या वेळीं ते केव्हांहि जोडले गेले नाहींत. शांततेच्या वेळीं एकहि लष्करी झेपेलिन अस्तित्वांत नव्हतें. युद्धसाहित्यविषयक आपलीं रहस्यें जर्मनी कशीं गुप्त ठेवतो, याचा हा एक मासला आहे.

* * *

आज एसेन येथील क्रप्च्या कारखान्याची पहाणी व्हावयाची होती.

खुद्द बादशहा अथवा युवराज वर्षांतून दोन वेळ आपल्या राज्यांतील दारूच्या कोठारांची व कारखान्यांची पहाणी करीत असतात. या साऱ्या कारखान्यांत एसेन येथील क्रुपचा कारखाना प्रमुख आहे. हा धंदा बाह्यतः खाजगी म्हणविला जातो; तथापि वस्तुतः त्याजवर सरकारची सक्त देखरेख असते. फ्रँको प्रशियन युद्धानंतर या कारखान्यास जर्मन सरकाराकडून पैशाची मदत मिळण्यास सुरुवात झाली आणि फ्रेड्रीक क्रुप हे मरण पावल्याचा पुकारा झाल्यानंतर हा कारखाना पूर्णपणे सरकारच्या ताब्यात गेला.

फ्रेड्रीक क्रुप हे खरोखरच मरण पावले, असा पुरावा केव्हांच पुढें आलेला नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी फ्रेड्रीक क्रुप यांचे एका फ्रेंच स्त्रीवर प्रेम जडलें. ही स्त्री एका मोठ्या फ्रेंच अम्मलदाराची नातेवाईक होती. पुढें लवकरच क्रुप यांस कांहीं असाध्य रोगांनीं पछाडलें. विशेष महत्त्वाचे लोक आणि ज्यांचेपाशीं राजकीय रहस्यांचा संग्रह आहे, अशा जर्मनांचें प्रेम एकाद्या फ्रेंच स्त्रीवर जडल्यास त्याबरोबरच त्यांना एकादा असाध्य रोगहि जडावयाचा, असा अनुभव जर्मनींत वारंवार आलेला आहे. फ्रेड्रीक क्रुप यांची खरोखर काय वाट लागली, हें निश्चितपणें कोणासहि ठाऊक नाहीं.

बादशहांची स्वारी कारखान्यांत गेल्याबरोबर तेथील अधिकाऱ्यांनीं त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत केलें. बादशहांनीं सर्व कारखाना पाहिला. विशेषतः तोफखान्याच्या भागांतील प्रत्येक कृति त्यांनीं फारच सूक्ष्म रीतीनें पाहिली. सर्व मंडळी जातां जातां एका लांबच लांब बांधलेल्या सोप्यापर्यंत आली. खुद्द बादशहा, यांचे मुख्य सेनानायक, कारखान्याचा मालक आणि त्याचा इंजिनियर इतक्या इसमांनींच या दालनांत प्रवेश केला. बाकी सर्व मागें राहिले. या दालनांत विशेष पाहण्यासारखें असें कांहीं दिसत नव्हतें. फक्त पोलादाचे ५०।६० प्रचंड ठोकळे मात्र येथें पडले होते. हे ठोकळे ज्या भांड्यांत ठेवले होते, त्यांतून सल्फुरिक असीडचा धूर निघत होता. हे ठोकळे स्वच्छ करण्याच्या कामावर सहा माणसें लाविलीं होतीं. ते ठोकळे घासून घासून त्या माणसांनीं आरशासारखे स्वच्छ केले होते.

या ठोकळ्यांचा उपयोग काय, याबद्दल तेथील कामकऱ्यांत कित्येक दिवस मोठी चर्चा माजून राहिली होती. हे सर्व ठोकळे बादशहांनीं व त्यांच्या सेनापतींनीं फार लक्षपूर्वक पाहिले. कारखान्यांतील मुख्य इंजिनिअर बादशहांच्या कानांत कांहीं कुजबुजला, तेव्हां बादशहांच्या चेहऱ्यावर मृदु स्मिताची एक लकेर झळकूं लागली.

युरोपच्या या कार्तिकस्वामीला सतोष झाला, यांत कांहीं नवल नाहीं. कारण, अगदीं थण्ड पडून राहिलेल्या आणि निरुपद्रवी दिसणाऱ्या या लोखण्डी ठोकळ्यांच्या पोटांतून सत्रा इंची तोफा पुढे लवकरच बाहेर पडल्या. सांप्रतच्या युद्धांत सुप्रसिद्ध किल्ले कोटांचीहि धुळधाण या तोफांनीं कशी उडविली, हें आतां सर्वांस ठाऊक झालें आहे.

शांततेच्या वेळीं यांपैकीं एकहि तोफ अस्तित्वांत नव्हती. भिंतीला सुद्धां कान असतात, ही म्हण जर्मनीनें पुरी पाठ करून ठेवली आहे.

* * *

कील येथील सरकारी गोदींत आज मोठी गडबड सुरू होती. केसरचे बंधु आणि बादशाही आरमाराचे ग्रॉस ॲडमिरल, प्रशियाचे प्रिन्स हेनरी, आरमारी प्रधान ॲडमिरल टिरपिट्झ आणि ॲडमिरल कोस्टर इतक्यांच्या स्वाऱ्या कील येथें पाहणी करण्यासाठीं आज आल्या होत्या. सर्व गोदीभर फिरून त्यांनीं प्रत्येक वस्तूची काळजीपूर्वक पाहणी केली. थोड्या वेळानें तेथून बाहेर पडून ही मंडळी एका खडकाळ बेटाकडे रवाना झाली. हें बेट श्ले नांवाच्या उपसागराच्या तोंडाशीं आहे. बेटांतील एका निरुंद आणि खडकाळ अशा भागीं असलेल्या एका तरत्या गोदीजवळ या मंडळीची बोट उभी राहिली.

या ठिकाणीं धूसर पोषाक केलेले कांहीं लोक एक बोट बांधण्याचें काम करीत होते. या बोटीचा आकार प्रथमावस्थेंतल्या लांबट बेडकाप्रमाणें दिसत होता. या बोटीवर काम करणारीं सर्व माणसें जन्मठेपेचे कैदी होतीं. कांहीं गुप्त कामें करण्याकरतां या माणसांचा उपयोग जर्मनी करून घेत असतो. या लोकांना फारच चांगल्या प्रकारें वागविलें जातें; परंतु त्यांस पुन्हां स्वातंत्र्य मात्र मिळत नाहीं.

पाहणी करण्यास आलेली मंडळी एका मोठ्या माशाच्या आकाराच्या बोटींत शिरली. मंडळी आंत गेल्याबरोबर या माशानें एकदम बुडी मारली. तीन तासांनंतर ही पाणबुडी पुन्हा आपल्या जागीं परत आली. मंडळी बाहेर पडली, तेव्हां त्यांचे चेहरे आनंदानें फुललेले दिसत होते. यावरून पाणबुडीच्या कर्तबगारीबद्दल त्यांची खात्री झाली होती, असें दिसतें. यांपैकीं एक गृहस्थ हळूच पुटपुटला "चार हजार मैलांचा प्रवास करील." या बोटींत दोन हजार हॉर्सपावरचें ऑईल एंजीन व नऊशें हॉर्सपावरचें विजेचें मोटार एंजिन बसविलीं होतीं. १९१२ सालापर्यंत बांधलेल्या जर्मन पानबुडींत मोठी चालक शक्ति फक्त साडे सहाशें हॉर्स-पावराची होती व प्रवासाचा परिघ दोन हजार मैलांचा होता. पाण्या-खालून चालणाऱ्या बोटींत याहून अधिक सामर्थ्य एकवटणें शक्य नाहीं, असा इतर राष्ट्रांतील सर्व नाविकांचा समज झाला होता; पण जर्मनीनें मात्र या समजास जागा दिली नाहीं. नव्या नव्या पद्धतीचे बांधणीचे प्रकार अजमावून पाहण्याचें काम जर्मनींत चालूच होते. या नव्या पाणबुडीला तीन परिवीक्षण नळया लावलेल्या होत्या. यांशिवाय पाहणी करण्याच्या जागीं एक विशेष प्रकारचें यंत्र लावलेलें होतें. संधि प्रकाशासारख्या कमी प्रकाशाच्या वेळींहि लांबवर वस्तु नजरेस याव्या अशी योजना या यंत्रांत केली होती. यामुळें कमी प्रकाशानें होणारा त्रास वांचला जाऊन जर्मन पाणबुडीला वाटेल त्या वेळीं हल्ला करण्याचें साधन उपलब्ध झालें. या नव्या पाणबुडींत आगमासे भरण्याच्या आठ जागा केल्या होत्या, हा दुसरा विशेष. याशिवाय हींत चौदापौंडी दोन जलदबारी तोफा व एक पौंडी दोन आकाशी तोफा बसविण्यांत आल्या होत्या. अम्मलदारांसुद्धां हींत ३५ खलाशी असतात.

लष्करी झेपेलिन ज्याप्रमाणें फोडून टाकण्यांत आलें, त्याचप्रमाणें ही सवाई पाणबुडीहि ताबडतोब फोडून टाकण्यांत आली. ही नवी पाणबुडी आपल्या ठाण्याबाहेर १५ दिवस एकसारखी राहूं शकते. अर्थातच ती एकसारखी चालू असते असें नाहीं. यानंतर या सवाई पाणबुडीचे निरनिराळे भाग तयार करण्याचें काम मात्र अखंड सुरू होतें.

इंग्लंडांत शिकारीचा मोसम पूर्ण भरास आला होता. एका बड्या सरदारसाहेबांच्या घरीं इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांतून शिकारी लोक रोज येत होते. सदोदित सुप्त असें भासणारें तें रेलवे स्टेशन आणि तें खेडें माणसांनीं गजबजून गेलें होतें.

इंग्रज लोकांस शिकार फार प्रिय आहे. शिवाय या मर्दानी खेळामुळें ब्रिटनमधील सरदार घराण्यांतील लोकांना एकत्र जमण्याचा प्रसंग येत असतो. यामुळें शिकारीचे प्रसंग तिकडे वारंवार येत असतात. या प्रसंगीं सारी मंडळी एकमेकांशीं अगदीं मोकळ्या मनानें वागत असत. या वेळीं आपला आणि परका अथवा लहान आणि मोठा हा भेदसुद्धां फारसा पाळला जात नाहीं. एकादा परदेशस्थ माणूस खंदा स्वार असला आणि त्याची निशाणबाजी चांगली असली, तर बडे बडे सरदारहि त्याच्या गळ्यास मिठी मारण्यास कमी करणार नाहींत. कोणी मनुष्य पट्टीचा विद्वान् असला, अथवा मोठा शास्त्री अथवा पंडित असला किंवा पुष्कळ श्रीमंत असला, तरी त्याजबद्दल इंग्रजांना फारसें कौतुक वाटावयाचें नाहीं; पण क्रिकेट किंवा शिकार यांसारख्या मर्दानी खेळांत जो प्रवीण असेल, त्याची जातगोत न पाहतांहि ते त्याशीं मैत्री संपादन करतात. अशाच एका शिकारीच्या प्रसगीं एक जर्मन घोडदळांतील अम्मलदार एका इंग्रज सरदाराच्या घरीं पाहुणचारासाठीं गेला.

हा अम्मलदार शरीरयष्टीनें उंच आणि दिसण्यांत फार रुबाबदार होता. सरदारसाहेबांच्या मित्रमंडळांत लवकरच त्यानें आपला चांगला जम बसविला.

अगदीं शांतपणें आणि कोणाच्याहि लक्षांत येऊं न देतां सहज बोलण्याच्या ओघांत जर्मनसरकाराला उपयुक्त होईल, अशी माहिती तो मिळवूं लागला. आपल्या या नव्या मित्रमंडळींत विशेष उपयोगी पडणारीं स्त्री-पुरुषें कोण आहेत, याचा शोध तो करूं लागला. आपल्या स्नेहीमंडळीच्या चालचालणुकीवर तो बारीक नजर ठेऊं लागला. इंग्लंडांत ब्रिज नांवाच्या पत्त्याचें खेळाचें व्यसन श्रीमंत घराण्यांत अतिशय बोकाळलें आहे. या खेळाच्या पायीं मोठमोठ्या सरदारांच्या स्त्रिया आणि पुरुष हीं

धुळीस मिळालीं आहेत. आपला जर्मन अम्मलदार त्यांजबरोबर स्वतः कधीं खेळत नसे; पण त्यांपैकीं प्रत्येकानें किती किती रकमेच्या हुंड्या कोणास लिहून दिल्या आहेत, याची माहिती मात्र त्यानें पुरी मिळविली आणि हा धागा हातीं धरून आपलें सूक्ष्म जाळें विणण्यास त्यानें आरंभ केला. एकादे दिवशीं एकाद्या पोकळ झालेल्या सरदाराकडे एकाद्या मारवाडीबाण्याचा गृहस्थ हळूच यावयाचा आणि हुंडी पुढें करून पैशाचा तगादा करावयाचा. सरदारांचा खिसा रिकामा असल्यामुळें हुंडीची भरपायी करण्याचा एकादा वाममार्ग शोधणें त्यास भाग पडावयाचें. तवा इतका खरपूस तापला, कीं, या जर्मन अम्मलदाराची पोळी त्यावर पडलीच.

ब्रिटिशराज्याला आंतून पोखरणारे हे भुगे आंत सोडण्याचें काम मुख्यतः बर्लिन येथील हेरखातें करतें; तथापि जर्मन वकिलातीला या गोष्टी अगदींच अज्ञात असतात असें नाहीं. एके वेळीं, एक नामधारी कौंटेस लडन येथील बड्या घराण्यांत फार प्रसिद्धीस आली होती. कांहीं दिवसांनीं लंडन येथील पोलिस म्याजिस्ट्रेटसमोर कौंटेसच्या भ्रमाचा भोपळा फुटला. या बाईबद्दल माहिती विचारतां जर्मन वकिलातीनें अर्थातच कानावर हात ठेवले. पण खुद्द वकीलसाहेब आणि या नामधारी कौंटेस अनेक मेजवान्यांच्या प्रसंगीं एकमेकांशीं संभाषण करीत असत, हें अनेकांनीं पाहिलें आहे.

कित्येक वेळां केसरची स्वारी इंग्लंडला गेली असतां, आपणाबरोबर कांहीं लोक मुद्दाम घेऊन जात असत. एके वेळीं व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूच्या आधीं केसरची स्वारी इंग्लंडास गेली होती, त्यावेळीं प्रिन्स ऑफ वेल्स (एडवर्ड बादशहा) यांनीं आपल्या भाच्यास पुढील निरोप पाठविला होता. " आमच्या मातुःश्रीची प्रकृति बरीच नादुरुस्त असल्यामुळें तिजकडून योग्य तऱ्हेचा आदरसत्कार कदाचित् होणार नाहीं; तथापि माझ्याकडून बनेल तेवढा करीन. आतां एक विशेष सूचना इतकीच करावयाची कीं, येतांना ॲडमिरल फॉ सेडन बिट्रियन यांस मात्र बरोबर आणूं नये. "

या ॲडमिरलनें एके प्रसगीं प्रिन्सला कर्मीपणा आणणारें भाषण केलें

होतें. केसरची स्वारी इंग्लंडांत आली, तेव्हां ॲडमिरलसाहेब सर्वांच्या पुढें चालत असतांना आढळले. त्या वेळीं केसरनीं बरोबर इतकीं माणसें आणलीं होतीं, कीं, त्या सर्वांची सोय वुइंडसर राजवाड्यांत लावण्यासारखें नव्हतें. यामुळें त्यांतील पुष्कळांची सोय निरनिराळ्या जागी लावावी लागली. केसरबरोबरच्या सर्व माणसांना निरीक्षण शास्त्राचे धडे मिळालेले असतात, हें सांगावयास नकोच. या वेळीं अनेक माणसांनीं ज्या अनेक गमती केल्या, त्या सर्व सांगावयाचें म्हटलें, तर एक महाभारतच होईल; पण मासल्यासाठीं एकच गोष्ट सांगतों.

एका सरदारसाहेबांनीं समुद्रप्रवासाचा बूट काढला. लंडनमधून निघून स्काटलंडच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत गमतीनें प्रवास करावयाचा बेत त्यांनी ठरविला. या प्रसंगीं आपल्या अनेक ओळखीच्या स्त्री-पुरुषांस त्यानें पाचारण केलें. या मंडळींत इंग्लंडांतील नामांकित स्त्रिया आणि पुरुष व कित्येक लष्करी आणि आरमारी कामदारहि होते. एक मोठी आगबोट भाड्यानें ठरविली होती. या आगबोटीवर सर्व प्रकारच्या खेळांची योजना करण्यांत आली होती. एकंदरीनें हा प्रवास मोठ्या मौजेचा होईल, याबद्दल कोणासहि शंका नसल्यामुळें सर्व मंडळी आनंदांत गर्क होती. पुष्कळ मंडळींनीं आपलीं फोटोग्राफीचीं उपकरणेंहि बरोबर घेतलीं होतीं. आमच्या जर्मन सरदारसाहेबांनीं फोटोग्राफीवर अशा सुंदर गप्पा मारल्या कीं, त्यांची सर्व श्रोते मंडळी आपल्या फोटोग्राफीच्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्यास विलक्षण उत्सुक झाली. दुसऱ्याच दिवसापासून किनाऱ्याचे फोटो भराभर बाहेर पडूं लागले. अशा रीतीनें वेगवेगळ्या भागांचा फोटोच एक प्रचंड ढीग जर्मन सरदारसाहेबांजवळ जमला. सांप्रत हे सर्व फोटो नंबरवारीनें एका पुढें एक असे बर्लिन येथील आरमारी खात्याच्या फडणिशींत लागले असून इंग्लंडच्या साऱ्या दक्षिणोत्तर किनाऱ्याचे प्रत्यक्ष प्रदर्शन करीत आहेत.

* * *

इंग्लंड युद्धांत पडलें, तर आपणास तें जड गेल्यावांचून राहणार नाहीं हें लक्षांत आणून जर्मनीच्या जनरल स्टाफनें आपल्या तयारींत कोणतीहि

उणीव राहूं न देण्याची खटपट चालविली होती. इंग्लंडची तंगडी मोडण्याकरितां दोन गोष्टी करणें अवश्य होतें. एक इंग्लंडवर स्वारी करणें अथवा तें न साधल्यास हवेंतून जमिनीवर हल्ले करणें आणि पाण्यांतून इंग्लंडचा अन्नाचा पुरवठा तोडण्याचा यत्न करणें. आरमारी जहाजांची संख्या वाढवून इंग्लंडबरोबर आपला निभाव लागणार नाहीं, ही गोष्ट जर्मनीच्या लक्षांत पूर्णपणें येऊन चुकली होती. आपलें आरमार इंग्लडच्या आरमाराच्या बरोबरीचें करण्याचा यत्न जर्मनीनें चालविला होता, पण जर्मनीच्या एका जहाजास दोन जहाजें बांधण्याचा उपक्रम इंग्लंडनें सुरू केल्यामुळें जर्मनी या शर्यतींत मागें पडला. या बाजूनें निराशा झाल्यानंतर त्यानें आपला मोर्चा दुसरीकडे वळविला. झेपेलिन, डीझल आणि सायमनलेक यांच्या युक्त्यांनीं जर्मनीचा हा दुसरा प्रयत्न बराच यशस्वी झाला.

आटो डीझल यानें एक नवें इंजिन बनविलें आहे. हें इंजिन जर्मन सरकाराकडे आल्याबरोबर त्यानें तें विकत घेतलें. याबद्दल डीझल याला साडेसात लक्ष रुपये रोख व वीस हजारांचें वर्षासन मिळालें. एवढें द्रव्य अचानकपणें खिशांत पडल्यावर डीझलच्या तोंडास अधिक पाणी सुटलें. हें आपलें इंजिन घेऊन इंग्लंडांत जाण्याचा विचार त्यानें केला पण ही गोष्ट जर्मन सरकारास समजली. थोड्या दिवसांनीं हंबर्गहून एडिंबरोला जाणाऱ्या एका बोटीवर डीझल चढला. त्याला पुढें केव्हांहि कोणीं जिवंत पाहिला नाहीं. आपण कोणाशीं स्पर्धा करीत आहों, ही गोष्ट बिचाऱ्या डीझलच्या लक्षांत आली नाहीं!

सायमन लेक या नांवाचा एक अमेरिकन गृहस्थ होता. पाणबुड्या बोटींत यानें कित्येक सुधारणा केल्या होत्या. खुद्द अमेरिकेंत त्याच्या श्रमाचें चीज झालें नाहीं; तेव्हां तो जर्मनींत निघून आला; जर्मन सरकारानें ताबडतोब त्याला आश्रय दिला. त्याच्या युक्त्या त्याजपासून विकत घेऊन जर्मन इंजिनियरांनीं त्यांत आणखी सुधारणा केली. ४२ सेंटिमिटर (१६·८) इंच तोफेची मूळ कल्पनाहि अमेरिकेंतच उद्भवली. अशी बोलवा आहे; पण अमेरिकेंतील या बियाण्याचें अखेरचें फळ

जर्मनीच्या पदरांत पडलें, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. भवितव्यता बलीयसी !

झेपेलिन प्रत्यक्ष अस्तित्वांत आलें. अशक्य वाटणारी ४२ सेंटिमिटर तोफ प्रत्यक्ष सिद्ध झाली. आपल्या पुरवठ्याच्या कोठारापासून १५ दिवसांच्या अंतरावर चालून जाणारी पाणबुडी तयार झाली. भावी दिवसांकरतां (Der Tag) जर्मनीची सर्व तयारी पूर्ण झाली.

केसर दिवसें दिवस जणू काय अधिक तरुण होत आहेत, अशा रीतीनें वागू लागले. त्यांच्या चेहऱ्यावरील पूर्वीची काळजीची छटा नाहींशी झाली. आपल्या हातीं असलेल्या यंत्राच्या सामर्थ्याबद्दल जणूं काय त्यांची खात्री पटली. पूर्ण तयारी करून योग्य संधीचीच ते जणूं काय वाट पहात होते.

१९१४ च्या वसंत मासाच्या आरंभीं जर्मनींतील तरुण शेतकऱ्यांस राजवाड्यांतून पाचारण झालें. बराच वेळ बादशहांशीं त्यांची भेट झाली. अखेरीस त्याना निरोप देतांना बादशहा म्हणाले, "सद्गृहस्थहो, जर्मनी च्या इतिहासांत अननुभूत अशा प्रकारचें यंदाचें पीक मोठें येईल, असें तुम्ही म्हणतां, ही गोष्ट अगदीं खरी आहे ना ?"

"होय सरकार. ही गोष्ट अक्षरशः खरी आहे."

'तो दिवस' जवळ येत चालला.

* * *

तो दिवस जवळ येत चालला. परिस्थितींत विलक्षण बदल झाल होता. सन १९०० पासून १९०६ सालापर्यंत इंग्लंड सर्व युरोपीय राष्ट्रांपासून अलग राहिलें होतें. हा अलगपणा बरा नाहीं, ही गोष्ट प्रथम सातव्या एडवर्ड बादशहांच्या नजरेस आली, आणि त्यांच्या खट पटीनें युरोपची सारी परिस्थिति बदलण्यास आरंभ झाला. इंग्लंड आणि फ्रान्स यांची मैत्री पक्की आहे, ही गोष्ट मोरोक्को प्रकरणाच्या वेळीं उघड झाली. यानंतर ट्यानस अरण्यांतील मुत्सद्यांच्या भेटीचा योग जुळवून आणून इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया या त्रिकुटांत फूट पाडण्याचा यत्न केसरनीं केला; पण त्या प्रयत्नांत त्यांस यश आलें नाहीं.

या घडामोडीमुळें जर्मनी दिवसें दिवस अधिक मस्त होत चालला. जंगली हत्ती मस्त झाला, म्हणजे बेगुमानपणें समोर दिसेल, त्यावर तो कसा तुटून पडतो, व तशा स्थितींत त्याच्या समोर जाणे किती धोक्याचे आहे, ही गोष्ट सर्व शिकाऱ्यांना माहीत आहेच. जर्मनीची आज अशीच स्थिति झाली आहे. जर्मनी आतां अगदीं पिसाळला आहे. त्यानस अरण्याच्या भेटीच्या वेळीं आपली तयारी कितपत आहे, याचा अजमास जर्मनीनें इंग्लंडला दिला होता; तथापि त्या वेळींहि बेचाळीस सेंटिमिटर तोफ; झेपेलिन आणि पाणबुडी यांचा थांग मात्र जर्मनीनें कोणासहि लागूं दिला नव्हता.

आपलें खरें सामर्थ्य किती आहे, हें जर्मनीनें सर्वांस अगोदर जाणविले असतें, तर जगाच्या शांततेचा भंग झाला नसता, असेंहि कोणी म्हणतात; पण भविष्यत् कालाबद्दल खात्री कोणीं द्यावी ? इंग्लंड आपल्या बाजूला वळत नाहीं, असें पाहून जर्मनीनें इंग्लंडांत आपल्या हेरांचा नुसता सुळसुळाट करून दिला.

जर्मनराष्ट्राचें अंतरंग.



युरोपच्या शांततेचा कधींहि भंग होणार नाहीं, अशी खात्री बाळगणारे अद्यापिहि युरोपांत होते. बरेच दिवस युरोपांत शांतता नांदल्यामुळें, त्यांच्या डोक्यांत हा भ्रम उत्पन्न झाला होता. व्यापाराच्या विलक्षण भरभराटीमुळें सर्व राष्ट्रांचे परस्पर संबंध पूर्वीपेक्षां अधिक गुंतागुंतीचे झाल होते. ही गुंतागुंतच युद्ध होऊं देणार नाहीं, असा पुष्कळांचा समज होता. सर्व देशांत शांतिसूक्तें म्हणणाऱ्या लोकांच्या आरडाओरडींत आणि शांतता परिषदांच्या गडबडीमुळें खरी परिस्थिति लपून गेली होती. यामुळें वस्तुस्थितीचा विसर लोकांस पडला. ही बाह्य शांतता खोटी आहे, असें म्हणणाऱ्या लोकांची गणना वेड्यांत होऊं लागली. विशेषतः इंग्लंडांत शांतिःपुष्टिःस्तुष्टिश्चास्तूचा पाठ विशेष जोरानें चालला होता.

लॉर्ड राबर्ट, जनरल बेडन पॉवेल, लॉर्ड फिशर आणि लॉर्ड किचनेर इत्यादिकांच्या सूचनांकडे इंग्लंडनें फारसें लक्ष पुरविलें नाहीं.

* * *

जर्मनीची परिस्थिति त्याहून अगदीं वेगळी होती. शांततेच्या, युद्धसाहित्य कमी करण्याच्या व सलोख्यानें तटे तोडण्याच्या सूचना इतर राष्ट्रांनीं केल्या, तर त्या अगदीं शांतपणें ऐकून घ्यावयाच्या व ताबडतोब फेटाळून लावावयाच्या असा क्रम जर्मनीने सुरू केला होता. ट्यूटनवंश युद्धदेवतेचा भक्त आहे, या म्हणण्यांत फारसा जीव नाहीं. विनाकारण रक्तपात करण्याची हौसहि त्यास नाहीं; तथापि राष्ट्याराष्ट्रांतील तंट्याचा अखेरचा निकाल प्राचीन कालाप्रमाणें सांप्रतहि केवळ तलवारीनेंच लागतो, ही कल्पना मात्र जर्मनीच्या डोक्यांतून अद्यापि निघालेली नाहीं. मानवजातीच्या कल्याणास शांततेची स्थिति किती उपकारक आहे, ही गोष्ट जर्मनी जाणत नाहीं, असें नाहीं; तथापि [illegible] सर्व भांडणांचा निकाल थंड्या मार्गानें लागण्याचा दिवस पूर्वेतिहासांत ज्याप्रमाणें उगवलेला दिसत नाहीं, त्याचप्रमाणें सांप्रतहि तो उगवलेला नाहीं, असें जर्मनीचें ठाम मत आहे.

गत युद्धांच्या कारणांची कितीहि मीमांसा करून भावी युद्धें टाळण्याच्या उपपत्ति त्याजवरून कोणीं बसविल्या अथवा भारेच्या भारे ग्रंथ लिहून आपलें पांडित्य त्यांनीं सिद्ध केले, तरी या साऱ्या गडबडींत एक महत्त्वाची गोष्ट हे पंडित विसरत असतात. ही गोष्ट म्हणजे मनुष्य स्वभाव.

युद्धास सुरवात झाल्याबरोबर जो प्रथम तडाखा मारतो, तो अर्धें युद्ध जिंकतो, असें जर्मन चालकांचें मत आहे. युरोपांतील सांप्रतची गुंतागुंत शेवटीं तरवारीनेंच मोकळी होईल, अशी खात्री चित्तांत बाळगून जर्मनीनें त्या दिशेनें पहिला तडाखा मारण्याची तयारी चालविली होती.

गेल्या तीन होहेनझोलर्न घराण्याच्या बादशहांच्या कारकीर्दीत जर्मनीला युरोपांत प्रमुखस्थान मिळालें होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. सुमारें चाळीस वर्षांच्या अवधीच्या शांततेनें जर्मनीची विलक्षण भरभराट झाली होती, हेंहि खरें आहे. या चाळीस वर्षांच्या अवधींत आपल्या

विलक्षण मेहनतीनें आणि सशास्त्र उद्योगानें जर्मनीनें आपला व्यापार इतका वाढविला कीं, शेंकडों वर्षांनीं आपल्या पुढें असलेल्या इतर राष्ट्रांच्या पंक्तीस तो येऊन बसला.

सामान्यपणें पहातां जर्मन लोकांना सुखसमाधानानें आयुष्याचे दिवस कंठण्याची जितकी आवड आहे, तितकी इतर कोणत्याहि लोकांना नसेल. होतां होईल, तों पोटचें पाणी हालवावयाचें नाहीं, असा त्यांचा बाणा आहे. या बाबतींत त्यांची बरोबरी स्विनी लोकांशिवाय दुसरें कोणी करणार नाहीं. शरीर सामर्थ्याला इतर देशात जो मान आहे, तो जर्मनींत मुळींच नाहीं. यामुळें मैदानी अथवा मर्दानी खेळांचें महत्त्व मुळींच मानण्यांत येत नाहीं. व्यापार आणि आधिभौतिक शास्त्रें यांच्या होणाऱ्या वाढींत इतर राष्ट्रांच्या चढाओढीची भीति जर्मनीला वाटण्याचें कारण नव्हतें. स्वतःचें घर संभाळून राहण्याचें सामर्थ्य जर्मनींत होते; पण कालाची सूक्ष्म गति अवलोकन करण्याची संवय जर्मनराष्ट्रास फार प्राचीन काळापासून आहे. क्यांट, शापेनहारपासून तों अलीकडच्या ट्रीचेनीचेपर्यंत झालेले तत्त्ववेत्ते जर्मनराष्ट्राच्या मानसिक स्थितीची साक्ष पटवीत आहेत. शांततेनें आपण मिळविलेला घास आपल्या तोंडून कोणी तरी ओढून नेण्याचा दिवस उगवेल, अशी खात्री अंतर्यामीं पटल्यामुळें त्या दिवसाकरतां जर्मनी आपली तयारी करीत होता. असा प्रसंग येणे ही मोठी आपत्ति आहे, ही गोष्ट तो जाणून होता; पण ती टाळतां येणें शक्य नाहीं, असेंहि त्यास वाटत होतें.

जर्मन सैन्याची आश्चर्योत्पादक तयारी आणि त्याची प्रतिरोधकशक्ति हीं सैन्याच्या आगाऊ शिस्तीचीं फळें होत. जर्मन लष्कर एकाद्या यंत्राप्रमाणें तयार केलें जातें. ही यांत्रिक पद्धत केवळ लष्करापुरतीच आहे असें नाहीं. साऱ्या साम्राज्याची इमारतहि एकाद्या यंत्राप्रमाणें उभारलेली आहे. जर्मनींतील प्रत्येक व्यक्तीला आज्ञाधारकपणाची शिस्त लहानपणापासूनच लावली जाते. जर्मन आईबाप आपले हुकूम मुलांकडून तंतोतंत पाळवितात. मुलांवर आईबापांची सत्ता अप्रतिहत असली पाहिजे, असें जर्मन लोकांचें मत आहे आणि या तत्त्वाची अम्मलबजावणी बादशहाच्या राज-

वाड्यापासून तों थेट एकाद्या शेतकऱ्याच्या झोंपडीपर्यंत एकसारखींच होत असते. जर्मन जनतेच्या भावी आयुष्याच्या मुळाशींहि हेंच तत्त्व असतें. जर्मन मूल मोठें होऊन शाळेंत जाऊं लागलें, ह्मणजे तें शाळागुरूंच्या करड्या अम्मलाखालीं असतें. यानंतर शाळा सुटून तें एकादा धंदा शिकण्याकारितां एकाद्या कारखान्यांत राहिलें ह्मणजे, कारखान्याचा मालक त्याचा सर्वस्वी धनी बनलेला असतो. ठरीव वय झाल्याबरोबर जर्मन मुलाचा प्रवेश सैन्यांत अगर आरमारांत होतो. येथील शिस्तीची कदर सर्वविश्रुत आहेच. यावरून शिस्त भाणि आज्ञाधारकता हे दोन गुण साऱ्या जर्मन राष्ट्राच्या अंगांत कसे भिनविण्यांत येतात, याची कल्पना येईल.

केवळ वर वर पहाणारास बाह्यदेशीयांस ही पद्धत विलक्षण त्रासदायक वाटेल, यांत शंका नाहीं आणि जन्मापासून अशा रीतीनें वागण्याची संवय ज्यांना नाहीं, अशा माणसांना हा करडा अम्मल असह्य वाटेल यांत शंका नाहीं. तथापि आकुंचित व्यक्तिविषयक सर्व भावना नाहींशा होऊन त्यांचा लय विशाल राष्ट्रीय भावनांत होण्यास शिस्त आणि आज्ञाधारकता यांवांचून दुसरा उपाय नाहीं, असें जर्मन पुढाऱ्यांचें मत आहे. जनतेच्या कल्याणाकरतांच राष्ट्र अस्तित्वांत आलेलें असतें. तसेंच राष्ट्रीय जीवित कायम राखणें हें जनतेचें आदि कर्तव्य आहे. राष्ट्र आणि जनता ह्यांचे संबंध पितापुत्राप्रमाणें आहेत. जर्मन जनतेच्या आचरणांत या तत्त्वांचा अंतरभाव सर्वत्र झाल्याचें आढळून येतें. आगगाड्या, टपालखातें, तारखातें, मोठे गाडी रस्ते आणि पाण्यांतील दळणवळणाचे मार्ग हीं सारीं कंपन्यांच्या ताब्यांत नसून सरकारच्या ह्मणजे राष्ट्राच्या ताब्यांत असलीं पाहिजेत. ह्या तत्त्वाचा प्रत्यक्ष पुरस्कार जर्मनींनें पुष्कळ वर्षांपासून केला आहे. हीं सुखसाधनें व्यापारी लोकांच्या हातांत गेलीं, ह्मणजे, त्यांचा उपयोग हे व्यापारी स्वतःच्या तुंबड्या भरण्याकडे करतात. उलट पक्षीं हीं साधनें सरकारच्या स्वाधीन राहिलीं, ह्मणजे त्यांचा उपयोग राष्ट्राच्या कल्याणाकडे होतो. प्रजासत्ताक संस्थानांत या तत्त्वांचा नुसता उच्चार नुकताच कोठें होऊं लागला आहे. व्यापारी दृष्ट्या जर्मनीची इतकी अश्रुतपूर्व भरभराट होण्यास हींच तत्त्वें मूळ कारण झालीं.

ट्यूटनवंश हा कल्पनातरंगवश आहे, असा त्याचा लौकिक आहे कल्पनेच्या साम्राज्यांत, ट्यूटनवंश अधिक वावरत असतो ही गोष्ट खरी, तथापि तो व्यवहारापासून सुटत नाहीं, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपले पाय प्रथम जमिनीवर पक्के केल्यावांचून आपलें डोकें तो आकाशांत कधींहि भडकूं देत नाहीं. शीलर, गटे, शापेनहार, श्लेजेल, आणि क्यांट इत्यादिकांचा तत्त्ववाद व व्याग्नर वगैरे कवींचें संगीत आणि नाट्यग्रंथ यांचीं पारायणें करून त्यांतील रहस्यें तुह्मांस पचनीं पाडतां आलीं, तरच जर्मन कुलाचें खरें ह्रद्गत तुमच्या हातीं पडेल. त्यांचें साहित्य, त्यांचे तत्त्वदर्शन आणि त्याचे संगीत या साऱ्यांच्या मुळाशीं ऐहिक कल्याणाची इच्छा तुम्हांस आढळून येईल.

या सर्व तत्त्वाची व अशा स्वरूपाच्या जड वादाची मूर्तिमत मूस जर तुह्मांस पाहणें असेल, तर ती तुह्मांस होहेनझोलार्न घराण्यांत आढळून येईल. होहेनझोलार्न बादशहाच्या भोंवतीं असलेला राजकीय थाटमाट व डोळे दिपविणारा लखलखाट काढून टाकला, तर आंत बाकी राहिलेला पुरुष शुद्ध वणिकवृत्तीचा पुतळा आहे, असें तुमच्या निदर्शनास येईल. ट्यूटनसारख्या अत्यंत व्यवहारी राष्ट्रावर राज्य करण्यास हा गुण राजाच्या अगीं अवश्य असला पाहिजे. जर्मन लोक जसे अत्यंत व्यवहारी, तसेच अत्यंत कल्पनावश आहेत आणि त्यांच्या या दुसऱ्या गुणाचें प्रदर्शन त्यांच्या बादशहाच्या भाषणप्रसंगीं अनेक वार झालेलें आहे. दुसऱ्या वुइलियम बादशहाचीं भाषणें हीं एकाद्या नाटकांत शोभण्यासारखीं असून त्याचे हावभावहि नाटकी असतात, ही गोष्ट सर्वविश्रुत आहेच.

आपणाभोंवतीं काय चाललें आहे, हें जाणण्याचा गुण बहुतेक साऱ्या होहेनझोलार्न राजांस होता, असें इतिहासावरून दिसून येतें. कांहीं प्रसंगीं त्यांपैकीं कित्येकांनीं मुलतानी अम्मल गाजविला असला, तरी लोकांचा कल पाहून तदनुसार राज्याची शिस्त राखावयाची व आपलें व देशाचें कल्याण करून घ्यावयाचें. हा क्रम त्यांनीं बहुधा सोडला नाहीं. विशेषतः सांप्रतच्या बादशहांनीं तर या कामीं चांगलीच कुशलता दाखविली आहे. सांप्रतचे बादशहा लोकांस भासवितात, तितके ते खरोखर बुद्धिमान् नाहींत.

साहित्यशास्त्रादि कलांतील त्यांचें नैपुण्य अनेक बाबतींत आक्षेपार्हहि आहे; तथापि आजुबाजूची परिस्थिति ओळखून तदनुरूप वर्तन करण्याचा होहेनझोलार्न घराण्याचा गुण त्यांजपाशीं मुबलक आहे. त्यांची खाजगी शेती व गुराढोरांची संपत्ति जर्मनींत सर्वांहून मोठी आहे. याशिवाय सराफकट्ट्यावरहि त्यांचा दांडगा व्यवहार चालू असतो. त्यांच्या सुनाहि युरोपांतील अत्यंत श्रीमंत घराण्यांतील आहेत.

जर्मन बादशहा अत्यंत संपत्तिमान असले, तरी खर्चाच्या बाबतींत ते विलक्षण काटकसरी आहेत. या बाबतींत सांप्रतचे जर्मन युवराज आपल्या वडिलांच्या अगदीं उलट स्वभावाचे आहेत.

हें युद्ध सुरू होण्यापूर्वी युवराजांनीं इंग्लंडांत एक शर्यतीचा सट्टा केला होता. हा सट्टा त्यांच्या अंगावर आला. पैशाबद्दल लिहून दिलेली हुंडी लंडन येथील एका प्रसिद्ध सावकाराच्या हातीं गेली. युवराजाकडून पैसे येण्याकरतां या सावकारानें बरीच खटपट करून पाहिली; पण ते लवकर मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां त्यानें एक विलक्षण युक्ति योजिली. एका बड्या सरदार घराण्यांतील एक स्त्री त्याच्या ओळखीची होती. जर्मन राजघराण्यांशींहि या स्त्रीचा मित्रत्वाचा संबंध होता. या स्त्रीमार्फत त्या सावकारानें एक पत्र वुइलियम बादशहांच्या हातीं जाण्याची व्यवस्था केली. या पत्राच्या द्वारें आपण एक दुर्मिळ जुनें नाणें बादशहास पाठवीत आहों, असा त्यानें त्या सरदार स्त्रीचा समज करून दिला. ही सरदार स्त्री पुढें लवकरच बर्लिन येथें गेली. तेथें तिला एके दिवशीं राजवाड्यांतून मेजवानीचें बोलावणें आलें. या प्रसंगीं बादशहांची भेट होतांच सावकाराकडून आणलेलें पाकीट तिनें बादशहांच्या स्वाधीन केलें. बादशहाला जुनीं नाणीं गोळा करण्याचें विलक्षण वेड आहे. आतां एक मोठी अजब चीज आपल्या हातीं लागणार, अशा आशेनें बादशहांनीं मोठ्या आतुरतेनें हें पत्र फोडलें; परंतु त्यांत जुनें नाणें मिळण्याऐवजीं पावणेचार लक्ष रुपयांचीं नवीं नाणीं पाठविण्याचा तगादा मात्र बादशहांच्या दृष्टीस पडला. पत्र वाचतांना बादशहांचा संतापलेला चेहरा पाहून ती बिचारी सरदार स्त्रीहि मोठ्या बुचकळ्यांत पडली. पत्राची घडी करून बादशहा म्हणाले,

" असले तगादे पावते करण्याचें काम ब्रिटिश सरदार घराणीं केव्हांपासून करूं लागलीं ? " सरदारस्त्रीनें सर्व हकीकत बादशहांच्या कानावर घातली. बादशहा मोठे रसिक असल्यामुळें त्या मारवाड्याच्या युक्तीचें व कौटिल्याचें त्यांना एकदम मोठें हंसूं आलें. सरदारस्त्रीकडे वळून ते म्हणाले, " ठीक आहे. या रकमेची भरपायी युवराजांच्या खाजगी तैनातींतून होईल. "

वैवाहिक संबंध जोडून त्या द्वारें आपलें तटूंट सदोदित पुढें ढकलावयाचें असा प्रशियाचा पूर्वापार क्रम आहे; तथापि ही युक्ति नेहमीं सारखीच साध्य होते असें नाहीं.

नार्वे, स्वीडन आणि डेन्मार्क या तीन स्क्यान्डीनेव्हियन देशांचे जर्मनीशीं निरनिराळ्या प्रकारचे संबंध आहेत. डेन्मार्क व ब्रिटन यांच्यांत वितुष्ट पडण्यासारख्या कांहीं गोष्टी पूर्वेतिहासांत घडल्या असतांहि डेन्मार्कचें मन जर्मनीपेक्षां इंग्लंडकडे अधिक ओढ घेतें. १८६४ सालीं प्रशियानें श्लेस्वीग–हाल स्टीन प्रांत डेन्मार्कपासून बळकावला. जर्मनीची ही लूट डेन्मार्क अद्यापिहि विसरला नाहीं. आल्सेस–लोरेन प्रांताचें शल्य जसें फ्रान्साच्या हृदयांत अद्यापीहि बोंचत आहे, त्याचप्रमाणें वरील शल्य डेन लोक अद्यापि विसरलेले नाहींत. यामुळें एकाद्या युद्धप्रसंगीं जर्मनीला डेन्मार्ककडून कसल्याच प्रकारची मदत मिळण्याची आशा नाहीं. चालू युद्धांत डेन्मार्क जर्मनीच्या पंखाखालीं गेला असता, तर बाल्टिक समुद्राची नाकेबंदी करण्याचें काम ब्रिटिश आरमारास अत्यंत जड गेलें असतें; यांत शंका नाहीं. डेन्मार्कला अशा रीतीनें असंतुष्ट ठेवण्यांत जर्मन मुत्सद्यांनीं बरीच मोठी चूक केली आहे. कदाचित् होहेनझोलार्न घराण्याच्या उद्दाम स्वभावाच्या अतिरेकानेंहि ही गोष्ट घडून आली असेल. उलटपक्षीं राजकन्या आलेक्झाड्रा व सातवे एडवर्ड यांजमधील विवाहामुळें इंग्लंड व डेन्मार्क यांचे स्नेहसंबंध दृढ झाले.

स्वीडन आणि नार्वे यांचें जर्मनीशीं राजकीय संबंध याहून वेगळ्या प्रकारचे आहेत. जर्मनीबद्दल या देशांच्या मनांत मोठेंसें प्रेम आहे, असें नाहीं; तथापि रशियाबद्दल मात्र त्यांच्या मनांत विलक्षण भीति आहे. ही भीति इतकी दृढमूल आहे, कीं तिच्यापुढें बाकीचे सारे विचार रद्द

पडतात. याशिवाय नार्वे आणि स्वीडन यांचा जर्मनीशीं असलेला व्यापारी संबंधहि अत्यंत महत्त्वाचा आहे. या देशांतील खनिज जिनसांना जर्मनी हें एक मोठें गिऱ्हाइक आहे. यामुळें बाल्टिक समुद्राचा रस्ता सदोदित मोकळा राहण्यांत त्यांचा फायदा आहे. या दोन देशांची व्यापारी जहाजांची संख्याहि मोठी असल्यामुळें जलमार्ग मोकळे राहाण्यांत त्यांचा फायदा आहे. या दोन देशांच्या व्यापारास धोका येईल, असें वर्तन जर्मनीनें आजपर्यंत केव्हांहि केलेलें नाहीं. उलट त्यांच्या व्यापारास त्यानें मदतच केली आहे. ड्यान्झीग, स्ट्रेटीन, स्वाइनमुंड, रोस्टाक, कील, हॉंबर्ग इत्यादि बंदरांत नित्य दृष्टीस पडणारें स्विडिश आणि नार्वेजियन डोलकाठ्यांचें अरण्य या गोष्टीची साक्ष देतें. याशिवाय खुद्द जर्मन बादशहाचें वजनहि लक्षांत घेण्यासारखें आहे. या देशांतील पुष्कळशा लोखंडाच्या खाणी बाह्यतः क्रप कंपनीच्या; पण वस्तुतः वुइलियम बादशहांच्या ताब्यांत आहेत, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

यंदाच्या जुलई महिन्यांत अतिशय उकाडा होत होता. साऱ्या हवेंत या उष्म्यामुळें औदासिन्य आलें होतें. आकाशांत एकहि ढग दिसत नव्हता. तरी लवकरच प्रचंड वादळ होणार, असें भविष्य वायुभारमापनशास्त्री वर्तवीत होते. हवामानातील ही स्थिति युरोपांतील राजकीय परिस्थितीशीं अत्यंत जुळती होती. सर्व देशांचे परस्परांचे संबंध इतके गुंतागुंतीचे झाले होते, कीं या गांठी सुटून, कीं तुटून मोकळया होणार, हें कोणासहि सांगतां येत नव्हतें.

जर्मनीची सांपत्तिक स्थिति अगदींच वाईट नसली, तरी फार समाधानकारकहि नाहीं. मजुरांना पुरेसें काम मिळत नव्हतें. पुष्कळसे कारखाने केवळ उसन्या भांडवलावर चालले होते. जगभर झालेल्या व्यापारी मंदीचा परिणाम जर्मनीला जाणवत होता. लष्कर आणि आरमार यांजवरील खर्चाच्या ओझ्याखालीं जर्मन सरकार मेटाकुटीस आलें होतें. यामुळें व्यापाऱ्यांस मिळणारी पैशाची मदत कमी होत चालली होती. अशा अनेक गोष्टींच्या एकीकरणांनीं जर्मन राष्ट्र उदास आणि बेदील झालें होतें.

जर्मनीचे राजकीय संबंधहि फारसे संतोषकारक नव्हते. आपण साऱ्या युरोपांत एकटे पडलों आहों, ही जाणीव बादशहांच्या हृदयास टोंचत होती. यामुळें बादशहांवर जर्मनींतील युद्धप्रिय पक्षाचा पगडा वाढत्या प्रमाणावर बसूं लागला होता. या पक्षाचें प्रमुखत्व खुद्द युवराजानें स्वीकारलें होतें; तथापि होतांहोईतों तरवार म्यानाबाहेर काढण्याची बादशहांची इच्छा नव्हती. ती नुसती खुळखुळावून व धाकदपटशा दाखवून होईल तितकें कार्य साधावें असा बादशहांचा मनोदय होता.

अद्यापि आकाश निरभ्र होतें.

* * *

इंग्लडांतील इतरेजनांची परिस्थिति अशीच बिकट होत चालली होती. जर्मनीच्या व्यापारी मुसंडीपुढें ब्रिटिश व्यापाराची पिछेहाट होऊं पहात होती. जर्मन आगबोटींच्या वाढत्या संख्येपुढें आपला टिकाव कसा लागेल, ही काळजी ब्रिटिश आगबोट कंपन्यांस जाणवूं लागली होती. त्याचप्रमाणें जर्मनीचें वाढतें आरमारहि ब्रिटिश मुत्सद्यांची झोंपमोड करण्यास कारण होत होतें. सांपत्तिक परिस्थितीहि प्रतिकूल होऊं पहात होती. व्यापार कमी झाल्यामुळें मजुरांस काम मिळेना. यामुळें जिकडे तिकडे संप होण्यास सुरवात झाली आणि यामुळें आधींच खालावत चाललेला व्यापार अधिक ढबघाईस येत चालला.

याच सुमारास इंग्रज लष्करी अम्मलदार बेल्जमची पाहणी करीत आहेत अशी वदंता उठली. बेल्जमचा प्रत्येक चौरसमैल या अम्मलदाराच्या नजरेखालून गेला आहे, अशी गप्प पसरली. त्याचप्रमाणें सर्व मोठ्या रस्त्यांची व जलमार्गांची पाहणी झाली असून बेल्जम देशांतील धान्य वगैरेंचा पुरवठा, रेल्वेरस्ते, वगैरे सर्व बाजूंचें टिपण तयार झालें आहे, असें लोक म्हणूं लागले.

अद्यापीहि आकाश निरभ्र होतें.

* * *

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या सुमारें दुप्पट आकार व तितकीच लोकसंख्या असा रशिया आहे. दगडी कोळसा, लोखंड व इतर अशी-

धित धातु यांच्या घनत्तर खाणी रशियांत आहेत. तसेंच मोठमोठ्या वृक्षांचीं पुष्कळ अरण्यें तिकडे असून गव्हाचीं विस्तीर्ण शेतेंहि आहेत. गव्हाची शेतकी इतक्या मोठ्या प्रमाणावर जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळावयाची नाहीं. देशाची सांपत्तिक भरभराट होण्यास ज्या गोष्टी मुळांत असाव्या लागतात, त्या सगळ्यांची तयारी रशियापाशीं भरपूर आहे. असें असतांहि रशिया बऱ्याच अंशीं दरिद्री आहे. दरिद्री याचा अर्थ त्याजपाशीं सोन्याचें वैपुल्य केव्हांहि झालेलें नाहीं.

दुसऱ्या क्याथेराइन राणीच्या वेळेपासून उष्ण प्रदेशांतील एखादें बंदर मिळविण्याची धडपड रशियानें एकसारखी चालविली आहे. उत्तर दिशेंतील धडपड स्वीडनच्या बाराव्या चार्लस राजानें बंद पाडली. त्यांत त्याला प्रशियन राजांचें सहाय्य होतें. दक्षिणेकडील ह्मणजे काळ्या समुद्रांतील धडपड इंग्लंड व फ्रान्स यांनीं बंद पाडली. पूर्वेकडच्या खटपटीस जपाननें शह दिला, या खटपटीस थोडेंसें यश येण्याचा संभव दिसत होता व याच वेळीं जर्मनीच्या चिथावणीनें आस्ट्रियानें बाल्कन संस्थानांत आपलें तट्टू घुढें दामटलें नसतें, तर इंग्लंडच्या सहाय्यानेंहि जपानला रशियावर मात करतां आली असती कीं नाहीं, याची शंकाच आहे.

पूर्वेकडे झालेला तंगडमोडीचा पहिला परिणाम झटला ह्मणजे आस्ट्रियानें हारजेगोविना आणि बासनिया हे दोन प्रांत गिळंकृत केले, हा होय. अशा रीतीनें बाल्कन द्वीपकल्पांतील रशियाच्या वजनास शह बसत असतांहि त्याला त्याचा प्रतिकार वेळींच करतां आला नाहीं. रूसो-जपानी युद्धापूर्वी जर्मनी रशियाला फार भीत असे. प्रख्यात मुत्सद्दी बिस्मार्क यानें रशियाशीं सदोदित मैत्रीचें धोरण ठेवलें होतें. फ्रेडरिक दी ग्रेटच्या काळाच्या सप्तवार्षिक युद्धानंतर टबूटन आणि मस्कोव्हाईट यांच्या समशेरी एकमेकांविरुद्ध केव्हांहि चमकल्या नाहींत. रशियाशीं कधींहि वैर करूं नये, अशाबद्दलचे स्वदस्तुरचे लेख फ्रेडरिक दि ग्रेटनें लिहून ठेवलेले आहेत, असें ह्मणतात. जर्मनीला रशियाबद्दल मत्सर वाटतो, याबद्दल बिलकुल शंका नाहीं. रशियाच्या जमिनीचा एकादा

लहानसाहि तुकडा जर्मनीला पाहिजे, असें नाहीं; पण रशियाचें सारें राजकारण आपल्या तंत्रानें चालावें, अशी जर्मनीची इच्छा आहे. "रशियाच्या पोटांत भावी इतिहासाची मुबलक सामग्री आहे; पण पौरुषयुक्त जर्मनीच्या हाताचें सहाय्य असल्याशिवाय त्या सामग्रीचा उपयोग होणार नाहीं," असें बिस्मार्क म्हणत असे. सांप्रतच्या वुइलियम बादशहांनींहि असेंच मत एका ठिकाणीं व्यक्त केलें आहे. जर्मनी व रशिया यांसारखी दोन एकसत्ताक, प्रबळ आणि महत्त्वाकांक्षी राष्ट्रें एकदील झालीं असतीं, तर पृथ्वीवर काय अनर्थ ओढवला असता, याचा अजमास करणें कल्पनेच्याहि बाहेर आहे. हीं राष्ट्रें परस्परांविरुद्ध असल्यामुळेंच पुष्कळसे देश आज स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेत आहेत, ही गोष्ट मात्र खरी.

रशियाचा वारवार पाणउतारा करण्याचा मार्ग जर्मन मुत्सद्यांनीं स्वीकारला. यामुळें पूर्वीची मैत्री अस्तंगत होत चालली. रशियन लोक मुळचे तारतार वंशांतील असल्यामुळें अर्धवट एशियाटिक आहेत, असें म्हणावयाला हरकत नाहीं. एशियाटिक लोक अपमान विसरून जात नाहींत अथवा त्याबद्दल क्षमाहि करीत नाहींत. या तत्त्वाला अनुसरूनच जर्मनीनें केलेल्या अपमानाचें उट्टें काढण्याची तयारी रशिया धिमेपणें आणि गुप्त रीतीनें करीत होता. तो केवळ अनुकूल संधीचीच वाट पहात होता, आणि ती संधि प्राप्त होण्याचीं चिन्हेंहि दिसूं लागलीं. केवळ बाह्य दृष्टीनें पाहणाराला रशिया आंतून पोंखरल्यासारखा दिसत होता. वारंवार होणारीं बंडें, यहुदी लोकांचा असंतोष आणि पैशाची कमतरता या कारणांनीं रशिया हलाकीस आला असावा असें अनुमान कोणींहि काढलें असतें; पण हें अनुमान खात्रीनें चुकीचें आहे. रशियाच्या वस्तुस्थितीबद्दल आजपर्यंत अनेकांनीं अनेक प्रकारचीं अनुमानें काढून त्या राज्याचें भविष्यहि वर्तविलें आहे; पण हीं सारीं अनुमानें व भविष्यें खोटीं ठरत असल्याचा प्रत्यय युरोपास अनेकवार आला आहे. रशियन राज्य हें मुत्सद्यांस एक मोठें कोडें होऊन बसलें असून त्याचा उलगडा आजपर्यंत कोणासहि करतां आला नाहीं.

आस्ट्रो-जर्मनांच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास रशियास सामर्थ्य नाहीं, असें पाहून दुसऱ्या वुइलियम बादशाहांनीं बाल्कन संस्थानांत आपलें घोडें पुढें ढकललें. यामुळें रशिया पूर्णपणें आंग्लो फ्रेंच द्वयीस मिळाला.

* * *

व्यापारीदृष्ट्या अथवा पैशाचा तुटवडा पडला म्हणून, फ्रान्स देशाला युद्धोपस्थित करण्याचें मुळींच कारण नव्हतें; पण १८७० साली गमावलेल्या आल्सेस लोरेन प्रांताचें शल्य त्याच्या हृदयांत अद्यापि ताजें आहे. फ्रेंच लोक विशेषतः विकारवश आहेत. कोणत्याहि विकाराचें प्राबल्य त्यांच्या चित्तांत ताबडतोब होतें. कॉर्डिनल, हिचेल् अथवा नेपोलियन बोनापार्ट यांसारख्या लोकोत्तर बुद्धिमान् पुरुषांनीं फ्रेंचांच्या याच स्वभावविशेषाचा उपयोग करून घेतला, आणि त्या त्या वेळीं राजकीय दृष्ट्या फ्रान्सचा फायदा झाल्यासारखा दिसला, ही गोष्टहि खरी; पण कार्य आणि प्रतिकार्य यांच्या परस्पर विरोधी लाटा नेहमींच समप्रमाणानें उठत असतात, या शास्त्र सिद्धांताचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य रिचेल् किंवा बोनापार्ट यांच्या आंगीं नव्हतें. कोणताहि मानसिक विकार उत्कटतेस पोहोंचून तो ओसरून गेला, म्हणजे त्याचे अंतिम परिणाम शारीरिक अवनतींत दिसून येतात. चैनीची चटक लागून सामान्य नीतीचीहि हेळसांड होऊं लागते. सांप्रतच्या युद्धाच्या पूर्वी फ्रान्सची अंतःस्थ स्थिति कशी होती, हें सूक्ष्म नजरेने पाहणारांच्या लक्षांत आलें असेलच. या वेळीं फ्रान्स मोठ्या पेचांत सांपडला होता. जर्मनीवर सूड उगविण्याची त्याची इच्छा प्रबळ होती; पण सिडान आणि मेट्झ यांची आठवण अद्यापि ताजी असल्यामुळें जर्मनीशीं एकाकी सामना बांधण्यास तो धजावत नव्हता. त्यामुळें इतर राष्ट्रांची मदत घेण्याचा उपक्रम त्यानें सुरू केला. मोठमोठ्या रकमा रशियास कर्जाऊ देऊन त्यानें प्रथम रशियाचें पाठबळ मिळविलें; तथापि इंग्लंडशीं मैत्री होईपर्यंत फ्रान्सच्या मनांतील धाकधूक गेली नव्हती. अशा रीतीनें रशिया आणि इंग्लंड यांच्याशीं स्वतःची मैत्री पक्की होतांच

१८७० सालच्या जुन्या शल्यानें त्याच्या मनात पुनः जोरानें उचल खाल्ली आणि आपल्या मनस्वी स्वभावास अनुसरून ही बदललेली परिस्थिति फ्रान्सनें शक्य तितक्या स्पष्ट रीतीनें जर्मनीच्या नजरेसहि आणून दिली. शक्य असेल, तर फ्रान्सला आपल्या बाजूस वळवावें, असें केसरचें धोरण होतें; पण फ्रान्सच्या कृतीनें या त्याच्या धोरणास पूर्ण हरताळ लागून जुनें शत्रुत्व पुनः नव्या जोरानें प्रगट झालें.

● ● ●

आस्ट्रिया-हंगारी या जोड राज्याच्या प्रजेंत एकंदर निरनिराळ्या सव्वीस जातींचे लोक आहेत. पांच कोटी दहा लक्ष प्रजेपैकीं अर्धी प्रजा टयूटन वंशापैकीं आहे. हंगारीची दोन कोटी दहा लक्ष प्रजा कांहीं कांहीं बाबतींत टयूटन प्रजेशीं सहानुकंपा बाळगणारी आहे. बाकी उरलेल्या प्रजेंत स्लाव आणि झेच या प्रमुख असून जर्मनांशीं त्यांचें हाडवैर आहे. याशिवाय इटालियन सरहद्दीजवळील ट्रेंटिनो व डालमेशिया या प्रांतांतल्या जोड राज्यांतील इटालियन प्रजा राहते. तिचा ओढा अर्थातच इटलीकडे आहे. अशा रीतीनें वस्तुतः विस्कळित असलेल्या या राज्याचे केव्हांच तुकडे होऊन जावयाचे; पण बादशहा दुसरे फ्रान्सीस जोसेफ यांच्या अस्तित्वामुळेंच तें अद्यापि टिकून राहिलें आहे. खुद्द या बादशाहाच्या कारकीर्दीतहि राज्याचीं शकलें होण्याचे प्रसंग आले नव्हते असें नाहीं.

मध्य युरोपांत होहेनझोलार्न आणि हॅप्सबर्ग हीं दोन प्रमुख राजघराणीं आहेत. यांत होहेनझोलार्न घराणें पुष्कळ पुढें सरकलें असून दुसरें घराणें मागें पडलें आहे. १८६६ सालच्या साडावोच्या लढाईंत हॅप्सबर्ग घराण्याचें राजकीय महत्त्व होहेनझोलार्न घराण्यानें बहुतेक नामशेषच केलें, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं; पण लढाईनें या दोन घराण्यांतील वैमनस्याचा काळ संपून यांच्या मैत्रीस सुरुवात झाली. सांप्रत या दोन घराण्यांचीं साध्यें आणि आकांक्षा हीं जवळ जवळ एकजीव झालीं असून परस्पर परस्परांस वाटेल त्या बाबतींत सहाय्य देण्यास तयार आहेत. आस्ट्रियन राज्यावर जर्मनीचें वजन इतकें आहे,

कीं, जर्मनीच्या वाटेल त्या म्हणण्यास रुकार न भरणारा युवराज तेथें टिकूं शकत नाहीं.

आस्ट्रियन गादीचा वारस आर्च ड्यूक रूडोल्फ याचा उत्तर आस्ट्रियांतील मेअरलिंग गांवीं गुप्तपणें खून झाला. ही गोष्ट कशी घडली, याजबद्दल अनेकांनीं अनेक तर्क केले; पण खरीं कारणें केव्हांहि बाहेर पडलीं नाहींत. या बाबतींत विशेषसा पूसतपास झाला नाहीं अथवा कांहीं धरपकडहि झाली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या राजपुत्राचा ऑटो या नांवाचा एक नौकर होता. राजपुत्राचा खून झाला, त्या वेळीं ऑटो तेथें हजर होता. आज मितीस न्यूयार्क शहरापासून ५०० मैल अंतराबर असलेल्या एका गांवीं तो अद्यापि जिवंत आहे. या ऑटोनें या खुनाच्या बाबतींत अद्यापि मूग गिळले आहेत. त्यानें तोंड उघडलें, तर काय चमत्कार बाहेर पडतील हें कोणीं सांगावें !

राजपुत्र रूडोल्फ हा जर्मनीचा मनापासून द्वेष्टा होता. आस्ट्रियावर जर्मनीचा ताबा दिवसेंदिवस वाढत आहे, या गोष्टीचा त्याला विषाद वाटत होता.

* * *

क्यापटन फौं ट्यापकेन यांना सांकेतिक भाषेंत एक तार आली होती. कांहीं इंग्रजी लष्करी अधिकारी बेलजमची पाहाणी करीत आहेत, असा मजकूर त्या तारेंत होता. ही पाहाणी कशाकारितां होती ? असा प्रश्न बर्लिनमध्यें उपास्थित झाला. याबरोबरच बेल्जममधून आणखीहि एक बातमी आली. लीज, नामूर वगैरे किल्ले नव्या साहित्यानें सज्ज केले जात असून याप्रीत्यर्थ सुमारें साडे बारा लाख रुपये खर्च होत आहेत, अशा अर्थाची ही बातमी होती. यापैकीं फक्त तृतीयांश रक्कम मात्र बेलजम सरकारची असून बाकीची कोठून आली, हें कळण्यास मार्ग नव्हता. मग ही रक्कम प्याराग्वेनें, ब्रेझिलनें अथवा दुसऱ्या कोणत्याहि देशानें दिली असेल.

हरजेगोविना आणि बासानिया या प्रांतांची पाहणी करण्याकरतां आस्ट्रियन युवराजांची स्वारी सपत्नीक आली. वास्तविक पाहतां या दोन

प्रांतांची स्थिति त्या वेळीं अत्यंत असमाधानकारक होती. अशा स्थितींत युवराजांच्या जाण्यास आस्ट्रियनसरकारनें व बादशहानें अनुमोदन कसें दिलें, हें समजणें कठिण आहे. यानंतर या भेटीचा शेवट कसा झाला, हें सर्व जगास विदित आहेच. आस्ट्रिया व सर्विया यांजमधील तंटा विकोपास गेला.

सर्वियन सरकारला आस्ट्रियाचा निर्वाणीचा खलिता मिळाल्यापासून अडेचाळीस तासांनीं आस्ट्रियाच्या सरहद्दीवरील आपल्या सैन्यास तयार राहण्याचा हुकूम झारकडून आला. हें काम इतक्या गुप्तपणें व शिताफीनें झालें कीं, तीक्ष्ण नजरेच्या जर्मन हेरांच्याहि तें लक्षांत आलें नाहीं. केसर यांनीं झारला लिहिलेल्या खलित्यांत उत्तराकरतां फक्त चारच दिवसांची मुदत दिली होती. कारण, त्या दिवसापासून चवथे दिवशीं रशियन सैन्याची तयारी पूर्ण होईल, अशी बातमी केसरला आगाऊ लागली होती.

दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे राजकीय क्षितिज गढूळ दिसूं लागलें. पूर्वेकडे थोडेथोडे ढग येऊ लागले. मधून मधून विजाहि चमकूं लागल्या. वातावरण धुंद होऊं लागलें. ह्या आगामी वादळाची वाट पहात भयचकित होत्सातें सारें युरोप आ करून बसलें. आतां फक्त एक ठिणगी पडण्याचाच अवकाश होता.

चालू युद्धाकरतां जर्मनीनें आपली तयारी किती विचारपूर्वक आणि सशास्त्र केली होती, हें आतां साऱ्या जगास कळून चुकलें आहे. तथापि कांहीं बाबतींत जर्मनीच्या मुत्सद्यांनीं विलक्षण घोडचुका केल्या आहेत. युद्धशास्त्रविशारदांनीं आपलें काम जितकें काळजीपूर्वक आणि चोख केलें आहे, तितकें मुत्सद्यांनीं आपलें काम केलें नाहीं.

युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिकेंत जर्मनीबद्दल फारशी सहानुकंपा आढळून आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर कांहीं बाबतींत पूर्ण उदासीनताच दिसून आली. अमेरिकन लोक होतां होईतों दुसऱ्यांच्या भानगडींत पडत नाहींत. तसेंच त्यांच्या घरच्या कारभारांत दुसऱ्या कोणीं तोंड घातलेलेंहि त्यांना खपत नाहीं. इंग्लंडाबद्दलहि अमेरिकन लोकांच्या मनांत मोठें

प्रेम आहे, असें नाहीं. असें असतांहि त्यांचा कल इंग्लंडकडे अधिक झुकलेला दिसला. या वस्तुस्थितीचें मुख्य कारण होहेनझोलार्न घराण्याचा अभिमानी स्वभाव हें होय. प्रजासत्ताक राज्यें त्यांच्या दृष्टीनें तुच्छशीं भासतात. सारीं राजघराणीं परमेश्वरनिर्मित आहेत, असा त्यांचा पक्का समज असल्यामुळें राज्य करण्याचा हक्क फक्त राजकुलोत्पन्न पुरुषांसच मात्र आहे व जगाची अबाधित सत्ता राजघराण्याकडेच चालली पाहिजे, असें त्यांस वाटतें. स्पॅनिश-अमेरिकन युद्धाच्या वेळीं वुइलियम बादशहाचा ओढा स्पेनकडे विशेष दिसून आला, त्याचें कारण हेंच. त्या वेळीं जर्मनीबद्दल अमेरिकन लोकांच्या मनांत जी तेढ उत्पन्न झाली, ती अद्यापिहि पूर्ण नाहींशी झालेली नाहीं. स्पॅनिश-अमेरिकन युद्धानंतर आपली चूक सुधारण्याचा प्रयत्न वुइलियम बादशहांनीं केला. प्रशियाचे प्रिन्स हेनरी हे अमेरिकेस भेट देण्याकरतां गेले, त्यांतील इंगित हेंच. आपलें उद्दिष्ट प्रिन्स हेनरी यांनीं उत्तम प्रकारें सिद्धीस नेलें, यांत शंका नाहीं. आपला राजकुलीनत्वाचा उच्चपणा क्षणभर बाजूस ठेवून अमेरिकेंतील सामान्य जनसमूहाशींहि ते अगदीं सलोख्यानें वागले. यामुळें पूर्वीची बरीचशी अढी नष्ट होऊन अमेरिका व जर्मनी यांचे संबंध सलोख्याचे होण्याच्या मार्गास लागले.

या भेटींत कांहीं राजकीय हेतु नव्हता ही गोष्ट खरी; तथापि आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून या प्रसंगाचा फायदा जर्मनीनें आपल्या विशेष पद्धतीनें करून घेतला. प्रिन्सबरोबर असलेल्या लवाजम्यांत अनेक शास्त्रांचे तज्ञ असून त्यांनीं पुष्कळ प्रकारची उपयुक्त माहिती गोळा केली

अमेरिकेंत असलेल्या कांहीं जर्मन संस्थांनीं प्रिन्सला मेजवानी दिली व त्या वेळीं आपापल्या संस्थांचे सभासद प्रिन्सच्या नजरेस पडण्याची व्यवस्था केली होती. लष्करी वाद्यांची सलामी घेत प्रिन्स उभे असतां त्यांजसमोरून हे सभासद चालत गेले. अखेरचा मनुष्य प्रिन्स समोरून निघून गेल्यानंतर प्रिन्सच्या तैनातींतल्या एका मनुष्यानें झटकन् आपलें घड्याळ खिशांतून बाहेर काढून म्हटलें, "सत्याण्णव मिनिटें सरकार." तोंच दुसरा एक कामगार म्हणाला, "६६,५००."

ज्या ज्या शहरीं आणि गांवीं प्रिन्सची स्वारी गेली, त्या सर्व ठिकाणी या प्रकारची उजळणी झाली. या मोजदादींत पंचवीस आणि चाळीस या वयाच्या दरम्यान असलेल्या जर्मन अमेरिकन पुरुषांची संख्या ३,००,०२० असल्याचें बाहेर आलें आहे.

अमेरिकेच्या बाबतींत जर्मन मुत्सद्यांनीं अनेक चुका केल्या असल्या, तरी अमेरिकेच्या लष्करी बाबतींत जर्मन जनरल स्टाफनें मात्र कोणतीहि चूक केलेली नाहीं. अमेरिकेच्या लष्करी बळासंबंधीं अनेक प्रकारची माहिती जनरल स्टाफच्या दप्तरांत नमूद केलेली आहे. ही माहिती सर्व दृष्टींनीं इतकी परिपूर्ण आहे, कीं, खुद्द अमेरिकन अधिकाऱ्यांसहि ती नसेल. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत असलेल्या जर्मन प्रजेची जर्मनींत ठेवलेली नोंद खुद्द वाशिंगटन येथील खानेसुमारीच्या नोंदीपेक्षांहि अधिक विश्वसनीय आहे. या नोंदीप्रमाणें अमेरिकेंतील एकंदर जर्मन प्रजेची संख्या १,३४,७६,००० असून यांपैकीं ३१,६०,००० खुद्द जर्मनींत जन्मलेले आहेत. यांत २,८५,००० हजार लष्करी शिक्षण घेतलेले लोक असून ते जर्मनीच्या राखून ठेवलेल्या सैन्यापैकीं आहेत. जर्मनी व अमेरिका यांजमध्यें कदाचित् युद्ध उपस्थित झालें, तर या आंकड्यांचा विचार करणें अमेरिकन सरकारास भाग पडेल.

अमेरिकन लोकांत स्वतःबद्दल सहानुकंपा उत्पन्न करण्याचा इंग्लंडनें बराच प्रयत्न केला आणि त्यांत त्यास यशहि आलें. या बाबींत इंग्लंडच्या वर्तमानपत्रांनीं बरीच महत्त्वाची कामागिरी बजावली आहे. याशिवाय इंग्लंडांतील सर दारघराण्यांचे जे शरीरसंबंध अमेरिकन घराण्यांशीं झाले आहेत, तेहि इंग्लंडबद्दल स्नेहभाव उत्पन्न करण्यास कारणीभूत झाले आहेत. संयुक्त संस्थानास आवडणार नाहीं, अशा प्रकारची कोणतीहि ढवळाढवळ इंग्लंडनें कधींहि केली नाहीं. या परिस्थितीचा फायदा इंग्लंडास सध्यां मिळत आहे. युद्धसामग्रीच्या बाबतींत अमेरिकेचें सहाय्य किती मोठें आहे, हें सर्वांस ठाऊक आहेच.

समाप्त.

भारत-गौरव-ग्रंथमाला.

उद्देश व नियम.

सर्व महाराष्ट्रीयांच्या आदरास, अभिमानास व प्रशंसेस पात्र झालेली अशी साऱ्या महाराष्ट्रांत ही एकच ग्रंथमाला असून महाराष्ट्रवाङ्मयाची उत्कृष्ट सेवा या ग्रंथमालेनें किती बाणेदार वृत्तीनें केली आहे, तें सर्वप्रसिद्धच आहे. इतकी लोकप्रिय ग्रंथमाला महाराष्ट्रांत दुसरी कोणतीहि नसून महाराष्ट्रांतल्या अन्य कोणत्याहि ग्रंथमालेपेक्षां या ग्रंथमालेचा प्रसार दुप्पट तिप्पट अधिक आहे. आपण या ग्रंथमालेचे आश्रयदाते असालच. कदाचित् नसल्यास ताबडतोब पत्र पाठवून आश्रयदात्यांत नांव दाखल करा आणि महाराष्ट्रवाङ्मयाची अधिक उत्साहानें सेवा करण्यास आह्मांस कार्यक्षम करा. महाराष्ट्रसाहित्याची सर्वांगीं सेवा करून सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचा शक्य तितक्या कमी किंमतीनें प्रसार करणें हाच या ग्रंथमालेचा उद्देश आहे.

नियम.—(१) आश्रयदात्यांस केव्हांहि नांव दाखल करतां येतें. नांव दाखल करण्यास सहा आणे प्रवेश फी द्यावी लागते. ही प्रवेश फी केव्हांहि परत मिळत नाहीं. (२) ग्रंथमालेनें आजपर्यंत जीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यांपैकीं नंबर १ ते १५ पर्यंतचीं पुस्तकें वर्गणीदारांना प्रत्येकीं सहा आण्यांस व पुढील प्रत्येक आठ आण्यांस मिळेल. ट. ख. शिवाय. वर्गणीदारांस पहिली व्ही. पी. प्रवेशफीसह केली जाते. (३) साधारणतः दोन अडीच महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध होतें. (४) प्रत्येक पुस्तक क्राऊन साईज दोनशें वर पानांचें, सुंदर छपाईचें सुबक बांधणीचें व सचित्र असतें. (५) मागील पुस्तकें वाटल्यास घ्यावींत किंवा घेऊं नयेत; परंतु आश्रयदात्यांत नांव दाखल झाल्यावर पुढें निघणारें प्रत्येक पुस्तक घ्यावें लागतें. जीं पुस्तकें शिल्लक नाहींत, तीं देण्याची जबाबदारी ग्रंथमालेवर नाहीं. (६) मागील सर्व पुस्तकें घेतलीं तरी कोणतीहि सवलत नाहीं. पुस्तकालयें वगैरे संस्थांसहि सवलत देण्यास ग्रंथमाला समर्थ नाहीं. (७) पत्ता वगैरे सुवाच्य लिहिण्याविषयीं विनंति आहे.

प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचीं नांवें.

१ समाजकंटक प्र. खंड (सामाजिक कादंबरी). २ समाजकंटक द्वि. खंड (सामाजिक कादंबरी). ३ दैवलीला (एका सद्गुणी पण दुर्दैवी स्त्रीचें आत्मचरित्र). ४ सावित्री-सत्यवान (पौराणिक कादंबरी) ५ प्रवासिनी (सुशिक्षित स्त्रीची आत्मकहाणी). ६ महात्मा-परिचय (स्वामी विवेकानंदाविराचित कांहीं महात्म्यांचीं चरित्रें). ७ महात्मा-गौतम (बुद्ध चरित्र). ८ जाईचा मंडप प्र. खंड (ऐतिहासिक कादंबरी). ९ जहांगीर (बादशहा जहांगिरचें आत्मचरित्र). १० जाईचा मंडप द्वि. खंड (ऐतिहासिक कादंबरी). ११ समाज रहस्य (सामाजिक कादंबरी). १२ जन्मभूमि प्र. खंड (ऐतिहासिक कादंबरी). १३ जन्मभूमि द्वि. खंड (ऐतिहासिक कादंबरी). १४ प्रेममंदिर (अध्यात्मविषयक कादंबरी). १५ शिवाजीचा उजवा हात (ऐतिहासिक कादंबरी). १६ रजनी (अंध स्त्रीचें आत्मचरित्र). १७ जर्मनीचें पाताळयंत्र. १८ केसरची प्रभावळ. १९ स्वप्नमय आयुष्य (सामाजिक कादंबरी). २० मातृमूर्ति (एका सदुद्यमशील तरुणाचें आत्मचरित्र). २१ कर्मफल (कादंबरी, छापत आहे. १९१७ च्या मार्च महिन्यांत तयार होईल.)

१६ रजनी.

सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्यूगो व बंगकादंबरीकार बंकिमचंद्र या उभयतांच्या दोन कादंबऱ्यांवरून ही रजनी कादंबरी अगदीं स्वतंत्रपणें एका प्रतिभासंपन्न महाराष्ट्र लेखकानें मराठींत लिहिली असून या कादंबरीचें कथानक मराठींत सर्व प्रकारें नवीन आहे. या कादंबरींत एका अनाथ अंधस्त्रीच्या अंधजीवनाचा विलक्षण इतिहास मोठ्या बहारीनें ग्रथित केला आहे. अंधजीवन किती चमत्कृतिपूर्ण असतें, अंधळ्याची अवस्था किती करुणास्पद असते आणि या विश्वसंसाराच्या दृष्टिसुखाला मुकल्यामुळें अंध अंधःकरण कसें करपून गेलेलें असतें, हें चित्रलेखकानें नानाविध रंगीकरणानें फारच कुशलतेनें चित्रित केलें आहे. ज्याला डोळे आहेत अशा प्रत्येक साक्षरानें अंधजीवनाचें हें रहस्यमय

पण अत्यंत करुणास्पद चित्र पहाण्याची हयगय करूं नये, अशी त्यांना आमची नम्र व आग्रहाची विनंति आहे. सर्व पुस्तक इमिटेशन आर्ट पेपरवर छापलें असून एक सुंदर चित्रहि दिलें आहे.

१९ स्वप्नमय आयुष्य !

एक विलक्षण सामाजिक कादंबरी. दक्षिण महाराष्ट्रांतल्या एका अज्ञान संस्थानिकास आपल्या हातांतलें बाहुलें करण्याचा कारभाऱ्याचा प्रयत्न व स्वतंत्र पण सद्वर्तनानें वागण्याचा संस्थानिकांचा निश्चय या दोन गोष्टी या कादंबरींत विशेष मनन करण्यासारख्या असून कारभाऱ्याच्या दुराग्रहामुळें एका निर्बोध, सुशील व सुंदर बालिकेच्या आयुष्याची जी माती झाली आहे, ती पाहून कोणीहि अश्रु गाळल्यावांचून राहणार नाहीं. शेवटीं संस्थानिकावर आपत्तीमागून आपत्ति येऊन कारण नसतां आपल्या संस्थानास कसें मुकावें लागलें, याचा अत्यत करुणाजनक इतिहास यांत दिला आहे.

२० मातृमूर्ति.

विशेषतः कृषिकार्याच्या उन्नतीस वाहून घेतलेल्या एक दुर्दैवी महाराष्ट्र तरुणाची अत्यंत रहस्यमय आत्मकहाणी या पुस्तकांत ग्रथित केली आहे. त्याच्या उद्देशाचा विपर्यास करून त्याच्यावर जी संकटपरंपरा कोसळली आहे, ती पाहून कोणाचेंहि हृदय थरारून जाईल. त्याचें शील बिघडविण्याचा प्रयत्न कित्येक अराजनिष्ठांनीं केला असतांहि तो सरकारशीं सहकारितेनेंच वागलें पाहिजे या तत्त्वापासून न सुटतां शेवटीं त्यानें आपल्या कृषिकर्मविद्येचा जो चमत्कार दाखविला आहे, तो पाहून या तरुणाविषयीं कोणीहि धन्योद्गार काढल्यावांचून राहणार नाहीं.

रजनी, स्वप्नमयआयुष्य आणि मातृमूर्ति हीं तिन्ही पुस्तकें एकत्र व्ही. पी. नें मागवून आश्रयदात्यांत नांव दाखल केल्यास प्रवेश फी द्यावी लागणार नाहीं. म्हणजे तिन्ही पुस्तकें अवघ्या १।१० च्या व्ही. पी. नें पाठविलीं जातील.



सर्व प्रकारचा पत्रव्यवहार खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

प्रभाकर श्रीपत भसे,

व्यवस्थापक, भारत-गौरव-ग्रंथमाला,

गिरगांव—मुंबई.

